४८
१

# वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा

(वनस्पतिशास्त्र-व्याख्यासंग्रह)

संपादक
प्रा. शं. आ. परांडेकर

# वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा

(वनस्पतिशास्त्र-व्याख्यासंग्रह)

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/४८/१
मंत्रालय.

संपादक

**प्रा. शं. आ. परांडेकर** एम्. एस्सी.
बी. ई. एस्. (निवृत्त)

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ

१९७७

प्रकाशक :

सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य–संस्कृति मंडळ, मुंबई, ३२.

पहिली-आवृत्ति १९७७ शके १८९९

मुद्रक :

पां. गो. आपटे
दी प्राज्ञ प्रेस,
३१५ गंगापुरी, वाई (जि. सातारा)

# अर्पण–पत्रिका

कै. तीर्थरूप डॉ. आत्माराम गोपाळ परांडेकर
एल्. एम्. अँण्ड एस्.

( इ. स. १८७६–१९१२ )

यांच्या पवित्र स्मृतीस सादर समर्पण

## अल्प परिचय

**प्रा. शंकर आत्माराम परांडेकर, एम. एस्सी.**

**जन्म :** ( १८-८-१९०६; कागल, कोल्हापूर )

**शिक्षण :** बी. एस्सी. ( ऑनर्स ) १९२७; एम्. एस्सी. १९२९ ( कोल्हापूर, पुणे व मुंबई. ); सरदार अकबरनवीस सायन्स स्कॉलर (१९२७-१९२९); राष्ट्रभाषा प्रविण (१९५२).

**नोकरी :** राजाराम कॉलेज कोल्हापूर; जीवशास्त्र खात्याचे प्रमुख व वनस्पतिशास्त्राचे प्राध्यापक ( १९२९-१९६१); निवृत्त. प्राचार्य, जनता (देवचंद) महाविद्यालय, अर्जुननगर, निपाणी (१९६१-१९६२); निवृत्त. अभ्यागत संपादक-वनस्पतिशास्त्र. ( १९६४- ), मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.

**संशोधन :** वनस्पतिशास्त्र ( कवकविज्ञान, नेचे, शैवले, इत्यादी ).

**लेखन :** 'सुलभ वनस्पति विज्ञान', 'पारिभाषिक शब्दसंग्रह (वनस्पतिशास्त्र)'; 'वनस्पतिशास्त्र' (इंग्रजी पाठ्यपुस्तक); 'सामान्य जीवशास्त्र' (इंग्रजी पाठ्यपुस्तक) इं. ग्रंथ. मराठीत सुमारे शंभर व इंग्रजीत अनेक सुलभ शास्त्रीय लेख ( १९२८-१९७७ ) विविध नियतकालिकात प्रसिद्ध. समीक्षक व लेखक : मराठी विश्वकोश, वाई.

**सहसंपादक :** 'सृष्टिज्ञान' मासिक, पुणे (१९३८-४८).

**सदस्यत्व :** मराठी परिभाषा समिति, पुणे विद्यापीठ ( १९५८-१९६५ ); बोर्ड ऑफ स्टडीज इन् बॉटनी; (१९५०-१९६१ ), पुणे विद्यापीठ; ॲकॅडेमिक कौन्सिल (१९५५-१९५८), पुणे विद्यापीठ; बोर्ड ऑफ स्टडीज इन् बॉटनी, शिवाजी विद्यापीठ (१९७०- ), कोल्हापूर; आजीव सभासद, मराठी विज्ञान परिषद, मुंबई.

**छंद :** विद्यार्थीदशेत बलोपासना व व्यायामप्रकारात ( मल्लखांब, वजन उचलणे, सिंगल व डबल बार्स, इ.) प्राविण्य व पारितोषके. सन्मान्य शारीरिक शिक्षण पर्यवेक्षक (राजाराम कॉलेज, १९२९-१९३९).

पत्ता :
१७३० 'गिरिजाभुवन'
६ वी गल्ली, राजारामपुरी
कोल्हापूर- १

# निवेदन

आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने, तंत्र आणि अभियांत्रिकी इत्यादी क्षेत्रांत त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयांत मराठी भाषेला विद्यापीठाच्या स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य यावे हा मुख्य उद्देश लक्षात घेऊन साहित्य–संस्कृती मंडळाने वाङ्मय निर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. मराठी विश्वकोश, मराठी भाषेचा महाकोश, वाङ्मयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला, आंतरभारती–विश्वभारती, महाराष्ट्रेतिहास इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत केल्या आहेत.

२. मराठी भाषेला विद्यापीठीय भाषेचे प्रगल्भ स्वरूप व दर्जा येण्याकरिता मराठी भाषेत विज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि तंत्रविज्ञान याविषयांवरील संशोधनात्मक व अद्यावत माहितीने युक्त अशा ग्रंथांची रचना मोठ्या प्रमाणावर होण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या प्रसाराने मराठी भाषेचा विकास होईल ही गोष्ट तर निर्विवादच आहे. पण मराठी भाषेचा विकास होण्यास आणखीही एक साधन आहे आणि ते साधन म्हणजे मराठी भाषेत निर्माण होणारे उत्कृष्ट वाङ्मय हे होय. जीवनाच्या भाषेतच ज्ञान व संस्कृती यांचे अधिष्ठान तयार व्हावे लागते. जोपर्यंत माणसे परकीय भाषेच्याच आश्रयाने शिक्षण घेतात, कामे करतात व विचार व्यक्त करतात तोपर्यंत शिक्षण सकस बनत नाही. संशोधनाला परावलंबित्व रहाते व विचाराला अस्सलपणा येत नाही. एवढेच नव्हे तर वेगाने वाढणाऱ्या ज्ञानविज्ञानापासून सर्वसामान्य माणसे वंचित राहतात.

३. वरील विषयांवर केवळ परिभाषाकोश अथवा पाठ्यपुस्तके प्रकाशित करून विद्यापीठीय स्तरावर अशा प्रकारचे स्वरूप व दर्जा मराठी भाषेला प्राप्त होणार नाही. सर्वसामान्य सुशिक्षितांपासून तो प्रज्ञावंत पंडितापर्यंत मान्य होतील अशा ग्रंथांची रचना व्हावयास पाहिजे. मराठी भाषेत किंवा अन्य भारतीय भाषांमध्ये विज्ञान, सामाजिक शास्त्रे व तंत्रविज्ञान या विषयांचे प्रतिपादन करावयास उपयुक्त अशा परिभाषासूची किंवा परिभाषा कोश तयार होत आहेत. पश्चिमी भाषांना अशा प्रकारच्या कोशांची गरज नसते. याचे कारण उघड आहे. पश्चिमी भाषांत ज्या विद्यांचा संग्रह केलेला असतो, त्या विद्यांची परिभाषा सतत वापराने रूढ झालेली असते. त्या शब्दांचे अर्थ त्यांच्या उच्चाराबरोबर वा वाचनाबरोबर वाचकांच्या चटकन ध्यानात येतात, निदान त्या त्या विषयांतील जिज्ञासूंना तरी ते माहीत असतात. अशी अवस्था मराठी आणि अन्य भारतीय भाषांची नाही. परिभाषा किंवा शब्द यांचा प्रतिपादनाच्या ओघात समर्पकपणे वारंवार प्रतिष्ठित लेखांत व ग्रंथांत उपयोग केल्याने अर्थ व्यक्त करण्याची त्यात शक्ती येते. अशा तऱ्हेने उपयोगात न आलेले शब्द केवळ कोशात पडून राहिल्याने अर्थशून्य राहतात. म्हणून मराठीला आधुनिक ज्ञानविज्ञानांची भाषा बनविण्याकरिता शासन, विद्यापीठे, प्रकाशनसंस्था व त्या त्या विषयांचे कुशल लेखक यांनी मराठीत ग्रंथरचना करणे आवश्यक आहे.

४. वरील उद्देश ध्यानात ठेवून मंडळाने जो बहुविध वाङ्मयीन कार्यक्रम आखला आहे त्यातील पहिली पायरी म्हणून सामान्य सुशिक्षित वाचकवर्गाकरिता, इंग्रजी न येणाऱ्या कुशल कामगारांकरिता व पदवी / पदविका घेतलेल्या अभियंत्यांकरिता सुबोध भाषेत लिहिलेली विज्ञान व तंत्रविषयक पुस्तके प्रकाशित करून स्वल्प किंमतीत देण्याची व्यवस्था केलेली आहे. मंडळाने आजवर आरोग्यशास्त्र, शरीरविज्ञान, जीवशास्त्र, आयुर्वेद, गणित, ज्योतिषशास्त्र, भौतिकी, रेडिओ, अणुविज्ञान, सांख्यिकी, स्थापत्यशास्त्र, पाणीपुरवठा, वनस्पतिशास्त्र, इत्यादी विषयांवर ३९ दर्जेदार पुस्तके विज्ञानमालेत प्रकाशित केली आहेत. वस्त्रोद्योग, प्रकाशचित्रणकला, गणकयंत्रे, रंग, कृत्रिम धागे, पुस्तकबांधणी, मोटारदुरुस्ती, वैमानिकविद्या, अवकाशयान, सीमेंट, वास्तुकला इत्यादी इतर अनेक विषयांवरील पुस्तके तयार होत आहेत.

५. प्रस्तुत "वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा" (वनस्पतिशास्त्र-व्याख्यासंग्रह) प्रा. शं. आ. परांडेकर यांनी संपादित केला असून मंडळाच्या विज्ञानमालेत सदर कोश प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे. हा व्याख्यासंग्रह अतिशय परिश्रमाने व काळजीपूर्वक तयार करण्यात आलेला असून पदवी परीक्षेपर्यन्त वापरण्यात येणारे शब्द त्यांत समाविष्ट आहेत. पारिभाषिक शब्दांचे मराठी प्रतिशब्द व त्यांचा अर्थ सुलभ भाषेत उदाहरणे देऊन स्पष्ट करण्यात आलेला आहे. यापूर्वी मंडळाने १९६९ मध्ये प्रा. गो. रा. परांजपे यांनी संपादित केलेला "वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा" (पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र आणि गणितशास्त्र यांतील पारिभाषिक शब्दांचा कोश) प्रकाशित केला आहे. आतापर्यन्त वनस्पतिशास्त्रावरील पारिभाषिक शब्दकोश थोड्याफार प्रमाणात प्रसिद्ध झाले आहेत. पण या सर्व प्रकाशनांत शब्दांची व्याख्या अगर खुलासा असत नाही. काही वेळा इंग्लिश शब्दाइतकाच मराठी अगर संस्कृत शब्द दुर्बोध असतो. याकरिता शब्दाची सोदाहरण व्याख्या असणे जरूर आहे. ही उणीव प्रा. परांडेकर यांनी संपादित केलेल्या "वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा" ने भरून काढली.

वाई :
ज्येष्ठ ११, शके १८९९
दिनांक १ जून, १९७७.

**लक्ष्मणशास्त्री जोशी**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई-३२.

# प्रास्ताविक

चालू शतकाच्या आरंभापासून ते आजपावेतो महाराष्ट्रात वनस्पतिशास्त्रावर मराठीत थोडीफार ग्रंथनिर्मिती झाली असून अनेकांनी त्याशिवाय लहानमोठे लेख सामान्य वाचकांकरीता वृत्तपत्रातून व नियतकालिकांतून प्रसिद्ध केले आहेत; तत्पूर्वी तसा प्रयत्न फारच कमी झाला होता; कारण माध्यमिक व उच्च शिक्षणात इंग्रजीचा वापर हल्लीपेक्षा बराच मोठा होता. प्रसिद्ध झालेल्या मजकुरात उपयोगात आणलेल्या पारिभाषिक संज्ञा थोडया व विविध आहेत. विद्यापीठे व सरकार यांच्या अलीकडे झालेल्या उपक्रमांमुळे काही विज्ञान–परिभाषासंग्रह उपलब्ध झाले आहेत व काही पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. खासगी प्रयत्नांमुळेही पारिभाषिक संज्ञांची निर्मिती, संकलन व प्रसिद्धी झाली आहे; काही पाठचपुस्तकांतूनही इंग्रजीतील संज्ञांचे मराठी किंवा संस्कृत पर्याय असलेल्या याद्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. महाराष्ट्र साहित्य व संस्कृति मंडळाने मराठी विश्वकोशाचा १८ वा खंड प्रसिद्ध ( इ. स. १९७३ ) केला असून त्यामध्ये अनेक विषयांतील इंग्रजी संज्ञांचे मराठी वा संस्कृत पर्याय दिले आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेनेही परिभाषाकोश प्रसिद्ध ( इ. स. १९६२ ) केला आहे. अशा सर्व प्रयत्नांमुळे पारिभाषिक संज्ञांना ( मराठी वा संस्कृत ) आता निश्चितपणा मिळून एकरूपता येऊ लागली आहे. तथापि अद्याप सर्वच इंग्रजी संज्ञांना मराठी किंवा संस्कृत पर्याय नाहीत व लेखकांना स्वतःच्या कल्पनेनुसार त्या संज्ञा बनवाव्या लागतात; काही सरकारी कोशांत तर कित्येक इंग्रजी संज्ञा जशाच तशा ठेवल्या गेल्या आहेत.

इंग्रजीतील अनेक शब्दकोशांत वैज्ञानिक व तांत्रिक संज्ञांच्या व्याख्या किंवा लहान मोठे स्पष्टीकरण दिलेले असते; त्यावरून ( पहा संदर्भग्रंथांची यादी ) विद्यार्थी, शिक्षक व जिज्ञासू वाचक यांना संज्ञांचा अर्थबोध त्वरित होऊ शकतो. मराठी पाठचपुस्तकांतून किंवा इतर ग्रंथांतून अशा संज्ञा मजकुरात येऊन वाचकाला त्यांचे अर्थ स्पष्टपणे कळतात, परंतु इंग्रजी कोशाप्रमाणे अर्थबोध त्वरित होण्यास पारिभाषिक व्याख्यासंग्रहासारखा संदर्भ ग्रंथ आवश्यक ठरतो. मराठीत वनस्पतिशास्त्रातील पारिभाषिक संज्ञांच्या व्याख्या किंवा त्यांचे स्पष्टीकरण एकत्र देणारा ग्रंथ अद्याप प्रसिद्ध झालेला नाही. पुणे विद्यापीठाने इंग्रजी पारिभाषिक संज्ञांचे मराठी व बहुतांशी संस्कृत पर्याय निश्चित करण्याकरिता समिती नेमून तिच्यातर्फे वनस्पतिशास्त्र ( वानसशास्त्र ), वास्तवशास्त्र, प्राणिशास्त्र, रसायनशास्त्र, भूशास्त्र, गणितशास्त्र, ज्योतिःशास्त्र व तर्कशास्त्र इत्यादी शास्त्रांतर्गत संज्ञांचे मराठी पर्याय देणाऱ्या पुस्तिका प्रसिद्ध केल्या व त्याचप्रमाणे मराठी-इंग्रजी अशी मांडणी केलेल्या पुस्तिकाही प्रसिद्ध केल्या ( इ. स. १९६० – ६५ ). याच आधारावर इंग्रजी-मराठी असे व्याख्यासंग्रह प्रसिद्ध व्हावे यास पुणे विद्यापीठाने तत्त्वतः मान्यता दिली. त्यानुसार वास्तवशास्त्र, गणितशास्त्र व रसायनशास्त्र या तीन शाखांतील संज्ञांचा इंग्रजी – मराठी व्याख्यासंग्रह प्रा. गो. रा. परांजपे ( चिटणीस, मराठी परिभाषा समिती, पुणे विद्यापीठ ) यांनी तयार केला व महाराष्ट्रराज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाने तो प्रसिद्ध ( इ. स. १९६९ ) करून विज्ञान-साहित्य वर्धनाला बहुमोल साहाय्य केले आहे. त्याच धर्तीवर प्रस्तुतचा वनस्पतिशास्त्राचा व्याख्यासंग्रह बनविलेला असून त्याचा यथायोग्य सर्वांना उपयोग होईल असा विश्वास वाटतो.

महाराष्ट्रातील शिक्षण संस्थांची संख्या आता खूपच वाढली असून शास्त्रीय विषयांचे मराठीतून शिक्षण घेणारे विद्यार्थी, शास्त्रीय शिक्षण देणारे भिन्न स्तरावरील शिक्षक व लेखक यांची संख्याही बरीच वाढली आहे. सामान्य वाचकवर्गाचाही शास्त्रीय संज्ञांशी संबंध वाढत आहे; अशा वेळी अर्थबोध सहज व त्वरित होईल अशा ह्या वनस्पतिशास्त्रातील पारिभाषिक संज्ञांच्या व्याख्यासंग्रहाचे स्वागत होईल अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.

ह्या व्याख्यासंग्रहात वनस्पतिशास्त्रात सामान्यपणे उपयोगात आलेल्या इंग्रजी संज्ञा व त्यांना दिलेले मराठी ( वा संस्कृत ) पर्याय मुख्यतः महाराष्ट्र साहित्य व संस्कृति मंडळाने प्रसिद्ध केलेल्या विश्वकोशाच्या

१८ व्या खंडातून घेतले असून त्या अभावी किंवा कधी त्याऐवजी इतर खासगी व सरकारी कोशांतून घेतले आहेत; कित्येक इंग्रजी ( किंवा लॅटिन अथवा ग्रीक ) संज्ञा व त्यांचे मराठी पर्याय नव्याने अंतर्भूत केले आहेत. वनस्पतिशास्त्राच्या सर्व शाखांतून वापरात असलेल्या सर्वच संज्ञा येथे समाविष्ट आहेत असा लेखकाचा दावा नाही; तथापि साधारणपणे पदवीपर्यंतच्या अभ्यासक्रमात अंतर्भूत असलेल्या विषयांतील बहुतेक सर्व इंग्रजी संज्ञा, त्यांचे पर्याय ( मराठी वा संस्कृत संज्ञा ) आणि त्यांच्या व्याख्या किंवा स्पष्टीकरण यांचा समावेश केला आहे; एकूण सुमारे पाच हजार संज्ञा आहेत.

व्याख्या किंवा स्पष्टीकरण समजण्यास सोपे व्हावे या दृष्टीने सामान्य व परिचित वनस्पतींची काही उदाहरणे दिली आहेत. आयात केलेल्या कित्येक वनस्पतींना मराठी नावेच नाहीत; अशांचा उल्लेख इंग्रजी वा लॅटिन नावांनीच करणे भाग पडले आहे. अशा काही थोड्या इंग्रजी नावांचे उपलब्ध असलेले भाषांतरित पर्याय दिले असून तसेच काही नवीन सुचविले आहेत. अशी भाषांतरित नावे रूढ केल्यास मराठी भाषा शुद्ध राहून समृद्ध होईल अशी अपेक्षा आहे. भारतात सध्या चालू असलेल्या तांत्रिक, वैज्ञानिक व औद्योगिक क्षेत्रांतील प्रगतीमुळे सध्या अनेक इंग्रजी व लॅटिन नावे रूढ होत आहेत पण एकतर ती उच्चारण्यास अडचण भासते व त्यांचे उच्चारणही चुकीचे होते. वैज्ञानिक विषयांचे लेखन व शिक्षण मराठीतून होत असताना आयात वनस्पतींच्या नावांचेही योग्य असे सामान्य मराठीकरण होणे आवश्यक आहे; मूळची नावे विशेषनामे आहेत हे मान्य करूनही मराठीकरणाचा प्रयत्न व्हावा. 'डायाटमी'ला 'करंडक कुल', 'लेम्नेसी'ला 'कारंड पादप' कुल, 'ट्री ऑफ लाइफ'ला 'जीवनवृक्ष', 'रेन ट्री' याला 'वर्षावृक्ष', 'फौंटन ट्री'ला 'कारंज वृक्ष' 'ट्रंपेट ट्री'ला 'तुतारी वृक्ष', 'कॅनन बॉल ट्री'ला 'तोफगोळा वृक्ष' इ. 'करीलीफ'ला कढिलिंब ही तर रूढच संज्ञा आहे; अशी नावे वापरण्यात भाषाशुद्धी व भाषासमृद्धी ह्या दोन गोष्टी साध्य होतात. काही लॅटिन संज्ञांतही संस्कृत संज्ञांचा अंतर्भाव झालेला आढळतो; उदा. पुत्रजीवी (पत्रवंती) या वृक्षाचे लॅटिन नाव 'पुत्रंजीव रॉक्सबर्घाय' असे आहे. आजच्या मराठीतील कित्येक वनस्पतींची नावे संस्कृत, इंग्रजी, अरबी, उर्दू व द्राविडी भाषांतून अपभ्रष्ट रूपात रुढ झाली आहेत हे अनुभवसिद्ध आहे. उदा. 'पॉइनसेटिया' वरून पानचेटी, 'कॉलिफ्लावर' वरून फुलवर, 'कॅबेज' वरून कोबी, 'पोटॅटो' वरून बटाटा, 'टोबॅको ( टाबॅकॉस )' वरून तंबाखू ( तमाखू ); संस्कृत, 'अक्षोट' वरून अक्रोड, 'अतसी' वरून अळशी, 'कुंचला' वरून कुचला; 'फरझ बीन व फ्रेंच बीन' वरून फरसबी, 'सनफ्लावर' वरून सूर्यफूल, 'गुले अबास' वरून गुलबाक्षी ( गुलबुश ) इत्यादी अनेक उदाहरणे मिळतात. मराठीकरणाचा सुयोग्य प्रयोग व्यक्तिगत न होता अधिकृतरीत्या तज्ञांकडून होऊन सरकारमान्य व्हावा हे उचित; त्यामुळे तशा संज्ञांत एकरूपता येईल. कै. डॉ. रघुवीर यांच्या प्रचंड शब्दकोशात अशा प्रयत्नाने अनेक संस्कृत नावे बनविलेली आढळतात; त्यातील बरीच काही समर्थनीय वाटतात; उदा. 'पर्पल रीथ'ला 'नील हार', 'नार्सिसस'ला 'इंदिरा' ( याला हिंदीत 'नर्गीस' रूढ झाला आहे ), 'नॅस्टर्शियम'ला 'इंदुशूर' व 'फॅगॅसी'ला 'चिक्कणवल्क कुल' इत्यादी अनेक प्रतिशब्द व्युत्पत्तीनुसार दिलेले आढळतात. पुणे विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेत ( वानसशास्त्रीय ) शेवटी दिलेल्या पुरवणीत काही रूढ इंग्रजी - मराठी नावे दिली आहेत, त्याच धर्तीवर विस्तृत व स्वतंत्र कोश झाल्यास उपयुक्त ठरेल. विश्वकोशाच्या १८ व्या खंडात फक्त विश्वकोशाशी संबंधित वनस्पतींच्या इंग्रजी – मराठी नावांची यादी आली आहे; सध्या ती अपुरी आहे.

वाचकांपुढें आलेली एखादी संज्ञा वा पर्याय कोणत्या इंग्रजी किंवा लॅटिन संज्ञेबद्दल वापरली आहे याचा बोध व्हावा म्हणून प्रस्तुत ग्रंथातील मराठी वा संस्कृत ( किंवा अंतर्भूत केलेल्या लॅटिन वा इंग्रजी ) संज्ञांची सूची शेवटी दिली आहे; मूळच्या शब्दावलीत काही ग्रीक व लॅटिन संज्ञा ( प्रत्यय, उपसर्ग, विशेषणे इ. ) दिल्या असून त्यांचा वनस्पतींची नावे बनविण्यात कसा उपयोग केला गेला आहे हे समजण्यास आवश्यक ती वनस्पतींची नावे ( रोमन लिपीत ) दिली आहेत. इंग्रजीतील कित्येक वैज्ञानिक शब्दकोशात संज्ञांची व्युत्पत्ती दिलेली आढळल्याने तशी येथे देण्याची आवश्यकता वाटली नाही; येथे मराठीत व्याख्या व स्पष्टीकरण देणे हा प्रमुख उद्देश पुढे ठेवून विषयाची मांडणी केली आहे; शिवाय स्थलाभाव आहेच.

पाश्चात्त्य भाषांतील अनेक संज्ञा ( वैज्ञानिक, तांत्रिक अथवा सामान्य ) रोमन, ग्रीक, लॅटिन इत्यादी जुन्या प्रचलित भाषांशी संबंधित आहेत; त्याचप्रमाणे भारतातील अनेक भाषांतील शब्द संस्कृत व द्राविडी

भाषांतील मूळ शब्दांवरून आले असावेत हे मान्य झाले आहे; कित्येक शब्द फार्सी, उर्दू व अरबी या भाषांतून आले आहेत. ह्या व्याख्यासंग्रहात अंतर्भूत केलेल्या नवीन सुयोग्य ( सुटसुटीत, उच्चारणसुलभ, अर्थवाही व व्याकरणशुद्ध ) संज्ञा सुचवितांना संस्कृतचा भरपूर उपयोग करणे क्रमप्राप्त असल्याचे अनुभवास आले आहे.

पुणे विद्यापीठाच्या मराठी भाषासमितीचा एक सभासद या नात्याने स्वतः लेखकाने ( संपादकाने ) असे अनेक शब्द ( पारिभाषिक संज्ञा ) नव्याने सुचविले होते व ते समितीने स्वीकारून प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकात समाविष्ट केले आहेत. तसेच लेखकाने पूर्वी 'सृष्टिज्ञान' मासिकातून क्रमशः प्रसिद्ध ( इ. स. १९४२ ) केलेल्या 'पारिभाषिक शब्दसंग्रहात' अनेक शास्त्रीय संज्ञा सुचविल्या होत्या; 'सुलभ वनस्पति-विज्ञान' या स्वतः लिहिलेल्या ( इ. स. १९३७ ) पुस्तकात व इतर अनेक लेखांत ( इ. स. १९२८–१९७७) आजपावेतो अनेक नवीन संज्ञा सुचवून वापरातही आणल्या आहेत. मराठी विश्वकोशाच्या १८ व्या खंडातील वनस्पतिशास्त्रासंबंधीच्या अनेक पारिभाषिक संज्ञा त्यापैकीच आहेत. ह्या व्याख्यासंग्रहात काही जुन्या संज्ञा सुधारून घेतल्या आहेत. नवीन सुचविलेल्या काही संज्ञांत सुटसुटीतपणा आणण्यास त्यातील काही पदे गाळून त्यांना संक्षिप्त स्वरूप दिले आहे; उदा. लघुबीजुककोशपर्ण ( microsporophyll ) या लांबलचक संज्ञेऐवजी लघुबीजुकपर्ण ही संज्ञा सुचविली आहे; तसेच 'लघुबीजुककोशपुंजफल' (microsporocarp) याऐवजी 'लघुबीजुकफल' ही संज्ञा सुचविली आहे; या नूतन स्वरूपामुळे अर्थहानी होत नाही. 'वाहिनीवंत अबीजी वनस्पती' ऐवजी 'नेचाभ पादप' ही नवीन संज्ञा Vascular cryptogams किंवा Pteridophyta या इंग्रजी संज्ञेला समर्पक वाटते, कारण कित्येक इंग्रजी ग्रंथांतून त्याचा सामान्य अर्थ Ferns and their allies ( नेचे व त्यांचे स्वकीय ) असा दिलेला आहे. येथे सुचविलेल्या संस्कृत पर्यायी संज्ञा मूळच्या इंग्रजीसंज्ञेपेक्षा मोठ्या खास नाहीत व अर्थवाही आहेत.

वनस्पतींच्या अनेक प्रमुख व महत्वाच्या कुलांच्या, गणांच्या आणि वर्गांच्या (वर्गीकरणातील भिन्न दर्जाच्या गटांच्या ) काही संज्ञा प्रस्तुत ग्रंथात अंतर्भूत केल्या असून त्यासंबंधीच्या स्पष्टीकरणात भिन्न मते व वर्णनात्मक तपशील अपरिहार्य वाटल्याने दिला आहे. तेथे फक्त त्रोटक व्याख्या दिल्यास मतभेद होणे शक्य असल्याने तपशिलाचा प्रपंच करणे प्राप्त झाले. आज वनस्पतिशास्त्रातील विभाग, वर्ग, कुले, गण व वंश इत्यादींच्या वर्गीकरणातील व्याप्तीसंबंधी शास्त्रज्ञांत मतभेद असल्यामुळे भिन्न देशांत भिन्न पद्धती रूढ आहेत व पाठ्य पुस्तकांतून व इतर अधिकृत ग्रंथातूनही या मतभेदांचे दर्शन घडते. नवीन संशोधनानुसार नव्या समजुती व नवे संकेत यांचा प्रसार होत असून वर्गीकरणात बदल होत आहेत; वनस्पतींची मूळची लॅटिन नावे ( वंश व जाती ) बदलत आहेत; इतकेच नव्हे, तर त्यांचा अंतर्भाव कधी नवीन कुलात किंवा गणात केला जात आहे; कुलांना गणाचा दर्जा देणे किंवा गणांची व्याप्ती कमी करणे किंवा वाढविणे असेही बदल होत आहेत. याच कारणास्तव अंतर्भूत केलेल्या काही कुलांची व गणांची तपशीलवार लक्षणे देणे भाग पडले आहे. कुल व गण यांचे मराठी पर्याय त्या त्या गटातील प्रमुख व परिचित वनस्पतीच्या संस्कृत किंवा मराठी नावाने सुचविले आहेत; तथापि त्याबद्दल मतभेद होणे साहजिक आहे, म्हणून त्यासंबंधीची मूळची लॅटिन संज्ञा देवनागरीत दिली आहे. इंग्रजीत कुलांची लॅटिन नावे बहुधा प्रमुख वंशाच्या लॅटिन नावावरून व गणांची नावे प्रमुख कुलनामावरून दिली जातात; उदा– Asclepiadaceae या कुलाचे नाव *Asclepias* या वंशनामावरून पडले आहे. मराठीत 'काकतुंडी कुल' असा पर्याय वापरणे योग्य ठरेल कारण *Asclepias curassavica* L. ही काकतुंडी नावाची भारतातील वनस्पती *Asclepias* वंशातील आहे. पण ती परिचित व सामान्य नसल्याने 'रुई' या त्याच कुलातील पण भिन्न वंशातील व फार सामान्य जातीवरून 'रुई कुल ही संज्ञा त्या कुलाला सुचविली आहे. 'करंबा कुल' या संज्ञेऐवजी 'पारिजातक' कुल ही संज्ञा ओलिएसी ( Oleaceae ) नावाच्या कुलाला सुचविली आहे. कारण ओलिया वंशातील करंबा ( *Olea dioica* Roxb. ) फारशी परिचित वनस्पती नाही; याच कुलाला 'मालती कुल' असेही नाव दिलेले आढळले; मालती हे नाव दोन भिन्न वनस्पतींना दिल्याचे आढळते, त्यामुळे गोंधळ होण्याचा संभव अटळ होतो; एका सामान्य वनस्पतीला संस्कृतात अनेक नावे असल्यामुळे संस्कृत नावाचा उपयोग सावधगिरीनेच करावा लागतो.

कोणत्याही पारिभाषिक संज्ञेच्या व्याख्येत किंवा स्पष्टीकरणात सोपेपणा आणण्यास त्यात इतर पारिभाषिक संज्ञा टाळणे जितके आवश्यक तितकेच त्या टाळणे कठीण असते. काही संज्ञा मौलिक असल्याने त्या शेकडो वेळा पुनः पुनः चर्चेत येतात व दरवेळी त्यांचेही स्पष्टीकरण करण्यात मूळच्या व्याख्येचा अतिविस्तार होतो. स्थलाभावी व व्याख्येचा सुटसुटीतपणा राखण्यास काही संज्ञा पुनः पुनः वापरल्या आहेत व आवश्यक तेथे त्यांच्याशी संबंधित संज्ञांचा किंवा त्यांच्या इंग्रजी पर्यायांचा संदर्भ 'पहा' या सूचनेने दिला आहे; तेथे अधिक माहिती मिळतेच आहे; तसेच एखाद्या संज्ञेच्या उलट अर्थाच्या संज्ञेचाही उल्लेख 'पहा' या सूचनेने दिला आहे. एखादी विशेषणात्मक संज्ञा कोणत्या नामाला उद्देशून वापरली जाते हे कळण्यास, त्या व्याख्येच्या अथवा स्पष्टीकरणाच्या शेवटी ते नाम कंसात दिले आहे व जरूर तेथे पुढे उदाहरणही दिले आहे. एखाद्या संज्ञेचा इतर अनेक संज्ञांत उपसर्ग किंवा प्रारंभिक भाग म्हणून समावेश असल्यास पुढील ( त्याखाली येणाऱ्या ) इतर संज्ञांचा तो पहिला भाग आडव्या लांबट रेषेने दर्शविला आहे; तसेच त्या रेषेपुढील स्वल्पविरामामुळे रेषेऐवजी येणारी संज्ञा विरामापुढील संज्ञेनंतर आहे असे समजावे.

' पुष्पसूत्र ' या संज्ञेच्या स्पष्टीकरणात ते मराठीत कसे लिहिता येईल याची रूपरेखा दिली आहे. त्यामध्ये फुलातील भिन्न मंडलाकरिता वापरलेल्या लॅटिन संज्ञाच्या आद्याक्षरांचा उपयोग सर्व इंग्रजी ग्रंथांतून कसा केला जातो व तसेच फुलांच्या संरचनेसंबंधीची काही चिन्हे त्या सूत्रात कशी उपयोगात आहेत हे दर्शविले आहे. एखाद्या इंग्रजी किंवा लॅटिन वनस्पतिवर्णनात हा आंतरराष्ट्रीय संकेत पाळणे आवश्यक असते; परंतु मराठी पुस्तकांतील वनस्पतिवर्णनातील पुष्पसूत्रात, मराठी संज्ञेनुसार (पण आंतरराष्ट्रीय साच्यात ), फुलाची संरचना कशी दर्शविता येईल हेही तेथे सुचविले आहे; त्यात आंतरराष्ट्रीय चिन्हांचा उपयोग केला आहे. फक्त पुष्पदलांच्या मंडलांच्या (संवर्त, पुष्पमुकुट, केसरमंडल व किंजमंडल) संस्कृत संज्ञांची आद्याक्षरे (सं, पु, के व किं) वापरता येतात असे सुचविले आहे.

एखादी इंग्रजी संज्ञा दोन किंवा अधिक अर्थाने वापरात असल्यास तिचे मराठी पर्याय आवश्यक तेथे कंसात क्रमांक घालून दिले आहेत व भिन्न व्याख्या त्या त्या पर्यायी संज्ञेच्या क्रमांकापुढे दिल्या आहेत. इंग्रजी संज्ञेपुढे कंसात काही ठिकाणी पर्यायी इंग्रजी संज्ञा दिल्या असून कधी कधी लॅटिन किंवा ग्रीक संज्ञेचा इंग्रजी पर्याय किंवा अर्थ दिला आहे. वंश, कुल, गण, वर्ग इत्यादी गटवाचक संज्ञा मोठ्या टंकांत दिल्या असून वनस्पतींची लॅटिन नावे रोमन लिपीत असल्यास तिरप्या टंकात दिली आहेत. देवनागरीतील लॅटिन नावे साध्या टंकातच आहेत. वनस्पतिशास्त्र व प्राणिशास्त्र या दोन्हींत वापरात असलेल्या काही सामान्य इंग्रजी संज्ञा दिल्या असून, भिन्न अर्थी असल्यास तसे स्पष्टीकरण दिले आहे.

सध्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षण-क्रमात वापरात येऊन रूढ होत असलेल्या जीवशास्त्रीय मराठी संज्ञा, शक्य तो येथे दिलेल्या व्याख्येशी जुळत्या असतील, त्यांचा अंतर्भाव पर्यायी म्हणून केला आहे; अशा काही संज्ञा (पर्याय) सूचीमध्ये पहिल्या संज्ञेपुढे कंसात दिल्या आहेत, त्यावरून त्या कोणत्या इंग्रजी संज्ञेकरिता आल्या आहेत ते समजू शकेल.

वनस्पती (किंवा प्राणी) यांच्या नैसर्गिक वर्गीकरणात त्यांच्यामध्ये आढळलेले साम्य व भेद विचारात घेऊन लहानमोठे गट केले जातात. सर्वात मोठा गट विभाग या नावाने ओळखला जात असून त्यामध्ये अनेक वर्ग अंतर्भूत असतात. प्रत्येक वर्गात काही गणांचा समावेश असून प्रत्येक गणात काही कुले समाविष्ट करतात. अनेक वंश एका कुलात व शेवटी अनेक जातींचा एक वंश केलेला आढळतो. हे स्थूल मानाने केलेले वर्गीकरण अनेकदा अपुरे पडल्याने काही पद्धतीत मध्यम प्रकारचे गट केले जातात. जाती हा गट अनेक उपजातींचा व उपजातीत अनेक प्रकार केलेले आढळतात. तसेच एका कुलात काही उपकुले व उपकुलात काही गोत्रे समाविष्ट करून एका गोत्रात काही गण अंतर्भूत करतात. विभागाचे उपविभाग व एका वर्गाचे काही उपवर्ग केलेले आढळतात; थोडक्यात, विभाग, उपविभाग, वर्ग, उपवर्ग, गोत्र, गण, उपगण, कुल, उपकुल, वंश, जाती, उपजाती व प्रकार इत्यादी भिन्न दर्जातील एककांची क्रमवार मांडणी केली जाते. सर्वांत खालच्या गटातील व्यक्तीत साम्य अधिक व वरच्या गटातील व्यक्तींशी तुलना करता अधिक भेद असल्याचे आढळते. हे भेद जसजसे खालून वर जावे तसतसे वाढत जातात. कधी एखाद्या वंशात एकच

जाती व एखाद्या कुलात एकच वंश किंवा एखाद्या गणात एकच कुल असेही वर्गीकरण आढळते. निरनिराळ्या दर्जावरील गटांची व्याप्ती हा कधी कधी वादग्रस्त विषय बनल्याने वर्गीकरणात भिन्नता येते. यासंबंधीचा तपशील व काही उदाहरणे प्रस्तुतच्या व्याख्यासंग्रहात त्या त्या गटांच्या स्पष्टीकरणात समाविष्ट केली आहेत. उदा. आंबा, काजू, बिब्बा व चारोळी या भिन्न जाती भिन्न वंशांतील असून एकाच आम्रकुलात घातल्या जातात; ही तीनही फुलझाडे असल्याने व त्यांच्या बीजात दोन दलिका असल्याने त्यांचा समावेश बीजी विभागातील फुलझाडें (आवृतबीज) या उपविभागात व द्विदलिकित वर्गातील अरिष्ट( रिठा) गणात ( सॅपिंडेलिझमध्ये ) व आम्रकुलात ( ॲनाकार्डिएसीमध्ये ) केला जातो. आंब्याच्या भिन्न प्रकारांचा (हापूस, पायरी, लंगडा, बलसाड, मानकोर व तोतापुरी ) अंतर्भाव आंबा, मँजिफेरा इंडिका ह्या लॅटिन नावाच्या एकाच जातीत केला जातो.

प्रस्तुतच्या व्याख्यासंग्रहाची छपाई सुरू असताना कित्येक पारिभाषिक संज्ञांचा उल्लेख राहून गेल्याचे आढळले; ती उणीव भरून काढण्याकरिता ‘ पुरवणी ’ लिहून काढण्याची आवश्यकता भासली; म्हणून तिचा स्वतंत्र अंतर्भाव शेवटी केला आहे.

व्याख्यासंग्रहाच्या निर्मितीत संकलन व लेखन ह्या दोन्हींचा समावेश होतो; त्यातील जबाबदारीची जाणीव लेखकास आहे. अडचणींची जाणीव ‘ जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे. ’ प्रयत्न करूनही काही चुका राहून जाणे ही गोष्ट स्वाभाविक वाटते; म्हणून वाचकांनी त्या चुका दाखवून द्याव्या अशी आग्रहाची विनंती आहे. पुनरावृत्ति काढण्याचे भाग्य लाभल्यास त्या चुकांची दुरुस्ती करणे शक्य होईल. सध्या छापील मजकुरात आढळून आलेले मुद्रणदोष व इतर दोष **शुद्धिपत्रात** अंतर्भूत केले आहेत; वाचकांनी त्याची दखल अवश्य घ्यावी.

## ऋणनिर्देश

प्रस्तावनेत उल्लेख केल्याप्रमाणे पुणे विद्यापीठाने वैज्ञानिक संज्ञांचे व्याख्यासंग्रह लिहिले जावे असे तत्त्व मान्य केल्यानंतर प्रा. गो. रा. परांजपे ( आय्. ई. एस्., निवृत्त ) यांनी त्याप्रमाणे वास्तव, रसायन व गणित या विषयांतील संज्ञांचा व्याख्यासंग्रह लिहिण्यास सुरवात केली. त्याच वेळी वनस्पति-शास्त्रातील संज्ञांचा व्याख्यासंग्रह मी लिहावा अशी विनंति मला केली होती. त्यांनी आपले कार्य पूर्ण केल्याला आज सात वर्षे होऊन गेली. परंतु माझा वेळ अन्य कार्यात ( मराठी विश्वकोश वाई, येथे अभ्यागत संपादकाच्या कामात व इतर काही कार्यात) गेल्याने व्याख्यासंग्रहाचे काम रेंगाळत पडले; ही एक मी इष्टापत्तीच समजतो कारण त्यामुळे वाई येथील कार्यालयात वनस्पतिशास्त्रावरील अनेक नवनवीन ग्रंथाचे जवळून परिशीलन करण्याची अमोल संधी मला मिळाली व त्यामुळे प्रस्तुतचा व्याख्यासंग्रह अधिक अद्ययावत व विस्तृत करता आला. या अवधीत प्राचार्य परांजपे यांनी माझ्यावर टाकलेल्या ह्या कार्याची पुनः पुनः आठवण दिली नसती तर हे कार्य आणखीच रेंगाळले असते. त्यांनी स्वतः कार्यरत राहून मला आपल्या उदाहरणाने प्रोत्साहन दिले, इतकेच नव्हे, तर काही उपयुक्त सूचनाही केल्या याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहे.

“ मराठी विश्वकोशाच्या ” प्रमुख संपादनाचे प्रचंड कार्य ज्यांनी आज सुमारे सतरा वर्षे सुरू ठेवले आहे व त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाच्या साहित्य आणि संस्कृति मंडळाचे अध्यक्ष या नात्याने साहित्याच्या क्षेत्रातील विविध कार्येही जोमाने चालू ठेविली आहेत, त्या प्रकांडपंडित पद्मभूषण तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, डि. लिट्. यांचा मी ऋणी आहे. गेली सुमारे बारा-तेरा वर्षे मी त्यांच्या सहवासात असल्याने त्यांची अभ्यासू वृत्ती, विवेचक बुद्धी, विद्वत्ता व अखंड कार्यरत असण्याचे व्रत इत्यादींचा प्रभाव माझ्या ह्या कार्याला पोषक ठरला आहे, हे मान्य करण्यात मला अभिमान वाटतो; त्यांनी केलेल्या काही सूचनांबद्दल व या ग्रंथात अंतर्भूत केलेल्या निवेदनाबद्दल त्यांचे आभार मानण्यास शब्द अपुरे पडतात.

हा व्याख्यासंग्रह जिज्ञासू वाचकांकरिता सादर करीत असताना माझ्या तीर्थरूपांचे स्वाभाविक स्मरण मला होत आहे. माझे वडील तीर्थरूप कै. डॉ. आत्माराम गोपाळ परांडेकर, एल्. एम्. ॲन्ड एस्. हे इ. स.

१९०१–२ च्या सुमारास 'ग्रंथमाला' या तत्कालीन ( इ. स. १८९४–१९०६ ) व कोल्हापुरातून प्रसिद्ध होत असलेल्या प्रतिष्ठित नियतकालिकात लेखन करीत असत. विशेषतः वनस्पतिविषयक व दीर्घायुष्यविषयक त्यांचे लेखन त्यावेळी प्रसिद्ध झाले; परंतु त्यांच्या अकाली निधनामुळे मराठीत शास्त्रीय लेखन करण्याची त्यांची इच्छा अपूर्ण राहिली. त्यांचे हे लेखन मी पुढे वनस्पतिविषयक जुने वाङ्मय अभ्यासत असताना माझ्या वाचनात आले. त्यामुळे आपण अशा प्रकारचे लेखन करावे, ही प्रेरणा निर्माण झाली. वडिलांची शास्त्रीय लेखनाची इच्छापूर्ती करण्याचे आपले कर्तव्य असल्याची जाणीवही त्या लेखनामागे होती. त्याप्रमाणे इ. स. १९२८ पासून आज १९७७ पर्यंत मी लेखनाचा क्रियाशील प्रयत्न करीत आलो आहे. माझ्या हातून जे काही थोडेफार इंग्रजी व मराठी शास्त्रीय लेखन झाले, त्याच्यामागे अशी तीर्थरूपांच्या लेखनाची प्रेरणा आहे, हे मला नम्रतापूर्वक व अभिमानपूर्वक सांगावेसे वाटते. त्यांच्याबद्दलच्या कृतज्ञताबुद्धीने मी हा व्याख्यासंग्रह त्यांना समर्पित केला आहे.

विद्यार्थीदशेत वनस्पतिशास्त्राच्या अभ्यासात मुंबई येथील इन्स्टिटयूट ऑफ सायन्समधील, वनस्पति-शास्त्राचे प्रमुख, शास्त्रीय लेखक व 'सृष्टिज्ञान' मासिकाच्या आद्य संस्थापकांपैकी एक सदस्य, कै. प्रा. श्री. ल. आजरेकर आय. इ. एस. ( निवृत्त ) यांनी मला मार्गदर्शन तर केलेच परंतु त्यानंतरच्या कालात, विशेषतः मराठीत शास्त्रीय लेखन करण्यास त्यांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिले, ही गोष्ट येथे कृतज्ञतापूर्वक नमूद करणे हे माझे कर्तव्य समजतो.

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र-शाखेचे प्रमुख, प्रा. डॉ. गो. वि. जोशी, एम्. एससी. पीएच्. डी. यांनी ह्या ग्रंथाचे हस्तलिखित काळजीपूर्वक तपासून बहुमोल सूचना केल्या व अनुकूल अभिप्राय व्यक्त केला याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानणे आवश्यक आहे.

माझे स्नेही व जुने व्यवसायबंधू प्रा. डॉ. व. स. जोशी, एम्. ए., पी एच्. डी. ( हल्ली वाई येथील महाविद्यालयातील मराठीचे विद्वान प्राध्यापक ) यांनीही हस्तलिखित तपासून व चर्चा करून काही उपयुक्त सूचना केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

महाराष्ट्र शासनाच्या साहित्य–संस्कृति मंडळाने हा ग्रंथ प्रसिद्धीकरिता स्वीकारून माझ्या अल्पशा कार्याचे चीज केल्याबद्दल मी मंडळाला धन्यवाद देत आहे.

ग्रंथाच्या शेवटी दिलेल्या यादीतील संदर्भग्रंथांचा मी उपयोग करून प्रस्तुत ग्रंथातील मजकुरात शक्य तो अचूकपणा आणण्याचा प्रयत्न केला, त्यासंबंधी त्या सर्व ग्रंथांच्या लेखकांचा व प्रकाशकांचा मी आभारी आहे.

शेवटी, ह्या ग्रंथाची छपाई काळजीपूर्वक व सुबक प्रकारे करून ती अल्पावधीत पूर्ण केल्याबद्दल वाई येथील प्राज्ञ प्रेसचे व्यवस्थापक व कर्मचारी यांचेही ऋण मान्य करणे प्राप्त आहे.

वाई, दि. ३० जुलै
१९७७

शं. आ. परांडेकर
संपादक

# वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा

## ( वनस्पतिशास्त्र-व्याख्यासंग्रह )

### A

**A** **ए; A**

फुलाच्या सूत्रमय वर्णनात ( पुष्पसूत्रात ) वापरण्याचे केसरमंडलासंबंधीचे व इंग्रजीतील अँड्रोशियमचे आंतरराष्ट्रीय आद्याक्षर; फुलांतील ह्या नर पुष्पदलांची संख्या या आद्याक्षरापुढे लिहून दर्शविता येते.
पहा floral formula; androecium.

**a-** **अ-, -शिवाय, -हीन**

अभावदर्शक उपसर्ग; प्रत्ययाप्रमाणेही उपयुक्त.
पहा apetalous, aphyllous.

**ab-** **अप - , अ-**

अनित्यवाचक, दूरत्व अथवा विरुद्धपणा दर्शविणारा उपसर्ग.

**abaxial** **अपाक्ष; अक्षविमुख**

खोड अथवा अक्ष यांच्या विरुद्ध बाजूकडील अथवा त्यांच्या केंद्रापासून दूर असलेला (अवयव, उपांग इ.).

**— side** **अपाक्ष ( अक्षविमुख ) पार्श्व**

खोडापासून दूर असलेली (पानाची) बाजू.

**— sporangium** **अपाक्ष बीजुककोश**

पानाच्या अथवा त्यासारख्या अवयवाच्या खालच्या पृष्ठभागावर असलेली प्रजोत्पादक सूक्ष्म घटकांची (बीजुकांची) पिशवी; उदा. नेचे; पहा spore.

**— surface of the leaf** **अपाक्ष पर्णपृष्ठ**

खोडाच्या विरुद्ध बाजूस असलेला पानाचा पृष्ठभाग.

**aberration** **विपथन**

नित्यापासून भिन्न (अनित्य) प्रकार; उदा. परिस्थितीतील विशिष्ट घटकामुळे किंवा अनित्य अंतस्थ घटनेमुळे प्राप्त झालेले एखाद्या वनस्पतीतील विशिष्ट लक्षण किंवा लहान मोठ्या अवयवाचा अनित्यपणा; पहा chromosome.

**abiogenesis** **अजीवजनन; जडोत्पत्तिवाद**

जड किंवा निर्जीव वस्तूपासून सर्व सजीव सहज उत्पन्न झाले असावे अशी जुनी समजूत; पहा biogenesis; special creation.

**abjection** **अपक्षेपण**

तुटून किंवा अलग होऊन जोराने फेकले जाण्याची प्रक्रिया; उदा. काही कवक वनस्पतींची बीजुके बीजुकधरापासून सुटून निघण्याचा प्रकार.

**— of spores** **बीजुकक्षेपण**

वर वर्णिल्याप्रमाणे बीजुकांचे तंतूपासून तुटून जाणे.

**abjunction** **विबीजुकसंभव**

विशेष प्रकारची बीजुके तंतूपासून पडद्यांनी अलग होऊन बनण्याचा प्रकार; पहा conidium.

**abnormal** **असामान्य; विकृत**

सामान्यपणे न आढळणारे; उदा. फार मोठे फळ; नित्यापेक्षा अधिक मोठा किंवा संख्येने अधिक ( अवयव ); एका केळाच्या सालीत दोन स्वतंत्र मगज.

**abnormality** **विकृति**

वैचित्र्य दर्शविणारी निर्मिती; अनित्यता.

**abortion** **(१) अविकसन; (२) गर्भाभाव; (३) गर्भपात**

( १ ) एखाद्या अवयवाची अर्धवट वाढ किंवा क्वचित वाढ खुंटण्याची प्रक्रिया. उदा. कळ्या किंवा बारीक अपक्व फळे गळून पडणे; फुलांतील केसरदलात संक्षेप; ( २ ) पक्व बीजातील गर्भाच्या अभावामुळे बीज वांझ असण्याचा प्रकार; ( ३ ) गर्भ गळून जाण्याची प्रक्रिया.

**abortive** **अविकासित; सदोष; वंध्य**

अर्धवट बनलेला किंवा अवशेषरूप ( अवयव ); उदा. सूर्यफुलाच्या किरण पुष्पकातील वांझ किंजमंडल; बीजके नसलेला किंजपुट; न रुजणारे बी.

**abscence** **अनुपस्थिति**

व्यक्तीतील एखाद्या लक्षणाबद्दल जबाबदार असलेल्या जनुकाचा अभाव; पहा presence; gene.

**absciss (abscission) layer** **अपाच्छेदक स्तर**

पान अथवा तत्सम अवयव निसर्गतः गळून पडण्यापूर्वी खोड व पानाचा (देठाचा) तळ यांमध्ये प्रथम अस-

लेला व नंतर हळुहळू नाश पावणारा विशिष्ट कोशिकांचा थर; याच्या खोडाकडील बाजूस बुचासारख्या पदार्थाच्या घटकांचा ( त्वक्षा ) थर असल्याने पान गळून पडल्यावर खोडाचा भाग सुसंरक्षित राहतो; पहा cork.

**abscission** अपाच्छेदन; झड

स्वाभाविकपणे अवयव गळून पडण्याची ( झडण्याची ) वर वर्णिलेली प्रक्रिया. उदा. काही झाडांच्या सालीचे तुकडे, पाकळ्या, फळे इ.

**absorb** शोषणे

बाहेरील द्रवरूप अथवा वायुरूप पदार्थ शरीरात ओढून घेणे; यात बहुधा भौतिक प्रक्रियेचा ( विसृति ) संबंध असतो; पहा diffusion.

**absorbability** शोषणीयता; शोषणक्षमता.

शोषून घेण्याचे सामर्थ्य.

**absorbent root** शोषक मूळ

शोषण करणारे मूळ.

**absorption** (१) शोषण; (२) अभिशोषण

(१) शोषून घेण्याची प्रक्रिया [ कार्य ];
(२) विशेषप्रकारे [ विसृतीने ] झालेली शोषणाची प्रक्रिया.

**abstriction** त्वबीजुकक्षेपण

विशिष्ट तंतूच्या टोकास बनलेली बीजुके आकुंचनाने सुटी होऊन फेकली जाणे; या संज्ञेत बीजुकसंभव व अपाच्छेदन ही अभिप्रेत आहेत.

**Acanthaceae** वासक कुल; ॲकँथेसी

वासक ( अडुळसा ), कोरांटी, कोळसुंदा इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; बेंथींच्या वर्गीकरणाप्रमाणे या कुलाचा समावेश नीर-ब्राह्मी गणात ( स्क्रोफ्यूलारिएलीझ ) केला असून हचिन्सन यांनी पर्सोनेलीझ गणामध्ये केला आहे. ह्या कुलातील वनस्पतींची लक्षणे : पाने समोरासमोर व पंचभागी सच्छदक फुले; संवर्त व पुष्पमुकुटातील भाग जुळलेले, व्दोष्ठी किंवा द्वयोष्ठक; केसरदले २-५; दोन जुळलेली किंजदले; किंजपुट ऊर्ध्वस्थ; बोंड प्रकारचे फळ व त्यात बीजे तळाशी असलेल्या आकड्यासारख्या भागास चिकटलेली असतात; पहा Scrophulariaceae; retinacula.

**acanthaceous** (१) कंटकित; (२) वासक कुलोत्पन्न

(१) काटेरी; (२) वासक कुलांतील ( वनस्पती ); उदा. तालीमखाना ( *Asteracantha longifolia* Nees. ).

**acaulescent** अस्कंध; स्कंधहीन; क्षोडहीन

जमिनीवर ( सहज ) न दिसणारे खोड असलेली ( वनस्पती ); उदा. घायपात; कोरफड; कांदा; शेवरा ( *Phoenix acaulis* Roxb. ) इ.

**accelerator** प्रवेगकर

वितंचकाची क्रिया अधिक वेगाने घडविणारे ( विद्युत् विच्छेद्य ) द्रव्य; पहा enzyme.

**accessory** अतिरिक्त; गौण; साहाय्यक

प्रमुख अवयवाशिवाय इतर ( अधिक ); उदा. आगंतुक व साहाय्यक कळ्या.

**— fruit** अतिरिक्त फळ

किंजपुटाखेरीज फुलातील इतर भागांपासून ( पुष्पासन, देठ, इ.) बनलेला फळासारखा मांसल अवयव; उदा. काजू, सफरचंद, स्ट्रॉबेरी इ.

**accrescent** सहवर्धिष्णु

इतर अवयवाबरोबर वाढत जाऊन न गळता राहणारा; उदा. फळाबरोबर वाढत जाणारा फुलातील एखादा अवयव ( वांग्याचा संवर्त; काजूचा देठ ).

**accumbent** संमुख

समोरासमोर निकट असलेले; उदा. दलिका ( हरभरा, वाटाणा ).

**aceae** -कुल

कुलवाचक लॅटिन संज्ञा बनविताना लॅटिन वंशनामापुढे लावण्याचा प्रत्यय; उदा. वृन्ताक ( वांगे ) कुल ( Solanaceae या नावात *Solanum* या वंशनामापुढे प्रत्यय लावला आहे ); वांग्याचे शास्त्रीय नाव *Solanum melongena* L. हे आहे.

**aceous** - प्रमाणे; - सम

वनस्पतींच्या लॅटिन वंशनामापुढे किंवा कुलनामापुढे विशेषणात्मक संज्ञा बनविण्यास लावलेला प्रत्यय; उदा. गुलाबसम अथवा गुलाबाप्रमाणे किंवा गुलाब कुलातील; पहा Rosaceous.

**acellular** अकोशिकेय; अकोशिक

कोशिकायुक्त संरचना नसलेले; उदा. सर्व जड वस्तू ( दगड, खनिजे इ.).

**acephalous** अशीर्षक

डोक्यासारखा भाग नसलेला ( अवयव ).

**Aceraceae** किनार कुल, ॲसरेसी

किनार ( ॲसर किसीयम ), मॅपल, सिकॅमूर, शुगर मॅपल इत्यादी विशेषतः उत्तर गोलार्धातील द्विदलिकित फुलझाडांचे कुल; बेंथॅम व हूकर यांनी या कुलाचा समावेश

अरिष्ट (रिठा) गणात केलेला आढळतो. प्रमुख लक्षणे : वृक्ष व झुडपे; साधी, पिसासारखी किंवा हस्ताकृती खंडित, समोरासमोर पाने; द्विलिंगी किंवा एकलिंगी, अरसमात्र फुले; संदले व प्रदले ४–५; कधी पाकळ्या नसतात; केसरदले बहुधा ८; किंजदले दोन व ऊर्ध्वस्थ; केसरदलाबाहेर किंवा मध्ये बिम्ब; किंजपुटात दोन कप्पे व प्रत्येकात दोन बीजके; दोन पंखांचे व शुष्क (पालिभेदी) फळ, किंवा सपक्ष कृत्स्नफळ. अपुष्क बिया.

**acerose** सूच्याकृति; सूचिसम

सुईसारखे टोक, धारदार कडा व अत्यंत निमुळते; उदा. चीड- (चिल) चे पान; शतावरीची फांदी.

**achene** कृत्स्नफल

शुष्कफळाचा एक प्रकार; हे न फुटणारे, एकबीजी, पातळ सालीचे, एका किंजदलाचे व ऊर्ध्वस्थ किंजपुटापासून बनलेले असून बीजावरण व फलावरण अलग असतात; उदा. मोरवेल, स्ट्रॉबेरी, कमळ यांच्या फळातील एक सुटा भाग.

**achenial fruit** कृत्नाभ फल

सर्वसाधारणपणे वर वर्णन केल्याप्रमाणे शुष्क एकबीजी व न तडकणारे कोणतेही फळ; उदा. सूर्यफूल, माठ, मका, गहू इ.

**achlamydeous** अपरिदल

परिदले (संवर्त व पुष्पमुकुट) नसलेले; उदा. अळू, केवडा यांची फुले.

**acicular leaf** सूचिपत्र ; सूचिपर्ण

पहा acerose.

**acorn** छदककपाली; वंजुफल

लहान छदांच्या पेल्याने वेढलेले ओक (वंजू) चे (किंवा तत्सम) कवची फळ.

**acquired** अर्जित; संपादित

स्वतःच्या प्रयत्नाने मिळविलेले किंवा परिस्थितीच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणामामुळे घडून आलेले (फरक); उदा. पुरेशा पोषणाभावी वनस्पतीस आलेला खुरटेपणा; एकाच बाजूने सतत लागलेल्या वाऱ्यामुळे आलेला बाक.

**acro –** अग्र –

टोक किंवा शेंडा या संदर्भात उपसर्गाप्रमाणे वापरलेली संज्ञा.

**— carpus** अग्रफलयुक्त; अग्रफली

शेंडेफळ असलेले.

**— petal** अग्रवर्धी

केवळ टोकाशीच वाढणारे (खोड, अक्ष, इ.).

**— — succession** अग्रवर्धी अनुक्रम

खोडाच्या किंवा इतर अवयवांच्या टोकास सदैव वाढ होत राहिल्याने, कोवळे भाग टोकाजवळ व जून भाग क्रमाने खाली असण्याचा प्रकार; उदा. बहुतेक खोडे व काही फुलोरे; सर्वसाधारण मुळे; पहा basipetal.

**actino–** अरीय; अर–

आरे (किरणासारखे भाग) असलेला; उदा. मोरपंखी (*Actiniopteris dichotoma* Bedd.) या नेचाची पाने.

**—meter** प्रकाशमापक

छायाचित्राच्या कागदाचा उपयोग करून प्रकाशाच्या भिन्न तीव्रतेचे मापन करण्याचे उपकरण.

**— morphic** अरसमात्र; नियमित

एखाद्या अवयवाच्या (उदा. फूल) केंद्रातून कोणतीही संपूर्ण आडवी रेषा काढल्यास दोन सारखे भाग होतात अशी संरचना; उदा. धोतरा, जास्वंद, गुलाब इत्यादींची फुले; हे लक्षण दर्शविण्याकरिता ⊕ हे आंतरराष्ट्रीय चिन्ह वापरतात; पहा floral formula.

**— stele** तारकारंभ

खोडाच्या किंवा मुळाच्या अंतर्रचनेत प्रकाष्ठ व परिकाष्ठ परस्पराशी किरणाप्रमाणे एकाआड एक मांडलेली असण्याचा (रंभाचा) प्रकार; उदा. बहुतेक मुळे; लायकोपोडियमचे खोड; पहा stele.

**activator** प्रभावक; क्रियाप्रवर्तक; त्वरक

वितंचकाची क्रिया चालू करणारा पदार्थ; येथे वितंचक स्वयंपूर्ण नसते; कधी कधी हा क्रियाप्रवर्तक धातुस्वरूप असतो; पहा proenzyme; coenzyme.

**active** सचेष्ट; सक्रिय; क्रियाशील

नैमित्तिक किंवा सतत हालचाल करणारे; सुप्तावस्थेत नसून वाढ होत असलेले; उदा. गंतुक, बीजुक, कळी इ. पहा dormant.

**— transport** क्रियाशील परिवहन

पाणी किंवा अन्नद्रव्य यांचे जलद स्थलांतर.

**aculeus** कंटक; काटा

कठीण, तीक्ष्ण उपांग.

**aculeate** कंटकित; काटेरी

काटे असणारे; तीक्ष्ण टोक असलेले; उदा. वेडी बाभूळ (*Parkinsonia aculeata* L.). कणगर (*Dioscorea aculeata* L.)

**acuminate** प्रकुंचित; पुच्छाकार

शेपटीसारखे हळूहळू निमुळते होत गेलेले; उदा. पिंपळाच्या पानाचे टोक; सफेद कचनार ( *Bauhinia acuminata* L.).

**acute** आकुंचित; लघुकोनी; टोकदार

लघुकोनासारखे टोकदार; उदा. कण्हेरीच्या पानाचे टोक खैरचाफा (*Plumeria acutifolia* Poir); दोडका (*Luffa acutangula* [L.] Roxb.)

**acyclic** अमंडलित; अचाक्रिक; अचक्रीय

चक्राकार किंवा मंडलाकार मांडणी नसलेली; मळसूत्राप्रमाणे सर्पिल मांडणी असलेली (पाने किंवा पुष्पदले); उदा. कमळाचे फूल; पहा cyclic.

**ad-** -कड; जवळचे

या अर्थी उपसर्ग; मराठीत प्रत्ययासारखा उपयोग करतात; पहा adaxial.

**adapt** जमवून घेणे

जरूर ते शारीरिक फरक घडवून परिस्थितीशी समरस होणे.

**adaptability** अनुयोजकता

परिस्थितीशी जमवून घेण्याची ( समरस होण्याची ) क्षमता; हे सर्व सजीवांचे लक्षण समजले जाते.

**adaptation** अनुयोजन; अनुकूलन

बदलत्या परिस्थितीशी समरस होण्याची प्रतिक्रिया.

**adaptive (inducible ) enzyme** अनुकूली वितंचक

जिवंत कोशिकेतील चयापचयात, परिस्थितिसापेक्ष विशिष्ट कार्यद्रव्यांनी तेथेच निर्मिलेले नवीन आणि विशिष्ट वितंचक ( कार्बनी निदेशक ); उदा. एश्चेरिया कोली या सूक्ष्मजंतूंचे काही वाण ग्लूकोज व अमोनिया या कार्बनयुक्त व नायट्रोजनयुक्त प्राथमिक उद्गमावर वाढविले असता त्यांमध्ये पूर्वी नसलेली अनेक वितंचके नंतर बनवून उपयोगात आणली जातात, असे काही प्रयोगांती आढळले आहे; पहा enzyme.

**adaptor RNA ( +RNA )** योजक आरएनए

प्रथिन संश्लेषणात प्रभावित अमिनो अम्ल ज्या विशिष्ट लहान, विद्राव्य आरएनए रेणूला चिकटून राहतात, त्याला ही संज्ञा वापरतात; पहा RNA.

**adaxial** अभ्यक्ष; अक्षसंमुख

खोडासमोरचे; खोडाजवळचे; अक्षालगत असलेले; उदा० सिलाजिनेला किंवा लायकोपोडियम या वनस्पतींचे बीजुककोश; पहा ventral.

**— surface of the leaf** अभ्यक्ष पर्णपृष्ठ

पान खोडाशी समांतर नसल्यास, पानाची वरची ( प्रकाशाकडे वळलेली ) बाजू व ते समांतर असल्यास खोडाकडे असलेली बाजू ( पृष्ठभाग ).

**— sporangium** अभ्यक्ष बीजुककोश

पानाच्या किंवा तत्सम अवयवाच्या बगलेतील बीजुकांची पिशवी.

**adelphous** ससंघ

फुलातील केसरदलांचा एक अथवा अनेक संच (जुडगा) असण्याचा प्रकार; उदा. जास्वंद.

**adherent** आसक्त; अभिलग्न

दोन निराळे अवयव परस्परास चिकटून असणे; उदा. किंजपुटास चिकटून राहिलेला संवर्त; काकडी, पेरू, इ.

**adhesion** आसंग

फुलातील एका मंडलाची दले दुसऱ्या मंडलातील दलांशी अंशतः किंवा पूर्णपणे चिकटून असण्याचा प्रकार; उदा. धोत्र्याच्या फुलातील केसरदले पाकळ्याशी तळात चिकटलेली परंतु वर सुटी असतात; पहा epipetalous; episepalous; gynandrous.

**adhesive** आसंगी; आसंजक

चिकटून राहण्याची क्षमता असलेला; उदा. भिंतीस चिकटून राहणारी मुळे किंवा ताणे काही वेलींना वर चढण्यास मदत करतात (नागवेल, मिरवेल, अंजनवेल).

**— disc** आसंगी बिम्ब

चिकटण्यास उपयुक्त असा चकतीसारखा भाग; उदा. *Parthenocissus tricuspidata* Planch. या वेलीचे ताणे टोकाशी बिम्बयुक्त असतात.

**adnate** पृष्ठाबद्ध

एखादा अवयव दुसऱ्याच्या पृष्ठभागास पूर्णपणे चिकटून वाढलेला असणे; उदा. गुलाबाच्या पानाची उपपर्णे; काही फुलातील परागकोशाची एक बाजू संपूर्णपणे तंतूस चिकटून असते (कमळ). पहा dorsifixed.

**ADP** एडीपी; ॲडिनोसीन डायफॉस्फेट

पहा ATP.

**adpressed (appressed)** आलग्न

एखादा अवयव दुसऱ्यावर सपाट दाबून असणे; उदा. काही खवले किंवा तत्सम पाने.

**adsorption** पृष्ठशोषण

काही घन किंवा द्रव पदार्थाच्या पृष्ठभागावर लवणे ( रेणू किंवा आयने ) चिकटून राहण्याची प्रक्रिया;

जमिनीतील चिकणमातीचे व कुजकट जैव पदार्थाचे कलिल कण तेथील लवण पदार्थ या पद्धतीने धरून ठेवतात.

**adventitious** आगंतुक

अनपेक्षितपणे दुसऱ्या अवयवावर उगम पावलेले काही अवयव; उदा. कलमांवर येणारी मुळे किंवा नवीन कळ्या; पानफुटीच्या तुटून पडलेल्या पानावर येणारी नवीन रोपे.

**aecidiospore** वर्षाबीजुक

बहुधा पावसाळयात बनणारे कवकाचे बीजुक (प्रजोत्पादक कोशिका).

**aeration** वातन; वायुमिश्रण

द्रव किंवा घन पदार्थात वायूचे मिश्रण करण्याची प्रक्रिया.

**aerenchyma** वायूतक

वायूने भरलेल्या पोकळ्या असलेला कोशिकांचा समूह; पाण्यात वाढणाऱ्या वनस्पतींत हवेच्या पुरवठ्याकरिता असे समूह ( ऊतक ) आढळतात; तसेच समुद्रकिनाऱ्यावरील खाऱ्या दलदलीत वाढणाऱ्या अनेक वनस्पतींतील हे ऊतक त्वक्षाकरापासून बनलेले असते; उदा. शिंगाडा, तिवर, कमळ, चिप्पी, कांदळ, इ. पहा tissue; phellogen.

**aerial** वायवी; हवाई

जमिनीवरच्या भागात ( हवेत ) वाढणारा ( अवयव ); उदा. खोड, पाने, क्वचित मुळे.

**— root** वायवी मूळ

हवेत वाढलेले मूळ. मुळे सामान्यपणे जमिनीत वाढतात; तथापि कधी हवेतही ती खोडापासून उगम पावतात; उदा. वडाच्या पारंब्या; खाऱ्या चिखलात वाढणाऱ्या काही वनस्पतींची मुळे जमिनीतून वर वाढतात. पहा pneumatophore.

**aerobe** वायुजीवी; सानिल

हवेच्या सान्निध्यातच जगणारे; उदा. काही सूक्ष्मजंतू.

**aerobic** सानिल

हवेच्या सान्निध्यातच घडून येणारी (प्रक्रिया); उदा. श्वसन; प्रकाशसंश्लेषण.

**— respiration** सानिल श्वसन

हवेतील प्राणवायूचा उपयोग करून पदार्थातील ऊर्जा मिळविण्याची प्रक्रिया; जलवनस्पतींत पाण्यातील विरघळलेल्या प्राणवायूचा श्वसनार्थ उपयोग होतो; पहा respiration; energy.

**aerophyte (epiphyte)** अपिवनस्पति

दुसऱ्या वनस्पतीच्या फक्त आधाराने वाढणारी वनस्पती; हिचा जमिनीशी संपर्क नसतो; उदा. शैवाक (घोंडफूल), शेवाळी, आमरे, काही नेचे, इ.

**aerotactic** वातानुचलनी

हवेच्या दिशेकडे किंवा त्याविरुद्ध दिशेकडे स्थानांतर करणारी ( वनस्पती; उदा. काही शैवले; सूक्ष्मजंतू ).

**aerotaxis** वातानुचलन

हवेतील प्राणवायूच्या चेतनेनुसार घडून येणारी हालचाल; उदा. अस्थिर वनस्पती किंवा स्थिर वनस्पतींचे सुटे भाग.

**aerotropic** वातानुवर्तनी

हवेच्या चेतनेनुसार वाढीची दिशा ठेवणारे (अवयव).

**aerotropism** वातानुवर्तन

हवेच्या दिशेकडे किंवा दिशेविरुद्ध होणारी वनस्पतींच्या अवयवांची वाढ; उदा. खाऱ्या दलदलीतील झाडांची मुळे; पहा chemotropism.

**aestivation** पुष्पदलसंबंध

कळीतील पुष्पदलांची ( संदले व प्रदले ) परस्परसंबंध दर्शविणारी मांडणी; पहा ptyxis; vernation.

**aethalium** उपधानक

श्लेष्मकवक वनस्पतींत कधी कधी सूक्ष्म व अनेक बीजुककोश एकत्र होऊन बनणारा प्रजोत्पादक अवयव. पहा Myxomycetes.

**affinity** आप्तभाव

वनस्पतींतील ( अथवा प्राण्यांतील ) सादृश्यामुळे दिसून येणारे व्यक्तींतील ( अथवा लहानमोठ्या गटातील ) रक्ताचे नाते; त्यांचे नैसर्गिक वर्गीकरण या नात्यावर केले जाते.

**after-ripening** अनुपक्वन; अनुपाक

वनस्पतींचे बीज पूर्णपणे तयार झाल्यानंतरही लागलीच न रुजता काही वेळानंतर ( विश्रांतिकालानंतर अथवा प्रसुप्तावस्थेनंतर ) रुजते; ह्या मध्यावधीला वरील संज्ञा वापरतात. या कालात बीजामध्ये काही क्रियावैज्ञानिक ( शरीरव्यापारविषयक ) बदल घडून येतात.

**Agaricales (Hymenomycetae)** पटलकवक गण; ॲगॅरिकेलीझ

सत्यकवक विभागातील गदाकवक वर्गात अंतर्भूत असलेल्या दोन उपवर्गापैकी सत्य गदाकवकातील एक गण;

भूछत्रे, शूल्कवक इत्यादींचा येथे समावेश असून यामध्ये प्रथमपासून गदाकोशिका उघड्याच असतात किंवा गदा-बीजुके बनून पक्व होतेवेळी त्या उघड्या होतात; पहा Eubasidii.

**Agavaceae** घायपात कुल; ॲगॅव्हेसी
घायपात गणातील एक कुल ( एकदलिकित फुलझाडे ); अरुंद, लांबट किंवा भाल्यासारख्या पानांचा झुबका खोडाच्या टोकावर राहतो; फुलातील परिदले शुष्क नसून बहुधा ती जुळून नलिका बनते; किंजपुट उर्ध्वस्थ किंवा अधःस्थ; इतर लक्षणे पुढे घायपात गणात दिल्याप्रमाणे; उदा. घायपात, दर्शना, युका, नागीन, फर्क्रिया; इत्यादी.

**Agavales** घायपात गण; ॲगॅव्हेलीझ
हचिन्सन यांनी बनविलेला एकदलिकित फुलझाडांचा एक गण. याचा प्रसार उष्ण व उपोष्ण खंडातील शुष्क प्रदेशात व ऑस्ट्रेलियात आहे. प्रमुख लक्षणे : वृक्षासारख्या व अनेक वर्षे जगणाऱ्या वनस्पती; काष्ठमय खोडावर किंवा जमिनीवर वाढणाऱ्या खोडाच्या टोकास जाड, मांसल, सूत्रल, कधी कधी काटेरी असलेल्या पानांचा झुबका; फुले लहान, सच्छद, अनेक शाखायुक्त परिमंजरीवर येतात; ती बहुधा अरसमात्र, द्विलिंगी, किंवा एकलिंगी व दोन स्वतंत्र झाडावर येतात; परिदले शुष्क किंवा मांसल; केसरदले सहा व परागकोशात दोन कप्पे; ऊर्ध्वस्थ किंवा अधःस्थ किंजपुटात तीन किंवा एक कप्पा व त्यात अक्षावर किंवा मध्यावर बीजके; बोंडे किंवा मृदुफळ; बीजे सपुष्क. या गणात फक्त एकच कुल ( घायपात कुल ) घातले आहे.

**agent** मध्यस्थ; माध्यम
वनस्पतींतील परागण, फलप्रसार व बीजे अथवा बीजुके यांचा प्रसार घडवून आणण्यास साहाय्य करणारे वारा, प्राणी इत्यादीसारखे घटक; पहा pollination.

**aggregate fruit** ( etaerio ) संघफळ; घोसफळ
एकाच फुलातील अनेक सुट्या किंजदलांपासून बनलेल्या अनेक साध्या फळांचा, घोस; मोरवेल, पिवळा किंवा हिरवा चाफा, रुई, इ. पहा carpel.

**air** हवा; वायु; वात; अनिल

**— bladder** वायुकोश; वाताशय
हवेने भरलेला फुग्यासारखा अथवा गेळ्यासारखा अवयव; उदा. चीडचे परागकण; सरगॅसम किंवा फ्यूकस शैवलाच्या कायकाचे भाग.

**— canal** (air-passage) वायुमार्ग; हवामार्ग
वनस्पतीच्या शरीरात हवेची ये–जा होण्याकरिता बनलेले लहान मोठे हवायुक्त, सलग, लांब पोकळ मार्ग; उदा. कमळासारख्या जलवनस्पतींत हे मार्ग ठळकपणे आढळतात तर रुक्ष जागी वाढणाऱ्या वनस्पतींत ते सर्वांत कमी व बारीक असतात.

**— cavity** वायुकोटर
हवेने भरलेली लहान किंवा मोठी पोकळी.

**— pore** वायुरन्ध्र
हवेची ये–जा होण्यास शरीरावर असलेले छिद्र; उदा. काही शेवाळींचे कायक (मार्चेशिया.)

**— space** (air-chambur, air-sac) वायुकोटर; पहा air-cavity.

**ala** (wing; pl. alae) पक्ष; पंख
काही फुलांच्या पुष्पमुकुटातील पंखासारख्या दोन पाकळ्या. उदा. गोकर्ण, वाटाणा इ.

**alate** पंखधारी
पंख असलेले;

**alba** श्वेत ( प्रकार )
पांढरा; उदा. मेंदी (*Lawsonia alba* Lamk.)

**albinism** श्वेतत्व; विवर्णता
शरीराचा एखादा अवयव किंवा सर्व शरीर रंगहीन ( पांढरट ) असण्याचा प्रकार; उदा. पांढऱ्या फुलांचे प्रकार ( गुलाब, गोकर्ण, कण्हेर, जास्वंद, इ. ); कित्येक पशूंतही असे प्रकार सामान्यपणे आढळतात ( मांजर, कुत्रा, ससा, मेंढी, गाय, इ. ).

**albino** विवर्ण ( श्वेत ); रंजकहीन
पांढऱ्या फुलांची किंवा पानांची ( वनस्पती ) किंवा पांढरे प्राणी; उदा. धोतरा; पांढरा वाघ.

**albumen** (endosperm) पुष्क
बीजातील दलिकाबाहेर असलेला अन्नांश; उदा. एरंड, मका, इ.

**albuminous** (endospermic) **seed** सपुष्क बीज
पुष्क असलेले बीज.

**alburnum** (sap-wood) रसकाष्ठ
काही बहुवर्षायू झाडांच्या जुन्या खोडांमध्ये सालीच्या आतील फिकट रंगाच्या काष्ठाचा व कार्यक्षम भाग; द्रव पदार्थांची ने–आण याच भागातून होते.
पहा duramen ( heart-wood ).

**-ales** गणवाचक प्रत्यय
उदा. Sapindales अरिष्ट (रिठा) गण; लॅटिन वंशनामापुढे ( *Sapindus* ) प्रत्यय लावून गण-वाचक संज्ञा बनविली जाते.

**aleurone grain** आपांडुर कण
प्रथिनाचा सूक्ष्म कण; वनस्पतीच्या भिन्न अवयवांतील संचित अन्न या स्वरूपात कधी कधी आढळते; पहा protein.

**— layer** आपांडुर स्तर
वर वर्णन केलेल्या पदार्थाने भरलेल्या कोशिकांचा थर; उदा. मक्याचे दाणे.

**alga (pl. algae)** शैवल (अ. शैवले); आल्गा (अ. आल्गी)
बहुधा पाण्यात वाढणारी, बीजहीन, एक किंवा अनेक कोशिकांची बनलेली, साधी, (कायकाम) हिरवी, पिंगट, लालसर, किंवा निळसर वनस्पती; पहा thalloid; thallophya.

**algalogist** शैवलविज्ञ; शैवलवेत्ता
शैवलांचा विशेष अभ्यासू व ज्ञानी.

**Algalogy** शैवलविज्ञान
शैवलांचीच फक्त तपशीलवार माहिती देणारी विज्ञान-शाखा.

**alien** अन्यदेशीय
विशिष्ट निमित्ताने बाहेरील प्रदेशातून आलेली व कायम रहिवासी झालेली तणासारखी वनस्पती; उदा. पिवळा धोत्रा, गाजरी, ओसाडी, इ.

**allelomorph (allel)** विकल्प
वनस्पतीच्या एकाच जातीतील दोन प्रकारांचे भिन्नत्व (विरुद्धपणा) दर्शविणारा गुण (लक्षण) किंवा जनुक; उदा. वाटाण्याच्या जातीतील उंचपणा व खुजेपणा; फुलांचा पांढरेपणा व लाली; पहा gene.

**allelomorphic pair of characters** वैकल्पिक गुणयुगुल
वर वर्णन केलेल्या विरुद्ध गुणांची जोडी; असे भिन्न गुण असणाऱ्या व्यक्तींच्या प्रजोत्पादनामुळे होणाऱ्या संततीस संकरप्रजा (सकरज) म्हणतात; या संततीत आईबापांच्या भिन्न गुणांपैकी कधी एकाचाच प्रभाव दिसतो व दुसरा गुण सुप्तावस्थेत असून पुढील पिढ्यांतील काहीत दिसून येतो; म्हणून या गुणांना प्रभावी (प्रकट) व सुप्त (अप्रकट) अशी विशेषणे लावतात. कधी कधी संकरप्रजेत दोन्ही गुणांचे मिश्रण आढळते. पहा dominant, recessive.

**alliaceous** कंदर्प-लशुन-गंधी
कांदा किंवा लसूण यांचा वास येणारे.

**allogamy** परयुति
वनस्पतींच्या एकाच जातीतील दोन भिन्न व्यक्तींच्या प्रजोत्पादक कोशिकांचे (गंतुकांचे) मीलन (फलन); पहा autogamy.

**allopolyploidy** असमगट-गुणन
व्यक्तीच्या शरीराच्या कोशिकेतील रंगसूत्रांची संख्या तिप्पट, चौपट इ. अशी असून त्यापैकी एखादा (किंवा अधिक) संच एका जातीच्या वनस्पतीचा व उरलेले संच दुसऱ्या जातीच्या वनस्पतीचा असण्याचा प्रकार. पहा autopolyploidy.

**alternate** एकांतरित; एकाआड एक
अक्षाच्या (खोडाच्या) प्रत्येक पेऱ्यावर एक अशा क्रमाने आलेली; उदा. पाने, पुष्पदले अथवा शाखा.

**alternation of generations** पिढ्यांचे एकांतरण
लिंगभेद न दर्शविणाऱ्या (द्विगुणित) एका पिढी-पासून दुसरी लैंगिक पिढी (एकगुणित) निर्माण होणे व पुनरपि हिच्यापासून अलैंगिक पेढीची उत्पत्ती होणे, याप्रकारचे जीवनचक्र; काही शैवले, शेवाळी व नेचाभ ह्या वनस्पतींच्या गटांत ही घटना स्पष्टपणे दिसून येते; फक्त रंगसूत्रांच्या संख्येचा विचार केला असता बहुतेक सर्व वनस्पतींत व प्राण्यांत एकगुणित व द्विगुणित या अवस्था त्यांच्या जीवनात आढळतात; पहा diploid; haploid.

**— of parts (in a flower)** एकांतरण (पुष्पदलांचे)
फुलातील एका मंडलातील दलांची दुसऱ्या मंडलातील दलांशी एकाआड एक मांडणी; केसरदलांची दोन मंडले असल्यास आतील केसरदले बाहेरच्याशी एका आड एक अशी मांडणी कधी कधी आढळते.

**alternative pair of characters** वैकल्पिक (पर्यायी) गुणयुगुल.
पहा allelomorphic pair of characters.

**alternative inheritance** वैकल्पिक (पर्यायी) अनुहरण
संततीमध्ये काही व्यक्ती आईबापांच्या दोन (वैकल्पिक-प्रभावी व अप्रभावी) गुणांपैकी एकच गुण दर्शवितात तर काही दुसरा (पर्यायी) गुण दर्शवितात असा प्रकार.

**alveolar** विवरयुक्त

**alveolus** विवर

(१) वस्तूच्या पृष्ठभागावरील रिकामी खोलगट जागा (पोकळी) उदा. मधमाश्यांचे पोळे; सूर्यफुलाच्या पुष्पासनावरील खाच;

(२) अनेक छिद्रे असलेल्या कवकाच्या शरीरावरील कप्पा;

(३) कोशिकेतील जीवद्रव्याच्या फेसासारख्या अवस्थेतील रिती जागा.

**Amarantaceae** अपामार्ग (आघाडा) कुल; ॲमरँटेसी

अपामार्ग (आघाडा), कुरडू, माठ, पोकळा, राजगिरा, तांदुळजा इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे (फुलझाडांचे) कुल; हचिन्सन यांनी या कुलाचा अंतर्भाव चक्रवर्त गणात (चीनोपोडिएलिझ) केला असून बेसींच्या पद्धतीत कार्योफायलेलीझ या गणात केला आहे व त्यात चक्रवर्त कुल समाविष्ट आहे. प्रमुख लक्षणे: बहुतेक ओषधीय वनस्पती; एकलिंगी किंवा द्विलिंगी; छदे व छदके असलेली बिनपाकळ्याची फुले; संदलासमोर बहुधा पाच केसरदले; ऊर्ध्वस्थ किंजपुट आणि न फुटणारे किंवा करंड्यासारखे दोन शकलांनी फुटणारे फळ; बिया एक किंवा अध्रुक व सपुष्क.

**Amaryllidaceae** मुसळी कुल; ॲमारिलिडेसी

मुसळी, घायपात, नार्सिसस, कुमूर, नागदवणा इत्यादी एकदलिकित वनस्पतींचे कुल. या कुलाचा अंतर्भाव केसर गणात (इरिडेलीझ) बेसींच्या पद्धतीत केला असून हचिन्सन यांनी मुसळी गणात (ॲमारिलिडेलीझ) केला आहे. या कुलाची प्रमुख लक्षणे: कंद, दृढकंद प्रकारचे खोड; मूलज पाने; फुलोऱ्यास प्रथम महाछदाचे आवरण; परिदले सहा, खाली नळीसारखी व वर सुटी; सहा केसरदले, अधःस्थ, तीन कप्प्यांचा व अनेक बीजकांचा किंजपुट; मृदुफळ किंवा बोंड इ.

**Amentiferae** नतकणिश गण; ॲमेंटिफेरी

नतकणिश फुलोरा असलेल्या वनस्पतींचा गट; यामध्ये भूर्ज कुल, ओक कुल, वालुंज कुल, अक्षोट कुल इत्यादींचा समावेश केला जात असे.

**amentum (catkin)** नतकणिश

फुलोऱ्याचा एक प्रकार; यावर बिनदेठाची लहान, एकलिंगी, सच्छद व बिनपाकळ्याची फुले असून फुलोरा बहुधा लोंबता कणिश प्रकारचा असतो. उदा. भूर्ज, मिरवेल, वंजू (ओक), नागवेल, हॅझेल, पॉप्लर इ. पहा spike; inflorescence.

**amitosis (direct division; fragmentation)** असम विभाजन

एका कोशिकेची दोन किंवा अधिक भागात होणारी प्रत्यक्ष विभागणी; विभागणीनंतर ते विभाग पूर्णपणे सारखे होतातच असे नाही; यामध्ये कोशिकेतील प्रकलादी भागांची साथीच विभागणी होते; तसेच त्यानंतर कोशिकावरण लागलीच बनते असे नाही; केव्हा तर यामुळे बहुप्रकली कोशिका बनते. उदा. चिकाळ कोशिका;

पहा mitosis; laticiferous cell.

**amoeboid** आदिजीवसदृश

अत्यंत सूक्ष्म व प्रारंभिक प्राण्याप्रमाणे (ॲमीबाप्रमाणे); उदा. श्लेष्मकवकातील गंतुके.

**— movement** आदिजीवसदृश हालचाल

आदिजीवाप्रमाणे छद्मपादांनी सरकण्याची प्रक्रिया; कोशिकावरण नसलेल्या सजीव (प्राकल) घटकांचे स्थलांतर या पद्धतीने होते; उदा. श्लेष्मकवक.

**amphibious** जलस्थलवासी; जलस्थलीय

पाण्यात व जमिनीवर जगणारे (जीव); उदा. दलदलीत वाढणारी वनस्पती; कमळ, पाणकणीस; प्राण्यांच्या बाबतीत 'उभयचर' ही संज्ञा वापरतात.

**amphicribral** मध्यप्रकाष्ठक

प्रकाष्ठाभोवती परिकाष्ठ अशी मांडणी असलेले (एकमध्य वाहक वृंद); उदा. काही नेचे (ग्लीकेनिया, ऑस्मुंडा). पहा xylem, phloem, stele.

**amphigenesis** सलिंग प्रजोत्पादन (जनन)

लिंगभेदयुक्त अवयवांच्या साहाय्याने झालेली पुनरुत्पत्ति.

**amphimixis** गंतुकमीलन; युग्मकसंयोग

नर व स्त्री गंतुकांचा संयोग (एकरूप होणे);

पहा gamete.

**amphiphloic** द्विपरिकाष्ठी

प्रकाष्ठाच्या आत व बाहेर परिकाष्ठ असलेले (रंभ); उदा. नेचा (ॲडिॲंटम).

**amphiploid (amphidiploid)** उभयद्विगुणित

दोन जातींच्या संकराने प्राप्त झालेल्या प्रत्येकी दुप्पट रंगसूत्रामुळे एकूण चौपट रंगसूत्रे असलेली संकरज वनस्पती; उदा. तंबाखूच्या व धोत्र्याच्या काही जाती.

**amphisarca** घनकवची मृदुफळ

कठीण कवचाच्या आत मऊ मगज असलेले साधे फळ; उदा. कवठ, बेलफळ, गोरखचिंच, इ.

पहा berry.

**amphithecium** बाह्यकोश
विकासावस्थेतील अतिशय कोवळ्या (अपक्व) बीजुकाशयाचे बाहेरील आवरण; उदा. शेवाळी; पहा endothecium.

**amphitropous** तिर्यङ्मुख; उभयवर्ती
बीजबंधाशी काटकोन केलेले (बीजक); याचे बीजकरंध्र व बीजकतल विरुद्ध टोकास असून नाभि या दोन्हीपासून सारख्या अंतरावर असते; रंध्र, तल व नाभि यांचा त्रिकोन बनतो. उदा. लेम्ना (डकवीड). पहा Lemnaceae.

**amphivasal** मध्यपरिकाष्ठक
परिकाष्ठाभोवती प्रकाष्ठ असलेले (एकमध्य वाहक वृंद; रंभ); उदा. दर्शना (Dracaena Sp.).

**amplexicaul** संवेष्टी
खोडाभोवती वेढून राहणारा पानाच्या देठाचा पसरट तळ; उदा. कोथिंबीर, जिरे, इ.

**ampulla (bladder)** आशय
पहा bladder.

**amylaceous** तौकीरमय; पिठूळ

**amyloplast** तौकीरकणु
पिष्ठ (पिठूळ पदार्थ) कण बनविणारा कोशिकेतील प्राकणु (सजीव कण); पहा plastid; starch.

**anabolism** उपचय
पिष्ठ, प्रथिन, मेद इत्यादी पदार्थ किंवा प्राकल (कोशिकेतील सजीव पदार्थ) काष्ठ, तूलीर (कौशिकावरण) इत्यादी बनविण्याची विधायक प्रक्रिया. पहा katabolism.

**Anacardiaceae** आम्रकुल; ॲनाकार्डिएसी
आंबा, काजू, चारोळी, मोई इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; याचा अंतर्भाव अरिष्ट (रिठा) गणात (सॅपिंडेलीझ) केला जातो. या कुलाची प्रमुख लक्षणे : राळयुक्त चीक; लहान, एकलिंगी किंवा द्विलिंगी, नियमित फुले: संदले ३–७ जुळलेली; पाकळ्या ३-७ सुट्या; पेल्यासारखे बिम्ब; केसरदले ३–७ किंवा दुप्पट; ऊर्ध्वस्थ किंजपुट व बहुधा आठळीयुक्त फळ.

**anaerobe (anaerobic)** अननिल; अवायुजीवी
हवेशिवाय जगणारे; उदा. नायट्रट क्षारांचा नाश करणारे जमिनीतील सूक्ष्मजंतू.

**anaerobic respiration** अननिल श्वसन
प्राणवायू बाहेरून आत घेतल्याशिवाय चालणारी काही सजीवांतील ऊर्जा निर्माण करणारी प्रक्रिया; उदा. काही सूक्ष्मजंतू; किण्व (यीस्ट); या प्रकारांत विशिष्ट पदार्थांच्या विघटनातून ऊर्जा प्राप्त केली जाते.

**analogous** समरूप; सदृश
दोन किंवा अधिक अवयवांमध्ये समान कार्यामुळे आलेला सारखेपणा; उदा. द्राक्षवेलीचे (खोड) ताणे व वाटाण्याचे (दल) ताणे; निवडुंगाचे व बाभळीचे काटे भिन्न अवयवांची रूपांतरे आहेत; पहा homologous.

**analogy** समरूपता; सादृश्य
समान कार्यांमुळे आलेला (भिन्न अवयवातील) स्वरूपातलि सारखेपणा; पहा homology.

**anandrous** केसरहीन
केसरदले नसलेले (फूल); उदा. पोपईची स्त्री-पुष्पे; सूर्यफुलाची किरणपुष्पके.

**anaphase** पश्चावस्था
कोशिकेच्या समविभाजनातील चारीपैकी उपांत्य अवस्था; यामध्ये प्रकलातील रंगसूत्रांची विभागणी संपून त्यांचा एकेक संच कोशिकेच्या दोन टोकाकडे स्थिर होतो; पहा mitosis.

**anastomose** सिरामीलन; सिरासंधि
अनेक शिरा परस्परांना जोडल्या जाणे.

**anastomosing (netted)** जाळीदार
अनेक शिरा परस्परांशी जुळून बनलेली संरचना असलेला (अवयव).

**anastomosis** सिराजाल
अनेक लहान मोठ्या शिरांची जाळीदार मांडणी उदा. अनेक पाने.

**anatomist** शारीरविज्ञ
शरीराच्या अंतर्रचनेसंबंधीची विशेष ज्ञानी व्यक्ती.

**anatomy** शारीर
शरीरातील संरचनात्मक माहिती.

**—, minute (histology)** सूक्ष्म शारीर; ऊतकविज्ञान
सूक्ष्मदर्शकाच्या साहाय्याने मिळणारी शरीराच्या भिन्न अवयवांची तपशीलवार संरचनात्मक माहिती; यामध्ये कोशिका व त्यांचे समूह (ऊतके) यासंबंधीची माहिती असल्याने येथे ऊतकविज्ञान अशीही संज्ञा वापरतात.

**anatropous** अधोमुख; अधोवर्ती
खाली वळलेले बीजकरंध्र असलेले ( बीजक ); उदा. सूर्यफूल; येथे बीजबंध बीजकाच्या आवरणाशी चिकटलेला असून बीजकरंध्र व नाभि जवळ जवळ असतात; पहा ovule; raphe.

**ancestral** पैतृक
आनुवंशिकतेमुळे पूर्वजांकडून मिळालेले; उदा. पानांफुलां-फळांचे वैशिष्ट्य, संरचना, इ.

**anchored** तललग्न
तळाशी चिकटलेले.

**androcyte** रेतुकजनक
प्रजोत्पादक नर ( पुं– )कोशिका बनविणारी मूळची कोशिका.

**androecium** केसरमंडल; पुं-केसरमंडल
फुलातील परागकण बनविणाऱ्या एक किंवा अनेक अवयवांचा ( केसरदलांचा ) संच; पहा stamen; pollen.

**androgenic haploid** पुंजनित एकगुणित
रंगसूत्रांचा एकच संच असलेल्या ( एकगुणित ) नरकोशिकेपासून बनलेले ( अपत्य ).
पहा parthenogenesis; haploid.

**androgynophore** केसरकिंजधर
फुलातील पाकळ्यांमधून वर वाढलेला व प्रथम केसरमंडल आणि नंतर किंजमंडल धारण करणारा अक्ष ( दड ); उदा. पांढरी तिळवण.

**androphore (gonophore)** केसरधर
पाकळ्या व केसरदले यांमधील देठासारखा भाग ( अक्ष ); उदा. कृष्णकमळ

**androsporangium** पुं–बीजुककोश
पुं–बीजुक (लघुबीजुक) बनविणारी कोशिका; हिचेच रूपांतर ( पक्व झाल्यावर ) कोशात होते.

**androspore** पुं–बीजुक
रुजल्यावर एक खुजा (ऱ्हस्व ) पुं–तंतू उत्पन्न करणारे व हालचाल करणारे ( चर ) बीजुक; उदा. इडोगोनियम शैवल; पहा nanandrium.

**anemometer** पवनमापक; वातमापक; पवनमापी
वाऱ्याच्या वेगाची नोंद करणारे उपकरण; स्थलविज्ञानात उपयुक्त.

**anemophile** वातप्रिय
वाऱ्यात चांगल्या प्रकारे वाढणारी ( वनस्पती ).

**anemophilous** वायुपरागित
वाऱ्याच्या साहाय्याने परागांचे वहन ( सिंचन ) करणारी ( वनस्पती ); उदा. गवत; सायकस, इ.

**anemophily** वायुपरागण
वाऱ्याकडून परागण घडविण्याची पद्धत.

**anemophobe ( anemophobous )**
वातवर्ज्यक; वातद्वेषी
वारा वर्ज्य करणारी ( वनस्पती ).

**anfractuose ( sinuous; spirally twisted )**
सर्पिल; तरंगित
नागमोडीसारखे; पिळीव; उदा. पांढरी सावर.
( *Eriodendron anfractuosum* DC. )

**Angiospermae** आवृतबीज वनस्पती उपविभाग; ॲंजिओस्पर्मी
बीजाला फलावरणाचे संरक्षण असणाऱ्या वनस्पतींचा गट; सामान्य भाषेत, फुलझाडे. वनस्पति-कोटीतील बीजी वनस्पतींच्या विभागातील दोन्हांपैकी एक उपविभाग; दुसरा उपविभाग, प्रकटबीज वनस्पती.
पहा Gymnospermae; flower.

**angle of divergence** परामुखता कोन
एकाआड एक पानांच्या मांडणीत, भिन्न पातळीतील दोन जवळच्या ( क्रमागत ) पानांतील स्थानांतर; हे कोनाच्या अंशात दर्शविले जाते; उदा. गवताच्या खोडावर प्रत्येक पेऱ्यावर एक पान असून एकूण पाने दोन रांगांत असतात, म्हणून परामुखता कोन १८०° मानला जातो.
पहा phyllotaxy ( phyllotaxis ).

**angular** कोनयुक्त; कोनीय
कोन असलेले; आडव्या छेदात अवयवाचा परीघ वाटोळा नसून चौकोनी, त्रिकोनी किंवा षट्कोनी असलेले ( उदा. खोड, फळ, बी, इ. ) उदा. कांडवेल, मोथा, निवडुंग, तुळस, इत्यादींचे खोड; भेंडीचे फळ.

**animate** सजीव; चेतन
हालचाल, श्वसन, वर्धन, पोषण व प्रजोत्पादन इत्यादी सजीवांची लक्षणे दर्शविणारे; जिवंत; अर्थात् प्राणी, वनस्पती, विषाणू, सूक्ष्मजंतू , इ.

**anisogametes** असमगंतुके
सारखे नसलेले ( नर व स्त्री असा भेद दर्शविणारे ) प्रजोत्पादक घटक ( कोशिका ); पहा isogametes.

**anisogamy** विषमयुति; असमयुति

सारख्या नसलेल्या दोन प्रजोत्पादक कोशिकांचा (गंतुकांचा) संयोग; पहा heterogamy.

**anisomerous** असमभागी

प्रत्येक मंडलातील पुष्पदलांची संख्या सारखी नसलेले (फूल); उदा. वाटाण्याचे फूल (संदले पाच, प्रदले पाच, केसरदले दहा, किंजदले दोन). पहा isomerous.

**anisophyllous** भिन्नपर्णी

एकाच वनस्पतीवर दोन प्रकारची पाने असणारी; ती एकाच माध्यमात (हवेत किंवा पाण्यात) असतात; उदा. सिलाजिनेला मार्टेन्सी.

**anisophylly** भिन्नपर्णत्व

वर वर्णिल्याप्रमाणे दोन प्रकारच्या पानांचे अस्तित्व.

**anisostaminous (anisostemonous)** असमकेसर

सर्व केसरदले सारखी नसणारी (वनस्पती); उदा. मोहरीच्या फुलात काही केसरदले आखूड तर काही लांब असतात.

**Anonaceae** सीताफल कुल; ॲनोनेसी

सीताफळ, रामफळ, मारुतिफळ, हिरवा चाफा, हिरवा अशोक इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा अंतर्भाव मोरवेल गणात (रॅनेलीझ) मध्ये केला जातो; हचिन्सन यांनी सीताफळ गणात (ॲनोनेलीझमध्ये) केला आहे. या कुलाची सामान्य लक्षणे : वृक्ष अथवा झुडपे; साधी एकाआड एक पाने; फुलात तीन संदले; तीन किंवा सहा सुट्या पाकळ्या; अनेक केसरदलांची सर्पिल मांडणी व अनेक ऊर्ध्वस्थ व सुटी किंजदले; घोसफळ व सपुष्क रेषाभेदित बिया.

**annual** वर्षायु

वार्षिक; एकच वर्ष किंवा ऋतू आयुष्य असणारे. उदा. मका, मिरची. (*Capsicum annuum* L.) सूर्यफूल (*Helianthus annuus* L.)

**— ring** वार्षिक वलय

खोडामध्ये दरवर्षी एक याप्रमाणे बनत असलेले प्रकाष्ठाचे वर्तुळ. बहुवर्षायू वृक्षांच्या खोडांतील वर्तुळे मोजून त्यांच्या वयोमानाचा अंदाज करतात; उदा. द्विदलिकित फुलझाडे आणि प्रकटबीज वनस्पती.

**annular** वलयाकृति; कंकणाकृति

बांगडीसारख्या आकाराचे (कंगोरे असलेली वाहिका किंवा वाहिनी).

**annulus** वलय, स्फोटक वलय

(१) भूछत्र [कवक] वनस्पतीच्या दांड्यावर असलेले काकणासारखे कडे.

(२) नेचे वनस्पतींच्या बीजुककोशावर असलेला जाड आवरणाच्या कोशिकांचा थर; यामुळे कोशाच्या स्फोटास चालना मिळते.

(३) शेवाळी वनस्पतींच्या बीजुकाशयावर स्फोट घडवून आणणारा जाड कोशिकांचा थर.

**anomalous structure** असंगत संरचना

सर्वसाधारणतः नित्य न आढळणारी खोड किंवा मुळे यांची अंतर्रचना; बहुधा द्वितीयक वाढीत ऊतककराच्या अनित्य क्रियेमुळे अशी अंतर्रचना निर्माण होते व कित्येकदा तिचे विशिष्ट कार्य असते. उदा. सायकस व मोठ्या वेलींची खोडे; मुळा, गाजर, बीट यासारखी मांसल मुळे.

**antagonism** विरोध

(१) वनस्पतींच्या पोषणामध्ये खनिज लवणांच्या वैयक्तिक विषारी परिणामांचे परस्पराकडून निराकरण होण्याचा प्रकार. (२) एका जीवाच्या वाढीवर दुसऱ्याचा अवरोध.

**antagonistic symbiosis** विरोधी सहजीवन

दोन सजीव एकत्र जीवन कंठत असताना एकाचा दुसऱ्यावर हानिकारक परिणाम होण्याचा प्रकार; उदा. आश्रय देणारी एक वनस्पती व तिच्यावर जगणारी दुसरी वनस्पती (आकाशवेल; तांबेरा, काणी अर्गट यासारखे रोग); पहा symbiosis.

**anterior** पुरश्च; अग्र; अग्रीय

सजीवांच्या शरीराचा किंवा अवयवाचा पुढचा (डोक्याकडील, टोकाकडील) भाग; खोडावरील बाजूच्या फुलांच्या बाबतीत खोडाजवळची बाजू पश्च व त्याविरुद्ध असलेली बाजू ती पुरश्च.

**antero-posterior** अग्रपश्च

पुढचा व मागचा भाग यातून जाणारी किंवा परस्पराविरुद्ध टोकातून जाणारी (रेषा किंवा दिशा).

**— — plane** अग्रपश्च प्रतल

वर वर्णन केल्या प्रकारची उभी पातळी.

**anthella** निम्नाग्र पुष्पबंध

गुलुच्छ नावाच्या फुलोऱ्यात वरच्या पातळीत खोलगटपणा असणारा प्रकार; उदा. प्रनड (Juncus); पहा corymb.

**anther ( pollen sac )** परागकोश
फुलातील केसरदलाच्या तंतूच्या टोकास असणारी व परागकणांच्या भुकटीने भरलेली पिशवी; याचे बहुधा दोन खंड असून प्रत्येकात प्रथम दोन कप्पे असतात; पुढे त्याचा एक कप्पा ( कोटर ) बनतो.

**antheridial chamber** रेतुकाशय कोटर
रेतुकाशये अंतर्भूत करणारी पोकळी; उदा. अँथोसिरॉस शेवाळी ( शृंगकावर्ग ).

**antheridiophore** रेतुकाशयदंड
रेतुकाशयांना आधार देणारा दांडा; उदा. शेवाळी.

**antheridium** रेतुकाशय
पुं-गंतुके ( प्रजोत्पादक नरकोशिका ) निर्माण करणारा बहुकोशिक अवयव; शेवाळी, नेचे व नेचाभ वनस्पतींत आढळतो; काही शैवलांत एककोशिक अवयव याच नावाने ओळखतात.

**antheriferous** परागकोशधारी
अनेक परागकोश धारण करणारा (दांडा किंवा नलिका); उदा. जास्वंद.

**antherizoid ( spermatozoid )** रेतुक
प्राणी व वनस्पती यामध्ये आढळणारी, हालचाल करणारी, केसलयुक्त प्रजोत्पादक पुं-कोशिका ( पुं-गंतुक ); पहा gamete.

**anthesis** पुष्पविकसन; पुष्पकाल
फुलणे; वनस्पतीला फुले यणे; कळ्या उमलणे; काही वनस्पती वर्षातून एकदाच फुलतात ( उदा. गुलमोहोर), तर काही कमीजास्त प्रमाणात वर्षभर फुलतात ( उदा. कण्हेर, गुलाब, इ. ); काहींच्या जीवनात एकदाच फुले येतात ( उदा. बांबू ).

**Anthocerotae** शृंगकावर्ग; अँथोसिरोटी
शेवाळी वनस्पतींच्या विभागातील एक वर्ग. काहींच्या मते यकृतका वर्गातील तीन गणांपैकी एक; अँथोसिरोटेलीझ, मार्चांशिएलीझ व युंगरमॅनिएलीझ हे तीन गण होत; हल्ली बहुतेक शास्त्रज्ञ हेपॅटिसी (यकृतका), अँथोसिरोटी ( शृंगका ) व मुस्सी ( हरिता ) असे शेवाळींचे तीन वर्ग मानतात. येथे बीजुकधारी पिढी गंतुकधारीवर अंशतः अवलंबून असून पद व बीजुकाशय यात विभागलेली असते. गंतुकधारी शरीर सपाट व फार साधे असत. या प्रकारच्या पूर्वजांपासून अत्यंत साधी वाहक ऊतके असलेली बीजुकधारी स्वतंत्र पिढी व त्यापासून पुढे नेचाभ वनस्पती अवतरल्या असाव्या असे काही शास्त्रज्ञ मानतात. पहा Muscinae = Bryophyta ( शेवाळी विभाग ).

**anthocyanin** वर्णद्रव्य; नील-रक्त-द्रव्य
फुले, फळे, पाने इत्यादींमध्ये आढळणारे निळे, किंवा लाल (गडद किंवा फिकट) रंगद्रव्य; हे कोशिकारसात विरघळलेले असते; विशिष्ट ऋतूत किंवा कोवळेपणी कित्येक पानांत आढळते. यामुळे ते अवयव रंगीत दिसतात; नायट्रोजनच्या कमतरतेमुळेही हे लक्षण आढळते.

**anthophore** प्रदलदंड; प्रदलधर
संदले व प्रदले यांमधील अक्षाचा भाग; बहुधा हा संक्षिप्तच असतो.

**anthophyll** सवर्ण पुष्पदल
रंगीत संदल किंवा प्रदल; कधी कधी केसरदले व किंजदले ही रंगीत असतात (उदा. कर्दळ).

**anthracnose** करपा; कवडी
(१) द्राक्षवेलीचा एक रोग (*Phoma*);
(२) कापसावरचा एक रोग (*Colleotrichum*); यामध्ये फळांवर किंवा पानांवर पिंगट ठिपके येऊन पिकाची हानी होते; काकडी, टरबूज, भात इत्यादींवरही करपा रोग येतो.

**antiauxine** प्रतिवृद्धिनियामक
वृद्धीचे नियमन करू न देणारा.

**antibody** प्रतिद्रव्य
शरीरात बाहेरून आलेल्या हानिकारक द्रव्याला विरोध करणारे द्रव्य.

**anticlinal** पृष्ठजाल्य
पृष्ठभागाशी काटकोन करणारे (उदा. कोशिकावरण ).

**anticlockwise (sinistrorse)** अपसव्य; वामावर्त; डावी
घड्याळ्याच्या काट्यांच्या विरुद्ध दिशेने वळण घेणारी ( वेल ); ( उदा. घेवडा, अमरवेल); पहा clockse; dextrorse; twiner.

**antienzysue** प्रतिवितंचक
वितंचकाच्या आंबविण्याच्या क्रियेस विरोध करणारे द्रव्य.

**antipetalous** प्रदलसंमुख
पाकळ्यांच्या समोर असणारे ( उदा. केसरदले ).

**antipodal** तलस्थ
फुलझाडांच्या बीजकातील गर्भकोशाच्या तळाजवळ असणारी; उदा. कोशिका; सामान्यपणे या तीन असतात.

**antisepalous** संदलसंमुख
संदलाच्या समोर असलेला (संदलाशी एकाआड एक नसणारा); उदा. पाकळी किंवा केसरदलासारखा अवयव.

**antiseptic** पूतिरोधक
जंतुनाशक; कुजणे, नासणे, आंबणे इत्यादी प्रक्रियेशी विरोध करणारे व त्यामुळे त्या प्रक्रियेला जबाबदार असणाऱ्या जंतूस मारक द्रव्य.

**antitoxin** प्रतिविष
शरीरातील विषाला मारक (पदार्थ).

**Apetalae (Incompletae)** अप्रदल (प्रदलहीन) उपवर्ग; एपेटॅली
पाकळ्या नसलेली फुले असणाऱ्या द्विदलिकित वनस्पतींचा बेंथॅम आणि हूकर यांच्या वर्गीकरणातील उपवर्ग; या वनस्पती मूलतः प्रारंभिक समजून त्यांचा वेगळा गट केला गेला; तथापि त्यांपैकी कित्येक ऱ्हासामुळे प्रदलहीन असून मुक्तप्रदल (सुट्या पाकळ्या असलेल्या) वनस्पतींशी त्यांचे आप्तभाव असल्याचे आढळल्याने एंग्लर व प्रँटल यांच्या वर्गीकरणपद्धतीत अप्रदल व मुक्तप्रदल वनस्पतींचा समावेश एकाच उपवर्गात (आर्किक्लॅमिडी = आद्यपरिदल) करणे नैसर्गिक वर्गीकरणपद्धतीच्या तत्त्वास सुसंगत मानतात. युक्तप्रदल वनस्पतींशी तुलना करता अप्रदल व मुक्तप्रदल वनस्पती सापेक्षतः खालच्या दर्जात समाविष्ट होतात.

**apetalous** अप्रदल; प्रदलहीन
पाकळ्या (पुष्पमुकुट) नसलेले (फूल); उदा. गुलबुश; एरंड. गुलबुशाच्या फुलातील रंगीत पाकळ्यासारखा भाग परिदलमंडल असून संवर्तासारखा तळातील भाग छदमंडल असते.

**apex** अग्र
शेंडा; टोक; खोडाच्या पानाच्या किंवा मुळाच्या टोकाचा भाग.

**apheliotropism (negative heliotropism)** ऋण प्रकाशानुवर्तन
प्रकाशाच्या चेतनेमुळे वनस्पतींच्या अवयवांचे प्रकाशाच्या विरुद्ध दिशेकडे वाढणे अथवा वळणे (वाढण्याची प्रवृत्ति); पहा heliotropism.

**aphyllous (leafless)** पर्णहीन; अपर्ण
पानांचा अभाव असणारे (खोड); उदा. शतावरी, अमरवेल, सोमलता इ.

**aphylly** पर्णाभाव; पर्णहीनत्व; अपर्णत्व
पाने नसण्याचा प्रकार; उदा. नेपती (*Capparis aphylla* Roth.).

**Apiaceae** एपीएसी
पहा Umbelliferae

**apical** अग्रस्थ; शीर्षस्थ
शेंड्यावर (टोकावर) असलेले (उदा. फूल किंवा कळी).

**apiculate** तीक्ष्णाग्र
आखूड, तीक्ष्ण पण लवचिक टोक असलेले (पान); उदा. त्रिधारी निवडुंग.

**aplanogamete** अचर गंतुक
गतिशून्य प्रजोत्पादक कोशिका; उदा. स्पायरोगायरा शैवल; बुरशी.

**aplanospore** अचर बीजुक
हालचाल न करणारे बीजुक; उदा. अनेक कवक वनस्पती; अनेक उच्च दर्जाच्या वनस्पती.

**apocarpous** मुक्तकिंज; पृथक अंडपी
सुटी (अलग) किंजदले असलेले; उदा. मोरवेल, पिवळा चाफा, कुडा, इत्यादींची फुले.

**apocarpy** मुक्तकिंजत्व
मुक्तकिंज असण्याचा प्रकार.

**Apocynaceae** करवीर कुल; ॲपोसायनेसी
कण्हेर (करवीर), कुटज (कुडा), तगारी, पांढरा चाफा, करवंद, सातवीण इत्यादी फुलझाडांचे (द्विदलिकित) कुल. या कुलाचा अंतर्भाव बेसींच्या पद्धतीत किराइत गणात (जेन्शिएनेलीझ) केला असून हचिन्सन यांनी करवीर गणात (ॲपोसायनेलीझ) केला आहे; या कुलाची प्रमुख लक्षणे : दुधासारखा चीक, साधी पाने बहुधा समोरासमोर किंवा मंडलित; पूर्ण, नियमित, द्विलिंगी फुले; जुळलेल्या चार ते पाच पाकळ्या व त्यास चिकटलेली, सुटी, चार ते पाच केसरदले; ऊर्ध्वस्थ सुट्या किंवा जुळलेल्या दोन किंजदलांचे किंजमंडल; फळे विविध; पंखयुक्त किंवा केशयुक्त (कधी साध्या) बिया.

**apogamy** अफलित जनन; अनिषेक जनन
लैंगिक प्रक्रियेच्या (फलनाच्या) अभावीही प्रजोत्पादन घडून येणे; उदा. काही नेचे.

**—, reduced (meiotic euapogamy)** न्यूनित अनिषेक जनन
गंतुकधारीच्या कोशिकांपासून नवीन बीजुकधारीची निर्मिती; हा बीजुकधारी एकगुणित असतो.

**—, vegetative** शाकीय अफलित (अगंतुक) जनन
लैंगिक पिढीपासून परंतु लैंगिक प्रक्रियेशिवाय नवीन बीजुकधारी वनस्पतीची निर्मिती; उदा. नेचे. पहा parthenogenesis.

**apomict** असंगजनित
फलनाशिवाय बनलेली (वनस्पती).

**apomixis** असंगजनन
प्रजोत्पादनामध्ये गंतुकांचा संयोग किंवा प्रकलाचे न्यूनीकरण (विभाजन) न होता नवीन पिढीची निर्मिती; यामध्ये अफलित जनन, अबीजुक जनन व अनिषेक जनन यांचा समावेश होतो.

**apophysis** (१) आशयतल (२) शल्कपीठिका
(१) शेवाळीतील बीजुकाशयाचा तळचा भाग.
(२) काही शंकुमंत वनस्पतीतील बीजकाच्या खवल्यावर असलेला उंचवटा; उदा. चीड (पाइन)

**aposepalous** मुक्तसंदल
पहा polysepalous.

**apospory** अबीजुकजनन
बीजुकनिर्मिती न होता बीजुकधारी (द्विगुणित) पिढीच्या इतर भागांपासून नवीन लैंगिक अवयव धारण करणाऱ्या (गंतुकधारी) पिढीची निर्मिती; उदा. काही नेचे; ही गंतुकधारी पिढी अनित्य (द्विगुणित) असते; पहा haploid; diploid; gametophyte; sporophyte.

**apostrophe** विमुखावस्था
तीव्र प्रकाशाच्या चेतनेमुळे हरितकणयुक्त कोशिकेच्या उभ्या भिंतीजवळ ते कण एकाखाली एक अशी ओळ करून राहण्याचा प्रकार (अथवा त्याकरिता केलेली हालचाल).

**apothecium** मुक्त धानीफल
शैवाक (धोंडफूल) व काही धानीकवकात आढळणारा उघडा, पेल्यासारखा किंवा वाटीसारखा, बीजुके निर्माण करणारा अवयव; पहा perithecium; ascus.

**apparent** आभासी
प्रत्यक्षात नसलेले; वरवर आढळणारे किंवा दिसणारे.

**appendage** उपांग
शरीरावर किंवा अवयवावर वाढलेला गौण किंवा कमी प्रतीचा लहान अवयव; उदा. केस, खवला, काटा, इ.

**appendicular** उपांगीय; उपांगासंबंधी

**appendicular theory** उपांगीय सिद्धांत
ऊर्ध्वस्थ किंजपुटापासून अधःस्थ किंजपुटाचा क्रमविकास झाला असून त्यामध्ये इतर पुष्पदलांच्या तळभागांपासून बनलेल्या आवरणाने तो किंजपुट प्रथमपासून क्रमाने वेढून तो बदल झाला असावा अशी एक उपपत्ती; ही दुसऱ्या उपपत्तीपेक्षा अधिक ग्राह्य मानली गेली आहे; पहा receptacular theory.

**appendiculate** सोपांग
उपांगे असलेला (भाग).

**apposite** सन्निध
दोन सारखे अवयव परस्पराजवळ असणे.

**apposition theory** स्तराधान सिद्धांत
कोशिकावरणाच्या प्राथमिक थरावर आतील बाजूस नवीन थर बसून वाढ होते, अशी उपपत्ती.

**appressed** आलग्न
पहा adpressed.

**appresorium** आबंधक
आश्रय वनस्पतीस बाहेरून चिकटून राहण्यास उपयुक्त असा अवयव; उदा. जीवोपजीवी कवक वनस्पती.

**aqua culture (water culture; hydroponics)** मृद्हीन कृषि; जलकृषि
पोषक द्रावणाच्या साहाय्याने वनस्पतींची कृत्रिम पद्धतीने वाढ (संवर्धन) करण्याची पद्धती (प्रकार); यालाच soiless culture असे म्हणतात, कारण या पद्धतीत नित्याप्रमाणे जमिनीतील खनिज पोषणावर वनस्पती अवलंबून नसतात.

**aquarium** जलजीवपात्र; जलजीवालय
सदैव पाण्यात असणाऱ्या वनस्पती व प्राणी यांना नैसर्गिक परिस्थिती प्राप्त करून देणारी व त्यांची वाढ व प्रजोत्पादन यास मदत करणारी कृत्रिम पेटी (पात्र); अशा अनेक पेट्यांतून मोठ्या प्रमाणावर वनस्पती व प्राणी ठेवून त्यांचा अभ्यास व प्रदर्शन करण्याची सोय असलेली संस्था (जलजीवालय).

**aquatic** जलवासी; जलीय; जलचर
सदैव पाण्यात असणारे; उदा. शैवले, मासे, इ. उदा. नावळी (*Ipomoea aquatica* Forsk.).

**— life** जलजीवन
पाण्यातील जीवनक्रम; जलजीव (पाण्यात राहणारे सजीव).

**aqueous ( watery )** आप्य; जलीय
पाणी असलेले; पाण्यात केलेले ( विद्रव, द्रावण ).

**— tissue** आप्योतक
पाण्याचा संचय करणाऱ्या कोशिकांचा समूह; ह्या कोशिकामधून रित्या जागा ( मोकळ्या ) कमी असून हरितकणूंची संख्याही कमी असते; उदा. मांसल पाने, खोड इत्यादी मरुवनस्पतींचे अवयव.

**Araceae (Aroideae)** सुरण कुल; ॲरेसी।
वेखंड, सुरण, अळू, गोंडाळ इत्यादी एकदलिकित वनस्पतींचे कुल. बेंथॅम आणि हूकर यांच्या वर्गीकरण पद्धतीत न्यूडिफ्लारी (नग्नपुष्प) श्रेणीत परंतु हचिन्सन याच्या पद्धतीत सुरण गणात (ॲरेलीझ) या कुलाचा समावेश आहे; प्रमुख लक्षणे : महाछदाने संरक्षित असा स्थूलकणिश फुलोरा; द्विलिंगी किंवा एकलिंगी फुले; परिदले क्वचित आणि खवल्यासारखी; सहा केसरदले (कधी कमी व जुळलेली); किंजदल एक किंवा अधिक; मृदुफळ.

**Araliaceae** तापमारी, कुल; ॲरेलिएसी
तापमारी (ॲरेलिया), फॅट्सिया, पॅनॅक्स, हेडेरा इत्यादी उद्यानवनस्पतींचे लहान कुल; याचा समावेश चामर गणात केला जातो. प्रमुख लक्षणे : वृक्ष, झुडपे, वेली; राळनलिकायुक्त; पाने साधी किंवा संयुक्त; फुलोरे चामरकल्प किंवा स्तबक; फुले द्विलिंगी, अपिकिंज, पंचभागी; पाच जुळलेल्या किंजदलांचा अधःस्थ किंजपुट ( क्वचित ऊर्ध्वस्थ ); कप्पे पाच व प्रत्येकात एक बीजक; बहुधा अश्मगर्भी फळ; सपुष्क बीजे.
पहा Umbelliflorae ( Umbellales ).

**arbor** वृक्ष
काष्ठयुक्त बहुवर्षायू झाड; पहा tree. उदा. कुंभा ( *Careya arborea* Roxb. ); चिनी कंदील ( *Malvaviscus arboreus Cav.* ).

**arboraceous** वृक्षसदृश
वृक्षाप्रमाणे मोठे व काष्ठयुक्त.

**arboreous ( arboreal )** वृक्षस्थ; वृक्षवासी
वृक्षावर राहणारे.

**arborescent** वृक्षसम; वृक्षसदृश
वृक्षासारखे.

**arboret** लहान वृक्ष

**arboretum** (१) वृक्षसंवर्धनस्थान; वृक्षालय; वृक्षोद्यान; (२) वृक्षविज्ञान
( १ ) वृक्षासंबंधीच्या संशोधनार्थ बनविलेली बाग; ( २ ) वृक्षासंबंधीच्या माहितीचे पुस्तक ( वृक्षविज्ञान ).

**arboriculture** वृक्षसंवर्धन
लहान मोठ्या वृक्षांची पद्धतशीर लागवड अथवा त्यासंबंधी माहिती.

**arc-indicator** चाप-निदर्शक
वनस्पतीची उंचीतील वाढ मोजण्याचे कमानी पट्टीचे उपकरण.

**archegoniophore** अंदुककलशधर
एक अथवा अनेक अंदुककलशांना आधारभूत दांडा; उदा. मार्चांशिया, फिंब्रिॲरिया, इ. शेवाळी.

**archegonium** अंदुककलश
शेवाळी, नेचे व तत्सम ( नेचाभ ) वनस्पतींत आढळणारा सुरईच्या आकाराचा बहुकोशिक व स्त्री-गंतुक ( अंदुक ) असलेला अवयव.

**archesporium** बीजुकपूर्वज
बीजुके निर्माण करणारी आद्य कोशिका; हिच्यापासून प्रथम अनेक जनक कोशिका बनून नंतर शेवटी बीजुके निर्माण होतात; पहा sporocyte; spore.

**archicarp** पूर्वफल
काही कवकात आढळणारा, लैंगिक प्रक्रियेनंतर बनणारा व पुढे बीजुककोश निर्मिणारा अवयव.

**Archichlamydeae** आद्यपरिदली श्रेणी अथवा उपवर्ग
पहा Choripetalae.

**arcuate** वक्र
वाकलेला; बाकदार.

**aril ( arillus )** अध्यावरण; बीजोपांग
बीजकाच्या तळापासून उगम पावून बीजकाभोवती अंशतः किंवा पूर्णपणे वाढणारे बीजावरण; उदा. लिची, कमळ, विलायती चिंच, इ. पहा caruncle.

**arillate** बीजोपांगयुक्त; अध्यावरणयुक्त
बीजोपांग ( तिसरे आवरण ) असलेले ( बीज ).

**arillode ( false aril )** छद्मी अध्यावरण
बीजकरंध्रापासून वाढून बीजकावर पसरलेले बीजावरण; "जायपत्री" हे जायफळाच्या बीजावरील छद्मी आवरण बीजकाच्या दोन्ही टोकापासून ( बीजकरंध्र व बीजकबंध यांपासून ) वाढते.

**aristate** प्रशूकी
पहा awn.

**Aristolochiaceae** ईश्वरी कुल; ॲरिस्टोलोकिएसी
पोपटवेल (कुक्कुटवेल), सापसंद (ईश्वरी) इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; याचा अंतर्भाव मोरवेल गणात ( रॅनेलीझ ) केला जातो; याची प्रमुख लक्षणे : बहुधा एकाआड एक पानांच्या ओषधी, क्षुप किंवा वेली; फुले मोठी, एकसमात्र व द्विलिंगी; परिदले जुळलेली; केसरदले व किंजदले जुळून किंजकेसराक्ष बनतो; अधःस्थ किंजपुट; बिया अनेक; मृदुफळ किंवा बोंड. हचिन्सन यांनी हे कुल ईश्वरी गणात घातले आहे.

**Aroideae** सुरण कुल; ॲरॉइडी
पहा Araceae.

**aromaticus** सुगंधि
खमंग वास किंवा रुचि असलेले; उदा पानाचा ओवा. (*Coleus aromaticus* Lour.).

**armature** शस्त्रसंभार
वनस्पतींच्या शरीरावर किंवा शरीरांत आढळणाऱ्या स्वसंरक्षक योजना; उदा. काटे, दाहक (दंशक, कंडूत्पादक) केस, दुर्गंध, चीक, विषारी द्रव्ये, इत्यादी.

**armed** शस्त्रसज्ज
संरक्षक उपांगे असलेले.

**arrangement** मांडणी; विन्यास
खोडावरील पानांची, फुलातील दलांची, किंजपुटातील बीजकांची, इत्यादींची विशिष्ट व्यवस्था.

**Articulatae** संधिपादप वर्ग
पहा Equisetinae.

**articulated (jointed)** संधियुक्त; सांधेदार
सांधे असलेले; सांधलेले; उदा. एकिसीटमचे खोड; लिंबू किंवा पपनसाच्या पानाचे पाते.

**artificial selection** कृत्रिम निवड
एका जातीतील अनेक वनस्पतींतून (किंवा प्राण्यांतून) मनुष्याच्या आवडीप्रमाणे (गरजेप्रमाणे) विशिष्ट गुणयुक्त व्यक्तींची (प्रकारांची) पैदाशीकरिता (किंवा संकर घडवून आणण्याकरिता) केलेली निवड; कित्येक खाद्य वनस्पती किंवा पाळीव प्राणी मनुष्याने शेकडो वर्षे केलेल्या निवडीतूनच उगम पावले आहेत.

**arvensis** क्षेत्रज
लागवडीच्या जमिनीतील ( वनस्पती ); उदा. पुदीना. ( *Mentha arvensis* L. )

**ascending** आरोही; चढणारा
गुरुत्वाकर्षणाविरुद्ध वर वाढत जाणारा ( अवयव ).

**ascent** आरोह; उद्गम
चढण; अवयव ( खोड ) अथवा वनस्पती किंवा त्यातील द्रव पदार्थ वर चढविला जाण्याची प्रक्रिया ( रसारोह ).

**Asclepiadaceae** रुई (अर्क) कुल; ॲस्क्लेपीएडेसी
रुई, मांदार, हरणदोडी, अंतमूळ, माकडी, सोमलता, उतरणी, कावळी, उपळसरी इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; याचा समावेश किराईत गणात ( जेन्शिएनेलीझ मध्ये ) केला जातो; हचिन्सन यांच्या पद्धतीत करवीर गणात ( ॲपोसायनेलीझमध्ये ) केला आहे. प्रमुख लक्षणे : ओषधी, क्षुपे व वेली; बहुधा दुधी चीक आढळतो; पाने साधी व समोरासमोर; द्विलिंगी, पंचभागी, पूर्ण व नियमित लहान फुले; पाकळ्या जुळलेल्या व त्यावर केसरदलांशी संबंधित तोरण ( परिवलय ); तसेच केसरदले व किंजदले यांचा किंजकेसराक्ष; बहुधा परागांचे पुंज असून दोन किंजपुटापासून दोन स्वतंत्र पेटिकाफळे व त्यात शिखाल ( केसाळ झुबका असलेली ) बीजे असतात.

**ascidium** चषिका; कलश
पेला किंवा कुंभ यासारखा लहान अवयव.

**ascocarp** धानीफल
धानीकवक वनस्पतीत लैंगिक प्रक्रियेनंतर आढळणारा व धानीबीजुकांची निर्मिती करणारा अवयव; पहा apothecium; perithecium.

**ascogenous filament** धानीजनक तंतू
धानी व त्यातील बीजुके निर्माण करणारा तंतूसारखा अवयव.

**ascogonium** धानीयोनी
धानीकवकात आढळणारा प्रजोत्पादक स्त्रीलिंगी अवयव.

**Ascolichens** धानी शैवाक
पहा Lichens.

**Ascomycetes** धानीकवक वर्ग; ॲस्कोमायसेटीज
कवक वनस्पतींपैकी विशिष्ट प्रकारची बीजुके ( धानी बीजुके ) निर्माण करणारा ( सत्यकवक विभागातील ) एक गट; उदा. बाजरीवरील अर्गट रोग.
पहा Eumycophyta; ergot.

**ascospore** धानीबीजुक
धानीकवकातील प्रातिनिधिक व विविध आकाराचा एककोशिक प्रजोत्पादक घटक; हे धानी नावाच्या कोशिकेत प्रकलाच्या न्यूनीकरण विभागणीनंतर बनतात;

संख्येने ही बीजुके चार किंवा आठ असतात व ती निर्मिणाऱ्या कोशिकेस धानी म्हणतात.

**ascus** धानी

धानीकवकात बहुधा नेहमी आढळणारा बीजुककोश; यातील बीजुके रुजून नवीन कवक वनस्पतींची निर्मिती होते. उदा. किण्व ( यीस्ट ) या कवकातील धानीत चारच धानीबीजुके बनतात.

**asexual** अलिंग; निर्लिंग; अलिंगी; अलैंगिक

लिंगभेदयुक्त प्रजोत्पादनाचा संबंध नसलेली व बीजुकांच्या साहाय्याने घडून येणारी नवीन वनस्पतीची निर्माण-पद्धती.

**— organ** अलैंगिक अवयव

लिंगभेदयुक्त लक्षणाचा अभाव दर्शविणारा अवयव; उदा. बीजुककोश.

**— reproduction** अलिंग जनन

लिंगभेद न दर्शविणाऱ्या अवयवापासून होणारे प्रजोत्पादन.

**— stage** अलिंगावस्था

लिंगभेद युक्त अवयव नसलेली शारीरिक स्थिती ( पिढी ).

**asiphonogamous** अनिनाल्युतिक

निनाल्युति नसलेली ( वनस्पती ); पहा siphonogamous.

**asper** खर्बर

केस किंवा बारीक पुटकुळ्या यामुळे आलेला खड-बडीतपणा. उदा. पराया ( *Streblus asper* Lour. )

**assimilation** सात्मीकरण; समावेशन

बाहेरून घेतलेले अन्नघटक शरीरात सामावून घेणे अथवा शरीराशी एकरूप बनविण्याची प्रक्रिया; यामध्ये अन्नघटकांची रूपांतरे अभिप्रेत आहेत.

**assimilability** सात्मीकरणक्षमता

शरीरात वर वर्णन केल्याप्रमाणे सामावून घेण्याचे सामर्थ्य.

**association** संगति; साहचर्य

पादपीय समाजशास्त्रातील नैसर्गिक मूलभूत एकक; विशिष्ट पादपीय संघटना, स्थलविषयक घटकातील ऐक्य व स्वरूपदृष्ट्या असलेली एकता इ. वैशिष्ट्ये असलेला वनस्पतींचा नैसर्गिक समुदाय. अनेक वन-स्पतींच्या समुदायातील दोन किंवा अधिक प्रधान जाती सतत एकत्र वाढल्याने त्या समुदायास विशिष्ट स्वरूप प्राप्त होते. उदा. पळस, पांगारा व लाल सावर हे तिन्ही वृक्ष ज्या पादपसमुदायात ( पानझडी जंगलात ) एकत्र आढळतात त्याला पळस-पांगारा-सावर संगति म्हणतात; पहा community; consociation; formation.



**— index** संगति-निर्देशांक

संगतीतील वनस्पतींचे परिस्थितिजन्य प्रमाण दर्शविणारे गुणोत्तर; एखाद्या मोठ्या समुदायातील अनेक ( सु. ४० ) नमुन्यांपैकी काहींत ( सु. ३० ) अ व ब जाती एकत्र आढळतात, परंतु अ सर्व नमुन्यांत आढळल्यास $\frac{३०}{४०}$ = ·७५ हा संगति-निर्देशांक होतो.

**assortment** व्यवस्थापन

एकत्र असलेल्या भिन्न वस्तू ( किंवा गुण ) भिन्न गटामध्ये विभागून ठेवण्याची प्रक्रिया; उदा. आनु-वंशिकीमध्ये एका व्यक्तीत आईबापाकडून आलेले पर्यायी ( वैकल्पिक ) गुण ( घटक ) स्वतंत्र राहून प्रजोत्पादनानंतर पुढच्या पिढीत ( संततीत ) भिन्न अपत्यांत स्वतंत्रपणे उतरतात; पहा allelomorphs; heredity, genetics; segregation.

**— of characters ( factors ), free**
**गुणांचे ( घटकांचे ) स्वतंत्र व्यवस्थापन**

संकरजात प्रथम एकत्र असलेल्या गुणांचे पुढे स्वतंत्रपणे नवीन संततीत होणारे विभक्त व्यवस्थापन.

**aster stage** तारकावस्था

कोशिकेतील प्रकलांच्या विभाजनात स्वतंत्र झालेली रंग-सूत्रे कोशिकेच्या मध्यावर वर्तुळाकार मांडली गेल्याने ताऱ्याप्रमाणे भासणारे दृश्य; पहा mitosis.

**Asteraceae** सूर्यफूल कुल; ॲस्टरेसी; कंपॉझिटी

पहा compositae.

**asymmetrical** असमात्र; असममित

शरीराच्या किंवा विशिष्ट अवयवांच्या बाबतीत प्रमाण-बद्धतेचा अभाव; त्यामुळे कोणत्याही पातळीने त्या शरीराचे किंवा अवयवाचे दोन सारखे भाग करता येत नाहीत; उदा. निवडुंगाचे फूल.

**atmometer** बाष्पीभवनमापक

वाफेच्या रूपाने हवेत जात असलेल्या पाण्याचे मापन करणारे उपकरण; एक सच्छिद्र मृत्तिकापात्र. पहा potometer.

**atom** अणु

रासायनिक मूलद्रव्याचा सर्वात लहान घटक.

**ATP (adenosine triphosphate)** एटीपी (ॲडिनोसीन ट्रायफॉस्फेट)

वनस्पती, प्राणी व सूक्ष्मजीव, यांच्या सजीव द्रव्यात सदैव आढळणारा व ऊर्जासंचय करणारा आद्य रासायनिक पदार्थ (संयुग); ही ऊर्जा ऑक्सिडीकर विक्रियांत (कार्बोहायड्रेट, प्रथिने व मेदी संयुगे यांच्या ऑक्सिडीकरणात) निर्माण होते व तिचा विनियोग सर्व जीवप्रक्रियात होतो. एटीपी संयुग हे एडीपी (ॲडिनोसीन डायफॉस्फेट) पासून ऊर्जासंपन्न अकार्बनी फॉस्फेट संयुगाच्या साहाय्याने बनते व ते एक सह-वितंचक आहे. एटीपीचे एडीपीत रूपांतर होतेवेळी ऊर्जामुक्त होते व तिचा वापर अनेक जैव-प्रक्रियात होतो.

**atrophy** अपक्षय; पुष्टिरोध

शरीरावयवांच्या अगर विशिष्ट ऊतकांच्या किंवा कोशिकांच्या आकारमानात घट होणे; पोषणातील दोष किंवा रोग ही कारणे त्यास जबाबदार असतात; केव्हा तर अवयव अर्धवट बनतो अगर पूर्णपणे लोप पावतो.

**atropous (orthotropus)** ऊर्ध्वमुख

किंजपुटात बीजकरंध्र वर असलेले (सरळ बीजुक); उदा. सायकस.

**attached** अभिलग्न

चिकटलेली (वनस्पती); एक अवयव किंवा काय दुसऱ्यास चिकटून असलेला. उदा. दगडफूल; शैवल.

**attachment** अभिलाग

(१) चिकटून असण्याची वृत्ती किंवा घटना. उदा. परागकोश केशरतंतूस चिकटून असण्याचा प्रकार. (२) रंगसूत्रातील तर्कुयुजाचे स्थान; पहा centromere.

**attenuate** निमुळते

क्रमाने अरुंद होत गेलेले; उदा. कांद्याची पात; काही काटे.

**auricle** कर्णिका

मनुष्याच्या बाह्य कानाच्या खालच्या भागाप्रमाणे दिसणारा भाग (पानाचा तळभाग). उदा. नेफ्रोलेपिस नेचा; तरवडीची (*Cassia auriculate* L.) उपपर्णे.

**auricled** सकर्णिक; पालिवत्; कर्णिकाभ

कर्णिकाप्रमाणे पात्याचा तळ असलेले (पान); उदा. सालीट, मका, चांदवेल.

**autecology** स्वस्थलविज्ञान; स्वपारिस्थितिकी

एखादी वनस्पती जेथे निसर्गतः उगवते, वाढते, फुलते व तेथील परिस्थितीशी एकरूप होते त्यासंबंधीची (ते स्थल व ती वनस्पती यांचे परस्परसंबंधदर्शक) माहिती; पहा synecology.

**authority** प्राधिकार; कर्ता

एखाद्या कुलाचे, वंशाचे, किंवा जातींचे नाव ज्या शास्त्रज्ञाने प्रथम प्रसिद्ध केले ती व्यक्ती; उदा. Liliaceae Adanson या नावात अंतर्भूत केलेली व्यक्ती (Adanson).

**autoecious** एकस्थ

एकाच आश्रय वनस्पतीवर संपूर्ण जीवन काढणारी (वनस्पती); उदा. कवकांपैकी काही जाती (काणी तांबेरा, मूळकूज इ.)

**autoecism** एकस्थितत्व; एकस्थत्व

एकाच आश्रयावर वाढण्याची क्षमता.

**autogamy** आत्मयुति

केवळ स्वतःच्याच (शरीरातील; फुलातील) पुं-व स्त्री-गंतुकांचा संयोग.

**autogenesis (spontaneous generation)** स्वयंजनन

पूर्वी सजीव रूपात नसलेल्या कोणत्याही वस्तूपासून होणारी सजीवाची निर्मिती; हा समज अनेक वर्षे प्रचलित होता; पहा abiogenesis.

**autogenic** स्वयंजात; स्वजात; स्वयंजनित

स्वतःपासून निर्माण झालेले.

**autogenous** स्वयंभव; स्वजात

एकाच जातीतील अनेक वनस्पतींत (अथवा प्राण्यांत) दिसणारा, पण स्वसंपादित नसलेला (भेद, गुण, लक्षण).

**autonomous (spontaneous)** स्वयंप्रेरित; स्वायत्त

शरीराबाहेरील चेतकाशिवाय घडून येणारे; उदा. कोशिकेतील प्राकलाची भ्रमंती; खोडाच्या टोकाची नागमोडीसारखे वाढ (प्रच्यवन); पहा cyclosis, nutation.

**autonomy (of characters or factors)** गुण-घटकांचे स्वातंत्र्य (स्वायत्तता)

आनुवंशिक गुणांचे, लक्षणांचे किंवा लक्षणांबद्दल जबाबदार असलेल्या घटकांचे एका पिढीतून दुसऱ्या पिढीत उतरताना परस्परांवर अवलंबून नसणे.

**autopolyploidy** समगट-गुणन
व्यक्तीच्या शरीराच्या कोशिकेतील रंगसूत्रांची संख्या तिप्पट, चौपट इ. अशी असून ते सर्व संच एकाच जातीच्या वनस्पतीतून गुणनामुळे आलेले असण्याचा प्रकार; पहा allopolyploidy.

**autosome** अलिंग रंगसूत्र
लिंगसूत्रांशी संबंध नसलेले रंगसूत्र; पहा chromosome.

**autotroph (autotrophic)** स्वोपजीवी; स्वयंजीवी; स्वयंपोषी
निर्वाहाकरिता दुसऱ्या सजीवावर किंवा मृत शरीरावर अवलंबून नसणारा स्वतंत्र (सजीव); उदा. सर्व हिरव्या वनस्पती.

**autozygous** स्वयंयुग्मनजी; स्वरंदुकी
स्वतःच निर्मिलेली स्त्री- व नर-गंतुके एकत्र होऊन बनलेल्या रंदुकाने प्रजोत्पादन करणारी.

**autumn-wood** शरद्‌काष्ठ
हिवाळ्यात तयार होणारा लाकडाचा (प्रकाष्ठाचा) भाग; वसंतऋतूत तयार होणाऱ्या लाकडापासून हा ओळखता येतो; दोन्हींचे मिळून एक वार्षिक वलय बसते; पहा annual ring.

**auxilliary** साहाय्यक
विशेषप्रकारे मदत देणारी (कोशिका) उदा. लाल शैवाले.

**auxin (hormone)** वृद्धिसंप्रेरक; ऑक्सिन
वनस्पतींत वाढीसंबंधी महत्त्वाचे कार्य घडवून आणणारा रासायनिक पदार्थ (दूत); प्राण्यांमध्ये अनेक नलिकाहीन प्रपिंडातून असा अंतःस्राव रक्ताद्वारे शरीरात पसरविला जातो. प्रकाशाच्या दिशेकडे खोड वळते याचे कारण प्रकाशाचा परिणाम ह्या संप्रेरकावर होतो.

**auxonometer** वृद्धिमापक
वनस्पतीतील वाढ (लंबन) मोजण्याचे उपकरण.

**available** उपलब्ध; प्राप्य
प्राप्त करून घेता येण्यासारखे.

**awl-shaped (subulate)** आराकृति
तळापासून टोकाकडे निमुळते होत गेलेले (चांभाराच्या आरीसारखे) निरुंद व टोकदार; उदा. एरिओकॉलॉन व आयसॉएटिस यांची पाने.

**awn (arista)** प्रशूक
गवते व शूकधान्ये यांच्या परितुषावर किंवा इतरत्र वाढलेले राठ केसासारखे उपांग; उदा. Berberis aristata DO. दारुहळद.

**axial** अक्षीय
अक्षावरचे; अक्षासंबंधी; पहा axis.

**axil** कक्ष; कक्षा
बगल; खोडास पान चिकटलेले असते तेथील बगलेसारखा (कोनासारखा) भाग.

**axile** अक्षलग्न
अक्षाला (आसाला) चिकटून वाढलेले.

**— placentation** अक्षलग्न बीजकविन्यास
किंजपुटातील फक्त आसालाच चिकटून असणारी बीजकांची मांडणी; उदा. नागदवणा.

**axillary** कक्षस्थ; कक्षास्थ; कक्षीय
पानाच्या किंवा छदाच्या बगलेत असलेला (अवयव); उदा. कळी, फूल, शाखा, काटा, इ. उदा. काळा माका (*Caesulia axillaris* Roxb.).

**axis** आस; अक्ष
प्रमुख आधारभूत कण्यासारखा अवयव; उदा. खोड, फुलोऱ्याचा दांडा, इ.

**—, daughter** जन्याक्ष; उपाक्ष
मुख्य दांड्यावर असलेला दुय्यम प्रतीचा अक्ष.

**—, embryonic** गर्भाक्ष
गर्भावस्थेतील वनस्पतीचा अक्ष.

**—, median** अग्रपश्च अक्ष
अग्रस्थ व उलट बाजूचा (तलस्थ) भाग यांना जोडणारा भाग (अक्षवर्ती).

**—, mother** प्रधानाक्ष; जनकाक्ष
ज्यापासून इतर अक्ष निघतात असा मुख्य अक्ष.

**azure** निळा
आकाशाप्रमाणे रंग असलेला

**azygospore (parthenospore)** अगंतुबीजुक
दोन सारख्या प्रजोत्पादक कोशिकांपैकी फक्त एकापासूनच संयोगाशिवाय बनलेली प्रजोत्पादक कोशिका; उदा. म्यूकर बुरशी, स्पायरोगायरा शैवल, इ.

**azygous (unpaired)** अजोड
पिसासारख्या संयुक्त पानाच्या मध्यशिरेवरच्या एकाद्या दलास उलट बाजूस दलाचा अभाव असण्याचा प्रकार.

## B

**bacca (baccate fruit; berry)** मृदुफळ
आठळी (बाठा) नसलेले मगजयुक्त किंवा रसाळ साधे फळ; उदा. केळ, संत्र, पेरू; बहुधा यातील कठीण बिया मगजात विखुरलेल्या असतात.
उदा. बिर्मी (*Taxus baccata* L.).

**Bacillariophyceae** करंडक वर्ग
पहा Diatomaceae.

**bacillus** दंडाणु
साधारणपणे अत्यंत साधी, अतिसूक्ष्म, एककोशिक, लांबट, हरितद्रव्यहीन, परोपजीवी वनस्पती; कधी कधी ही संज्ञा बीजुकनाशक दंडाणूंच्या वंशालाच फक्त वापरतात: उदा. विषमज्वर व धनुर्वात इत्यादींचे रोगकारक सूक्ष्मजंतू; पहा bacterium.

**back-cross** पूर्वसंकर
संकरजाच्या आईबापांपैकी एकाशी केलेला (झालेला) त्याचा संकर; या प्रयोगामुळे आनुवंशिक लक्षणांचे अनुहरण कसे होते यावर प्रकाश पडतो.

**bacteriocidal** जंतुनाशक
सूक्ष्मजंतूंचा नाश घडवून आणणारे (द्रव्य).

**bacterioid** विकृतजंतू
शारीरिक बिघाड झालेला जंतू; शिंबी (शेंगा येणाऱ्या) वनस्पतींच्या मुळावरील गाठीत हे जंतू आढळतात.

**Bacteriology** सूक्ष्मजंतुशास्त्र
सूक्ष्मजंतूसंबंधी सर्व तपशीलवार माहितीची विज्ञान-शाखा.

**Bacteriophage** सूक्ष्मजंतुभक्षी
सूक्ष्मजंतूंचा नाश करणारे.

**bacteriosis** सूक्ष्मजंतुविकृति
सूक्ष्मजंतूपासून उद्भवलेला रोग.

**bacteriostatic** सूक्ष्मजंतुरोधक
सूक्ष्मजंतूंची वाढ थांबविणारे.

**Bacterium (pl. Bacteria)** शाकाणु; जीवाणु; सूक्ष्मजंतु
साधी, अतिसूक्ष्म, एककोशिक, भिन्न आकार दर्शविणारी, हरितद्रव्यहीन, परोपजीवी वनस्पती; काही हालचाल करतात; काही स्वोपजीवी (स्वावलंबी) व काही मृतोपजीवी व जीवोपजीवी असतात; कुजणे, आंबणे, नासणे, इत्यादी प्रक्रिया घडविण्याचे व प्रकाश, रंग, रोग उत्पन्न करण्याचे सामर्थ्य या जंतूत असून "लहान मूर्ती पण थोर कीर्ती" अशा सदरात ते येतात; आकाराप्रमाणे भिन्न नावे दिलेली आढळतात; पहा Schizomycophyta.

**bacteroid** सूक्ष्मजंतुसम
सूक्ष्मजंतूसारखे.

**balausta** दाडिमक; दाडिमसम
डाळिंबासारखे फळ; बीजाभोवती रसाळ आवरण असणारे व अधःस्थ किंजपुटापासून बनलेले मृदुफळ; पहा bacca.

**Balsaminaceae (Balsamaceae)**
तेरडा-तेरणा-कुल; बाल्समिनेसी
रिठा (अरिष्ट) गणातील फुलझाडांचे एक लहान कुल; याचा समावेश हचिन्सन यांनी हल्ली जिरॅनिएलीझमध्ये (भांड गणात) केला आहे. बेंथॅम व हूकर यांनी यातील वनस्पतींचा समावेश जिरॅनिएसी कुलात (भांड कुलात) केला आहे; तेरडा कुलात दोन वंश व सुमारे ४३० जाती अंतर्भूत असून त्या उष्ण कटिबंधीय आशिया व आफ्रिका येथे आढळतात. प्रमुख लक्षणे : ओषधी; पाने साधी व एकाआड एक; फुले द्विलिंगी व एकसमात्र; पाच संदलांपैकी (सुट्या) एक शुंडिकायुक्त; पाच पाकळ्यांपैकी बाजूच्या दोन दोन जुळलेल्या; केसरदलांचे फक्त परागकोश जुळून किंजपुटावर त्यांचे टोपीसारखे झाकण बनलेले; पाच जुळलेल्या किंजदलांच्या उर्ध्वस्थ किंजपुटात पाच कप्पे व अनेक बीजके; बोंड तडकून अपुष्क बीजे फेकली जातात; तेरडा ही सामान्य वनस्पती जंगलात व बागेत आढळते.

**barbate (bearded)** लंबकेशी
मऊ लांबट केसाचे पुंजके असलेले.

**bark** वल्क; साल
जुन्या काष्ठमय खोडाची किंवा मुळाची, बाहेरून संरक्षण करणारी बव्हंशी मृत कोशिकांची बनलेली साल; वल्क या संज्ञेत सजीव त्वक्षाकरासह त्यावरील सर्व मृतकोशिकांचे थर समाविष्ट करतात;
पहा cork-cambium; cork; ring-bark; scale bark.

**barren** (१) ऊषरा; (२) वंध्य; वांझ
(१) जीवनास आवश्यक त्या परिस्थितीच्या अभावी नापीक राहिलेली जमीन; उदा. वाळवंट; खडकाळ किंवा हिमाच्छादित प्रदेश.

(२) फळ किंवा कार्यक्षम बीज न बनवणारे (फूल); उदा. लागवडीतील केळ, अळू, गुलाब, इ.

**— bract** वंध्यछद

बगलेत फूल नसलेले छद; उदा. अननस.

**— flower** वंध्यपुष्प

वांझ फूल; उदा. बागेतील जास्वंद, गुलाब यांमध्ये बहुधा फळे किंवा बीजे बनत नाहीत.

**basal (basilar)** तलोद्भव; तलीय, तल

किंजपुटात तळापासून उगम पावलेले; उदा. सूर्यफुलाचे बीजक.

**base (basis)** तळ; तल

वनस्पतींच्या अवयवांचा तळचा भाग.

**basal cell** तलीय कोशिका; आधार कोशिका

**Basellaceae** मयाळ (उपोदकी) कुल; बॅसेलेसी

पहा Chenopodiaceae.

**basidiocarp** गदाफल

गदाकवक वर्गात बहुतेक आढळणारा व गदाकोशिका आणि त्यावरची गदाबीजुके निर्माण करणारा प्रजोत्पादक अवयव.

**Basidiolichens** गदा शैवाक

पहा Lichens.

**Basidiomycetes (Basidiomycetae)** गदा-कवक वर्ग; बेसिडिओमायसेटिझ

सत्यकवकांपैकी काहींमध्ये विशिष्ट प्रकारची गदेसारख्या बीजुककोशावर निर्माण होणारी गदाबीजुके निर्माण करणारा एक गट; उदा. भूछत्रे, तांबेरा, काणी इ. पहा Eumycetae, Eubasidii, Hemi-basidii.

**basidiospore** गदाबीजुक

गदाकवकामध्ये आढळणारे व गदेसारख्या कोशिकेबाहेर निर्माण होणारे एककोशिक व एकगुणित बीजुक (प्रजोत्पादक अलिंग कोशिका).

**basidium** गदाकोशिका

गदाकवकात आढळणारी विशिष्ट, काहीशी गदेसारखी व प्रजोत्पादक, अखंड किंवा विभागणारी कोशिका; हिच्या टोकावर दोन किंवा चार बीजुके बनून ती सुटून जातात व रुजल्यावर नवीन एकगुणित कवकतंतूंचे जाळे बनते. गदाबीजुके बनण्यापूर्वी गदाकोशिकेत द्विगुणित प्रकल असतो; बीजुके बनण्यापूर्वी न्यूनीकरण विभाजनाने एकगुणित प्रकल बनतात व प्रत्येक बीजुकात एक याप्रमाणे प्रवेश करतात.

**basifixed (innate)** तलबद्ध

केसरतंतूच्या टोकावर तळाशी चिकटलेला (परागकोश); उदा. टाकळा, तरवड, इ.

**basilar** तलोद्भव

पहा basal.

**basipetal** तलवर्धी

टोकापासून तळाकडे क्रमाने होणारी (फुलोऱ्याची) वाढ; यामुळे सर्वात जून भाग (उदा. फुले) टोका-जवळ व सर्वात कोवळा (अपक्व फुले, कळ्या) तळा-जवळ असा प्रकार; उदा. जाई, चमेली, रानटी गुलाब यांचे फुलोरे. पहा acropetal; centripetal.

**bast (phloem)** परिकाष्ठ

वनस्पतींच्या शरीरात अन्नरसाची ने-आण करणाऱ्या जिवंत, लांबट कोशिका (सछिद्र नलिका) व त्या-समवेत आढळणाऱ्या इतर कोशिका, सूत्रे इत्यादींचा संच (ऊतक).

**— - fibre** परिकाष्ठ सूत्र

परिकाष्ठातील दृढ आवरणाच्या लांब व मजबूत कोशिका.

**—, hard** उपकाष्ठ

परिकाष्ठाल्गतचा कठिण कोशिकांचा संच.

**—, soft** मृदु परिकाष्ठ

कठिण सूत्राशिवाय परिकाष्ठाचा शेषभाग.

**beaded (monoliform)** मणिमालाकृति

अनेक गाठींचे बनलेले व मण्यांच्या माळेप्रमाणे दिसणारे; उदा. काही मुळे, काहीं लाल शैवलाचे तंतू; काही केसरदलावरचे केस.

**beak** चंचू

अवयवाचा किंवा त्यावरील लांबट टोकदार (चोची-सारखा) भाग.

**beard** प्रशूक

पहा awn.

**Begoniaceae** शोभापर्ण कुल; बिगोनिएसी

बिगोनिया, बिगोनिएला, इत्यादी चार लॅटिन नावाच्या वंशातील द्विदलिकित फुलझाडांचे कुल. बेसींनी यांचा अंतर्भाव लोझेलीझ गणात व हचिन्सन यांनी कर्कटी गणात (कुकर्बिटेलिझ) केला आहे; तत्पूर्वी बेंथम व हूकर यांनी कृष्णकमळ गणात केला होता प्रमुख लक्षणे : बहुवर्षायू, भूमिस्थित खोडाच्या ओषधीय वनस्पती; काही मुळांच्या साहाय्याने वर चढणाऱ्या वेली; मूलज, सोपपर्ण, किंवा एकाआड एक, असमात्र,

साधी पाने; बगलेतील लहान ग्रंथिल अवयव किंवा पानाचे तुकडे यांपासून नवीन वनस्पती बनतात. फुले एकलिंगी; परिदले सुटी; नरफुलात दोन किंवा चार परिदले व स्त्री-फुलात दोन ते पाच; केसरदले अनेक; जुळलेल्या दोन ते तीन अधःस्थ किंजदलापासून बनलेल्या किंजपुटात दोन ते तीन कप्पे व त्यात अनेक अधोमुखी बीजके; पंखयुक्त बोंड व अपुष्क बिया; शोभादायक पानांमुळे "शोभापर्ण कुल" असे या कुलाला म्हटलेले आढळते.

**bell-jar** घंटापात्र; हंडी

घंटेच्या आकाराचे प्रयोगाकरिता वापरात असलेले खाली अधिक रुंद व वरच्या बाजूस थोडे निरुंद व फुगीर असे काचपात्र.

**bell-shaped (campanulate)** घंटाकृति

फुलातील घंटेच्या आकाराचा संवर्त किंवा पुष्पमुकुट; उदा. लाल भोपळा; पिवळी कण्हेर, इ.

**Benettitales** बेनेटायटेलीझ

मध्यजीव महाकल्पातील विलुप्त प्रकटबीज वनस्पतींचा गण; बाह्यरूप, खोड व पान यांची संरचना सायकॅडेलीझ प्रमाणे. दोन्ही प्रकारची बीजुकपर्णे एकाच शंकूत असतात; पहा Cycadales; Gymnospermae.

**benthos** जलतलस्थ जीवसमूह

खाऱ्या किंवा गोड्या पाण्यात तळाशी राहून जगणारा प्राणी वा वनस्पती यांचा समूह.

पहा. plankton; nekton; pelagic.

**berry (beccate fruit)** मृदुफळ

पहा bacca.

**Betulaceae** भूर्जकुल; बेट्युलेसी

भूर्ज, हॅझेल, कुनिष, इत्यादी द्विदलिकित प्रारंभिक (किंवा ऱ्हसित) वनस्पतींचे कुल. याचा अंतर्भाव मोरवेल गणात (रॅनेलीझ) सर्वसाधारणपणे केला जातो; तत्पूर्वी नतकणिश गणात (ॲमेंटिफेरी) किंवा ओक गणात (कार्सिफ्लोरीत) केला जात असे. प्रमुख लक्षणे वृक्ष किंवा क्षुपे; एकलिंगी फुले एकाच झाडावर असून पुं-पुष्पे छदयुक्त; परिदले लहान रंगहीन व पुं-फुलोरा लोंबत कणिश; स्त्री-फुलोरा उभा; स्त्री-पुष्पात अधःस्थ द्विपुटक किंजपुट; किंजले दोन; प्रत्येक कप्प्यात एकच लोंबते बीजक; वायुपरागण; एकबीजी कपाली फळ. पहा *Amentiferae*.

**bicarpellary (bicarpellate)** द्विकिंज

दोन किंजदलापासून बनलेला (किंजपुट; किंजमंडल) उदा. रुई, सदाफुली, इ.

**biciliate** द्विकेसली

दोन केसले असलेली (कोशिका); उदा. काही शैवले (क्लॅमिडोमोनॅस) अथवा त्यांची गंतुके (क्लॅडोफोरा, उल्व्हा इ.); पहा cilium; gamete.

**bicollateral** द्विसंलग्न

दोन बाजूनी वेढलेला; प्रकाष्ठाच्या दोन्ही बाजूस ऊतककर व परिकाष्ठ असलेला (वाहकवृंद); उदा. काकडीचे खोड; पहा vascular bundle.

**bicolor (two-coloured)** द्विवर्णी; दुरंगी

पानाचे वरचे व खालचे पृष्ठ भिन्न रंगाचे असलेले; उदा. बिगोनिया; ताराफळ; कमळ; ट्रॅडेस्कॅन्शिया, उदीचिराइत (*Exacum bicolor* Roxb.).

**bicrenate** द्विस्थूलदंतुर

पानाच्या कडेवरचे बोथट दाते पुन्हा प्रत्येक दात तसाच बोथट दात्यांनी भरलेला असणे; पहा crenate.

**bicuspidate** द्विकंटकाग्र

दोन तीक्ष्ण काटे असलेल्या टोकाचे (पान).

**bidentate** द्विप्रदंतुर

बाहेर वळलेले पानाच्या कडेवरचे दाते, पुन्हा तसेच दातेरी असण्याचा प्रकार; पहा dentate.

**biennial** द्विवर्षायु

बी रुजल्यापासून ते पुन्हा बीजाची निर्मिती व त्यानंतर मृत्यु या सर्व घटना दोन वर्षात संपविणारी (वनस्पती); कोबी, मुळा, गाजर, इ.

**bifacial (dorsiventral)** द्विपार्श्व

वरचा व खालचा असे दोन भिन्न पृष्ठभाग असलेले (पान अथवा खोड); उदा. जमिनीवर सरपटणाऱ्या वेलीचे (रताळे) किंवा जमिनीत आडवे वाढत असणाऱ्या वनस्पतींचे (आले, कर्दळ) खोड; खोडाशी काटकोन करून वाढणारे पान (जास्वंद, रुई, पेरू इ.)

**bifid** द्विभिन्न

एकाचे दोन भाग झालेले, उदा. पान, पाकळी, इ.

**biflagellate** द्विप्रकेसली

दोन प्रकेसले असलेली (कोशिका); पहा flagellum.

**biflorus** द्विपुष्पी

दोन दोन फुले येणारे; उदा. कुळीथ (*Dolichos biflorous* L.)

**bifoliar ( spur )** द्विपर्णी ( प्ररोह )
फक्त दोनच पाने असणारा ( प्ररोह ); उदा. चीड ( पाइन ); पहा dwarf shoot.

**bifoliate ( binate; bifoliolate )** द्विदली
दोन दले असलेले संयुक्त पान; उदा. अंजन ( *Hardwickia binata* Roxb ), हिंगण, इ.

**bifurcate** द्विविध; द्विभक्त
द्विधा झालेले; दुभंगलेले; उदा. किंजल्क, किंजल, अक्ष.

**biglandular** द्विप्रपिंडी
दोन प्रपिंड (स्रवणाऱ्या ग्रंथि) असलेले; उदा. चेंडूफळ ( *Parkia biglandulosa* W & A ).

**Bignoniaceae** टेटू कुल; बिग्नोनिएसी
आकाशनिंब, टेटू, पाटल, वाघनखी, मेडशिंगी, कारंजवृक्ष, खडशिंगी, निळा गुल्मोहोर ( जॅकरंदा ), इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; याचा समावेश हचिन्सन यानी पर्सोनेलीझ व बेसींनी नीलब्राह्मी गणात (स्क्रोफ्यूलारिएलीझमध्ये ) केला आहे. याची प्रमुख लक्षणे : वृक्ष व मोठ्या वेली; संयुक्त, पिसासारखी व समोरासमोर पाने; द्विलिंगी, अनियमित आकर्षक फुले; संदले जुळलेली; पुष्पमुकुट द्वयोष्ठक व जुळलेल्या पाकळ्यांचा; चार केसरदलांपैकी दोन लांब; दोन किंजदलांच्या ऊर्ध्वस्थ किंजपुटात दोन कप्पे; बोंडांत सपक्ष बिया.

**bilabiate** द्वयोष्ठक
दोन ओठांप्रमाणे ( संवर्त किंवा पुष्पमुकुट ), उदा. तुळस, अडुळसा, इ.

**— personate** द्वयोष्ठक संवृत
पाकळ्यांच्या खालच्या ओठावरील उंचवट्यामुळे तोंडाचे भोक फार लहान असणारे : उदा. हरणखुरी.

**— ringent** द्वयोष्ठक विवृत
पाकळ्यांचे दोन्ही ओठ उघडलेल्या तोंडाप्रमाणे ( जांभई देतेवेळी होते तसे ) असणारे; उदा. तुळस, अडुळसा; सॅल्व्हिया.

**bilateral** द्विपार्श्व
दोन बाजू ( डावी व उजवी; वरची व खालची ) असलेले; दोन्ही बाजूवर असलेली ( उदा- पाने. )

**— symmetry** द्विपार्श्व समात्रता
परस्परांशी काटकोन करणाऱ्या दोन पातळ्यांनी किंवा एकाच पातळीने विभागल्यावर दोन सारखे अर्ध होणारी ( संरचना ).

**bilaterally symmetrical** द्विपार्श्व समात्र
दोन किंवा एका पातळीने विभागल्यावर दोन सारखे अर्ध होतात असा ( अवयव; बहुधा फूल ).

**bilobed ( bilobate )** द्विखंडी; द्विपाली; द्विखंडित
दोन भाग पडलेले; उदा; कांचन, मर्यादवेल यांची पाने; काही परागकोश ( गारवेल, सॅल्व्हिया ). गिंको ( *Gingko biloba* ); मर्यादवेल ( *Ipomoea biloba* Forsk ); ही नावे द्विखंडी पानांची सूचक आहेत.

**bilocular ( two-celled )** द्विपुटक
( १ ) दोन कप्पे असलेला (किंजपुट); उदा. मोहरी, कोथिंबीर.
( २ ) दोन कप्प्यांचे (परागकोश); पहा anther.

**bimerous ( dimerous )** द्विभागी
प्रत्येक मंडलात दोनच भाग असलेले ( फूल ); उदा. मोहरीकुल.

**binary** द्वैती
दोन भागांचा; दोन मूलतत्त्वांचा; जोड्यांचा संबंध येत असलेला.

**— fission** द्विभाजन; द्वैती विभाजन
प्रत्यक्षपणे एका कोशिकेच्या दोन बनणे; उदा. काही सूक्ष्म वनस्पती व प्राणी.

**binomial nomenclature** द्विपद नामकरण
वनस्पती व प्राणी यांना दोन भाग असलेल्या संज्ञांनी व्यक्त केली जाणारी शास्त्रीय नावे देण्याची पद्धती; यापैकी पहिला भाग वंशनाम व दुसरा त्या वनस्पतीचे ( किंवा प्राण्याचे ) जाति वैशिष्ट्यदर्शक असतो; एकाच वंशनामाच्या अनेक जाती असतात त्यावेळी भिन्न जातींतील आतभाव या पद्धतीने सहज कळून येतात. उदा. वड, पिंपळ, अंजीर व उंबर यांच्या शास्त्रीय नावांतील वंशनाम ( *Ficus* ) यावरून त्या एकाच वंशातील जाती आहेत हे कळून येते. तसेच जातिवाचक नामावरून प्रत्येकाचे वैशिष्ट्य कळून येते. ( *Ficus benghalensis*; *F. religiosa*; *F. carica*; *F. glomerata* इ. ); हल्ली या लॅटिन नावापुढे मूळ नाव देणाऱ्या शास्त्रज्ञांचे संक्षिप्त नाव देण्याची पद्धत आहे; ( उदा. *F. carica* L.; *F. glomerata* Roxb. ).

**binomial system** द्विपदनाम-पद्धति
दोन भाग असलेली नावे ( संज्ञा ) वापरण्याची पद्धत; उदा. प्राणी व वनस्पती यांची शास्त्रीय नावे.

**binucleate** द्विप्रकल

दोन प्रकले असलेली (कोशिका); पहा nucleus.

**biochemistry** जीवरसायनशास्त्र

सजीव प्राणी व वनस्पती यांच्या शरीरात चालू असलेल्या किंवा त्यांच्या मध्यस्थीने शरीराबाहेर चाललेल्या रासायनिक प्रक्रियेसंबंधीच्या माहितीचे शास्त्र उदा. शरीरातील पचन, विघटन, संघटन, ऊर्जानिर्मिती; शरीराबाहेरील कुजणे, आंबणे, इत्यादी सूक्ष्मजंतुद्वारे होणाऱ्या घटना; विंचन.

**biogenesis** जीवजनन

विद्यमान व पूर्वी असलेल्या सजीवांपासूनच नवीन जीव उत्पन्न होण्याची नैसर्गिक व सनातन परंपरा; पहा abiogenesis

**biological** जीवशास्त्रीय; जैव; जीववैज्ञानिक

जीवशास्त्रासंबंधी; जीवशास्त्राच्या माहितीचा उपयोग करून; जीवासंबंधी.

**biological clock** जैव घड्याळ; जैव कालगणक

वनस्पती व प्राणी यांच्या शरीरक्रियेत आढळणारी नियमित दैनिक लयबद्धता; प्रकाश व अंधार यांचा शरीरक्रियेवर होणारा परिणाम अटळ असतो व शरीरक्रियेतील लयबद्धता घड्याळाच्या नियमितपणाशी तुल्य असते, परंतु घड्याळाने दर्शविलेल्या कालगणनेशी संबंधित नसते.

**— control** जीवशास्त्रीय-जीववैज्ञानिक नियंत्रण; जैव नियंत्रण

काही हानिकारक प्राणी व वनस्पती यांचा उपयोग करून इतरांचा संहार (नाश) करणे. उदा. डासांचा संहार भक्षक माशाकडून करविणे, निवडुंगाच्या काही जातींचा नाश काही कीटकांकडून केला गेला आहे.

**biologist** जीवशास्त्रज्ञ; जीववैज्ञानिक

सर्व सजीवांचा पद्धतशीर संपूर्ण अभ्यास केलेला तज्ञ.

**biology** जीवशास्त्र; जीवविज्ञान

सर्व सजीवांचा संपूर्ण अभ्यास व त्यामुळे उपलब्ध झालेले ज्ञान.

**bioluminescence** जीवदीप्ती

काही जीवांच्या विशिष्ट रासायनिक शारीरिक प्रक्रियेमुळे उत्पन्न होणारा नैसर्गिक प्रकाश; यामध्ये विंचनाचा संबंध असावा; उदा. काजव्यांचा प्रकाश; काही सूक्ष्मजंतु व कवक (भूछत्रे) या घटनेस जबाबदार असतात. वास्तविक ही "रासायनिक दीप्ती" आहे कारण रासायनिक विक्रियेतून ही घटना होते. काही कुजट लाकडातून असा प्रकाश येतो; तसेच अनेक समुद्रातील प्राणीही या प्रकाशामुळे ओळखू येतात.

**biometry** जीवसांख्यिकी

सजीवांच्या अभ्यासात गणित व सांख्यिकी यांचा वापर करून बनविलेले शास्त्र व संपादन केलेले ज्ञान. पैतृक अनुहरण (Law of ancestral heredity) आणि पितृपरागति (Law of filial regression) यांचे सिद्धांत अशा अभ्यासांनीच काढले आहेत.

**biophysics** जीवभौतिकी

भौतिक (वास्तव) शास्त्राच्या दृष्टिकोनातून केलेला सजीवांचा अभ्यास; तपमान, आर्द्रता, वातावरणाचा दाब, समुद्रसपाटीपासून उंची इत्यादी घटकांचा सजीवावर होणारा परिणाम अथवा त्यांच्या प्रतिक्रिया; भौतिक नियमाप्रमाणे घडून येणाऱ्या काही शारीरिक प्रक्रिया.

**biosphere** जैवगोल; जीवावरण

जेथे जीवन शक्य होते असा पृथ्वीभोवतालचा भाग; यामध्ये जमीन पाणी व वातावरणाचा काही भाग समाविष्ट होतो.

**biotic** जैव

सजीवासंबंधाचे (वनस्पती व प्राणी यासंबंधी).

**biovulate** द्विबीजकी

दोन बीजके असलेला (किंजपुट) किंवा खवला; उदा. गिंको; थुजा.

**biparous** द्विपद

अक्षाच्या टोकापासून दोन्ही बाजूस वाढलेला.

**— cyme** द्विपद वल्लरी

मुख्य अक्षावर शेंड्याला फूल येऊन वाढ खुंटते व नंतर दोन्ही बाजूस दोन फुले येतात, ती साधी वल्लरी; उदा. जाई, मोगरा, इ. अधिक जटिल प्रकारात त्याऐवजी बाजूस दोन उपाक्ष येऊन त्यांना प्रत्येकी वरीलप्रमाणे वल्लरी येतात. उदा. पांगारा, मोगली एरंड, इ.

**— cymose branching** द्विपद कुंठित शाखाबंध

मुख्य अक्षाची, वाढ थांबून बाजूच्या दोन उपाक्षांची वाढ चालू राहिल्याने व असा प्रकार पुनः पुनः घडून होणारा शाखाविस्तार; उदा. करवंद, गुलबुश, खैरचाफा.

**bipinnate** द्विगुण पिच्छाकृति

पिसासारखी दलांची मांडणी असलेल्या संयुक्त पानाच्या मधल्या दांड्याच्या ( पर्णाक्ष ) दोन्ही बाजूस असलेली दले पुनश्च तशीच विभागलेली असण्याचा प्रकार; उदा. गुल्मोहोर; बाभूळ; संकेश्वर; कॉसमॉस. ( *Cosmos bipinnatus* Cav. ) इ.

**bipolar** द्विध्रुवी

दोन टोके असलेलें; कोशिकेतील प्रकलाची अप्रत्यक्ष विभागणी सुरू असता प्राकलाचे अनेक धागे तर्कूसारख्या ( धोट्यासारख्या ) आकृतीत बांधले गेल्यामुळे दोन टोके असलेली व मध्ये फुगीर असलेली मांडणी.

**bipolar spindle** द्विध्रुवी लुंठ ( तर्कू )

वर वर्णन केलेली तर्कूसारखी आकृती.

**biseriate** ( १ ) द्विश्रेणिबद्ध (२) द्विमंडलित

( १ ) दोन रांगांत असलेले;

( २ ) दोन वर्तुळे असलेले; उदा. संवर्त व पुष्पमुकुट.

**biserrate** द्विगुणदंतुर

पानाच्या दातेरी कडेवरील दाते पुनश्च दातेरी असण्याचा प्रकार; पहा serrate.

**bisexual (hermaphrodite)** द्विलिंगी; आंतर्राष्ट्रीय चिन्ह ☿

नर– व स्त्री– प्रजोत्पादक अवयव निर्माण करणारे (दोन्ही अवयव एकाच व्यक्तीवर असणारे) ; उदा. फूल; वनस्पतीची पिढी. बहुतेक प्राण्यांत दोन स्वतंत्र व्यक्तीवर हे अवयव असतात; काही वनस्पतींत दोन प्रकारची फुले (नर व मादी) एकाच झाडावर ( एरंड ) तर काहीत स्वतंत्र झाडावर (पपई) असतात.

**bispinose** द्विकंटकित

दोन काटे किंवा तत्सम उपांगे असलेले; उदा. शिंगाड्याचे (*Trapa bispinosa* Roxb.) फळ.

**bisporangiate** द्विबीजुककोशिक

दोन प्रकारचे बीजुककोश असलेले अवयव (शंकू, फूल) अथवा वनस्पती.

**bisporic (bisporous)** द्विबीजुकी

लघु व गुरु अशी दोन प्रकारची बीजुके असलेली (वनस्पती) ; उदा. सिलाजिनेला, मार्सिलिया, सायकस इ. bisporangiate या संज्ञेला हाच मराठी पर्याय वापरता येईल, कारण दोन प्रकारच्या बीजुककोशात ती बीजुके बनतात; पहा sporangium, spore.

**bistipular (bistipulate)** द्व्युपपर्णी

दोन उपपर्णे असणारी; उदा. कापूस, जास्वंद, गुलाब इत्यादींची पाने.

**biternate** द्विगुण त्रिदली

तीन दले असलेल्या संयुक्त पानाचे प्रत्येक दल पुनरपि तिन्हीत विभागून तीन दलके असलेले; पहा ternate.

**Bixaceae** केसरा कुल; बिक्सेसी

केसरी ( कडुकवीठ ), बिक्सा व इतर दोन वंशांतील जातींचे फार लहान द्विदलिकित वनस्पतींचे कुल. प्रमुख लक्षणे : वृक्ष व झुडुपे; सोपपर्ण, अखंड, एकाआड एक पाने; द्विलिंगी पंचभागी फुले; केसरदले अनेक; ऊर्ध्वस्थ किंजपुटात एक कप्पा व त्यात अनेक बीजके; बोंडात अनेक सपुष्क बिया असतात. केसरी ( *Bixa orellana* L. ).

**bivalent chromosomes** द्वियुजी रंगसूत्रे

कोशिकेच्या न्यूनीकरण विभागणीत एकत्र येऊन जोडी जमविणारी समरचित रंगसूत्रे; यापैकी एक नर-गंतुकातून व दुसरे स्त्री-गंतुकातून आलेले असून त्यावरील जनुके वैकल्पिक किंवा अविभाज्य गुणाबद्दल जबाबदार असतात; पहा gene, allelomorph, gamete.

**bladder** गेळा; फुगा; आशय

हवेने भरलेला व त्यामुळे हवेत किंवा पाण्यात तरंगण्यास उपयुक्त असा अवयव; उदा. शैवले (सरगासम, फ्यूकस ); चीडचे परागकण.

**bladdery** फुगीर; आशयित

फुगे असलेला; फुगलेला.

**blade ( lamina, epipodium )** पाते

पानाचा पसरट व बहुधा हिरवा भाग; काही जमिनीवरील खोडांची खवल्यासारखी पाने हिरवी नसून पाती अरुंद असतात; पाकळ्यांचा पसरट भाग; पहा phyllode.

**blastogenic ( germinal, congenital )**
उपजत; जन्मजात

जन्मापासून असलेले व बाह्यपरिस्थितीमुळे प्राप्त न झालेले; उदा. शारीरिक फरक; भेद.

**bleeding** रसस्राव

वनस्पतींच्या बाबतीत जखमेतून रस किंवा चीक वाहण्याची प्रक्रिया; नीरा, माडी, ताडी, हे रसच होत; पहा exudation.

**blending (blended) inheritance** संमिश्र अनुहरण

आईबापापासून संततीत उतरताना पूर्वी असलेल्या पर्यायी लक्षणांचे होणारे मिश्रण; येथे एका लक्षणाचा दुसऱ्यावर अंशमात्र प्रभाव दिसतो; गुण-दोष युक्त लक्षणे अनेक जनुकांमुळे प्राप्त होतात त्यावेळी संततीत त्यांचा आविष्कार पूर्णपणे आढळणे शक्य नसते; पहा particulate.

**bloom (on surface)** (१) राग; (२) बहर; पुष्पपुंज

(१) पृष्ठभागावर येणारा पातळ थर; उदा. शैवलाचा थर पाण्यावर विशिष्ट ऋतूत येतो; मेणाचा थर पानावर येतो. (२) फुले येणे (बहार) किंवा फुलांचा झुबका येणे.

**Blue green algae (Cyanophyceae; Myxophyceae)** नील-हरित शैवले; निळी शैवले (वर्ग); सायनोफायसी

निळसर, काळसर, क्वचित गर्द हिरव्या रंगाच्या शैवल वनस्पती; इतर शैवलांशी तुलना करता, ह्या अधिक साध्या व पुरातन आणि काही बाबतींत सूक्ष्मजंतूशी तुल्य असतात. प्रमुख लक्षणे: एककोशिक किंवा अनेककोशिक, तंतुमय; प्राकणूंचा अभाव; प्रारंभिक प्रकल (प्रकल्काचा व प्रकलावरणाचा अभाव); प्रजोत्पादक कोशिकांना केसले नसून गंतुकांचे मीलन होत नाही; हरितद्रव्याशिवाय इतर (निळे किंवा लाल) रंगद्रव्ये असतात. Cyanophyta ह्या नील-हरित शैवल विभागात हा एकच वर्ग आहे.

**body-cell** कायकोशिका; तनुकोशिका

प्रजोत्पादक अवयवांखेरीज शरीराच्या इतर कोणत्याही भागातील कोशिका; काही शंकुधारी वनस्पतींत ज्यापासून नर-कोशिका बनतात तिला हीच संज्ञा वापरतात.

**bog** रुतण; दलदल

ओली व अत्यंत भुसभुशीत (सुविरल) जमीन; यात विशिष्ट वनस्पतीच वाढू शकतात; उदा. स्फॅग्नेसी कुलातील शेवाळी; ओक, क्रेनबेरी इत्यादींच्या काही जाती.

**bole** सोट; स्तंभ

वृक्षाच्या खोडाचा कठीण, सरळ व शाखाहीन भाग.

**Bombacaceae** शाल्मली कुल; बॉम्बॅकेसी

लाल सावर, सफेत सावर, गोरख चिंच, बाल्सा इत्यादी द्विदलिकित फुलझाडांचे स्वतंत्र कुल; पहा Malvaceae (जास्वंद कुल).

**Boraginaceae** भोकर कुल; बोरॅजिनेसी

भोकर, छोटा कल्प, धत्रंग (दत्रंग, अजानवृक्ष) त्रिपक्षी, गोंदणी, लिचरडी इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा अंतर्भाव बेसींच्या पद्धतीत भोकर गणात (पोलेमोनिएलीझ) केला असून हचिन्सनच्या पद्धतीत भोकर गण (बोरॅजिनेलीझ) वरच्याहून अलग केला आहे. या कुलाची प्रमुख लक्षणे : फुलोरा– वृश्चिकाभ वल्लरी; फुले द्विलिंगी, बहुधा नियमित, पंचभागी; पाकळ्या जुळलेल्या; नलिकाकार, विविधाकृति पुष्पमुकुट; केसरदले पाच व पाकळ्यास तळाशी चिकटलेली; दोन किंजदलांचा ऊर्ध्वस्थ किंजपुट; फळ अश्मगर्भी किंवा चार कपालिकांचे; वृंताक कुल (सोलॅनेसी) व हरिणपदी कुल यांचे या कुलाशी आप्तभाव असून त्यांचाही अंतर्भाव याच गणात (पोलेमोनिएलीझमध्ये) केला जातो.

**Boraginales** भोकरगण; बोरॅजिनेलीझ

पहा Boraginaceae.

**bordered pit** अनुलिप्त खात (खाच); वलयी गर्त

सभोवार वलय असणारी खाच; विशेषेकरून प्रकाष्ठाच्या कोशिकावरणावर (प्रकटबीज वनस्पतीतील) आढळते; दोन जवळच्या कोशिकावरणाची जाडी वाढत असता काही भाग पातळ राहून, काही भाग पूर्वीच्या आवरणापासून अलग राहतो तो खाचेभोवती वलयाप्रमाणे दिसतो.

**bostryx (uniparous, helicoid cyme)** एकपद शुंडी (वल्लरी)

शेंड्याला फूल आल्याने मुख्य अक्षाची वाढ खुंटते व नंतर एका बाजूस बगलेतील कळीपासून उपाक्ष वाढतो व त्याचीही तीच गत होते; पुढे हाच प्रकार एकाच बाजूस नवीन उपाक्ष क्रमाने वाढून शेवटी एक वाकडा सोंडेसारखा फुलोरा बनतो; उदा. गेळफळ, हॅमेलिया, इ.

**botanical garden** शास्त्रीय उद्यान

वनस्पतिशास्त्राच्या दृष्टीने वनस्पतींची मांडणी केली असून त्याशिवाय प्रायोगिक कार्याच्या व संशोधनाच्या सोयी उपलब्ध असलेली बाग.

**botanist** वनस्पतिशास्त्रज्ञ; वनस्पतिविज्ञ

वनस्पतिशास्त्राचा संपूर्ण अभ्यास करून तसेच त्यामधील काही शाखांमध्ये संशोधन करून एकंदरीत पारंगत असलेली व्यक्ती.

**botanize** वनसंचार

आपले नैसर्गिक जीवन जेथे अनेक वनस्पती चालू

ठेवतात अशा वने, उद्याने, उपवने इत्यादी ठिकाणी जाऊन त्यांच्याविषयीची माहिती मिळविणे.

**Botany** वनस्पतिविज्ञान; वनस्पतिशास्त्र

( १ ) सर्व प्रकारच्या वनस्पतींची तात्त्विक व व्यावहारिक माहिता मिळवून त्यांच्यासंबधींचे निश्चित ज्ञान संकलन करणारी ज्ञानशाखा. यालाच कोणी 'उद्भिज्जशास्त्र', 'वानसशास्त्र' अशीही नावे दिली आहेत.

( २ ) वनस्पतिविज्ञानाबद्दलचे पाठ्यपुस्तक; स्थानिक वनस्पतींच्या संबंधीचे पुस्तक.

**—, Medicinal** वैद्यकीय (भेषजीय) वनस्पतिशास्त्र

वनस्पतींच्या औषधी गुणधर्मांची माहिती संकलित करणारी ज्ञानशाखा.

**bough** बृहत्तर शाखा; महाशाखा

सर्वात मोठी फांदी.

**bract ( hypsophyll )** छद

फुले अथवा फुलोरा व त्याच्या फांद्या यांच्या तळाशी असलेला लहान खवल्यासारखा संरक्षक अवयव; केळीच्या फुलोऱ्यावर जाड तांबूस व चिवट मोठी छदे ( महाछदे ) येतात तर केवड्याच्या फुलोऱ्यावर मोठी पण सुवासिक छदे येतात; पहा spathe.

**bract-scale** छदशल्क

शंकुधारी वनस्पतींतील स्त्री-शंकूवर बीजधारी खवल्याखाली असणारा लहान खवल्यासारखा संरक्षक अवयव.

**bracteate** सच्छद

छदाचा आधार असलेले ( फूल किंवा फुलोरा ); उदा. बुगनवेलीया, पानचेटी, इ.

**bracteole ( bractlet )** छदक

फुलोऱ्याच्या तळास असणारे अवयव ते छद मानून फुलाच्या तळास असलेल्यास छदक म्हणतात. उदा. गोकर्ण, घेवडा, इ.

**bracteolate** सच्छदक

छदक असलेले ( फूल ); उदा. खडशेरणी;

**branch** शाखा

फाटा; फांदी; मुख्य खोडापासून ( अक्षापासून ) वाढलेला व सर्वसाधारणपणे तशीच संरचना, आकार व कार्य असलेला दुय्यम अथवा तिय्यम दर्जाचा अक्ष.

**branched** शाखित; सशाख; शाखायुक्त

फांद्या ( शाखा ) असलेले ( खोड ).

**branch-gap** शाखा-विवर

खोडावरील ज्या स्थानापासून शाखा निघते तेथील वाहक ऊतकांच्या चितीत (स्तंभात) पडलेली फट (खिंड).

**branching** शाखाबंध; शाखाविन्यास

प्रमुख अक्षापासून निघालेल्या नवीन शाखांचा उगम, विस्तार व मांडणी (अथवा त्या संबंधीची माहिती).

**branchless** शाखाहीन; शाखा नसलेले

**branchlet** लघुत्तर शाखा; लघुशाखा

लहान फांदी; सर्वात लहान फांदी.

**branch-trace** शाखालेश

शाखेतील वाहक वृंदाशी खोडातील वाहक भागाला (रंभाला) जोडणारा वाहक भाग.

**breathing pore** श्वसनरंध्र; वातरंध्र

हवा आत-बाहेर जाण्याकरिता असलेले छिद्र. पहा air-pore, stoma, lenticel.

**— root** श्वसनमूळ

वायुविनिमय करण्याकरिता विशेषत्व पावलेले मूळ अथवा मुळाचा भाग. खाऱ्या दलदलीतील जमिनीतील मुळापासून जमिनीवर आलेल्या सरळ उभ्या शाखा; त्यावरील वल्करंध्रातून हवेची ये-जा घडून येते, कारण अशा जमिनीत हवेचे दुर्भिक्ष असते; उदा. कांदळ, चिप्पी, तिवर, इ.

**breed** प्रजा; संतति

( १ ) विशिष्ट गुणयुक्त प्रकार, वंश किंवा अवलाद.

( २ ) पैदास करणे, प्रजनन करणे.

वनस्पतींतील किंवा प्राण्यांतील जाती व विशिष्ट प्रकारांची निर्मिती करणे.

**—, in** अंतःप्रजनन

अगदी जवळच्या आप्तसंबंधात प्रजोत्पादन घडवून आणणे; हा प्रकार सुप्रजाजननाच्या दृष्टीने सुयोग्य नाही असा अनुभव आहे.

**—, out** बहिःप्रजनन

दूरच्या आप्तामध्ये प्रजोत्पादन घडवून आणणे.

**bridle** प्राकलतंतु

कोशिकेतील मध्यवर्ती प्राकलखंडापासून निघून कोशिकावरणाच्या जवळ असलेल्या प्राकलस्तराशी जोडणारा तंतूसारखा भाग ( धागा ); उदा. स्पायरोगायरा शैवलाच्या तंतूतील कोशिका.

**bristle** रोम; शूक

ताठर केस.

**bristly** रोमश

ताठर जाड केस असलेला ( अवयव ). उदा. भेंडीची पाने किंवा भोपळ्याची पाने अथवा खोड.

**broad-leaved** रुंदपानी; विस्तृतपर्णी

रुंदट किंवा पसरट पाने असलेले झाड; उदा. पळस, साग, इ.

**Bromeliaceae** अननस ( आपनस ) कुल; ब्रोमेलिएसी

अननस, टिलँड्सिया इत्यादी एकदलिकित वनस्पतींचे कुल. बेसींच्या पद्धतीत या कुलाचा अंतर्भाव केसर गणात ( इरिडेलीझ ) केला असून हचिन्सन यांनी अननस गण या स्वतंत्र गणात केला आहे. प्रमुख लक्षणे : काही गुच्छाकृती ओषधीय वनस्पती व अपिवनस्पती; फुलोरा सच्छद; द्विलिंगी किंवा एकलिंगी, त्रिभागी फुले; परिदल मंडले दोन; केसरदले सहा व कधी तळाशी चिकटलेली; किंजपुटात अक्षलग्न बीजके व तीनच कप्पे; बीजे सपुष्क, सपक्ष व केसाळ.

**Brown algae ( Phaeophyceae )** पिंगल शैवले; फीओफायसी ( वर्ग )

हरितद्रव्याव्यतिरिक्त एक पिंगट द्रव्य प्राकणूत असणाऱ्या व बहुधा खाऱ्या पाण्यात आढळणाऱ्या शैवलांचा गट; वनस्पती अनेककोशिक व मोठ्या; प्रजोत्पादक कोशिका (बीजुके, गंतुके) चलनशील व बाजूस दोन असम केसले असलेल्या; सलिंग व निलिंग प्रजोत्पादन आणि पिढ्यांचे एकांतरण आढळते.

**Bryology** शेवाळी विज्ञान

शेवाळी (ब्रायोफायटा) संबंधीची माहिती.

**bryologist** शेवाळवेत्ता (विज्ञ)

शवाळीसंबंधी अधिकतर ज्ञान संपादित केलेला (शास्त्रज्ञ).

**Bryophyta** शेवाळी विभाग; ब्रायोफायटा

शैवलांपेक्षा अधिक प्रगत तथापि वाहक ऊतकांचा पूर्ण अभाव असलेल्या आणि नेचाभ ( टेरिडोफायटा ) वनस्पतींशी प्रजोत्पादक अवयव ( रेतुकाशय व अंदुककलश) व पिढ्यांचे एकांतरण या बाबतीत साम्य असलेल्या हरितद्रव्ययुक्त वनस्पतींचा गट. सर्वसाधारणपणे या वनस्पती स्थलवासी असूनही त्यांचे प्रजोत्पादन बाहेरील पाण्यावाचून घडून येत नाही म्हणून त्या संदर्भात यांना जलस्थलवासी म्हणणे योग्य; ह्या वनस्पतींमध्ये ठळकपणे ओळखली जाणारी ( एकगुणित) पिढी प्रजोत्पादक नर- व स्त्री- कोशिका ( गंतुके ) बहुकोशिक अवयवांत निर्माण करते व त्यांच्या संयोगाने बनलेली संयुक्त कोशिका ( रंदुक ) त्याच जनक वनस्पतीवर पोसली जाते व तिच्यापासून दुसरी अलिंगी प्रजोत्पादक कोशिका ( बीजुके ) बनविणारी पिढी ( द्विगुणित किंवा बीजुकधारी ) वाढते; या बीजुकांपासून पुनरपि पहिली ( गंतुकधारी ) सारखी प्रमुख वनस्पती निर्मिली जाते. याप्रमाणे या दोन पिढ्यांत ( एकगुणित व द्विगुणित ) एकांतरण असते; ह्यापैकी अत्यंत प्रगत वनस्पतींना नाजुक पाने, खोड व केसासारखी मुळे असतात व त्यांची संरचना फारच साधी असते. यकृतका, शृंगका व हरितका असे यामध्ये तीन वर्ग मानतात.

**bud** मुकुल; कुड्मल; कलिका; कळी; कोरक

खोडावरील सर्व अवयव अविकसित अवस्थेत एकत्र सामावून ठेवणारी संरचना; विकास पूर्ण होताना तिचे रूपांतर साध्या शाकीय अवयवात किंवा फुलात होते; अविकसित प्ररोह; कायक वनस्पतींत ही संज्ञा शरीराच्या प्रजोत्पादक, साध्या व स्वतंत्र होणाऱ्या घटकास वापरतात.

**bud, stem- ( vegetative bud )** कोरक

शाकीय अवयवांचा अंतर्भाव करणारी कळी.

**bud, flower- ( reproductive bud )** कलिका

फुलाची कळी.

**budding** मुकुलन

(१) कळ्या येणे; (२) एका कोशिकेवर दुसरी व पुढे तिसरी किंवा चौथीही येणे; उदा. किण्व. (३) डोळा बांधणे; कळीचे कलम बांधणे.

पहा gemmation; grafting.

**bud-scale** कोरक शल्क

कळीच्या संरक्षणार्थ तिच्यावर प्रथम असणारे व नंतर गळून पडणारे खवल्यासारखे उपांग; उदा. पिवळा चाफा, वड, फणस, इत्यादींचे खवले उपपर्णे होत व ती पुढे गळून पडतात. आले, कर्दळ यांच्या जमिनीतील खोडावर खवले असतात.

**bulb** कंद

रसाळ खवल्यांनी वेढलेले, बिंबात रूपांतर पावलेले व जमिनीच्या पृष्ठभागाखाली वाढणारे संक्षिप्त खोड; यापासून खाली आगंतुक मुळे असून खवल्यांच्या बगलेतून वाढणाऱ्या कळ्यापासून नवीन कंद बनतात व शाकीय उत्पत्ति होते; कंदाचे काही प्रकार हवेत खोडावर येतात. पहा disc.

**—, scaly** शल्क कंद

हिरवी पाने व खवले अलग असून त्याभोवती आवरण नसते व खवले परस्पराभोवती नसतात; उदा. आंबुटी.

**—tunicated** आवृतकंद

आवरण असलेला कंद; यात रसाळ खवले एकमध्य मांडलेले असून त्या सर्वांभोवती पातळ खवल्यांचे वेष्टन असते. उदा. कांदा, लसूण. लसणातील कुड्या अन्न साठविलेल्या कळ्या असतात व कांद्याच्या बाबतीत रसाळ खवले हिरव्या पानांचे तळभाग असतात.

**bulbel** लघुकंद

कंदापासून आलेला लहान अपत्यकंद.

**bulbiferous** कंदधर

कंदधारी; कंद असणारी वनस्पती; कंदाचे काही प्रकार पानांच्या बगलेत किंवा फुलोऱ्यातही येतात. उदा. घायपात; कारंदा (*Dioscorea bulbifera* var. *sativa* Prain.); पहा bulbil.

**bulbil** कंदिका

लहान कंद; पानांच्या बगलेत किंवा कडेवर वाढलेली लहान गाठीसारखी किंवा फक्त सूक्ष्म मांसल पानांच्या झुबक्यासारखी प्ररोहरूप संरचना; ही मूळच्या वनस्पतीपासून योग्य काली तुटून पडते व नवीन वनस्पती निर्माण करते; उदा. कारंदा, घायमारी, घायपात, इ. सायकसच्या खोडास तळाजवळ येणारी कळी (लहान प्ररोह) व अननसाच्या फळाखाली खोडापासून येणारी लहान कळी कंदिकाच मानतात; त्या अलग करून नवीन वनस्पती बनविता येतात.

**bulblet** कंदक

पानाच्या किंवा फुलोऱ्याच्या बगलेत अथवा अनित्य ठिकाणी येणारा कंद.

**bulbose (bulbous)** कंदधर; कंदकल्प

कंद धारण करणारी किंवा कंदासारखी संरचना असणारी (वनस्पती); उदा. भुईचाफा; नागदवणा, निशिगंध.

**bulbous hair** कंदकेश

फुगीर तळाचा केस; उदा. आग्या, खाजोटी यांचे दाहक केस.

**bullate** पीटिकायुक्त; पुळीदार

फोड किंवा पुटकुळ्या आलेले; उदा. कोबीची सॅव्हॉय जातीची पाने.

**bulliform cell (motor cell)** चलित्र कोशिका; प्रेरक कोशिका (पेशी)

पूर्णपणे भरल्यावर फुगणाऱ्या व पाणी कमी झाल्यावर आकुंचन पावणाऱ्या अपित्वचेतील मोठ्या कोशिका; यांच्या प्रसरण व आकुंचन यामुळे पानांच्या कडा जवळ येऊन सुरळी बनणे किंवा ती पुन्हा उलगडून पान पसरणे घडून येते. अशा यंत्रणेमुळे बाष्पोच्छ्वास कमी जास्त होतो; उदा. मका; काही गवते.

**bundle** वृंद

जुडगा; अनेक विशिष्ट कोशिकांचा किंवा ऊतकांचा संच. कोशिकारूप तंतूंचा किंवा सूत्रांचाही संच बनतो. वाहक कोशिका व वाहिन्या यांचेही संच आढळतात, त्यास वाहक संच म्हणतात. पहा vascular bundle (वाहकवृंद).

**— cap** वृन्दत्राण

वृन्दातील परिकाष्ठाबाहेरचा अर्धचंद्राकृति घनकोशिकांचा संच.

**— sheath** वृन्दावरण; वृन्दवेष्टन

वाहक वृन्दाभोवती असलेले मृदूतकाचे किंवा सूत्रल आवरण.

**buoyancy** तरणक्षमता; प्लावकता

हवेत किंवा पाण्यात तरंगण्याचे सामर्थ्य.

**Burseraceae** गुग्गुळ कुल; बर्सेरेसी

काकड, धूप, गुग्गुळ, बोळ, सालई इत्यादी द्विदलिकित व उष्णकटिबंधातील वनस्पतींचे लहान कुल; याचा अंतर्भाव भांड गणात (जिरॅनिएलिझमध्ये) केला जातो. प्रमुख लक्षणे : वृक्ष व झुडपे; बहुधा संयुक्त, एकाआड एक पाने; बाल्सम व राळ यांनी भरलेल्या नलिका असतात. फुले लहान, बहुधा एकलिंगी, त्रित्रयुक्त, चार-पाच भागी; दोन केसरमंडले असल्यास बाहेरचे पाकळ्यासमोर व आतील एकाआड एक; जुळलेली किंजदले ३–५ व ऊर्ध्वस्थ किंजपुटात अनेक कप्पे व प्रत्येकात २ बीजके; फळ अश्मगर्भी वा बोंड; बिया अपुष्क; काकड (*Garuga pinnata* Roxb.).

**bush** क्षुपक

लहान झुडुप; ओषधीपेक्षा मोठे व क्षुपापेक्षा लहान; कठीण खोड व लहान फांद्या असलेली व अनेक वर्षे जगणारी वनस्पती; उदा. मोगरा, गुलाब, इ. पहा shrub.

**buttress root (plank root)** आधारमूळ

मोठ्या वृक्षांना जमिनीजवळ खोडाला आधार देण्याकरिता बुंध्यापासून निघालेले व जमिनीत गेलेले फळी-

सारखे मूळ; उदा. गुलमोहोर, गोरखचिंच, सावर, रबर, इ.

## C

**C** सी; C

पुष्पसूत्रात पुष्पमुकुटाबद्दल वापरलेले आद्याक्षर; पहा floral formula; corolla.

**Cactaceae** नागफणा कुल; कॅक्टेसी

नागफणा व काही निवडुंगाच्या जाती ह्या फुलझाडांचे (द्विदलिकित) कुल. बेंथॅम आणि हूकर यांनी याचा अंतर्भाव फायकॉइडेलीझ या नावाच्या गणात व एंग्लर आणि प्रँटल यांनी नागफणा गणात (ऑपन्शिएलीझ) केला आहे.

प्रमुख लक्षणे : बहुतेक सर्व काटेरी, पर्णहीन व मांसल लहानमोठ्या मरुवनस्पती; अर्धचक्रीय, अग्रपश्च किंवा अरसमात्र, द्विलिंगी फुलात संवर्त व पुष्पमुकुट यातील दले अनेक, सर्पिल व संक्रमक; तसेच केसरदले व किंजदले अनेक; किंजपुट अधःस्थ, एकपुटक व त्यात अनेक तटवर्ती बीजकाधानी; मृदुफळ; सर्वत्र काट्यांचे झुबके; बागेला कुंपणाकरिता व काही जाती शोभेकरिता लावतात.

**caducous** शीघ्रपाती

लवकर गळून पडणारी (पाने, पुष्पदले, इ.); उदा. वड व पिंपळ यांची उपपर्णे; संदले (अफू); प्रदले (पिवळा धोत्रा); पाने (थोंड); इ.

**Caesalpiniaceae (Caesalpinioideae)**

संकेश्वर (शंकेश्वर) कुल; सीसॅल्पिनिएसी

संकेश्वर, सागरगोटा, दिवि-दिवी, पतंग, टाकळा, तरवड, चिंच, बाहवा, कांचन, लाल अशोक इत्यादी कमीजास्त परिचित व द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा समावेश इतर दोन (शिरीष कुल व पलाश कुल) कुलांसह शिंबी गणात (लेग्युमिनोजी) केला जातो; गुलाब-कुलासह शिंबी कुलाचा व इतर काहींचा अंतर्भाव अद्यापही (रोजेलीझ) गुलाब गणात केलेला आढळतो व शिंबी कुलात वर वर्णन केलेल्यांना उपकुले समजतात. संकेश्वर कुलाची प्रमुख लक्षणेः वृक्ष व क्षुपे; क्वचित साधी पण बहुधा पिच्छाकृती विभागलेली पाने; फुले बहुधा आकर्षक व काहीशी एकसमात्र, पंचभागी; संदले व प्रदले सुटी; केसरदले दहा; किंजदल एक, ऊर्ध्वस्थ व एक कप्प्याचा किंजपुट; बिया अनेक 'लताकरंज (सागरगोटा) कुल' असेही नाव या कुलाला दिलेले आढळते.

**caespitose (tufted)** झुबकेदार; पुंजकल्प

झुबक्याप्रमाणे जमिनीतून वर वाढलेले; उदा. काही गवते; नागदवणा; गवती चहा, कुमूर (*Pancratium triflorum* Roxb.).

**caffeine** कॅफीन

कॉफी पूड ज्या वनस्पतीच्या (*Coffea arabica L.*) फळापासून बनवितात, त्या फळातील विशिष्ट क्षाराभ द्रव्य.

**calcar** शुंडिका

फुलातील परिदलांच्या कोणत्याही भागापासून खाली वाढलेले नळीसारखे (व मधाने भरलेले) किंवा सोंडे-प्रमाणे उपांग; उदा. तेरडा, काही आमरे (ऑर्किड).

**calcarate** शुंडिकायुक्त

शुंडिका असलेले; उदा. आमर (*Haebenaria longicalcarata* Rich.)

**calcification** चूर्णीभवन

खटमय (चूर्णीय) होणे; कोशिकावरणात, कोशिका-द्रव्यात किंवा केसात चूर्णीय (खट) द्रव्याचा अंतर्भाव होणे; उदा. वडाच्या पानाच्या अपित्वचेतील काही कोशिका; कारा या शैवलाच्या कोशिका.

पहा cystolith.

**calciphilous** खटप्रिय

चुनखडीच्या जमिनीवर विशेषत्वाने वाढणाऱ्या (वनस्पती).

**calciphobous** खटद्वेष्टी; खटद्वेषी

चुनखडीची जमीन न मानवणाऱ्या (वनस्पती).

**callose** किणमय; कॅलोज

एक कार्बोहायड्रेट : १% दाहक क्षारात विद्राव्य.

**callus** किणक

(१) परिकाष्ठाच्या छिद्रयुक्त नलिकेतील आडव्या पडद्यावर (चाळणीवर) हिवाळ्यात बसणारा कॅलोज पदार्थाचा थर.

(२) जखमेभोवती असलेल्या निकोप व जिवंत कोशिकांपासून जखमेवर बसणारा रसाळ नरम कोशिकांचा थर (किणोतक=callus tissue); यापासून पुढ त्वक्षाकोशिका तयार होऊन जखमेचे संरक्षण होते. पहा cork.

**Calyciflorae** संवर्तपुष्पी (श्रेणी)

पहा Thalamiflorae.

**calyciflorous** संवर्तपुष्पी
पाकळ्या व केसरदले यांना चिकटून असलेला संवर्त धारण करणारी (वनस्पती).

**calyptra** पिधानी; झाकणी
(१) शेवाळी वनस्पतींतील अंदुककलशाचा वरचा अर्धा भाग; ह्यामुळे बीजुकाशयाचे संरक्षण होते.
(२) मुळाच्या टोकावरील टोपीसारखा भाग.
(३) फुलाचे अथवा फळाचे टोपणासारखे आवरण; उदा. निलगिरी; लवंग.

**calyptrogen** मूलत्राणकर; पिधानीजनक
मुळाच्या टोकावरील टोपीच्या आकाराचे वेष्टन जसजसे जीर्ण होईल तसतसे आतून नवीन बनविणारे ऊतक.

**calyx** संदलमंडल; संवर्त
फुलातील अवयवांच्या मंडलांपैकी सर्वात बाहेरचे, बहुधा हिरवे व संरक्षक मंडल; यातील प्रत्येक भागाला 'संदल' म्हणतात; याला च 'पुष्पकोश' असेही म्हटल्याचे आढळते.

**— tooth** संवर्तदंत
सूक्ष्म दातासारखे संदल.

**— tube** संवर्तनलिका
जुळलेल्या संदलामुळे बनलेली नलिका (नळी).

**cambiform cell** दीर्घकोशिका
परिकाष्ठातील लांबट व पातळ भिंतीची टोकदार कोशिका.

**cambium** ऊतककर
खोड, फांद्या व मुळे यातील वाहक घटकांच्या सान्निध्यात असून सतत नवीन वाहक घटक बनविणारा कोशिकांचा समूह; तसेच इतरत्रही इतर प्रकारच्या कोशिका बनविण्यास ( उदा. त्वक्षा=cork ) असा कोशिकासमूह आढळतो; पहा cork-cambium.

**— cell ( meristematic cell )** विभाजी कोशिका; वर्धिष्णु पेशा
सतत विभागणी चालू ठेवणारी व नवीन कोशिका निर्मिणारी कोशिका.

**— ring** ऊतककर वलय
बीजी वनस्पतींपैकी द्विदलिकित व कित्येक प्रकटबीज वनस्पती यांमध्ये खोडात व मुळात नवीन वाहक ऊतके ( प्रकाष्ठ व परिकाष्ठ ) किंवा नवीन साल (वल्क) बनविणाऱ्या ऊतकांचे वर्तुळ. पहा xylem, phloem, bark.

**Campanulaceae** घंटापुष्प कुल; कँपॅन्युलेसी
बेंथॅम व हूकर यांनी कँपेनेलीझ आणि एंग्लर व प्रँटल यांनी कँपॅन्युलेटी गणात या कुलाचा समावेश केला आहे; बेसी व हचिन्सन यांनी ॲस्टरेलीझ गणात हे कुल घातले आहे. या कुलाची प्रमुख लक्षणे : दुधी चिकाच्या ओषधी व झुडुपे; एकाआड एक साधी पाने; घंटाकृती, द्विलिंगी, अरसमात्र, युक्तप्रदल फुले; केसरदलांचे परागकोश जुळलेले; पाच किंवा तीन कप्प्यांचा अधःस्थ किंजपुट; बीजके अनेक; मृदुफळात किंवा बोंडात सपुष्क बिया.

**Campanulales ( Campanulatae )** घंटापुष्प गण; कँपेन्युलेलीझ
या गणात सहा कुले असून फक्त घंटापुष्प कुल व सूर्यफूल कुल यांचा अंतर्भाव एंग्लरच्या पद्धतीत आहे. या गणातील वनस्पती क्वचित काष्ठयुक्त पण बहुंशी ओषधीय; पंचभागी फुलात केसरदलांचे एकच मंडल व परागकोश बहुधा जुळलेले; किंजपुट अधःस्थ किंवा ऊर्ध्वस्थ.

**campanulate (bell-shaped)** घंटाकृति
तळाशी फुगीर व वर पसरट असा घंटेसारखा ( संवर्त किंवा पुष्पमुकुट ); उदा. मोपळा; कारंजवृक्ष ( *Spathodea companulata* Beauv.).

**campester (campestris)** क्षेत्रवासी
शेतात आढळणारे; उदा. एक भूछत्र (Mushroom; *Agaricus campestris* L.).

**camphor** कर्पूर ( कापूर )
काही वनस्पतींतून काढलेला पण बाष्परूपाने उडून जाणारा घन पदार्थ; *Dryobalanops camphora* Colebr; *Cinnamomum camphora* ( L. ) T. Nees & Eburn.

**campylotropous** वक्रमुख; वक्र
बीजबंधाशी काटकोनात वाढताना टोकास वाकडे झालेले व बीजकरंध्र, नाभि, बीजकतल जवळजवळ असलेले बीजक; उदा. कर्दळ.

**canada balsam** कॅनडा बाल्सम
एका वनस्पतीपासून ( *Abies balsamea* ) काढलेले विशिष्ट पारदर्शक चिकट द्रव्य. सूक्ष्मदर्शकाखाली निरीक्षण करण्याकरिता एखादा नमुना एका काचपट्टीवर दुसऱ्या पातळ काचेखाली चिकटवून कायमपणे ठेवण्याकरिता हे चिकट द्रव्य उपयोगात आणतात.

**canal** खोबण; सीता; नाली

लहान, उथळ चीर ( फट ); नळीसारखी पोकळी किंवा पोकळ मार्ग.

**canal-cell** मार्ग-कोशिका; नाली-कोशिका

अंदुककलशाच्या नळीसारख्या भागातील कोशिका.

**canaliculate** सीतायुक्त; खोबणीदार

**candidus** शुभ्र

पांढरे व चकाकीत; *Cystopus* ( *Albugo* ) *candidus* हे एका रोगकारक कवकाचे शास्त्रीय नाव पोकळ्यासारख्या आश्रय वनस्पतीवर पडणाऱ्या पांढऱ्या ठिपक्यामुळे पडले आहे.

**Cannabinaceae** गंजा ( गांजा ) कुल; कॅनाबिनेसी

गांजा, चरस, भांग ज्या वनस्पतीपासून काढतात ( *Cannabis sativa* L. ) तिचा व हॉप या द्विदलिकित वनस्पतीचा अंतर्भाव केलेले कुल; या द्विदलिकित कुलाचा समावेश आता हचिन्सन् यांनी वावल गणात ( आर्टिकेलीझ ) केला आहे. या कुलाची सामान्य लक्षणे : पहा Urticaceae; Urticales.

**Cannaceae** कर्दळ कुल; कॅनेसी

केवळ कर्दळीच्या वंशाचा ( कॅना ) अंतर्भाव करणारे एकदलिकित फुलझाडांचे लहान कुल; याचा समावेश कदली गणात ( सिटॅमिनी ) केला जातो परंतु हचिन्सन यांनी झिंजिबरेलीझ अथवा शुण्ठी गणात घातले आहे. प्रमुख लक्षणे : मूलक्षोडयुक्त ओषधी; पाने साधी, मोठी; सच्छद फुलोरा; द्विलिंगी मोठी आकर्षक फुले; परिदले सहा; पाकळ्या तळाशी केसरदलाशी जुळलेल्या; केसरदले सहा; त्यापैकी पाच वंध्य व पाकळ्यासारखी; एकाबर अर्धा कार्यक्षम परागकोश; किंजदले तीन; अधःस्थ व त्रिपुटक किंजपुटात अनेक अधोमुख बीजके; बोंडात सपुष्क बिया;
पहा Scitaminae.

**caoutchouc** कूटशूक; काऊट छूक

काही वनस्पतींच्या दुधी चिकातील रबरासारखा पदार्थ; ( उदा. *Hevea*; *Kickxia elastica* ) हेविया; किक्सिया.

**cap** ( १ ) छत्र; ( २ ) पिधानी; ( ३ ) टोपी

( १ ) भूछत्र नावाच्या कवकाचा छत्रीसारखा वरचा भाग ( pileus ).

( २ ) पहा calyptra; पिधानी

( ३ ) ईडोगोनियम या हरित शैवलाच्या तंतूमध्ये कोशिकांवरचा टोपीसारखा भाग; अनेक टोप्या वलयाकार दिसतात.

**capillary** केशिका

केसासारखी ( अतिशय अरुंद ).

**— space** केशिका मार्ग

केसासारखी सूक्ष्म पोकळी.

**— vein** केशवाहिनी

केसासारखी शीर.

**capitate** सशीर्ष; शीर्षाभ

( १ ) टाचणीसारखे डोके असलेले; उदा. किंजल्क; केस;

( २ ) गुच्छासारखी ( स्तबकासारखी ) मांडणी असलेली; उदा. सूर्यफुलाची पुष्पके असलेल्या फुलोऱ्याप्रमाणे; ( *Malachra capitata* L. )

**capitulum** स्तबक

अनेक बिनदेठाची लहान फुले एकत्र असलेला अकुंठित फुलोरा; उदा. झेंडू, शेवंती, सूर्यफूल.

**Capparidaceae ( Capparaceae )** वरुण कुल; कॅपॅरिडेसी ( कॅपॅरेसी )

वरुण (वायवर्णा) नेपती ( करीर ), तरटी, वाघाटी, कावरा, गोविंदफळ ह्या द्विदलिकित वनस्पतींच्या वंशाचे शास्त्रीय नाव ( कॅपॅरिस ) या कुलाला देण्यात वापरले असून याचा अंतर्भाव पॅपॅव्हरेलीझ अथवा अहिफेन गणात बेसींनी व वरुण गणात (कॅपॅरिडेलीझ) हचिन्सन यांनी केला आहे. या कुलाची प्रमुख लक्षणे : द्विलिंगी फुले; संदले ४-८ ; प्रदले ४ क्वचित कमीजास्त, सुटी; केसरदले अनेक किंवा थोडी व अक्षावर ( केसरधर ); किंजदले दोन किंवा अधिक, जुळलेली व ऊर्ध्वस्थ आणि बहुधा अक्षावर ( किंजधर ); बीजकविन्यास तटलग्न. पिवळी तिळवण व पांढरी तिळवण याच कुलात येतात.

**capsule** ( १ ) बोंड; ( २ ) आशय

( १ ) शुष्क, तडकणारे, अनेकबीजी आणि ऊर्ध्वस्थ, युक्तकिंज, अनेक कप्प्यांच्या किंजपुटापासून बनलेले फळ. उदा. भेंडी, कापूस, धोत्रा, अफू, ज्योत ( जूट= *Corchorus capsularis* L. ).

( २ ) शेवाळी वनस्पतींतील बीजुके बनविणारा पिशवीसारखा अवयव ( आशय ); लहान पिशवीसारखा अवयव.

**carbohydrate** कार्बोहायड्रेट

कार्बन, हायड्रोजन व ऑक्सिजन यांच्या रासायनिक संयोगाने बनलेला व विशिष्ट रासायनिक संघटना असलेला पदार्थ; हायड्रोजन व ऑक्सिजन यांचे प्रमाण २ : १ असते. उदा. सामान्य भाषेत तौकीर (तवकीर), ग्लायकोजेन, सेल्युलोज (तूलीर), पीठ, साखर इ. पदार्थ.

**carbon-assimilation ( photosynthesis )**

कार्बन सात्मीकरण

पानातील जिवंत व हरितद्रव्ययुक्त कोशिकांमध्ये कार्बन डायॉक्साइड वायू, पाणी व सूर्यप्रकाश यांच्या साहाय्याने कार्बोहायड्रेट बनविण्याची नैसर्गिक रासायनिक प्रक्रिया; यांमध्ये हा कार्बनयुक्त पदार्थ वनस्पतींच्या शरीरात समाविष्ट होतो व पुढे त्याची अनेक रूपांतरे होतात; यामध्ये सूर्यप्रकाशातील ऊर्जेचा वापर करून शिवाय ही ऊर्जा अन्नकणात साठविली जाते.

**carcerule ( carcerulus )** मुद्रिका

ऊर्ध्वस्थ व युक्त किंजपुटापासून बनलेले, शुष्क, न फुटणारे, एकबीजी फलांश अलग करणारे फळ; उदा. चक्रभेंडी, पेटारी, मुद्रा, गुल्खेरा इ.

पहा mericarp; schizocarp.

**Caricaceae** पपई कुल; कॅरिकेसी

जुन्या वर्गीकरणाच्या पद्धतीत या द्विदलिकित कुलाचा अंतर्भाव पॅसिफ्लोरेलीझमध्ये ( कृष्णकमळ गणात ) केला जात असे; किंवा कृष्णकमळ कुलात पपईचा समावेश असे; हल्ली कॅरिकेसी कुलात पपईचा समावेश करतात; दुधी चीक; युक्तप्रदल, एकलिंगी, नियमित पंचभागी फुले; ऊर्ध्वस्थ किंजपुटात एक किंवा अनेक कप्पे व अनेक बीजके इत्यादी लक्षणे आढळतात; पहा Passifloraceae.

**carina ( keel )** नौकातल; प्रदलांजली; कणा ( आढे )

( १ ) वाटाणा, गोकर्ण, अगस्त्य यांच्या फुलातील पतंगरूप पुष्पमुकुटाच्या पाकळ्यांच्या मांडणीत सर्वात आत असलेल्या ( पुरश्च ) दोन पाकळ्यांनी बनलेला नावेसारखा ( ओंजळीसारखा ) भाग; पहा papilionaceous.

( २ ) गवताच्या फुलातील तुषासंबंधी; काही तुषे नावेसारखी असून त्यांची मध्यशीर उठावदार कण्याप्रमाणे ( आढ्याप्रमाणे ) असते; पहा glume.

**carinal ( keeled )** नौकातलीय

फुलातील नावेसारखा व आनुषंगिक अवयव असलेला भाग.

**carinal canal** कटक नाली

खोडावरील धारेसमोर किंवा शिरेसमोर पण प्रकाष्ठाच्या आतील बाजूस असलेला नळीसारखा मार्ग; उदा. एक्किसीटम.

**carinate** कटकयुक्त

उठावदार, उभी व जाड मध्यशीर किंवा मध्ये कटकयुक्त रेषा असलेला (भाग); उदा. संदल, तुष, छद इ.

**carnivorous** मांसाहारी

कीटकांना आकर्षून व मारून त्यांच्यावर उपजीविका करणाऱ्या ( वनस्पती ); उदा. घटपर्णी, कलशपर्णी (Pitcher-plant); मच्छीमारी (Fly-trap); गेळ्याची वनस्पती (Bladderwort); इ.

**carnose ( carnosus; fleshy)** मांसल; मगजयुक्त

**carotin ( carotinoid )** पर्णपीतक; कॅराटीन ($C_{40}H_{56}$)

बहुतेक वनस्पतींच्या निरनिराळ्या भागात ( प्राकणूत ) आढळणारे तसेच हरितद्रव्यात मिसळून असणारे नारिंगी किंवा लाल द्रव्य; उदा. गाजराच्या मुळांना त्यामुळे शेंदरी रंग प्राप्त होतो; कित्येक वनस्पतींच्या पानावर ह्या रंगाचे ठिपके असतात.

पहा xanthophyll.

**carpel** किंजदल; स्त्रीकेसर

फुलातील भिन्न अवयवांपैकी सर्वात आतील (केंद्रवर्ती) व स्त्री-गंतुके निर्माण करणारे पुष्पदल; तळाशी किंजपुट, मध्ये किंजल व टोकास किंजल्क असे याचे तीन क्रमवार भाग असून किंजपुटात बीजके असतात.

पहा megasporophyll; pistil.

**carpellate** किंजदलयुक्त

**carpophore** फलधर

किंजदलांमधून वाढलेला फुलातील अक्षाचा (पुष्पस्थलीचा) भाग; काही फुलांत पुढे फळांचे भाग (फलांश) याला चिकटून राहतात; उदा. जिरेनियम, जिरे, धणे, गाजराची फळे इ.

**caruncle ( strophiole )** नाभिजात

बीजरंध्राजवळ (उदा. एरंड) किंवा नाभीजवळ (उदा. पॅन्सी) बीजावर वाढलेला फोडासारखा भाग.

पहा aril.

**Caryophyllaceae** पाटलपुष्प कुल; अरुणपुष्प कुल; कॅरिओफायलेसी

डायांथस ( पिंक; अरुणपुष्प ), सायलीन, स्टेलेरिया

इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा अंतर्भाव बेसींनी पाटलपुष्प गणात (कॅरिओफायलेलीझ) आणि हचिन्सन यांनी त्याच गणात पण फार संकुचित अर्थाने केला आहे. ॲल्सिनॉइडी व सायलिनॉइडी ही या कुलातील उपकुले आहेत. प्रमुख लक्षणे : खोडावरची पेरी फुगीर; साधी पाने समोरासमोर; कुंठित फुलोरा; सुट्या नखरी पाकळ्यांची व अवकिंज, पंचभागी, द्विलिंगी नियमित फुले; केसरदले पाकळ्यांच्या दुप्पट; २–५ जुळलेली किंजदले; एक कप्प्याच्या किंजपुटात मध्यवर्ती सुटा बीजकविन्यास आणि बोंड (फळ).

**caryophyllaceous** लवंगरूप

पसरट पाती व लांबट वृंतक ( देठ ) असलेल्या (नखरी) सर्व सुट्या पाकळ्यांचा पुष्पमुकुट; सामान्यपणे लवंगेसारखा ( *Eugenia caryophyllata* Thunl. ) दिसणारा; उदा. डायांथस (पिंक).

**caryopsis** सस्यफल; धान

ऊर्ध्वस्थ किंजपुटापासून बनलेले, शुष्क, एकबीजी, फलावरण व बीजावरण चिकटून असलेले कृत्स्नफल; उदा. भात, मका, गहू, जोंधळा; पहा achenial.

**casein** दधान; दुग्धप्रथिन; केसीन

दुधात व दह्यात असणारे एक प्रथिन; पहा protein.

**casparian dot ( strip )** अरीय बिंदू; कॅस्परी बिंदू ( पट्टा )

अंतस्त्वचेच्या कोशिकांच्या अरीय भिंतीवरील भिंगाच्या आकाराचा ठिपका; कॅस्परी नावाच्या शास्त्रज्ञाच्या नावे असलेली हीं सुबरीन ( बुचासारख्या ) द्रव्याची पट्टी अरीय कोशिकावरणाभोवती असते.
पहा endodermis; radial dot.

**cast** (१) प्रतिमा; छाप; ठसा; (२) गळणे

( १ ) प्राचीन वनस्पती अथवा प्राणी यांच्या शरीरांवरील विशिष्ट खाणाखुणांचे दर्शन घडविणारे पूर्वकालीन दगड ( प्रशेष–उत्खात ); पहा fossil.
( २ ) शरीरावयव निसर्गतः गळून पडणे; उदा. पाने, फुले, फळे, इ.

**casual** नैमित्तिक

काही विशिष्ट निमित्ताने बाहेरून आलेली परंतु स्थायिक न झालेली ( वनस्पती; तण ); पहा alien.

**Casuarinaceae** खडशेर कुल; कॅज्युरिनेसी

खडशेरणीचा अंतर्भाव करणारे द्विदलिकित लहान कुल; पूर्वी याचा अंतर्भाव ॲमेंटिफेरीमध्ये (नतकणिश गणात) करीत. कारण त्यातील वनस्पती प्रारंभिक मानल्या असाव्या. हल्ली या गणातील वनस्पती मुक्तप्रदल वनस्पतीपासून ऱ्हास पावल्या असून प्रारंभिक नाहीत असे मानतात. प्रमुख लक्षणे: मरुवनस्पती; शाखा हिरव्या व खोवणीदार; पाने खवल्यासारखी मंडलित; फुलोरे एकलिंगी; पुंपुष्पे कणिशावर; स्त्री-पुष्पे गुच्छावर; पुं-पुष्पे सच्छद व सच्छदक; एक किंवा दोन परिदले; एक केसरदल व द्विखंडी परागकोश; स्त्री-पुष्पे सच्छद व सच्छदक, परिदलहीन; एका कप्प्याचा व द्विकिंजदलांचा ऊर्ध्वस्थ किंजपुट; बीजके दोन व तटलग्न; फळ पक्षधारी, कपाली व एकबीजी; सर्व फुलोऱ्यांचे एक शंकूसारखे संयुक्त शुष्क व कठीण; फळ, तलयुती, अनेक गर्भकोशिका, वायुपरागण ही वैशिष्ट्येही आढळतात व ती लक्षणे प्राचीनत्व दर्शवितात;
*Casuarina equisetifolia* Forst. ( Beef-wood tree ) खडशेरणी.

**catabolism ( katabolism )** अपचय

पहा metabolism.

**catalysis** उत्प्रेरण; निदेशन

वितंचक किंवा त्यासारख्या पदार्थाच्या साहाय्याने दुसऱ्या पदार्थात रासायनिक बदल होण्याची प्रक्रिया; उदा. डायास्टेजने तवकिराची साखर बनणे; यामध्ये निदेशक (उत्प्रेरक) स्वतः बदलत नाही.

**catalyst** उत्प्रेरक; निदेशक

निदेशन घडवून आणणारा पदार्थ.

**cataphyll** शल्कपर्ण

वनस्पतींचे खवल्यासारखे पान; हे शुष्क किंवा मांसल आणि लहान किंवा मोठे असते. बीजातील दलिकांचाही येथे समावेश होतो. उदा. कांद्यातील मांसल खवले; कळ्यावरचे खवले.

**catechu (cutch)** कात

खदिराच्या ( Acacia catechu Willd. ) झाडाच्या मध्यकाष्ठापासून काढलेला टॅनिनयुक्त स्तंभक पदार्थ.

**catkin ( ament )** नतकणिश

पहा amentum.

**caudate ( caudatus )** पुच्छयुक्त; पुच्छाभ

लांबट निमुळते; शेपटीप्रमाणे; शेपटी असलेले; उदा. *Adiantum caudtaum* L. ह्या नेचाच्या पानाचे टोक लांबट निमुळते असते; *Amaranthus caudatus* L.

**caudex** (१) अक्ष; (२) शाखाहीन खोड
खोड व मूळ यांचा समावेश केलेला वनस्पतीचा अक्ष; (२) फांद्या नसलेले खोड; उदा. सायकस; वृक्षी नेचा; नारळ.

**caudicle** पुंजवृंतक
परागपुंजाचा बारीक देठ; उदा. रुई; आमरे.

**caulescent** सस्कंध
जमिनीवर दिसणारे सरळ खोड असणारी (वनस्पती); उदा. गुलाब; गुलमोहोर; पहा acaulescent.

**cauliflorous** स्कंधपुष्पी
खोडाच्या जून पृष्ठभागापासून (प्रत्यक्षपणे) फुले येणारे (झाड); उदा. फणस; तोफगोळा वृक्ष. पुष्पधारक अक्षाच्या अतिपुष्टीबरोबरच दोषयुक्त फुलांच्या निर्मितीमुळे बनलेला फुलोरा, 'कॉलीफ्लावर (फुलवर)' म्हणून प्रसिद्ध आहे.

**cauline** स्कंधोद्भव; स्कंधेय
जमिनीवरील खोडाचे किंवा खोडापासून उगवलेले (पान); फक्त खोडातच सरळ वाढत राहणारा (वाहक वृंद).

**caulis** स्कंध
फक्त जमिनीवरच वाढत असलेला वनस्पतीचा अक्ष (खोड).

**cavity** कोटर; कोष्ठ; गुहिका
वनस्पतीतील किंवा तिच्या लहान मोठ्या अवयवांतील पोकळी.

**ceae** कुलवाचक संज्ञांना लावलेला प्रत्यय; उदा. Acanthaceae (वासक कुल).

**cecidium** पिटक
बारीक फोड किंवा उंचवटा; कवक किंवा कीटक यांच्या संसर्गाने झालेली अनिल व गाठीसारखी वाढ; उदा. उंबराच्या पानावरील गाठी.

**cecidilogy** पिटकविज्ञान
पिटकासंबंधीच्या सर्व माहितीची शाखा.

**Celastraceae (Celastrineae)** ज्योतिष्मती (कंगुणी) कुल; सेलॅस्ट्रेसी
कंगुणी (कांगोणी) व तत्सम इतर द्विदलिकित वनस्पतींचे लहान कुल. या कुलाचा अंतर्भाव ज्योतिष्मती गणात (सेलॅस्ट्रेलीझ) केला जातो; याच गणात द्राक्षा कुल व बोर कुल यांचाही समावेश असून अरिष्ट गणाशी त्याचे आप्तभाव आहेत; तसेच या गणाचा उगम गुलाब गणापासून असावा असे मानतात. प्रमुख लक्षणे : साध्या व चिवट पानांचे वृक्ष व झुडपे; लहान, नियमित, बहुधा द्विलिंगी व बिंबयुक्त फुले; संवर्त व पुष्पमुकुट ४-५ भागी; जुळलेल्या पाकळ्या; केसरदले ४–५; किंजदले २–५ व जुळून बनलेला ऊर्ध्वस्थ किंजपुट; बीजके ४–१०; विविध प्रकारचे फळ व बीजास बीजोपांग असते.

**cell** (१) कोशिका; पेशी; (२) कोटर; (३) पुटक
(१) वनस्पती व प्राणी यांच्या शरीरांतील सर्वांत लहान घटक; जीवनाचे एकक, कारण काही प्राणी व वनस्पती फक्त एकाच कोशिकेचे (पेशीचे) बनलेले असतात; जिवंत कोशिकेत प्राकल नावाचा सजीव व कार्यक्षम पदार्थ असतोच व कोशिकतील सर्व जीवन-व्यापार (वृद्धी, चयापचय, प्रजोत्पादन, इ.) प्राकलामुळेच घडून येतात; प्राकलातील प्रमुख बिंदूसारखा नियंत्रक 'प्रकल' असून काही अपवादात्मक कोशिकांत तो स्पष्ट नसतो किंवा दोन वा अधिक प्रकले असतात. प्राकलाभोवती कोशिकावरण बहुधा असते; आकार अति-सूक्ष्म व संरचना विविध असते. प्राण्यांतील कोशिका व वनस्पतींतील कोशिका यात किरकोळ फरक आढळतात. पहा; protoplasm, protoplast, mitosis; nucleus.
(२) परागकोशातील कप्पा (कोटर);
(३) किंजपुटातील कप्पा (पुटक); पहा loculus.

**— cavity** कोशिका-कोष्ठ
कोशिकावरणाने मर्यादित केलेली कोशिकेतील पोकळी;

**— – contents (inclusions)** कोशिका-द्रव्य; पेशी-पदार्थ
कोशिकेतील सजीव व निर्जीव पदार्थ (विद्राव्य, अविद्राव्य, उपयुक्त, टाकाऊ, संचित इ.).

**— – divison** कोशिका-विभाजन; पेशी-विभाजन
एका कोशिकेपासून दोन किंवा अधिक कोशिका विभागणीने निर्माण होणे. द्विभाजन, समविभाजन, असमविभाजन या सर्वांचा येथे समावेश होतो; पहा mitosis; meiosis; fission.

**— – formation** कोशिका-सम्भवन; कोशिका-निर्मिती
अनेक प्रकारे नवीन कोशिकांची निर्मिती होणे.

**— – fusion** कोशिकासंयोग
जवळ जवळ असलेल्या कोशिकांतील आवरण नाहीसे होऊन सलग नळी किंवा शाखित नळी किंवा तसे मार्ग बनणे; उदा. वाहिन्या, चिकाळ नलिका, हवामार्ग, राळनलिका, तैलनलिका, इ.

— - **mass** कोशिकासमूह
अनेक कोशिकांचा संच.

— - **membrane** प्राकल-पटल
प्राकलाच्या सीमेवरील पापुद्रा.

— - **octant** कोशिकाष्टम
कोशिका-विभागणीत आठ भाग होतात, त्यातील एक अष्टमांश ( आठवा ) भाग.

— - **organelle** कोशिकांगक
कोशिकेतील अतिसूक्ष्म व कार्यक्षम सजीव भाग; उदा. प्रकल, प्राकणु, कर्षकेंद्र इ.

— - **permeability** कोशिका-पार्यता
कोशिकेतील पदार्थ बाहेर जाणे अथवा बाहेरून आत येणे यासंबंधीची क्षमता; ही वास्तविक बहुतांशी प्राकलाचीच क्षमता असते.

— - **plate** कोशिका-अंतराय
कोशिकेच्या विभागणीत अंत्यावस्थेत परिकलाचे तंतू कोशिकेच्या मध्याशी समांतर पातळीत जाड होऊन हळुहळू बनणारा एक पातळ प्राकलाचा पडदा.

— - **sap** कोशिका-रस; पेशी-रस
कोशिकेच्या पोकळीतील पातळ द्रवपदार्थ; पहा vacuole.

— - **theory** कोशिका-सिद्धांत
सर्व सजीव कोशिकामय असून त्यांची वाढ व उत्पत्ती कोशिका-विभाजनामुळेच शक्य होतात हा श्लायडन व श्वान या दोन शास्त्रज्ञांचा मौलिक सिद्धांत ( इ. स. १८३८-३९ ).

— - **wall** कोशिकावरण; कोशिकातट; कोशिका-पेशी-भित्तिका; पेशी-भित्ती
वनस्पतींच्या शरीराच्या घटक-कोशिकांच्या बाहेरील पातळ, पारदर्शक व पार्य आच्छादन; हे बहुधा तूलीर ( सेल्युलोज ) नामक पदार्थाचे असते, परंतु त्यात अन्य पदार्थ समाविष्ट होऊन त्याचे रूपांतर लिग्निन, क्यूटिन, स्यूबरिन ह्या पदार्थांत होऊ शकते व त्यानंतर त्याचे गुणधर्म बदलतात.

**cellulose** तूलीर; सेल्युलोज
वनस्पतींच्या कोशिकावरणातील मुख्य कार्बनी पदार्थ; कार्बोहायड्रेट ( $C_6H_{10}O_5$ )$_n$.

—, **fungus** कवक-तूलीर
प्राण्यांतील कायटिन नावाच्या पदार्थासारखा कवकांच्या कोशिकावरणात असलेला पदार्थ.

—, **hemi** अर्धतूलीर
विशेषतः काष्ठयुक्त कोशिकावरणात असलेला तूलीर; काही बीजातील अन्नसाठ्यातही हा आढळतो; उदा. खजूर.

**censer mechanism** धूपपात्र यंत्रणा
धूप जाळण्याकरिता वापरात असलेल्या पात्राप्रमाणे टोकास तडकलेल्या बोंडातून ( फळातून ) बीजे आजूबाजूस फेकली जाण्याची योजना. उदा. अफू व पिवळा धोत्रा.

**central** केंद्रीय; मध्यवर्ती; केंद्रस्थ
केंद्राशी संबंध असलेला.

— **cylinder** केंद्रीय चिती
मध्यवर्ती भाग; मूळ व खोड यांच्या संरचनेत अंतस्त्वचेच्या आतील सर्व भाग; विशेषतः वाहक ऊतकांना उद्देशून वापरलेली संज्ञा.

**centric leaf** शलाकाकृति पर्ण
वृंतहीन ( देठ नसलेले ), अंतर्रचनेत अरसमात्र, उभे, निमुळते, चितीय हिरवे पान; उदा. कांद्याची पात.

**centrifugal** अपमध्य; केंद्रोत्सारी
केंद्राकडून बाहेर अशा क्रमाने; उदा. कुंठित फुलोऱ्यातील फुलांचा उमलण्याचा क्रम; जाई, जुई, मोगरा इ.

**centriole ( centrosome )** कर्षकेंद्रकण
कोशिकेच्या कर्षकेंद्रातील सूक्ष्म कण.

**centripetal** अभिमध्य; केंद्रगामी
परिघाकडून केंद्राकडे अशा क्रमाने; उदा. अकुंठित फुलोऱ्यातील फुलांचा उमलण्याचा क्रम; जून फुले बाहेरच्या बाजूस ( अक्षावर सर्वात खाली ) आणि कोवळी फुले क्रमाने केंद्राजवळ ( अक्षावर सर्वात टोकाकडे ); उदा. संकेश्वर.

**centromere** तर्कयुज
रंगसूत्रांच्या काही हालचाली निश्चित करणारा व स्वनिर्मिती करण्यास समर्थ असलेला रंगसूत्रातील एक सूक्ष्म कण.

**centrosphere** कर्षकेंद्र
कोशिकेतील प्रकलाजवळ असलेले प्रथम एक नंतर दोन, वर्णहीन व प्राकलात बुडलेले, केव्हा तारकाप्रमाणे दिसणारे बिंदू; प्रकल-विभाजनात रंगसूत्रांना कोशिकेच्या दोन टोकाकडे ओढणे हे त्याचे कार्य असून त्या प्रत्येकातील सूक्ष्म कणास कर्षकेंद्रकण म्हणतात. पहा nucleus.

**cephalodium** अपवर्ध

१) घोंडफुलाच्या ( शैवाक ) शरीरातून आलेले शाखायुक्त किंवा बहिर्वक्र उपांग.

२) स्तबक फुलोरा; पहा lichen; head.

**cereal** तृणधान्य, शूकधान्य

ज्यांची फळे वा बीजे खाद्य आहेत अशी लागवडीतील गवते; उदा. भात, जोंधळा, गहू, मका, बाजरी इ.

**ceriferous** सिक्थकयुक्त

मेण बनविणारे ( धारण करणारे ); उदा. भुरा कोहळा ( *Benincasa cerifera* Savi. ).

**chaeta ( seta )** दण्ड

शेवाळी वनस्पतींच्या बीजुकधराचा उभा काडीसारखा आधार; पहा sporogonium.

**chalaza** बीजकतल

बीजकातील प्रदेह ( मगज ) व आवरणे यांचा संधिप्रदेश ( बीजकाचा तळप्रदेश ); पहा nucellus.

**chalazogamy** तलयुति

बीजकाच्या तळातून परागनलिकेचा प्रवेश व नंतरचे फलन; हा अनित्य व प्रारंभिक प्रकार काहीं प्राचीन वनस्पतींत आढळतो; उदा. खडशेरणी; भूर्जकुल, अक्रोड कुल, एरंड कुल, वावल कुल, कारगोळ कुल, गंजा कुल, इत्यादींतील काहीं जाती; पहा porogamy.

**chalk-gland** खट-प्रपिंड

चूर्णीय द्राव स्रवणारी ग्रंथि; उदा. पाषाणभेद (सॅक्सिफ्रॅगा); नेफ्रोलेपिस नेचा.

**chamber** संपुट; पुटक; कोटर; कोष्ठ

लहान बंदिस्त पोकळी.

**—, pollen** पराग-संपुट

परागणानंतर त्यांना काही अल्पकाळ सुरक्षित ठेवण्याची प्रदेहावरची पोकळी; उदा. सायकस.

**—, sperm (archegonial)** रेतुक-( अंदुककलश-) संपुट

अंदुककलशात सुक्ष्म प्रवेश होण्यास त्याच्या टोकास असलेली प्रदेहातील पण गर्भकोशाच्या वरच्या भागातील पोकळी; उदा. सायकस.

**chambered pith** कोष्ठित मज्जा

अनेक आडव्या पडद्यांनी विभागल्याने अनेक कप्पे असणारे भेंड.

**changeability ( mutability )** परिवर्त्यता

बदल होण्याची क्षमता; सजीवात स्थिरता असून बदल होत नाहीत, अशा गैरसमजुतीविरुद्ध असलेली व सर्वमान्य विचारसरणी.

**channel** पन्हळ; प्रणाल; नाली

पाट; चर; खोबणी; लांबट खोलगट मार्ग.

**channelled** प्रणालयुक्त; नालीयुक्त

खोबण किंवा पन्हळ असलेले ( उदा. खोड; शीर, देठ इ. ).

**character** लक्षण; गुण

भिन्न वंशातील अगर जातीतील व्यक्तींना एकमेकापासून ओळखून काढण्यास उपयुक्त भेद. उदा. गुल्बुश किंवा घाणेरी यांच्या भिन्न प्रकारातील फुलांचे विविध रंग; बीजयुक्त व बीजहीन द्राक्षे, पेरू, पपई, इ.

**Characeae ( Charophyceae )** कांडशरीरिका ( शैवल ) वर्ग; कारेसा

हरितशैवल विभागातील ( क्लोरोफायटा ) एक प्रगत गट ( वर्ग ). प्रमुख लक्षणे : सतत गोड्या ( क्वचित गोड्या व खाऱ्या पाण्याच्या मिश्रण असलेल्या ) पाण्यात राहणाऱ्या अनेक कोशिक शैवल वनस्पती; टोकाकडे एका कोशिकाद्वारे वाढ; एककोशिक लैंगिक अवयव, परंतु विशिष्ट वंध्य कोशिकांनी वेढलेले; अक्षावरची व फांद्यावरची पेरी व कांडी स्पष्ट असून जमिनीशी तंतूसारख्या मुळांनी संपर्क असतो. काही जातींत कांड्या भोवती कोशिकांच्या रांगांचे वेष्टन असते. पहा globule; nucule; Chlorophyta.

**chemonastic** रसायनानुकुंचनी

रसायनाच्या चेतनेमुळे घडून येणारे ( अवयवांचे वलन-किंवा वळणे ); त्या चेतनेमुळे हालचाल करणारा अवयव; अवयवाची स्थिती व आकार यात बदल.

**chemonasty** रसायनानुकुंचन

रासायनिक चेतनेमुळे वळण्याचा प्रकार; येथे चेतकाच्या दिशेचा व वळणाच्या दिशेचा संबंध नसतो.

**chemotactic** रसायनानुचलनी

रासायनिक चेतकामुळे घडून येणारे ( चलन ); उदा. अस्थिर वनस्पतींचे ( सूक्ष्मजंतू, शैवले, इ. ) अथवा त्यांच्या सुट्या भागांचे ( उदा. बीजुके, गंतुके, इ. ) स्थलांतर ( चेतकाकडे किंवा चेतकापासून दूर ).

**chemotaxis** रसायनानुचलन

रसायनाच्या चेतनेमुळे हालचाल ( स्थलांतर ) घडून येण्याचा प्रकार. उदा. पाण्यातील सूक्ष्म व स्वतंत्र

शैवले अथवा रेतुके विशिष्ट रसायनाकडे किंवा त्याविरुद्ध पोहत जाण्याची प्रक्रिया; नेचांची रेतुके अंदुककलशातील रासायनिक द्रव्याकडे जातात; सूक्ष्म-जंतू अन्नकणाकडे पण विषारी पदार्थांपासून दूर जातात.

**chemotropic** रसायनानुवर्तनी

रसायनाच्या चेतनेमुळे त्याकडे किंवा त्याविरुद्ध होणारी ( वाढ व त्यामुळे वळणे ); उदा. परागनलिकेची किंजलातील वाढ.

**chemotropism** रसायनानुवर्तन

रसायनाकडे किंवा त्याविरुद्ध भागाकडे वाढण्याचा प्रकार. उदा. बुरशीचे काही तंतू अन्नपदार्थात वाढतात तर काही वर हवेत वाढतात.

**chemosynthesis** रसायन-संश्लेषण; रासायनिक संश्लेषण

रासायनिक विक्रियेतून उद्‌भवणाऱ्या ऊर्जेचा वापर करून केलेली अन्ननिर्मिती, उदा. काही स्वोपजीवी सूक्ष्मजंतू.

**Chenopodiaceae** चक्रवर्त ( चाकवत ) कुल; चिनोपोडिएसी

चक्रवर्त ( चाकवत ), चंदनबटवा, बीट, पालक, मायाळ, ( मयाळ, वेलबोंडी ) इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा अंतर्भाव एंग्लर व प्रँटल यांनी सेंट्रोस्पर्मी गणात, बेसीनी पाटलपुष्प ( कॅरिओ-फायलेलीझ ) गणात आणि हचिन्सनने चक्रवर्त गणात ( चिनोपोडिएलीझ ) केला आहे. प्रमुख लक्षणे : अनेक लवणवासी वनस्पती; बहुतेक ओषधी, मांसल, क्वचित पर्णहीन; लहान, नियमित, एकावरणी, अवकिंज, बहुधा द्विलिंगी, पंचभागी फुले; परिदलसंमुख केसरदले; एक कप्प्याचा, दोन किंवा तीन जुळलेल्या किंजदलांचा ऊर्ध्वस्थ किंजपुट; एकबीजी, कपाली फळ, चिरस्थायी परिदलांनी वेढलेले असते. अलिकडे मयाळाचा समावेश मयाळ ( उपोदकी ) कुलात ( बॅसेलेसी ) केला जातो; पहा Basellaceae.

**chersophyte** शुष्कभूवनस्पति

कोरड्या व ओसाड जमिनीवर वाढणारी वनस्पती. उदा. एकदांडी; पिवळा धोत्रा; काही निवडुंगाच्या जाती.

**chiasma ( pl. chiasmata )** व्यत्यास

कोशिकेतील प्रकलाच्या न्यूनीकरण विभाजनात दोन समजात रंगसूत्रांची परस्पराशी फुलीतील ( क्रॉस ) दोन रेषाप्रमाणे होणारी युति; या अवस्थेत त्या दोन्ही-तील गुणघटकांचा विनिमय होऊ शकतो.

**chilling** अतिशीतन

अतिथंड करण्याची प्रक्रिया.

**chimaera** विचित्रोतकी

एकापेक्षा अधिक व जननिकदृष्ट्या भिन्न ऊतके असलेली वनस्पती. याचा उगम उत्परिवर्तनात किंवा विकासावस्थेच्या आरंभी एखाद्या कोशिकेतील अनित्य रंगसूत्राच्या वाटणीत असतो.

**chiropterophilous** जतुकापरागित

पाकोळ्या किंवा वाघळे यांच्या मदतीने परागण घडवून आणणारी ( वनस्पती किंवा फुले ); उदा. कदंब, डाळिंब.

**chitin** कायटिन

शृंगद्रव्यासारखा पदार्थ; हा प्राण्यांच्या विशेषतः कीटकांच्या शरीराच्या आच्छादनात असणारा, मजबूत व रसायनाच्या प्रक्रियेला सहसा दाद न देणारा असून कवकाच्या कोशिकावरणातील द्रव्यासारखा असतो; तो नायट्रोजनयुक्त बहुशर्कर असतो.

**chlamydospore** आवृतबीजुक

विशेष जाड आच्छादन असलेले कवकाचे बीजुक; उदा. बुरशी.

**chlorenchyma** हरितोतक

हरितकणूंनी भरलेल्या कोशिकांचा समूह.

**Chlorophyceae ( Green algae )** हरित शैवल वर्ग

फक्त हरितद्रव्य असलेला व कायक वनस्पतींपैकी एक शैवल गट; आधुनिक वर्गीकरणपद्धतीप्रमाणे हरित शैवल विभागाचे ( क्लोरोफायटा ) हरितशैवल व कांड-शरीरिका (कारेसी; कॅरोफायसी) असे दोन वर्ग मानतात. प्रमुख लक्षणे : एककोशिक किंवा अनेककोशिक; अनेक कोशिकातील वाढ अग्रस्थ कोशिकाद्वारे नसते; प्रजोत्पादक अवयव एककोशिक व मुक्तपणे विखुरलेली; फलनानंतर वंध्य कोशिकांचे आच्छादन अपवादात्मक; शरीर कोशिकासमूहाचे, तंतुमय, पसरट, पोकळ किंवा भरीव नळीप्रमाणे ( कायकाभ ); अलिंग प्रजोत्पादन बीजुकाद्वारे आणि सलिंग प्रजोत्पादन सम किंवा असम गंतुकाद्वारे होते. पहा Chlorophyta; Characeae.

**chlorophyll** हरितद्रव्य

वनस्पतींच्या सर्व हिरव्या भागातील कोशिकात प्राकणूत असणारे हिरवे द्रव्य; या द्रव्यात अ आणि ब असे

हिरवे द्रव्य, कॅरोटिन नामक नारिंगी व झँथोफिल हे पिवळे अशी द्रव्ये, यांचे मिश्रण असते. कार्बन आत्मसात करून अन्ननिर्मिती करण्यास सौर उर्जा शोषून घेणे व तिचा पुढे अन्नकणात संचय करणे ह्या जीवरासायनिक प्रक्रियेत हरितद्रव्याचा उपयोग कोशिकेतील सजीव पदार्थ करतो. सूक्ष्मजंतू, कवक अशा काही वनस्पतींत हरितद्रव्य नसते तर नीलहरित शैवलातील कोशिकांमध्ये प्राकणूंच्या अभावी हरितद्रव्य विखुरलेले आढळते. हरितद्रव्य–अ ($C_{55}H_{72}O_3N_4Mg$) व हरितद्रव्य–ब ($C_{55}H_{70}O_6N_4Mg$); पहा carotine; xanthophyll.

**Chlorophyta** हरितशैवल विभाग

अबीजी वनस्पतींपैकी अत्यंत साध्या शरीराच्या (कायक) हिरव्या, प्रारंभिक, स्वतंत्र वनस्पतींचा गट. प्रमुख लक्षणे : वर वर्णन केलेले हरितद्रव्य प्राकणूत असून बहुतेक सर्व गोड्या पाण्यात पण लहान असून काही समुद्रवासी आणि काहीशा मोठ्या; संचित पदार्थ स्टार्च; शरीर एककोशिक किंवा अनेककोशिक; प्रजोत्पादक कोशिका, चलनशील, असून दोन किंवा चार प्रकेसले टोकास (क्वचित बाजूस) व सारख्या लांबीची; एककोशिक लैंगिक अवयवात गंतुके बनून त्यांचे मीलन दोन सारख्या आकाराची किंवा भिन्न आकाराची एकत्र येऊन होते; हरितशैवले व कांड शरीरिका असे दोन वर्ग यात समाविष्ट केले आहेत; पहा Chlorophyceae; Charophyceae; Algae; Thallophyta.

**chloroplast** हरितकणु; हरित लवक

हरितद्रव्य धारण करणारे वनस्पतींच्या कोशिकेतील एक कोशिकांगक (प्राकणु); पहा plastid.

**chlorosis** हरिताभाव

अन्नात लोहाभाव होऊन हिरवे द्रव्य न बनल्याने मूळच्या हिरव्या वनस्पतीस आलेला फिकटपणा; पहा etiolated.

**chondriosome** कलकणु

सूक्ष्मजंतू व निळी शैवले याखेरीज इतर वनस्पतींत आढळणारा आणि विशेषत्व पावलेला कोशिकेतील प्राकलातील सूक्ष्म कण; हा प्रथिन व मेद (चरबी) यांचा बनलेला असून अनेक वितंचके अशा कणांपासून निर्माण होतात.

**Choripetalae** पृथक्‌दली श्रेणी; कोरीपेटॅली

जुन्या वर्गीकरणपद्धतीप्रमाणे, फुलात दोन परिदलमंडले (संवर्त व पुष्पमुकुट) असून सुट्या पाकळ्या असलेल्या, परिदलाचे एक मंडल असलेल्या व परिदलांचा अभाव असलेल्या या सर्व द्विदलिकित फुलझाडांची एक श्रेणी; बेसींनी या श्रेणीला मुक्त प्रदली म्हटले आहे; इतरांनी (उदा. एंग्लर, हचिन्सन इ.) आद्यपरिदली उपवर्ग; पहा Dialypetalae; Monochlamydae; Sympetalae; Archichlamydeae.

**chromatid** रंगसूत्रार्ध

प्रकल-विभाजनात प्रत्येक रंगसूत्राच्या उभ्या (अन्वायाम) विभागणीने होणाऱ्या दोन भागांपैकी एक; मध्यावस्थेत ते एकमेकांपासून सुटे होऊन अंत्यावस्थेत कोशिकेच्या दोन टोकांकडे जातात; पहा mitosis; meiosis; chromosome.

**chromatin** रंगसूत्रद्रव्य; रंज्यद्रव्य

कृत्रिमरीत्या रंगवले असता ते अधिक शोषून घेणारा प्रकलातील विशिष्ट पदार्थ; पहा nucleo-protein.

**— granule** रंगसूत्रकणु

रंगद्रव्य शोषून घेणारे रंगसूत्रांतील मुख्य पदार्थाचे सूक्ष्मकण.

**chromomere** रंगसूत्रकण

प्रकल-विभाजनात पूर्वावस्थेत रंगसूत्राच्या संरचनेत दिसून येणारे त्याच्या अक्षावरील अनेक सूक्ष्मकण.

**chromonema (pl. chromonemata)** रंगसूत्र तंतु

रंगसूत्राच्या संरचनेत सर्पिल धाग्यांच्या वेटोळ्याच्या रुपात असणारे त्यांचे सर्व रंज्यद्रव्य.

**chromoplast** वर्णकणु; रंगीत लवक

वनस्पतींच्या कोशिकेतील हरितद्रव्याखेरीज इतर (नारिंगी, शेंदरी, लालसर, पिवळे) रंगद्रव्ये धारण करणारा सजीव सूक्ष्मकण (प्राकणु); पहा plastid; chloroplast.

**chromosome** रंगसूत्र; गुणसूत्र

काही अपवाद वगळल्यास, सर्व प्राण्यांत व वनस्पतीत, त्यांच्या शरीरातील लहानात लहान घटकात (कोशिकेत, पेशीत), विभागणीच्या वेळी त्यातील मुख्य (रंगद्रव्यशोषक) बिंदूपासून (प्रकलापासून) सुटा होणारा, वैशिष्ट्यपूर्ण, व आनुवंशिक गुणधारक, तंतूसारखा लहान उपघटक (कोशिकांगक). यांची संख्या, आकार व आकारमान प्रत्येक जातीत निश्चित असून त्या प्रत्येकावर अनेक सूक्ष्म कण (जनुक, जीन) असतात; त्या कणांद्वारे व्यक्तीची विशिष्ट लक्षणे

प्रजोत्पादक कोशिकाद्वारे एका पिढीतून दुसऱ्या पिढीत उतरतात. रंगसूत्रात प्रथिन व डीएनए (डी ऑक्सिरिबोज न्यूक्लीइक अम्ल) आणि फार कमी प्रमाणात आरएनए (रिबोन्यूक्लीइक अम्ल) हे रासायनिक पदार्थ असतात; आरएनए फार अधिक प्रमाणात कोशिकेतील परिकलात (जीवद्रव्यातील प्रकलाशिवाय इतर द्रव पदार्थात) असते. डीएनए द्वारे आनुवंशिक लक्षणांची माहिती वंशपरंपरा उतरते. आरएनए प्रथिन संश्लेषणाचे कार्य करते; ॲडेनीन, ग्वानीन, थायामीन व सायटोसीन ही जटिल रासायनिक संयुगे डीएनए मध्ये असून आरएनए मध्ये थायामीन शिवाय इतर संयुगे व युरेसील हे क्षारक असतात. रंगसूत्रांना गुणधारण करणारी म्हणून गुणसूत्रे असे कोणी म्हणतात; वास्तविक गुणांबद्दल जबाबदार अशी जटिल संरचनेची जनुके रंगसूत्रांत असून ती विशिष्ट रंगद्रव्ये अधिक प्रमाणात शोषून घेतात म्हणून त्यांना मूळ ग्रीक संज्ञेवरून घेतलेली रंगसूत्रे ही पारिभाषिक संज्ञा अधिक सार्थ दिसते. पहा ribosome; mitosis; meiosis; DNA; RNA.

**—, daughter** जन्य रंगसूत्र

मूळच्या एका रंगसूत्रापासून विभागणीमुळे बनलेल्या दोन्हींपैकी प्रत्येक रंगसूत्र; पहा chromatid.

**—, sex** लिंगसूत्र

कोशिकेतील रंगसूत्रांच्या संचातील ती धारण करणाऱ्या व्यक्तीच्या लिंगभेदाबद्दल जबाबदार असलेले रंगसूत्र; पहा X–chromosome; Y–chromosome

**— mapping** रंगसूत्र चित्रण

रंगसूत्र व रंगसूत्रातील भिन्न जनुकांच्या सापेक्ष स्थानांचे दिग्दर्शन करणारा आकृतिबंध.

**chromosomal aberration** रंगसूत्री विपथन

कोशिकेची विभागणी चालू असताना रंगसूत्रांच्या भिन्न प्रकारे होणाऱ्या संपर्कामुळे त्यांच्यातील जनुकांच्या मूळच्या सापक्ष संघटनेत घडून येणारा बदल.

**chrysanthine** पीतपुष्पी

पिवळी फुले असलेली; उदा. शेवंती (*Chrysanthemum indicun* L.)

**cilia** केसले

पहा cilium.

**ciliary** केसली

केसलामुळे घडून येणारी (हालचाल; उदा. काही शैवले, बीजुके, गंतुके, सूक्ष्मजंतू); पहा cilium.

**— movement** केसली चलन–वलन

एक किंवा अनेक केसलांमुळे होणारी हालचाल.

**ciliaris** केसलाभ

पापणीच्या केसाप्रमाणे किंवा आखुड केसाप्रमाणे.

**ciliated** सकेसल

केसल असलेले.

**—cell** सकेसल कोशिका

प्राकलाचे सूक्ष्म धागे केसाप्रमाणे कोशिकेबाहेर असलेली कोशिका; उदा. काही सूक्ष्मजंतू, काही शैवले, बीजुके, गंतुके, कवक, इ.

**cilium** केसल; पक्ष्माभिका

कोशिकाबाहेर आलेला प्राकलाचा फार लहान धागा (कोशिकांगक); पहा flagellum.

**cincinus (helicoid cyme)** वृश्चिकाभ वल्लरी

फुलोऱ्याच्या मुख्य अक्षाची वाढ फूल येऊन थांबल्यावर पुढे क्रमाने पण दोन्ही बाजूस (एकांतरित) नवीन उपाक्ष येऊन त्यांची तीच गत होते; यामुळे वास्तविक नागमोडीसारखा (सर्पगती) पण प्रत्यक्षतः विंचवाच्या नांगीप्रमाणे वाकडा दिसणारा फुलोरा; उदा. हेलिओट्रोपियम वंशाच्या जाती (भुरुंडी); पहा scorpioid cyme, cyme.

**circinate** अवसंवलित

टोकाकडून तळाकडे याप्रमाणे कळीमध्ये गुंडाळलेली पानाची अवस्था; उदा. नेफ्रोलेपिस नेचा; सायकसची दले. पहा ptyxis.

**circulation** अभिसरण

कोशिकेतील प्राकलाच्या सूक्ष्म प्रवाहाचे अनियमित चलन (वाहणे); उदा. ट्रॅडेस्कॅन्शियाच्या फुलातील केसरदलावरचे केस.

**circumnutation (revolving nutation)** प्रच्यवन; परिवर्धन

खोड, मूळ व तणावा यांच्या टोकांशी एकावेळी सर्व बाजूंनी सारखी वाढ न होता ती क्रमाने टोकाच्या सर्व बाजूस होण्याचा प्रकार; यामुळे ते टोक सरळ न वाढता जवळच्या आधाराभोवती गुंडाळते; वेली व तणावे यांना हे सोयिस्कर असते; आधार न मिळाल्यास ते अवयव हवेतच काहीवेळ वर्तुळाकार वाढतात.

**circumscessile (transverse) dehiscence** वृत्तीय स्फुटन

गोलसर फळाच्या भोवताली जाणाऱ्या मध्यरेषेवरहुकूम तडकण्याची प्रक्रिया; उदा. घोळ; कुरडू; निलगिरी इ.

**cirrhose apex** सूत्राग्र; प्रतानाग्र
तणाव्यासारखे (लांबट सुताप्रमाणे) टोक; उदा. केळीच्या पानाची सुरळी; कळलावीचे पान.

**citation** उल्लेख; अवतरण
कुल, वंश, जाती इ. च्या नावापुढे ज्याने प्रथम प्रसिद्धी दिली त्याचा संक्षिप्त नामनिर्देश, उदा. *Pinus longifolia* Roxb. (चीड)

**citreus** पीत
लिंबासारखे पिवळे.

**citric acid** सायट्रिक अम्ल
लिंबाच्या फळांत विशेषेकरून आढळणारे अम्ल

**Citrus (citron)** लिंबू वंश
कागदी लिंबू, पपनस, संत्रा, मुसुंब, महाळुंग, ईडलिंबू इत्यादी वनस्पतींचा गट (वंश).

**cladode (cladophyll)** पर्णक्षोड
एकाच कांडाची, हिरव्या पानासारखी दिसणारी, छदाच्या किंवा लवकर पडून जाणाऱ्या पानाच्या बगलेत वाढणारी आणि पानाचे कार्य करणारी फांदी. उदा. शतावरी, रस्कस, इ.

**class** वर्ग
श्रेणी, गण, कुले, वंश व जाती ह्या वर्गीकरणातील भिन्न दर्जाच्या एककांचा समावेश होतो अशी विशिष्ट अर्थाने वापरलेली गटवाचक संज्ञा; विभाग व उपविभाग या वरच्या दर्जाच्या गटात एक किंवा अनेक वर्गांचा समावेश करतात.

**Classification (Taxonomy)** वर्गीकरण
सर्व सजीवांतील वरवरचे आणि विशेषत: खोलवर आढळलेले साम्य व त्यावरून निश्चित केलेले आप्तभाव लक्षात घेऊन, विशिष्ट तात्त्विक बैठकीवर आधारलेले त्यांचे भिन्न दर्जाचे लहानमोठे नैसर्गिक गट करून योजनापूर्वक सर्वांचा समावेश होईल अशी व्यवस्था असलेली पद्धती (साचा), अथवा यासंबंधीच्या माहितीची शाखा (वर्गीकरणविज्ञान). वरवर सहज दिसणाऱ्या एकदोन लक्षणांवरून वर्गीकरण करण्याच्या कृत्रिम पद्धतीही आहेत; उदा. औषधी वनस्पती; इमारती लाकडाच्या वनस्पती; रंगद्रव्य पुरवणाऱ्या वनस्पती इ. पहा Taxonomy.

**—, natural system of** नैसर्गिक वर्गीकरणपद्धति
सर्व वनस्पती (अथवा प्राणी) एकमेकांचे कमीजास्त जवळचे अथवा दूरचे आप्तसंबंधी आहेत व त्या सर्वांना समान पूर्वजांची परंपरा आहे असे मानून केलेले त्यांचे वर्गीकरण; यातील कोणत्याही एका गटांतील व्यक्तींत दुसऱ्या गटातील व्यक्तींपेक्षा अधिक साम्ये असून त्या दोन गटांतील व्यक्तींत कमी साम्ये (अथवा अधिक फरक) असतात. बेंथॅम–हूकर, एंग्लर–प्रँटल, बेसी, हचिन्सन इ. यांच्या अशा पद्धती हल्ली वापरतात.

**clavate (club-shaped)** गदाकृति
गदेप्रमाणे (खाली निमुळते व टोकाकडे रुंदावत गेलेले) असलेले; उदा. गदाकवक वनस्पतींतील बीजुककोश; शेवाळींपैकी काहींच्या रेतुकाशयाप्रमाणे; उदा. मार्चीशिया.

**claw** नखर; वृंतक
संदलाच्या किंवा पाकळीच्या खालचा देठासारखा बारीक व रुंद भाग; वरच्या रुंद भागास पाते म्हणतात. उदा. डायांथस (पिंक); काही वनस्पतींच्या दलांचे (तणाव्यांचे) आकड्यासारख्या (नखासारख्या) अवयवात झालेले रूपांतर; उदा. वाघनखी वेल. (*Bignonia gracilis* Lodd.)

**cleavage (segmentation)** पाटन; भंजन
रंदुकाच्या पुनःपुनः होणाऱ्या विभागणीत प्रकल विभाजनानंतर होणारी प्राकलाची विभागणी.

**cleft** खंडित
साधारण मध्यापर्यंत विभागलेले; उदा. पान.

**cleistogamous flower** मुग्धपुष्प
बंदफूल; बंद राहूनही स्वपरागकण व स्वफलन होणारे लहान फूल. उदा. पॅन्सी; तेरडा; कंचट कुलातील काही जाती; काही आमरे; इ.

**cleistogamy** मुग्धयुति
वर वर्णन केलेल्या प्रकारचे प्रजोत्पादन.

**cleistothecium** युक्त धानीफल
धानीकवकात आढळणारा व धानीबीजुकनिर्मिती करणारा आणि कुजून फुटेपर्यंत बंद राहणारा प्रजोत्पादक अवयव.

**climate** जलवायुमान
थंडी, उष्णतामान, ओलावा, पाऊस इत्यादी वातावरणसंबंधी परिस्थिती.

**climax stage** चरमावस्था.
बदलत्या नैसर्गिक वनश्रीची अंतिम अवस्था; ही परिस्थितिसापेक्ष असते.

**climber** आरोहिणी
आपल्या नाजूक खोडामुळे स्वतंत्रपणे सरळ न वाढता तणावे, आकडे, मुळे इत्यादी अवयवांच्या आधारे

वर चढत जाणारी वेल; उदा. काकडी, मोरवेल, कृष्णकमळ इ.

**climbing root** आरोही मूळ

वर चढत जाण्यास उपयुक्त असे वायवी मूळ; उदा. नागवेल; अंजनवेल; इ.

**clinostat** नतिनियंत्रक; क्लीनोस्टॅट

वनस्पतींच्या अवयवांच्या वाढीवर गुरुत्वाकर्षणाचा होणारा परिणाम नाहीसा करून त्याची वाढ दर्शविणारे उपकरण.

**clockwise (dextral, right-handed)** सव्य; दक्षिणावर्त

उजवी; घड्याळाच्या काट्यांच्या नित्य दिशेने होणाऱ्या हालचाली प्रमाणे; उदा. काही वेलींचे आधाराभोवती वेढणे; तिचा शेंडा उजवीकडून डावीकडे वर्तुळ घेतो; उदा. गुळवेल, गारवेल, पोपटवेल, इ. पहा sinistral, anti-clockwise.

**clone** कृत्तक

एकाच वनस्पतीपासून शाकीय पद्धतीने अथवा असंग जननाने निर्माण झालेल्या संततीचा परंपरागत समूह; उदा. केळ, कर्दळ, अळू, आले, हळकुंड इत्यादींचे वनस्पतिसमूह. पहा apomixis.

**closed bundle** अवर्धी वृंद

वाढीस जबाबदार असलेल्या ( ऊतककर ) कोशिकांच्या अभावामुळे नवीन वाढ न होणारा वाहक घटकांचा (वाहिकांचा व वाहिन्यांचा) संच; पहा vascular bundle; open bundle; cambium.

**Club-fungus** गदाकवक

गदेप्रमाणे बीजुककोश असलेले कवक. पहा Basidiomycetes.

**Club-mosses** मुद्गल-शेवाळी

पहा Lycopodinae.

**coagulate** क्लथन; साखळणे.

घन व विरल ( द्रव ) भाग निराळे होणे.

**coalescence** संमीलन

प्रथमपासून एकमेकास जुळून वाढण्याची प्रक्रिया. उदा. फुलातील भिन्न दले; पहा cohesion.

**coastal** समुद्रतटीय

समुद्र किनाऱ्यावरचे; समुद्रकाठी असलेले.

**coat** ( १ ) आवरण; आच्छादन; ( २ ) लेपन

( १ ) वनस्पतींच्या अवयवांचे ( फळ, बीज, पराग, बीजुक, इ. ) आवरण. (२) क्यूटिन, मेण यासारख्या पदार्थांच्या आवरणाला लेपन ही संज्ञा अधिक अर्थपूर्ण आहे.

**coated (tunicated)** आवृत

आवरण असलेले; उदा. कंद; बीज. पहा tunicated bulb.

**cob** स्थूलाक्ष

गोलाकार, दंडाकृति ( चितीय ) व फुगीर अक्ष; उदा. मक्याच्या कणसातील कणिशकांच्या अनेक रांगा असलेला जाडजूड भाग. पहा spikelet.

**coccineus** शेंदरी; सिंदूरवर्णी

उदा. पेंडगूळ ( *Ixora coccinea* L. )

**coccus** ( १ ) गोलाणु; ( २ ) कुडी

( १ ) सूक्ष्मजंतूंपैकी वाटोळ्या आकाराचे जंतू; उदा. प्रमेह जंतू.

( २ ) विशिष्ट पालिभेदी ( फुटून तुकडे होणाऱ्या ) फळाचा एकबीजी भाग ( फलांश ); उदा. एरंड; पहा schizocarpic fruit.

**co-dominance** सहप्रभाविता

एखाद्या वनस्पति-संगतीत दोन किंवा अधिक प्रभावी वनस्पतींपैकी एकाचा विशेष प्रभाव ( प्रभावीपणा ).

**co-dominant** सहप्रभावी

वर वर्णिलेल्याप्रमाणे संगतीतील एक व्यक्ती.

**coenanthium** स्थालीकल्प

थाळीसारख्या ( चकतीसारख्या ) जाड पुष्पासनाच्या पृष्ठभागात अंशतः रुतलेल्या फुलांचा समूह; अकुंठित पुष्पबंधाचा ( फुलोऱ्याचा ) एक प्रकार; उदा. डॉर्स्टेनिया.

**coenocyte** बहुप्रकल कोशिका

प्राकलात अनेक प्रकले विखुरलेली कोशिका; उदा. व्हाउचेरिया शैवल; म्यूकर बुरशी; चिकाळ कोशिका.

**coenogamete** बहुप्रकल गंतुक

अनेक प्रकले असलेली प्रजोत्पादक कोशिका; उदा. म्यूकर बुरशी.

**co-enzyme** सहवितंचक

आंबणे, फसफसणे यासारख्या वितंचनाच्या ( रासायनिक बदलाच्या ) प्रक्रिया चालू राहण्यास मुख्य वितंचकाशिवाय ( कार्बनी निदेशकाशिवाय ) जरूर ते दुसरे द्रव्य ( निदेशक ); हे अलग करून प्रक्रिया थांबविता येते व पुन्हा मिसळून ती सुरू करता येते. उदा. यीस्ट ( किण्व ) मधील वितंचकाची क्रिया

फॉस्फेटवर अवलंबून असते; प्राण्यांच्या यकृतातील लायपेज या वितंचकाची क्रिया पित्तातील लवणाशिवाय बंद राहते; पहा enzyme; lipase.

**cohesion** संसंग

पहा coalescence.

**coherent** संसक्त

पूर्ण संपर्क असलेले, पण जुळून एकरूप नसलेले ( सारखे अवयव ); पहा connate.

**cohort** गोत्र

अनेक निकटवर्ती गणांचा गट; श्रेणीपेक्षा लहान असे वर्गीकरणातील एकक.

**colchicine** कॉल्चिसाइन

एक वनस्पतिजन्य ( *Colchicum autumnale* ) क्षाराभ द्रव्य; रंगसूत्रांची संख्या वाढविण्याकरिता याचा उपयोग केला जातो; पहा ploidy.

**coleoptile** आदिकोरकवेष्ट

बहुतेक सर्व गवतांचे बी रुजतांना प्रथम फुटणारे अंकुराचे ( आदिकोरकाचे ) संरक्षक आवरण; पहा plumule.

**coleorhiza** आदिमूलवेष्ट

बहुतेक गवतांचे बीज रुजून मोड ( पहिले मूळ ) येत असता प्रथम फुटणारे संरक्षक आवरण; हा गर्भाचा एक भाग असतो.

**collateral** संलग्न

एखाद्या संरचनेतील भाग परस्परास चिकटून किंवा परस्पराजवळ असण्याचा प्रकार.

**— vascular bundle** संलग्न वाहक वृंद

प्रकाष्ठ व परिकाष्ठ परस्परालगत ( एका त्रिज्येवर ) असलेला वाहक कार्य करणारा ऊतक संच.

**collecting cells** संग्राहक कोशिका

पानातील वरच्या पृष्ठभागाखाली असणाऱ्या ( व स्कंभोतकाखाली ) हरितद्रव्यहीन, भरपूर प्राकलयुक्त व फुगीर तळाच्या कोशिका; शर्करायुक्त अन्न वरच्या कोशिकांतून घेऊन ते वाहकवृंदामार्फत देठ व खोडाकडे पाठविण्याचे कार्य या कोशिका करतात; पहा palisade tissue.

**collective fruit ( composite fruit )** संयुक्तफळ

अनेक फुले असलेल्या फुलोऱ्यापासून बनलेले एकच फळ; तुतू, फणस, अननस, अंजीर इ.

**collenchyma** स्थूलकोनोतक; स्थूलकोनोति

विशेषेकरून कोनांमध्ये अधिक जाड व कठीण तूलीरमय आवरण असलेल्या बहुधा लांब कोशिकांचा समूह (ऊतक); हा वनस्पतींच्या वाढत असलेल्या भागांतच (मुळाशिवाय इतर) आढळतो व त्याचे कार्य संरक्षणाचे असते.

**colletor** श्लेष्मग्रंथि

काही फुलझाडांच्या कळ्यांवरील, चिकट पदार्थ स्रवणारा केस.

**colloid** कलिल; श्लेष्माभ

डिंक- गोंदासारखा चिकट पदार्थ; हा पूर्णपणे पाण्यात न विरघळणारा असून याचे सूक्ष्म कण पाण्यात मिसळून तरंगत (निलंबित) राहणारे असतात; सर्व सजीवांतील जीवनरस (प्राकल) याच स्वरूपात असतो.

**colloidal** कलिलवृत्ति; कलिलाभ

**colonisation** वसन

अनेकांनी एकत्र कायम चिकटून वाढणे किंवा राहणे.

**colony ( coenobium )** समूह; वस्ति; निवह

अनेक शरीरघटक, स्वतंत्र कोशिका, व्यक्ती इत्यादींचा संच; उदा. नैसर्गिकरीत्या सहज एकत्र वाढलेल्या वनस्पतींचा किंवा प्राण्यांचा संच; व्हॉल्व्हॉक्स, पँडोरीना, या वनस्पती, म्हणजे अनेक सारख्या एककोशिक घटकांचा संच. एककोशिक सजीवांनी क्रमविकासात बहुकोशिकावस्थेत येण्यास घेतलेला पहिला टप्पा. श्लेष्मल आवरणात कित्येक एककोशिक वनस्पती गुरफटून राहतात (काही नीलहरित शैवले व काही सूक्ष्मजंतू).

**columella** कील

(१) शेवाळींच्या बीजुकाशयातील मध्यवर्ती गाभा.

(२) काही कवकांच्या बीजुककोशातील मधला वंध्य भाग; उदा. म्यूकर.

(३) किंजदलांना आधारभूत असा फुलातील अक्ष; उदा. चामर कुल; भांड कुल.

(४) काही नेचांमध्ये आढळणारा बीजुककोशधारी दांडा; उदा. ग्रायकोमॅनिस नेचा.

**column** स्तंभ

फक्त केसरदले एकत्र जुळून बनलेली किंवा केसरदले, किंजल व किंजल्क जुळून एकरूप बनलेली संरचना.

**columnar** स्तंभी; स्तंभाकार

स्तंभ असलेले; स्तंभासारखे.

**coma** गुच्छ

(१) काही बियांच्या टोकास असलेला केसांचा तुरा किंवा झुबका; उदा. रुई, कुडा, इ.

(२) अननसाच्या फळाच्या टोकावरील छदांचा झुबका; ताल वृक्षांच्या खोडाच्या टोकावरील पानांचा झुबका.

**comate** गुच्छल

तुरेवाला; झुबकेदार (अवयव).

**Combretaceae** अर्जुनकुल; कॉम्ब्रेटेसी

अर्जुनसादडा, हिरडा, बेहडा, ऐन, किंजळ, धावडा, लाल चमेली, घायटी इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; याचा अंतर्भाव जंबुल गणात ( मिर्टेलीझमध्ये ) करण्याबद्दल एकमत आढळते. प्रमुख लक्षणे ( काहीशी मिर्टेसी अथवा जंबुल कुलाप्रमाणे ) : वृक्ष, क्षुपे व वेली; साधी पाने; क्वचित एकलिंगी, बहुधा द्विलिंगी, पंचभागी, नियमित पण क्वचित अपूर्ण; अधःस्थ किंजपुटात, एक कप्पा व दोन किंवा अधिक बीजके. फळ अश्मगर्भी किंवा शुष्क व सपक्ष.

**Commelinaceae** कंचट कुल; कॉमेलिनेसी

कंचट ( कोशपुष्प ), केना, कानवला इत्यादी एकदलिकित लहान ओषधीय वनस्पतींचे कुल; याचा समावेश एंग्लर व प्रँटल यांनी फॅरिनोजीमध्ये (गणात) व बेंथॅम व हूकर यांनी कॉरोनेरी या श्रेणीत केला असून हचिन्सन यांनी कॉमेलिनेलीझमध्ये (कंचट गणात) केला आहे. प्रमुख लक्षणे: संधियुक्त खोड व एकाआड एक पानांच्या लहान वनस्पती; पानांचा तळ खोडास वेढणारा; फुले बहुधा नियमित व द्विलिंगी; फुलोरा वृश्चिकाभ; संदले व क्वचित जुळलेली प्रदले प्रत्येकी पाच; केसरदलांची प्रत्येकी पाचांची दोन मंडले; कधी वंध्य केसरदले व कधी काहींचा अभाव; ऊर्ध्वस्थ किंजपुटांत २–३ कप्पे व अक्षवर्ती, २–३ सरळ बीजके; बोंडात सपुष्क बिया व त्या कधी अध्यावरणयुक्त; पहा Liliales, Liliaceae.

**commensal** सहभोजी

परस्परांच्या अन्नासंबंधीच्या फायद्याकरिता एकत्र जीवन कंठणारे दोन सजीव; उदा. दगडफूल; पहा Lichen.

**commensalism** सहभोजिता

अन्नविषयक फायद्याकरिता दोन सजीव एकत्र राहण्याचा प्रकार; उदा. शैवाक; पहा Lichen.

**common** सामान्य; सामायिक; समान

सहज नित्य आढळणारे; दोन्हींना किंवा अनेकांना उपयुक्त.

**— bundle** समाइक वृंद; समानवृंद

खोड व पान या दोन्हींत उपयुक्त असा वाहक संच.

**— petiole** समाईक ( सामायिक ) वृंत; समान वृंत

संयुक्त पानाचा प्राथमिक व प्रमुख देठ; त्यावरील सर्व दलांना हा सारखाच उपयुक्त ठरतो.

**communis** संहतजीवी

जमाव ( समूह ) करून राहणारी ( वनस्पती); उदा. एरंड ( *Riccinus communis* L. )

**community** समुदाय

कमीजास्त प्रमाणात सारख्याच परिस्थितीत एकत्र वाढत असलेल्या अनेक वनस्पतींचा समूह.

**comose** शिखालु

पहा comate; केसांचा झुबका असलेले.

**compact** व्यूढ; घट्ट; संहत

एकत्र बळकट केलेले ( असलेले ); उदा. कोशिकासमूह.

**companion cell** सहचरी कोशिका

विशिष्ट कोशिकेशी आरंभापासून सतत संबंध असणारी कोशिका. परिकाष्ठातील चाळणी असलेल्या नलिकेबरोबर नेहमी ( बहुधा ) आढळणारी साधी कोशिका. पहा phloem.

**competition** स्पर्धा; चुरस

सामुदायिक जीवनात, समान परिस्थितीत असलेल्या सजीवांत, जीवनकलहामुळे आलेला संबंध व त्यातून एकमेकांवर विजय मिळविण्याकरिता झालेली प्रक्रिया ( केलेली धडपड ).

**complementary ( compliment )** पूरक

अभाव भरून काढणारा; उदा. घटक, रंगद्रव्य इ.

**— cells** पूरक कोशिका

त्वक्षाकरापासून बाहेरच्या बाजूस तयार होणाऱ्या ऊतकांमध्ये वल्करंध्राचे ठिकाणी असलेल्या मोकळ्या, पातळ आवरणाच्या व भरपूर हवा खेळविणाऱ्या कोशिका.

**— factor** पूरक घटक ( कारक )

संततीतील काही लक्षणांबद्दल ( उदा. रंग ) संयुक्तपणे जबाबदार असलेले ( व आईबापापासून आलेले ) दोन घटक; यांच्या अन्योन्य विक्रियेमुळे नवीन गुण ( भेद ) आलेले दिसतात.

**complete flower** पूर्णपुष्प

परंपरेने निश्चित केल्याप्रमाणे चार पुष्पदलांची मंडले असलेले फूल; उदा. धोत्रा, वांगे, टाकळा इ.

**complex** जटिल; संमिश्र; व्यूह
गुंतागुंत असलेली ( संरचना, विक्रिया, प्रक्रिया इ. ).

**Compositae ( Asteraceae )** सूर्यफूल कुल; कंपॉझिटी; ॲस्टरेसी
माका, सूर्यफूल, झेंडू, शेवंती, एकदांडी, सहदेवी, कुसुंबा (करडई), कारळा (कोरटे), डेझी, झिनिया, डेलिया इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे मोठे कुल. या कुलाचा अंतर्भाव बेंथॅम व हूकर यांनी ॲस्टरेलीझ या गणात, एंग्लर व प्रँटल यांनी घंटापुष्प गणात (कँपॅन्यूलेटीमध्ये) हचिन्सन व बेसींनी ॲस्टर गणात (ॲस्टरेलीझ) केलेला आढळतो. आधुनिक वर्गीकरणान्वये या कुलाला "ॲस्टरेसी" म्हणतात. मिकॅल्मस डेझी ( ॲस्टर ॲमेलस) यावरून कुल व गण यांना वरील नावे पडली आहेत. या कुलाची प्रमुख लक्षणे : बहुतेक ओषधी व झुडपे; एकांतरित, क्वचित संमुख, साधी पाने; स्तबक फुलोरा व त्याखाली छदमंडल; फुले पंचभागी, अरसमात्र किंवा एकसमात्र; संवर्त रूपांतरित किंवा ऱ्हास पावलेला; पाच जुळलेल्या पाकळ्यांचा पुष्पमुकुट ( जिव्हिकाकृती किंवा नलिकाकृती ); केसरदले सुटी परंतु परागकोश जुळलेले; दोन किंजदलांच्या अधःस्थ किंजपुटात एक कप्पा व एक बीजक; शुष्क संकृत्स्न फळ. या कुलात अनेक उपकुले समाविष्ट आहेत. स्तबकातील काही फुले वंध्य व इतर जननक्षम व पूर्ण असून कधी सर्वच पूर्ण असली तरी काहींत स्त्री–पुष्पके व पुं–पुष्पके भिन्न असतात.

**composite ( compound ) fruit** संयुक्त फळ
पहा collective fruit, multiple fruit.

**compost** मिश्रखत
अनेक मृत, कार्बनी व कुजकट पदार्थांचे बनविलेले मिश्रण.

**compound** संयुक्त
अनेक साध्या व सारख्या भागांचा बनलेला (अवयव).

**— leaf** संयुक्त पर्ण
अनेक लहान दले एका प्रमुख देठावर किंवा मध्यशिरेवर असलेले पान; कधी ही दलेही पुन्हा विभागलेली असतात. उदा. निंब, संकेश्वर, शेवगा इ.

**—pistil** संयुक्त किंजमंडल ( किंज ).
अनेक किंजदलांच्या संयोगाने बनलेले किंजमंडल;

**—raceme** संयुक्त मंजिरी
एका प्रमुख ( फुलोऱ्याच्या ) अक्षावर अनेक लहान मंजिऱ्या ( मंजिऱ्यांचे उपाक्ष ) असण्याचा प्रकार; उदा. कडुनिंब; पहा raceme.

**—spadix** संयुक्त स्थूलकणिश
अनेक जाडजूड अक्षाची कणिशे ( फुलोरे ) असलेला फुलोरा; उदा. नारळ; पहा spadix.

**—spike** संयुक्त कणिश
अनेक लहान कणिशे ( फुलोरे ) असलेला अक्ष; उदा. गवते, माठ, राजगिरा, इ.

**—stem** संयुक्त क्षोड
अनेक शाखा असलेले खोड.

**—umbel** संयुक्त चामरकल्प
एका प्रमुख अक्षावर एकाच स्थानावरुन अनेक चवरी-सारखे फुलोरे निघण्याचा प्रकार; उदा. गाजर.

**compressed** संपीडित; संदम्न
एकत्र दाबलेला; दाबामुळे सपाट झालेला ( अवयव ).

**concave** अंतर्वक्र
खोलगट; मध्ये खोल असलेला; बशीसारखा; उदा. गुलाबफुलाच्या पाकळ्या.

**concentrated** संहत
एकाद्या पदार्थाची जास्तीत जास्त प्रमाणात एकत्र असण्याची स्थिती.

**concentric** एकमध्य; समकेंद्री
एकाच केंद्राभोवती असलेली ( काष्ठवलये, वाहक वृंदातील प्रकाष्ठ व परिकाष्ठ, शल्कपर्णे; तौकीरकण, इ. ).

**conceptacle** कुहर
प्रजोत्पादक अवयवांनी भरलेली व बाहेरच्या बाजूस भोक असलेली पृष्ठभागाजवळची पिशवीसारखी पोकळी; उदा. फ्यूकस व पेल्वेशिया ( शैवले ).

**concinnus** नेटका; सुरेख
उदा. शिकेकाई ( *Acacia concina* DC. )

**conducting ( vascular ) bundle** वाहक वृंद
वनस्पतीतील द्रव पदार्थांची ने–आण करणाऱ्या ऊतकांचा संच; पहा xylem; phloem.

**conducting tissue** वाहक ऊतक
वर वर्णन केल्याप्रमाणे कार्य करणाऱ्या कोशिका किंवा तत्सम घटकांचा समूह.

**conduction** संवहन; वहन
शोषण होते तेथून इतरत्र अथवा पदार्थ बनतो तेथून अन्यत्र स्थलांतराची प्रक्रिया; संचित स्थानांतून ( मूळ, बीज, खोड, इ. ) वापरले जाते तेथे अन्न वा पाणी नेण्याची क्रिया.

**conduplication ( conduplicate )** संमीलित
मध्याशिरेवर उभी घडी पडून दुमडलेले; (उदा. पान); पर्णवलनाचा एक प्रकार; पहा ptyxis.

**cone ( strobilus)** शंकु
खाली रुंद व टोकाकडे निमुळते होत गेलेला, खवल्यासारखी पाने व त्यांवर किंवा त्याखाली प्रजोत्पादक अवयव, बहुधा एकाआड एक धारण करणारा अवयव; उदा. सिलाजिनेला, लायकोपोडियम, सायकस, पाइन ( चीड ), इ.

**—, bisporangiate** उभयबीजुककोशिक शंकु
लघु- व गुरु- बीजुककोश असलेला शंकू; उदा. सिलाजिनेला.

**—, female** स्त्री-शंकु
फक्त गुरुबीजुकपर्णे असलेला शंकू; उदा. पाइन.

**—, male** पुं-शंकु
फक्त लघुबीजुकपर्णे असलेला शंकू; उदा. पाइन, सायकस, इ.

**—, monosporangiate** एकबीजुककोशिक शंकु
एकाच प्रकारचे बीजुककोश असलेला शंकू; उदा. लायकोपोडियम.

**—, pistillate** स्त्री-शंकु; किंज-शंकु

**—, staminate** पुं-शंकु; केसर-शंकु

**conical** शंकाकृति; शंकूसारखे

**congener** समवांशिक
त्याच वंशातील दुसरी ( वनस्पती किंवा प्राणी ).

**congeneric** समवंश
त्याच ( एकाच ) वंशातील ( जाती ); उदा. वड, पिंपळ, उंबर, अंजीर, इ.; किंवा जास्वंद, भेंडी, अंबाडी, रानभेंडी, बेलपटा, वनकपास, इ.

**congenital** उपजत; जन्मजात
जन्मापासून आढळलेले ( लक्षण; भेद ); नंतर संपादन न केलेले; उदा. फुलांचा सुवास, रंग; फळांचा रंग, संरचना; पानांचा आकार, इ.

**conidiophore** विबीजुकदंड
विशेष प्रकारची बीजुके निर्माण करून टाकणारा लहान दांड्यासारखा भाग.

**conidiosporangium** विबीजुककोश
वर सांगितलेल्या पद्धतीने प्रथम बनलेला बहिर्भव बीजुककोश; हा रुजून त्यातून बीजुके ( उदा. पिथियम; द्राक्षावरची तंतुभुरी; आल्बुगो नांवाचा पोकळ्यावरचा पांढरा ठिपका; इ. ) बाहेर पडून ती नवीन कवक तंतू बनवितात.

**conidium** विबीजुक
कवकतंतूच्या टोकाशी आडव्या पडद्यांनी सुटी होऊन नंतर पडणारी ( बहिर्भव, बहिर्जात ) प्रजोत्पादक कोशिका; एकामागून एक अशा अनेक कोशिका निर्माण होतात तेव्हा त्यांची एक साखळी किंवा रांग दिसते; उदा. पेनिसिलियम, अरगट, ॲस्पर्जिलस इत्यादी बुरशीचे प्रकार; काही गदाकवक (उस्टिलॅगो); मक्यावरची काणी.

**conifer** शंकुमंत; शंकुधारी
शंकूसारखा फुलोरा असलेली वनस्पती; उदा. चीड; सुरू, जुनिपर, चिनार, फर. यांना 'सूचिपर्ण वृक्ष' असेही म्हणतात; पहा cone.

**Coniferae** शंकुमंत वर्ग; कॉनिफेरी
प्रकटबीज वनस्पतींपैकी शंकुधारी वनस्पतींचा वर्ग; काहींनी हा उपवर्ग मानला तर काहींनी गण ( कॉनिफेरेलीझ ) मानला आहे. या गटातील काही विलुप्त (निर्वंश) व प्राचीन तर काही विद्यमान वनस्पतींची कुले असून एकंदरीने त्यांची लक्षणे प्रारंभिक आहेत; काहींच्या मते त्यांच्यापैकीच काही प्राचीन पूर्वजांपासून फुलझाडे ( आवृतबीज वनस्पती ) अवतरली असावी. वर उल्लेख केलेल्या शंकुधारी वनस्पतीशिवाय यू ( बिर्मी ), लार्च, देवदार, थुजा, स्प्रूस इत्यादींचा यात समावेश होतो. हे बहुतेक सर्व उंच, सदापर्णी व मोठे वृक्ष असून समशीतोष्ण व थंड हवेत त्यांची जंगले आहेत. कित्येकांची पाने सुईसारखी, खवल्यासारखी अथवा रेषाकृती व काहीशी रुंद असतात. बहुधा दोन प्रकारचे (लघुबीजुकपर्णे व गुरुबीजुकपर्णे असणारे; यानांच कोणी अनुक्रमे केसर -पुं-शंकू आणि किंज-स्त्री-शंकू म्हणतात) शंकू एकाच झाडावर, क्वचित भिन्न झाडांवर येतात. शंकू हा काहींच्या मते फुलोरा व काहींच्या मते फूल याशी तुल्य आहे; त्यामुळे व फुलातील केसरदले व किंजदले यांचे कार्य करणारे अवयव त्यात असल्याने लिंगवाचक विशेषणे वापरतात. फुलातील किंजदलाप्रमाणे या शंकूपासून खरी फळे बनत नाहीत; मात्र बीजे किंजदलासारख्या खवल्यावर येतात. यांची काही लक्षणे नेचाभ पादपाप्रमाणे असतात; चरगंतुकांचा अभाव पण कधी अंदुककलशांचे अस्तित्व आढळते. तसेच बीजुकधारी पिढी प्रमुख पण अत्यंत ऱ्हसित गंतुकधारी पिढी

आढळते. पायनेसी, टॅक्सोडिएसी, क्युप्रेसेसी, ॲरॉकॅरिएसी, पोडोकार्पेसी व टॅक्सेसी अशी सहा कुले या गणात घातली जातात; काहींनी टॅक्सेसीचा समावेश टॅक्सेलीझ या स्वतंत्र गणात केला आहे; पहा Gymnospermae.

**conjoint** संयुक्त
जुळलेली किंवा जुळून बनलेले.

**— (vascular) bundle** संयुक्त वाहक वृंद
प्रकाष्ठ व परिकाष्ठ या दोन्हींचा मिळून बनलेला वाहक ऊतकांचा गट (जुडगा).

**conjugate** संयोग होणे
दोन प्रजोत्पादक कोशिका एकरूप होणे; उदा. शैवलातील गंतुके.

**conjugation** संयोग; संयुग्मन
दोन प्रजोत्पादक सजीव घटकांचे (क्वचित एककोशिक वनस्पतींचे) एकत्रीकरण होऊन नवीन सुप्तशक्तियुक्त कोशिका बनणे (गंतुबीजुक, रंदुक).

**— tube** संयोग नलिका; संयुग्मन नलिका
दोन सारख्या प्रजोत्पादक कोशिकांतील प्राकल एकत्र येण्यास दोन भिन्न (क्वचित एका तंतूमधील दोन कोशिका) तंतूंना जोडणारी नळी; उदा. स्पायरोगायरा, झायग्निमा. इ. हरितशैवले.

**—, lateral** पार्श्व संयोग
एकाच तंतूच्या एका कोशिकेतून बाजूच्या दुसऱ्या कोशिकेत होणारे प्राकल (गंतुक) – मिश्रण; उदा. काही हरितशैवले.

**— scalariform** श्रेणिरूप संयाग
दोन शैवलतंतूंच्या समोरासमोरच्या कोशिकांमध्ये नलिकेद्वारे घडून येणारा संयोग व त्यामुळे शिडीप्रमाणे दिसणारा प्रकार; उदा. स्पायरोगायरा.

**conjunctive** संयोजी
जोडण्यास उपयुक्त; जोडणारे; जोडून असणारे.

**— symbiosis** संयोजी सहजीवन
परस्परांशी कायमपणे जोडून राहून चालविलेले एकत्र जीवन; उदा. अमरवेल व मेंदी (डुरांटा, कडबी, इ.) यांचे जीवन; मनुष्य व त्याच्या पोटातील कृमी; अपिवनस्पती; इ.

**— tissue** संयोजी ऊतक
खोडाचे मध्यभागी वाहक वृंदांचे आजुबाजूस असलेले सामान्य साधे ऊतक (तल्पोतक); पहा ground-tissue.

**Connaraceae** सुंदर कुल; कॉनॅरेसी
सुंदर, रौरिया, नेस्टिस इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे लहान कुल; याचा समावेश गुलाब गणात (रोझेलीझमध्ये) करतात. प्रमुख लक्षणांत शिंबावंत गणाशी (लेग्युमिनोजीशी) या कुलाचे साम्य आढळते.

**connate** संजात
एकत्र वाढलेले; सुरवातीस किंवा वाढ होत असताना पूर्ण जुळलेले सारखे भाग; उदा. लोनिसेराच्या दोन संमुख पानांचे तळ.

**connecting cell (heterocyst)** असमकोष्ठ
तंतूच्या दोन भागांना जोडणारी मध्य कोशिका; उदा. नीलहरित शैवलांपैकी नॉस्टॉक.

**— link** जोडणारा दुवा
दोन लहानमोठ्या गटांचा संबंध दर्शविणारा एक स्वतंत्र गट अथवा व्यक्ती. उदा. काहींच्या मते कोंबळ कुल (नीटेसी) फुलझाडे व प्रकटबीज वनस्पती या दोन गटांना जोडणारा (त्यांचा पारंपरिक संबंध दर्शविणारा) लहान गट असावा.

**connective (of anther)** संधानी
दोन परागकोशांना जोडणारा व तंतूपासून भिन्न असा भाग.

**— tissue** संयोगी ऊतक (ऊति)
दोन भाग जोडणारा कोशिकांचा समूह.

**consanguineous** सहोद्भवी
एकाच रक्ताचे; एकाच आईबापापासून जन्मलेले; सामान्य (समान) पूर्वजांपासून अवतरलेले.

**consociation** संघात
अनेक प्रधान वनस्पतींची विशिष्ट संगती (साहचर्य) दर्शविणाऱ्या वनस्पतींच्या समुदायात कधी कधी प्रत्येक प्रधान व्यक्तीने (इतर गौण व्यक्तीबरोबर) बनविलेले लहान उपसमूह (समुदाय); उदा. पळस-पांगारा-सावर यांच्या संगतीत, पळस-संघात, पांगारा-संघात, सावर-संघात असे उपसमुदाय दृष्टीस पडतात; संघात हा संगतीचा भाग मानतात. पहा association; community, society.

**constricted** संकुचित
आकसलेले (खोड किंवा मूळ); उदा. घायपाताच्या काही जातींच्या पानांचा तळभाग.

**constitutive enzyme** घटक वितंचक
अनुकूली वितंचकाविरुद्ध प्रकारचे कार्बनी निदेशक; हे सदैव उपस्थित असतात.

**continuity of life** जीवसातत्य

पूर्वज जीवांपासून नवीन जीवांची निर्मिती, अशी सनातन परंपरा.

**continuous** अखंडित; सतत

खंड न पडलेले; सलग.

**— variation** अखंडित भेद; अनवरत भेद

एकाच जातीतील अनेक व्यक्तींत एखादे सलगपणे कमी किंवा जास्त प्रमाणात दिसून येणारे लक्षण अथवा लक्षणासंबंधीचा भेद; उदा. बियांच्या वजनातील फरक कमीत कमी ते जास्तीत जास्त यामधील सर्व टप्पे सलगपणे आढळल्यास तो अखंडित भेद ठरतो. पहा discontinuous variation.

**contorted ( twisted )** परिवलित; पिळीव

कलिकावस्थेतील पुष्पदलसंबंधाचा एक प्रकार; यामध्ये प्रत्येक पाकळीची एक कडा दुसरीचे आत व दुसरी कडा बाहेर अशी मांडणी असल्याने ती कळी पिळीव ( पिळवटल्याप्रमाणे ) दिसते; उदा. जास्वंद, लाल कण्हेर; कुसळी गवताचे पिळीव प्रशूक ( *Andropogon contortus* L. ).

**contractile vacuole** संकोचशील रिक्तिका; संकुची रिक्तिका

आकुंचन व प्रसरण पावणारी प्राकलातील सूक्ष्म पोकळी; उदा. काही शैवले व काही सूक्ष्म प्राणी.

**— root** संकुची मूळ

वयोमानाबरोबर आडव्या रेषा ( वलये ) पडलेले मांसल मूळ; यामध्ये त्याचे आकुंचन होऊन वनस्पतीस ते खोलवर जमिनीत ओढून धरते.

**control ( check ) experiment** नियंत्रित प्रयोग

कृत्रिम व ज्ञात अशी व्यवस्था केलेला सहप्रयोग; मूळच्या निरीक्षणाशी ताडून पाहण्याकरिता केलेला प्रयोग.

**convergent** अभिमुख; समाभिरूपी

प्रथम अलग असून शेवटी एकत्र मिळणाऱ्या; उदा. पानाच्या पात्यातील शिरा ( दालचिनी, कारंदा, बोर ). पहा divergent

**— evolution** समाभिरूपी क्रमविकास

भिन्न वंशातील, कुलातील किंवा वर्गातील वनस्पतींचा आकार, स्वरूप व संरचना मूलतः ( तत्त्वतः ) भिन्न असूनही क्रमविकासात शेवटी त्यांना साधारणतः परिस्थितिसापेक्ष सारखेच स्वरूप प्राप्त होण्याची घटना; उदा. मरुवनस्पती; जलवनस्पती; इ.

**convolute** संवलित

पर्णवलनाचा एक प्रकार; पानाच्या एका कडेपासून दुसऱ्या कडेपर्यंत सुरळीप्रमाणे गुंडाळण्याचा प्रकार; उदा. केळ.

**Convolvulaceae** हरिणपदी ( गंधवेल ) कुल; कॉन्व्हॉल्व्ह्युलेसी

अमरवेल, गारवेल, रताळे, गणेशपुष्प, मर्यादवेल, विष्णुक्रांता, हरिणपदी (*Convolvulus arvensis* L. ), इत्यादी अनेक द्विदलिकित वनस्पतींचे कुल. बेसींनी या कुलाचा अंतर्भाव पोलेमोनिएलीझ या गणात तर हचिन्सननी धोतरा गणात (सोलॅनेलीझ) केला आहे. या कुलाची लक्षणे : वेली; काही वर चढणाऱ्या तर काही जमिनीवर पसरणाऱ्या; एकाआडएक साधी पाने; कुंठित फुलोरा; अरसमात्र, नियमित, पूर्ण, द्विलिंगी अवकिंज, मोठी, पंचभागी, आकर्षक, घंटाकृति किंवा नाळक्यासारखी, जुळलेल्या पुष्पमुकुटाची फुले; दोन जुळलेल्या किंजदलांच्या ऊर्ध्वस्थ किंजपुटात २-४ कप्पे आणि प्रत्येकात २-४ बीजके; मृदुफळ किंवा बोंड.

**coralloid** विद्रुमरूप; प्रवालसम

पोवळ्याप्रमाणे; पोवळी बनविणाऱ्या विशिष्ट शाखित प्राण्यांच्या शरीराप्रमाणे दिसणारे; उदा. जमिनीलगतची सायकसची मुळे.

**Cordaitales** कॉर्डाइटेलीझ

पुराजीव महाकल्पातील एक निर्वंश प्रकटबीजधारी वनस्पतींचा गण. प्रमुख लक्षणे : उंच वृक्ष; खोडाच्या टोकास शाखांचा झुबका व त्यावर साधी लांबट अनेक पाने; बीजुकपर्णे आकाराने लहान; व स्वतंत्र शंकूवर; गुरु बीजुकपर्णांच्या टोकावर बीजक असते; पहा Gymnospermae.

**cordate ( heart-shaped )** हृदयाकृति

पत्त्याच्या डावातील बदामाच्या आकाराचे, एका टोकास खाच व दुसऱ्या टोकास निमुळते असलेले; उदा. चक्रभेंडी अथवा गुळवेलीचे पान; गुळवेल = *Tinospora cordifolia* (Willd.) Miers.

**coriaceous** चर्मिल; चिवट

चामड्यासारखे चिवट; उदा. वड, रबर, आंबा, इ. ची पाने.

**cork** त्वक्षा

जून खोडे, फांद्या व मुळे यावर अपित्वचेच्या ऐवजी नवीन बनलेल्या बुचासारख्या पदार्थाच्या ( सूबरिन) कोशिकांचा थर; हा मृत कोशिकांचा थर संरक्षक असून काही वनस्पतींच्या ( कॉर्क ओक ) खोडावरचा

जाड थर प्रत्यक्ष बुचे बनविण्यास वारंवार काढून घेतला जातो.

**cork-cells** त्वक्षा-कोशिका

वर वर्णन केल्याप्रमाणे जाड स्यूबरिनयुक्त कोशिका.

**cork-cambium (phellogen)** त्वक्षाकर

त्वक्षा-कोशिका बनविणारा अपित्वचेच्या आतील (क्वचित परिरंभ-अंतस्त्वचेखालच्या थर) जिवंत कोशिकांचा सतत विभागणी चालू असलेला थर (ऊतककर); यापासून बाहेरच्या बाजूस त्वक्षाकोशिका व आतील बाजूस उपत्वक्षा (द्वितीयक मध्यत्वचा) बनते; पहा phelloderm; cambium.

**— formation** त्वक्षासंभवन; त्वक्षानिर्मिती

त्वक्षाकराच्या कार्यामुळे त्वक्षाचे थर बनण्याची प्रक्रिया; बहुवर्षायू, द्विदलिकित, प्रकटबीज व काही एकदलिकित वनस्पतीं यांमध्ये ही घटना आढळते; ज्या वनस्पतींत द्वितीयक वाढ असते तेथे त्वक्षानिर्मिती बहुधा आवश्यक ठरते.

**corm** घनकंद

जमिनीत वाढणारे, मांसल, संघटित, फुगीर, अन्नाच्या साठ्यामुळे घट्टपणा आलेले, खवल्यासारख्या पानांनी वेढलेले, खाली आगंतुक मुळे व वरच्या बाजूस कळ्या असून नवीन कंद, पाने व फुलोरा बनविणारे रूपांतरित खोड; उदा. केशर, अळू, सुरण इ.

**cormel** लघुघनकंद; घनकंदिका

मूळच्या घनकंदापासून बनलेला लहान घनकंद.

**cormophyte** स्कंधवनस्पति; स्कंधपादप

पाने, मुळे, खोड आणि वाहक ऊतके असलेली वनस्पती; काही अपवाद वगळल्यास (पाने व मुळे नसलेले) सर्व नेचाभ पादप व बीजी वनस्पती यांमध्ये वर सांगितलेले अवयव आढळतात. परंतु कायक वनस्पतीत नसतात; पहा Thallophyta; Pteridophyta; cormus.

**cormus** स्कंध

सर्वसाधारणतः वाहक ऊतके, मुळे, व पाने असलेला अक्ष; पहा thallus.

**corolla** प्रदलमंडल; पुष्पमुकुट

फुलातील पाकळ्यांचा समूह (मंडळ, वर्तुळ); केसरमंडल व किंजमंडल यांचे संरक्षण व गंध आणि स्वरूप यांच्या साहाय्याने प्राण्यांना आकर्षित करून प्रजोत्पादनास मदत करणे ही पुष्पमुकुटाची कार्ये होत.



**corolliform** पुष्पमुकुटाभ

पुष्पमुकुटासारखे (परिदलमंडल); उदा. गुलबुश.

**corona (crown)** मुकुट; तोरण

पाकळ्यांपासून किंवा तत्सम पुष्पदलांपासून उगम पावलेले दले, केस, खवले यासारख्या सुट्या अथवा जुळलेल्या उपांगांचा समूह (वर्तुळ); उदा. कृष्णकमळ, लाल कण्हेर, कुमुर, पिंक, इ. क्वचित केसरदलांना हे तोरण चिकटून असते (उदा. रुई कुल).

**coronans** अग्रस्थ

मुकुटाप्रमाणे शोभणारे.

**corpusculum (pollen-carrier)** पुंजकणिका

दोन परागपुंजांना जोडणारा गाठीसारखा भाग; उदा. रुईचे फूल; पहा pollinium.

**correlation** सहसंबंध

दोन इंद्रियांचा एकमेकांवर असलेला अंमल अथवा नियंत्रण; उदा. खोडाचा शेंडा खुडल्यास बगलेतील कळ्यांची जोमाने वाढ होणे, खालची पाने मोठी व जाड होणे किंवा नव्या कळ्या फुटणे, इत्यादी. एखाद्या इंद्रियाची हानी दुसऱ्याने भरून काढण्याचा प्रकार. पहा reparation, regeneration, restitution.

**corrugated (corrugate)** वलीवन्त; पन्हाळी

एखाद्या सपाट अवयवावर खोबणी (पन्हळी) अथवा खोलगट रेषा असण्याचा प्रकार; उदा. काही तालवृक्षांची पाने.

**cortex (rind)** मध्यत्वचा

द्विदलिकित वनस्पतींच्या कोवळ्या खोडाच्या अथवा मुळाच्या अंतर्रचनेत अपित्वचेच्या आतील अंतस्त्वचेपर्यंतचा भाग; सामान्य भाषेत ' साल. '

**corticate** मध्यत्वचायुक्त

मध्यत्वचा अगर तत्सम भाग असलेले.

**corymb** गुलुच्छ

फुलोऱ्याचा (पुष्पबंधाचा) एक प्रकार; यामध्ये केंद्राजवळची फुले सर्वांत लहान व परिघाजवळची अधिकाधिक जून असा परिघाकडून केंद्राकडे (अभिमध्य) उमलण्याचा क्रम असतो; फुलांच्या देठांची लांबी साहजिकच केंद्राजवळ (अक्षाच्या टोकास) कमी व परिघाकडे (अक्षाच्या तळाकडे क्रमाने) अधिक होत जाते व सर्वसाधारणपणे सर्व फुले एकाच पातळीत येऊन सर्व दृश्य आकर्षक होते; उदा. मोहरी, व्हर्बिना, कँडिटफ्ट, इ.

**costa (rib, vein)** सिरा; शीर

पानांमध्ये व तत्सम अवयवांत ( पुष्पदले, छदे ) पाणी व अन्नरसाची ने-आण करणाऱ्या ऊतकांचा संच ( वाहक वृंद ); पहा unicostate; multicostate; costate.

**costate** सिराल

एक अथवा अनेक शिरा असलेले ( पान ).

**cotyledon** ( १ ) दलिका; बीजपत्र; डाळिंबी ( २ ) कॉटिलेडॉन

( १ ) बीजातील गर्भावस्थेत असलेल्या वनस्पतीचे पान; सामान्य भाषेत 'दळ'. यांची संख्या एक किंवा दोन असून क्वचित अधिक असते. अन्नसंचय, अन्नशोषण, कधी अन्ननिर्मिती ( बी रुजल्यावर जमिनीवर येऊन ) ही कार्ये ती दलिका करते.

( २ ) एका वनस्पतीचे नाव.

**counter clockwise ( anti-clockwise )** अपसव्य; वामावर्त

घड्याळाच्या काट्यांच्या नित्याच्या दिशेविरुद्ध ( हालचाल ).

**cover** छादन; आच्छादन; आवरण

**cover-cell** छादन कोशिका

शेवाळी वनस्पतीतील अंदुककलशाच्या ग्रीवामार्गाच्या तोंडाशी असलेली कोशिका.

**cover-slip** छादनी; झाकणी; आच्छादन काच

सूक्ष्मदर्शकातून निरीक्षण करण्याकरिता वस्तूवर बसवलेली काचेची पातळ चकती ( गोल, चौकोनी किंवा आयत चौकोनी ).

**Crassulaceae** घायमारी कुल; क्रॅसुलेसी

घायमारी, पानफुटी ( पर्णबीज ), कलांचो इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे लहान कुल; याचा अंतर्भाव गुलाब गणात ( रोजेलीझमध्ये ) केला जातो. प्रमुख लक्षणे : मरुवनस्पती; मांसल अवयव असलेल्या ओषधी व क्षुपे. फुलोरा कुंठित; नियमित, द्विलिंगी, समभागी फुले; ऊर्ध्वस्थ किंजपुट; किंजदले सुटी किंवा जुळलेली; फळ शुष्क पेटिकेसारखे; कॉटिलेडॉन, क्रॅसूला, सेडम; सेंपरव्हायव्हम इत्यादी वंशांचा यातच समावेश आहे.

**creation** निर्मिती

निर्माण केलेले; बनविलेले; निर्माण करण्याची प्रक्रिया.

**creeper** प्रसर्पी

जमिनीवर सरपटत जाणारी व आगंतुक मुळांनी चिकटून राहणारी वेल; उदा. रताळे, ब्राह्मी, आंबुशी.

**cremocarp** आंदोलिपालि

शुष्क, दोन कप्प्यांचे, अधःस्थ, पालिभेदी फळ; पक्व झाल्यावर याचे दोन एकबीजी भाग ( फलांश ) फळ धारण करणाऱ्या दांड्यापासून (फलधर) अलग होतात पण बारीक तंतूच्या आधारे लोंबत राहतात; उदा. ओवा, धणे, गाजर, जिरे इत्यादी चामर कुलातील वनस्पती. पहा schizocarp; carpophore; mericarp.

**crenate** स्थूलदंतुर; गोलदंती

बोथट गोलसर दाते असलेले; उदा. ब्राह्मी, पानओवा अथवा पानफुटी यांची पाने, अथवा त्यांची कडा.

**crenulate (crenulated)** सूक्ष्मदंतुर; सूक्ष्मदंती

बोथट, गोलसर पण फार बारीक दाते असलेले; ( पान अथवा त्याची किनार )

**crescent-shaped ( lunate )** अर्धचंद्राकृति

अर्ध्या चंद्राच्या आकाराप्रमाणे; उदा. कृष्णकमळ ( *Passiflora lunata* Juss. ); एक नेचा ( *Adiantum lunulatum* Burm. ) रातकोंबडा.

**crest** (१) माथा; शिखर; शिखा; शीर्ष (२) कटक; कंगोरा

शेंडा; उदा. झाडाचे टोक; फळाचे टोक. पहा ridge, crown.

**crested** शिखी; कटकित

विशिष्ट प्रकारचा शेंडा किंवा अनियमित कंगोरा असलेले.

**creta ( chalk )** खडू; खट

**cretaceous** (१) खटी; (२) खटवर्णी; (३) क्रेटेशियस काल

( १ ) खडू असलेले ( २ ) खडूसारखे पांढरे; शुभ्र, सफेत; ( ३ ) सुमारे १४ ते ७ कोटी वर्षांपूर्वीचा काळ.

**crevice** फट; भेग; चीर

खोडावर, खडकावर किंवा जमिनीवर असलेली कमी जास्त खोलीची पण अरुंद चीर.

**crisp ( crisped, curled )** वालित

अनियमितपणे खाली किंवा वर किंवा दोन्हीकडे वळलेली ( वाकलेली ) उदा. कडा, किनार; तगारीच्या

पाकळीच्या कडा (*Tabernemontana crispa* L.).

**crista** (१) शिखा; तुरा; गुच्छ; (२) प्रकटक

(२) विशेष प्रकारचा कंगोरा; उदा. काही सूक्ष्म जंतूवरचा कंगोऱ्यासारखा पापुद्रा; प्राकणूतील अनेक पोकळ्याभोवती वेढून राहणारा दुहेरी पापुद्रा.

**cristate** तुरेबाज; तुरेदार; गुच्छल

तुरा असलेले; उदा. मयूरशिखा (*Celosia cristata* L.) या वनस्पतीच्या शेंड्यावर (टोकास) असलेल्या तुऱ्यासारख्या फुलोऱ्यामुळे हे नांव पडले.

**crooked** वाकडातिकडा

अनेक ठिकाणी वाकडे वाढलेले; उदा. खोड.

**crop** पीक

विशेष प्रकारे वाढविलेल्या वनस्पतींचा समूह; उदा. धान्ये; फळझाडे; फुलझाडे.

**cross** (१) स्वस्तिक चिन्ह; (२) संकर प्रजा; संकरज

(१) बेरजेकरिता वापरलेले अधिक चिन्ह; गुणिले चिन्ह; फुली; स्वस्तिक चिन्ह; (२) दोन भिन्न जाती किंवा प्रकार यांचेपासून निर्मिलेली प्रजा (संतति); पहा hybrid; cruciform.

**— breed** (१) संकर; (२) संकरज

(१) दोन जातींच्या किंवा प्रकारांच्या व्यक्तीत (सजीव) प्रजोत्पादन घडवून आणणे; (२) घडवून आणलेली संतती.

**— fertilisation** परफलन

एकाच जातीच्या पण दोन भिन्न व्यक्तींच्या किंवा प्रकारांच्या प्रजोत्पादक कोशिकांचा संगम.

**— over (crossing over)** पारगति

कोशिकेच्या न्यूनीकरण विभागणीत दोन समजात रंगसूत्रे काही वेळ संपर्क साधून परस्परांच्या काही भागांची अदलाबदल (विनिमय) करतात त्यावेळी पूर्वीच्या त्यावरील घटकांच्या विशिष्ट संचातील मांडणी बदलून नवीन होणाऱ्या फेरवाटणीची (नवीन मांडणीची) प्रक्रिया; पहा chiasma; linkage.

**— pollination** परपरागण

फुलझाडाच्या एका जातीच्या फुलातील परागकण त्याच जातीच्या दुसऱ्या वनस्पतीच्या फुलातील स्त्री-केसराच्या टोकावर (किंजल्कावर) पडण्याची (टाकण्याची) प्रक्रिया.

**— section (transverse section)** अवच्छेद

आडवा छेद; अवयवाच्या लांबीशी काटकोनात घेतलेला काप.

**crown** (१) मुकुट; (२) माथा; डेरा

(१) कारा या शैवलाच्या प्रजोत्पादक अवयवाचे, (अंडुकाशयाचे) टोकावरील कोशिकांचा समूह. (२) वृक्षाच्या खोडावरील सर्व शाखा व पानांचा समूह; हा अर्धगोलाकार, गोलाकार किंवा स्तूपासारखा असतो.

**— graft** खुंटी कलम

जमिनीत असलेल्या एका झाडाच्या खुंटात दुसऱ्या झाडाची खुंटीसारखी लहान पाचर बसवून केलेले कलम.

**cruciate (cruciform; cross-shaped)** क्रूसाकार; स्वस्तिकाकृति

स्वस्तिक किंवा गणितातील अधिक (बेरजेच्या) चिन्हाप्रमाणे आकार असलेला; उदा. मोहरीच्या फुलाचा पुष्पमुकुट.

**Cruciferae (Brassicaceae)** मोहरी (सर्षप) कुल; क्रुसिफेरी (ब्रॅसिकेसी)

मोहरी (सर्षप), कोबी, नवलकोल, मुळा इत्यादी द्विदलिकित फुलझाडांचे कुल. याचा अंतर्भाव बेसींनी अहिफेन गणात (पॅपॅव्हरेलीझ), बेंथॅम व हूकर यांनी पराएटेलीझ गणात व हचिन्सन यांनी क्रुसिफेरेलीझ किंवा मोहरी (सर्षप) गणामध्ये केला आहे. प्रमुख लक्षणे : ओषधीय वनस्पती; साधी एकाआड एक पाने; चतुर्भागी, स्वस्तिकाकृति, नियमित, अवकिंज, द्विलिंगी फुले; केसरदले सहापैकी चार लांब; दोन जुळलेल्या किंजदलांच्या ऊर्ध्वस्थ किंजपुटात तटवर्ती बीजकविन्यास व छद्मपटलामुळे दोन कप्पे; फळ शुष्क (सार्षप) व दोन्ही शिवणीवर तडकणारे, अनेक बीजी.

पहा siliqua; parietal; replum.

**crumpled** वलिवंत

कळीमध्ये सुरकुतलेले (वेड्या वाकड्या घड्या पडलेले); पर्णवलनाचा एक प्रकार; उदा. कोबीची पाने.

**crust (rind, shell)** कवच; पुट

खपलीसारखा कठीण पापुद्रा.

**crustaceous (crustose)** कवची

ताठर व ठिसूळ (पाने); दगडास किंवा झाडाच्या सालीस चिकटून सपाट कवचासारखे वाढलेले; उदा. काही धोंडफूल वनस्पती.

**Cryptogamia (Cryptogamae; Cryptophyta)** अबीजी वनस्पति विभाग

कायक वनस्पती, शेवाळी, नेचाभ पादप इत्यादी वनस्पतींचा अंतर्भाव असलेला (जुन्या वर्गीकरणा-

प्रमाणे ) गट; यातील प्रजोत्पादक इंद्रियांत केसरदले, किंजदले, फळ व बीज यांचा संपूर्ण अभाव असतो; तथापि काही नेचाम पादपातील लघुबीजुकपर्णे व गुरुबीजुकपर्णे यांची तुलना केसरदले व किंजदले यांचेशी करता येते. यातील वनस्पतींची संपूर्ण माहिती उपलब्ध नव्हती त्यावेळी सलिंग प्रजोत्पत्ती गूढ मानून या सर्वांना 'गूढयुतिक' या अर्थाचे शास्त्रीय नाव दिले गेले.

**crystal** स्फटिक

खनिज अथवा कार्बनी पदार्थांचे घनावस्थेतील पैलूदार स्वरूप ( संरचना ); उदा. कॅल्शियम कार्बोनेट; कॅ. ऑक्झेलेट; खडीसाखर; मोरचूद, इ.

**crystalloid** स्फटिकाभ

रवाळ स्वरूप; स्फटिकासारखे; याविरुद्ध कलिल स्वरूप असते. उदा. बदाम, एरंड, मका यांच्या बीजातील अन्नसाठ्यातील प्रथिनकण; पहा colloid.

**cucullate** स्फटिकाकृति; स्फटायुक्त

नागाच्या फणाप्रमाणे; फणा ( फडी ) असलेला; उदा. एका जलनेचाच्या पानाप्रमाणे ( *Salvinia cucullata* Roxb).

**Cucurbitaceae** कर्कटी ( काकडी ) कुल; कुकर्बिटेसी

लालभोपळा, काकडी, कलिंगड, टरबूज, इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा समावेश बेंथॅम व हूकर यांनी कृष्णकमळ गोत्रात ( पॅसिफ्लोरेलीझ ), एंग्लर व प्रँटल यांनी कर्कटी गणात ( कुकर्बिटेलीझ ), बेसींनी लोॲझलीझ गणात व हचिन्सननी कर्कटी गणात केलेला आढळतो. प्रमुख लक्षणे : बहुतेक सर्व प्रतानयुक्त ओषधीय वेली; साधी, एकाआड एक, हस्ताकृती शिरा असलेली पाने; अरसमात्र, अपिकिंज बहुधा आकर्षक, पिवळी किंवा पांढरी, एकलिंगी, एकाच झाडावर असणारी फुले; बहुधा संवर्त व पुष्पमुकुट पंचभागी, जुळलल, घंटाकृती; केसरदले ३ किंवा ५; परागकोश बहुधा जुळलेले; तीन जळलेल्या किंजदलाच्या अधःस्थ किंजपुटात एक कप्पा व तटवर्ती अनेक बीजके; मृदुफळ; पहा pepo.

**culm** संधिक्षोड; सांधेदार खोड

बहुधा पोकळ किंवा भरीव, शाखा नसलेले व पेरी घन व स्पष्ट असलेले खोड; उदा. ऊस, बांबू, मका इ.

**cultivable** कृषियोग्य

लागवडीस योग्य ( सोयीचे; फायद्याचे ).

**culture** संवर्धन

विशेष प्रकारे कृत्रिम वाढ करण्याची प्रक्रिया.

**cuneate (cuneiform)** शंकाकृति; कीलाकार

पाचरीसारखे किंवा लांबट त्रिकोणासारखे असून तळाशी टोकदार; उदा. गोंडाळाची पाने.

**cup-shaped** चषकाकृति

वाटी किंवा पेला यासारख्या आकाराचे; उदा. गुलाबाचे पुष्पासन; काही कवक.

**cupule** चषिका; वाटिका

लहान वाटीसारखा अवयव; उदा. ओक(बंज)च्या फळाच्या (बंजूफळ) तळाशी असलेले छदावरण; काही तालवृक्षांच्या फळांच्या तळाशी परिदलांचे आवरण; उदा. नारळ.

**Cupuliferae** चषिका कुल; क्युप्युलिफेरी

जुन्या वर्गीकरणाप्रमाणे (बेंथॅम व हूकर) ओक (बंज), चेस्टनट, बीच इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा अंतर्भाव बंज (ओक) गणात किंवा कर्सिफ्लोरीत केला जात असे. एंग्लर व प्रँटल यांनी या कुलाला गणाचा (फॅगेलीझ) दर्जा दिला आहे व भूर्ज कुल ( बेटयुलेसी) आणि ओक कुल किंवा बंज कुल (फॅगेसी) अशी दोन कुले त्यात समाविष्ट केली आहेत. अलिकडे फॅगेसी म्हणजेच चषिका कुल ( क्युप्युलिफेरी ) असे मानतात.

प्रमुख लक्षणे : वृक्ष व क्षुपे; साधी उपपर्णे असलेली, एकाआड एक पाने; नतकणिश फुलोरा; एकलिंगी, पण एकाच झाडावर, एक परिदलमंडल किंवा तेही नसलेली फुले; दोन किंवा तीन अधःस्थ किंजदलांच्या संयुक्त किंजपुटात प्रथम दोन किंवा तीन कप्पे व प्रत्येकात एक किंवा दोन बीजके; कपाली फळात एकच अपुष्क बीज. सपक्ष फळ ( बीच ); बीच, ॲल्डर, हॅझेल, हॉर्नबीम, ओक या सर्वांचा येथे समावेश आहे. पहा Amentiferae, Fagaceae.

**curcumine** हरिद्राद्रव्य

जमिनीतील हळदीच्या खोडातील प्रमुख पिवळे द्रव्य; ( *Curcuma longa* L. = हळद ).

**curvature** वक्रता; वलन

बाकडेपणा; वळण; बाक.

**—, movement of** वक्रताजन्य हालचाल

वळल्यामुळे घडून आलेली हालचाल; उदा. खोडाचे किंवा मुळाचे टोक चेतकामुळे वळून खाली, वर किंवा बाजूस वाढते; कळी उमलणे; फूल मिटणे किंवा उघडणे.

**curved ( bent )** वक्र

वाकलेले, वाकडे; उदा. काही झाडावरील ( उदा. वेत, बोर ) काटे.

**cushion** पुलवृंत

पानाच्या देठाचा तळास असलेला फुगीरभाग; यातील कोशिकांच्या आकुंचन वा प्रसरणामुळे पानाचे पाते वर-खाली होते; उदा. तरवड, लाजाळू इ.

**— plant** उपधान वनस्पति

जमिनीजवळच्या अनेक फांद्या एकत्र येऊन वाढल्याने उशीसारखा (अर्धगोल) आकार प्राप्त झालेली वनस्पती; उदा. सायलीन एकॉलस; काही शेवाळी.

**cusp** कंटक; काटा

**cuspidate** कटकाग्र

शेंड्यास किंवा टोकास तीक्ष्ण काटा असलेले; उदा. घायपात, युका यांची पाने.

**cuticle** उपत्वचा; क्यूटिकल

क्यूटिन द्रव्याचा लेप.

**cutin** क्यूटिन

मेदविशिष्ट द्रव्य; याचा पातळ लेप पानावर असून एक चकाकित, पानाला अपार्य पण प्रकाशाला पार्य असे संरक्षक आच्छादन बनते; उदा. आंबा.

**cutinisation ( cuticularisation )** क्यूटिनी-भवन; उपत्वचाभवन

क्यूटिनचा लेप बसण्याची प्रक्रिया; मूळ कोशिकावर-णात क्यूटिन द्रव्य मिसळून त्याचा थर बनण्याची प्रक्रिया.

**cutting** छिन्नकांड; छाटकलम

जिवंत खोड अथवा फांदी यांचा कापून काढलेला तुकडा; मूळच्या वनस्पतीपासून तशीच नवीन वनस्पती बनविण्याकरिता हा तुकडा ( कलम ) उपयुक्त असतो; उदा. गुलाब, जास्वंद, कण्हेर, इ.

**Cyanophycae ( Blue-green algae )** नीलहरित शैवले वर्ग; सायनोफायसी
**Cynophyta** नीलहरित शैवल विभाग; सायनोफायटा

पहा Blue-green algae.

**cyathium** चषकरूप

फुलोऱ्याचा (पुष्पबंधाचा) एक प्रकार; पेल्यासारख्या छदमंडलात बहुधा केसरदलाचे पाच गट व मध्यभागी एक लहान दांड्यावर तीन किंजदलाचा तीन कप्पी किंजपुट असतो; प्रत्येक केसरदल एक सच्छद पुं-पुष्प व किंजपुट एक स्त्री-पुष्प मानतात; छदमंडलावर अनेक मधुप्रपिंड कधी कधी असतात; उदा. पानचेटी, शेर, शेंड, इ. एरंड कुलातील कित्येक वनस्पतींत ( युफोर्बिया वंश ) हा फुलोरा ( क्वचित रूपांतरित ) आढळतो.

**Cycadales** सायकस गण

पहा cycadaceae

**Cycadaceae (Cycads)** सायकॅडेसी; सायकस कुल

प्रकटबीज वनस्पतींपैकी सायकस, झामिया, दिऊन इत्यादींचे कुल; अलिकडे नवीन वर्गीकरणपद्धतीत यांचा अंतर्भाव एका विभागात (सायकॅडोफायटा) केला जातो; तर काहींनी सायकॅडेलीझ असा गण मानला आहे; त्यात विलुप्त व विद्यमान वनस्पती समाविष्ट केल्या आहेत. प्रमुख लक्षणे : फार प्रारंभिक बीजधारी वनस्पती; काही जीवाश्मरूपात तर काही जिवंत वनश्रीत आढळतात; बहुवर्षायु, अशाखित, ग्रंथिल किंवा स्तंभासारखे खोड व त्यावर नेचासारखा पण मोठ्या पिसासारख्या पानांचा झुबका; नर व मादी वृक्ष भिन्न; नर वृक्षावर लघुबीजुकपर्णे शंकाकृती फुलोऱ्यात परंतु गुरुबीजुकपर्णे सुटी, पानासारखी अथवा रूपांतरित आणि शंकूवर एकत्र; गुरुबीजके उघडी; रेतुके चलनशील; पराग (लघुबीजुके) वायुप्रसारित; परागण बीजकरंध्रा-वर होते. बीजावर कठीण किंवा मांसल आवरण आणि बीजात एक किंवा अनेक गर्भ.

**Cycadofilicales** बीजी नेचे गण; सायकॅडोफिलि-केलिझ

पहा Pteridospermae.

**cycle ( whorl )** मंडल; चक्र

अनेक अवयवांचे वर्तुळ; काही फुलात पुष्पदलांची बहुधा चार मंडले असतात; काही खोडावर पानांची (उदा. खडशेरणी; सातवीण) तर काहींवर फांद्यांची ( उदा. कारा व एक्विसीटम ) मंडले असतात.

पहा spiral.

**cyclic ( whorled )** चक्रिय; मंडलित

वर्तुळाकार, चक्राकार किंवा मंडलाकार ( मांडणी ).

**cyclosis ( streaming )** भ्रमण

कोशिकावरणाच्या आतील बाजूस चालू असलेली जिवंत द्रव्याची ( प्राकलाची ) प्रवाहरूपी हालचाल. नियमित प्रकारे प्रदक्षिणा करणे, परिगमन ( rotation) अथवा अनियमितपणे इतस्ततः किंवा प्रकला-भोवती फिरणे, अभिसरण (circulation).

**cylinder** चिती; दंडगोल
गोलसर दंडाप्रमाणे आकाराचा ( अवयव ); उदा. बहुतेक खोडे, देठ; फुलांचे व फुलोऱ्याचे दांडे (अक्ष).

**cylindric** चितीय; दंडगोलाकृति
गोलसर दांड्याप्रमाणे; उदा. ऊस, वेळू इत्यादींचे खोड.

**cymba** पोय; पोत
नावेसारखा, कठीण, दीर्घकाल राहणारा महाछद; उदा. काही तालवृक्ष; पहा spathe.

**cyme** वल्लरी
फुलोऱ्याचा एक प्रकार; अक्षाच्या शेंड्यावर फूल आल्याने पुढे वाढ खुंटते; केव्हा त्याच्या बाजूस दोन नवीन अक्ष येऊन त्यांचीही फूल आल्याने वाढ खुंटते व तीन फुलांची साधी वल्लरी बनते; उदा. मोगरा; कधी बाजूच्या दोन अक्षावर फूल येऊन पुनरपि त्यांच्या दोन्ही बाजूस फुले येऊन पुन्हा तोच प्रकार काही वेळ चालतो. उदा. पारिजातक; वल्लऱ्या अनेक प्रकारच्या असतात; पहा uniparous, biparous helicoid; scorpioid.

**cymule** लघुवल्लरी
लहान वल्लरी.

**Cyperaceae (Sedges)** मुस्तक (मुस्ता; मोथा) कुल; सेजीस; सायपेरेसी
लव्हाळा, मोथा, कुंदा, कचेरा इत्यादी गवतासारख्या दिसणाऱ्या एकदलिकित वनस्पतींचे कुल; याचा समावेश तृण कुलाबरोबर तृण गणात ( ग्रॅमिनेलीझ) केला जातो. हचिन्सन यांनी मात्र मुस्तक गण ( सायपेरेलीझ ) स्वतंत्र करून त्यात मुस्तक कुल समाविष्ट केले आहे. तृणकुलाशी याचे आप्तभाव असून अनेक लक्षणांत दोन्ही कुलांत साम्य आहे. प्रमुख लक्षणे : मुस्तक कुलात खोड भरीव व त्रिधारी; पाने तीन रांगांत; जिव्हिकाहीन पानांचे तळ खोडाशी पूर्णपणे वेढतात; परिदले केसाप्रमाणे व फुले दोन्ही कुलात तुसांनी संरक्षित असतात; तसेच ती अवकिंज व एकलिंगी; केसरदले तीन; किंजदले दोन किंवा तीन पण किंजपुटात एकच कप्पा व बीजक; शुष्क व एकबीजी फळात बीजावरण फलावरणापासून अलग; पहा Gramineae.

**cyphella** निगर्तिका
दगडफुलाच्या पृष्ठभागात खोलवर असलेला व शैवल कोशिकांची निर्मिती करणारा पेल्यासारखा अवयव; पहा Lichens.

**cypsela** संकृत्स्न
शुष्क, एकबीजी, न तडकणारे, पातळ फलावरण व बीजावरण एकमेकांपासून अलग असलेले, अधःस्थ व दोन किंजदलांपासून बनलेले फळ; उदा. सूर्यफूल, सहदेवी, एकदांडी, ओसाडी, करडई इ.

**cyrrhus ( tendril )** प्रतान; ताणा
तणावा; बारीक दोऱ्याप्रमाणे, आधाराला गुंडाळून धरण्यास उपयुक्त, असा संवेदी अवयव किंवा तशा अवयवात रूपांतर झालेला दुसरा प्रमुख अवयव ( खोड, पान, उपपर्ण, फुलोऱ्याचा अक्ष, इ. ); उदा. द्राक्षवेल, मोरवेल, वाटाणा, कळलावी, अँटिगोनॉन, भोपळा इ.

**cyst** कोष्ठ
बंदिस्त पोकळी; लहान बंद पिशवीसारखा अवयव.

**cystolith** खटिकापुंज
चुनखडीच्या कणांचा झुबका; उदा. वडाच्या पानाच्या अपित्वचेतील कोशिका.

**cytase** सायटेज
तूलीरावर ( सेल्युलोजवर ) क्रिया करणारे वितंचक किंवा कार्बनी निदेशक; अनेक बिया रुजताना हे क्रियाशील असते.

**Cytochemistry** कोशिकारसायनशास्त्र
कोशिकेच्या सर्व भागासंबंधीचे रासायनिक ज्ञान.

**cytogamy** कोशिकायुति; कोशिकासंगम
दोन कोशिकांचा संपूर्ण संयोग.

**cytogenesis** कोशिकाजनन
कोशिकांचा उगम व विकास.

**Cytogenetics** कोशिकाजननविज्ञान, कोशिका-आनुवंशिकी
कोशिकाविज्ञान व कोशिकाजनन या दोन्हींच्या संबंधी उपलब्ध ज्ञानाने कोशिकेतील भागांचे व गुणधर्मांचे पिढ्यानुपिढ्या अनुहरण कसे होते हे ज्ञान देणारी शाखा.

**cytokinesis** परिकल-विभाजन
कोशिकेतील परिकलाची ( प्रकलादीशिवाय इतर सजीव द्रव्याची ) विभागणी.

**Cytology** कोशिकाविज्ञान
कोशिकेचा आकार, संरचना, विभागणी इत्यादी सर्व माहितीची ज्ञानशाखा.

**cytoplasm** परिकल; कोशिका ( पेशी ) द्रव्य
कोशिकेतील प्रकल, प्राकलकणु किंवा अशी विशिष्ट कोशिकांगके सोडून इतर सजीव व अर्धघन कलिल द्रव्य.

**cytoplasmic fibres** परिकल-तंतू
कोशिका-विभागणीत सहज दिसून येणारे परिकलाचे सूक्ष्म धागे.

**— inheritance** परिकलानुहरण
प्रकलाद्वारे कोशिकेचे (किंवा व्यक्तीचे) बहुतेक गुण पुढील पिढीत उतरतात, तथापि काही परिकलाद्वारेही उतरत असावे असा पुरावा मिळाल्याने ती उपपत्ती स्वीकृत झाली आहे व येथे अभिप्रेत आहे.

## D

**daily period of growth** दैनिक वर्धनभेद
दर चोवीस तासात होणारा वाढीतील चढ-उतार.

**Darwinism** डार्विनवाद; डार्विनची उपपत्ति
नैसर्गिक निवडीच्या तंत्रानुसार नवीन जातींची निर्मिती; स्पष्टीकरण : सर्व सजीवांची संख्या भूमितिश्रेणीने वाढते, परंतु जीवनावश्यक वस्तू मर्यादित असल्याने त्या प्राप्त करून घेण्यास सजीवांमध्ये स्पर्धा होते ( जीवनार्थ कलह ) ; सजीवांमध्ये सबल व दुर्बल असे भेद निसर्गतःच असतात; साहजिकच स्पर्धेमध्ये सबल यशस्वी होऊन दुर्बल नाश पावतात, म्हणजेच जगण्यास लायक अशा सबलांची सृष्टीकडून निवड केली जाते. ज्या भेदांमुळे सबल यशस्वी होतात ते भेद आनुवंशिकतेमुळे नवीन पिढीत उतरतात, तीव्रतर होत जातात व काही नवीन फायदेशीर भेदही दिसून येतात; यांचेही अनुहरण होऊन व असा प्रकार शेकडो पिढ्यात चालू राहून नवीन गुणधर्मयुक्त सजीव निर्माण होत जातात; हानिकारक भेद पण असतात व नवीन येतात, परंतु ते धारण करणाऱ्या व्यक्ती दुर्बल ठरून नवीन संततीची परंपरा फार काल चालू ठेवीत नाहीत. या प्रकारे सर्व सजीव साध्या समान पूर्वजांपासून उत्क्रांत झाले असून ते परवर्तनीय आहेत व सध्या आहेत तसे पूर्वी एकेवेळी एकदम निर्मिलेले नाहीत.

**daughter-axis** जन्याक्ष
एका अक्षापासून उद्भवलेला नवीन उपाक्ष.

**daughter-cell** जन्य-कोशिका; जन्य-पेशी
मूळच्या एका कोशिकेपासून जन्मलेली नवीन कोशिका; मूळची कोशिका ' मातृकोशिका ' ठरते.

**daughter-chromosome** जन्य रंगसूत्र
मूळच्या रंगसूत्रापासून बनलेले नवीन रंगसूत्र.

**day-length** दिनावधि
दिवसातील प्रकाशपूर्ण काल.

**day-position** दिनस्थिति
दिवसा उजेडी असलेली स्थिती; उदा. चिंच, बाहवा इत्यादी झाडांची पाने दिवसाच्या प्रकाशात सपाट राहतात; परंतु रात्री त्यांची दले मिटून लोंबती राहतात त्याला रात्रि-स्थिती म्हणतात.

**decapitation** विमुंडकन
विशेष प्रकारची छाटणी.

**deciduous** पतिष्णु
विशिष्ट ऋतूत किंवा वेळी आपोआप गळून पडणारी; उदा. पांगारा, पळस, वड इत्यादींची पाने; वडाची उपपर्णे, गुलाबाच्या पाकळ्या, इ.

**— tree** कदापर्णी वृक्ष, पानझडी वृक्ष
पाने झडून जाणारा वृक्ष; उदा. शाल्मली; ओक, पांगारा, साग, भूर्ज, खैरचाफा, इ.

**declinate** आभनत
पुढे किंवा खाली वाकलेले; उदा. काही फुले, केसरदले, किंवा किंजले इ.

**decoloratus ( discoloured )** वर्णहीन; विवर्ण; रंगहीन

**decolouration** वर्णनाश; विरंजन
रंगद्रव्याचा नाश होणे अथवा करणे.

**decompound** बहुदलित; बहुदली
तीनपेक्षा अधिकवेळा पूर्णपणे, पानाचे पाते विभागून बनलेले संयुक्त पान; उदा. गाजर, शेवगा.

**decorticated** वल्कहीन
साल काढलेले; मध्यत्वचेपासून बाहेरचा भाग सोलून काढलेले (उदा. खोड); पहा girdling.

**decumbent** पार्श्वारोही
जमिनीवर सरपट वाढून टोकास वर वळलेले (खोड); उदा. पुनर्नवा.

**decurrent (running down)** अधोगामी
खोडास चिकटून पर्णतलाच्या खाली काही अंतरावर वाढत गेलेले (पाते); उदा. गोरखमुंडी.

**decussate opposite** जात्यसम संमुख
समोरासमोर असलेल्या पानांच्या जोड्या एकाआड एक ( खोडाच्या ) पेऱ्यावर, एकमेकांशी काटकोनात

असण्याचा प्रकार; उदा. रुई, पेरू, झिनिया, कड्डू ( *Swertia decussata* Nimmo. ex Grah. ) इ.

**dedoublement ( doubling, chorisis )** द्विखंडन

पाने किंवा पुष्पदले यांच्या दुभंगण्यामुळे त्यांची संख्या दुप्पट किंवा अधिकपट होणे; उदा. मोहरीच्या फुलातील केसरदले.

**deficiency** न्यूनता; त्रुटि; अभाव

आवश्यक रासायनिक घटकाचा अभाव; रंगसूत्राच्या टोकाचा भाग नाहीसा होणे (लोप होणे); त्या भागात तर्कुयुज नसतो; पहा centromere.

**definite** कुंठित; मर्यादित

अक्षाची मर्यादित वाढ होण्याचा प्रकार; पुष्पबंधाच्या ( फुलोऱ्याच्या ) अक्षाची वाढ फूल टोकास आल्यावर थांबणे.

**— inflorescence** कुंठित पुष्पबंध

पहा cymose.

**definitive nucleus** अंतिम प्रकल

फुलझाडांच्या बीजकातील गर्भकोशात त्याच्या दोन्ही टोकांकडून आलेल्या एकेक एकगुणित प्रकलाच्या संयोगाने बनलेला एक द्विगुणित प्रकल; पहा diploid; haploid.

**— host** अंत्याश्रय

जीवोपजीवी वनस्पतींच्या अनेक आश्रय देणाऱ्या वनस्पतींपैकी शेवटचा ( निश्चित ).

**deflexed ( reflexed )** बहिर्नत

बाहेरच्या बाजूस वाकलेले; उदा. संकेश्वराची केसरदले.

**defoliation** पर्णत्यजन; पर्णत्याग; पानगळ

निसर्गतः पानांचा त्याग करण्याची ( पाने गळण्याची ) प्रक्रिया.

**deformation** विरूपण; विकृति

कुरूपता येण्याची प्रक्रिया; रोग, जखम इत्यादी कारणांमुळे अवयवांना अनित्य आकार येणे; उदा. पाने किंवा फळे वाकडीतिकडी होणे.

**deformity** विकृति; विद्रूपता

अनित्य आकार; नित्यस्वरूपात बदल.

**degeneration** अवनति; ऱ्हसन; अपकर्ष

निकृष्टपणा येण्याची प्रक्रिया; विशिष्ट अवयवांतील कार्यक्षमता व त्यांचे मूलस्वरूप यात कमीपणा येणे; एखादी पिढी व जाती क्रमाने निकृष्ट होत जाणे; उदा. पानांऐवजी खवले येणे; जलवनस्पतीतील संरचनेत काही भागांचा ( उदा. वाहक संच, काठिण्य, इ. ) अंशतः लोप होण्याची घटना.

**degradation** परागति; प्रतिगमन

पहा retrogression.

**dehiscence** स्फुटन; स्फोट

बीजुकाशय, बीजुककोश, परागकोश किंवा शुष्क फळे यांची आपोआप तडकण्याची प्रक्रिया; उदा. शेवाळी; नेचे; बोंड, शेंगा इत्यादी फळे.

**—, lateral** पार्श्विक स्फुटन

बाजूच्या चिरीतून किंवा भोकातून फुट्न बी किंवा बीजुके बाहेर पडण्याचा प्रकार; उदा. एक्विसीटमचा बीजुककोश; काही नेचांचे बीजुककोश; बहुतेक परागकोश ( जास्वंद; धोत्रा ); मोहरीची फळे व वाटाण्याच्या शेंगा; भेंडी सापसंद यांची फळे.

**dehiscent** स्फुटनशील; फुटीर

आपोआप तडकणारे (अवयव); उदा. फळ, बीजुककोश, इ.

**dehydration** निर्जलीकरण

पदार्थातील पाणी काढून टाकण्याची प्रक्रिया.

**deletion** लोप; उच्छेद; वगळणे

रंगसूत्राच्या मधल्या भागाचा नाश होण्याची प्रक्रिया; यात तर्कुयुज नसतो.

**delimitation** परिच्छेदन

निश्चित मर्यादा घालून काही भाग वेगळा करणे; उदा. एखाद्या कोशिकेतील प्राकलाचा काही भाग विशिष्ट कार्याकरिता मध्ये पडदा घालून वेगळा करणे.

**delimited** परिछिन्न

वर वर्णन केल्याप्रमाणे वेगळा केलेला (भाग); उदा. शैवले, कवक.

**deliquescent** (१) बहुशाखित; (२) विघळणारा

(१) जमिनीवर वाढणाऱ्या प्रमुख अक्षावर [खोडावर] काही उंचीवर अनेक फांद्या असलेली वनस्पती; उदा. वड.

(२) हवेतील ओलावा शोषून काहीसा अर्धवट विरघळत जाणारा अवयव; उदा. काही कवक; काहींच्या फुलातील परिदले; उदा. केना; इकॉर्निया इ. पहा Phallaceae.

**dendroid** शाखित; वृक्षाभ

वृक्षासारखा; अनेक शाखा असलेला.

**dendrology** वृक्षविज्ञान
वृक्षासंबंधीच्या माहितीची ज्ञानशाखा.

**denitrification** विनायट्रीकरण
नायट्रोजनयुक्त पदार्थातील अपघटनामुळे नायट्रोजन वेगळा होऊन जाणे.

**de novo** नवीन; नूतन
पूर्वी असलेल्यापासून नसून, पूर्णपणे नवी उत्पत्ती.

**dentate** प्रदंतुर; दंतुर; सरलदंती
बाहेरच्या बाजूस टोके असलेले दात असणारी ( कडा किंवा किनार ); उदा. शिंगाडा.

**denticulate** लघुदंतुर
बाहेर टोके असलेले पण लहान दाते असणारी ( किनार ).

**depressed** अवनत
झुकलेला किंवा खाली दबलेला ( भाग ).

**dermatogen ( protoderm )** त्वचाजनक
खोड अथवा मूळ यांच्या टोकास असलेल्या व सतत वाढ चालू असलेल्या भागातील सर्वात बाहेरचा कोशिकांचा थर; यापासून अपित्वचा बनते. पहा protoderm.

**dermis** त्वचा
कोशिकांचा थर; पहा epidermis, hypodermis, endodermis, इ.

**descending axis** अवरोही अक्ष
खाली वाढत जाणारा वनस्पतीचा आस.

**— ovule** अवरोही बीजक
किंजपुटाच्या बाजूच्या भिंतीत उगम पावून खाली वाढत गेलेले बीजक.

**descent** ( १ ) अवरोह; ( २ ) अवतरण
( १ ) भूमीत किंवा भूमीकडे खाली वाढण्याची ( वाहण्याची ) प्रक्रिया.
( २ ) एका पिढीतून दुसरी पिढी याप्रमाणे चालू राहणारा क्रम.

**— , doctrine of common** सामान्य अवतरण सिद्धांत
सर्व सजीव सारख्याच व प्राचीन ( प्रारंभिक ) पूर्वजांपासून क्रमाक्रमाने बदल होत जाऊन सद्यस्थितिप्रत आले आहेत अशी सजीवांच्या उत्पत्तीची ( क्रमविकासाची ) उपपत्ती; पहा evolution.



**— of sap** रसावरोह
वनस्पतींच्या शरीरातील रस वरून खाली उतरण्याचा प्रकार; पानात निर्माण झालेले अन्न ह्या प्रवाहामुळे खोडात व मुळात येते व त्याचा संचय होतो किंवा त्यांची वाढ होते.

**desert** मरुभूमी; मरुस्थल
रूक्ष प्रदेश; पाण्याची कमतरता, भयंकर उष्णता, कडाक्याची थंडी, रेताड किंवा खडकाळ जमीन इत्यादीमुळे वनस्पतींच्या वाढीस प्रतिकूल असा प्रदेश; उदा. गोबी, सहारा, कलहारी, ध्रुव प्रदेश, कच्छचे रण इ.

**— flora** मरुपादपजात
प्रतिकूल परिस्थितीतही (वर वर्णिल्याप्रमाणे) वाढणाऱ्या वनस्पतींचा समूह.

**desertion of host ( lipoxeny )** आश्रयत्याग
ज्या सजीवावर आपली उपजीविका चालू असते तिला विशिष्ट काली सोडून अलग होण्याची प्रक्रिया; उदा. अर्गट.

**dessication** आर्द्रशोषण
ओलावा काढून घेण्याची कृति (प्रक्रिया).

**destarched** नितौंकीकृत
विशिष्ट अवयवात असलेले तौकीर ( स्टार्च ) नाहीसे केलेले अथवा त्याचे साखरेत रूपांतर करून ते इतरत्र नेलेले.

**destructive metabolism (katabolism)** अपचय; विध्वंसक (भंजक) चयापचय
संयुक्त अन्नकणांचे अथवा ऊतकांचे अनुक्रमे साध्या पदार्थात अथवा थोड्याफार नाशात रूपांतर करण्याची रासायनिक प्रक्रिया; उदा. रुजणाऱ्या बिया, बटाटे व तत्सम कंद अथवा मुळे.

**determinant** निर्धारक; गुणघटक ( कारक )
संततीत उतरणाऱ्या गुणांची ( लक्षणांची ) अगाऊ निश्चिती करणारा प्रजोत्पादक कोशिकेच्या (गंतुकाच्या) रंगसूत्रांतील घटक; याचे स्वरूप जनुक प्रकारचे असते; जनुके व त्यांचे रासायनिक स्वरूप याबद्दलच्या कल्पना आता काही अंशी निश्चित झाल्याने, वरील संज्ञा आता फारशी प्रचारात नाही; पहा gene.

**determinate** (१) निश्चित; निर्धारित; (२) कुंठित
(१) पुढे कोणती घटना, ऊतक, गात्र इ. होणार त्याची अगाऊ निश्चिती. (२) टोकावरच्या फुलामुळे मर्यादित झालेल्या अक्षाचा फुलोरा; वल्लरी.

**— growth** निश्चित वर्धन ( वृद्धि )
वनस्पतींच्या कोणत्याही अवयवाची आधी निश्चित झालेली अथवा मर्यादित वाढ; यामुळेच प्रत्येक वनस्पतीचे अवयव जातीधर्माप्रमाणे ठराविक प्रमाणातच वाढतात.

**determination** निश्चिती; निर्धारण; निर्णय
निश्चित करणे; उदा. वनस्पतीचे नाव ( ती पूर्वी नोंदली असल्यास ) व तिचे वर्गीकरणातील स्थान नक्की करणे.

**— of sex** लिंगनिश्चिती; लिंगनिर्णय
भावी पिढीतील संततीच्या लिंगभेदासंबंधी फलनापूर्वी अथवा फलनक्रियेत घडून येणाऱ्या घटना; कोणत्या प्रक्रियेमुळे नर किंवा मादी निर्माण होईल याच्या अन्वेषणामुळे मिळालेली माहिती.

**Deuteromycetes (Deuteromycetae; Fungi Imperfecti )** अपूर्ण कवक वर्ग; ड्युटेरोमायसेटीज ( ड्युटेरोमायसेटी )
ज्यांच्या विषयी पूर्ण माहिती उपलब्ध नाही किंवा त्यांच्या प्रजोत्पादक अवयवांसंबंधी पूर्ण कल्पना येत नाही व त्यामुळे ज्यांचा इतर कवकवर्गांत अंतर्भाव करता येत नाही अशा कवकांचा ( काहीसा तात्पुरता ) गट. पहा Eumycophyta.

**development** विकास; विकसन
प्राप्त परिस्थितीत सजीवाच्या किंवा त्याच्या एखाद्या अवयवाच्या प्रारंभिक अवस्थेपासून ते पूर्णावस्थेपर्यंत होणाऱ्या बदलाची प्रक्रिया; यामध्ये संचरनात्मक प्रभेदन अभिप्रेत असते.

**deviation** विचलन; अपगम
ठराविक अवस्थेपासून किंवा नित्यस्थितीपासून काही कारणामुळे ( उदा. भेदामुळे ) घडून आलेला बदल. उदा. एखाद्या फळाच्या किंवा बियाच्या वजनात किंवा आकारमानात आणि नित्याच्या सरासरी वजनात किंवा आकारमानात आढळलेला फरक.

**dextral ( dextrorse, clockwise, right-handed )** सव्य; दक्षिणावर्त; उजवा
पहा clockwise.

**— twiner** सव्य वलयिनी; उजवी वेल
पहा clockwise twiner.

**di-** द्वि-
दोन किंवा दुप्पट या अर्थाचा उपसर्ग.

**diad ( dyad )** युगुल; जोडी; द्वय
उदा. द्विसंयोजी रंगसूत्रे.

**diadelphous** द्विसंघ
केसरदलांचे दोन जुडगे ( गट ) असलेले; उदा. अगस्ता, वाटाणा यांच्या फुलातील केसरमंडले.

**diageotropic** क्षितिजानुवर्तनी; भूपृष्ठानुवर्तनी
क्षितीजाशी किंवा भूपृष्ठाशी समांतर ( आडवी ) वाढत राहणारी किंवा गुरुत्वाकर्षणाच्या रेषेशी काटकोनात वाढणारी; उदा. मुळाची अगर खोडाची बाजूची फांदी; काही फुलांचे देठ, पाने इ.

**diageotropism** क्षितिजानुवर्तन; भूपृष्ठानुवर्तन
वर वर्णन केल्याप्रमाणे वाढीची प्रक्रिया किंवा प्रवृत्ती; गुरुत्वाकर्षणाच्या चेतनेमुळे दर्शविलेली ( वाढ अभिप्रेत असलेली ) प्रतिक्रिया.

**diagnosis** प्रवर्णन
लॅटिन भाषेत वनस्पतीचे अधिकृत व आंतरराष्ट्रीय संकेतानुसार केलेले वर्णन.

**diagonal plane** कर्ण-प्रतल
फुलाच्या पुढच्या ( पुरश्च; खोडापासून दूरच्या ) व मागच्या ( पश्च, खोडाजवळच्या ) बाजूतून जाणारी पातळी व ह्या पातळीस काटकोनात छेदणारी पातळी ह्यां दोन्हींच्या मधल्या कोनाला सारखी विभागणारी तिसरी पातळी. पहा anterior; posterior.

**diagrammatic representation** रेखाकृति प्रतिरूपण
वस्तूचा, व्यक्तीचा किंवा अवयवाचा आकार किंवा रचना रेषांनी दर्शविणारी आकृती.

**diaheliotropic** प्रकाशजात्यानुवर्तनी
प्रकाशकिरणांशी काटकोनात वाढणारे; उदा. सामान्य ( द्विपार्श्व ) पाने.

**diaheliotropism** प्रकाशजात्यानुवर्तन
वर वर्णिलेली वनस्पतींच्या काही अवयवांची प्रतिक्रिया; उदा. पानांची ( सामान्यपणे ) स्थिती.

**diakinesis** चतुष्ट्यावस्था
प्रकलाच्या न्यूनीकरण विभाजनातील मध्यावस्थेतील रंगसूत्रांची अंतिम स्थिती; यावेळी समजात रंगसूत्रांच्या जोड्या तयार होऊन त्यांच्या अर्धांनी आपल्या काही भागांची अदलाबदल केलेली असते, प्रकलावरण अद्याप टिकून असते व एकंदर रंगसूत्रे चारीच्या संचात असतात.

**Dialypetalae ( Polypetalae )** मुक्तप्रदली गोत्र
द्विदलिकित वनस्पतींतील संवर्त व सुट्या पाकळ्या असलेल्या फुलांच्या वनस्पतींचा एक गट; एका गोत्रात

अनेक गण व कुले असून वरील लॅटिन संज्ञा एंडलिकर व जुस्यू या वनस्पतिशास्त्रज्ञांनी दिली आहे; पहा cohort ( गोत्र ).

**diandrous** द्विकेसरी

फक्त दोन केसरदले असलेले; उदा. जाई, जुई, इत्यादींची फुले.

**diaphragm** अंत:पटल; मध्यपट

शरीरांतर्गत पातळ पडदा; उदा. कमळाचा देठ.

**diarch** द्विसूत्र; द्विसूत्री

खोड व मूळ यांच्या अंतर्रचनेत दोन ठिकाणी आद्यप्रकाष्ठ असलेले ( प्रकाष्ठ अगर रंभ ).

**— stele** द्विसूत्र रंभ

उदा. काही नेचे.

**diastase (amylase)** डायास्टेज

तौकिराचे शर्करेत रूपांतर करणारे कार्बनी निदेशक ( वितंचक ).

**diaster stage** द्वितारकावस्था

समविभाजनात रंगसूत्रे विभागून कोशिकेच्या दोन टोकाकडे जात असताना ( मध्यावस्था ) त्यांच्या दोन तारकेसारख्या होणाऱ्या आकृती.

**diastole** प्रसरण

जीवद्रव्यातील ( प्राकलातील ) संकोचशील रिक्तिकांचे ( रित्या जागांचे ) प्रसरण पावणे; पहा systole.

**Diatomaceae (Bacillariophyceae; Diatomeae; Diatoms)** करंडक कुल; डायाटोमेसी; बॅसिलॅरिओफायसी

शैवल वनस्पतींपैकी अेककोशिक व एकावर दुसरे डबीप्रमाणे ( करंड्याप्रमाणे ) बसणाऱ्या दोन ( वालुकामय झाकणाचे ) सारख्या भागांचे शरीर असलेल्या गोड्या किंवा खाऱ्या पाण्यातील सूक्ष्म वनस्पती.

**diatomaceous earth** करंडकीय मृदा

करंडक वनस्पतींच्या मृत शरीराची अवशेषरूप माती ( रेती ).

**dicarpellary** द्विकिंज

पहा bicarpellary.

**dicaryon** प्रकलयुग्म

एका कोशिकेच्या प्राकलात असलेल्या दोन स्वतंत्र प्रकलांच्या संयोगाचा एक संयुक्त प्रकल, अथवा हे सतत जोडीने पण अलग राहणारे दोन प्रकल; उदा. काही कवक ( तांबेरा ).

**dichasial cyme (dichasium)** द्विशाख वल्लरी

पहा biparous cyme.

**dichlamydeous** द्वयावृत

संवर्त व पुष्पमुकुट अशी दोन परिदलमंडले असलेले ( फूल ); उदा. चिंच, बाहवा, गुलाब; पहा monochlamydeous, achlamydeous.

**dichogamy** भिन्नकालपक्वता; असमपक्वता

केसरदले व किंजदले एकत्र असूनही ( एकाच फुलात ) एकाच वेळी पक्व न होण्याचा प्रकार; यामुळे परपरागण अथवा असमयुति सहज साध्य होते. फुलझाडांखेरीज इतर वनस्पतींच्या बाबतीतही ही संज्ञा वापरतात.

**dichotomous** द्विशाखी

एका अक्षाच्या टोकाची कळी विभागून दोन अक्ष वाढतात व पुढे त्या प्रत्येकाची वाढ तशाच प्रकारे होते; उदा. डिक्टिओटा शैवल; रिक्सिया शेवाळी; केवडा; शंखपुष्पी ( Canscora sp. ); भोकर ( *Cordia dichotoma* Forst. ) इ.

**dichotomy** द्विशाखाक्रम; द्विपदशाखाक्रम

प्रमुख खोडाच्या टोकास वाढ थांबून, बाजूच्या बगलेतून दोन फांद्या (अक्ष) वाढून व त्याच पद्धतीने वाढ चालू राहून शाखाविस्तार होण्याचा प्रकार.

**—, false** छद्मी ( आभासी ) द्विशाखाक्रम

अक्षावरची शेंड्याची कळी निसर्गतः किंवा अपघाताने नाश पावल्याने बाजूच्या दोन शाखा पुढे वाढून व याचीच पुनरावृत्ती होऊन झालेली द्विशाखायुक्त मांडणी; शेंड्यावर फूल येऊनही वाढ खुंटते व बाजूच्या उपाक्षांची वाढ होते; हाच प्रकार पुनः पुनः होऊन द्विशाखाबंध होतो; उदा. गुल्बुश, करवंद, खैरचाफा, हाडमोड ( *Viscum album* L.).

**diclinous** विभक्तलिंगी

नर व मादी हे दोन प्रकारचे प्रजोत्पादक अवयव एकत्र ( एका फुलात ) नसणारे ( फूल ); उदा. मका, एरंड, काकडी इ. पहा unisexnal; imperfect.

**dicliny** विभक्तलिंगता

वर वर्णन केलेला प्रकार अथवा स्थिती.

**Dicotyledoneae (Dicotyledons)** द्विदलिकित वनस्पति वर्ग

बीजामध्ये दोनच दलिका ( गर्भावस्थेतील पाने ) असलेल्या वनस्पतींचा मोठा गट; याचा अंतर्भाव फुलझाडांमध्ये ( आवृतबीज वनस्पतींच्या उपविभागात )

करतात; सामान्य भाषेत ' द्विदल वनस्पती ' म्हणतात. दुसरा वर्ग एकदलिकितांचा होय. पहा Monocotyledoneae; Angiospermae; Gymnospermae; Phanerogamae; cotyledon.

**dicotyledonous** द्विदलिकित; द्विबीजपत्री

दोन दलिका ( डाळिंब्या ) असलेले ( बीज ); उदा. पावटा, मोहरी, आंबा, इत्यादी. अशी बीजे असलेल्या सर्व वनस्पतींना हेच विशेषण सामान्यपणे लावतात. ' द्विदळ ' अशी संज्ञा सामान्यपणे रूढ आहे. ह्या वनस्पतींची इतर प्रमुख लक्षणे : पानांमध्ये शिरांचे जाळे; खोडात सतत वाढणाऱ्या वाहक वृंदाचे वर्तुळ; बहुवर्षीय वनस्पतीत द्वितीयक वृद्धी; फुलातील प्रत्येक मंडलात ४–५ पुष्पदले; फळे व बीजे विविध प्रकारची. उदा. निंब, पिंपळ, बाभूळ, साग.

**— embryo** द्विदलिकित गर्भ

दोन दलिका ( डाळिंब्या ) असलेला गर्भ; पहा cotyledon.

**dictyostele** जालरंभ; बहुलाद्यरंभ

अनेक प्रारंभिक ( साधे ) रंभ असलेले; उदा. नेफ्रोलेपिस नेचा; पहा protostele.

**dicyclic** द्विचाक्रिक; द्विमंडलित

विशिष्ट प्रकारच्या पुष्पदलांची एकाऐवजी दोन मंडले असणारे ( फूल ); उदा. मोहरीच्या फुलातील केसरमंडल; निशिगंधा ( गुलछडी ) च्या फुलातील परिदले; हिरव्या चाफ्याचे फूल.

**didymous** द्विभक्त

( १ ) फलांशाच्या जोड्या असलेले ( फळ ); उदा. धणे; जिरे; अरसूळ ( *Canthium didymum* Gaertn. );

( २ ) दोन भाग असलेले; उदा. काही परागकोशखंड; उदा. साल्हिया.

**didynamous** दीर्घद्वयी; द्वयोन्नत

दोन लांब व दोन आखूड केसरदले असलेले; उदा. तुळशीच्या फुलातील केसरमंडल; पातेरी, टोरेनिया.

**differentiated** विभेदित

आकार व संरचना यात विशेष रीतीने फरक ( भेद ) पडलेले ( शरीर किंवा अवयव ).

**differentiation** प्रभेदन; विभेदन

शरीरातील भिन्न कार्याला उपयुक्त असे भिन्न संरचनेचे व आकारमानाचे घटक बनण्याची प्रक्रिया; अवयवांच्या विकासात ही प्रक्रिया प्रमुखपणे आढळते; संरचनेत भेद वाढत जाणे हे येथे अभिप्रेत आहे.

**diffuse** प्रसृत; विरळशाखी

पसरून वाढणारी वनस्पती.

उदा. पुनर्नवा ( *Boerhaavia diffusa* L.).

**diffusion** विसृति; विसरण

वनस्पतींच्या शरीराबाहेरील वायू, पाणी, जमिनीतील विद्राव ( त्यातील आयने) इत्यादींचा भौतिक नियमाने होणारा शरिरात प्रवेश; विशिष्ट परिस्थितीत त्यांचे आतून शरीराबाहेर येणे; पहा gland; stoma, hydathode, osmosis.

**digestive gland** पचन प्रपिंड; पचन ग्रंथि

अन्नाचे सात्मीकरण होण्यास त्याचे रूपांतर करण्याकरिता उपयुक्त द्रव पदार्थ ( उदा. वितंचक ) स्रवणारे उपांग ( संरचना, ग्रंथि, कोशिका, इ. ); उदा. कीटकभक्षक वनस्पती.

**— sac** पचनकोश

मुळातून त्याची शाखा बाहेर पडत असताना मुळाच्या सालीतून बाहेर पडण्याचा मार्ग मोकळा करणारे (काही ऊतकांचे पचन करणारे– रुपांतर घडविणारे ) शाखेच्या टोकावरचे आवरण; यामध्ये अंतस्त्वचा व त्याबाहेरील काही ऊतकांचा समावेश होतो.

**digitaliform** हस्ताकृति

हातमोज्याप्रमाणे आकार असलेले; उदा. तीळ, विंचवी, तिलपुष्पी (*Digitalis purpurea*) इत्यादींच्या फुलांचे पुष्पमुकुट.

**digitate** चपेटाकृति

बोटासह तळहाताप्रमाणे ( पंज्याच्या ) आकाराचे; उदा. सावर, पून, गोरखचिंच इत्यादींची संयुक्त पाने; भुईकोहोळा ( *Ipomea digitata* L.)

**digonous** द्विकोनी

आडवे कापल्यास दोन कोन दिसणारे; उदा. काही निवडुंग–प्रकारांची खोडे.

**dihybrid–cross** गुणद्वय-संकर

दोन वैकल्पिक गुणांच्या जोड्यांनी भिन्न असलेल्या वनस्पतिप्रकारांचा केलेला संकर; यांच्या संततीस द्विसंकरज म्हणतात; पहा allelomorphic; cross.

**— ratio** द्विसंकरज गुणोत्तर

वर वर्णन केलेल्या संकर-प्रजेच्या पुढील पिढीतील

अपत्यांचे परस्परांशी प्रमाण, मेंडेलच्या प्रयोगात ९ : ३ : ३ : १ होते.

**dihybridisation** द्विसंकरण
वर सांगितलेली गुणद्वय संकरप्रक्रिया (प्रयोग).

**dilation** विस्तार; विस्फारण
प्रकाष्ठाच्या परिसरातील मृदूतकाच्या कोशिकांच्या विभागणीमुळे प्रकाष्ठात मधून मधून खंड पडल्यामुळे ते सर्वच फुगण्याचा प्रकार.

**Dilleniaceae** करंबळ कुल; डायलेनिएसी
करंबळ, करमळ इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; एंग्लरच्या पद्धतीत याचा समावेश पराएटेलीझ गणात व हचिन्सन यांनी याचा अंतर्भाव करंबळ गणात (डायलेनिएलीझमध्ये) केला आहे. प्रमुख लक्षणे : वृक्ष, झुडुपे कधी वर चढणारी; जाड एकाआड एक पाने व कुंठित फुलोऱ्यावर द्विलिंगी, अवकिंज फुले; सदले ३–५ किंवा अनेक व सर्पिल आणि फळावर सतत राहतात; पाकळ्या ३–५ व सुट्या; केसरदले अनेक; तसेच किंजदले १ ते अनेक, सुटी किंवा जुळलेली व बीजकेही एक किंवा अनेक. मृदुफळ किंवा पेटिकाफळ; सपुष्क बीजावर बीजोपांग.

**dimerous** द्विभागी
प्रत्येक मंडलात दोनच पुष्पदले असणारे (फूल); उदा. मोहरी.

**dimorphic** द्विरूप
दोन आकारात आढळणारे (अवयव; सजीव). उदा. काही नेचांची पाने.

**dimorphism** द्विरूपता
वर वर्णन केलेला प्रकार; उदा. त्रिशकोप्रा.
पहा heterostyly; trimorphic.

**dioecious** विभक्तलिंगी
भिन्न लिंगभेद दर्शविणारे अवयव ( उदा. केसरदले किंजदले, अंदुककलश, रेतुकाशये, इ. ) दोन भिन्न वनस्पतींवर असणारी जाती; उदा. पपई; कुंकुमवृक्ष; सायकस; कॉलेर्पा आणि कोडियम या हरित शैवलांच्या काही जाती; एक्विसीटम अर्वेन्से; इ.

**dioecism** विभक्तलिंगता
वर वर्णन केलेला प्रकार.

**Dioscoriaceae** आलुक कुल; डायॉस्कोरिएसी
कणगर, गोराडू, कारांदा इत्यादी एकदलिकित वनस्पतींचे कुल. बेंथॅम व हूकर यांनी पलांडु गणात घातले आहे. प्रमुख लक्षणे : वेली; भूमिस्थित ग्रंथिल खोड व मुळे; साधी, एकाआड एक पाने ( जाळीदार शिरांची ); नियमित, एकलिंगी, त्रिभागी, लहान फुले भिन्न वनस्पतीवर असतात; अधःस्थ किंजपुटात १–३ कप्पे व प्रत्येकात २ बीजके; मृदुफळ किंवा बोंड; सपुष्क बी.

**diplo–** द्वि
जोडी या अर्थाचा प्रत्यय.

**-- coccus** द्विगोलाणु
जोडीने असणारे गोलाणु ( गोल सूक्ष्मजंतू ).

**— idization** द्विगुणन
कोशिकेतील रंगसूत्रांची संख्या दुप्पट होण्याची प्रक्रिया; एका एकगुणित प्रकलाऐवजी दोन तशीच प्रकले एकत्र यणे.

**— phase ( diploid phase )** द्विगुणितावस्था
शरीरातील सूक्ष्म घटकातील ( कोशिकातील ) रंगसूत्रांची संख्या दुप्पट असलेली ( पिढी ) अवस्था; यालाच diploid generation ( sporophyte generation ) म्हणतात.

**-- stemonous** द्विवर्तकेसरी
दोन केसरमंडलापैकी बाहेरची केसरदले पाकळ्याशी एकाआड एक असून आतील पाकळ्यासमोर असतात, अथवा बाहेरच्याशी एकाआड एक असतात.
पहा obdiplostemonous.

**-- temony** द्विवर्त केसरावस्था
वर वर्णिल्याप्रमाणे संरचनेचा प्रकार.

**— tegia** द्वयावृत बोंड
अधःस्थ किंजपुटापासून बनलेले व सतत संवर्तांने वेढलेले शुष्क फळ; उदा. वेलचीचे फळ; कर्दळ; आमर इ.

**— tene** द्विसूत्रावस्था; डिप्लोटीन
न्यूनीकरणाच्या ( प्रकलविभाजन ) तिसऱ्या अवस्थेत जाडी वाढलेल्या रंगसूत्रांच्या जोड्या प्रकलाच्या एका कोपऱ्यात जमण्याची स्थिती; पहा leptotene, pachytene.

**— xylic** द्विवृन्दक
दोन किंवा अधिक वाहक वृन्द असलेला ( अवयव ); उदा. चिलची पाने. ( *Pinus longifolia* Roxb.).

**Dipterocarpaceae** शाल कुल; डिप्टेरोकार्पेसी
चाल्न (गुर्जन), शाल (साल), बोर्निओ कापूर इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. बेंथॅम व हूकर यांनी वृंदार

(कोकम) गणात समावेश केला आहे. प्रमुख लक्षणे : साध्या एकाआड एक, जाड, सोपपर्ण पानांची उंच झाडे (वृक्ष); अकुंठित फुलोऱ्यावर, द्विलिंगी, नियमित, पंचभागी, अवकिंज फुले; ऊर्ध्वस्थ किंजपुटात तीन कप्पे व त्या प्रत्येकात दोन बीजके; सतत संवर्तांने वेढलेले कपाली सपक्ष फळ. साल ( *Shorea robusta* Gaertn. ).

**disc** बिम्ब; चकती

(१) फुलातील पुष्पदलांमध्ये पुष्पस्थलीची वर्तुळाकार चकतीसारखी वाढ.

(२) स्तबक फुलोऱ्यातील पसरट पुष्पासन.

(३) कंदातील खोडाचा संक्षिप्त चकतीसारखा भाग.

(४) थाळी, तबकडी, इत्यादी अर्थाने वापरतात.

पहा capitulum; head.

**—, adhesive** आसंगी बिम्ब

पहा adhesive disc.

**— - floret** बिम्बपुष्पक

गुच्छासारख्या ( स्तबक ) फुलोऱ्यातील बिम्बावरील (मध्यभागातील) लहान फुले; उदा. सूर्यफूल.

**Disciflorae** बिम्बपुष्पी श्रेणी

वर्गीकरणाच्या बेंथॅम् व हूकर यांच्या पद्धतीत फुलझाडांच्या द्विदलिकित वर्गातील सुट्या पाकळ्या असणाऱ्या उपवर्गातील बिम्बयुक्त फुले असलेल्या वनस्पतींची श्रेणी; पहा Thalamiflorae.

**disciform** बिम्बसदृश

सपाट व गोलाकार चकतीसारखे अथवा वर्तुळासारखे.

**discoid gland** बिम्बाभ प्रपिंड

चकतीसारखे किंवा अर्धगोलाकार डोके असलेली, लांब अथवा आखुड दांड्यावर आधारलेली स्रावक ग्रंथि.

**discolour** भिन्नवर्णी

दोन्ही पृष्ठभाग निरनिराळ्या रंगाचे असलेले; उदा. काळा चाफा ( *Unona discolour* Vahl. ); कानवला ( *Rhoeo discolour* Hans. ), बिगोनिया इ. ची पाने.

**discontinuous** खंडित; असंतत

सलगपणा (क्रमिकपणा) नसलेले (उदा. भेद).

**— variation** खंडित भेद

अनेक व्यक्तींमध्ये (एकाच जातीच्या ) आढळणाऱ्या सर्वात मोठ्या व सर्वात लहान अशा भेदांमध्ये ठराविक क्रमाचा अभाव. उदा. फळाचे सरासरी आकारमान व भेददर्शक असे मोठे फळ यामध्ये काही सलगपणा नसणे; पहा continuous variation.

**disjunction** वियोजन

प्रजोत्पादक कोशिका (गंतुके) निर्मिणाऱ्या जनक कोशिकेच्या न्यूनीकरण विभाजनात प्रथम एकत्र येणाऱ्या समजात लिंगसूत्रांच्या जोडीतील ( एक बापाकडील व एक मातेकडील) प्रत्येक नंतर नित्याप्रमाणे अलग होण्याची प्रक्रिया; त्यानंतर त्यापैकी प्रत्येक स्वतंत्र गंतुकात राहतो; रंदुकात ते दोन्ही परत एकत्र येतात. मात्र क्वचित ते वर सांगितल्याप्रमाणे अलग न होता दोन्ही एकाच गंतुकात येतात व दुसऱ्या गंतुकात त्या रंगसूत्राचा अभाव आढळतो. या प्रकारास 'अवियोजन' म्हणतात (non-disjunction); हाच प्रकार इतर रंगसूत्रांच्या बाबतीतही होणे शक्य असते. ह्यामुळे संततीच्या लिंगभेदात व काही लक्षणांत फरक (भेद) पडतात; तसेच विशिष्ट लिंगभेदयुक्त व्यक्तींचे प्रमाणही बदलते.

**disjunctive symbiosis** वियोजी (वियुक्त) सहजीवन

परस्परांचे कायम निकट संबंध न राखता चालू असलेले सहजीवन ( एकत्र जगणे ). उदा. पक्षी आणि वृक्ष यांचा सहवास फक्त फळे खाण्यापुरता किंवा रात्री घरट्यात विश्रांतीकरताच असतो; ते कायमपणे चिकटलेले नसतात; पहा conjunctive symbiosis.

**dispersal** विकिरण; प्रसार

फळे, बीजे, बीजुके इत्यादींना जनक वनस्पतीपासून अलग करून इतरत्र नेण्याची नैसर्गिक प्रक्रिया.

**displacement** विस्थापन; स्थानच्युति

एखादा अवयव निसर्गतः अनित्य जागी येणे. उदा. सूर्यफुलाच्या पुष्पासनाखाली, बाजूस दुसरे लहान स्तबक ( फुलोरा ) आलेले क्वचित आढळते.

**dissection** विच्छेदन

विशिष्ट पद्धतीनुसार वनस्पती अथवा प्राणी व त्यांचे भाग अभ्यासाचे दृष्टीने सुटे करणे, कापणे इत्यादी प्रक्रिया.

**dissected** ( १ ) खंडित; ( २ ) विच्छेदित

(१) निसर्गतः अनेक भाग पडलेले; उदा. पाण्यातील पाने; ( २ ) वर सांगितल्याप्रमाणे सुटे केलेले इ. (अवयव); उदा. फूल किंवा फळ.

**dissecting microscope** विच्छेदक सूक्ष्मदर्शक
सूक्ष्म विच्छेदनाकरिता सोइस्कर असे उपकरण.

**dissemination** प्रसार
विशेषतः सूक्ष्म प्रजोत्पादक घटकांचे मूळ वनस्पतींपासून अलग करून दूरवर नेण्याची प्रक्रिया. उदा. बुरशी व भूछत्रे यांची बीजुके; पहा dispersal.

**dissepiment (partition)** पटल
पातळ पडदा; उदा. किंजपुटात किंजदलाच्या आत वाढलेल्या बाजू जुळून तयार झालेला पडदा; त्यामुळे त्यात कप्पे तयार होतात. उदा. भेंडी.

**—, spurious (replum)** छद्मपटल
किंजपुटाच्या बाजूकडून ( शिवणीकडून ) नंतर आत वाढत आलेला पडदा; उदा. मोहरी

**dissimilar (unlike)** असम; विषम; असदृश
सारखेपणा नसलेला ( अवयव ); उदा. वाटाण्याच्या फुलातील पाकळ्या; मुळे व खोड यांची संरचना; मुळे, खोड व पाने अनेक दृष्ट्या विषम असतात.

**dissolved** विलीन
विरघळलेले.

**distal** दूरस्थ
दूर असलेला; दूरचा; उदा. पानाचे टोक देठाशी तुलना केल्यास खोडापासून दूर असते; पहा proximal.

**distillation** ऊर्ध्वपातन
एकादा द्रव पदार्थ उकळेपर्यंत तापवून व त्याची वाफ निववून तो परत द्रवरूपात ( बहुधा पूर्वीपेक्षा अधिक शुद्ध स्वरूपात) आणण्याची प्रक्रिया.

**distichous** द्विपंक्तिक
दोन रांगांत असलेली; उदा. गवताची पाने. राय-आवळा(*Phyllanthus distichous* Muell.).

**distinct** मुक्त; अयुक्त
सुटे; न जोडलेले (न जुळलेले); उदा. काही केसरतंतू, परागकोश खंड, किंजदले, इत्यादी पुष्पदले.

**diurnal (daily)** (१) दैनिक; (२) दिनचर
(१) दिवसा घडणारे; (२) दिवसा संचार करणारे.

**— sleep movements** दैनिक (दिवा) निद्रावलन
दिवसा (सूर्यप्रकाशात) रात्रीप्रमाणे घडून येणाऱ्या हालचाली; उदा. लाजाळू, तरवड, चिंच इत्यादींची पाने.

**divergence** परामुखता; अपसारण
परस्परांपासून दुरावत जाणे; उदा. ताड, एरंड इत्यादींच्या पानातील शिरा; रुईची दोन पेटिकाफळे; कुडा, माकडशिंगी, इत्यादींची फळे.

**—, angle of** उद्गमन कोन; परामुखता कोन
पहा angle of divergence.

**divergent** परामुख; अपसारी
परामुखता असलेले; परस्परापासून दूर होत गेलेल्या; (उदा. शिरा).

**divided** खंडित; मुक्त
सुटे; एकमेकांपासून तळापर्यंत अलग झालेले (भाग); उदा. संदले, प्रदले, पानांची दले; पुष्पदले इ.

**division** (१) विभाग; (२) विभाजन
(१) वर्गीकरणातील मोठा गट [ एकक ]; कोटीहून किंवा उपकोटीहून लहान.
(२) विभागण्याची प्रक्रिया. उदा. कोशिका, प्रकल.

**DNA** डीएनए
प्राणी व वनस्पती यांच्या शरीरघटकातील एक रासायनिक पदार्थ, डी ऑक्सिरिबोज न्यूक्लीइक ॲसिड; प्रकलातील एक अम्ल. पहा chromosome; nucleotide.

**domesticated** (१) संवर्धित; (२) पाळीव
(१) लागवडीमुळे टिकून राहिलेली ( वनस्पती ).
(२) पाळलेला प्राणी.

**dominance** (१) प्रभाव; (२) प्राधान्य
(१) संकराच्या प्रक्रियेत दोन वैकल्पिक गुणांपैकी एकाची अधिक छाप संकरजात दिसण्याचा प्रकार.
(२) वनस्पतिसमुदायातील काही व्यक्तींचा ठळकपणा.
(३) परिस्थितिविज्ञानात, एखाद्या पादपसमुदायातील प्रत्येक जातीच्या व्यक्तींनी व्यापलेली क्षेत्रमर्यादा; एखाद्या समुदायात अनेक थर असल्यास प्रत्येक थरातील प्रभाव स्वतंत्रपणे मोजला जाणे आवश्यक असते.

**dominant** (१) प्रभावी; प्रकट; (२) प्रधान
(१) संकरजात प्रत्यक्ष दिसून येणारे ( लक्षण ); पहा recessive.
(२) संगति व संघात यातील सर्वात प्रभावी वनस्पती; पहा association, consociation.

**— character** प्रभावी लक्षण ( गुण )
संकरजातील प्रकट लक्षण.

**dormancy** प्रसुप्तावस्था; तंद्रावस्था; प्रसुप्तता
पहा dormant

**dormant** (१) प्रसुप्त; (२) अप्रकट
(१) योग्य परिस्थितीच्या अभावी प्रकट न झालेले; उदा. कळी, बीज अथवा बीजुक यातील जीवन.
(२) दोन वैकल्पिक गुणांपैकी संकरप्रजेत न दिसणारा पण त्यापुढच्या पिढीतील काही अपत्यांत आढळणारे लक्षण; पहा allelomorph.

**— bud** सुप्तकलिका
तात्पुरती वाढ थांबलेली कळी; मुका डोळा.

**dorsal** पृष्ठीन; पृष्ठीय; पश्च
पाठीकडचा; पानाच्या बाबतीत वरची किंवा प्रकाशाकडे असलेली ( बाजू ); पहा adaxial.

**— suture** पृष्ठसेवनी
पाठीकडची शिवण; किंजदलाची मध्यशीर; उदा. वाटाण्याच्या शेंगेतील बीजके न चिकटलेली शीर; पहा ventral suture.

**dorsifixed ( adnate )** पृष्ठालग्न; पृष्ठाबद्ध
पाठीकडून चिकटलेले; उदा. कमळाचे परागकोश. पहा adnate.

**dorsiventral** द्विपार्श्व
दोन बाजू असणारे.

**— ( bifacial ) leaf** द्विपार्श्व पर्ण
बाह्य स्वरूप व अंतर्रचना या बाबतीत दोन बाजू स्पष्ट दर्शविणारे पान.

**— ( zygomorphic ) flower** द्विपार्श्व पुष्प
एक पुरस्थ अर्ध दुसऱ्या ( पश्च ) अर्धाहून भिन्न असणारे ( एकसमात्र ) फूल; उदा. तेरडा; पहा zygomorphy; anterior, posterior.

**dosage ( dose )** मात्रा
योग्य परिणामकारक व्हावे असे एखाद्या औषधाचे प्रमाण.

**double** द्विगुणित; दुहेरी; दुप्पट; द्वि– ( उपसर्ग )
दुप्पट भाग असलेले; उदा. पाकळ्या ( निशिगंध, तगर, मोगरा, जास्वंद, तेरडा, इ. ).

**— cross** दुहेरी संकर; द्विसंकर
एका संकरजाचा दुसऱ्या संकरजाशी घडविलेला संकर.

**— fertilisation** द्विफलन
फुलझाडाच्या बीजकातील अंदुकाशी परागनलिकेतील एका प्रकलाचा संयोग व दुसऱ्या प्रकलाचा दुय्यम प्रकलाशी संयोग; यामुळे गर्भ व पुष्क (गर्भाचे अन्न) यांची निर्मिती व त्यापासून बीज यांचा विकास होतो; पहा endosperm; secondary nucleus.

**— cross hybrid** द्विसंकरज
एका संकरजाचा दुसऱ्या ( भिन्न मातापित्यापासून झालेल्या ) संकरजाशी झालेल्या संकरामुळे निर्माण झालेली संतती.

**— samara** सपक्ष युग्मफल
पंखाचे जोडफळ ( उदा. मॅपल; ॲश ); हे शुष्क, द्विपुटक, ऊर्ध्वस्थ, पालिभेदी पंखधारी फळ असून त्याचे दोन सुटे पक्षधारी फलांश फलधराला ( दांड्याला ) तंतूने चिकटून राहतात; पहा schizocarp.

**down** मृदुलोम
मऊ लव; उदा. ऐसर ( ईश्वर ).

**downy** मृदुलोमश; लवदार
मऊ लव असलेले; उदा. रुई; तीळ; पहा pubescent.

**— mildew** तंतुभुरी
जीवोपजीवी कवकापासून होणारा रोग; यामुळे पानांवर पांढरट रंगाचे मऊ लवीसारखे कवकतंतूंचे ठिपके येतात; उदा. द्राक्षाच्या वेलीवर हा रोग होतो.

**draining point ( drip-tip )** निःसरणाग्र; प्रकुंचिताग्र
पहा acuminate apex.

**drepanium** वक्रवल्लरी; दात्रवल्लरी
कोयत्याच्या आकाराचा कुंठित फुलोरा; पहा helicoid.

**drooping** लोंबती; नत
खाली लोंबणारी; उदा. फुले ( कोरफड; कलांचो ); फांद्या, पाने ( हिरव्या अशोकाचा एक प्रकार ).

**drought** जलदुर्भिक्ष; जलाभाव
पाण्याची दुर्मिळता ( तुटवडा ); रुक्षता.

**— , physical** भौतिक ( वास्तव ) जलदुर्भिक्ष
वाळवंट किंवा खडकाळ ठिकाणी आढळणाऱ्या जमिनीतील पाण्याची टंचाई.

**— , physiological** क्रियावैज्ञानिक जलदुर्भिक्ष
जमिनीत पाणी असूनही, क्षार, लवणे, अम्लता, अतिथंडपणा, हवेचा अभाव इत्यादींमुळे शोषणास अडथळा येऊन जलाभावाचा अनुभव ( भासणारा तुटवडा ).

**—resistant** रुक्षताप्रतिरोधी
जलदुर्भिक्षतेशी समरस होण्याची क्षमता असलेले.

**drug** औषध
शरीरातील दोष नाहीसे करून आरोग्यप्राप्तीचा लाभ देणारा पदार्थ.

**drupe (stone-fruit)** अश्मगर्भी फळ; अष्ठीला; आठळी फळ; बाठी फळ
फलावरणाचा सर्वांत आतला भाग कठीण (कवचासारखा) असलेले (बाठी असलेले) रसाळ फळ; उदा. आंबा, बदाम, अक्रोड, जरदाळू, इ. पहा nut.

**—, fibrous** तंतुमय अश्मगर्भी फळ
रस किंवा मगज याऐवजी धाग्यांनी भरलेले पण करवंटी असलेले फळ; उदा. नारळ.

**drupelt** उपाष्ठीला
अनेक आठळ्यांच्या घोसफळातील एक; उदा. रासबेरी.

**duct** नलिका; वाहिनी
राळ, श्लेष्मल (चिकट) द्रव्य, चीक यांसारखे पदार्थ साठविणे, किंवा बाहेर टाकणे, याकरिता शरीरातील सलग नळीसारखा घटक किंवा कोशिकांमधून जाणारा मार्ग; उदा. चीड, चिल, अफू, सायकस इ.

**dulcis (sweet)** मधुर
गोड; खारट, तुरट, कडवट इत्यादी नसलेले; उदा. विलायती चिंचेतील (इंगा डल्सिस) बीजाभोवतालचा मगज; (*Pithecolobium dulce* Benth.).

**dune** वालुकाराशि
वाऱ्याने किंवा मोठ्या लाटांनी किनाऱ्यावर किंवा वाळवंटात जमलेल्या वाळूचे लहान मोठे ढीग (उंचवटे).

**duplex** द्विघटक
विशिष्ट आनुवंशिक गुणांचे बाबतीत आई किंवा बाप यांच्याकडून एकाच लक्षणाचे दोन प्रभावी गुणघटक संततीत उतरण्याची घटना; एकच प्रभावी घटक उतरल्यास एकघटक (simplex) आणि एकही न उतरल्यास अघटक (nulliplex) अशा संज्ञा आहेत; पहा dominant; allelomorph.

**duplication** द्विगुणन
दुप्पट होणे; उदा. फुलातील मंडले किंवा त्यातील अवयव; रंगसूत्रे; कोशिका इ.

**duplicate** द्विगुण्य; द्विरूप
दुप्पट संख्या असलेले; उदा. आनुवंशिक परिमाणात्मक लक्षणांचे संततीत अनुहरण होताना दोन प्रभावी घटक जबाबदार असण्याचा प्रकार; उदा. गव्हाचा रंग.



**duramen (heart-wood)** अंतःकाष्ठ
जून खोडाच्या मध्यभागी असलेले गडद रंगाचे (मृत) लाकूड; याचे कार्य फक्त मजबुती आणण्याचे असते; पहा alburnum.

**duration of life** आयुर्मान; आयुःकाल
वनस्पतीची सर्वसाधारण जीविताची मर्यादा.

**dwarf male** ऱ्हस्व पुं-तंतु; लघु नर
फार लहान आणि फक्त पुं-गंतुके निर्माण करणारा तंतू; उदा. इडोगोनियम शैवल.

**dwarf shoot** ऱ्हस्व प्ररोह; लघु शाखा
(१) केवळ दोन किंवा तीन पाने असणाऱ्या लहान मर्यादित शाखा; उदा. चीड, चिल, इ.
(२) अत्यंत मर्यादित वाढ असणाऱ्या शाखा; उदा. फणसाच्या खोडावरील फुलोऱ्याच्या शाखा.

**dwarfishness (dwarfism)** ऱ्हस्वता; लघुत्व
खुजेपणा; खुरटेपणा; वाढीमध्ये दोष निर्माण झाल्यामुळे आलेला अथवा कृत्रिमरीत्या आणलेला; साधारणपणे निसर्गतः रुक्ष प्रदेशातील वनश्री खुरटी असते.

## E

**e** - हीन
नकार (अभाव) दर्शक उपसर्ग; मराठीत प्रत्ययाप्रमाणे – 'हीन' वापरतात; पहा ebracteate.

**ear** (१) कर्ण; (२) संयुक्त कणिश
(१) सामान्य अर्थाने कान अथवा तत्सम भाग.
(२) अनेक लहान कणिशांचा छदयुक्त फुलोरा; उदा. मका; पहा spike, spiklet.

**earlier** पूर्वतर
अधिक आरंभी असलेले.

**earliest** पूर्वतम
सर्वांत आरंभी असलेले.

**early** पूर्व
आरंभी असलेले.

**earth** मृदा; मृत्तिका; माती

**Earth** पृथ्वी

**Ebenaceae** टेंबुर्णी (तिंदुक) कुल; एबेनेसी
टेंबुर्णी, काकी, तिमरू, तेंडू, अबनुस इत्यादी द्विदलिकित फुलझाडांचे कुल. याचा अंतर्भाव तिंदुक गणात

( एबेनेलीझ ) मध्ये करतात. बकुल कुलाशी ( सॅपोटेसी ) याचे निकट संबंध आहेत. प्रमुख लक्षणे : वृक्ष व झुडपे; साधी, अखंड व चिवट पाने. नियमित, बहुधा विभक्तलिंगी, सच्छदक, ३–७ भागी फुले; परिदले जुळलेली; संवर्त सतत राहणारा; पुष्पमुकुट संवलित; केसरदलांची दोन मंडले व तळाशी ती पाकळ्यास चिकटलेली; ऊर्ध्वस्थ किंजपुट; किंजदले २–१६ व जुळलेली. मृदुफळ; क्वचित तडकणारे फळ; सपुष्क बिया.

**ebracteate** छदहीन

छद (फुलाच्या तळाशी असलेले उपांग ) नसलेले ( फूल ); उदा. संकेश्वर, मोगरा इ.

**ecalcarate** शुंडिकाहीन

शुंडिका नसलेले; पहा calcarate.

**ecesis** वसन प्रक्रिया; स्थिरावणे

नव्या जागी आक्रमक वनस्पतींचे बी अथवा बीजुक रुजून नवीन वनस्पती वाढणे, प्रजोत्पादन होणे व अशा रीतीने ती स्थिर होणे; पहा invasion.

**echin–** कंटकित; ( ग्रीक उपसर्ग )

**echinate ( prickly )** कंटकित; काटेरी

मजबूत, काटे असलेली ( वनस्पती; अवयव, इ. ) उदा. उटकटारी ( *Echinops echinatus* Roxb. ).

**eciliate** केसलहीन; पक्ष्माभिकाहीन

केसले नसलेला ( अवयव, उपांग ); पहा cilium.

**ecology ( oecology )** परिस्थितिविज्ञान; स्थलविज्ञान; पारिस्थितिकी

वनस्पतींच्या परिस्थितिसापेक्ष अभ्यासाने मिळविलेल्या ज्ञानाची शाखा.

**economic botany** आर्थिक वनस्पतिशास्त्र (वनस्पतिविज्ञान);

व्यावहारिक किंवा सांपत्तिक दृष्टीने उपयुक्त अशी वनस्पतींच्या अभ्यासाची ( अन्वेषणाची ) ज्ञानशाखा.

**ecorticate** मध्यत्वचाहीन

मध्यत्वचा अगर तत्सम ऊतक नसलेले; उदा. कांडशरीरिका ( कारेसी ) शैवल वर्गातील काही वनस्पती; पहा *Characeae*.

**ecostate** सिराहीन

शिरा नसलेले ( पान अथवा तत्सम अवयव ); मांसल पानावर शिरा दिसत नाहीत; उदा. पानफुटी, घायपात, इ. पहा unicostate, multicostate.

**ecto–** बाह्य–

बाहेरचे या अर्थी उपसर्ग.

**ectoparasite** बाह्योपजीवी

आश्रयाच्या पृष्ठभागावर राहून आतील अन्नरस शोषून घेणारे; उदा. अमरवेल; काही कवक.

**ectophloic** बाह्यपरिकाष्ठी

केवळ बाहेरच्या बाजूस परिकाष्ठ असलेला ( रंभ ); उदा. बहुतेक सर्व खोडात आतील बाजूस प्रकाष्ठ व त्या बाहेर परिकाष्ठ असते; काही नेचे ( ऑस्मुंडा ) व तत्सम वनस्पती यांच्या खोडात आत व बाहेर परिकाष्ठ असते. पहा siphonostele; stele.

**ectoplasm ( ectoplast )** बाह्यप्राकल

कोशिकेच्या आवरणाच्या आतील बाजूस असलेला प्राकलाचा ( जीवद्रव्याचा ) थर; हा अधिक दाट व पारदर्शक असतो.

**ectotrophic (ectophytic) mycorrhiza** बहिःस्थित संकवक

इतर झाडांच्या मुळांच्या पृष्ठभागावर आश्रय घेणारे व आपली उपजीविका चालविणारे कवक; हे मुळाला जमिनीतील अन्नरस उपलब्ध करून देते; उदा. चीड. सहजीवनाचा एक प्रकार; पहा symbiosis.

**edaphic** भौम

वनस्पतींना आधारभूत अशी मुख्यतः जमीन, पाणी, अन्य वनस्पती, कुजणाऱ्या काटक्या, प्राणिज पदार्थ इत्यादींचा या संज्ञेत समावेश होतो.

**— factor** भौम घटक

वनस्पतिजीवनावर परिणाम करणाऱ्या भूमिविषयक वर सांगितलेल्या बाबींचा तपशील; उदा. जमिनीचे काठिण्य, रंग, रासायनिक घटना, ओलावा, लवणे, सूक्ष्मजंतू, हवा, प्राणी इ.

**edge (margin)** धारा; किनार

पानाची किंवा तत्सम अवयवांची कडा.

**efflux** बहिर्वाह; उत्प्रवाह

बाहेर वाहून येण्याची क्रिया किंवा तो पदार्थ.

**egg (egg-cell)** अंदुक; स्त्री-गंतुक; अंडपेशी; अंडे

प्रजोत्पादनाचे सामर्थ्य (क्षमता) असलेली स्त्री-लिंगधारक कोशिका.

**— apparatus** अंदुक परिवार

फुलझाडांतील बीजकांच्या गर्भकोशांतील बीजरंध्राच्या जवळ असलेल्या अंदुकाजवळच्या दोन सहचर कोशिका व अंदुक; पहा synergidae.

**— shaped ( ovate )** अंडाकृति

तळाशी गोलसर व टोकाकडे निमुळते होत गेलेले; उदा. वड, पारिजातक, जास्वंद, इत्यादींची पाने, काही फळे, पाकळ्या, छदे, संदले, उपपर्णे, इ.

**ejection** विक्षेपण

आतून जोराने फेकण्याची प्रक्रिया; उदा. काही बीजे व बीजके.

**ejectory mechanism** विक्षेपक यंत्रणा ( योजना )

वर वर्णन केल्याप्रकारची कार्यकारी योजना; उदा. तेरडा, संकेश्वर, एरंड; इ. ची फळे; नेफ्रोलेपिस नेचा (बीजुक-कोश); काही शेवाळी व कवक.

**Elaegnaceae** आंबगूळ कुल; एलेग्नेसी

आंबगूळ व इतर काही (एकूण तीन वंश व सुमारे ४५ जाती ) वनस्पतींचा अंतर्भाव असलेले एक द्विदलिकित फुलझाडांचे कुल; याचा समावेश जंबुल गणात (मिर्टेलीझ) केला जातो; हचिन्सन यांनी बदरी गणात ( ऱ्हॅम्नेलीझ ) केला आहे. प्रमुख लक्षणे : शाखायुक्त व बहुधा काटेरी झुडुपे; खवल्यासारख्या केसांनी भरलेली साधी चिवट पाने; द्विलिंगी किंवा एकलिंगी, २–४ भागांची ( पुष्पदलांची ) मंडले; पुष्पासन नळीसारखे व बहुधा किंजपुटाला वेढणारे; पाकळ्या नसतात. परिदले ४ ( क्वचित २ किंवा ६ ) केसरदले तितकी किंवा दुप्पट; ऊर्ध्वस्थ, एका किंज-दलाच्या किंजपुटात एक कप्पा व त्यात बीजक; आठळीफळात एक अपुष्क बी.

**elaioplast** तैलकणु; मेदलवक; एलिओप्लास्ट

तैलबिंदू बनविणारा कोशिकेतील सजीव कण; पहा plastid.

**elastic limit** स्वाग्रही सीमा

कायम ताणले जाण्यापूर्वी वनस्पतिसूत्राने (धाग्याने) पेललेले जास्तीत जास्त वजन.

**elater** क्षेपक

बीजुकांच्या प्रसाराला मदत करणारा जलशोषी व बहुधा सपाट तंतू ; उदा. एक्विसीटम, मार्चोशिया, पेलिया, इ. शेवाळी.

**elaterophore** क्षेपकधर

क्षेपकांना आधार देणारा स्तंभासारखा तंतुमय भाग; उदा. पेलिया (शेवाळी).

**electrotactic** विद्युतनुचलनी

विजेच्या चेतनेमुळे होणाऱ्या हालचालीची प्रतिक्रिया.

**electrotropic** विद्युतनुवर्तनी

विजेच्या चेतनेमुळे होणाऱ्या वाढीमुळे वळण्याची प्रतिक्रिया.

**eligulate** जिव्हिकाहीन

जिभेसारखे लहान उपांग ( पानाच्या बगलेत ) नसलेली ( वनस्पती ); उदा. लायकोपोडिएलीझ.

**elliptic ( elliptical, ellipsoidal )** दीर्घवृत्ताकृति

लंबगोलासारखे; उभट वर्तुळासारखे; उदा. सदाफुली, बकुळी इत्यादींची पाने.

**elongate** लंबित; लांबलेले

**elongation** लंबन; दीर्घीकरण

लांबीत वाढ होण्याची प्रक्रिया.

**elongation phase** लंबनावस्था

नवीन कोशिकांची निर्मिती झाल्यावर त्यांची लांबीत वाढ होण्याची अवस्था; त्यानंतरच आकारास कायमपणा येतो; हा प्रकार विशेषतः टोकास असलेल्या ( अग्रस्थ विभज्या ) कोशिकात आढळतो.

**emarginate** निम्नमध्य; निम्नाग्र

टोकास त्रिकोनी खाच असलेले; उदा. उंडी, अंबुशी यांची पाने.

**embryo** गर्भ; भ्रूण

अंदुककलशातील किंवा बीजातील वनस्पतीची अविकसित अवस्था; फलनानंतर रंदुकापासून ती वनस्पती स्वावलंबी होईपर्यंतची अवस्था. प्राण्यांच्या बाबतीत फलित अंड्यापासून ( युग्मनजापासून ) ते तो प्राणी जातिविशिष्ट लक्षणांनी परिपूर्ण अशा अवस्थेत येई-पर्यंतची अवस्था.

**— sac** गर्भकोश; भ्रूणकोश

गर्भधारणा व गर्भविकास ( रंदुकाची वाढ ) घडून येण्यास सोयिस्कर व संरक्षक अशी बीजकातील पिशवी.

**embryogeny ( embryonic development )** गर्भविकास

रंदुकापासून गर्भाची वाढ होण्याची प्रक्रिया किंवा तत्संबंधी माहितीची शाखा.

**embryology** गर्भविज्ञान

गर्भासंबंधी संपूर्ण माहिती.

**embryonic axis** गर्भाक्ष

गर्भाच्या दोन टोकास जोडणारा आस ( कणा ).

**— rudiment** गर्भांकुर
गर्भाची अत्यंत प्रारंभिक अवस्था.

**embryomy** गर्भत्व; भ्रूणत्व
गर्भ असण्याचा प्रकार.

**embryophyta** गर्भपादप विभाग; एम्ब्रियोफायटा
एंग्लर यांच्या पद्धतीप्रमाणे वनस्पति-कोटीचे तेरा विभाग केले असून पहिल्या अकरांचा एक गट कायक वनस्पती (थॅलोफायटा) म्हणून ओळखला जातो; दुसरा गट शेवाळी व नेचाभ ( ब्रायोफायटा व टेरिडोफायटा) यांचा व तिसऱ्या गटात ( स्पर्मटोफायटा ) बीजी वनस्पतींचा समावेश केला जातो; दुसऱ्या व तिसऱ्या गटांचा एकत्रित गट ' गर्भपादप ' ( काही काळ गर्भावस्थेत राहणाऱ्या वनस्पती) हा असून त्यांस अनुक्रमे एसायफोनोगॅमा ( अनिनाल्युतिक ) व सायफोनोगॅमा (निनाल्युतिक) अशी नांवे, त्यांचे उपविभाग समजून, दिली आहेत; पहा siphonogamous; asiphonogamous; Bryophyta; Pteridophyta; Spermatophyta.

**emergence** त्वगुत्थित
त्वचेवर वाढलेले व त्वचेखाली असलेल्या थराचाही संबंध असणारे उपांग; उदा. काही केस, काटे, इ.

**emission** उत्सर्जन
बाहेर टाकण्याची क्रिया.

**emulsion** पायस
एका कलिल द्रवाचे दुसऱ्या कलिल द्रवात मिसळून निलंबित ( तरंगत) राहण्याची स्थिती. उदा. दुधात मेदाचे कण व प्रथिनाचे कण पाण्यात एकत्रित तरंगत असतात.

**encysted** कोष्ठित
बहुधा जाड आवरणात, पिशवीत बंद केल्यासारखे राहिलेले; उदा. काही सूक्ष्मजंतू किंवा इतर सूक्ष्म वनस्पती काही काल सुप्तावस्थेत अशा प्रकारे काढतात, त्याला कोष्ठावस्था ( encystment ) म्हणतात; पहा aplanospore.

**endarch** अंतर्वर्धी
काष्ठनिर्मितीत प्रथमतः परिघाजवळ सुरवात होऊन, तेथे आद्यप्रकाष्ठ व नंतर परिघापासून केंद्राकडे ( अधिमध्य ) उत्तर प्रकाष्ठ बनण्याची प्रक्रिया; उदा. बहुतेक सर्व खोडे.

**endemic** प्रदेशनिष्ठ
विशिष्ट ठिकाणीच आढळणारी ( वनस्पती ); आंबा ( *Mangifera indica* L. ) व लाल अशोक ( *Saraca indica* L. ) या भारतातील वनस्पतींच्या शास्त्रीय नावात जातिवाचक शब्द त्या अर्थाने वापरलेला आढळतो.

**endemism** प्रदेशनिष्ठा
वर वर्णन केलेली प्रवृत्ति (प्रकार); उदा. कारवी; तेरडा.

**endergonic reaction** ऊर्जाग्राहक विक्रिया
ऊर्जेचा पुरवठा करावा लागणारा रासायनिक बदल घडवून आणणारी घटना.

**endo–** अंत:
आतील या अर्थी उपसर्ग.

**endocarp** अंत:कवच
फळाच्या तीन आच्छादनांपैकी सर्वांत आतील भाग; अष्ठीलात हा कवचासारखा परंतु मृदुफळांत पातळ असतो; पहा drupe; berry.

**endodermis** अंतस्त्वचा
तल्पोतकाचा सर्वांत आतील थर; उदा. खोड व मूळ यात केंद्रवर्ती रंभाशी हा थर बाहेरून चिकटून (परिरंभामोवती ) असतो; पहा stele, pericycle.

**endogenous** अंतर्जात; अंतर्भव
आतील कोशिकाथरातून उद्भवलेले; उदा. मुळाच्या शाखा; बीजुककोशात बनलेली बीजुके.
पहा exogenous.

**endoparasite** अंतर्जीवोपजीवी
आश्रयाच्या शरीरात राहून उपजीविका करणारी (वनस्पती अथवा प्राणी); उदा. तांबेरा, काणी; कित्येक रोगकारक सूक्ष्मजंतू ; जंतासारखे किंवा नारूसारखे प्राणी.

**endophyte** अंतर्वनस्पती
एका वनस्पतीच्या शरीरात असलेली (पण जीवोपजीवी असेलच अशी नव्हे) दुसरी वनस्पती; उदा. सायकसच्या मुळातील नीलहरित शैवल (नॉस्टॉक); अँथोसिरॉस (शेवाळी) मधील नॉस्टॉक; अॅझोलातील (जलनेचा) अॅनाबीना शैवल.

**endoplasm** अंत:प्राकल
कोशिकेतील बाह्यप्राकलाने वेढलेला आतील जीवद्रव्याचा भाग; हा अधिक कणीदार व पातळ असतो.
पहा ectoplasm.

**endoplasmic reticulum ( ER )** अंत:प्राकल जालक
जिवंत कोशिकेतील प्राकलात आढळणारे अतिसूक्ष्म धाग्यांचे जाळे; संक्षिप्त रूपात 'अंजा' ही संज्ञा इंग्रजी ER ऐवजी वापरण्यास हरकत दिसत नाही.

**endoscopic** अंतरग्र

अंदुककलशाच्या तळाकडे, विकासावस्थेत स्वतःचा अग्रभाग ( वरचे टोक अथवा ऊर्ध्वध्रुव ) असलेला ( गर्भ ); उदा. बीजी वनस्पतींतल्याप्रमाणे; पहा exoscopic.

**endosmosis** अंतस्तर्षण

बाहेरील पातळ विद्रवाचा आतील अधिक दाट विद्रवाकडे पार्य पडद्यातून ( पापुद्र्यातून ) होणारा प्रवेश (विसरण ); उदा. जमिनीतील लवणाचा पातळ विद्रव या नियमाने मूलकोशात ओढला जाण्याचा प्रकार; पहा osmosis.

**endosperm** पुष्क; गर्भपोष; भ्रूणपोष

बीजकातील दलिकाबाहेरील अन्नसाठा करणारे ऊतक; उदा. एरंड; मका.

**— nucleus** पुष्कप्रकल; भ्रूणपोष केंद्रक

फुलझाडांच्या बीजकांच्या गर्भकोशातील पुष्क तयार होण्याच्या आरंभी असलेले द्विगुणित ( दुय्यम ) प्रकल; पहा double fertilisation.

**— , ruminated** रेषाभेदित पुष्क

रेषायुक्त पुष्क; उदा. हिरवा अशोक, सुपारी, जायफळ.

**endospermic (endospermous albuminous)** सपुष्क; गर्भपोषयुक्त

गर्भपोषक अन्न असलेले; उदा. गहू, जायफळ, खारीक, नारळ, इत्यादींची बीजे.

**— , non- ( exalbuminous )** अपुष्क; गर्भपोषहीन

पुष्क नसलेले; उदा. चिंच, हरभरा, वाटाणा यांची बीजे.

**endospore** अंतर्बीजुक

बीजुककोशात बनलेले बीजुक; उदा. म्यूकर बुरशी; कित्येक शैवले; धानीकवक. पहा exospore.

**endosporium** बीजुकांतःपटल

बीजुकाचे आतील आवरण; पहा exosporium.

**endothecium** अंतःकोश

बीजुकाशयाच्या विकासातील प्राथमिक अवस्थेत आढळणारे ऊतक; उदा. शेवाळी; पहा amphithecium.

**endotrophic mycorrhiza** अंतःस्थित संकवक

उच्च वनस्पतींच्या मुळात शिरकाव करून व तेथेच आपले तंतू वाढवून त्यांचे पोषण करणारी कवक वनस्पती; यापासून आश्रय वनस्पतीस कार्बनी द्रव्य मिळते, यामुळे सहजीवनाचा हा एक प्रकार आहे. उदा. नीओशिया आमर; पहा conjunctive symbiosis.

**energesis** ऊर्जानिर्मिती; ऊर्जामुक्ति

विश्लेषणात्मक किंवा विध्वंसक प्रक्रियेने पदार्थातील ऊर्जा अलग करण्याचा प्रकार. उदा. श्वसन; वितंचन; ज्वलन इ.

**energy** ऊर्जा

एखादी क्रिया घडवून आणण्यास आवश्यक असलेली शक्ती ( उत्साह ).

**—, chemical** रासायनिक ऊर्जा

रासायनिक विक्रियेतून उद्भवणारी शक्ती.

**—, kinetic** गतिज ऊर्जा

गतिमान शक्ती (उत्साह); उपलब्ध (मुक्त) झालेली शक्ती; उदा. मेणातील ऊर्जा ही मेणबत्ती जळत असता उष्णता व प्रकाश ह्या रूपाने मुक्त होते.

**—, potential** स्थितिज ऊर्जा

साठविलेली (संचित; सुप्त) किंवा विशिष्ट स्थितीमुळे प्राप्त झालेली परंतु उपयोगात प्रत्यक्ष नसलेली शक्ती; उदा. जळत नसलेल्या मेणबत्तीतील संचित ऊर्जा; अन्नपदार्थातील शक्तीचा साठा.

**— transformation** ऊर्जांतरण

ऊर्जेच्या रूपातील (प्रकारातील) बदल; उदा. प्रकाशसंश्लेषणात प्रकाशरूप ऊर्जेचे रूपांतर होऊन अन्नघटकात ती स्थितिज ऊर्जेत साठविली जाते; या अन्नाचा उपयोग होतेवेळी तिचे गतिज ऊर्जेत रूपांतर होते; लाकूड जळताना तिचे उष्णतेत रूपांतर होते.

**ensiform** खड्गाकृति

तरवारीच्या पात्यासारखे; उदा. केशर, बाळवेखंड, बेलमकँदा यांची पाने; आवईची शेंग; आवई (*Canavalia ensiformis* DC.).

**entire** अखंड

न फाटलेली किंवा दाते नसलेली (किनार); उदा. पेरू, सदाफुली, कण्हेर इत्यादींची पाने.

**entomophilous** कीटकपरागित

कीटकांद्वारे परागण (परागांचा प्रसार) घडवून आणणारे; उदा. आंबा, मेंदी, संकेश्वर, सूर्यफूल यांची फुले.

**entomophily** कीटकपरागण (पद्धत)

वर वर्णन केल्याप्रमाणे परागण करविण्याचा प्रकार.

**enucleate** प्रकलहीन

प्रकल नसलेली कोशिका; सूक्ष्मजंतूमध्ये प्रकलाचे कण विखुरलेले असतात. तसाच काहीसा प्रकार नील-हरित शैवलात आढळतो.

**environment** परिस्थिति; आसमंत; पर्यावरण
वनस्पती अथवा प्राणी ज्या नैसर्गिक परिसरात जगतात, वाढतात व प्रजोत्पादन करतात तेथील हवा, जमीन, पाणी, इतर सजीव, पर्जन्यमान, उंची, तपमान, इत्यादी सर्वांचा समावेश येथे (या संज्ञेत) होतो; पहा ecology.

**enzyme** वितंचक
नेहमीच्या तपमानात दुसऱ्या कार्बनी द्रवपदार्थात रासायनिक प्रक्रिया घडवून आणणारा कार्बनी प्रेरक ( निदेशक ); उदा. डायास्टेज; किण्वातील ( यीस्ट ) किंतक (झायमेज) इ. पहा catalyst; carnivorous plants.

**— inhibitor** वितंचक रोधक
कार्यद्रव्य (मूळ पदार्थ) व त्यात रासायनिक बदल घडविण्यास साहाय्य करणारे ( निदेशक ) वितंचक यांच्या आड येणारा पदार्थ.

**ephemeral** अल्पजीवी; अल्पायुषी
फार थोडे दिवस जिवंत राहून सर्व जीवनावस्थांतून जाणारी (वनस्पती); काही आमरे; ध्रुव प्रदेशांतील किंवा अत्यंत उंचीवर वाढणाऱ्या काही वनस्पती; काही शेवाळी, शेवले, शैवाक इ.

**epi -** बाह्य
बाहेरचा किंवा वरचा (वर असलेले) या अर्थी उपसर्ग; प्रत्ययाप्रमाणेही उपयुक्त.

**epibasal** अपितल
गर्भपूर्वावस्थेतील रंदुकाचा वरचा अर्ध; इतर काही अवयवांच्या टोकाकडील अर्धा भाग.
पहा hypobasal; zygote ( oospore ).

**— cell** अपितल कोशिका
शेवाळी व नेचाभ वनस्पती यातील रंदुकाच्या पहिल्या विभागणीनंतरची ( रंदुकातील ) वरची कोशिका.

**— octant** अपितल अष्टम
रंदुकाच्या विभागणीत त्याच्या आठ सारख्या भागांपैकी वरच्या चार भागातील एक भाग (एक अष्टमांश).

**— blema** मूलत्वचा
कोवळ्या मुळाच्या पृष्ठभागावरील कोशिकांचा थर; यात मूलत्राणाचा अंतर्भाव नसून केवल मूलकेश असतात; तसेच उपत्वचा व रंध्रे यांचा अभाव असतो; पहा epidermis.

**— calyx** अपिसंवर्त
संवर्ताखाली असलेले छदांचे वर्तुळ; उदा. कापूस; जास्वंद; भेंडी; इ. येथे संवर्त या मंडलावर असतो.

**— carp** बाह्यकवच
फळाचे सर्वात बाहेरचे आच्छादन; कवठ, बेल व गोरखचिंच इत्यादींचे हे आवरण कठीण असते.

**— cotyl** अप्याक्ष
द्विदलिकित बी रुजून त्यातून नवीन रोप बनते, त्याच्या दलिकांच्या वरच्या बाजूकडील प्रारंभिक अक्षाचा भाग; पहा hypocotyl.

**— dermal tissue system** अपित्वचा तंत्र
अपित्वचा व त्याशी संलग्न असलेली उपांगे, छिद्रे, केस इ.

**— dermis** अपित्वचा
नेचाभ पादप व बीजी वनस्पती ( सर्व वाहिनीवंत ) ह्यांच्या शरीरांच्या सर्व अवयवांवर ( अपवाद : जमिनीतील मुळे ) असलेला सर्वात बाहेरचा प्राथमिक कोशिका-थर; यावर उपत्वचेचा लेप, केस, रंध्रे इत्यादी परिस्थितिनुसार किंवा गरजेप्रमाणे कधी कधी आढळतात.

**— geal** अपिभौम
बी रुजण्याचा एक प्रकार; बी रुजल्यावर दलिका जमिनीवर येऊन बहुधा हिरव्या बनतात व काही वेळ अन्ननिर्मिती करतात; पहा hypogeal.

**— gynous** अपिकिंज
किंजमंडल खालच्या पातळीवर ( अधःस्थ ) राहून बाकीची पुष्पदले वरच्या पातळीवर येतात, तो प्रकार; येथे पुष्पस्थली किंजपुटाला पूर्णपणे वेढून राहते. उदा. पेरू, काकडी, निशिगंध यांची फुले; पाहा hypogynous, perigynous.

**— nasty** अपिवर्धन
एखाद्या अवयवाचा वरचा पृष्ठभाग ( प्रकाशाकडे असलेली बाजू ) अधिक वेगाने वाढून तो अवयव वळण्याचा प्रकार; उदा. फुलाची कळी उमलताना संदले व प्रदले या प्रकारे वळतात; याउलट प्रकार कळीची वाढ होते त्यावेळी असतो; पहा hyponasty; nastic movement.

**— ptalous** अपिप्रदललग्न; प्रदललग्न
पाकळीला कमीजास्त प्रमाणात चिकटलेले ( केसरदल ); उदा. धोत्रा.

**— phyllous** (१) अपिदललग्न; परिदललग्न
(२) पर्णोपरिक
परिदलाला वरप्रमाणे चिकटलेले ( केसरदल ); उदा. केशर, नागदमनी, भुईचाफा; (२) पानांचा फक्त आधार घेऊन त्यावर वाढणारी ( वनस्पती ); उदा. काही शैवले.

**— phyte** अपिवनस्पति; अपिपादप
दुसऱ्या वनस्पतीवर फक्त संपूर्ण आधार घेणारी वनस्पती; उदा. आमरे, शेवाळी, दगडफुले, नेचे, गवते, शंखपुष्पी ह्यांपैकी काही जाती.

**— phytic habit** अपिवनस्पति वृत्ति; अपिवृत्ति
सतत दुसऱ्या वनस्पतीवर पूर्ण आधार घेण्याची रीत; अनेक दगडफुले ( शैवाक ); पहा Lichen.

**— plasm** अपिप्राकल
बीजुककोशात बीजुके तयार होऊन शिल्लक राहिलेले (मधुजन युक्त) जीवद्रव्य (प्राकल ); उदा. काही कवक.

**— podium (blade)** पाते; पत्र
पूर्ण विकसित पानाच्या अक्षाचा पसरट भाग.

**— sepalous** अपिसंदललग्न; संदललग्न
संदलाला कमीजास्त प्रमाणात चिकटून वाढलेले (केसरदल ); उदा. रंगूनचा वेल; लाल अशोक, इ.

**— sperm (perisperm)** परिपुष्क
पुष्काभोवती असलेल्या ऊतकापासून ( प्रदेह ) बीजामध्ये बनलेला व कायम राहिलेला अन्नसाठा; उदा. कर्दळ, कमळ, इ.

**— spore** अपिबीजुक
बीजुक किंवा रंदुक याभोवती परिप्राकलापासून बनलेला आच्छादक थर; उदा. काही कवक व काही बीजुके.

**— stasis** संनियंत्रण
एकाच वैकल्पिक गुणयुगुलात नसलेल्या परंतु वनस्पतीच्या एकाच लक्षणाशी संबंधित अशा दोन भिन्न घटकांपैकी एकाचा दुसऱ्यावर प्रभाव पडण्याची घटना. मेंडेलच्या सिद्धांताप्रमाणे असाच प्रभाव एकाच वैकल्पिक गुणयुगुलातील दोन घटकांपैकी एकाचा दुसऱ्यावर पडतो. प्रथम सांगितलेल्या घटनेतील अप्रकट घटक दुसऱ्या तशाच अप्रभावीशी संबंध आल्यास प्रभावी ठरतो; म्हणजेच पहिल्या घटनेत दोन भिन्न वैकल्पिक जोडीतील प्रभावीपैकी एक अधिक प्रभावी ठरतो; तो संनियंत्रक (epistatic) असून ज्याच्यावर प्रभाव पडतो त्याला संनियंत्रित (hypostatic) म्हणतात.

**— strophe** संमुखावस्था
अंधुक प्रकाशाच्या चेतनेमुळे कोशिकेतील हरितकणूंची प्रकाशासमोरच्या कोशिकाभित्तीजवळ उपस्थिती; प्रकाशाकडे जाणे (चलन) असाही अर्थ अभिप्रेत आहे (संमुख चलन); पहा apostrophe.

**— thelium** अपिस्तर
शरीरातील पोकळीभोवती असलेला अनेक कोशिकांच्या जाडीचा थर.

**— them** जलस्रावक
पानातील पाणी बाहेर टाकण्यात वैशिष्ट्य पावलेल्या हरित्कणुहीन कोशिकांचा समूह ( ऊतक ); पाणी बाहेर जाण्याकरिता विशिष्ट छिद्र ( जलरंध्र ) असून ही सर्व संरचना वाहक वृंदाच्या टोकास असते; उदा. अंजनवेल; पहा hydathode.

**— thet** गुणनाम
वनस्पतींना लॅटिन भाषेत अधिकृत नाव देण्यात ज्या वंशातील ती वनस्पती असेल त्या वंशाचे नाव प्रथम ठेवून त्यापुढे त्या वनस्पतीचा विशेष ( इतरांपासून ती वनस्पती ओळखली जाईल असा ) गुणवाचक शब्द लिहितात; असे गुणवाचक नाम त्या वंशातील दुसऱ्या कोणत्याही वनस्पतीस दिले जात नाही; हा गुणवाचक शब्द ( अंतिम निर्देशक ) कधी एखाद्या थोर व्यक्तीच्या किंवा देशाच्या नावाशी निगडित असतो; गुणवाचक शब्द हा मनुष्यांच्या व्यक्तिगत नावाप्रमाणे व वंशवाचक शब्द आडनावाप्रमाणे उपयोगात असतो. उदा. *Polyalthia longifolia* (हिरवा अशोक) यातील दुसरा शब्द गुणनाम असून *P. longifolia var. pendula* या नावातील तिसरा शब्द प्रकारदर्शक गुणनाम मानतात.

**equatorial division** समविभाजन
पहा mitosis.

**Equisetinae (Horsetails)** बंधकतृण वर्ग; हयवाल वर्ग; एक्विसिटीनी
नेचाभ पादपांपैकी ( वाहिनीवंत अबीजी वनस्पतीपैकी ) काही प्राचीन व काही विद्यमान वनस्पतींचा गट; याला आर्टिक्युलेटी असेही इंग्रजी नाव आहे. यात वनस्पतींची प्रमुख पिढी बीजुकधारी; मुळे; खोबणीदार हिरवे खोड व बहुधा फार लहान मंडलाकृती पानांचे झुबके; फांद्या असल्यास मंडलाकार; पाने वंध्य व जननक्षम; विशिष्ट प्रकारच्या उपांगांवर ( बीजुककोशधरांवर ) बीजुककोश आधारलेले असून वाहक

स्तंभात ( रंभात ) पर्णविवरे नसतात. विद्यमान वंश ( एक्विसीटम ) एकच असून त्याचा अंतर्भाव बंधकतृण कुलात ( एक्विसीटेसी ) व बंधकतृण गणात (एक्विसीटेलीझ) केला असून त्याशिवाय हेनिएलीझ आणि स्फेनोफायलेलीझ हे प्राचीन गण बंधकतृण वर्गात समाविष्ट आहेत. एक्विसीटमच्या प्रजोत्पादक अवयवास शंकू म्हणतात व त्यामध्ये एका लहान अक्षावर छत्राकृती बीजुककोशधर असतात; त्या छत्राखाली बीजुककोश उभे टांगलेले असून त्यात सारखी दिसणारी बीजुके असतात; रुजल्यावर दोन स्वतंत्र ( एकलिंगी ) गंतुकधारी बनतात. पहा Pteridophyta.

**equitant** अध्यारूढ

कळीमध्ये पानांच्या मांडणीचा एक प्रकार; कळीमध्ये प्रत्येक पात्याचे दोन्ही अर्ध एकमेकाजवळ बिजागरीप्रमाणे ( संमीलित ) असून एकात दुसरे पान याप्रमाणे बाहेरून आत क्रम असतो. उदा. बेलमकँदा, ग्लॅडिओलस, इ. पहा phyllotaxis.

**—, semi-** अर्ध अध्यारूढ; अर्धाध्यारूढ

कळीतील पानांच्या या मांडणीच्या प्रकारात संमीलित एका पानाचा एक अर्ध दुसऱ्या पानाच्या तशाच प्रकारच्या एका अर्धावर याप्रमाणे अनेक पानांचा क्रम असतो.

**erect** (१) उन्नत; (२) ऊर्ध्वमुख

( १ ) सरळ उभे; भरपूर काठिण्यासुळे ( काष्ठामुळे ) ताठ उभे राहणारे ( खोड ); उदा. जांभूळ, आंबा; किंवा घनकोशिकांमुळे उभे राहणारे ( पान ); उदा. बेलमकँदा, कांदा; पांढरा माका ( *Eclipta erecta* L. ); झेंडू ( *Tagetes erecta* L. ) इ.

( २ ) बीजकरंध्र वर असलेले सरळ ( बीजक ); उदा. पॉलिगोनम्.

**ergot** अर्गट

कवक रोगामुळे गवताच्या ( उदा. बाजरी ) किंजपुटाचे ऐवजी तेथे वाढलेला ( कवकतंतूचा बनलेला ) काळा शिंगासारखा अवयव ( जालाश्म ); पहा sclerotium.

**ergotine** अर्गटिन

अर्गटातील विषारी व औषधी द्रव्य.

**Ericaceae** संतानक कुल; एरिकेसी

संतानक, गंधपुरा, अँड्रोमेडा, एरिका, कॅल्ना, काऊबेरी इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे मोठे कुल; याचा अंतर्भाव संतानक गणात ( एरिकेलीझ ) करतात. प्रमुख लक्षणे : मरुवासी लक्षणे असलेली झुडपे; बहुधा अवकिंज व जुळलेल्या पाकळ्यांची द्विलिंगी ४–५ भागी फुले; केसरदले ८-१०, बाहेरचे मंडल पाकळ्यासमोर; २-१२ किंजदलांचा अनेक कप्प्यांचा बहुधा ऊर्ध्वस्थ किंजपुट; फळ विविध; परागकोशातील परागांच्या चौकड्या छिद्रावाटे बाहेर पडतात; बिया अनेक.

**Eriocaulaceae (Eriocauleae)** एरिओकॉलेसी

एरिओकॉलॉन, पीपॅलँथस इत्यादी लॅटिन नावाच्या वंशांतील एकदलिकित वनस्पतींचे कुल. एंग्लर व प्रँटल यांनी फॅरिनोजी गणात व हचिन्सननी एरिओकॉलेलीझ या गणात अंतर्भूत केले आहे. बेंथम व हूकर यांनी ग्लुमेसी श्रेणीतील एरिओकॉली या नावाने हे कुल वर्णिले आहे. प्रमुख लक्षणे : गवतासारख्या दिसणाऱ्या बहुवर्षायू ओषधी; सूर्यफूल कुलातील स्तबक प्रकारच्या फुलोऱ्यात एकलिंगी, फार लहान, २–३ भागी, नियमित व एकसमात्र फुले; ऊर्ध्वस्थ किंजपुटात २–३ कप्पे व प्रत्येक कप्प्यात एक बीजक; फळात ( बोंडात ) सपुष्क बिया; पहा Gramineae.

**esculent** खाद्य

खाण्यास उपयुक्त ( योग्य ); उदा. *Hibiscus esculentus* L. भेंडी.

**essential** आवश्यक

अत्यंत जरूरीचे; उदा. फुलांमध्ये केसरदले व किंजदले प्रजोत्पादनार्थ आवश्यक असून त्यांचेशिवाय फुलाचे कार्य होत नाही. सापेक्षतः संवर्त व पुष्पमुकुट ही पुष्पदलांची मंडले साहाय्यक होत.

**— oil ( ethereal oil )** बाष्पनशील तेल

हवेत उडून जाणारे तेल; उदा. लिंबाच्या किंवा कढिलिंबाच्या पानातील तेल.

**estipulate** अनुपपर्ण

पहा exstipulate.

**etaerio ( aggregate fruit )** संघफल; घोसफळ

एकाच फुलातील सुट्या किंजदलापासून प्रत्येकी एक या प्रमाणे बनलेल्या साध्या फळांचा झुबका; उदा. मोरवेल, सोनचाफा; हिरवा चाफा; रुई, कुडा, अनंतमूळ, सदाफुली इत्यादींत फक्त दोन फळांच्या जोड्या असतात.

**etiolated** तमोविकृत

प्रकाशाभावी पिवळटपणा व इतर दोष ( लांब कांडी, खवल्यासारखी पाने, नाजुकपणा, इ. ) आलेली ( वनस्पती ).

**etiolation** तमोविकृति
वर उल्लेखिलेला रोग (असण्याचा प्रकार).

**Eubasidii** सत्यगदाकवक उपवर्ग; युबेसिडी
गदाकवकातील एक गट; अर्धगदाकवक हा दुसरा; पहा Hemibasidii; Basidiomycetes.

**Eugenics** सुप्रजाजननशास्त्र; सुजननविज्ञान
नवीन संतती (भावी पिढी) आनुवंशिक दृष्ट्या चांगली निपजण्यासंबंधीची ज्ञानशाखा.

**Eumycetae (Eumycophyta)** सत्यकवक विभाग; युमायसेटी
कवक (अळंबे) वनस्पतींतील या गटात चार वर्गांचा (शैवल्कवक, धानीकवक, गदाकवक आणि अपूर्ण कवक) समावेश करतात; काही शास्त्रज्ञ श्लेष्मकवक (मिक्सोमायसेटी) कवकांतच अंतर्भूत करतात; तथापि त्यांना अलग करून हल्ली सत्यकवकांचा दर्जा (मिक्सोथॅलोफायटा, मिक्सोफायटा, मायसेटोझोआ) दिला जातो; कायक वनस्पतींचा स्वतंत्र विभाग मानल्यास (अनेक शास्त्रज्ञांत याबद्दल मतभेद आहेत) शैवले व कवक हे दोन उपविभाग (यात शैवाक जमेस धरल्यास तीन उपविभाग) होतात; परंतु तसे न मानल्यास श्लेष्मकवक, सत्यकवक (युमायकोफायटा) हे विभाग मानणे योग्य ठरते; पहा Thallophyta; Mycetozoa; Ascomycetes, Basidiomycetes; Fungi.

**Euphorbiaceae** एरंड कुल; यूफोर्बिएसी
पॅरा व सीरा रबर, एरंड, शेर, टॅपिओका, आवळा, पानचेटी इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; एंग्लर व प्रँटल यांच्या आणि बेसींच्या पद्धतींत याचा अंतर्भाव भांड गणात (जिरॅनिएलीझ), परंतु हचिन्सन यांनी एरंड गणात (यूफोर्बिएलीझ) केला आहे. प्रमुख लक्षणे : ओषधी, क्षुपे व क्वचित वृक्ष; दुधी चीक बहुधा आढळतो. बहुधा साधी एकाआड एक पाने; कधी चषकरूप फुलोरा; सच्छद, लहान, एकलिंगी फुले; कधी पाकळ्या नसतात; केसरदले अनियमित (संख्या); किंजदले तीन, किंजपुट एक व ऊर्ध्वस्थ; तीन एकबीजी कप्पे; बोंड फळात पुष्कयुक्त बीजे; क्रोटन, ॲकॅलिफा, पानचेटी बागेत लावतात.

**Eusporangiatae** स्थूलबीजुककोशी उपवर्ग; युस्पोरँजिएटी
जाड आवरणाचे व प्रत्येकी अनेक कोशिकापासून बनलेले बीजुककोश असलेला नेचे गट; पहा Filicinae.

**eusporangiate** स्थूलबीजुककोशिक; युस्पोरँजिएट
वर वर्णन केलेल्या प्रकारचा (नेचा); पहा Ophioglossales, Marattiales.

**eustele** वृन्दरंभ
अनेक स्वतंत्र वाहक वृन्दाभोवती एक अंतस्त्वचेचा थर असून मध्ये भेंड असलेला रंभ; उदा. सूर्यफूल; अनेक द्विदलिकित खोडे व मुळे यात सामान्यपणे आढळणारा रंभ; पहा stele.

**evaporation** बाष्पीभवन; बाष्पीकरण
पाण्याची वाफ बनून वातावरणात मिसळून जाणे; तसाच दुसरा एखादा द्रव पदार्थ (उदा. अल्कोहॉल) सामान्य तापमानात उडून जाणे.

**evaporimeter** बाष्पीभवनमापक
वनस्पतींतून सोडल्या जाणाऱ्या बाष्परूप पाण्याचे तौलनिक मोजमाप करण्याचे उपकरण; पहा atmometer.

**evergreen** १) सदापर्णी; २) सदाहरित; ३) चिरहरित
(१), (२) झाडावरील सर्वच पाने एकावेळी गळून न पडल्याने सदैव हिरवे दिसणारे [झाड किंवा वन]; (२), (३) दीर्घकाल हिरवी राहणारी [पाने].

**evolution** उत्क्रांति; क्रमविकास
सामान्यतः क्रमाने हळूहळू बदल किंवा विकास होण्याची प्रक्रिया. प्राणी व वनस्पती यांच्या अनेक पिढ्यांत ही चालू असणे शक्य असून त्यामध्ये बदल, प्रगति व वाढ अभिप्रेत आहे; या प्रक्रियेत सर्वांगीण बदल व प्रगति असतेच असे नाही; अंशतः किंवा पूर्णतः परागति होत असल्याची (झाल्याची) उदाहरणे अनेक आहेत. पृथ्वीच्या स्वरूपातील बदल अथवा पृथ्वीवर झालेल्या क्रमवार घटना यांचाही या सामान्य संज्ञेत समावेश करतात.

**—, organic** जैव उत्क्रांति अगर जैव क्रमविकास
हल्ली अस्तित्वात असलेले सर्व जीव (प्राणी व वनस्पती) पूर्वी (पृथ्वीवर जीवनास आवश्यक ती परिस्थिती उपलब्ध झाल्यावर) अत्यंत साध्या, सूक्ष्म, प्रारंभिक जीवद्रव्याच्या अवस्थेत असून कालांतराने परिस्थितिसापेक्ष अनेक बदल होत जाऊन ते सध्याच्या विविध जटिल स्वरूपात आले आहेत असा निश्चित, सप्रमाण व सर्वमान्य सिद्धांत. हा बदल घडवून आणण्यात जीवांतील सजीवद्रव्य, त्याची संवेदनाक्षमता व परिस्थितिसापेक्ष प्रतिक्रिया जबाबदार आहेत; बदल होण्याची

(प्रभेदनाची) प्रक्रिया थांबलेली नसून सतत चालू राहणारी आहे.

**ex** बाह्य; अ-; -हीन; बहि
अभावदर्शक अथवा बाहेरील या अर्थी उपसर्ग; संज्ञांमध्ये उपसर्ग किंवा प्रत्यय असा उपयोग केला आहे.

**exalbuminous (non-endospermic)** अपुष्क; पुष्कहीन
बीजातील गर्भाभोवतीचा विशेष अन्नसाठा नसण्याची स्थिती. उदा. वाटाणा, हरभरा, चिंच इत्यादींची बीजे.

**exaltatus (raised high)** उच्च
उंच; भव्य. उदा. इतर नेचांच्या मानाने भव्य असा हंसराज नेचा (*Nephrolepis exaltata* Schott). याला मराठीत 'आपर्णांग नेचा' असेही नाव आढळते.

**exarch** बहिर्वर्धी
बहुतेक सर्व मुळांमध्ये आढळणारी अपमध्य प्रकाष्ठ-निर्मिती; येथे आद्यप्रकाष्ठ बाहेर व उत्तरप्रकाष्ठ आत असण्याचे कारण केंद्राकडून परिघाकडे वाढ होत असते. पहा endarch.

**excentric** (१) उत्केंद्र; (२) विमध्य
(१) केंद्रापासून दूर. केंद्राभोवती नियमितपणे न बनलेले, उदा. बटाटा, कर्दळ, आरारूट, यातील तौकीर कणात कणबिंदू कणाच्या केंद्रापासून दूर असून त्याभोवतीचे थर सारख्या रुंदीचे (प्रमाणात) नसतात; याउलट काही तौकीरकणात कणबिंदू व केंद्र अलग नसतात व थरांची जाडी प्रमाणबद्ध असते.

(२) खऱ्या केंद्राभोवती वलयांमध्ये प्रमाणबद्धतेचा अभाव; उदा. झाडाला सतत एकाच दिशेकडून जोराने वारा लागत असल्याने खोडाच्या संरचनेत काष्ठवलयांची जाडी वाऱ्याच्या दिशेप्रमाणे केंद्राभोवती सारखी नसते; संरक्षित बाजूस ती अधिक असते, कारण तिकडे वाढ चांगली होते; केंद्रातून काढलेल्या त्रिज्यांची लांबी सारखी नसते.

**excitability** उद्दीपनक्षमता; उत्तेजनक्षमता
उत्तेजकाला (चेतकाला) प्रतिसाद देण्याचे सामर्थ्य (क्षमता).

**excretion** उत्सर्ग; उत्सर्जन
टाकाऊ (निरुपयोगी) पदार्थ बाहेर (कोशिकेबाहेर) टाकण्याची प्रक्रिया; कधी कधी असे पदार्थ कोशिकेत साठूनही राहतात (उदा. उडणारी तेले, काही स्फटिक) किंवा शरीरातील लहान मोठ्या पोकळ्यात साचतात; उदा. राळ, टॅनीन, चीक, इ. पहा secretion.

**excretory product** उत्सर्जित पदार्थ
चयापचयाच्या क्षेत्राबाहेर टाकलेला पदार्थ.

**excretory system** उत्सर्जन तंत्र
उत्सर्जनात उपयुक्त अशी संरचना व कार्यक्षम अवयव, उपांगे, इ. उदा. सोलून जाणारी साल, तिचे ढलपे, आपोआप गळून पडणारी पाने, जुने मध्यकाष्ठ यांमध्ये असे पदार्थ आढळतात.

**excurrent** १) पत्रातीत; २) असीमिताक्ष
(१) पानाच्या पात्याच्या बाहेर गेलेली [उदा. शीर];
(२) फांद्या नसून सतत वाढत सरळ गेलेले खोड असलेली [वनस्पती; उदा. पिसिया, ॲबीस; इ.]

**exendospermous** अपुष्क
पहा exalbuminous.

**exergonic process** ऊर्जादायी प्रक्रिया
ऊर्जेचे उत्पादन घडून येते असा रासायनिक बदल करविणारी घटना; उदा. श्वसन.

**exerted (protruding)** बहिरागत
पुष्पमुकुटाच्या बाहेर स्पष्टपणे दिसत असलेले (डोकावणारे); उदा. वनजाई, संकेश्वर, पेरू व जांभूळ यांची केसरदले.

**exfoliation** अपपर्णन
सपाट तुकडे किंवा खवले या स्वरूपात सोलून जाण्याचा प्रकार; उदा. पेरू, अर्जुन, इ. वनस्पतींची साल.

**exine (extine)** अधिलेप
बाह्यावरण (परागकणांचे); यातील विविधता (काटे, रंध्रे, रेषा, आकार) लक्षात घेऊन त्यांचे प्रकार अथवा जनक वनस्पती ओळखणे शक्य असते.

**exocarp (epicarp)** बाह्यकवच
फलावरणाचा सर्वात बाहेरचा पदर.

**exodermis** बहिस्त्वचा
मुळाच्या अपित्वचे खालचा एककोशिक जाडीचा थर. मूलत्वचेच्या जून भागाखालील ह्या थरातील कोशिकावरण उपत्वचायुक्त (क्यूटिकल) अथवा स्यूबरिनयुक्त असते; उदा. मका; पहा epiblema.

**exogenous** बहिर्भव; बहिर्जात
बाहेरील कोशिकांच्या थरातून उगम पावणारे; पाने, उपांगे, शाखा, इ.

**exoscopic** बाह्याग्र; बहिरग्र
अंदुककलशाच्या मानेकडे ( ग्रीवेकडे ) स्वतःचा वरचा भाग ( अग्रध्रुव ) असलेला ( गर्भ ); उदा. शेवाळी.

**exosmosis** बहिस्तर्षण
आतील पातळ विद्रवाचा बाहेरील अधिक दाट विद्रवाकडे पार्श्व पडद्यातून प्रवेश ( विसरण ); पहा diffusion.

**exospore** बहिर्बीजुक
बीजुककोशाबाहेर ( विबीजुकाप्रमाणे ) बनलेले बीजुक; उदा. धानीबीजुक; पहा conidium.

**exosporium** बीजुकबाह्य पटल
बीजुकाचे बाह्याच्छादन; विबीजुकाचे बाहेरचे आवरण; उदा. हिरवी बुरशी.

**exotic** विदेशी; आयात
बाहेरील देशातून आलेली ( वनस्पती ); उदा. कुंती, कामिनी ( *Murraya exotica* L. ); पहा alien.

**exploration** समन्वेषण
लहान व मोठ्या प्रदेशातील वनस्पतींचा परिस्थिति-विज्ञानाच्या दृष्टीने केलेला पूर्ण अभ्यास.

**explosive mechanism** स्फोटक योजना
फळ तडकून बी बाहेर फेकले जाण्याची यंत्रणा; उदा. तेरडा, आबई, अंबुशी.

**exposed** उद्भासित
वारा, पर्जन्य व सूर्यप्रकाश इत्यादींचा परिणाम होण्यास उघडा पडलेला ( संरक्षित नसलेला, एखादा प्रदेश किंवा व्यक्ती ).

**exposure** उद्भासन
वर वर्णिल्याप्रमाणे उघडे पडलेले असणे.

**expulsive fruit** निष्कासयी फल
आतील बीज जोराने बाहेर ढकलणारे फळ; उदा. काटेरी इंद्रायणीचे फळ टोकास फुटून आतील मगज अनेक बीजांसह एकदम बाहेर फेकला जातो.

**exsiccate** शुष्क करणे
वनस्पतींचे नमुने अवयवांसह कायम टिकून राहावे म्हणून सुकविण्याची प्रक्रिया ( exsiccation ) करणे.

**exstipulate (estipulate)** अनुपपर्ण; उपपर्णहीन
पानाच्या तळाशी लहान उपांग नसलेली ( पाने ); पहा stipule; stipulate.

**extensibility** तन्यता; विस्तरणीयता; वर्धनक्षमता
ताणले जाण्याचे सामर्थ्य; वाढण्याची क्षमता. उदा. प्रतान ( ताणा ); देठ, इ.

**exterior ( external )** बाह्य
फुलाच्या बाबतीत पुरस्थ; बाहेरचे; पहा anterior.

**extinct** लुप्त; विलुप्त; निर्वंश
पूर्वी असलेली परंतु हल्ली नाहीशी झालेली ( वनस्पती अथवा प्राणी ); उदा. बीजी नेचे.

**extra-** बाह्य
बाहेरचा या अर्थी उपसर्ग; मराठीत उपसर्ग किंवा प्रत्यय.

**— axillary** कक्षाबाह्य
पानाच्या बगलेबाहेर असलेले; उदा. कळ्या, ताणे इ.

**— cellular** कोशिकाबाह्य
कोशिकाबाहेरचे; उदा. कोशिकेबाहेर आलेल्या पाचक द्रव्याने कीटकाचे केलेले रूपांतर.

**— fascicular** वृन्दबाह्य
वाहक संचाबाहेर असलेला ऊतककर; पहा vascular bundle; cambium.

**— floral** पुष्पबाह्य
फुलाखेरीज इतरत्र आढळणारा; उदा. एरंडाच्या पानाच्या काही भागांवर आढळणारा मधुप्रपिंड.

**— stelar** रंभबाह्य
अंतस्त्वचेच्या बाहेरचे; पहा stele.

**— xylar** बाह्यकाष्ठी; प्रकाष्ठबाह्य
प्रकाष्ठाबाहेरचे.

**extrorse** बहिर्मुख
बाहेरच्या बाजूस तोंड असणारे; उदा. कळलावी वनस्पतीच्या फुलातील परागकोश बाहेरच्या बाजूस तडकतात; पहा introrse.

**exudation** निर्यास
शरीरातून काही द्रवपदार्थ बाहेर टाकण्याची प्रक्रिया; उदा. जखम झाल्यावर बाहेर चीक गळणे; विशिष्ट हवामानात निसर्गतः पानांतून पाण्याचे थेंब गळणे; उदा. कॅलॅडियम; अंजनवेल, इ.

**eye** १) नेत्र; २) कलिका; ३) बिंदू
(१) डोळा; (२) कलमावरील डोळा [ कळी ] किंवा भूमिगत खोडावरची कळी; (३) फुलातील ठळकपणे दिसणारा ठिपका; उदा. गुलखेरा; भेंडी इ.

**— piece** नेत्रभिंग
सूक्ष्मदर्शक यंत्रातून वस्तू पहाण्याकरिता वापरलेले डोळ्याजवळचे दर्शकाचे भिंग; याशिवाय वस्तूजवळचे भिंग असतेच; पहा objective.

**— spot (stigma)** नेत्रबिंदुक
कोशिकेतील प्रकाशज्ञान देणारा रंगीत ( पिंगल, लाल ) ठिपका; उदा. काही चरगंतुके, चर-शैवले ( उदा. क्लॅमिडोमोनॅस, व्हॉल्व्हॉक्स, युग्लीना, इ. ); भिंग, रंगीत चषक व प्रकाशसंवेदी पदार्थ असे तीन भाग या कोशिकांगकात कधीकधी आढळतात.

## F

**face** १) पृष्ठ; २) मुख
(१) पानाची खोडाकडील किंवा प्रकाशाकडील बाजू.
(२) परागकोशाची तडकणारी बाजू.

**facies (societies)** (१) संहति; समाज;
„ (२) स्वरूप
(१) पादपसंगतीतील जातींच्या संख्येत विलक्षण फरक दर्शविणारे लहानमोठे समुदाय; पहा association, society.
(२) वनस्पतीचे सामान्य रूप ( आकार ).

**factor** कारक; घटक
आनुवंशिक गुण किंवा लक्षणे यांना कारणीभूत मानलेले रंगसूत्रातील सूक्ष्म कण; वनस्पतींच्या परिस्थितिविषयक चर्चेत समाविष्ट असलेली प्रत्येक बाब; उदा. जैव घटक; हवामानासंबंधी घटक; इ.

**facultative** प्रासंगिक; प्रसंगोपात्त
परिस्थिति (प्रसंगा)नुरूप वर्तन करणारे; उदा. काही जंतू, कवक इत्यादी गरजेनुसार जीवोपजीवी किंवा शवोपजीवी.

**— anaerobe** प्रासंगिक अनानिल
हवेशिवाय जगणे आवश्यक असल्यास तसे करणारा ( सूक्ष्मजंतू, सूक्ष्मजीव इ. ).

**— parasite** प्रासंगिक जीवोपजीवी
शवोपजीवी परंतु प्रसंगोपात्त सजीवावर जगणारे; उदा. फायटोप्थोरा बुरशी ( कवक ).

**— saprophyte** प्रासंगिक शवोपजीवी
प्रथम जीवोपजीवी व नंतर शवोपजीवी; उदा. पिथियम बुरशी ( कवक ).

**— symbiont** प्रासंगिक सहजीवी
स्वतंत्र पण प्रसंगोपात्त दुसऱ्या वनस्पतीबरोबर एकत्र जीवन चालविणारी वनस्पती; उदा. काही शेवाळी, नेचे इ.

**Fagaceae** बंज ( बान ) कुल; ओक कुल; फॅगेसी
ओक ( बान ), बीच, चेस्टनट इत्यादी द्विदलिकित फुलझाडांचे लहान कुल; क्युप्युलिफेरी असेही याला म्हणतात. प्रमुख लक्षणे : वृक्ष; साधी सोपपर्ण पाने; नतकणिश फुलोरा; वायुपरागित एकलिंगी फुले; ४–७ खवल्यासारखी परिदले; केसरदले संख्येने अनियमित; तीन, अधःस्थ व जुळलेली किंजदले; किंजपुटात तीन कप्पे; व प्रत्येकात दोन बीजके; छदांच्या पेल्याने वेढलेले कवची फळ ( कपाली ); पुष्कहीन बिया; भूर्ज कुलाशी ( बेटयुलेसी ) साम्य.

**fairy ring** भूछत्र-वर्तुळ
जमिनीवर वर्तुळाकार उगवलेली भूछत्रे; त्यांचा उगम जमिनीतील कुजकट पदार्थावर वर्तुळाकार बहुवर्षायू तंतूपासून होतो; रात्री जणू स्वर्गीय पऱ्या तेथे फेर धरून नाचल्या असाव्या अशा जुन्या गैरसमजुतीमुळे त्या अर्थाचे इंग्रजी नाव पडले असावे; पहा mushroom.

**falcate** दात्राकृति
कोयत्यासारखे; उदा. काही कवकातील ( काणी ) विबीजुके; फळे, उदा. मेढशिंगी (*Dolicandrone falcata* Seem.).

**fall of leaves** पानगळ
वर्षातून एकदा होणारी पानांची गळून पडण्याची प्रक्रिया; निष्पर्ण होणे.

**false (pseudo)** छद्मी; आभासी; खोटे
खऱ्याचा फक्त भास उत्पन्न करणारा अवयव.

**— axis** छद्मी अक्ष
अनेक उपाक्षांचा बनलेला, पण एक दिसणारा अक्ष.

**— fruit** छद्मफल; आभासी फल
भोंदू फळ; किंजपुटापासून न बनता इतर भागांपासून ( देठ, पुष्पस्थली, पुष्पदले, इ. ) बनलेले व सामान्यपणे फळ मानले गेलेले; उदा. काजू किंवा बिब्बा यांचे मांसल देठ. पहा pome.

**— indusium** छद्मी पुंजत्राण
काही नेचांतील पानांची कडा दुमडून बनलेले बीजुककोशपुंजावरचे संरक्षक आवरण; उदा. टेरिस वंश.

**— parenchyma** छद्मी मृदूतक
आधी स्वतंत्र असलेल्या कोशिका ( किंवा तंतू ) नंतर एकत्र येऊन त्यांचा ऊतकासारखा बनलेला समूह; उदा.

भूछत्राचा दांडा, छत्र; अर्गटचे जालाश्म, इ. पहा ergot, sclerotium.

**family** कुल

अनेक संबंधित वंशांचा गट; पहा genus, order;

**fan-shaped (flabelliform)** व्यजनाकृति

पंख्यासारख्या पसरट आकाराचे; उदा. ताडाचे (*Borassus flabelifer* L.) पान.

**farinaceous (farinose)** (१) भुरकट; (२) पिष्टमय

(१) पिठुळ आवरण असलेले; (२) स्टार्च किंवा तत्सम पदार्थ असलेले.

**fascicle** वृन्द

गट, संच, झुबका; उदा. अनेक फुलांचा किंवा वाहिन्यांचा गट.

**fascicular** वृन्दस्थ

गटामध्ये असलेला.

**— cambium** वृन्दस्थ ऊतककर

वाहिन्यांच्या गटातील नवीन घटक बनविणारे ऊतक; पहा tissue.

**fasciculate leaves** वृन्दपर्णे

एकत्र झुबक्यात असलेली अनेक पाने; उदा. पाइन, भुईचाफा, निशिगंध, कुमूर, नागदवणा, इ.

**fastigate** समृजु

परस्परांच्या फार जवळ वाढणाऱ्या उभ्या शाखा असलेला (वृक्ष).

**fat** मेद; वसा

स्निग्ध (तुपकट) किंवा चरबीयुक्त पदार्थ; चरबी.

**father-plant** पितृ-वनस्पति

संकर-प्रक्रियेत पराग (नर-गंतुके) देणारी वनस्पती.

**fatty acid** मेदी अम्ल; मेदाम्ल

स्निग्ध पदार्थांचा एक घटक; दुसरा घटक म्हणजे ग्लिसरीन.

**— body** मेदकण; मेदीकाय

चरबी इ. स्निग्ध पदार्थांचे कण.

**fauna** प्राणिजात

विशिष्ट प्रदेशातील सर्व प्राणी अथवा त्यांची संकलित नावांची यादी; पूर्ण माहितीचा ग्रंथ. पहा flora.

**feather-veined (penninerved)** पिच्छसिराल

पिसासारखी शिरांची मांडणी असलेले (पान); आंबा, रामफळ, इ.

**feathery (plumose)** पिच्छल

पिसासारखे; अनेक लांब केस असून प्रत्येकास बारीक लव असलेले; उदा. मका, मोरवेल यांची किंजले.

**fecundation (fertilisation)** फलन

अंदुक व रेतुक यांचा संयोग; स्त्री- व पुं- गंतुकांचे मीलन (एकरूप होणे).

**feeder** (१) पोषक; (२) पोषकावयव

(१) आश्रय वनस्पती; (२) अन्नपाण्याचा पुरवठा करणारा अवयव (साधन); उदा. सिलाजिनेलाच्या गर्भांकुराचा तळभाग (पद); नीटेसी.

**feeding process** अशनक्रिया

अन्नपाणी घेऊन ते आत्मसात करणे.

**felted** ऊर्णजालकित

बुरणुसासारखे केसांच्या गुंतवळ्याचे (नमनाचे) आवरण असलेले.

**— tissue** ऊर्णोतक

वर वर्णिल्याप्रमाणे ऊतक (कोशिकांचा समूह).

**female** मादी; स्त्री-

स्त्रीत्व दर्शविणारे विशेषण; आंतरराष्ट्रीय चिन्ह ♀

**— cone** स्त्री-शंकु

प्रकटबीज वनस्पतींत आढळणाऱ्या दोन प्रकारच्या शंकूंपैकी बीज निर्मिणाऱ्या अवयवांचा (शंकूसारखा) समूह (फुलोरा); पहा cone; उदा. चिल, देवदार, इ.

**— flower** स्त्री-पुष्प

फक्त किंजदले असणारे फूल; उदा. पपई, मका, भोपळा, इ.

**— gametangium** स्त्री-गंतुकाशय

स्त्रीलिंगी प्रजोत्पादक कोशिका (अंदुक) निर्मिणारा अवयव (एककोशिक किंवा अनेककोशिक); पहा oogonium, archegonium.

**— gamete (egg, oosphere, ovum)** स्त्री-गंतुक; अंदुक; अंडे

लैंगिक प्रजोत्पादनात आवश्यक अशी स्त्रीलिंगी कोशिका (गंतुक); यालाच "स्त्री युग्मक" म्हणतात.

**— gametophyte (prothallus)** स्त्री-गंतुकधारी

फक्त स्त्रीलिंगी प्रजोत्पादक कोशिका किंवा त्यांचे उत्पादन करणारे अवयव (अंदुककलश, अंदुकाशय, इ.) धारण करणारी पिढी.

**— plant** स्त्री-वनस्पती; मादी वनस्पती

फक्त स्त्री-पुष्पे अथवा स्त्रीलिंगी अवयव निर्माण करणारी

वनस्पती; उदा. फळ येणारे पपईचे झाड; कुंकुम वृक्ष; बीजधारक सायकस; इ.

**feral** वन्य

जंगली; रानटी; वनात आढळणारी किंवा लागवडीत नसलेली (वनस्पती).

**ferment** वितंचक; विरजण

पहा enzyme.

**fermentation** वितंचन

कार्बनी पदार्थांचे वितंचकाने (कार्बनी निदेशकाने) घडवून आणलेले रासायनिक रूपांतर (विघटन); उदा. दुधाचे दह्यात रूपांतर; लोणी खंवट होणे; साखरेचे रूपांतर मद्यार्कात होणे; मद्यार्कापासून ॲसेटिक अम्ल बनणे; सामान्य भाषेत आंबणे. अशा प्रक्रिया प्राणवायूचा उपयोग न करता किंवा करून घडून येतात.

**— , alcoholic** मद्योत्पादक वितंचन

मद्याचे उत्पादन (निर्मिती) होणारी रासायनिक विक्रिया; उदा. निरेपासून ताडी बनणे.

**fern** नेचा (वनस्पति)

पहा Filicinae; Filicales.

**ferrobacteria** लोहजंतु

लोखंडाच्या लवणात बदल घडवून आणणारे सूक्ष्मजंतू.

**ferruginous** (१) ताम्रवर्णी; गंजवर्णी; (२) लोही; लोहयुक्त; लोहमय

(१) गंजलेल्या लोखंडाच्या रंगाचे.

(२) लोखंड असलेले.

**ferrugo** तांबेरा

कवक वनस्पतींपैकी (गदाकवक) एका प्रकाराने आश्रय वनस्पतीवर आलेला तांबूस ठिपके पाडणारा जीवोपजीवी रोग (rust); उदा. गहू, जोंधळा, चमेली, कुसर, इ.

**fertile** (१) सुपिक (२) फलनक्षम; अवध्य

(१) चांगले पीक येईल अशी (जमीन); पिकाऊ.

(२) फळ (अपत्य, गर्भ) उत्पन्न करण्याचे सामर्थ्य असलेले; उदा. फूल, पराग, बीजक.

**fertilisation** फलन

नर– व स्त्री-प्रजोत्पादक कोशिकांची (घटकांची) एकरूप होण्याची प्रक्रिया; लैंगिक प्रजोत्पादनातील मौलिक प्रारंभीची प्रक्रिया.

**—, cross** परफलन

दोन भिन्न व्यक्तींच्या (एकाच जातीच्या) प्रजोत्पादक कोशिकांचा संयोग व रंदुकाची निर्मिती.

**—, self** आत्मफलन

एकाच उभयलिंगी व्यक्तीच्या दोन भिन्नलिंगी प्रजोत्पादक कोशिकांचे मीलन.

**— tube** फलन–नलिका

फलनात गंतुकांना मार्ग देणारा नळीसारखा भाग; उदा. काही शैवले, कवक इ.

**fertilise (fertilize)** (१) फलित करणे (होणे); (२) फलनक्षम करणे

(१) अंदुक व रेतुक यांचे मीलन होणे.

(२) जमिनीची सुपीकता वाढविणे; त्याकरिता खते घालणे.

**fertility** (१) जननक्षमता; (२) सुपिकता

(१) फलित होण्याची पात्रता; (२) जमिनीचा पिकाऊपणा.

**fertilizer** खत

जमिनीची सुपिकता वाढविणारे पदार्थ.

**fetidus (foetid)** दुर्गंधित; दुर्गंधी

वाईट वास येत असलेले; उदा. कृष्णकमळाची एक जाती (*Passiflora foetida* L.).

**fibre** सूत्र; धागा

वनस्पतींच्या अवयवांत बळकटी आणणारी जाड कोशिकावरणाची लांबट कोशिका.

पहा prosenchyma, sclerenchyma.

**— crop** धागा पीक

उपयुक्त धाग्यांच्या उत्पादनाकरिता केलेली लागवड. उदा. अंबाडी, घायपात, ताग, इ.

**fibril** सूत्रक

अतिसूक्ष्म धागा; कोशिकावरणात व प्राकलात हे धागे आढळतात.

**fibrillose** सूत्रकी

अनेक सूत्रकांनी बनलेले.

**fibrous** सूत्रमय; सूत्रल

धागेदार; अनेक धाग्यांचे बनलेले; उदा. वाहकवृंदात धागे आढळतात.

**— covering** सूत्राच्छादन; सूत्रावरण

सूत्रांचे आवरण; उदा. नारळ व सुपारी यासारख्या कित्येक फळात जाड धाग्यांचे मध्यकवच असते; या धाग्यांस काथ्या म्हणतात; पहा mesocarp.

**— drupe** सूत्रल अश्मगर्भी फळ

जाड सूत्रांचे मध्यकवच व कठीण अंतःकवच असलेले फळ; उदा. नारळ; सुपारी (पोफळी).

**— root system** सूत्रल मूलतंत्र; तंतुमूल संस्था
जाड दोऱ्याप्रमाणे अनेक आगंतुक मुळांचा झुबका; उदा. मका व कित्येक गवते.

**— tissue** सूत्रल ऊतक
जाड आवरणाच्या कोशिकांचा बनलेला समूह.

**fibro-vascular bundle** सूत्रल वाहक वृंद
अनेक कठीण लांबट कोशिका असलेला वाहक ऊतकांचा जुडगा; पहा vascular bundle.

**fid (cleft)** खंडित; भिन्न
अंशतः विभागलेले या अर्थाचा प्रत्यय.

**fig-insect** उदुंबर कीटक
उंबर, अंजीर, पिंपळ, वड, इ. यांच्या फळात आढळणारे व फुलोऱ्यात परागण घडवून आणणारे वराटक प्रकारचे कीटक (कैंबरे).

**filament** तंतु
बारीक दोऱ्यासारखा अवयव; अनेक कोशिकांची माळ; उदा. युलोथ्रिक्स, स्पायरोगायरा इ. शैवले किंवा अनेक कवक. पहा hypha.

**— of stamen** केसरतंतु
केसरदलाचा परागकोशधारी देठासारखा अवयव.

**filamentous** तंतुमय; तंतुयुक्त
तंतूंचे बनलेले; शैवाळीतील गंतुकधारीची आरंभीची अवस्था; शैवलांचे किंवा कवकांचे शरीर.

**filar** सूत्राभ
लांबट व पातळ (केस; उपांग, इ.).

**filial** पैतृक; संतानक
संततिविषयक.

**— generation** संतानीय पिढी
संकरापासून प्रसवलेली पिढी; संकरज पिढी.

**— regression** संतानीय परागति
एखाद्या लोकसमुदायामध्ये, सरासरीने पाहता, एखाद्या आनुवंशिक लक्षणांबाबत, मुले सामान्य पातळीहून आईबापापेक्षा कमी ढळतात; म्हणजेच मुले शक्य तो सर्व सामान्यतेच्या जवळपास राहतात. उदा. उंच आईबापांची मुले (सरासरीने) त्यांच्यापेक्षा कमी उंच (सामान्य उंचीजवळ) असतात; उंचीत प्रगतीपेक्षा परागती आढळते; खुजेपणाच्या बाबतीतही हाच प्रकार असतो. तेथे मुले कमी खुजी असतात. यामुळे लोकसमुदायातील सामान्यपातळी राखली जाते; याला अपवाद उत्परिवर्तनाचा; पहा mutation.

**Filicales** नेचे गण; फिलिकेलीझ
नेचे वर्गातील एकमेव गण. काही नेचाभ पादपातील एक वर्ग मानतात; एंग्लर यांनी याचे दोन गट (स्थलनेचे व जलनेचे) केले होते. लक्षणे : पहा Filicinae.

**Filicinae** नेचे वर्ग; फिलिसीनी
नेचाभ पादप (टेरिडोफायटा; वाहिनीवंत अबीजी वनस्पती) या विभागातील एक वर्ग; काही शास्त्रज्ञांनी यात दोन उपवर्ग (स्थूलबीजुककोशी व तनुबीजुककोशी) केले असून त्यापैकी एकात समबीजुक सत्यनेचे (फिलिसीज) व असमबीजुक जलनेचे असे दोन गण अंतर्भूत केलेले आढळतात; फिलिकेलीझ (नेचे गण) व जलनेचे असेही दोन गण मानतात, तर काही शास्त्रज्ञांनी जलनेचांना नेचे गणातच समाविष्ट केले आहे. वर्गीकरण विवाद्य (विविध) आहे. नेचे वर्गाची प्रमुख लक्षणे : बीजुकधारी पिढीला मूळ, खोड व मोठी पाने एकाआड एक असतात. वाहक ऊतकांच्या चितीय संरचनेत पर्णविवरे असतात. बीजुककोश पानांच्या अक्षविमुख पृष्ठावर (मागील बाजूस) किंवा किनारीवर असतात. मुळे क्वचितच नसतात. या वर्गाचा उगम नग्नपादपवर्ग (सायलोफायटीनी) या प्राचीन वर्गापासून झाला असावा असे मानतात. कदाचित या दोन्हीचा उगम सारख्याच पूर्वजापासून झाला असावा. नेचे वर्गाचे तीन उपवर्ग हल्ली बहुतेक शास्त्रज्ञ मानतातः

(१) अश्मीभूत प्रारंभिक नेचे (प्रायमोफिलिसीज).

(२) स्थूलबीजुककोशी (युस्पोरॅंजिएटी) : अपूर्ण विकसित; काही अश्मीभूत व काही विद्यमान नेचे.

(३) तनुबीजुककोशी (लेप्टोस्पोरॅंजिएटी) : पूर्ण विकसित, परंतु काही प्राचीन व काही विद्यमान नेचे; उदा. हंसराज, रातकोंबडा, राजहंस, वृक्षीनेचे इ. पहा Eusporangiate; Leptorporangiate; Psilophytineae.

**filiform** तंतुसम
सुतासारखे बारीक; तंतूप्रमाणे बारीक व लांबट; उदा. अमरवेलीचे खोड (*Cassytha filiformis* L.).

**fimbriate (fringed)** कंकतिकाकृति
फणीसारखे दातेरी; झालरीसारखे; उदा. पिंक (डायांथस) च्या पाकळ्या; माकडशिंगाच्या (*Caralluma fimbriata* Wall.) फुलाच्या पाकळ्या.

**fimicolous** शमलवर्धी
खताच्या ढिगावर वाढणारी (वनस्पती).

**fissile** विखंडी; विखंडनशील
चिरलेले; चिंबलेला किंवा ती क्षमता असलेला (अवयव).

**fissiparous** विखंडकारी
चिंबणारा किंवा चिरत जाणारा.

**fission** द्विभंजन; भंजन
सहज दोन अथवा अधिक संपूर्ण भाग होणे (भंगणे). उदा. सूक्ष्मजंतूच्या कोशिका; नील-हरित शैवले. यामध्ये प्रकलाची तपशीलवार विभागणी नसते.

**fissured** स्फाटित; भेगाळ
बाहेरून भेगा (चिरा) पडलेली (मोठ्या झाडाची साल); उदा. चिंच, बाभूळ, शिरीष इ. उन्हाळ्यात सुकल्यामुळे तडकून भेगा पडलेली जमीन.

**fistular** नलिकासम
नळीसारखे लांब व पोकळ; उदा. कांद्याचे पान व फुलोऱ्याचा दांडा; बाहव्याची (*Cassia fistula* L.) शेंग प्रथम पोकळ परंतु नंतर त्यात अनेक आडवे पडदे बनतात.

**fixation** १) अवबंधन; रोपण; २) स्थिरीकरण
(१) कुंडीत अथवा जमिनीत वनस्पती बसविणे.
(२) सूक्ष्मदर्शकाखाली निरीक्षण करण्याकरिता वनस्पती अथवा त्यांचे पातळ काप, प्राणी किंवा त्यांचे सूक्ष्म भाग रासायनिक प्रक्रियेने कायम करणे.

**— of carbon dioxide** कार्बन सात्मीकरण; कार्बन स्थिरीकरण
कार्बन डायॉक्साईड वायू शरीरात घेऊन व त्यावर रासायनिक प्रक्रिया करून त्याचे रूपांतर सेल्युलोज, व शर्करा यासारख्या पदार्थांत करण्याची प्रक्रिया; पहा carbon-assimilation.

**— of nitrogen** नायट्रोजन स्थिरीकरण
हवेतून किंवा पावसातून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जमिनीत पोचलेला अथवा जमिनीत असलेला नायट्रेट-रूप पदार्थ शोषून त्याचे रूपांतर नायट्रोजनयुक्त पदार्थांत करण्याची प्रक्रिया; पहा nitrogen-fixation.

**fixative** स्थिरकारी
स्थिर करणारा पदार्थ.

**fixity (immutability)** अपरिवर्त्यता
पिढ्यानुपिढ्या सजीवांत काहीही बदल न होता ते आरंभापासून होते तसेच राहिले आहेत अशी जुनी समजूत; क्रमविकासाची उपपत्ती याउलट आहे. पहा organic evolution.

**flabellate (flabelliform)** व्यजनाकृति; पंख्यासारखे
पहा fan-shaped.

**flaccid (limp, floppy)** शिथिल; सैल
कोशिकेतील पाणी कमी झाल्यावर तिला येणारी अवस्था.

**flaccidity** शैथिल्य
शिथिलता; म्लानता; उदा. कोमेजलेल्या (पाणी कमी झालेल्या) पानांची स्थिती.

**Flacourtiaceae** अत्रुण कुल; फ्लॅकोर्टिएसी
तांबट, अत्रुण, अट्टाक व काकर इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. बेंथॅम व हूकर यांनी याला सॅमिडेसी असे संबोधले असून एंग्लर व प्रँटल यांनी फ्लॅको-र्टिएसी नावानेच त्याचा उल्लेख व अंतर्भाव पराएटे-लीझ गणात केला आहे. हचिन्सन यांनी बिक्सेलीझ (केसरी गण) मध्ये समाविष्ट केले आहे. प्रमुख लक्षणे : वृक्ष व झुडपे; पाने चिवट, साधी, एकाआड एक, सोपपर्ण; नियमित चार किंवा अधिक भाग प्रत्येक पुष्पमंडलात असतात; पुष्पदले कधी सर्पिल; कधी पाकळ्यांचा अभाव; असल्यास सुट्या व अनेक; संदले २–१५ सुटी किंवा जुळलेली; केसरदले अनेक व कधी त्यांचे अनेक संघ; बहुधा ऊर्ध्वस्थ, २–१० किंजदलांच्या किंजपुटात तटलग्न बीजकाधानीवर अनेक बीजके; मृदुफळात किंवा बोंडात एक किंवा अनेक सपुष्क बिया व त्यावर कधी बीजोपांग.

**flagellate** प्रकेसलयुक्त (प्रकेसलवान); कशाभिकायुक्त
प्रकेसल असलेले.

**flagelliform** कशाभिकारूप; प्रकेसलाभ
प्रकेसलासारखे.

**flagellum** प्रकेसल; कशाभिका
कोशिकेच्या बाहेर आलेला, प्राकलाचा लांबट, केसला-पेक्षा मोठा व जटिल संरचनेचा धागा; यांची संख्या बहुधा एक किंवा दोन, क्वचित अधिक असून कोशिकेला ते गति प्राप्त करून देतात. सूक्ष्मजंतूंची केसले लहान व साधी असतात; चर-बीजुके, चर-गंतुके (नेचे) इत्यादींना प्रकेसले असतात. पहा cilium.

**flask-shaped** सुरईप्रमाणे; कलशाकृति
गोलसर बसका तळभाग व लांब मान असलेले प्रायोगिक काचपात्र; उदा. शेवाळी व नेच्यांतील अंदुककलश.

**flavescence** पीतता
पिवळेपणा.

**flavescent** पीत
पिवळट; वनस्पतींच्या अवयवांना येणारा नैसर्गिक फिकट पिवळा रंग.

**flavous** पिवळेजर्द

**fleshy** मांसल; रसाळ; मगजयुक्त
गर (मगज) असलेले; रसयुक्त (केस अथवा कोशिकांनी भरलेले ); काही वनस्पतींच्या शरीराचा एखादाच भाग मांसल किंवा रसाळ असतो; उदा. निवडुंगाचे खोड, पान फुटीची पाने; तुतीच्या फळातील किंवा फणसातील परिदले; काजूचा देठ; सफरचंदाची पुष्पस्थली; नारळातील पुष्क ( खोबरे ); अननसाच्या फुलोऱ्यातील दांडा व फुलाचे भाग; संत्री व मुसुंबातील पातळ अंतःकवचातील केस; विलायती चिंचेतील बीजोपांग.

**flexible** नम्य; लवचिक
दाबामुळे वाकून (न मोडता) पुनः पूर्ववत होणारे. उदा. लव्हाळ्याचा दांडा; कित्येक पानांचे देठ; अनेक खोडे, ताणे इ.

**flexibility** नम्यता
वर वर्णन केलेला गुण.

**flexuous ( flexuose )** वाकडातिकडा; नागमोडी

**float** तरंड
तरंगणारा किंवा तरंगण्यास मदत करणारा अवयव; उदा. फ्यूकस शैवलाची एक जाती; सरगॅसम शैवल; पाण्यातील हायसिंथ अथवा शिंगाडा यांचे देठ. फळातील काथ्यामुळे नारळ ( शहाळा ) तरंगतो.

**floating** प्लवमान; प्लव; प्लवन
तरंगणारे.

**floating mechanism** तरंडयोजना; प्लवनयोजना
वर वर्णिल्यासारखी व इतर काही तशी तरंगण्याची साधने; बहुधा अशा साधनांत हवायुक्त पोकळी असते; उदा. कमळाच्या बिया, उंडीची फळे; नारळातील काथ्याचे आवरण.

**floccose** ऊर्णी; तूलीय; तूलाच्छादित
लोकरीसारख्या दिसणाऱ्या नरम केसांनी आच्छादलेला ( अवयव ).

**flocculent** उर्णाभ
लोकरीसारखे दिसणारे व सहज निघून जाणारे ( केस ).

**flora** पादपजात
( १ ) देशातील किंवा प्रदेशातील सर्व वनस्पती;



( २ ) विशिष्ट स्थानातील वनस्पतींच्या वर्णनाचा ग्रंथ; यामध्ये वनस्पती ओळखून काढण्याकरिता विशिष्ट योजनाही असते. उदा. Flora of India म्हणजे भारतातील पादपजात.

**floral** पुष्पीय; पुष्प-
फुलांचा; फुलासंबंधी; फुलांतील.

**— axis** पुष्पाक्ष
फुलाचा किंवा फुलातील अवयवांचा दांडा (अक्ष ).

**— bud** कलिका; कळी
फुलातील सर्वच अविकसित भागांचा प्ररोह ( एकत्रित समूह ).

**— diagram** पुष्पचित्र
फुलातील सर्व भाग, त्यांचे परस्परांशी व खोडाशी संबंध दर्शविणारी छेदासारखी आकृती.

**— envelops** परिदले
फुलातील संदले, प्रदले अथवा तत्सम आवरक पुष्पदले.

**— formula** पुष्पसूत्र
फुलातील सर्व संरचना पूर्णपणे संक्षिप्त रीतीने व्यक्त करण्याकरिता आंतरराष्ट्रीय खुणा, चिन्हे व आकडे इत्यादींचा उपयोग करून ते सूत्रमय पद्धतीने मांडण्याचा प्रकारः—

उदा. १) कर्कटी कुलातील सर्वसाधारण पुष्पसूत्र —
नर-फूल : ⊕ ♂ के ( ३–५ ) सी ( ३–५ ) ए ३;
स्त्री-फूल : ⊕ ♀ के( ३–५ )सी( ३–५ )जी (१–३);

२) चामर कुलाचे पुष्पसूत्र–
⊕ ⚥ के ५–० सी ५ ए ५ जी (२)

३) मोहरी कुलाचे पुष्पसूत्र–
⊕ ⚥ के २ + २ सी ४ ए २ + ४ जी (२)

स्पष्टीकरण : (१) येथे नियमित नरफुलात संदले जुळलेली तसेच प्रदलेही जुळलेली ३–५ व केसरदले ३ असतात; स्त्रीफुलात इतर भाग तसेच असून केसरदलांऐवजी १–३ जुळलेली अधःस्थ किंजदले; ( २ ) येथे द्विलिंगी नियमित फुलात सुटी पाच संदले, कधी नसल्यासारखीं; पुष्पमुकुटात सुट्या ५ पाकळ्या व ५ सुटी केसरदले आणि २ अधःस्थ जुळलेल्या किंजदलांचा किंजपुट असतो. ( ३ ) येथेही नियमित द्विलिंगी फुले असून संवर्तात २ संदलांची २ मंडले, ४ पाकळयांचा पुष्पमुकुट आणि केसरदलांची २ मंडले, एकात २ व दुसऱ्यात ४; ही सर्वच पुष्पदले सुटी; मात्र किंजपुट २ ऊर्ध्वस्थ किंजदले जुळून बनलेला असतो.

प्रदले व केसरदले यांचा संपर्क सी ⁀ ए ह्याप्रमाणे वरच्या

दोन्ही कमानी रेषेने ( उदा. धोत्र्याचे फूल ) आणि केसरदले व किंजदले यांची युती ए͡ जी याप्रमाणे दर्शवितात ( उदा. रुई ); अनेक पुष्पदलांकरिता ∞ ही खूण ( उदा. पेरू; सिताफळ ), अनियमित फुले असल्यास ·|· ही खूण ( उदा. तुळस, वाटाणा ) व नियमित फुलाकरिता ⊕ ही खूण वापरतात ( धोत्रा, गुलाब ). सुटी पुष्पदले कंसात न घालता व जुळलेली (अंशतः व पूर्णतः) पुष्पदले कंसात घालून दाखवितात. किंजमंडळ ऊर्ध्वस्थ असल्यास, जी पुढील आकड्याखाली आडवी रेषा व अधःस्थ असल्यास आकड्यावर आडवी रेषा लिहितात. देवनागरी ऐवजी रोमन लिपीतही ( K, C, A, G ) आद्याक्षरे वापरून पुष्पसूत्र लिहिता येईल. तसेच भारतीय देवनागरी आद्याक्षरे (सं, पु, के, किं) वापरून पुष्पसूत्र लिहिणे शक्य आहे.

**— leaf** पुष्पदल

फूल हा प्रजोत्पादक प्ररोह मानल्याने त्यातील अक्षावरची सर्व प्रकारची दले, पानांची रूपांतरे होत; उदा. संदले प्रदले, केसरदले व किंजदले; पुष्पाक्ष व पुष्पस्थली हे त्यातील खोडाचे ( अक्षाचे) भाग; पहा flower; shoot.

**— shoot** पुष्पप्ररोह

प्रजोत्पादनाकरिता फुलात रूपांतर पावलेला वनस्पतीचा भाग ( प्ररोह ). इतर शाकीय भागाप्रमाणे यातही अक्ष व पाने ( पुष्पदले ) अंतर्भूत होतात.

**— symmetry** पुष्पसमात्रता

फुलातील भाग व त्यांचे परस्पर संबंध यावर त्यातील प्रमाणबद्धता अवलंबून असून एक, दोन अथवा अधिक उभ्या पातळ्यांनी फूल विभागून ती प्रमाणबद्धता व्यक्त करण्याची पद्धत; पहा radial, bilateral, asymmetrical.

**florescence ( anthesis )** पुष्पकाल

फुले येण्याचा मोसम.

**floret** पुष्पक

स्तबक फुलोऱ्यातील (उदा. सूर्यफूल, झिनिया, झेंडू, शेवंती, इ.) असंख्य लहान फुलांतील एक फूल.

**floribundus** विपुलपुष्पी; बहुपुष्पी

खूपच फुले येणारी (वनस्पती); उदा. उक्षी (*Calycopteris floribunda* Lam.); धायटी (*Woodfordia floribunda* Salisb.).

**floriculture** पुष्पसंवर्धन

विशेषतः फुलांची पैदास करण्याचा प्रयोग (उद्योग).

**floridean starch** फ्लॉरिडी स्टार्च; फ्लॉरिडी मंड

लाल शैवल वनस्पतींत आढळणारे आरक्षित कार्बोहायड्रेट; याचे कण परिकलात विखुरलेले असून त्यांवर आयोडिनचा थेंब टाकल्यास ते लाल किंवा पिंगट दिसतात; खऱ्या स्टार्चप्रमाणे ते जांभळट दिसत नाहीत; तसेच ते वर्णकणूंत नसतात.

**floriferous** पुष्पी; पुष्पधारी; सपुष्प

फुले धारण केलेला (अक्ष; वनस्पती).

**floriform** पुष्पाकृति; पुष्पाकार

फुलासारखा आकार असलेले.

**florist** १) पुष्पसंवर्धक; २) पादपजातलेखक

(१) फुलझाडांची लागवड, फुलांची पैदास व खरेदी -विक्री करणारा;

(२) फ्लोरा [पादपजाती] संबंधीचा ग्रंथकर्ता.

**floristic** पादपी; पादपजातीय

पादपजातीसंबंधी; पहा flora.

**floristic composition** पादपी संघटना (रचना)

विशिष्ट क्षेत्रातील भिन्न वनस्पती व त्यांचे शेकडा प्रमाण इत्यादी माहिती.

**floristics** पादपीसंघटनाशास्त्र;

पादपजाती, त्यांचा उगम, विकास, स्थानिक व भौगोलिक प्रसार इत्यादी सर्व बाबींच्या तपशीलवार माहितीची विज्ञानशाखा.

**florus ( flowered )** – पुष्पी

फुले असलेले; उदा. एकपुष्पी, द्विपुष्पी, बहुपुष्पी ( अनुक्रमे एक, दोन किंवा अनेक फुले असलेले ); पहा caulifiorus.

**flower** पुष्प; फूल

सुमन, कुसुम, सुम, प्रसून ही नावेही संस्कृत वाङ्मयात आढळतात.

केसरदले व किंजदले यापैकी निदान एकाचे मंडल व सामान्यतः त्याभोवती परिदलांचे निदान एक मंडल यांनी बनलेले संक्षिप्त प्रजोत्पादक इंद्रिय ( प्ररोह ). परिपूर्ण फुलात चार प्रकारची मंडले (संवर्त, पुष्पमुकुट, केसरमंडल व किंजमंडल) असतात. पुष्पदले संख्येने आकाराने, रंगाने इत्यादी प्रकारे पुष्कळ विविधता दर्शवितात. प्रकटबीज वनस्पतीत प्रजोत्पादक प्ररोह असतात परंतु केसरदले व किंजदले यांशी तुलनात्मक अवयव असूनही परिदले व किंजपुट यांच्या अभावी त्यांना फुले की फुलोरे म्हणावे याबद्दल एकमत नाही;

त्यांना शंकू म्हणतात. पहा calyx; corolla; androecium; gynoecium.

**— arrangement** पुष्परचना
फुलांची मांडणी.

**— bed** पुष्पवाटिका
फुलझाडांचा वाफा; अशा अनेक वाफ्यामुळे बागेची शोभा वाढते.

**— bud** पुष्पकलिका; कलिका
फुलाची कळी.

**—, complete** परिपूर्ण पुष्प
पहा flower.

**— head** स्तबक
अनेक लहान फुलांचा झुबका; उदा. सूर्यफूल कुल.

**—pot** पुष्पपात्र;
फुले शोभादायक पद्धतीने एकत्र जुळवून ठेवण्याचे पात्र ( भांडे ).

**— stalk** पुष्पवृंत
फुलाचा देठ.

**flowering** पुष्पविकसन
फुलांच्या कळ्या उमलणे; झाड मोहरणे ( बहरणे ).

**— glume** बाह्यतुष
गवतांच्या फुलांचे बाहेरचे छद; त्याबाहेरच्या छदास परितुष ( outer glume ) म्हणतात.

**— plant** सपुष्प वनस्पति; फुलझाड
पहा Angiospermae; Phanerogamae.

**flowerless plant** अपुष्प वनस्पति
फुले नसलेल्या वनस्पती; पहा Gymnospermae; Cryptogamae.

**fluctuating variation** चंचलित भेद
एखाद्या लक्षणासंबंधी सामान्य स्थितीच्या (मूल्याच्या) आसपास ढळणारा फरक; उदा. फळाच्या सर्वसामान्य आकारापेक्षा कमी व जास्त आकार असलेली फळे त्याच झाडावर (किंवा त्याच जातीच्या दुसऱ्या झाडावर) असल्याने दिसणारा फरक; पहा continuous variation.

**fluorescent** प्रतिदीप्तिशील
अतिनील किंवा इतर प्रारणात ठेवल्यानंतर प्रकाश देणारे.

**flush** १) पुनर्वृद्धी; २) आकस्मिक जलवृद्धी
(१) काष्ठमय वनस्पतीचा पुन्हा वाढ होण्याचा काळ.
(२) पाऊस किंवा अन्य कारणाने मर्यादित क्षेत्रात पाण्याचा पुरवठा व त्यामुळे येणारी वनश्रीतील संपन्नता.

**fly-flower** मक्षिका-पुष्प
माश्यांच्या साहाय्याने परागित होणारे फूल; उदा. सुरण, पपनस, मेंदी इ.

**fly-trap** माक्षिका-पञ्जर
माशा किंवा तत्सम कीटक आकर्षून, पकडून, मारून त्यांचा अन्नाप्रमाणे वापर करण्याचे साधन ( सापळा; चापासारखी यंत्रणा); उदा. डायोनिया, ड्रॉसेरा इ. कीटकभक्षक वनस्पतीची पाने.

**flying hair** उड्डानकेश
वाऱ्याने तरंगत दूर जाण्यास व हवेत अधांतरी राहण्यास उपयुक्त केस (धागा); उदा. सहदेवीचा संवर्त; कुडा, कापूस, रुई, सावर यांच्या बीजावरील केस (धागे).

**flying membrane** उड्डानपटल
फळ अथवा बी यांना चिकटून असलेला पंखासारखा पातळ व पसरट भाग; उदा. शाल, पेट्रिया, चिल, शेवगा, वावळा, बिबला, टेटू, इ.

**flying tissue** उड्डानोतक
वर वर्णन केलेल्या पंखातील विशिष्ट ऊतक ( कोशिका समूह ).

**foetid** दुर्गंधी
पहा fetidus. उदा. हिंगडा (*Ferula foetida* Regel. ).

**folded** संमीलित
दुमडलेले; मध्यशिरेवर पात्याचे दोन्ही भाग पुस्तकाप्रमाणे मिटविलेले; पहा conduplicate.

**foliaceous** पर्णसम; पर्णाभ
हिरव्या पानासारखे; उदा. वाटाण्याची उपपर्णे; पहा phylloclade, cladode.

**foliage** पर्णसंभार
सर्व हिरव्या पानांचे खोडावरील आवरण.

**— leaf** हरितपर्ण
कोणतेही रूपांतर न पावलेले हिरवे पान.

**foliar** पर्णसम; पर्णसंबंधित
पर्णरूप; पानासारखे; पानाशी संबंधित.

**— gap** ( leaf-gap, folial gap ) पर्ण-विवर; पर्णांतराल
खोडाच्या रंभामधील, पानात जाणाऱ्या वाहक

ऊतकांमुळे ( वृंदामुळे ) मूळच्या वाहक चितीत पडलेली खिंड ( पोकळी ); उदा. काही नेचे; पहा stele.

**— spur** पर्णप्ररोह
पहा bifoliar spur;

**— (folial) trace** पर्ण-लेश; पर्णानुपथ
पहा leaf-trace.

**foliate (foliolate)** – पत्री; - दली
दले असलेले ( संयुक्त पान ); उदा. दोन दलांचे ते द्विदली (हिंगणबेट ); तीन दलांचे ते त्रिदली ( बेल ); लिंबूचे पान हे एकदली संयुक्त पान मानतात.

**foliation (leafing)** पर्णागम; पर्णन
वनस्पतीला पाने किंवा पालवी येणे ( पल्लवित होणे ).

**folicole** पर्णजीवी
जिवंत किंवा मृत पानावर जगणारी ( दुसरी वनस्पती ).

**folicolous** पर्णवासी
पानावर राहणारी ( अन्य वनस्पती ); पहा epiphyte.

**foliiferous** पर्णधारी; सपर्ण
पाने असणारे ( उदा. खोड ).

**foliicolous** पर्णवासी
पानावर वाढणारी अपिवनस्पती; उदा. काही शैवले, कवक, धोंडफुले.

**foliolose** दलयुक्त
दलांचे ( पानासारख्या लहान उपांगांचे ) बनलेले.

**foliose (foliaceous)** १) सपर्ण २) पर्णाभ
(१) अनेक पाने दाटीवाटीने उगवली आहेत अशी (वनस्पती); उदा. हरिता वर्ग; पहा Musci (mosses).
(२) पानासारखे पातळ, हिरवे व पसरट; उदा. काही धोंडफुले, शैवले, गंतुकधारी, इ. पहा Lichen.

**folium (folius)** - पर्णी
पानाचे या अर्थी प्रत्यय. उदा. खंडितपर्णी, लंबपर्णी, ऱ्हस्वपर्णी; हिरवा अशोक ( *Polyalthia longifolia* Thw. )

**follicle** पेटिकाफल
पेटीसारखे (तळ व झाकण असलेले) उघडणारे फळ; एका ऊर्ध्वस्थ किंजदलापासून बनलेले, एका शिवणीवर तडकणारे शुष्क फळ; उदा. रुई, सोनचाफा, सदाफुली इत्यादींच्या घोसफळांतील प्रत्येक लहान फळ.

**food-body** खाद्यपिंडिका; अन्नगुलिका
पानाच्या आसपास असलेली व कीटकांस अन्नाकरिता उपयुक्त अशी कोशिकांची गाठ; उदा. बाभळीच्या एका जातीतील पानांच्या दलावरची गांठ.

**— - pollen** खाद्यपराग
वांझ परागकण; कधी अलग व विशिष्ट परागकोशात बनलेले व कीटकांस आकर्षक खाद्य असे परागकण.

**— - vacuole** अन्न-रिक्तिका
कोशिकेतील अन्नकण अथवा द्रव असलेली व प्राकलाने वेढलेली पोकळी.

**foot** पद
(१) काही वनस्पतींच्या गर्भांकुराचा तळचा पोषक व शोषक भाग; उदा. शेवाळी, नेचे, इ.
(२) केसाचा तळ.

**forbe** प्रशाक
गवताशिवाय इतर कोणतीही लहान वनस्पती; पहा herb.

**force** प्रेरण
कृत्रिम उपायांनी वनस्पतींना पाने, फुले वा फळे लवकर किंवा उशिरा बनविण्यास लावणे; मोसमापूर्वी किंवा नंतर भाज्यांचे पीक काढणे.

**forcipate** चिमटाकार
चिमट्याच्या आकाराचे.

**forest** अरण्य; वन
मुख्यतः मोठी झाडे, वेली व काही त्यांखाली अथवा त्यांमधून वाढणारी झुडपे व रोपटी असलेले घनदाट जंगल ( वनश्रीचा प्रकार ); मोठ्या वनस्पतींचा समावास; पहा formation.

**— climax** वनचरम
अनेक वृक्ष असलेली पादपसमुदायाची अंतिमावस्था ( चरमावस्था ).

**— product** वनोत्पाद
वनात निर्मिलेले (बनलेले).

**—, swamp (marshy)** अनूपवन
दलदली जमीन असलेले वन.

**forestry** वनविज्ञान
वनासंबंधी सर्व प्रकारची (संवर्धन, संरक्षण, उपयोग इ.) माहिती देणारी ज्ञानशाखा.

foriculate कर्तनीरुप
कात्रीच्या आकाराचे.

forked ( furcate ) द्विशाखी
प्रत्येक वेळी दोन फाटे फुटलेले; उदा. देठ, शिरा, इ.

— venatiou द्विशाखी सिराविन्यास
मध्यशीर व विशेषतः बाजूच्या शिरा पुनः पुनः दुभंगल्याप्रमाणे असलेली मांडणी; उदा. नेचे.

form ( १ ) आकृति; ( २ ) रूप
( १ ) संपूर्ण शरीराचा किंवा अवयवाचा आकार.
( २ ) स्वरूप व लक्षणांत फरक असलेले दोन किंवा अधिक वंश किंवा जाती. उदा. लोंबती पाने व ताठ पाने असणारी झाडे; यामध्ये त्यातील व्यक्तींच्या अवतरणातील संबंध ( नाते ) अनिश्चित असतो.

— - genus रूप-वंश
अनेक रूप-जातींचा गट.

— - species रूप-जाती
एकाच जातीतील पण काही किरकोळ फरक दर्शविणारे प्रकार ( किंवा वाण ).

— - taxon अपूर्ण वर्गक
मामुली अथवा तात्पुरत्या स्वरूपातील, वर्गीकरणातील एकक.

formation ( १ ) समावास ( २ ) संभवन
( १ ) सारख्या परिस्थितीत आढळणाऱ्या व समान वृत्तीच्या वनस्पतींचा समुदाय; उदा. वन; दलदल; तृणक्षेत्र. सारख्या आकृतींच्या समुदायांचे गट, वर्ग आणि वनश्री यांचे अनेक प्रकार करता येतात.
( २ ) निर्माण होण्याची प्रक्रिया; उदा. नवीन कळ्या, कोशिका, गर्भ, उपांगे, पाने, इ.

—, closed घन समावास
दाट (निबिड) समुदाय; यातील जमीन किंवा पृष्ठभाग सर्वत्र वनस्पतींनी व्यापलेला असतो; उदा. वन; लहान तळे.

—, desert मरु ( रुक्ष ) समावास
रुक्ष भूमीवर वाढलेला वनस्पतिसमुदाय ( समूह ).

—, forest वृक्ष ( वन ) समावास
मागे वर्णन केलेले वन. पहा forest.

—, grassland तृण समावास
कुरण, गवताळ प्रदेश; पहा prairie, meadow, veld, steppe, pasture, llano.

—, open विरल समावास
मधून मधून मोकळी जागा असलेला वनस्पतींचा समुदाय.

—, saline लवण समावास
खारट जमिनीत वाढणाऱ्या वनस्पतींचा समुदाय.

—, swamp अनूप समावास
दलदलीत वाढणाऱ्या वनस्पतींचा समुदाय.

formative phase संभवनावस्था; निर्मायी अवस्था
वनस्पतींच्या अवयवांची वाढ होत असताना व त्यांना आकार येत असताना नवीन कोशिका बनण्याची अवस्था; मुळांच्या व खोडांच्या टोकांस हा भाग असतो व त्यामागे लंबनावस्था असलेला भाग असतो.

— region निर्मायी क्षेत्र
शरीरात कोशिकांची निर्मिती जेथे होते तो भाग (प्रदेश).

fossil जीवाश्म; अश्मीभूत प्रशेष
प्राचीन कालातील वनस्पती किंवा प्राणी यांचा किंवा त्यांच्या अवयवांचा दगडावरील ठसा अथवा कार्बन, रेती किंवा चुनखडीने पूर्णपणे व्याप्त असा अवशेष; उदा. दगडी कोळसा हा प्राचीन वनस्पतींचा अश्मीभूत पण कार्बनयुक्त भाग होय; पहा diatomaceous earth.

— animal जीवाश्म प्राणी; अश्मीभूत प्राणी

— botany पुरावनस्पतिविज्ञान
अतिप्राचीन ( अश्मीभूत ) वनस्पतींच्या माहितीची शाखा.

— history जीवाश्मवृत्त
जीवाश्मरूप अवशेषांच्या माहितीच्या आधारे बनविलेले इतिवृत्त.

— plant जीवाश्म ( अश्मीभूत ) वनस्पति
केवळ जीवाश्म रूपातच आढळणारी वनस्पती; उदा. कॅलमाइट्स, स्फेनोफायलम, मेड्युलोसा, इ.

— wood काष्ठ जीवाश्म
काष्ठाच्या रूपात आढळणारा एखाद्या वनस्पतीचा भाग; उदा. मेड्युलोसा.

foster ( host ) plant आश्रय वनस्पति
इतर वनस्पतींना पोषण किंवा आधार देणारी वनस्पती.

fovea गर्तिका
लहान खाच; उदा. आयसॉएटिसच्या पानाच्या तळाशी असलेली खाच; त्यातच बीजुककोश असतो.

foveola प्रगर्त
अर्थ वर दिल्याप्रमाणे.

**foveolate** प्रगर्ती

एक लहान खाच किंवा अनेक खाचा असलेला ( अवयव ).

**fragment** खंड; शकल

पूर्ण भागाचा एक लहान तुकडा.

**fragmentation** खंडन

प्रत्यक्ष विभागणीने अनेक तुकडे ( उदा. प्रकलाचे ) होण्याचा प्रकार.

**free** मुक्त; सुटे

इतर भागास न चिकटलेले; उदा. संदले, पाकळ्या, इ. पहा polysepalous; polypetatous.

**— cell-formation** मुक्त कोशिका-निर्मिति.

जनक कोशिकेत अनेक नवीन ( बहुधा आठ ) सुट्या जन्य कोशिका बनणे; उदा. परागकण, धानीबीजुके.

**— – central placentation** मुक्त मध्यवर्ती बीजकविन्यास

किंजपुटात सर्व बीजके मधल्या पोकळीतील अक्षाभोवती चिकटून राहण्याची पद्धत. उदा. घोळ; पिंक.

**— living** मुक्तजीवी

स्वतंत्रपणे जगणारे; चिकटून नसणारे; उदा. काही शैवले, बीजुके, गंतुके इ.

**— nuclear division** मुक्त प्रकल ( केंद्रक ) विभाजन

प्रकलाच्या अनेक विभागणीनंतर, कोशिकाविभाजन न झाल्याने ती प्रकले विखरून राहण्याची प्रक्रिया.

**frequency** वारंवारता; बाहुल्य

वारंवार असण्याची किंवा आढळले जाण्याची घटना; एखाद्या पादपसंगतीतील अनेक नमुना-क्षेत्रात विशिष्ट जाती किती क्षेत्रात आढळते व एकूण किती क्षेत्रे तपासली यांच्या गुणोत्तरावरून बाहुल्याचे मापन करतात.

**frequent** बहुल

एखाद्या मर्यादित क्षेत्रात वारंवार आढळणारी ( वनस्पती ).

**fringing forest** अनुतट वन; तटवर्ती वन

किनारी वन; सतत वाहणाऱ्या पाण्याच्या ओहोळाच्या किंवा तळ्याच्या कडेने वाढणारे वन.

**frond** विपत्र; पाते

( १ ) नायकस, नेचे व तालवृक्ष यांच्या पानाचे विविध प्रकारे विभागलेले पाते;

( २ ) समुद्रशैवलाचे पात्यासारखे कायक ( शरीर );

( ३ ) शैवाकाचे ( दगडफुलाचे ) कायक; पहा stipe.

**frondose** विपत्रसम

सपाट, पसरट विभागलेल्या किंवा अखंड पात्यासारखे.

**fructescence** पक्वकाल

फळे पिकण्याचा काळ.

**fructiferous** फलधारी

फळे असणारे किंवा निर्माण करणारे ( झाड ).

**fructification** फलित

( १ ) बीजुकोत्पादक अवयव;

( २ ) फलनानंतरची प्रजोत्पादक संरचना;

( ३ ) फळे येण्याची प्रक्रिया;

( ४ ) लैंगिक प्रक्रियेनंतर ( वनस्पतीत ) बनणारी बीजयुक्त किंवा बीजुकयुक्त संरचना.

**fructose** फलशर्करा

फळापासून काढलेली विशिष्ट रासायनिक संघटनेची साखर; केटो-हेक्सोज शर्करा.

**fruit** फल; फळ.

सपुष्प वनस्पतींच्या फुलातील लैंगिक प्रक्रियेनंतर ( फलनानंतर ) किंजपुटापासून बनलेले, बीजास संरक्षण देणारे व बीजप्रसारास मदत करणारे इंद्रिय; लैंगिक प्रक्रियेचा फळ व बीज हा दृश्य परिणाम होय; क्वचित फलनाशिवाय अशी फळे बनतात व त्यात वांझ बिया असतात किंवा त्या मुळीच नसतात. उदा. बीजहीन द्राक्षे, केळी, गुलाब इ. पहा false fruit;

**— -culture** फलसंवर्धन

केवळ फळांकरिता फळझाडांची लागवड, संरक्षण इत्यादी प्रक्रिया.

**— stalk** फलवृंत

फळाचा देठ.

**frutescens (frutescent)** क्षुपीय; क्षुपाभ

झुडपासारखे ( वाढलेले ); उदा. मिरची ( *Capsicum frutescens* L. ).

**fruticose** क्षुपिल

लहान झाडासारखे अवयव असलेले; क्षुपासारखे.

**— lichen** क्षुपिल शैवाक

अक्ष, उपाक्ष, फांद्या इत्यादी पण साधे ( कायकाभ ) अवयव असलेले धोंडफूल; उदा. टंड्रातील रेनडियर मॉस; उस्निया.

**fuligineus ( sooty )** कज्जलाभ; काळेकुट्ट
काजळासारखे; उदा. काणी रोगासारखे.

**fumeus ( smoky )** धूम्रकल्प; धुरकट.
धुरासारखे.

**function** कार्य
इंद्रियाने किंवा अवयवाने केले जाणारे काम.

**fundamental** मौलिक
मूलभूत; आधारभूत; उदा. ऊतक; तंत्र; अवयव इ.

**— (ground) tissue** तल्पोतक
मौलिक ऊतक; बाहेरील त्वचा व वाहक भाग वगळल्यास इतर सर्वसामान्य आधारभूत व इतर अनेक कार्ये करणारा कोशिकांचा समूह; बहुधा हा भाग मृदूतक स्वरूपाचा असतो; पहा parenchyma.

**— — system** तल्पोतक तंत्र
अभित्वचा, मध्यत्वचा, अंतस्त्वचा, परिरंभ, निकाष्ठ इत्यादींचा समावेश करणारा शरीरातील ऊतकांचा व्यूह; पानातील विरलोतक, फळातील रसाळ ऊतके यांचाही अंतर्भाव येथेच होतो; पहा tissue.

**fungal** कवकीय
कवकासंबंधी; पहा fungus.

**fungicidal (fungicide)** कवकनाशक
कवकांचा (त्यापासून होणाऱ्या रोगांचा) नाश करणारे (द्रव्य).

**Fungi Imperfecti** अपूर्ण कवक वर्ग
पहा Deuteromycetes.

**fungoid parasite** जीवोपजीवी कवक
इतर वनस्पतींवर उपजीविका करणारी कवक प्रकारची वनस्पती; उदा. भुरी, तांबेरा, काणी, अर्गट, इ.

**fungous** कवकजन्य
कवकापासून झालेला ( रोग ); उदा. भुईमुगावरील टिक्का रोग.

**fungus ( pl. fungi )** कवक; अळिंब; अळंबे
हरितद्रव्यहीन परोपजीवी साधी वनस्पती; पूर्वी कायक वनस्पती ( थॅलोफायटा ) विभागातील हा गट एक उपविभाग मानला जात असे व यामध्ये सर्वच हरितद्रव्य नसलेल्या वनस्पतींचा ( सूक्ष्मजंतू, श्लेष्मकवक, सत्यकवक इ. ) समावेश असे; परंतु हल्ली ही संज्ञा सामान्य भाषेतच तशी वापरतात; नवीन वर्गीकरणात वर सांगितलेले गट विभाग मानतात; पहा Schizomycophyta; Myxothallophyta; Eumycophyta; Eumycetae.

**— cellulose** कवक तूलीर
कवक वनस्पतींच्या कोशिकावरणातील तूलीरासारखा पण भिन्न पदार्थ; तूल ( कापूस ) या शब्दावरून झालेली संज्ञा ( तूलीर ).

**funicle ( funiculus )** बीजबंध; बीजांड वृंत
किंज्पुटातील बीजकास जोडणारा तंतूसारखा भाग अथवा बीजकाचा देठ.

**funnel-shaped ( funneliform; infundibuliform )** नालिकाकृति.
नसराळ्यासारखा आकार असलेला; उदा. धोत्र्याच्या फुलाचा पुष्पमुकुट.

**fur** मृदुलोम
मऊ, पातळ व लहान केस.

**furcate** द्विशाखी
पहा forked; उदा. रानमेंढीची ( *Hibiscus furcatus Roxb.* ) संदले.

**furcellate** अल्पद्विशाखी
द्विशाखीचा संक्षिप्त प्रकार. उदा. एक तांबडे शैवल (*Scinaia furcellata*).

**furrow** सीता; खोबण
लहान पन्हळ; चर; सरी.

**furrowed** ससीता
पन्हळ किंवा खोबण असलेले; उदा. केळीच्या पानाची मध्यशीर; एक्विसीटमचे खोड; खडशेरणीची फांदी.

**furry ( pubescent )** लोमश
मऊ केस असलेले; उदा. समुद्रशोकाची व आघाड्याची पाने; नॅफॅलियम इंडिकम *Gnaphalium indicum* L. इ.

**fusiform** लुंठसम; तर्कुरूप
दोन बाजूस निमुळते (अरुंद) व मध्ये फुगीर; लाटणे, कुकडे यासारखे; उदा. रताळे.

**fusion** संयोग; मीलन; संगम
एकरूप होणे; संपूर्णपणे मिसळून जाणे; उदा. प्रजोत्पादक घटकांच्या ( गंतुकांच्या ) मीलनामुळे रंदुक बनते; कोशिकांच्या संयोगाने वाहिन्या (उदा. चिकाळ नलिका; काष्ठवाहिन्या ) बनतात; पहा xylem; vessels; latex; zygote.

**— nucleus** मलिन-प्रकल

दोन प्रकलांच्या संयोगाने बनलेला (बहुधा द्विगुणित) एक सामान्य प्रकल; पहा. secondary nucleus.

**— , triple** त्रिकसंयोग

तीन स्वतंत्र घटकांची एकरूप होण्याची प्रक्रिया उदा. फुलझाडांच्या बीजकातील दुय्यम प्रकल व परागनलिकेतील पुं-प्रकल यांचा संयोग.

## G

**G** जी; G

पुष्पसूत्रात (किंजमंडलाबद्दल) स्त्रीकेसरांबद्दल वापरलेले अक्षर; पहा floral formula; gynoecium.

**galactin** गॅलॅक्टिन

(१) गॅलॅक्टोडेंड्रान या नावाच्या वनस्पतीतील रसात आढळणारे प्रमुख द्रव्य.

(२) शिंबी कुलातील वनस्पतींच्या बीजात आढळणारा डिंकासारखा पदार्थ; पहा Leguminosae.

**galactose** गॅलॅक्टोज

गॅलॅक्टिनपासून काढलेली साखर ( $C_6 H_{12} O_6$).

**galbulus** गोलशंकु; मांसल शंकु

गोलाकार शंकूपासून बनलेले बीजयुक्त इंद्रिय ( उदा. सुरु व थुजा ); यातील बीजधारी खवले टोकांशी मोठे मांसल व छत्राकृती असून त्यांच्या खालच्या बाजूस उघडी बीजे असतात; पहा Gymnospermae, Coniferae.

**galea** स्फटा

फडी; फणा.

**galeate ( galeiform )** स्फटाकृति

फणाकार; उदा. वचनागाच्या फुलातील एक संदल. पहा hooded.

**galericulate** चषकछदी

पेल्याप्रमाणे झाकण असलेला.

**galeriform** चषकरूप

पेल्याप्रमाणे.

**gall** गुल्म; विकृतवृद्धी

कीटकांच्या दंशाने किंवा जीवोपजीवी कवक वनस्पतींच्या संसर्गामुळे वनस्पतींच्या ऊतकांमध्ये दोष उत्पन्न होऊन व अनित्य ( असामान्य ) स्थानिक वाढ होऊन भिन्न प्रकारच्या गाठी, फोड, इत्यादी बनण्याचा प्रकार; उदा. पापटी, उंबर याची पाने; उंबरातील काही फुले.

**— --flower** गुल्मपुष्प

उंबराच्या फुलोऱ्यातील काही वंध्य ( बीजहीन ) पुष्पे; यातच कीटक अंडी घालतात व पुढे ती फुटून त्यातून कीटकांच्या अळ्या बाहेर येतात; पंख फुटून त्यातील माद्या उंबराच्या बाहेर येऊन दुसऱ्या फुलोऱ्यात जातात.

**gallic acid** गॅलिक आम्ल

ओक ( बंज, बान ) वृक्षावर असलेल्या गाठीतील स्तंभक द्रव्य.

**gallotanin** गॅलोटॅनिन

ओकच्या सालीतील ग्लूकोसाइड.

**gametangium** गंतुकाशय; युग्मकधानी

गंतुके ( प्रजोत्पादक कोशिका ) निर्माण करणारा एककोशिक किंवा अनेककोशिक अवयव; पहा antheridium; archegonium: oogonium.

**— , unilocular** एकपुटक गंतुकाशय

एकच कप्पा असलेली गंतुकयुक्त पोकळी.

**— , plurilocular** अनेकपुटक गंतुकाशय

मूळच्या एक कोशिकेचे रूपांतर अनेक कप्प्यांच्या पोकळीत होऊन बनलेला गंतुकाशय; उदा. एक्टोकार्पस ( एक पिंगल शैवल ).

**gamete** गंतुक; युग्मक

लैंगिक प्रजोत्पादक कोशिका; ही स्वरूपविषयक ( पुं- व स्त्री-लिंगभेद दर्शविणारी किंवा न दर्शविणारी असते. तथापि, तिची कार्यक्षमता दुसऱ्या ( बहुधा भिन्न ) गंतुकाशी संयोग झाल्याशिवाय दिसून येत नाही; फारच क्वचित ती एकटीच नवीन प्रजा निर्माण करू शकते ( अनिषेक जनन ); पहा parthenogenesis; isogamy; heterogamy.

**gametic number** गंतुकी सूत्रसंख्या; युग्मकी सूत्रसंख्या

एका गंतुकातील रंगसूत्रांची एकपट संख्या (एकगुणित).

**gametogenesis** गंतुकजनन

गंतुकाशयात गंतुके निर्माण करण्याची प्रक्रिया.

**gametophore** गंतुकधर; युग्मकधर

गंतुकाशयाला आधार देणारा देठासारखा भाग; गंतुके निर्माण करणारा, तंतुयुक्त भाग; उदा. काही शैवले व कवक ( बुरशी ).

**gametophyte** गंतुकधारी

गंतुकांच्या साहाय्याने नवीन संतती निर्माण करणारी वनस्पतींच्या जीवनातील एकगुणित अवस्था किंवा

लैंगिक पिढी; उदा. फुलझाडांतील तीन प्रकलयुक्त पराग-नलिका व आठ प्रकलयुक्त गर्भकोश.

**gamogenesis** लैंगिक प्रजोत्पादन (पुनरुत्पादन)
पहा sexual reproduction.

**gamogenic** फलनज; निषेचनज
गंतुकांच्या संयोगापासून बनलेले.

**Gamopetalae** युक्तप्रदल उपवर्ग
पहा sympetalae.

**gamopetalous** युक्तप्रदली
अंशतः किंवा पूर्णपणे जुळलेल्या पाकळ्या असलेला (पुष्पमुकुट अथवा फूल); उदा. सदाफुली, रुई, पारिजातक, धोत्रा.

**gamophyllous** युक्तपरिदली
परिदले (संवर्त व पुष्पमुकुट असा भेद न दर्शविणारी) जुळलेली असलेले फूल; उदा. कुमूर, नागदौना, गुलबुश, इ. पहा perianth.

**gamosepalous** युक्तसंदली
सर्व संदले पूर्णपणे किंवा अंशमात्र चिकटलेली असण्याचा प्रकार किंवा जुळलेली असलेला (संवर्त); उदा. धोत्रा, तुळस, तेरडा, इ.

**gamostely** रंभमीलन
प्रथम स्वतंत्र असलेल्या अनेक रंभांचे नंतर एक होण्याचा प्रकार; पहा stele (रंभ).

**gap** विवर
सलग पृष्ठभागात पडलेली खिंड; पहा leaf-gap (foliar gap).

**Gardening** उद्यानविद्यान
भिन्न प्रकारच्या बागा (उद्याने) बनविण्यासंबंधीच्या व त्यांच्या संवर्धनासंबंधीच्या माहितीची शाखा.

**gas-diffusion** वायुविसरण
एका वायूचे दुसऱ्या वायूत किंवा द्रवात विलीन होणे; पहा diffusion.

**gas (gaseous) exchange** वायुविनिमय
सामान्यपणे कार्बन डायॉक्साइड वायू बाहेर सोडणे व ऑक्सिजन (प्राणवायू) आत घेणे ही सजीवांतील प्रक्रिया; वनस्पतीत प्रकाश-संश्लेषणात या उलट प्रक्रिया आढळते; पहा photosynthesis; respiration.

**gas-vacuole** वायुरिक्तिका
ॲनाबीनासारख्या नील-हरीत शैवलांच्या कोशिकेतील प्राकलात असणारी वायूने भरलेली पोकळी; याबद्दल मतभेद आहेत.

**Gasteromycetes (Puff-balls)** भूकंदक (कवक) उपवर्ग; गॅस्टरोमायसेटीज
सत्यकवकांपैकी गदाकवक वर्गातील एक उपवर्ग; काही शास्त्रज्ञ या गटाला गणाचा (लायकोपर्डेलीझ) दर्जा देतात; भूतारका, कंदकवक (आभासी), नीडकवक, पूतिकवक इत्यादींचाही येथे समावेश करतात. गदाबीजुके गदाकोशिकावर येतात व गदेसारख्या पुनरुत्पादक(प्रजोत्पादक) कोशिका निदान आरंभी शरीरांतर्गत असून त्यात पडदे नसतात; तसेच त्या कंदुक (चेंडूसारख्या) शरीरातील गाभ्यात अनेक कप्प्यात असतात.
पहा Eumycetae; Basidiomycetes; Truffles; Phallaceae.

**Geaster (Earth-star)** भूतारका
पक्क झाल्यावर खालचा भाग (बाह्याच्छादन) तडकून व उलटा होऊन तारकाप्रमाणे दिसणारे कवक; वरचा भाग, नंतर फुटून बीजुके बाहेर पडतात; भूकंदुक कवकांच्या उपवर्गात याचा अंतर्भाव केलेला आढळतो.

**geitonocarpy** आसन्न फलोत्पत्ति; समीप फलोत्पत्ति
समीप (आसन्न) युतीमुळे फळ बनण्याचा प्रकार.

**geitonogamy** आसन्न युति; समीप युति; निकट परागण; एक पादप परागण
एकाच वनस्पतीच्या दोन जवळच्याच फुलातील परागणामुळे घडून आलेली फलनक्रिया; पहा xenogamy.

**gelatine** शुद्ध सरस
कडक, डिंकासारखा चिकट, पाण्यात न विरघळणारा पण मिसळून बुळबुळीतपणा आणणारा पारदर्शक, रुचिहीन, पदार्थ; उदा. तालिमखाना किंवा इसबगोल यांचे बी; पिवळ्या तिळवणीची पाने, खोड व फळे यावरचे (प्रपिंडीय) केस; कित्येक जलवनस्पती.

**gelatinous (mucilaginous)** पिच्छिल.
शुद्ध सरसयुक्त; चिकट; बुळबुळीत; उदा. थलथलित कवक.

**gelose** थलथली; जेली
गेलिडियम या तांबड्या शैवलापासून मिळणारी थलथली (जेली) अथवा बुळबुळीत पदार्थ; एगर या सामान्य इंग्रजी नावाने असा पदार्थ ओळखतात; तो इतर काही शैवलापासूनही मिळतो; जेलीयुक्त खाद्य पदार्थात हा उपयुक्त असतो.

**gemini** युगुले; जोड्या

जोडीने असणारे; प्रकलाच्या न्यूनीकरणात पूर्वावस्थेत जोडीने असणारी समरचित रंगसूत्रे; यांपैकी एक पित्याकडून व एक मातेकडून आलेले असते; पहा meiosis.

**geminus** युगुल; जोडी

पहा bivalent.

**gemma** मुकुलिका

काही वनस्पतीतील सूक्ष्म प्रजोत्पादक अलिंगी कळ्या-सारखे ( शाकीय ) अवयव; उदा. शेवाळी.

**— cup** मुकुलिका चषक;

मुकुलिका निर्माण करणारा पेल्यासारखा अवयव; उदा. मार्चांशिया नावाची शेवाळी.

**gemmation** मुकुलिकासंभव

मुकुलिकांची निर्मिती; सूक्ष्म कळ्या येणे; उदा. किण्व ( यीस्ट ) या एककोशिक कवक वनस्पतीवर तशाच कोशिका कळ्याप्रमाणे वाढून त्यांची माळ बनते; म्यूकर बुरशीतही कधी कधी हा प्रकार आढळतो.

**gene** जनुक; जीन

संततीत पिढ्यानुपिढ्या उतरणाऱ्या लक्षणांबद्दल जबाबदार असा रंगसूत्रातील जटिल घटक. जनक वनस्पतीच्या प्रजोत्पादक कोशिकेत ( गंतुकात ) रंगसूत्रांचा एकच संच असून त्यातील प्रत्येक रंगसूत्रावर अनेक जनुकांचाही एकच संच असतो; परंतु दोन गंतुके ( पुं- व स्त्री-) एकत्र झाल्यावर त्यात (रंदुकात) होणाऱ्या रंगसूत्रांच्या जोडीमध्ये जनुकांचे दोन संच बनतात व शरीरातील कोणत्याही सामान्य कोशिकेत तसे राहतात. एक जनुक एका लक्षणाबद्दल किंवा अनेकांबद्दल जबाबदार असू शकते, तसेच अनेक जनुके एका लक्षणाबद्दल जबाबदार असणेही शक्य असते. अनुहरणाच्या प्रक्रियेत जनुकात ( संख्या व संघटना ) बदल होऊ शकतो ( gene mutation ) व त्यामुळे संततीतही कमी अधिक प्रमाणात भेद झालेले आढळतात. पहा DNA; RNA; nucleic acid, nucleotide.

**— mutation** जनुकोत्परिवर्तन; जीन उत्परिवर्तन

गंतुकातील जनुकात घडून आलेल्या काही रासायनिक फरकामुळे किंवा जनुकांचा लोप झाल्यामुळे संततीत होणारा बदल. शारीरिक कोशिकांतील जनुकांमध्येही फरक पडून विशिष्ट ठिकाणी नवीन शारीरिक भेद झाल्याचे आढळले आहे.

**generation** पीठिका; पिढी

निलिंग (अलिंग) पद्धतीने अथवा एका शाकीय साधनाने एका व्यक्तीपासून किंवा सलिंग पद्धतीने दोन प्रजोत्पादक कोशिकांपासून (रंदुकापासून) निर्माण झालेली संतती.

**genertive cell** जनन-कोशिका; जननपेशी

प्रकटबीज वनस्पतींच्या परागकणातील पुं-गंतुके बनविणारी कोशिका.

**— nucleus** जनन-प्रकल

फलनाशी संबंध येणारा परागकणातील प्रकल.

**generic** वांशिक; वंशासंबंधी

वंशविषयक (गुणासंबंधी); वंशनिदर्शक; पहा genus.

**genesis** निर्मिती

नव्याने निर्माण करण्याची प्रक्रिया; उगम व विकास.

**genetic** जननिक; वंशागत; जनन—

एका पिढीतून दुसरीत ( अनुहरणामुळे ) येणारे; जननासंबंधी; अनुहरणाशी संबंधित.

**— code** जननिक सांकेतिक वर्ण

अनुहरणाच्या प्रक्रियेत एका पिढीतून दुसऱ्या पिढीत जनुकांद्वारे उतरलेल्या लक्षणांच्या माहितीचे संक्षिप्त स्वरूप; डीएनए मधील चार क्षारक हे जननिक संकेतातील अक्षरे होत म्हणून डीएनए ला जननिक संदेशवाहक (genetic messenger) म्हणतात. पहा DNA; chromosome.

**— spiral** जननिक सर्पिल

पहा angle of divergence.

**geneticist** जननवैज्ञानिक; आनुवंशिकीविज्ञ

जननविज्ञानासंबंधी विशेष ज्ञान असलेला ( तज्ज्ञ ).

**Genetics** जननविज्ञान; आनुवंशिकी

प्रजोत्पादनाची प्रक्रिया, त्याशी संबंधित इंद्रिये, अवयव, कोशिका व तदंतर्गत कोशिकांगके, आनुवंशिक लक्षणे, त्याशी संबंधित घटक ( जनुके ) व त्यांचा पिढ्यान्-पिढ्या प्रवास ( अनुहरण ) आणि त्यासंबंधीचे प्रयोग, निष्कर्ष व सिद्धांत इत्यादीसंबंधीच्या माहितीची शाखा; यालाच अनुहरणशास्त्र असेही म्हणतात; पहा heredity.

**geniculate** अवनत जानु

वाकलेल्या गुडघ्याप्रमाणे; उदा. काही फुलांच्या पुष्पमुकुटाचा तळभाग.

**genotype** (१) जनुकविधा; (२) वंशरूप

( १ ) एखाद्या व्यक्तीतील लक्षणांच्या अभ्यासाने निश्चित केलेला जनुकांचा संच; प्रकट व अप्रकट लक्षणे

विचारात घेऊन विशिष्ट पिढीतील त्या लक्षणाच्या जनुकासंबंधी संक्षिप्त स्वरूपात व्यक्त केलेले सूत्र; उदा. (अ) उंच व्यक्तीत सुप्तपणे असणारा खुजेपणा "उं (खु)" या सूत्राने दर्शविता येईल तर (आ) तसा खुजेपणा सुप्तरूपाने नसणाऱ्या व्यक्तीचा जनुकसंच "उं उं" या सूत्राने व (इ) उंचपणाचे जनुक नसणाऱ्या व्यक्तीचा जनुकसंच "खु खु" या सूत्राने दर्शविता येतो. येथे (अ) व (आ) या व्यक्तींचे बाह्यस्वरूप उंच म्हणजे सारखे असले तरी जनुकसंच भिन्न असतात; (इ) ही व्यक्ती खुजीच असते; ह्या बाह्यस्वरूपांना सरूपविधा (phenotype) म्हणतात. यावरुन सारखी सरूपविधा असलेल्या दोन व्यक्तींतील जनुकसंच सारखे असतातच असे नाही; त्यांच्या जनुकविधा भिन्न असू शकतात. (२) ज्या जातीवरुन वंशाची निश्चिती केली आहे ती जाती.

**Gentianaceae** किराइत कुल; जेन्शिएनेसी

किराइत (किरात, काढेचिराइत), कुमुद, इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे लहान कुल; याचा समावेश जेन्शिएनेलीझ किंवा किराइत गणात केला जातो. प्रमुख लक्षणे : (खाली दिलेल्या गणाच्या लक्षणांशिवाय) : आल्प्स पर्वतात विशेषेकरुन आढळणाऱ्या लहान-मोठ्या आकाराच्या वनस्पती; फुले भडकरंगी; कळ्या पिळीव व एका कप्प्याचा किंजपुट.

**Gentianales** किराइत गण; जेन्शिएनेलीझ

या गणात जेन्शिएनेसी, ओलिएसी (पारिजातक कुल), ॲपोसायनेसी (करवीर कुल) व ॲस्क्लेपिएडेसी (रुई कुल) इत्यादींचा समावेश बेसींनी केला असून हचिन्सन यांनी फक्त किराइत कुलच अंतर्भूत केले आहे. प्रमुख लक्षणे : पूर्ण, नियमित, पंचभागी फुले, द्विकिंज, ऊर्ध्वस्थ किंजपुट व समोरासमोर पाने इत्यादी लक्षणे मुख्यतः आढळतात. लोगॅनिएसी (कुचला कुल) याचाही येथेच पूर्वी समावेश करीत.

**genus** वंश; प्रजाति

वर्गीकरणात जाती हे सर्वात शेवटचे एकक मानून वंश हे त्यापेक्षा वरच्या दर्जाचे एकक मानतात, कारण अनेक भिन्न व संबंधित जातींचा संच म्हणजे वंश होय; मात्र एका वंशातील जातीतील फरक हे भिन्न वंशातील जातींतील फरकांपेक्षा कमी असतात; अनेक वंशांचा गट म्हणजेच कुल होय. पहा family; species.

**— (generic) hybrid** वंश-संकरज

दोन भिन्न वंशातील वनस्पतीच्या संकराने बनविलेली नवीन वनस्पती. उदा. कार्पेशेंको या रशियन शास्त्रज्ञाने मुळा व कोबी यांचा संकर घडवून नवीन जाती निर्माण केली होती.

**geocarpous** भूफलित

**geocarpy** भूफलन; भूफलता

प्रथम फूल जमिनीवर बनून नंतर ते जमिनीत घुसून फळ पक्व होण्याचा प्रकार; उदा. भुईमूग.

**Geographic botany (phytogeography)** वनस्पति-भूगोल

पृथ्वीच्या पृष्ठभागावरील भौगोलिक परिस्थितिसापेक्ष वनस्पतींच्या अथवा पादपसमूहांच्या विस्ताराच्या माहितीची शाखा; उदा. शंकुधारी वने, विषुववृत्तावरील निबिड वने, भिन्न तृणक्षेत्रे, इ.

**Geologic botany (Palaeobotany)** पुरावनस्पतिविज्ञान

पहा Fossil botany.

**geoperception** गुरुत्वसंवेदन

गुरुत्वाकर्षणाच्या चेतनेला प्रतिक्रिया दर्शविण्याचा प्रकार; पहा geotropism.

**geoperceptive organ** गुरुत्वसंवेदी अवयव

गुरुत्वाकर्षणाला प्रतिसाद देणारा अवयव, उपांग किंवा कोशिकांगक, उदा. अंतस्त्वचेतील तौकीरकण; मुळाचे टोक.

**geophilous** १) भूमिप्रिय; २) स्थलवासी; स्थल–

(१) पहा geocarpy; (२) सदैव जमिनीवर वाढणारी [वनस्पती].

**— fungus** स्थलकवक

जमिनीतील कुजक्या पदार्थावर वाढणारी कवक वनस्पती; उदा. भूछत्र, भूकंदुक, भूतारका, इ.

**geophyta** स्थलवनस्पति

सदैव जमिनीवर वाढणाऱ्या वनस्पती परंतु आपल्या कळ्या जमिनीत असणाऱ्या बहुवर्षायू खोडावर (उदा. कंद, मूलक्षोड, ग्रंथिक्षोड, इ.) बनवून त्या तेथेच कायम ठेवणाऱ्या वनस्पती. परिस्थितिविज्ञानात सर्वच शाकीय भाग जमिनीत असणाऱ्या वनस्पतीस भूपादप (geophyte) म्हणतात.

**geotaxis** गुरुत्वानुचलन; गुरुत्वीय अनुचलन

गुरुत्वाकर्षणाच्या चेतनेमुळे घडून येणारी हालचाल (प्राप्त होणारी गति) किंवा स्थलांतर; वनस्पतींचे सुटे भाग किंवा मुक्तपणे संचार करणाऱ्या वनस्पती, हा प्रकार दर्शवितात.

**geotropic** गुरुत्वानुवर्तनी

गुरुत्वाकर्षणाच्या चेतनेमुळे त्या दिशेने (संमुख) किंवा त्या दिशेविरुद्ध (विन्मुख) होणारी अवयवाची वाढ (वळणे); उदा. खोडाचे टोक जमिनीवर गुरुत्वाकर्षणा-विरुद्ध व मुळाचे टोक खाली गुरुत्वाकर्षणाच्या दिशेने वाढते.

**geotropism** गुरुत्वानुवर्तन

वर वर्णन केल्याप्रमाणे वाढ होऊन वळण्याची प्रतिक्रिया.

**—, lateral** पार्श्विक गुरुत्वानुवर्तन

खोडाच्या टोकास डाव्या अथवा उजव्या बाजूस अधिक वाढ झाल्याने वेलीचे कोवळे खोड प्रथम मोठी वेटोळी घालते व त्यामुळे जवळपासचा आधार मिळवते; या प्रकारास वरील नाव दिले जाते.

**—, transverse** भूपृष्ठानुवर्तन

पहा diageotropism.

**Geraniaceae** भांड कुल; जिरॅनिएसी

भांड गणातील (जिरॅनिएलीझ) द्विदलिकित फुलझाडांचे एक कुल. बेंथॅम व हूकर यांनी या कुलात ऑक्सॅलिडेसी, लिम्नॅथेसी, ट्रोपिओलेसी व बाल्समिनेसी यांचाही समावेश केला आहे. प्रमुख लक्षणे : बव्हंशी केसाळ ओषधी; अनेकदा उपपर्णयुक्त साधी पाने; नियमित द्विलिंगी, पंचभागी फुले; संवर्त चिरस्थायी; पाच सुट्या पाकळ्या व त्यांच्या दुप्पट किंवा तिप्पट तळाशी जुळलेली केसरदले; किंजपुट ऊर्ध्वस्थ व त्यात मध्यवर्ती अक्षावर अनेक बीजके; किंजल्क पाच; फळ बहुधा पालिभेदी; मध्यवर्ती चंचूपासून किंजदले सुटी होतात. जिरॅनियम व पेलॅर्गोनियमची झाडे बागेत लोकप्रिय आहेत.

**germ** (१) अंकुर; (२) सूक्ष्मजंतू; सूक्ष्मजीव

(१) खोडावरील कळी; बियातील गर्भ; (२) सूक्ष्म जंतू; रोगजंतू; अतिलहान साधे जीव.

**— -cell** गंतुक; जननकोशिका; जननपेशी

पुनरुत्पादक (प्रजोत्पादक) कोशिका.

**— - disc** अंकुर-बिम्ब

बीजुक रुजून त्यापासून बनलेली चकतीसारखी सूक्ष्म पहिली शारीरिक अवस्था (शंवालक); यापासून काही तंतूही निघालेले असतात; उदा. शेवाळी.

**— nucleus** अंकुर-प्रकल.

दोन गंतुकातील प्रकलसंयोगामुळे बनलेला रंदुक प्रकल.

**— plasm** गंतुकल; जननद्रव्य

भावी पिढी निर्माण करण्याची क्षमता असलेले शरीरातील द्रव्य; पहा somatoplasm; या कल्पनेचा पुरस्कर्ता ऑगुस्तो वाइझमान हा होता.

**— - pore** अंकुर-रंध्र; जननछिद्र

बीजुक व परागकण यावरचे बारीक भोक; यातूनच रुजण्याच्या वेळी अंकुरनलिका बाहेर येते.

**— - tube** अंकुरनलिका; जनननलिका

नलिकेसारखा तंतू; उदा. कवक.

**germicide** जंतुघ्न; जंतुनाशक

जंतूंचा नाश करणारे द्रव्य; पहा fungicide.

**germinal (congenital)** (१) जन्मजात (२) जनक; निर्मायी

(१) आनुवंशिकतेमुळे उपजत असलेले (लक्षण); (२) निर्माण करणारा; उदा. कोशिकांचा थर; पहा meristem.

**— vesicle (oosphere)** अंडुक

स्त्री-गंतुक किंवा त्यातील प्रकल.

**germination** अंकुरण; उगवण

बीज किंवा बीजुक अनुकूल परिस्थितीत रुजण्याची प्रक्रिया; अंकुर येणे; सुप्तावस्थेतील कळ्या जागृत होऊन फुले किंवा प्ररोह वाढीस लागण्याची घटना (sprouting ); पहा sprout.

**Gesneriaceae** शिलापुष्प कुल; जेस्नेरिएसी

पाथरफोडी (शिलापुष्प), जेस्नेरिया डग्लसी इ. वनस्पतींचे (बियात दोन दलिका असलेल्या फुलझाडांचे) कुल; याचा अंतर्भाव पर्सोनेलीझ गणात करतात; प्रसार : उष्ण व उपोष्ण कटिबंध; प्रमुख लक्षणे : ओषधी झुडुपे, वृक्ष, वेली व काही अपिवनस्पती. पाने साधी, समोरासमोर, क्वचित थोडीफार विभागलेली; फुलोरा कुंठित, किंवा फुले एकेकटी; ती द्विलिंगी, पंचभागी, आकर्षक; संदले जुळलेली व तशीच प्रदले; केसरदले दोन, चार किंवा पाच, पाकळ्यांस चिकटलेली; किंजदले दोन, ऊर्ध्वस्थ, क्वचित अधःस्थ व जुळलेली; किंजपुटात एक कप्पा व अनेक बीजके; मृदुफळ किंवा शुष्कफळ (बोंड); बिया लहान, असंख्य; ब्राह्मी कुल, टेटूकुल व तंबाखू कुल याशी साम्य. पाथरफोडी औषधी आहे. ग्लॉक्सीनिया, जेस्नेरिया यांच्या जाती बागेत लावतात.

**gibberillins** जिबरिलिन्स

वनस्पतींत आढळणारे व नैसर्गिकरीत्या वाढीस साहाय्य

करणारे कार्बनी संप्रेरक; काही बाबतीत हे ऑक्सिन ह्या नावाच्या वृद्धि संप्रेरकापासून भिन्न असतात. यांचा कृत्रिमरीत्या उपयोग करून वनस्पतीची उंची वाढविणे, फलनाशिवाय फळांची उत्पत्ति करणे, फुलण्याची क्रिया जलद गतीने घडविणे, बीजांची प्रसुप्तावस्था त्वरित कमी करविणे इत्यादी अनेक बाबतीत यश मिळाले आहे. पहा auxin; hormone.

**gibbous ( gibbose )** **कोशयुक्त**

अवयवाच्या तळाशी पिशवीसारखा एकांगी फुगीरपणा येऊन खोलगट खाच असलेला; उदा. संवर्त (मोहरी); स्नॅपड्रॅगॉन; पहा saccate.

**gigantic** **प्रचंड; राक्षसी; भीमकाय**

फार मोठे; दांडगे; उदा. अमेझॉन नदीतील कमलपुष्प; सुमात्रा बेटातील एक भुईपुष्प (रॅफ्लेसिया आर्नोल्डी); ब्रह्मदेशातील बांबूची एक जाती ( *Dendrocalamus giganteus* Munro.); रुई (*Calotropis gigantea* R. Br. ).

**gill** **पटल**

पातळ पडद्यासारखा अवयव; उदा. भूछत्रे.

**— fungus** **पटल कवक**

बीजुकोत्पादक पापुद्रे असलेले कवक;
पहा Agaricales.

**Gingkoales** **व्यजनपर्ण वृक्ष (कन्याकेश वृक्ष) गण; गिंकोएलीझ**

मध्यजीव महाकल्पातील प्रकटबीज वनस्पतींचा एक गण; यामध्ये गिंकोएसी हे एकच कुल व गिंको बायलोबा ही एकच जाती; प्रमुख लक्षणे : विभक्तलिंगी वृक्ष; ऱ्हस्व व दीर्घ प्ररोह असतात. पंख्यासारखी पाने (व्यजनपर्ण) व त्यात द्विशाखाक्रमी शिरांची मांडणी; ती पाने तळाशी पाचरीसारखी व टोकास विभागलेली; मेडन हेअर फर्न या नावाच्या नेचाशी पानांचे साम्य असल्याने या वृक्षाला मेडन हेअर टी (कन्याकेश वृक्ष) म्हणतात. तसेच पंख्यासारख्या पानांच्या आकारामुळे "व्यजनपर्ण वृक्ष" असेही म्हणतात. लघुबीजुकपर्णे लोंबत्या कणिश फुलोऱ्यावर (शंकूवर) सर्पिल प्रकारे मांडलेले; गुरुबीजुके धारण करणाऱ्या शंकूवर फक्त एक देठ व त्यावर दोन अनावृत (प्रकट, नग्न) बीजके असतात; रेतुके चलनशील; पहा Gymnospermae.

**girdle** **मेखला**

( १ ) करंडक वनस्पतींत आढळणाऱ्या शरीर-कोशिकांच्या बाजूस असलेला दोन्ही कोशिकावरणांना जोडणारा सूक्ष्म पट्टीसारखा भाग; ( २ ) सायकसच्या पर्ण-लेशाची वलयाकृती शाखा.

**— view** **मेखला-दृश्य**

करंडक वनस्पतींच्या कोशिकांची मेखला दिसून येणारी बाजू; पहा valve- view.

**girdling** **मेखलन**

झाडाची वलयासारखी पट्टी काढणे.

**glabrous** **केशहीन; रोमहीन**

केस नसलेले ( अवयव ); उदा. करंज ( *Pongamia glabra* Vent. )

**gland** **( १ ) प्रपिंड; ग्रंथि; ( २ ) छदककपाली; वंजुफल.**

( १ ) शरीरात किंवा शरीरावर, पाणी अथवा इतर द्रव पदार्थ ( उदा. मधुरस, पाचक रस ) स्रवणारी किंवा साठवून ठेवणारी कोशिका किंवा अन्य निश्चित संरचना ( उपांग ); ग्रंथी. उदा. जलस्रावक ऊतक; पहा epithem; nectary.

( २ ) ओकचे किंवा तत्सम फळ; कठीण कवचाचे, शुष्क एकबीजी व तळाशी छदकांचा पेला असलेले फळ.

**— dotted** **प्रपिंड-चित्रित**

अनेक प्रपिंडे बिंदूप्रमाणे विखुरलेली असणारे; उदा. लिंबू , कदिलिंब, बेल, जांभूळ, लवंग, निलगिरी इत्यादींची पाने; येथे बाष्पनशील द्रव्य कोशिकात असते.

**glandula** **प्रपिंडक**

आमराच्या फुलातील किंजल्कावरची चिकट चकती.

**glandular hair** **प्रपिंडीय केश; ग्रंथियुक्त केश प्रपिंडकेश;**

टोकास स्रावक किंवा संचयी ( ग्रंथी ) संरचना असलेले केसासारखे उपांग; उदा. कीटकभक्षक वनस्पती, पिवळी तिळवण, तुळस, खाजकुयली, चित्रक; पहा stinging hair.

**— tissue** **प्रपिंडोतक**

प्रपिंडाप्रमाणे कार्यक्षम असलेला कोशिकांचा समूह. पहा laticiferous tissue. hydathode, resin-passage.

**glandulose** **प्रपिंडसम; प्रपिंडयुक्त; प्रपिंडी; ग्रंथियुक्त**

प्रपिंडासारखे किंवा प्रपिंड ( ग्रंथी ) असलेले (अवयव, पृष्ठभाग, केस, बिम्ब, इ. )

**glaucescent** अल्पानील;
काहीसे आनील.

**glaucous** आनील
मेणाच्या पातळ थरामुळे निळसर हिरवा रंग असलेले; उदा. घायपाताचे पान; एरंडाचे खोड; देठ इ.

**gleba** गाभा
पहा Gasteromycetes.

**globoid** गोलाभ
प्रथिनाच्या कणातील गोलाकार खनिज कण; उदा. एरंडाचे बीजातील पुष्क; पहा crystalloid.

**globular** गोलाकार
चेंडूसारखे; उदा. जाफरी गेंदाचा फुलोरा; बाभळीचा फुलोरा.

**globule** नर गुलिका; गोळी; ग्लॉब्यूल
नर (पुं-) गंतुके निर्मिणारे वाटोळे जटिल इंद्रिय; उदा. कारा ( शैवल ); या वनस्पतीत तंतुयुक्त अवयवात ( रेतुकाशयात ) पुं-गंतुके असून असे अनेक तंतू एकत्र असलेल्या संरचनेभोवती अनेक कोशिकांच्या एका थराचे वेष्टन असते. सामान्य अर्थी गोळी;
पहा Charophyceae; nucule.

**globulin** ग्लॉब्यूलिन
गोल व पारदर्शक कण; गोलाभातील मुख्य पदार्थ.

**glochidium (glochid)** लोमांकुश; रोमांकुश
टोकाशी बाणाप्रमाणे वाकडा असलेला केस किंवा काटा. उदा. ॲझोला नावाचा जलनेचा; काही निवडुंगाच्या जाती.

**glome** गोल गुच्छ
अनेक लहान फुलांचा चेंडूसारखा फुलोरा; उदा. बाभूळ, लाजाळू, इ.

**glomerate** गोलगुच्छित
(१) वर वर्णिल्याप्रमाणे फुलोऱ्यात असलेली [फुले];
(२) अनेक गुच्छ एकत्र असलेले; उदा. औदुंबर
[ *Ficus glomerata* Roxb. ].

**glomerule ( glomerulus )** स्तबकपुंज
अनेक स्तबकांचा एकाच छदमंडलातील पुंजका; उदा. उटकटारी ( *Echinops echinatas* Roxb. ).

**glucose ( grape sugar )** द्राक्षशर्करा; ग्लुकोज
वनस्पतींतील साखरेचा एक प्रकार; $C_6H_{12}O_6$.

**glucoside** ग्लुकोसाइड
विघटनानंतर द्राक्षशर्करेत रूपांतर पावणारा जटिल पदार्थ; उदा. अमिग्डॅलीन, कोनिफेरीन, सॅलिसीन ही द्रव्ये अनुक्रमे बदाम, चीड, वाळुंज यांमध्ये आढळतात.

**glumaceous** तुषसम
गवतांच्या फुलातील तुसासारखे; पहा bract.

**glume** तुष; तूस
विशेषतः गवतांच्या फुलोऱ्यातील कणिशकात आढळणारे शुष्क छद; उदा. मका, गहू.

**— , flowering** बाह्यतुष
पुष्पदलाबाहेरचे छद (तूस).

**— , inner ( palea )** अंतस्तुष
आतील तूस; अक्षाजवळचे छद; बाह्यतुष व अंतस्तुष यामध्ये केसरदले व किंजदले असतात.

**— , outer ( lemma )** परितुष
सर्वात बाहेरचे आच्छादक छद (तुष); पहा lemma; lodicule; spikelet.

**— , sterile** वंध्यतुष
लैंगिक पुष्पदलाचे सान्निध्य नसलेले छद.

**Glumiflorae ( Graminales )** तृणगण;
ग्लुमिफ्लोरी
बेंथॅम व हूकर यांनी या गटाला श्रेणी म्हटले आहे; एंग्लर व प्रँटल यांनी गण व बेसींनी तृणगण (ग्रॅमिनेलीझ) अशी नावे देऊन त्यामध्ये तृणकुल व मोथाकुल अंतर्भूत केले आहेत; हचिन्सन यांनी या गटाला विभाग मानून तृणगण व मोथागण असे दोन गण व त्या प्रत्येकात अनुक्रमे एकेक कुल (तृणकुल व मोथाकुल) समाविष्ट केले आहे. सर्व गवते व लव्हाळे येथे अंतर्भूत आहेत; पहा Graminaceae; Cyperaceae.

**glutinous** चिक्कणछादित
चिकट पदार्थाचे आवरण असलेले; उदा. विंचवी (वृश्चन) व तंबाखूचे पान.

**glycogen** मधुजन; ग्लायकोजेन
आवश्यकतेनुसार साखरेत रूपांतर केला जाणारा तौकीरासारखा कोशिकेतील पदार्थ; उदा. यीस्ट; कित्येक कवक, अनेक प्राणी.

**Gnetales** डंबळी ( कोंबळ ) गण; नीटेलीझ
प्रकटबीज वनस्पती उपविभागापैकी एक गण; यांची काही लक्षणे आवृतबीज वनस्पतीप्रमाणे (फुलझाडे) असून या गणात नीटेसी– डंबळी ( कोंबळ ) कुल या एकाच कुलाचा अंतर्भाव होतो; द्वितीयक काष्ठ भागात वाहिन्या, बीजकातील अंदुककलशाचा अभाव

(अपवाद : एफेड्रा), ही लक्षणे फुलझाडांतल्याप्रमाणे असून एकूण तीन वंशांचा (एफेड्रा, वेल्वित्शिया आणि नीटम) समावेश होतो. या वंशांतील वनस्पती फारच क्वचित आढळतात. नीटम ( उंबळी; कोंबळ ) च्या महालता सह्याद्रीच्या जंगलात तर हूम किंवा अस्मानिया (एफेड्रा) सिंधमध्ये व हिमालयात आढळतात; वेलविशिया (तुंबोआ) आफ्रिकेत वाढते.

पहा Gymnospermae.

**goblet-shaped** चषकाकृति

पसरट तळ, मध्ये दांडा व वर काहीसा फुगीर भाग अशा पेल्याच्या आकाराचे.

**golgi-body** तनुकल; गॉल्गी बॉडी; गॉल्गी पुंजक

काही थोड्या वनस्पतींच्या पण बहुधा सर्व प्राण्यांच्या कोशिकेतील प्राकलात आढळणारा, अनेक सूक्ष्मतंतू अथवा सूक्ष्मबिंदू यांचा पुंजका; याचे कार्य कोशिकेच्या स्रवणाशी संबंधित असावे असे मानतात.

**gonidangiophore (sporangiophore)** बीजुककोशदंड

बीजुककोशाचा आधारतंतू.

**gonidangium ( sporangium )** बीजुककोश

वनस्पतींच्या गंतुकधारी अवस्थेतील बीजुकांची निर्मिती करणारा प्रजोत्पादक अवयव; बीजुकधारी अवस्थेतील बीजुकांचे कार्य याहून भिन्न नसते; म्हणून मराठी पर्याय तोच ठेवला आहे.

**gonidial layer** ( १ ) शैवलस्तर; ( २ ) बीजुकदंडस्तर

(१) काही धोंडफुलांच्या (शैवाक) शरीरातील शैवल कोशिकांचा थर. पहा Lichen.

(२) कवकांच्या शरीरातील बीजुककोश धारण करणाऱ्या तंतूंचा थर. पहा Fungi.

**gonidiophore ( sporophore )** बीजुकदंड

बीजुकांना आधारभूत तंतू; उदा. बुरशी.

**gonidium ( spore )** ( १ ) बीजुक ( २ ) शैवलकोशिका

(१) लिंगभेदविहीन पद्धतीने बनलेली व रुजल्यावर सलिंग अथवा गंतुकधारी अवस्था निर्मिणारी प्रजोत्पादक कोशिका;

(२) धोंडफुलातील शैवल.

**gradate sorus** क्रमि (बीजुककोश) पुंज; क्रमिपुंज

बीजुककोशांची पक्व होण्याची वेळ व स्थान क्रमाने (तळापासून वर) बदलत असणारा पुंज; उदा. प्रारंभिक नेचे; त्यावरून Gradatae = क्रमिपुंजी— क्रमिपुंज असलेले नेचे (गट). पहा Mixed sorus; Mixtae; Simplices.

**graft** कलम; भेटकलम; कलम करणे

दोन वनस्पतींचा शाकीय संबंध घडवून आणण्याकरिता एका स्थिर (बहुधा मजबूत) वनस्पतीच्या फांदीवर व खोडावर ( याला 'खुंट' म्हणतात ) कृत्रिमरीत्या सांधलेली दुसरी इष्ट तर काट किंवा छाट ह्या स्वरूपातील वनस्पती; पहा stock, scion.

**— hybrid ( chimaera )** कलम-संकरज; विचित्रोतकी

भेट कलम केल्याने (ऊतक संयोगाने) व दोन्ही भिन्न जातींच्या किंवा प्रकारांच्या परस्पर प्रभावाने लक्षणांत फरक पडलेले संकरज (कलम); येथे वरकरणी लक्षणांचे मिश्रण आढळते; पहा chimaera.

**grain** ( १ ) कण; ( २ ) शूकधान्य

(१) कोणत्याही घन पदार्थाचे अत्यंत लहान भाग.

(२) पिकविलेल्या गवतांचे फळ अथवा बीज; कित्येकांच्या छदांवर टोकाशी लांब राठ केस असतो, ते शूक आणि त्यामुळे शूकधान्य हे नाव. उदा. भात, गहू, बाजरी; पहा cereal, pulse, awn.

**Graminaceae ( Gramineae )** तृणकुल; गवते; ग्रॅमिनेसी ( ग्रॅमिनी )

गवत या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सर्व एकदलिकित वनस्पतींचे मोठे कुल; याचा अंतर्भाव ग्लुमिफ्लोरी (ग्रॅमिनेलीझ) गणात केला जातो. प्रमुख लक्षणे : ओषधीय वनस्पती; पोकळ किंवा भरीव दंडगोलाकृति खोड व पाने बहुधा साधी व दोन रांगांत, लांब असून पर्णाविरण खोडाभोवती तळाशी वेढलेले पण अपूर्ण (फाटलेले), जिव्हिकावंत; फुलोऱ्यात अनेक कणिशके व त्यातील परिदलहीन फुले तुसांनी वेढलेली; लघुतुषांना परिदले मानतात; फुले एकलिंगी किंवा द्विलिंगी; केसरदले तीन (क्वचित कमीजास्त) किंजदल एक व एकबीजी शुष्कफल ( सस्यफल ); परागण वाऱ्याने होते; बी सपुष्क. पहा Glumiflorae.

**Graminales** तृणगण

पहा Glumiflorae.

**graminicolous** तृणप्रिय; तृणवासी

गवतावर उपजीविका करणारी (जीवोपजीवी ) वनस्पती; उदा. चिकटा ( *Sclerospora graminicola*) नावाचा कवकापासून होणारा रोग बाजरीवर वाढतो.

**grana (granum)** तरंगक; कण; ग्रॅना
(१) हरितकणूंतील रंगद्रव्याचा बिंदुक ( सूक्ष्मयंत्र ). पहा stroma; (२) कोणताही सूक्ष्म कण.

**Granataceae** दाडिम कुल; ग्रॅनॅटेसी.
पहा Punicaceae.

**granular (granulose)** कणमय; कणयुक्त
रवाळ; कणीदार; कणांनी बनलेले. उदा. कोशिकेतील प्राकल; सूक्ष्मकणांचे आवरण असलेले.

**grassland** तृणभूमी; गवताळ प्रदेश
हवामानादी परिस्थितीमुळे ज्या ठिकाणी मुख्यतः नैसर्गिकरीत्या फक्त गवताची मुबलक वाढ होते असा प्रदेश.

**graveolens** उग्रगंध
न आवडण्याइतका उग्र वास; उदा. सताप ( *Ruta graveolens* L. ); शेपू ( *Peucedanum graveolens* L. ).

**green alga** हरित शैवल; हिरवे शैवल
पहा Chlorophyceae.

**green house** पादपगृह
तीव्र प्रकाश व रुक्ष हवा यांपासून संरक्षित असलेले व वनस्पतींचे संवर्धन करण्याच्याच सोयिस्कर खोलीसारखे झोपडे; येथे सावली, मंद प्रकाश व दमट हवा मिळण्याची कृत्रिम परिस्थिती राखलेली असते.

**gregarious growth** सांघिक वाढ; सामूहिक वाढ
एकाच जातीच्या अनेक वनस्पतींची एकत्र होणारी वाढ; उदा. कर्दळ, केळ, आले, बांबू, इ.

**grit-cell (stone-cell)** कठक; दृढ पेशी.
फार घन आवरणाची कोशिका; पहा sclereid.

**gritty (sandy)** रेवाळ
कठीण कण ( रेव ) असलेले.

**groove** चर, खोबण.
पहा furrow.

**ground meristem** तल्प विभज्या
खोडाच्या किंवा मुळाच्या टोकाशी सतत कोशिकांचे विभाजन व तज्जन्य नवीन ऊतकांची निर्मिती झाल्याने त्यातील तीन भागांपैकी केंद्रवर्ती भाग; त्यापासून वनस्पतीतील पक्व भागात भेंड, निकाष्ठ-किरण व मध्यत्वचा, अंतस्त्वचा इत्यादी मौलिक ऊतके बनतात.
पहा meristem.

**ground-tissue** तल्पोतक
अपित्वचा, वल्क, वाहक ऊतके इत्यादी विशिष्ट ऊतकाखेरीज वनस्पतीतील इतर व आधारभूत मृदूतकांचा संच; यामध्ये मध्यत्वचा, निकाष्ठ ( भेंड ), निकाष्ठ किरण इत्यादींचा अंतर्भाव होतो.

**ground vegetation** निम्नस्तर (भूस्तर) वनश्री
वनातील सर्वांत खालचा ( जमिनीजवळचा ) वनस्पतींचा थर.

**group** गट; समूह
अनेक सारख्या वस्तू, व्यक्ती किंवा पदार्थ, ऊतके, उपांगे, जाती, वंश इत्यादींचा एकत्र संच.

**growing point (apex)** वर्धनाग्र; वर्धिष्णु अग्र; वर्धी अग्र
सतत वाढ चालू असलेले वनस्पतींच्या अवयवांचे टोक

**growth** वृद्धि; वर्धन; वाढ
नवीन कोशिकांची निर्मिती होऊन किंवा असलेल्या कोशिकांच्या आकारमानात वाढ होऊन अवयवांची आकाराने व संख्येने कायम वाढ होण्याची प्रक्रिया; बीज रुजताना या दोन्ही क्रिया घडून येतात.

**growth curvature** वृद्धिवक्रता
वाढ चालू असताना येणारा वाकडेपणा.

**-- engyme** वृद्धि-वितंचक
वाढीला चालना देणारे वितंचक; पहा engyme.

**-- form (life form)** वृद्धि-रूप
केवळ शरीराच्या विस्तारावरून बनविलेली वर्णनात्मक संज्ञा; उदा. वृक्ष, क्षुप, ओषधी, इ.

**-- hormone** वृद्धि-संप्रेरक
पहा hormone.

**-- promoting** वृद्धिकारी; वृद्धिप्रवर्तक
वाढीस चालना देणारे.

**-- ring** वृद्धिवलय
खोडात विशिष्ट कालात वाढणारा वर्तुळाकार काष्ठाचा भाग; पहा annual ring.

**-- water** वृद्धि-जलांश; प्राप्यजल
जमिनीतील किमान ओलाव्यापेक्षा अधिक किती पाण्याचा अंश आहे याची टक्केवारी, कारण त्यावर वाढ अवलंबित असते.

**guard-cell** रक्षक कोशिका
पानावरील त्वग्रंध्राची ( सूक्ष्म छिद्राची ) उघडझाप करण्याबद्दल जबाबदार असलेली बहुधा अर्धचंद्राकृती

हरितद्रव्ययुक्त कोशिका; ह्यांची जोडी असते. क्वचित हिरव्या खोडावर, देठावर व किंजपुटावर या कोशिका आढळतात; पहा stoma.

**gum** गोंद; डिंक

**gummosis** डिंक्या रोग; गोंद रोग

खोड किंवा फांद्या यामधून डिंकासारख्या चिकट द्रव पदार्थाचा स्राव चालू असण्याचा प्रकार.

**gutta (drop)** थेंब; ठिपका; तैलबिंदु

**guttate (spotted)** अश्रुवत्; बिंदुयुक्त

ठिपकेदार; उदा. गोलदार वृक्ष (*Sterculia guttata* Roxb.).

**guttation** निस्यंदन

पानांतून अथवा तत्सम अवयवांतून पाण्याचे थेंब निसर्गतः गळून पडण्याचा प्रकार; रात्रीच्या थंड हवेत बाष्पोच्छ्वासाच्या अभावी हा प्रकार घडून येतो; उदा. गवते; अंजनवेल, ट्रोपिओलम, इत्यादी. यांमध्ये जलस्रावक ऊतके व जलरंध्रे यांचा संबंध येतो; पहा hydathode; epithem.

**Guttiferae (Clusiaceae)** वृंदार (कोकम) कुल; गटिफेरी (क्लुसिएसी)

सुरंगी, कोकम, नागचाफा, आमली, उंडी (पुन्नाग), ओट इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; याचा समावेश कोकम (वृंदार) गणात (गटिफेरलीझमध्ये) केला जातो. प्रमुख लक्षणे : पिवळट किंवा हिरवट चीक असलेले वृक्ष किंवा झुडपे; पाने साधी, बहुधा समोरासमोर, तैल प्रपिंडयुक्त व चिवट; फुले एकलिंगी, द्विलिंगी, अवकिंज व एकाच किंवा भिन्न झाडांवर; संदले व प्रदले २–६, सुटी; क्वचित पाकळ्या नसतात. केसरदले अनेक, सुटी, क्वचित जुळलेली; किंजपुटात एक किंवा अनेक कप्पे; मृदुफळ किंवा न तडकणारे फळ; बीजे मोठी व अपुष्क.

**Gymnospermae** प्रकटबीज वनस्पति उपविभाग; जिम्नोस्पर्मी

ज्यांची बीजे किंजपुटात (भावी फळात) बंदिस्त नसून किंजदलावर उघडीच असतात अशा सापेक्षतः प्रारंभिक बीजधारी वनस्पतींचा उपविभाग. प्रमुख लक्षणे : काही जीवाश्मरूपात व काही विद्यमान वनश्रीत आढळतात. लघुबीजुकपर्णे व गुरुबीजुकपर्णे बहुधा स्वतंत्र शंकूवर व एकाच किंवा भिन्न झाडांवर; गंतुकधारी पिढ्या फारच ऱ्हास पावलेल्या असून अंदुककलश बहुधा आढळतो; रेतुकाशय ऱ्हसित व रेतुके क्वचितच चलनशील; परागनलिका व परागण फुलझाडांतल्याप्रमाणे; बहुधा प्रकाष्ठात वाहिन्या नसतात; फळे बनत नाहीत. पक्वावस्थेत "शंकूफळ" रुक्ष असते. यामध्ये सात किंवा आठ गणांचा समावेश करतात; पहा Cycadales, Coniferales, Ginkgoales, Taxales, Gnetales, Bennettitales, Cordaitales, Cycadofilicales (Pteridospermeae). उदा. सायकस, विरमी (यू) देवदार, चिल, चीड, थुजा, आमाळ, गिंको, उंबळ (कोंबळ) इ.



**Gynaecium (gynoecium; pistil)** किंजमंडल; स्त्री-केसर मंडल

फुलातील सर्वांत आतील महत्वाचे बीजोत्पादक पुष्पदलांचे (किंजदलांचे) वर्तुळ; किंजदलावरील बीजकात स्त्री-गंतुक (अंदुक) असल्याने या सर्वच भागाला स्त्रीलिंगी (स्त्री-केसर) समजतात; पहा carpel; ovule; ovary.

**Gynandrophore** किंजकेसरधर (किंकेधर)

किंजदले व केसरदले यांना आधारभूत असा फुलातील अक्षाचा लांबट भाग (दांडा); उदा. पांढरी तिळवण. पहा androgynophore.

**Gynandrous** किंजकेसरित

किंजदलाला केसरदले चिकटलेली असण्याचा प्रकार; उदा. आमर पुष्प (ऑर्किड).

**gynobasic** किंजतलोद्गामी

किंजलाचा तळ किंजपुटाच्या तळाशी असून किंजपुट पुष्पस्थलीमध्ये असण्याचा प्रकार; उदा. तुळस, दीपमाळ, बुरुंबी, इ.

**gynophore** किंजधर

किंजदलांना आधार देणारा फुलातील केसरमंडलातून वाढलेला अक्ष; उदा. वाघाटी, पांढरी तिळवण, मुचकुंद, इ.

**gynostemium** किंजकेसराक्ष

किंजमंडल व केसरमंडल यांचा संयुक्त व संक्षिप्त अक्ष. उदा. आमरे (ऑर्किड); पोपटवेल, सापसंद इ.

## H

**habit** (१) रीति; (२) बाह्यरूप

(१) वृत्ति; वर्तन अथवा आहाराविषयक सवय; उदा. जीवोपजीवी; स्वोपजीवी.

(२) बाहेरून दिसणारी शारीरिक रूपरेखा (स्वरूप); उदा. गुच्छाकृती, चवरीसारखे, उशीसारखे, सरपटणारे, चढत जाणारे, वृक्ष, क्षुप, ओषधी, इ.

**habitat** अधिवास; निवासक्षेत्र

वनस्पती जेथे निसर्गतः फुलते, वाढते, प्रजोत्पादन करते असे ठिकाण. उदा. दाट वन, कुरण, खडकाळ किंवा रेताड मरुप्रदेश, समुद्रतट, जलाशय, इ.

**hadrocentric** मध्यप्रकाष्ठक; केंद्रकाष्ठिक

**hadrocentric bundle** मध्यप्रकाष्ठक वृंद

मध्ये प्रकाष्ठ व त्याभोवती परिकाष्ठ असलेला वाहक ऊतकांचा संच; उदा. नेचाची तिरश्चर शाखा. पहा concentric bundle.

**hadrome (xylem)** प्रकाष्ठ; काष्ठ

वाहक वृंदातील काष्ठयुक्त वाहकांचा भाग; विशेषतः पाण्याची ने-आण करणारा घन आवरणाच्या मृत कोशिकांचा (ऊतकाचा) भाग; पहा xylem.

**haematoxylin** हीमॅटॉक्सिलीन

गर्द तांबूस रंगाचे द्रव्य; एका वनस्पतीच्या (*Haematoxylon campechianum* L.) मध्य काष्ठापासून काढलेले असून त्याचा उपयोग सूक्ष्मदर्शकाच्या साहाय्याने निरीक्षणाकरिता करतात.

**hair** केश

वनस्पतींच्या शरीरावर अपित्वचेपासून वाढणारे भिन्न प्रकारचे केस; हे एककोशिक, अनेककोशिक, मऊ, राठ, दाहक, संरक्षक, प्रपिंडीय इ. विविध प्रकारचे असतात. उदा. कापसाचे धागे.

**hair-shaped** केशाकृति

केसासारखे बारीक व लांब.

**hairy** केशालु; केसाळ; रोमिल

**hairiness** केशालुत्व; केसाळपणा.

**halbert-rhaped (hastate)** तोमराकृति

भाल्याच्या आकृतीचे; उदा. हरणखुरीचे पान. त्रिकोनी व तळाकडील दोन कोनांची टोके बाहेरच्या बाजूस वळलेली.

**half-bred (hybrid)** संकरज

पहा cross-breed.

**half (semi) cylindric** अर्धचितीय

एक बाजू सपाट व दुसरी अर्धगोलाकार अशा आकाराचा लांबट (अवयव); उदा. कित्येक पानांचे देठ; काही पाती; उदा. कोरफड.

**half-equitant** अर्धारूढ

पहा semi-equitant.

**half-inferior** अर्धाधःस्थ

संवर्ताच्या नलिकेत किंजपुट अर्धवट सुटा असून त्या सभोवार पाकळ्या व केसरदले असलेला किंजपुट.

**half moon-shaped (lunate; crescent-shaped)** अर्धचंद्राकृति

अर्ध्या चंद्राप्रमाणे आकाराचे; उदा. कृष्णकमळाच्या एका जातीचे, तसेच एका नेचाच्या जातीचे पान. (*Adiantum lunulatum*).

**halophilous** लवणप्रिय

मिठाशिवाय इतर क्षार असलेल्या किंवा खारट जमिनीत विशेषेकरून वाढणारी (वनस्पती); मात्पुरा, कांकरा, चिप्पी, तिवार, कांदळ, इत्यादी समुद्रकिनारी वाढणारी झाडे.

**halophobous (halophobe)** लवणद्वेषी; लवणविरोधी

क्षारमुक्त किंवा खारट जमीन टाळणारी (वनस्पती).

**halophyte** लवण वनस्पति.

क्षारयुक्त (विशेषतः खारट) पाण्याच्या सान्निध्यात वाढणारी वनस्पती; पीलू, केवडा, उंडी, नारळ, इत्यादी आणि वर उल्लेखिलेल्या लवणप्रिय वनस्पती; सागरशैवले.

**hand-microtome** हस्त-सूक्ष्मछेदक

हाताने चालविता येणारे, सूक्ष्म छेद घेण्याचे यंत्र.

**hanging root** पारंबी

झाडाच्या शाखेपासून निघून खाली लोंबणारे व पुढे जमिनीत खोलवर घुसून आधार देणारे मूळ; उदा. वड.

**haploid** एकगुणित

प्रजोत्पादक कोशिकेच्या प्रकलातील रंगसूत्रांची एकपट संख्या; इतर कोशिकात ही संख्या दुप्पट असते. बहुतेक सर्व गंतुकधारी पिढीत एकपट व बीजुकधारी पिढीत ती दुप्पट (संख्या) असते व बीजुके तयार होताना ती संख्या पुन्हा एकपट होते; पहा diploid.

**haploidization** एकगुणन

कोशिकेतील रंगसूत्रांची संख्या दुप्पट असताना, ती एकपट होण्याची प्रक्रिया; अर्धसूत्रण.

**haploidy** एकगुणितत्व

एकगुणित रंगसूत्रे असण्याचा प्रकार.

**haplophase** एकगुणितावस्था

एकगुणित रंगसूत्रे असलेली स्थिती; उदा. बीजुक, गंतुक गंतुकधारी.

**haptostele** प्रथमाद्यरंभ
मध्ये प्रकाष्ठ व त्याभोवती परिकाष्ठ असा सममध्य वाहक संच असलेला अत्यंत साधा व अतिप्राचीन वाहक वनस्पतींत आढळणारा रंभ; उदा. ऱ्हिनिया; पहा stele.

**hapteron ( holdfast )** दृढधर
बहुकोशिक पण वाहक ऊतके नसलेला आणि चिकटून राहण्यास उपयुक्त असा अवयव; उदा. फ्यूकस शैवल.

**haptotropic** स्पर्शानुवर्तनी
स्पर्शामुळे घडून येणारी वाढ दर्शविणारे ( अवयव ).

**haptotropism** स्पर्शानुवर्तन
खडबडीत पृष्ठभागाच्या स्पर्शाच्या चेतनेमुळे वेटाळत वाढण्याची प्रतिक्रिया; उदा. अमरवेल; प्रतान; मोरवेलीची देठे; कित्येक वेलींची टोके.

**hard bast** उपकाष्ठ
परिकाष्ठाजवळचा सूत्रल ( घनकोशिकायुक्त ) भाग पहा phloem; bast.

**hastate** प्रशराकृति; तोमराकृति
पहा halbert-shaped.

**haulm** संधिखोड
सांधेदार खोड; पहा culm.

**haustorium** शोषक
आश्रय वनस्पतींतून अन्न शोषून घेण्याचा जीवोपजीवी वनस्पतीचा लहान मुळासारखा रूपांतरित अवयव; उदा. अमरवेल; बांडगूळ.

**head** १) स्तबक; २) शीर्ष
(१) पहा capitutum.
(२) टोकाचा भाग.

**— -cell** शीर्ष-कोशिका
कारा (या नावाच्या) शैवल वनस्पतीतील रेतुकजनक तंतूंच्या तळाशी असलेली कोशिका; यामध्ये प्राथमिक व दुय्यम असे दोन प्रकार आहेत.

**heart-shaped** हृदयाकृति
पहा cordate.

**heart-wood** मध्यकाष्ठ
खोडातील मेंडाभोवती (केंद्रवर्ती) असलेला सर्वात जून व मृत लाकडाचा भाग; पहा duramen.

**helicoid** शुंडी
गोगलगाईच्या शिंपल्याप्रमाणे वेटोळे असलेला ( फुलोरा अथवा शाखांची मांडणी ); सोंडेप्रमाणे.

**— cyme ( bostryx; depranium )** वक्रवल्लरी; शुंडी
फुलोऱ्यातील अक्षाच्या एकाच बाजूस पण भिन्न पातळीत नवीन अक्ष येऊन आणि दरवेळी त्यावर टोकास आलेल्या फुलांमुळे वाढ थांबून लहान वेटोळ्याप्रमाणे दिसणारा कुंठित फुलोरा; हा एकपद वल्लरीचा प्रकार मानतात; उदा. हॅमेलिया; गेळफळ इ.
पहा scorpioid.

**heliophilous** प्रकाशप्रिय
भरपूर सूर्यप्रकाशात वाढणारी ( वनस्पती ); उदा. सूर्यफूल, एरंड, गुलाब, निंब, आंबा, नारळ, इ.

**heliophobous** प्रकाशद्वेषी
प्रत्यक्ष सूर्यप्रकाश टाळणारी; नेचे, सिलाजिनेला, इ.

**heliophyte** प्रकाशप्रिय वनस्पति.

**heliotactic** प्रकाशानुचलनी
प्रकाशाच्या चेतनेनुसार होणाऱ्या शरीरांतर्गत प्रक्रियेमुळे त्याकडे किंवा त्याविरुद्ध दिशेकडे ( अनुक्रमे धन व ऋण ) स्थानांतर करणारी वनस्पती किंवा घडणारी ( हालचाल ); उदा. स्वतंत्र व चलनशील वनस्पती (शैवले) अथवा त्यांचे सुटे भाग (बीजुके, गंतुके, इ.).

**heliotaxis** प्रकाशानुचलन
वर वर्णन केलेली स्थानांतराची प्रक्रिया; उदा. हरित्कणु; सूक्ष्मजंतू.

**heliotropic** प्रकाशानुवर्तनी
प्रकाशाच्या दिशेला किंवा दिशेविरुद्ध वाढत वळणारा ( वनस्पतीचा अवयव ); खोडाची व मुळाची टोके.

**heliotropism** प्रकाशानुवर्तन; सूर्यावर्तन
वर वर्णन केल्याप्रमाणे वाढण्याची प्रक्रिया ( प्रतिक्रिया ); पहा apheliotropism.

**helmet-shaped ( galeate )** स्फटाकृति
पोकळ व अर्ध्या कमानीसारखे; उदा. अतिविषाच्या फुलातील पाकळीसारखे संदल; पहा hooded.

**helophyte** आर्द्रप्रिय वनस्पति
दलदलित वाढणारी वनस्पती; उदा. पाणकणीस, लव्हाळा, अळू, एक्विसीटम, जलनेचे, शिंगाडा.

**helotism** दास्यत्व
घोंडफुलातील कवक व शैवल यांच्या परस्परसंबंधात कवक हे आश्रित व शैवल आश्रय असा संबंध ध्वनित करणारी संज्ञा; वास्तविक तो परस्परावलंबनाचा ( सहजीवनाचा ) एक प्रकार आहे. पहा Lichen.

**hemi-** अर्ध-
निम्मेपणा दाखविणारा उपसर्ग.

**hemicarp** फलांश; अंशफल
पहा mericarp.

**Hemibasidii** अर्धगदाकवक उपवर्ग; हेमिबेसिडी
गदाकवक वर्गातील तांबेरा व काणी या दोन गणांचा समावेश असलेला गट; यामध्ये विशिष्ट विश्रामी बीजुकाच्या अंकुरणानंतर गदाकोशिका बनते.
पहा Eubasidii; basidium.

**—cellulose** अर्धतूलीर; हेमी सेल्युलोज
कोशिकावरणातील एक कार्बोहायड्रेट संचित पदार्थ; उदा. खारकेचे बीज; पेक्टिन द्रव्य इ.

**— cyclic** अर्धमंडलित
फुलातील काही पुष्पदले सर्पिल मांडणीत व इतर वर्तुळाकार असा प्रकार; उदा. सोनचाफा.

**— cylindric** अर्धचितीय
अर्धगोल दंडाप्रमाणे आकार असलेले (खोड, देठ, इ.).

**hemiparasite** अर्धजीवोपजीवी
पहा semiparasite; semisaprophyte.

**Hepaticae (Liverworts)** यकृतका वर्ग; हिपॅटिसी
शेवाळी (ब्रायोफायटा) विभागातील तीन वर्गांपैकी एक. या वनस्पतींचे शरीर पानासारखे सपाट, साधे व जमिनीवर केसासारख्या मुळांनी चिकटलेले, क्वचितच साधे खोड व साधी सूक्ष्म पाने असलेले व अंतर्रचनेत भिन्न ऊतकांनी भरलेले असते; प्रजोत्पादक इंद्रिये बहुधा वरच्या पृष्ठावर असून बीजुकधारी पिढी साधी किंवा पद, दंड व बीजुकाशय यांची बनलेली असते; तथापि ती गंतुकधारीवर पूर्णपणे अवलंबून असते.
पहा Bryophyta; Anthocerotae; Musci.

**herb** ओषधि
लहान, मऊ, वर्षापेक्षा बहुधा जास्त न जगणारी, पण जगल्यास जमिनीवर कायम काष्ठयुक्त खोड नसलेली वनस्पती. उदा. सूर्यफूल, मका, कोबी, डेलिया, झेंडू इ.

**herbaceous** ओषधीय
वर वर्णन केल्याप्रमाणे (खोड अथवा वनस्पती); उदा. काकडीचा वेल; गुलबुश.

**herbage** पल्लव
वनस्पतीचे शाकीय भाग.

**herbal** ओषधी-ग्रंथ; पादप-कोश
सर्व तऱ्हेच्या वनस्पतींची विविध माहिती संकलित करून देणारा जुन्या पाश्चात्य पद्धतीचा ग्रंथ; उदा. जॉन जेरार्डचा ग्रंथ.

**herbalist** ओषधी-ग्रंथकर्ता; पादपकोशकर्ता
वर वर्णन केल्याप्रकारच्या ग्रंथाचा लेखक (संकलक, संपादक).

**herbarium** वनस्पतिसंग्रह
अभ्यासाच्या सोयीकरिता विविध प्रकारे जमवून ठेविलेल्या वनस्पतींचा साठा; व्यापकप्रमाणात हल्ली सजीव वनस्पतींचे संवर्धन व संशोधन अशा संस्थेत केले जाते.

**herbivorous** वनस्पत्याहारी; शाकाहारी
केवळ वनस्पती (गवत, पाचोळा, तण, फळे, इत्यादी) खाऊन राहणारे (प्राणी); उदा. काही पक्षी, गाईबैल, मेंढ्या, घोडे, हत्ती इ. ; मनुष्यांपैकी काही फक्त वनस्पतिज पदार्थ खाऊन जगतात त्यांना 'शाकाहारी' म्हणतात.

**hercogamy (herkogamy)** विष्कंभयुति
संरचनेतील विशेषत्वामुळे स्वयंफलन न होऊ देणारी योजना. उदा. सूर्यफुलातील केसरदले व किंजदले यांच्या पक्व होण्याच्या भिन्न वेळा व उंचीतील फरक; कळलावीच्या फुलातील या दोन अवयवांचे स्थान;

**—, half** अर्ध विष्कंभयुति
जमल्यास परफलन, पण ते न जमल्यास निदान स्वयंफलनाची तरतूद; उदा. जास्वंद, सूर्यफूल.

**hereditary** आनुवंशिक
वंशपरंपरेने आलेले (लक्षण); संपादित नसलेले. उदा. पुष्पगंध, पुष्पसंरचना.

**— symbiosis** आनुवंशिक सहजीवन
जनक वनस्पतींच्या ऊतकातून (बीजुक, बीज) काही जंतू किंवा कवक संततीत उतरण्याचा प्रकार.

**heredity** आनुवंशिकता
आईबापापासून व काही प्रमाणांत इतर पूर्वजांकडून संततीत कमीजास्त प्रमाणात लक्षणे उतरण्याची प्रवृत्ती व त्यामुळे दिसणारे साम्य; ह्या प्रक्रियेत होणाऱ्या काही घटनांमुळे काही लक्षणांत फरक पडून संततीस वेगळेपणा येतो अथवा नवीन लक्षणे प्राप्त होतात.

**heritability** अनुहर्यत्व
एका पिढीतून दुसरीत उतरण्याची लक्षणांची शक्यता (क्षमता).

**heritable** अनुहार्य

एका पिढीतून दुसऱ्या पिढीत उतरणारे ( लक्षण ); सर्वच आनुवंशिक लक्षणे किंवा वंशपरंपरा चालू ठेवले जाणारे लक्षण ( गुण, दोष ). पहा germinal, congenital, aquired.

**hermaphrodite** उभयलिंगी; द्विलिंगी; चिन्ह ☿

केसरदले व किंजदले असलेले ( फूल ). दोन्ही लिंगभेद दर्शविणारी इंद्रिये असणारी गंतुकधारी पिढी ( उदा. काही शैवले, शेवाळी इ. ); पहा bisexual, monoclinous, perfect.

**hesperidium** जंबीरसम; नारंगक

नारिंगासारखे फळ; अनेक जुळलेल्या ऊर्ध्वस्थ किंजदला-पासून बनलेले, अनेक कप्प्यांचे, रसाळ केसानी भरलेले व चिवट सालीचे मृदुफळ; उदा. लिंबू, पपनस इ.

**hetero —** असम - ; विषम

ग्रीक भाषेमध्ये, भिन्न अथवा अनित्य या अर्थाचा उपसर्ग.

**heterochromosome** असमरंगसूत्र; विषमरंगसूत्र

नर व मादी यांच्या शरीरांतील लिंगविषयक किंवा अन्य प्रकारे फरक पडलेले रंगसूत्र.

**heterochromous** असमवर्णी; विषमवर्णी

एकाच फुलोऱ्यातील काही फुले एका रंगाची व इतर दुसऱ्या रंगाची असण्याचा प्रकार; उदा. कॉसमॉस, ॲस्टर, डेलिया, इत्यादींचे स्तबक फुलोरे. बुगनवेलि-याचा एक प्रकार.

**heterocotylous** असमदलिकित

दोन्ही दलिका सारख्या नसलेले ( बी ).

**heterocyclic** असममंडलित; विषमचक्रीय

दलांच्या संख्येबाबत फुलातील मंडलात भिन्नत्व अस-ण्याचा प्रकार; उदा. संकेश्वर, मोहरी, हिरवा चाफा.

**heterocyst** असमकोष्ठ

इतराहून भिन्न ( मोठी, पारदर्शक, निबंत व दुहेरी आवरणाची ) शैवल कोशिका; उदा. नीलहरित शैवले.

**heteroecious** अनेकस्थ; भिन्नाश्रयी

अनेक ( बहुधा दोन ) आश्रयावर वाढणारी ( उप-जीविका करणारी, वनस्पती ); उदा. तांबेरा गहू व दारुहळद या आश्रयावर आळीपाळीने वाढते; पहा autoecious.

**heteroecism** अनेकस्थता; भिन्नाश्रयता

वर वर्णन केलेला प्रकार.

**heterogamous** (१) भिन्नपुष्पकी; (२) विषम गंतुकी

(१) दोन प्रकारची ( उभयलिंगी व एकलिंगी किंवा वंध्य ) फुले असणारे स्तबक अथवा तो फुलोरा धारण करणारी वनस्पती; उदा. सूर्यफूल, झिनिया, गोरखमुंडी, शेवंती, दवणा, इ.

(२) भिन्न गंतुके ( स्त्री व नर ) असलेली (वनस्पती).

**heterogamy** १) असमयुति; २) विषमगंतुकत्व; ३) पुष्पविविधता

(१) दोन भिन्न गंतुकांचा संयोग;

(२) दोन प्रकारची ( पुं व स्त्री ) गंतुके असण्याचा प्रकार

(३) नर- व स्त्री- पुष्पांच्या कार्याचा अथवा मांड-णीचा बदल. पहा isogamy.

**heterogeneity** विषमांगता

सृष्टीतील विविधता.

**heterogenesis** असमजनन

(१) पहा alternation of generations; abiogenesis;

(२) कळ्यातील भेदांमुळे किंवा निसर्गलीलेमुळे झालेली निर्मिती.

**heterogenetic** असमजनित

परफलनामुळे झालेले.

**— variation** असमजनित भेद

परफलनामुळे उद्भवलेले बदल.

**heterogenous** नैकविध

विविधतापूर्ण ( वैचित्र्यपूर्ण ) असणारे; एकविध ( एकरूप ) नसलेले.

**heteromerous** (१) असमभागी; (२) स्तरित

(१) पहा heterocyclic;

(२) भिन्न थरांचे बनलेले; उदा. धोंडफुलातील शैवल आणि कवक यांची स्वतंत्र थरयुक्त मांडणी असलेले शरीर; पहा homoimerous.

**heteromorphic (heteromorphous)** असमरूपी; विषमरूपी

अनित्य संरचना असलेले किंवा विकृतियुक्त; अवयवा-तील भिन्नत्व दर्शविणारे; पहा dimorphic.

**heteromorphism** असमरूपता; विषमरूपत्व

वर वर्णन केलेली लक्षणे असण्याचा प्रकार.

**heterophyllous** विषमपर्णी
भिन्न माध्यमात (पाणी व हवा) असलेल्या खोडाच्या भागांवर भिन्न प्रकारची पाने असणारी (वनस्पती). उदा. कमळ; शिंगाडा; अतिविष ( *Aconitum heterophyllum* Wall. ).

**heterophylly** विषमपर्णत्व
वर वर्णिलेला प्रकार.

**heteroplasy** अनित्यवृद्धि
जखमेमुळे त्यानंतर तेथे होणारी अनित्य वाढ. उदा. गाठ; फोड इ.

**heteroprothally** विषम पूर्वकायकत्व
नर- व स्त्री-गंतुकधारी (पूर्वकायक) अलग असण्याचा प्रकार; उदा. सिलाजिनेला; एक्विसीटम. पहा unisexual; dicliny.

**heterosis ( hybrid vigour )** संकरज (संकर) ओज
दोन सापेक्षतः शुद्ध प्रकारातील वनस्पतींच्या संकरामुळे निर्माण झालेल्या संततीत एकत्र आलेल्या व आकारमान आणि जोम याशी संबंधित अशा अनेक जनुकांच्या श्रेणीच्या संमिश्र परिणामामुळे आढळून येणारे विशेषत्व; पहा inbreeding.

**heterospermy** असमबीजत्व
एकाच वंशातील काही जातीत सपुष्क व काहीत अपुष्क बीजे असण्याचा प्रकार. उदा. मोरस ( *Morus* ).

**heterosporous** असमबीजुक
नर-व स्त्री- गंतुकधारी निर्माण करणारी दोन ( लघु व गुरु ) प्रकारची बीजुके प्रसवणारी ( वनस्पती ); उदा. सिलाजिनेला, आयसॉएटिस; काही जलनेचे ( साल्व्हीनिया ).

**heterospory** असमबीजुकत्व
दोन प्रकारची बीजुके निर्माण करण्याचा प्रकार (क्षमता).

**heterostyly** भिन्न किंजलत्व
अेकाच जातीत भिन्न उंचीची किंजले असणारी फुले असण्याचा प्रकार; उदा. कदंब कुल; आंबुशी; प्रिम्यूला.

**heterothallic** विषमजालकित; विषमकायिक
नर- व स्त्री- अशी दोन प्रकारची गंतुके भिन्न कायकावर किंवा तंतूमय शरीरावर असणारी ( वनस्पती ); उदा. म्यूकर बुरशी, काही शैवले, शेवाळी, इ.; पहा homothallic.

**heterothallism** विषमजालकता; विषमकायिकता
वर वर्णन केलेला प्रकार; पहा homothallism.

**heterotrophic** परोपजीवी
इतर सजीव किंवा मृत शरीरावर उपजीविका करणारी (वनस्पती); उदा. बुरशी, सूक्ष्मजंतू, कवक, इ. पहा autotrophic.

**heterotropism** परोपजीवन; परोपजीविता
वर वर्णन केलेला प्रकार.

**heterotropous** तिर्यङ्मुख
पहा amphitropous.

**heterotypic division** विषमविभाजन
कोशिकांच्या विभाजनात द्विगुणित रंगसूत्रांच्या संख्याविभागणीने संपूर्ण सारख्या जनुकांचे नसलेले व एकपट ( एकगुणित ) संरचनेचे दोन संच बनण्याची प्रक्रिया; पहा meiosis; homotypic division.

**heterozygosis** विषमरंदुकत्व
खाली वर्णिलेला प्रकार.

**heterozygote** विषमरंदुक
दोन वैकल्पिक भिन्न लक्षणे ( जनुके ) असलेल्या गंतुकांच्या संयोगाने बनलेली संयुक्त कोशिका; यापासून होणाऱ्या संततीत लक्षणांचा संकर आढळतो; पहा allelomorphic pair of characters.

**heterozygous** विषमरंदुकी
विषमरंदुकता असलेले.

**hexacyclic** षट्चक्रीय
सहा मंडलाचे (फूल); संवर्त व पुष्पमुकुट यांची मिळून चार किंवा केसरदलांची दोन अथवा तीन मंडले व इतरांची अनुक्रमे चार किंवा तीन अशी एकूण सहा.

**hexagonous** षट्कोनी
सहा धारा असलेले (खोड, बी किंवा फळ).

**hexamerous** षट्भागी
प्रत्येक मंडलात सहा पुष्पदले असलेले फूल.

**hexandrous** षट्केसरी; षट्पुंकेसरी

**hexandry** षट्केसरत्व
फुलात सहा केसरदले असण्याचा प्रकार; उदा. मोहरी; नागदवणा.

**hexapetalous** षट्प्रदली
सहा पाकळ्या असलेले (फूल); उदा. हिरवा चाफा.

**hexaploid** षट्गुणित
रंगसूत्रांची सहापट संख्या असलेली (वनस्पती).

**hexarch** षड्सूत्र; षडादिकाष्ठ
आदिप्रकाष्ठाचे सहा गट असलेला रंभ; पहा stele.

**hibernal (hiemal) aspect** शिशिर दृश्य; शिशिर प्रभाव
हिवाळ्यात आढळणारे वनस्पति-समुदायाचे स्वरूप.

**hibernation** शीत-निष्क्रियता; ग्रीष्मनिद्रा
हिवाळ्यातील सुस्ती अथवा निष्क्रियता; काही झाडांची पाने गळून पडल्याने खोड व फांद्या यांचे क्रियाशीलत्व तात्पुरते थांबलेले आढळते; उदा. खैर, काटेसावर, रामफळ, इत्यादींची पाने गळतात. शीतकटिबंधात प्रखर थंडीत हा प्रकार विशेषकरून आढळतो. भूमिगत खोड किंवा बीजस्वरूपातही अशीच निष्क्रियता आढळते.

**hilum** (१) नाभि; (२) कणकेंद्र; (३) परागकेंद्र
(१) बीजक जेथे बीजबंधास अथवा बीजकाधानीस चिकटलेले असते तेथे त्यावर पडलेला वण;
(२) तौकीर पदार्थाचे थर कणातील ज्या बिंदूभोवती बनतात तो बिंदू; यालाच कोणी locus म्हणतात.
(३) परागकणाचे छिद्र.

**hirsutus (hirsute)** दीर्घकेशी; दीर्घरोमी
लांब व विरळ केसाचे; उदा. गजकर्णी (*Rhinacanthus hirsuta* Kurg.).

**hispid** राठकेशी; दृढरोमी
राठ किंवा ताठर केस असलेले; उदा. भोपळीचा वेल; *Acalypha hispida* Burm. शोभेचे झुडूप.

**histogenesis** ऊतकजनन; ऊतिजनन
ऊतकांचा उगम व निर्मिती आणि त्यांचा विकास.

**histology** सूक्ष्मशारीर; ऊतकविज्ञान
सूक्ष्मदर्शकांच्या साहाय्याने केला जाणारा वनस्पतींच्या (किंवा प्राण्यांच्या) शरीरांच्या संरचनेचा अभ्यास अथवा त्यासंबंधीच्या माहितीची शाखा.

**hoary** पलित.
भुरकट; पांढरट व दाट लव असलेले.

**hollard** पूर्ण जलांश
जमिनीतील पाण्याचा पूर्णांश.

**hold-fast (hapteron)** दृढबंध
आधाराला घट्ट धरून ठेवून स्थिरत्व देणारा चकती-सारखा अवयव; उदा. शैवले; शैवाक (धोंडफूल).

**hologamy** प्रकलसंयोग
गंतुकातील प्रकलांचा संयोग.

**holoparasite** पूर्ण जीवोपजीवी
अन्य सजीवावर पूर्णपणे आपले पोषण करणारी (वनस्पती); उदा. अमरवेल; तांबेरा; काणी.

**holophytic** पूर्ण स्वोपजीवी; पादपसमभोजी
संपूर्णपणे स्वावलंबनाने पोषण करणारी.

**holophytism** पूर्ण स्वोपजीवन
संपूर्णपणे स्वावलंबी असलेले जीवन.

**holosaprophyte** पूर्ण शवोपजीवी (मृतोपजीवी)
पहा saprophyte.

**homo-** सम-
सारखेपणा दर्शविणारा ग्रीक भाषेतील उपसर्ग.

**homochlamydeous** समपरिदली
सर्व परिदले सारखी असलेले (फूल); संवर्त व प्रदले यात फरक नसतो; उदा. निशिगंध, कुमूर, नागदवणा.

**homocyclic** समचक्रीय; समवलयी
सर्व पुष्पदलांची मंडले दलसंख्येने सारखी असलेले (फूल); उदा. नारळ; धोत्रा.

**homoeomerous** अस्तरित; संमिश्र
भिन्न स्तर नसलेले; काही धोंडफुलाच्या संरचनेत शैवल व कवक यांचे मिश्रण असलेले (शरीर; कायक).

**homogamy** (१) समपक्वता (२) समयुति
(१) एकाच वेळी पूर्ण फुलातील पराग व किंजल्क पक्व होऊन कार्यक्षम असण्याचा प्रकार; उदा. धोत्रा.
(२) सारख्या गंतुकांचा संयोग.

**homogeneous** एकविध
एकजिनसी; एकाच प्रकारचे अथवा गुणधर्माचे; विविधता नसलेले.

**homologous** १) समजात; सजातीय; २) समरचित; समजातीय
(१) वरकरणी भिन्न वाटले तरी मूलतः एकाच प्रकारचे; सारख्याच मूलभूत संरचनेचे; उदा. संदले व प्रदले; प्राण्यातील काही अवयव; उदा. वाघळाचे पंख व व्हेल माशाचे (देवमाशाचे) पर.
(२) संततीमध्ये माता व पिता यांच्याकडून आलेल्या व तत्त्वतः समान लक्षणांबद्दल जबाबदार असलेल्या रंगसूत्रांच्या एका जोडीपैकी प्रत्येक रंगसूत्र.

**homology** समजातता; सजातीयत्व
मूलभूत सारखेपणा असण्याचा प्रकार; उदा. फड्या निवडुंगाचे खोड (पानासारखे दिसणारे) व त्रिधारी

निवडुंगाचे खोड शास्त्रीय दृष्ट्या अक्ष, परंतु बरकरणी भिन्न आहेत. तसेच वाटाण्याची पानासारखी उपपर्णे, घोटवेलीचे ताणे व बोरीची काटेरी उपपर्णे यांचे स्वरूप भिन्न पण मूलतः तिन्ही पर्णतलाची उपांगे आहेत.

**homoplasy** समवृद्धि; समतोविकास
काही कारणाने होणाऱ्या अनित्य वाढीत पूर्वीप्रमाणेच नवीन भाग अंतर्भूत असण्याचा प्रकार.

**homosporangic** समबीजुक जनक
एकाच प्रकारची बीजुके बनविणारी.

**homosporic** समबीजुकोद्‌भूत
एकाच प्रकारच्या बीजुकापासून झालेली; उदा. (बहुतेक) नेचांचा पूर्वकायक (गंतुकधारी).

**homosporous** समबीजुक
सर्वच बीजुके सारखी असलेली (वनस्पती); उदा. अनेक नेचे. पहा heterosporous.

**homospory** समबीजुकत्व
सर्व बीजुके सारखी असण्याचा प्रकार.

**homothallic** समजालकित; समकायिक
प्रजोत्पादक लैंगिक अवयवांच्या निर्मितीच्या दृष्टीने एकाच प्रकारचे जालक ( कवकतंतूचे व शैवल तंतूचे जाळे) अथवा कायक असलेली जाती; उदा. काहीं कवक; शैवले; शेवाळी इ.

**homothallism** समजालकता; समकायिकता
गंतुकांच्या उत्पादनाच्या दृष्टीने सारखे किंवा सामान्य तंतू किंवा कायक असण्याचा प्रकार; पहा heterothallism.

**homotypic division** समविभाजन
कोशिकेच्या न्यूनीकरण विभाजनातील पहिल्या विषम विभागणीनंतरची रंगसूत्रांची संख्येबाबत सारखेपणा राखणारी दुसरी विभागणी; परिणामी आरंभीच्या द्विगुणित कोशिकेपासून चार एकगुणित कोशिका (बीजुके, रेतुके, अंदुके, इ.) बनतात; पहा heterotypic division; meiosis; mitosis.

**homozygosis** समरंदुकत्व
सारख्या प्रजोत्पादक कोशिकांच्या ( गंतुकांच्या ) संयोगाने रंदुक बनण्याचा प्रकार; खालील संज्ञा पहा.

**homozygote** समरंदुक
सारख्या ( वैकल्पिक जनुकांच्या सारखेपणा असलेल्या) गंतुकांच्या संयोगापासून बनलेली संयुक्त कोशिका; अशा कोशिकेपासून संकरप्रजा निर्माण होत नाही; पहा heterozygote; allelomorphic pair of characters.

**homozygous** समरंदुकी
वर वर्णन केलेल्याप्रमाणे समरचित रंगसूत्रांच्या जोडीतील प्रत्येकावर विशिष्ट स्थानी सारखीच जनुके असलेली व्यक्ती.

**honey** मध
प्रथम मधमाश्यांनी शोषून घेऊन आपल्या पोवळ्यात साठविल्यावर पुढे मनुष्याने त्यातून काढून घेतलेला, फुलातील गोड रस ( मधुरस ); पहा nectar.

**— dew** मधुबिंदु
एका ( अर्गट ) रोगकारक कवक वनस्पतीने आपल्या बीजुकांच्या प्रसाराकरिता कीटकांना खाद्य म्हणून बनविलेला गोड रस.

**— - guide** मधुदर्शिका; मधुसूचक
फुलातील मधुरसाचे स्थान कीटकांना दर्शविण्याकरिता त्यातील रेषा, ठिपके, इ.

**— - gland** मधुप्रपिंड
मधुरस बनविणाऱ्या व स्रवणाऱ्या कोशिका अथवा त्यांचा समूह; पहा gland.

**— - combed** मधुकोटरसम
मधमाश्यांच्या पोवळ्यासारखी रचना ( मांडणी ) असलेले.

**hood** स्फटा; फणा

**hooded** स्फटाकृति; फणाकृति
नागाच्या फडीच्या आकाराचा ( अवयव ); उदा. साल्हिया, तुळस, सब्जा इत्यादींच्या पुष्पमुकुटातील मोठी वरची पाकळी; पहा cucullate.

**hook** अंकुश
टोकाशी आकड्यासारखे ( गळासारखे, वक्र ) मागे वळलेले उपांग उदा. हिरवा चाफा, वेत.

**— - climber** अंकुशलता
अंकुशासारख्या उपांगानी किंवा अवयवांनी वर चढत जाणारी वेल; उदा. वाघनखी.

**—, sensitive** संवेदी अंकुश
स्पर्शग्राही व त्यानुसार प्रतिक्रिया दर्शविणारा अंकुशासारखा अवयव; उदा. हिरवा चाफ्याच्या फुलाचा देठ; कुचला.

**hordein** होर्डाइन
बार्लीत असणारे विशेष प्रकारचे प्रथिन.

**hormogonium** मालांश; मालाखंड
नीलहरित शैवलांच्या तंतुयुक्त शरीराच्या अनेक कोशिकांचे माळेसारखे तुकडे; हे विशिष्ट (असमकोष्ठ) कोशिकांच्या साहाय्याने सुटे होऊन नवीन वनस्पती बनवितात; उदा. नॉस्टॉक, ॲनाबीना इ.
पहा heterocyst.

**hormone** संप्रेरक; हॉर्मोन
सर्व सजीवांच्या शरीरातील चयापचयामध्ये चालना देणारा व त्यातील विविध प्रक्रियांची गति कमीजास्त करणारा वितंचकासारखा कार्बनी पदार्थ; भिन्न प्रक्रियात भाग घेणारे संप्रेरक भिन्न असून त्यांपैकी काही विशिष्ट प्रपिंडातून स्रवतात व सर्व शरीरभर पसरतात; त्यामुळे अनेक शरीरक्रिया घडून येतात; वृद्धि–संप्रेरक वाढीला जबाबदार असतो. पहा auxin.

**Horned liverworts** शृंगका; शृंगी यकृतका
पहा Anthocerotae.

**hortensis** उद्यानविषयक; उद्यानवासी
बागेतील किंवा बागेसंबंधी; उदा. आकाशनिंब (*Millingtonia hortensis* L.) हा वृक्ष बागेत शोभादायक म्हणून किंवा रस्त्यांच्या दुतर्फा लावतात.

**horticulture** उद्यानविज्ञान
बागेसंबंधी सर्व माहिती संकलन करणारी ज्ञान शाखा.

**hortus** बाग; उद्यान
विशेष प्रकारे वाढविलेल्या निवडक वनस्पतींचा समूह.

**host** आश्रय
दुसऱ्या सजीवास आधार अगर पोषण देणारा प्राणी अगर वनस्पती; पहा epiphyte, parasite.

**hull** (१) तूस; (२) टरफल
(१) पहा glume
(२) पहा pericarp; epicarp.

**humus** कुजात; कुजकट पदार्थ
जमिनीतील काळपट व कुजकट कार्बनी (वनस्पतिज व प्राणिज) पदार्थ; जमिनीच्या पोताशी व सुपिकतेशी याचा निकट संबंध असून त्यामुळे जमीन धुपून जात नाही.

**— plant (saprophyte)** शवोपजीवी वनस्पती
मृत शरीरावर उपजीविका करणारी वनस्पती; उदा. कवकांपैकी काही बुरशी, भूछत्रे; काही सूक्ष्मजंतु, इ.

**— soil** कुजात मृदा; कुथमृदा
प्रमाणाबाहेर कार्बनी कुजट पदार्थ असलेली माती अथवा जमीन.



**husk** तुष
फोल; चौडे; सालपट; काही फळांचे अथवा बियांचे बाहेरचे आवरण; हे परिदले किंवा छदे यापासून बनलेले असते; उदा. गूजबेरी.

**hyaline** पारदर्शक
पलीकडचे दर्शविणारे (उपांग अवयव, इ.)

**hyaloplasm** बाह्यप्राकल
पहा ectoplasm.

**hyalosome** अवर्णकणु
रंगद्रव शोषून न घेणारा प्राकलातील सूक्ष्म कण.

**hybrid** संकरज
अशुद्ध वंश; मिश्र–प्रजा. जननिक दृष्टीने भिन्नता असलेल्या दोन जाती किंवा प्रकार यांच्यापासून जन्मलेले.

**—, bisexual** द्विलिंगी संकरज
आई व बाप यांची लक्षणे (गुणदोष) मिश्र (जोड) स्वरूपात दर्शविणारी संकरप्रजा.

**—, derivative** साधित संकरज
दोन संकरजांची अथवा एक संकरज व आईबापांपैकी एक यांची संतति; पहा back-cross.

**—, double** द्विसंकरज
पहा dihybrid-cross.

**—, heterodynamic** असम संकरज
आईबापांच्या लक्षणांचे विषम मिश्रण दर्शविणारी मिश्र-प्रजा.

**—, homodynamic** समसंकरज
आईबापांच्या लक्षणांचे सारख्या प्रमाणात मिश्रण असणारी मिश्रप्रजा.

**—, mosaic** चित्रसंकरज
दोन्ही आईबापांच्या लक्षणांचे मिश्रण, संततीत भिन्न रंगाच्या लहानमोठ्या ठिगळांच्या (चट्टयांच्या) चित्राच्या रूपाने दर्शविणारी मिश्रप्रजा.

**—, permanant** स्थायी संकरज
स्थिरस्वरूप प्राप्त झालेला संकरज; स्वजननाने संततीत फरक न पडणारा.

**—, reciprocal** अन्योन्य संकरज
परस्परांच्या भिन्न प्रजोत्पादक कोशिकांच्या संयोगाने बनलेली मिश्रप्रजा; अनेकदा या दोन संकरजात फरक नसतात.

**—, twin** युग्म संकरज
वर वर्णिलेली पण सारखीच मिश्रप्रजा.

**— -vigour** संकरज ओज
वनस्पतींच्या अथवा प्राण्यांच्या दोन जाती, प्रकार अथवा वाण यांच्या संततीत असणारा विशेष जोम; पहा heterosis.

**hybridise** संकर करणे
कृत्रिमरीत्या दोन भिन्न जातींत किंवा प्रकारांत प्रजोत्पादन घडवून आणणे अथवा मिश्रप्रजा निर्माण करणे; पहा cross-breed.

**hybridisation** संकरण
वर वर्णिलेली प्रक्रिया ( कृति ).

**hybridology** संकरविद्या
संकरणासंबंधीची माहिती.

**hydathode** जलप्रपिंड
शरीरातील अत्याधिक पाणी बाहेर टाकण्याची योजना ( प्रपिंड ); यामध्ये जलस्रावक ऊतक व जलरंध्र यांचा अंतर्भाव होतो; जलरंध्राचा कधी अभाव असतो; पण असल्यास त्याची संरचना पर्णरंध्राप्रमाणे असून उघडझाक नसते; नेफ्रोलेपिस नेचामध्ये टाकलेल्या पाण्यात चुना विरघळलेला असतो; पहा epithem, gland.

**Hydnaceae ( Spine-fungi )** शूलकवक कुल
सत्य गदाकवक उपवर्गातील व पटलकवक गणातील त्रिकोनी काट्यासारख्या अवयवावर गदाकोशिका असलेल्या कवकांचे कुल; पहा Eubasidii; Agaricales.

**hydric** जलविषयक
पाण्यातील; पाण्यासंबंधी.

**hydrocarpic** वारिफलजनक; जलफलजनक
परागणाची कृति पाण्याच्या पृष्ठावर झाली असताही त्यानंतर फळ पाण्याखाली बनविणारी ( बनस्पती ); उदा. सवाला ( *Vallisneria* ).

**hydrocentric** मध्यप्रकाष्ठक
पहा hadrocentric.

**hydrogenase** हायड्रोजनेज
रेणवीय हायड्रोजनचा कार्यद्रव्यासारखा वापर करणारे कार्बनी निदेशक; नायट्रोजनचे स्थिरीकरण घडवून आणण्याशी हे संबंधित असते; क्लोरेला नावाच्या शैवलामध्ये नायट्राइटचे क्षपण घडवून आणण्यात याचा संबंध येतो.

**hydrolase** हायड्रोलेज
जलविच्छेदनामध्ये साहाय्यक वितंचक ( कार्बनी निदेशक ).

**hydrolysis** जलविच्छेदन; जलापघटन; हायड्रॉलिसिस
पाण्याचा वापर करून रासायनिक संयुगाचे दोन भाग करविणे; एक भाग H व दुसरा OH बरोबर संयोग पावतो; उदा. Nacl चे NaOH आणि HCl असे दोन भाग पडतात.

**hydrome ( hadrome )** जलवाहक
पाण्याची ने-आण करणाऱ्या शरीर घटकाचा संच; पहा xylem.

**hydromorphy** जलानुरूपता; जलरूपता
पाण्यात राहून जीवन काढण्यास उपयुक्त असे ( रूपांतरित ) शरीर असण्याचा प्रकार; उदा. हायड्रिला; नायास. इ.

**hydronastic** जलानुकुंचनी
पाण्याच्या सान्निध्यामुळे कमीजास्त वाढ होऊन झालेले ( अवयवांचे वलन ); या वळणाचा पाण्याच्या दिशेशी संबंध नसतो.

**hydrophilous** (१) जलप्रिय; (२) जलपरागित (३) जलसाधित
( १ ) सदैव भरपूर ओलावा असलेल्या ठिकाणी वाढणारी ( वनस्पती ); उदा; ब्राह्मी, शेवाळी.
( २ ) पाण्याकडून पराग नेण्याची कृति घडविणारी; उदा. सवाला; नायास.
( ३ ) रंदुकनिर्मितीत ( प्रजोत्पादनात ) पाण्याच्या माध्यमाचा वापर करणारी ( वनस्पती ).
उदा. शैवले व जलकवक.

**hydrophobe (hydrophobous)** जलद्वेषी; जलविरोधी
पाणी वर्ज्य करणारी.

**hydpophyte** जलवनस्पति; जलोद्‌भिद
सतत अंशतः अगर पूर्णपणे पाण्यात वाढणाऱ्या वनस्पती; उदा. कमळ, कुमुद, शिंगाडा, इ.

**hydroponics ( soilless cultivation; water-culture )** मृदहीन कृषि; जलकृषि
नित्याप्रमाणे प्रत्यक्ष जमिनीत लागवड न करता पोषण भरपूर मिळेल अशा विद्रवात किंवा अशा विद्रवाच्या वापराने केलेली वनस्पतीची लागवड अथवा संवर्धन;

चांगल्या शेतजमिनीची दुर्मिळता असते तेथे ही पद्धत फायदेशीर होते.

**Hydropteridales (water-ferns)** जलनेचे गण

पाण्यात वाढणारे नेचे; यांचा स्वतंत्र गण न मानता त्यांचा अंतर्भाव तनुबीजुककोशी ( लेप्टोस्पोरँजिएटी ) उपवर्गात स्वतंत्र कुलात करतात; पहा Filicinae; Filicales.

**hydrotactic** जलानुचलनी

पाण्याच्या चेतनेमुळे घडून येणारे ( स्थलांतर ); उदा. श्लेष्मकवक वनस्पतींचा प्राकल.

**hydrotaxis** जलानुचलन

वर वर्णन केल्याप्रमाणे घडून येणारी प्रतिक्रिया; पहा chemotaxis.

**hydrotropic** जलानुवर्तनी

पाण्याच्या चेतनेमुळे वाढ होऊन घडून येणारे वनस्पतींच्या अवयवांचे वलन ( वळणे ); पहा chemotropic, geotropic.

**hydrotropism** जलानुवर्तन

वर वर्णन केलेली पाण्याकडे किंवा पाण्यापासून दूर वाढण्याची अवयवांची प्रतिक्रिया; उदा. बीज रुजल्यावर त्यातील मोड जमिनीतील ओल्सर भागाकडे वळून वाढतो; त्याउलट रोपाचे वरचे टोक ( अंकुर ) प्रकाशाकडे वर वाढते; पहा phototropism, heliotropism, geotropism.

**hygrochasy ( hydrochasy )** आर्द्रस्फुटन

पाणी शोषून घेतल्यामुळे घडून येणारी वनस्पतींच्या अवयवांची तडकून फुटण्याची प्रतिक्रिया; उदा. काही प्रदेशातील वनस्पतींची फळे; उदा. जेरीकोचा गुलाब; पहा xerochasy.

**hygrometer** आर्द्रतामापक

हवेतील ओलावा ( बाष्पांश ) मोजण्याचे उपकरण.

**hygrophilae ( hygrophyte )** आर्द्राप्रिय वनस्पति; उन्दोद्‌भिद

ओल्सर हवा व जमीन पसंत करणारी वनस्पती. उदा. काही नेचे, शेवाळी, अळू, कर्दळ, केळ, इ.

**hygroscopic** उन्देक्षीय; आर्द्रताशोषी

पाणी शोषून फुगणे व पाण्याभावी आकसणे अशी प्रतिक्रिया दर्शविणारे; उदा. शेवाळी (परितुंड दंत); नेचे ( बीजुककोशाचे वलय ); बीजुक क्षेपक ( एकिसीटम ), इ.

**-- cell** चलित्र कोशिका

पहा bulliform cell.

**hymen** पटल

पापुद्रा; त्वचेसारखा पण पातळ पडदा.

**hymenium** बीजुकोत्पादक स्तर ( थर )

गदाकवकात आढळणारा व बीजुकधरातील बीजुकांची उत्पत्ति करणाऱ्या कोशिकांचा सलग थर; पहा Basidiomycetes; Agaricales.

**Hymenomycetae** पटलकवक गण; हायमेनोमायसेटी

पहा Agaricales.

**hypanthodium** कुंभासनी

पुष्पासनाचा फुगून वाढलेला व कुंभाच्या (कलशाच्या) आकाराचा सूक्ष्म व बहुधा एकलिंगी फुलांचा समूह; उदा. अंजिर, वड, उंबर, इ. पहा syconus.

**hyperplasy** अतिवृद्धि

कोशिकांच्या संख्यावाढीमुळे ऊतक व अवयव यांच्या आकारात अधिक वाढ होण्याचा प्रकार.

**hypertrophy** अतिपुष्टी

कोशिकांच्या आकारवाढीमुळे अवयवांच्या किंवा ऊतकांच्या आकारात अति वाढ होण्याची प्रक्रिया.

**hypha** कवकतंतु

कवक वनस्पतींच्या शरीराचा एक तंतू; यात कधी आडपडदे असतात व तंतूंना कधी शाखा असतात; कवकतंतूच्या कोशिकांत प्राकलकणू नसतात; एक किंवा दोन प्रकल किंवा अनेक प्रकल असतात; अनेक तंतू एकत्र येऊन पातळ पापुद्रे, छेद ऊतके, किंवा मांसल अवयव बनतात; उदा. बुरशी, भूछत्र, भूकंदुक, इ. पहा mycelium; fungus; false tissue.

**hypnospore** विश्रामी बीजुक

प्रतिकूल परिस्थितीत सुरक्षित स्थितीत जिवंत राहणारे बीजुक; पहा spore.

**hypo-** अधः ; अव- ; अधर- ; अभि-

खालचे या अर्थी उपसर्ग.

**hypobasal** अवतल

तळाकडील अर्धा भाग; गर्भकोशिकेच्या ( रंदुकाच्या ) विभाजनात पहिल्या अवस्थेतील गंतुकधारीला चिकटलेला तिचा खालचा अर्धा भाग; उदा. नेचे, शेवाळी, इ.

**hypocotyl** अधराक्ष

बीजातील दलिकांच्या खाली असलेला प्रारंभिक अक्षाचा

भाग; द्विदलिकित बीजातून बाहेर आलेल्या मूलांकुराच्या टोकामागील भाग; पहा epicotyl.

**hypodermal** अभित्वचीय

अपित्वचेच्या खालच्या कोशिकांच्या थराशी संबंधित असलेले.

**hypodermis** अभित्वचा; अधस्त्वचा

अपित्वचेखालचा थर; कधी हे थर दोन किंवा तीन असून कोशिकावरण कधी जाड तर कधी फक्त त्यांचे कोपरे जाड व अनेकदा कोशिका मृत असतात. सजीव कोशिकात हरितकणूही आढळतात; उदा. सूर्यफुलाचे अथवा मक्याचे खोड; पहा epidermis.

**hypogeal** अवभौम

बीज रुजताना, बीजातील दलिका जमिनीत राहून गर्भांकुराचे पोषण करतात, अशा प्रकारे बीजाची रुजण्याची पद्धती ( अंकुरण ); उदा. हरभरा.

**hypogynous** अवकिंज

किंजमंडलाच्या खालच्या पातळीवर पण त्यास न चिकटलेले असे (इतर भाग– पुष्पदले) अथवा अशा संरचनेचे (फूल); उदा. मोहरी, तिळवण, इ.

**hyponasty** अधर (अधो) वर्धन

खालची बाजू (पृष्ठभाग) अधिक जलद वाढून अवयवास वक्रता येण्याचा प्रकार; उदा. कलिकावस्थेत प्रथम अशा वाढीने फुलातील सर्व अवयव परस्परास वेढून संरक्षण होते. फूल उमलण्याच्या वेळी याउलट कृति ( वाढ ) होऊन फूल उमलते; बीजाच्या रुजण्याच्या वेळी मूलांकुर जमिनीत जाणे व नंतर दलिकासकट ( किंवा त्याशिवाय ) उरलेला भाग जमिनीवर येऊन रोप सरळ वाढणे यामध्ये ही योजना आढळते; पहा epinasty.

**hypophyll** (१) अवपर्ण; (२) पर्णतल

(१) पानाच्या किंवा तत्सम अवयवाच्या खाली अर्ध–वट वाढलेले पान किंवा खवल्यासारखा अवयव किंवा उपांग; उदा. रस्कस.

(२) पानाच्या देठाचा खोडाशी चिकटलेला भाग.

**hypophysis** मूलजनक

प्राथमिक मूळ व त्याची टोपी यांची निर्मिती करणारी, फुलझाडांच्या गर्भाची कोशिका.

**hypoplasy** विकृतवृद्धि

अपुऱ्या पोषणाने वाढ थांबल्याने झालेली विचित्र वाढ.

**hypopodium** (१) पर्णतल; (२) किंजवृंत

(१) पानाचा तळ; (२) किंजदलाचा देठ.

**hyposperm** अवबीजक

बीज अथवा बीजक यांचा तळभाग; याच्या वरच्या बाजूस बीजकाचे आवरण प्रदेहापासून सुटे होते.

**hyposporangium** अवपुंजत्राण

बीजुककोशाच्या खालून वाढणारे आवरण; उदा. काही नेचे.

**hypostatic** संनियंत्रित

पहा epistatic.

**hypsophyll** छद

पहा bract.

**hysterophyte** शवोपजीवी

मृत पदार्थावर उपजीविका करणारी ( वनस्पती ); उदा. भूछत्र; कंदकवक, भूकंदुक, इ.

**hysterostele** लघुरंभ

ऱ्हसित किंवा नष्टप्राय झालेले रंभ ( वाहक ऊतकांचा मितीय भाग ); उदा. काही जलवनस्पती; पहा stele.

## I

**icone** पादपाकृति

वैज्ञानिक आकृतीच्या रूपाने वनस्पतीचे दर्शन.

**identification (of plant or parts)** अभिज्ञान

वनस्पतीचे अथवा तिच्या अवयवांचे इतर वनस्पतीशी विरोध अथवा साम्य निश्चित करून ती ओळखणे; वर्गीकरणातील स्थान समजून घेणे.

**— ides (- ideus) -** सम

साम्यदर्शक प्रत्यय; उदा. पाकळीसारखे ( प्रदलसम ) *petaloideus*; ऑलिव्हसारखे ( *oleoides* ); ऑर्किडसारखे ( *orchioides* ) इ.

**idioblast** विषम कोशिका; भिन्न कोशिका

ऊतकातील इतर कोशिकांपेक्षा भिन्न अशी एखादी कोशिका; उदा. कमळाच्या पानाच्या किंवा फुलाच्या देठातील ऊतकात आढळणाऱ्या तारकाकृति कोशिका; अशा काही कोशिकात टाकाऊ पदार्थ ( राळ, टॅनिन, स्फटिक इ.) असतात; पहा stellate cell.

**idiochromosome** लिंगसूत्र

लिंगविशिष्ट प्रवृत्तींचे अनुहरण करणारे रंगसूत्र.

**imbibe** विचोषण करणे; अंत:शोषण करणे

शोषून घेऊन संचय करून ठेवणे; उदा. बीजाची साल पाण्याशी संपर्क होताच ते शोषून घेऊन धरून ठेवते;

सुके लाकूड, कोशिकावरण किंवा कोशिकांतर्गत द्रव्य पाणी शोषून फुगते.

**imbibition** विचोषण; अंत:शोषण

वर वर्णिलेली प्रक्रिया; विसृतीचा एक प्रकार; पहा diffusion.

**imbricate** परिहित

(१) छपरावरील कौलाप्रमाणे एकावर दुसरे अंशतः असलेली (पुष्पदले).

(२) कळीमध्ये विशिष्ट पुष्पदलांच्या (पाकळ्यांच्या) मांडणीत काही दले वर वर्णिल्याप्रमाणे तर इतर एखाद्या दलाच्या दोन्ही कडाजवळच्या दोन दलांनी अंशतः झाकलेल्या व दुसऱ्याच्या दोन्ही कडा पूर्णतः बाहेरच राहिलेल्या असा प्रकार; उदा. मोहरीचे किंवा पिवळ्या धोत्र्याचे फूल; पहा contorted.

**immersed (plunged)** निमज्जित

बुडलेले; पाण्याच्या किंवा पानाच्या पृष्ठभागाखाली राहिलेले, असलेले अथवा वाढलेले.

**immobile (immovable)** स्थिर; अचल

न हालणारा (अवयव); उदा. केतकीचा परागकोश.

**immunity** प्रतिकारक्षमता

रोगकारक पदार्थाला किंवा परिस्थितीला प्रतिकार करण्याची पात्रता.

**immutable** अपरिवर्त्य

कोणतेही फरक न पडता जसेच्या तसे राहणारे (सजीव).

**immutability (fixity)** अपरिवर्त्यता

सजीवांची वर वर्णन केलेली, न बदलण्याची प्रवृत्ति (एक जुनी गैर समजूत).

**impenetrable** अभेद्य

मधून आरपार जाण्यास अशक्य (कठीण) असे (जंगल).

**imperfect flower** एकलिंगी पुष्प

आवश्यक पुष्पदलात न्यूनता असणारे फूल; एकलिंगी फूल; उदा. पपई, भोपळा इ.

**imperforate** रंध्रहीन; अच्छिद्री; छिद्रहीन

भोके नसलेले.

**impermeable** अपार्य

द्रवरूप, वायुरूप अथवा घनरूप पदार्थ आरपार सूक्ष्म गतीने (विसरणाने) जाऊ न देणारा (पडदा); पहा diffusion; osmosis.

**impermeability** अपार्यता

अपार्य असण्याची क्षमता.

**impervious** अप्रवेश्य

छिद्रांच्या अभावी आरपार जाऊ न देणारा; उदा. मेणाच्या लेपामुळे, उपत्वचेमुळे किंवा वल्कामुळे पाणी आतबाहेर जाऊ न देणारा (पानाचा अथवा इतर अवयवांचा पृष्ठभाग); पहा cuticle, bark.

**imported** आयात

परठिकाणाहून आलेली (वनस्पती); पहा alien. उदा. कुंती *Murraya exotica* L.

**impregnating tube** फलन-नलिका

दोन विरुद्धलिंगी प्रजोत्पादक कोशिकांच्या संयोगाचे वेळी रेतुकाशयापासून वाढलेला नळीसारखा अवयव; उदा. पिथियम कवक.

**impregnation** फलन

रेतुक व अंदुक यांचा संयोग; गर्भाधान.

**impression** मुद्रा; ठसा

मऊ चिखलावर वनस्पतीच्या अवयवाचा ठसा उमटून तो पुढे कठीण दगड झाल्याने बनलेला जीवाश्म (एक प्रकारचा शिलारूप अवशेष); पहा fossil.

**— , fossil** जीवाश्म-मुद्रा

वनस्पतीचा, प्राण्याचा किंवा त्यांच्या अवयवांचा ठसा दर्शविणारा दगडाचा तुकडा.

**impulse** आवेग

बाह्य परिस्थितीतील काही घटकामुळे सजीवास मिळालेला ज्ञान स्वरूपातील धक्का.

**impure** अशुद्ध

दोन शुद्ध वंशातील पण भिन्न जाती अथवा प्रकार यांच्या संकराने बनलेली संतति (संकरज).

**inae**

वनस्पतींच्या वर्गीकरणात वंशाच्या वरच्या दर्जाच्या गटाचे शास्त्रीय नाव हा प्रत्यय लावून दर्शवितात. उदा. Rosinae (Rose हे वंशाचे नाव); येथे वरच्या दर्जाचा गट म्हणजे subtribe. पूर्वी वर्गाकरिता हा प्रत्यय वापरीत.

**inanimate** निर्जीव; जड; अचेतन

जीवनव्यापार अथवा सजीवात आढळणारी क्रियाशीलता न दर्शविणारे; कसल्याही चेतनेला प्रतिक्रिया न करणारे.

**inarticulate** संधिहीन
सलग; सांधे नसलेले (उदा. खोड); पहा articulated.

**inborn** उपजत
आनुवंशिक; जन्मापासून असलेले (शारीरिक वा मानसिक लक्षण); पहा congenital; hereditary.

**inbred** अंतःप्रजनित

**inbreeding** अंतःप्रजनन
फारच जवळच्या आप्तांमध्ये शरीरसंबंध होऊन प्रजा-निर्मिति होण्याची घटना (प्रक्रिया); पहा heterosis; outbreeding.

**incised** छेदित
अनियमितपणे निसर्गतः फाटलेले; दातेरी व खंडित यांमधील प्रकार.

**incision** छेदन
निसर्गतः कापून पडलेली अथवा कृत्रिमपणे पाडलेली चीर; उदा. पानाच्या किंवा पाकळ्यांच्या कडा कमी जास्त प्रमाणात फाटलेल्या (चिरलेल्या) आढळतात.

**included** अंतःस्थित
आत (दुसऱ्या अवयवाच्या पोकळीत) राहिलेले; उदा. पुष्पमुकुटात असलेली केसरदले; घोत्रा, गारवेल, इ. पहा exerted.

**inclusion** अंतर्विष्ट
समावेश झालेले; उदा. परिकलात किंवा कोशिकेत समावेश झालेले पदार्थांचे कण.

**Incompletae** अपूर्णपुष्पी उपवर्ग
पहा Monochlamydeae.

**incomplete flower** अपूर्ण पुष्प
साहाय्यक पुष्पदलात (परिदलात) न्यूनता असलेले (फूल); उदा. पुनर्नवा, चाकवत, शेर, शेंड, इ.

**incompressible** असंकोच्य; अदम्य
न दाबले जाणारे (खोड).

**incipient** प्रारंभिक
आरंभीच्या अवस्थेतील; उदा. नीलहरित शैवलातील प्रकल.

**incrustation** पुट; कवच
(१) खनिज द्रव्याने लपेटलेले वनस्पतींचे अवशेष (जीवाश्म); यात कार्बनी द्रव्याचा अभाव असून शरीर-संरचनेतील वैशिष्ट्य मात्र आढळते;
(२) खपलीसारखे आच्छादन.

**incumbent** (१) प्रणत; (२) आधारित
(१) जमिनीवर भार टाकून वाढणारे (खोड);
(२) इतरावर भार टाकणारी व वाढणारी (वनस्पती).

**incurved** अंतर्वक्र
बाहेरून आतील बाजूस वाकलेले; उदा. पाकळ्या, केसरदले.

**indefinite** (१) अमर्याद, असंख्य; (२) अकुंठित
(१) संख्या व आकारमान यात मर्यादा नसणारे; उदा. बीजके, केसरदले, पाकळ्या इ; आंतर्राष्ट्रीय चिन्ह ∞.
(२) प्ररोह किंवा फुलोरा यांच्या प्रमुख अक्षाची न थांबता चालू राहणारी वाढ; पहा racemose.

**indehiscence** अस्फुटन
स्फोट (तडकणे, उकलणे) न होणे; उदा. बीजुकाशय, बीजुककोश किंवा फळ आपोआप न फुटण्याचा प्रकार; पहा dehiscence.

**indehiscent** अस्फुटनशील
आपोआप न तडकणारे (अवयव).

**independent assortment** स्वतंत्र व्यवस्थापन
आईबापापासून संकरप्रजेत आलेले काही वैकल्पिक गुण पुढील पिढीत स्वतंत्रपणे उतरून त्यातील संततीत त्या गुणांची अलग वाटणी.

**indeterminate** (१) अनिश्चित; अनिर्धारित; (२) अकुंठित
(१) पुढील घटनांची (उदा. वाढ, बदल, इ.) खात्रीपूर्वक माहिती नसण्याचा प्रकार.
(२) अक्षाची वाढ मर्यादित नसलेला (फुलोरा).

**indicator species** निदर्शक जाती
आपल्या अस्तित्वाने परिस्थितीची (हवामान किंवा त्यातील बदल) जाणीव करून देणारी वनस्पतीची जाती. उदा. रामेठा ही जाती अधिक उंच, अधिक पावसाचे प्रमाण व कमी तपमान इत्यादी असलेल्या प्रदेशाची जाणीव उत्पन्न करते, कारण ती अशा ठिकाणीच आढळते.

**indigenous (indigen)** स्वकीय; रहिवासी
एतद्देशीय; बाहेरून न आलेली; उदा. आंबा, कोकम, पांगारा, मोह इत्यादी वृक्ष भारतीय असल्याने त्यांच्या

लॅटिन नावात त्या अर्थाची जातिवाचक संज्ञा (indica) समाविष्ट आहे; पहा cultigen.

**indirect division** अप्रत्यक्ष विभाजन

पहा mitosis; karyokinesis.

**individual** व्यक्ति

एकाच जातीतील प्रत्येक प्राणी किंवा वनस्पती; अनेक सारख्या व्यक्तींची जाती बनते; पहा species.

**induced** प्रवर्तित; प्रेरित

बाहेरील चेतकामुळे (चेतना देणाऱ्या घटकामुळे) घडून आलेली (वनस्पतींतील प्रतिक्रिया); उदा. अवयवांचे वलन, सुट्या भागांचे स्थलांतर.

**— polyploidy** प्रवर्तित बहुगुणन

चेतकाच्या साहाय्याने कृत्रिमपणे घडवून आणलेली रंगसूत्रांची संख्यावाढ.

**indumentum** घनलोमावरण

दाट लवीचे आच्छादन.

**induplicate** अंतर्नत धारास्पर्शी

कलिकावस्थेतील मांडणीचा एक प्रकार; प्रत्येक लहान पानाच्या दोन्ही कडा आतील बाजूस वळलेल्या असून जवळच्या तशाच दुसऱ्या पानांच्या कडांना स्पर्श करतात.

**indurated** घनीभूत

विकासावस्थेत विरळपणा जाऊन दृढता आलेले.

**indusiate** पुंजत्राणयुक्त

बीजुककोशांच्या समूहावरचे आवरण असलेले.

**indusium** पुंजत्राण

बीजुककोशांच्या समूहाचे आच्छादन; उदा. नेचे.

**ineae**

वनस्पतींच्या उपगणांच्या शास्त्रीय नावामध्ये असलेला प्रत्यय; उदा. नेचे उपगण (Filicineae).

**inextensible** अतन्य

न ताणता येणारा (अवयव).

**inextensibility** अतन्यता

न ताणले जाण्याची क्षमता ( गुण ); उदा. मुळे व खोड अतन्य असणे आवश्यक असते.

**infection** संसर्ग

रोगजंतूंशी प्रत्यक्ष संबंध व जंतूंचा शरीरप्रवेश.

**— tube** संसर्ग-नलिका

रोगजंतूंना प्रवेश मिळवून देणारा नळीसारखा भाग.

**infectious** सांसर्गिक

बाहेरून संसर्गाने येणारा ( जडणारा ).

**inferior** अधःस्थ; निम्न

इतर पुष्पदलांच्या खालच्या पातळीवर असणारा ( किंजपुट ); उदा. पेरु, डाळिंब, भोपळा, इ.; पुष्पसूत्रात हे लक्षण G किंवा जी या आद्याक्षरापुढील आकड्यावर, आडवी रेषा काढून दर्शवितात; पहा floral formula.

**infertile** (१) निकस; नापीक; (२) वंध्य

(१) पोषणक्षमता नसलेली ( जमीन );

(२) जननक्षम नसलेली ( वनस्पती ).

**inflated** फुगीर

फुगवलेले; हवा अथवा पाणी यामुळे तुडुंब भरलेले; उदा. काही शैवलांचे तरंड; काही फळांचे आच्छादन; काही फळाभोवती असलेले संवर्त ( पोपटी व कपाळफोडी ).

**inflexed** अंतर्नत

आतील बाजूस वाकलेले ( दुमडलेले ); उदा. तिवाराच्या कळीतील केसरदले.

**inflexible** अनम्य

बाहेरील दाबाने न वाकणारे.

**inflexibility** अनम्यता

दाबाने न वाकण्याची क्षमता; उदा. उभे खोड.

**inflorescence** पुष्पबंध; फुलोरा

( १ ) फुले असणाऱ्या फांदीवरील ( अक्षावरील ) त्यांची मांडणी; पुष्पविन्यास.

( २ ) अनेक फुलांचा घोस, ( झुबका ); फांदीच्या टोकाचे एकच फूल.

**infra-** अव-

खालचा या अर्थी उपसर्ग.

**— axillary** अवकक्षस्थ; कक्षतलीय

पानाच्या बगलेखाली असलेले.

**— foliar** अवपर्ण

पानाखाली असलेले ( उपांग, ग्रंथि, इ. ).

**— nodal** अवपर्वस्थ; पर्वतलीय; पर्वतलस्थ

खोडावरील पेऱ्याच्या खालच्या बाजूस उगवलेले.

**infundibular ( infundibuliform )**

नालिकाकृति

नाळक्यासारखा; उदा. धोत्र्याच्या पुष्पमुकुट.

**inherent** अंगभूत; स्वाभाविक
निसर्गदत्त; नैसर्गिक प्रवृत्तीमुळे असणारे किंवा येणारे (गुण); उदा. जीवद्रव्याची प्रमुख लक्षणे.

**inheritance** अनुहरण
वारसा; एका पिढीतून दुसऱ्या पिढीत गुण उतरण्याची प्रक्रिया; यामुळे संततीत व आईबापात कमी जास्त साम्य दिसून येते; तसेच जातिविषयक गुणांच्या (लक्षणांच्या) अनुहरणामुळे प्रत्येक जीव आपल्या सारखीच प्रजा निर्माण करतो. पहा cytoplasmic inheritance.

**inhibition** कुंठन; अवरोधन
थांबविण्याची क्रिया; स्थगित करण्याचा प्रकार; उदा. वाढ, विकास, प्रजोत्पादन, शोषण, इ.

**inhibitor** रोधक; दमक; निरोधक; निरोधी; अवरोधक
रासायनिक व जैव प्रक्रियांचा वेग कमी करणारा किंवा प्रक्रिया थांबविणारा घटक; संततीत एखादे लक्षण प्रकट होण्यास विरोध करणारा (घटक, कारक).

**initial cell** आदिकोशिका; आरंभिक कोशिका
जिच्यापासून पुढे विशिष्ट अवयव बनतो ती आरंभीची कोशिका.

**injection** (१) अंत:क्षेपण (२) सूचिकाभरण
(१) बाहेरून आत सोडण्याची प्रक्रिया; उदा. अंतराकोशिकी पोकळ्यात जवळच्या कोशिकेतून पाणी सोडण्याची क्रिया.
(२) सुईसारख्या सूक्ष्म नळीने द्रवरूप अथवा वायुरूप पदार्थ शरीरात घालणे.

**innate (basifixed)** अध: बद्ध; तलबद्ध
तळाशी चिकटून आधारलेला (परागकोश); उदा. मोथा, वांगे, टोमॅटो, मोहरी, इ.

**inner** (१) अंत:; (२) अंत:स्थ
(१) आतील या अर्थी उपसर्ग.
(२) आतील; केंद्राजवळचे.

**— bark** अंतर्वल्क
मृत अपित्वचा, त्वक्षाकोशिका, व (द्वितीयक) त्वक्षाकर (सर्व मिळून वल्क) यांच्या आतील भाग; पहा bark.

**— glume** अंतस्तुष
पहा glume.

**— integument** अंतरावरण
बीजकाच्या दोन्हीपैकी आतील आवरण; पहा tegmen.

**inrolled** अंतर्वलित
आतील बाजूस गुंडाळलेली; उदा. कळीमध्ये पाकळीची किंवा पानाची किनार; कमळ, अळू; पहा involute.

**insect-pollination** कीटक-परागण
कीटकांकडून घडवून आणलेला फुलातील परागांचा किंजल्काशी संपर्क; पहा pollination.

**insectivorous plant** कीटकभक्षक वनस्पति
पहा carnivorous.

**inserted (attached)** निवेशित; संलग्न

**insertion** निवेशन; संलग्नता
एका अवयवाचा दुसऱ्याशी असलेला निकट संबंध; उदा. पाने व खोड; पुष्पस्थली व पुष्पदले; पाकळ्या व केसरदले; इ. पहा epipetalous.

**insolation** सौरतापन
सूर्यकिरणात प्रत्यक्षपणे तापून निघण्याची प्रक्रिया.

**insoluble** अविद्राव्य; अविलेय; अद्राव्य
न विरघळणारा (पदार्थ).

**insusceptible** ग्रहणाक्षम; अग्रहणशील
ग्रहण न करू शकणारी अथवा एखाद्या रोगाच्या जंतूंना पूर्ण विरोध करणारी (व्यक्ती).

**integer** अखंडित
न फाटलेले (चिरलेले); उदा. पान.

**integerrimus** अखंडित
अवयवाच्या अखंडत्वाची विशेष ग्वाही देणारी संज्ञा; उदा. पांशी (*Carallia integerimma* DC.)

**integrifolius** अखंडपर्णी
अखंड कडा असलेल्या पानाची (वनस्पती); उदा. फणस *Artocarpus integra* (Thumb.) Merr. syn. *A. integrifolia* L.

**integument** आवरण
बीजकाचे (प्रदेहाभोवतीचे) आच्छादन; यापासून बीजावरण बनते; हे एक किंवा दोन असतात; पहा indusium; testa; tegmen.

**inter—** आंतर-; अंतरा-
संबंधित भागांच्या बाबतीत मध्ये या अर्थी उपसर्गाप्रमाणे उपयोग करतात.

**interaction** अन्योन्य क्रिया; आंतरक्रिया
दोन पदार्थांमध्ये होणारी परस्परावर परिणामकारक क्रिया; उदा. एकाच लक्षणाबाबत दोन जनुकांमध्ये होणाऱ्या परस्पर संबंधामुळे कधी कधी संततीत अनपेक्षित परिणाम दिसून येतो; पहा complimentary factor.

**intercalary** मध्यस्थित
दोन कायम ऊतकांमध्ये असलेले अथवा वनस्पतीच्या दोन्ही टोकास नसून अक्षावर मध्ये असलेले ( ऊतक, कोशिका, वर्धनशील भाग इ. ); पहा cambium.

— **growth** मध्यस्थित वृद्धि ( वर्धन )
अवयवाच्या टोकास नसलेली ( इतरत्र असलेली ) वाढ; उदा. काही एकदलिकित वनस्पतीत पेऱ्यांजवळ अधिक काळ वाढ चालू राहते. काहीत पानांचीही वाढ तळाशी अधिक वेळ चालू असते.

— **inflorescence** मध्यस्थित पुष्पबंध
प्रमुख अक्षावरच्या फुलोऱ्यानंतर पुन्हा त्याच अक्षावर वाढ होऊन फुलोरा येणे उदा. अननस.

— **meristem** मध्यस्थित विभज्या
वनस्पतींतील ( प्राथमिक वाढीनंतर ) द्वितीयक वाढ ( प्रकाष्ठ, परिकाष्ठ, त्वक्षा, उपत्वक्षा, इ. ) चालू ठेवून खोड, शाखा व मुळे यांची जाडी ( परिघ ) वाढविणारे व त्या त्या अवयवांतील प्रारंभिक ऊतकांमधून आढळणारे वर्धनशील ऊतक. उदा. ऊतककर, त्वक्षाकर; पहा meristem.

**intercalation** मध्यस्थापन
जुन्या कणांमध्ये नवीन कण प्रविष्ट होण्याचा प्रकार; उदा. कोशिकावरणाची वाढ; कधी नवीन कोशिका पूर्वीच्या कोशिकासमूहात प्रवेश करून समूहाकार वाढतो.

**intercarpellary** आंतर ( अंतरा ) किंजदली
अनेक किंजदलांमध्ये असलेले ( उदा. प्रपिंड ).

**intercellular** अंतराकोशिकी
दोन किंवा अनेक कोशिकांमधून असलेले ( उदा. पदार्थ; पोकळ्या; इ. ).

-- **passage ( duct )** अंतराकोशिकी मार्ग ( नलिका )
— **space** „ पोकळी
— **substance** „ पदार्थ

**intercostal** अंतरासिराल
शिरांमधून असणारे.

**intercrossing** अंतरासंकरण
दोन जाती किंवा प्रकार यांमध्ये घडविलेले प्रजोत्पादन.

**interfascicular** अंतरावृंदीय
दोन किंवा अधिक वाहक संचांमधील.

-- **cambium** अंतरावृंदीय ऊतककर
वाहक संचांमध्ये असलेले वर्धनशील ऊतक.

**interfoliar** अंतरापर्णी
अनेक पानांमधून.

**intergeneric hybrid** अंतरावंशीय संकरज
दोन वंशातील व्यक्तींमधील संकरणाने झालेली संतति.

**intermediate host** मध्याश्रय; मध्यस्थ आश्रय
जीवोपजीवी वनस्पतीच्या किंवा प्राण्याच्या सतत आश्रयाखेरीज अल्पकाळ असणारा दुसरा एक आश्रय; उदा. गव्हावरील तांबेऱ्याचा मध्यस्थ आश्रय, दारुहळद ( बार्बेरी; *Berberis aristata* DC. ).

**internal phloem** अंत:परिकाष्ठ
प्रकाष्ठाच्या आतील ( मेंडाजवळच्या ) बाजूस असलेले परिकाष्ठ; उदा. काकडीचे खोड;
पहा bicollateral bundle.

**internode** कांड
कांडे; खोडाच्या अथवा शाखेच्या दोन पेऱ्यांमधील भाग.

**internodal** अंतरापर्वीय
दोन पेऱ्यांमधील ( भाग, कोशिका, इ. ).

**interpetiolar** अंतरावृन्तीय
समोरासमोर असलेल्या दोन पानांच्या देठांमधील ( भाग, उपपर्ण ).

**interrupted** खंडित; असंतत
मधूनमधून खंड पडलेले.

**interseminal** अंतराबीजी; आंतरबीजी
अनेक बीजकांमधून किंवा बीजांमधून असलेले ( विखुरलेले ); उदा. सायकॅडिऑइडियाच्या उभय बीजुककोशधारी शंकूतील खवले.

**interspecific hybridisation** अंतराजातीय संकरण
दोन भिन्न जातींतील व्यक्तींमध्ये झालेला संकर.

**interstaminal** अंतराकेसरदली
दोन किंवा अधिक केसरदलांमध्ये असलेले; उदा. बिम्ब.

**interxylary phloem** अंतराप्रकाष्ठीय परिकाष्ठ
प्रकाष्ठ भागात पसरलेला परिकाष्ठाचा भाग. उदा. वाघ-

नखी; टेट्रू; यांमध्ये प्रकाष्ठाचे त्रिज्येप्रमाणे खंड पडून त्यामधून परिकाष्ठ असते; पहा xylem; phloem.

**intine** आलेप

परागकणाचे सर्वांत आतील आवरण; पहा exine.

**intra-** अंत:

आतील या अर्थी उपसर्ग.

**— axillary** अंत:कक्षी

पानाच्या बगलेतील ( अवयव, उपांग ).

**— cambial** अंत ऊतककर

ऊतककराच्या आतील बाजूचे.

**— cellular** अंत:कोशिकी

कोशिकेच्या आतील बाजूचे.

**— fascicular** अंतर्वृन्दी

वाहक घटकांच्या संचातील ( उदा. ऊतककर ).

**— floral** अंतर्पुष्पदली; अंतर्पुष्पी

फुलातील किंवा पुष्पदलांतील ( उदा. प्रपिंड ).

**— generic** अंतर्वंशी

एका वंशातील अनेक जातींत असलेली (लक्षणे).

**— marginal** अंतर्धारी

किनारीजवळ पण आतील बाजूस असलेली; उदा. जांभळीच्या पानातील शीर.

**— medullary** अंतर्निकाष्ठी

मेंडामध्ये विखुरलेले; उदा. वाहकवृंद (बिगोनिया, ॲरेलिया इ.)

**— molecular** अंतर्रेणवीय

पदार्थाच्या रेणूंमध्ये असणारे ( होणारे ).

**— nucellar** अंत:प्रदेही

बीजकाच्या प्रदेहातील; पहा nucellus.

**— nuclear** अंत:प्रकली

प्रकलात असलेले; पहा cell.

**— petiolar** अंतर्वृंती

खोड व देठ यांमधील; (उदा. अवयव, उपांग).

**— protoplasmic** अंत:प्राकली

कोशिकेतील प्राकलात असलेली ( विविध कोशिकांगके ).

**— specific** अंतर्जातीय

एका जातीतील अनेक व्यक्तींत; (उदा. चालू असलेली स्पर्धा).

**— staminal** अंत:केसरी

सर्व केसरदलांच्या आतील बाजूस असलेले; ( उदा. वलयाकार प्रपिंड, बिम्ब, इ. )

**— stelar** अंतरंभी

रंभाच्या आतील बाजूस असलेले; पहा stele.

**— xylary** अंत:प्रकाष्ठी

प्रकाष्ठाच्या क्षेत्रात असलेले ( उदा. परिकाष्ठ ); अनित्य वाढीमुळे गारदळ, खाजकुइली यासारख्या वनस्पतींच्या खोडांत प्रकाष्ठ भागात परिकाष्ठाची बेटे ( पुंजके ) आढळतात.

**intricate** जटिल

गुंतागुंत असलेले ( उदा. जाळे, संरचना, इ. )

**introduced** आनीत

परठिकाणाहून आणून वाढविलेली ( वनस्पती ); उदा. तंबाखू, बटाटा, गुल्बुश, इ.

**introduction of plants** वनस्पतिप्रवेशन

नवीन वनस्पतींची लागवड करणे किंवा ती यदृच्छया आणली जाऊन तिची वाढ व प्रसार होणे.

**introrse** अंतर्मुख

आतील बाजूस उघडणारा; उदा. कमळाचा परागकोश; पहा extrorse.

**intussusception** कणाधान

पूर्वी असलेल्या पदार्थाच्या कणांमध्ये नवीन कणांचा प्रवेश. उदा. कोशिकावरणाच्या आकारमानात वाढ होण्याची एक प्रक्रिया.

**inulase** इन्यूलेज

इन्यूलिन नावाच्या स्टार्चसारख्या कार्बोहायड्रेट पदार्थाचे शर्करेत ( लेव्ह्युलोज ) रूपांतर करणारे वितंचक द्रव्य; हे सूर्यफूल कुलातील वनस्पतीत स्फटिकावस्थेत प्रथम आढळले होते; उदा. डेलियाची ग्रंथिल मुळे.

**invasion** आक्रमण

परकीय वनस्पतीचा नवीन प्रदेशात प्रवेश व तेथे स्थिर ( स्थायी ) होणे; यामध्ये तिचे झालेले स्थानांतरही अंतर्भूत आहे; पहा ecesis; colonisation.

**inverse ( inverted )** अधोमुख; व्यस्त

उलटे; बीजकरंध्र खाली व बीजकतल वर असलेले ( बीजक ); उदा. सूर्यफूल; पहा anatropous; obovate; obcordate; इ.

**inversion** व्युत्क्रम

स्थान किंवा क्रम उलटा होणे; उदा. कोशिकाविभाज-

नात, एखाद्या रंगसूत्राचा काही भाग उरलेल्याशी उलटा लागल्याने जनुकांचा क्रम बदलतो, यामुळे संततीतील लक्षणात फरक होतो.

**invertase** इन्व्हर्टेज; परिवितंचक

इक्षुजा ( इक्षु-शर्करा ) या सामान्य साखरेचे रूपांतर फलजा ( फ्रक्टोज ) व द्राक्षजा ( ग्लूकोज ) अशा दोन साखरेत करणारे वितंचक; या प्रक्रियेला पर्यसन ( इन्व्हर्शन ) म्हणतात.

**involucel** छदकमंडल

फुलोऱ्यातील लहान छदांचे बनलेले वर्तुळ; उदा. गाजराचा संयुक्त चामरकल्प फुलोरा; यामध्ये प्रत्येक साध्या चामराखाली छदकमंडल असते; पहा compound umbel; bracteole.

**involucre** १) छदमंडल; २) परिधान

(१) फुलोऱ्यातील (विशेषतः स्तबक व चामरकल्प) फुलांच्या गुच्छाखाली असलेल्या मुख्य अक्षावरचे छदांचे वर्तुळ; उदा. सूर्यफूल, गाजर, कोथिंबीर; गुलबुशाच्या परिदलाखाली संवर्तासारखे दिसणारे छदांचे वर्तुळ; पहा bract.

(२) शेवाळी वनस्पतींतील गंतुकधारीचे गर्भावरील आच्छादन; हे फुटून गर्भाची वाढ बीजुकधारीच्या स्वरूपात होते; अंदुककलशाचे आच्छादन (पिधानि) परिधानाच्या आत असते; पहा calyptra.

**involute** अंतर्वलित

कळीमध्ये वरच्या बाजूस वळलेल्या (गुंडाळलेल्या) पानाच्या किनारी ( कडा ); उदा. अळू व कमळ; येथे दोन स्वतंत्र सुरळ्या होतात व हा पर्णवलनाचा एक प्रकार आहे; पहा ptyxis.

**Iridaceae** केशर कुल; इरिडेसी

केशर, बाळवेखंड, ग्लॅडिओलस इत्यादी एकदलिकित वनस्पतींचे लहान कुल; याचा अंतर्भाव इरिडेलीझमध्ये (केशर गणात) करतात. प्रमुख लक्षणे : भूमिस्थित खोड, बिनदेठाची पाने; परिदले नेहमी दोन वर्तुळात सारखी नसतात; केसरदले तीन व सुटी, अधःस्थ किंजपुट; बोंड; इतर लक्षणे पलांडु कुलाप्रमाणे; पहा Liliaceae.

**irregular ( non-radial )** १) अनियमित; २) अरहीन

(१) आकार व आकारमान यामध्ये एखाद्या फुलातील एका मंडलातील पुष्पदले सारखी नसल्याने फुलाची समात्रता बिघडली असण्याचा प्रकार; उदा. कर्दळ.

(२) कोणत्याही उभ्या पातळीने कापले असता दोन समभाग न होणारे (फूल); उदा. निवडुंग; पहा asymmetrical.

**irritability** संवेदनक्षमता; संवेदनशीलता; चैतन्य

बाहेरून चेतवल्यामुळे प्रतिक्रिया दर्शविण्याची क्षमता; सर्व सजीवांचे प्रमुख लक्षण.

**isidium** उत्प्रवाल; इसिडियम

प्रवाळाप्रमाणे दिसणारी धोंडफुलावरील प्रजोत्पादक घडी किंवा वळी; ही अलग होऊन नवीन वनस्पती बनविते.

**iso—** सम-

सारखेपणा दर्शविणारा उपसर्ग.

**— bilateral** १) समद्विपृष्ठी; २) समद्विपार्श्व

(१) दोन्ही पृष्ठभाग सारखे असलेले ( पान ); उदा. केशर, बाळवेखंड, बेलमकँदा.

(२) एकमेकांशी काटकोन करणाऱ्या दोन उभ्या पातळ्यांनी विभागल्यानंतर प्रत्येक वेळी दोन सारखे अर्ध होणारे; मात्र एका पातळीने केलेले दोन अर्ध दुसऱ्यांनी केलेल्या अर्धाहून भिन्न असतात; उदा. अक्रोडाचे फळ.

**— chromous** समवर्णी

सारखा रंग असलेले.

**— cotylous** समदलिकित

सारखीच वाढ झालेल्या डाळिंब्या ( दलिका ) असलेले ( बी अथवा गर्भ ).

**— cyclic** समचक्रीय

फुलातील प्रत्येक वर्तुळात पुष्पदलांची संख्या सारखी असलेले ( फूल ); उदा. पपई.

**— diametric** समव्यासीय

सर्वत्र सारखा व्यास असलेले ( खोड किंवा कोशिका ).

**— — cell** समव्यासीय कोशिका

केंद्रातून जाणारी प्रत्येक रेषा साधारणतः सारख्याच मापाची असलेली कोशिका; उदा. मृदूतकातील कोशिका; पहा parenchyma.

**— gamete** समगंतुक

सारख्या दिसणाऱ्या लैंगिक प्रजोत्पादक कोशिका; उदा. शैवले व कवक यांपैकी काही वनस्पती.

**— gamous** समगंतुकी

सारख्या प्रजोत्पादक कोशिका असणारी ( वनस्पती ).

**— gamy** समयुति
सारख्या प्रजोत्पादक कोशिकांचे मीलन ( संयोग ).

**— lation** विलगीकरण; विलगन
अलग करण्याची प्रक्रिया. उदा. रोगट वनस्पती किंवा रोगबीज यांना इतरांपासून वेगळे ठेवणे.

**— meric** समभागी
भिन्न वर्तुळातील पुष्पदलांची संख्या सारखी असलेले ( फूल ); उदा. घोत्रा.

**— osmotic** समतर्षक
सारखाच तर्षण– दाब उत्पन्न करणारे ( दोन अथवा अधिक विद्रव ); आत व बाहेर सारख्याच प्रकारे विसृत होणारे.

**— phyllous** समपर्णी
स्वरूप व विस्तार या दृष्टीने सारखी पाने असलेले.

**— planogamete** समचरगंतुक
हालचाल करणारी पण सारख्या आकाराची प्रजोत्पादक कोशिका;

**— sporous** समबीजुकी
सर्व सारखी बीजुके प्रसवणारी (वनस्पती); उदा. एक्विसीटम.

**— spory** समबीजुकत्व
एकाच प्रकारची बीजुके निर्मिण्याचा गुण.

**— staminous ( stemonous )** समकेसरी
(१) संदले व प्रदले यांच्याइतकी केसरदलांची संख्या असलेले (फूल); उदा. घोत्रा, नागदौना, इ.
(२) फुलातील सर्व केसरदले सारखी असलेले [फूल].

**— styly** समकिंजलत्व
एका जातीतील भिन्न वनस्पतींच्या फुलांमध्ये सारख्या उंचीची किंजले असण्याचा गुण; पहा heterostyly.

**— type** समस्वरूप; समप्ररूप
भिन्न देशांत सारखेच स्वरूप असणारी विशिष्ट वनस्पती.

**Isoetales ( Quillworts )** शलपर्ण गण; आयसॉएटेलीझ.
नेचाभ पादपापैकी ( वाहिनीवंत अबीजी वनस्पतींपैकी ) लायकोपोडिनी ( मुद्गल शेवाळी ) वर्गातील हा एक गण असून यामध्ये प्राचीन ( जीवाश्मरूप ) व विद्यमान वनस्पतींच्या दोन कुलांचा ( अनुक्रमे प्ल्युरोमिएसी व आयसॉएटेसी ) अंतर्भाव होतो. या वनस्पती ओषधीय असून खोडात द्वितीयक वाढ असते. अनेक आगंतुक मुळांचा उगम खोडाच्या तळाशी असलेल्या मूलदंडापासून होतो; पाने जिव्हिकावंत व लहान असून बीजुकधारीवर बीजुकपर्णे दोन प्रकारची असतात; काहीत बीजुकपर्णे निश्चित शंकूवर आणि बीजुककोश अक्षविमुख बाजूस ( प्ल्युरोमिएसी ) किंवा बीजुककोश अक्षसंमुख बाजूस असून ( आयसॉएटेसी ) शंकूचा अभाव असतो. फक्त आयसॉएटिस या विद्यमान वंशात रेतुके बहुप्रकेसली ( केसाळ ) असतात; जीवाश्मरूप वंश आयसॉएटाइटस आणि विद्यमान शलपर्ण ( आयसॉएटिस) वंश (शलपर्ण = Quillwort ) हे आयसॉएटेसी कुलात तर प्ल्युरोमिया वंश प्राचीन प्ल्युरोमिएसी कुलात समाविष्ट केले आहेत; पहा Lycopodinae.

**isthmus** संयोजक
कोशिकेच्या दोन सारख्या अर्धांना जोडणारा नळीसारखा भाग; उदा. डेस्मिड; इस्थमिया करंडक वनस्पती; पहा Diatomaceae.

## J

**jacket initial** आद्यवेष्टी ( कोशिका )
जिच्यापासून पुढे रेतुकाशयाचे आवरण बनते, अशी प्रारंभिक कोशिका.

**jacket layer** वेष्टनस्तर
रेतुके निर्माण करणाऱ्या कोशिकाभोवती असलेला प्रारंभिक संरक्षक थर.

**jaculator ( a darter )** उत्क्षेपक; अंकुशाभ
काही फळातील बीजकाधानीवरचा बीज सुटून फेकणारा आकड्यासारखा भाग (उपांग); उदा. वासक कुलातील वनस्पती; पहा Acanthaceae.

**Jasmine** जॅस्मिन
जॅस्मिनम या शास्त्रीय वंशनावाने ओळखल्या जाणाऱ्या वेली; उदा. चमेली, जाई, जुई, मोगरा इ.

**jel** जेल
पाण्यात न विरघळता निलंबित अवस्थेत राहिलेली सूक्ष्म घनकणांची अवस्था. विरघळलेली ( बिलीन ) अवस्था ही विद्रवी अथवा ' सोल ' ( sol ).

**jelly** जेली; अवलेह; थलथली
वर वर्णन केल्याप्रमाणे असलेला पदार्थ; उदा. काही फळांचा किंवा वनस्पतींच्या इतर भागांचा किंवा काही समुद्र शैवलांचा उपयोग करून उदा. (अगार) बनविलेला पदार्थ; जेलीतील पाण्याचा अंश कमी होत जाऊन

ती घट्ट बनत जाते; फ्रूट–जेली; आइस्क्रीम-जेली; औषधी अवलेह, इ. थलथलीत पदार्थ.

**Jelly-fungi (Tremellales)** अवलेह-कवक गण; जेली फंजाय

थलथलीत शरीरं असलेले कवक; सत्यकवक उपवर्गात यांचा समावेश होतो; पहा Eubasidii.

**joint** संधि; पर्व

सांधा; पेरे; दोन स्वतंत्र अवयवांना जोडणारा भाग. रेषा, कंगोरा किंवा फुगीरपणामुळे हा ओळखू येतो.

**jointed (articulated)** संधियुक्त; पर्वयुक्त

पेरेदार; पेरी किंवा संधी स्पष्ट असणारा; उदा. ऊस, बांबू इत्यादींची खोडे; एक्किसीटम; कारा शैवल.

**jugum** जोडी; युगुल

उदा. अंजनाचे दोन दलांचे संयुक्त पान; कोशिकेच्या प्रकलातील रंगसूत्रांची जोडी.

**Juglandaceae** अक्षोट (अक्रोड) कुल; जुग्लँडेसी

ह्या द्विदलिकित वनस्पतींच्या लहान कुलाचा अंतर्भाव अक्षोट गणात (जुग्लँडेलीझ) केला जातो; नतकणिशे (लोंबते कणिश फुलोरे) धारण करणाऱ्या वनस्पतींच्या गणात (ॲमेंटिफेरी) पूर्वी समावेश असे, परंतु त्यातील इतर कुलातील वनस्पतींची लक्षणे प्रारंभिक की ऱ्हसित हे विवाद्य आहे. प्रमुख लक्षणे : वृक्ष; एकाआड एक सोपपर्ण पाने; स्वतंत्र फुलोऱ्यावर दोन प्रकारची एकलिंगी फुले. परिदले ४ किंवा ५; नर फुलात ३–४० केसरदले; स्त्री-फुलात दोन अधःस्थ जुळलेल्या किंजदलांचा, एक कप्प्याचा व एकच बीजक असलेला किंजपुट; तल्युती (जुग्लॅन्स वंशात); वायुपरागण; कपाली किंवा आठळी फळ; अपुष्क बी.

**juice** रस

वनस्पतींच्या भिन्न अवयवात साठविलेला व सहज दाबाने निघणारा किंवा जखमेतून वाहणारा पातळ पदार्थ; चीक या नावाने असणाऱ्या पदार्थाची सामान्य संज्ञा; तथापि त्याहून काही अंशी भिन्न; उदा. उसाचा रस हा चीक नव्हे परंतु केळीच्या खोडातून येणारा रस हा चीक असतो; पहा latex.

**juicy** रसाळ

रसयुक्त अवयव किंवा उपांग; उदा. संत्री, काकडी, डाळिंबे, द्राक्षे ही रसाळ फळे; उसाचे खोड व कोरफडीचे पान हे रसाळ अवयव होत.

**juliform** नतकणिशाभ

लोंबत्या कणिशाप्रमाणे; उदा. शमी (*Prosopis juliflora* DC.); पहा amentum, catkin.

**Juncaceae** प्रनड कुल; जुन्केसी

जुन्कस (प्रनड), लुझुला इत्यादी शास्त्रीय नावाच्या वंशांतील वनस्पतींचे एकदलिकित कुल; याचा समावेश एंग्लर व प्रँटल यांनी पलांडु गणात (लिलिफ्लोरी) केला असून याचे पलांडु कुलाशी (लिलिएसी) आप्तभाव व अनेक बाबतीत साम्य आहे. हचिन्सन यांनी प्रनड गणात (जुन्केलीझमध्ये) अंतर्भाव केला आहे. इंग्रजीत ह्यातील वनस्पतींना रशेस (Rushes) म्हणतात. प्रमुख लक्षणे : गवतासारख्या व दलदलीत वाढणाऱ्या वनस्पती; द्विलिंगी, त्रिभागी, वायुपरागित फुले; खवल्यासारखी हिरवट परिदले; परागकणांचे चौकडे; तीन लांबट किंजल्क व त्यावर पुरळ; एक किंवा तीन कप्प्यांचा ऊर्ध्वस्थ किंजपुट; सपुष्क बियांचे बोंड.

**jungle** जंगल

भारतातील दाट झाडी पण वॉर्मिंग यांच्या मते रुक्ष वनासारखी भरपूर गवते असलेली; झुडपे अधिक असल्यास 'खुरटे जंगल'; भरपूर पाऊस असल्यास वृक्ष अधिक व दाट (गर्दीने) वाढल्यास 'घन जंगल' म्हणतात.

**jute** ज्यूट; ताग; पाट

ताग (*Corchorus capsularis* L. व *C. olitorius* L.) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वनस्पतींतील धागे; सुतळी व पोती बनविण्यास वापरतात.

**juvenile** नवजात

काही वनस्पतींची अथवा त्यांच्या अवयवांची आरंभीची अवस्था; काहींत हे पहिले स्वरूप नंतर बदलते; विशेषतः आरंभीची पाने (बालपर्णे) व नंतरची पाने यात फरक आढळतो; उदा. नेफ्रोलेपिस नेचा, निंब, चीड (चिल *Pinus longifolia* Roxb.).

**juvenile leaf** बालपर्ण

आरंभी येणारे पान; कित्येक संयुक्त पाने प्रथम साधी असून काही अंशतः विभागलेल्या पानांची पाती प्रथम तशी नसून अखंड किंवा फारच कमी विभागलेली असतात.

**juxtaposition** निकटस्थिती; सान्निध्य

अवयवांचे परस्पराशी संबंधित असलेले स्थान अथवा निकटपणा.

## K

**K** के **K**
पुष्पसूत्रात संवर्ताबद्दल वापरलेले अक्षर; पहा floral formula; calyx.

**Karyo-** प्रकल
कोशिकेतील नियंत्रक बिंदू ( भाग ), या अर्थी उपसर्ग.

**karyogamete** गंतुक-प्रकल
प्रजोत्पादक कोशिकेतील प्रकल; पहा nucleus.

**karyogamy** प्रकलयुति
दोन प्रकलांचा ( विशेषतः गंतुकातील प्रकलांचा ) संयोग.

**karyokinesis** प्रकल विभाजन
एका ( द्विगुणित ) कोशिकेची दोन कोशिकात सम-विभागणी होते वेळी त्यातील प्रकलांत होणारे अनेक बदल व त्यानंतर त्यांची सारख्याच घटकात विभागणी; पहा mitosis.

**karyology** प्रकलविज्ञान
प्रकलासंबंधी सर्व अधिकृत ज्ञान.

**karyolymph** प्रकलमातृक
प्रकलातील जालकात असलेले आधारद्रव्य.

**karyolysis** प्रकल-विलयन
प्रकलाचे अंशतः अगर पूर्णतः कोशिकेतील द्रव्यात रूपांतर.

**karyoplasm** प्रकलद्रव; प्रकलरस
पहा nucleoplasm.

**karyoplast** प्रकल
पहा nucleus.

**karyosome** (१) प्रकलकणसमूह; (२) प्रकल; (३) रंगसूत्र; (४) प्रकलक
(१) प्रकलातील अनेक घन व सूक्ष्मकणांचा पुंजका.
(२) पहा nucleus;
(३) पहा chromosome.
(४) प्रकलातील ( स्थिर अवस्थेत ) एक विशिष्ट बिंदूसारखे कोशिकांगक; पहा nucleolus.

**karyotype** सूत्रसमूहचित्र
निकट संबंध असलेल्या वनस्पतींच्या गटातील शरीराच्या कोशिकेतील रंगसूत्रांचे आकार, आकारमान, संख्या इत्यादी दर्शविणारा आकृतीबंध. (चित्र).

**katabolite** अपचयज
अपचयात निर्माण झालेले पदार्थ; उदा. वायू, पाणी.

**katabolism** अपचय
शरीरातील अन्न अथवा तत्सम जटिल पदार्थ यांचे साध्या पदार्थांत रूपांतर करण्याची विध्वंसक प्रक्रिया; यामध्ये उर्जेचे उत्पादन होऊन ती उपयोगात येते. ऊर्जा व कार्बन डायॉक्साईड साखरेच्या रूपांतराने मिळतात.

**katalase** कॅटॅलेज
तंबाखूच्या ताज्या पानात आढळणारे वितंचक.

**keel (carina)** १) प्रदलांजली; २) नौकातल; कटक; भाढे; कणा
(१) नावेप्रमाणे किंवा ओंजळीसारख्या आकाराची फुलातील जोड पाकळी; (उदा. वाटाणा, अगस्ता);
(२) नावेच्या तळाशी असलेली व पाण्यात बुडलेली उभी कोर; संदलावर, तुसावर किंवा पाकळीवर बाहेरील बाजूस असलेली तशी कोर किंवा तसा कटक.

**keeled (carinate)** १) नौकातलित; कटकित; २) प्रदलांजलित
(१) नौकातलाप्रमाणे कटक असलेले;
(२) नावेप्रमाणे आकृती असलेले.

**kernel** गाभा
बीज अथवा बीजक यातील आवरणाशिवाय सर्व भाग.

**ketone** केटोन
उडून जाणाऱ्या (बाष्पनशील) एका तेलाचे नाव; उदा. कापूर.

**key** (१) किल्ली; उकल; (२) किल्ली फळ
(१) वंश, जाती, कुल इत्यादींसंबंधी वनस्पतींच्या वर्गीकरणामध्ये उपयोगात आणलेल्या वैकल्पिक गुणांची किल्लीच्या आकाराची संक्षिप्त जंत्री; हिच्या साहाय्याने एखाद्या वनस्पतीचे वर्गीकरणातील स्थान निश्चित करता येते.
(२) सपक्ष फळ; उदा. सिकॅमूर; ॲश.

**kidney-shaped (reniform)** वृक्काकृति
मूत्रपिंडाच्या (किंवा काजूफळाच्या आकाराचे), लंबगोल व एका बाजूस मध्ये खाच असलेले; उदा. ब्राह्मीचे पान.

**kind** प्रकार
सामान्यपणे निश्चित लक्षणांमुळे ओळखता येणाऱ्या एखाद्या वनस्पतीच्या जातीतील वा उपजातीतील भेदयुक्त वनस्पती; उदा. द्राक्षातील भिन्न प्रकार; गुलाबातील प्रकार इ.

**kinesis** हालचाल; गति; बदल

कोशिकेतील जीवद्रव्य व त्यातील कमी अधिक सूक्ष्म पदार्थ यांच्या हालचाली, स्थलांतर इत्यादी क्रिया.

**kinetic energy** गतिज ऊर्जा

वस्तूला गति मिळणारी अथवा हालचाल करण्यास उपयुक्त अशी कार्यान्वित झालेली शक्ति.

**kingdom** कोटी

सजीवांच्या वर्गीकरणात प्राणी किंवा वनस्पती यांपैकी कोणत्याही एका प्रकारच्या व्यक्तींचा सर्वात मोठा संच दर्शविणारी संज्ञा.

**kino** विखदिर

पाण्यात विरघळणारा, स्तंभक, औषधोपयोगी, राळेसारखा पदार्थ; कातडी कमाविण्यासही उपयुक्त; पळस, निलगिरी, बिबळा इत्यादींत आढळतो.

**— plasm** सूत्रकल

कोशिकेतील जीवद्रवाच्या विभागणीमध्ये त्यातील तर्कूच्या सूत्रात रूपांतर होणारा भाग;
पहा mitosis.

**— spore** चरबीजुक

समविभाजनाने बनलेले व हालचाल करू शकणारे बीजुक.

**knee** जानु; गुडघा

(१) खोडावर अचानक गुडघ्याप्रमाणे आलेला बाक;
(२) काही झाडांच्या मुळापासून जमिनीवर झालेली वाढ; हिचा उपयोग हवा शोषून घेण्यास होतो. उदा. तिवार.

**knob** गुंडी; गुळुंब

बारीक दांड्याचे गोलाकृती टोक.

**knot** ग्रंथि; गाठ

खोडावरचा फुगीर उंचवटा, अगर पेरे; गाठीसारखे खोड (उदा. बटाटा, कारंदा, इ.); पहा tuber.

**knotted (knotty)** ग्रंथिल; गाठाळ

गाठी असलेले (खोड, मूळ, इ. अवयव).

**kolla-plankton** श्लेष्मप्लवक

बुळबुळीत पदार्थाने वेढलेला व तरंगणारा जीवसमूह; उदा. काही निळी हिरवी शैवले.

## L

**labellum** पुष्पोष्ठ; ओष्ठक

बहुधा पसरट व मोठी उंचवट्यासारखी पाकळी; उदा. कर्दळ, आमरे, आले, आरारूट, सुवर्णपुष्प इ.

**labiate** (१) ओष्ठाकृति; (२) ओष्ठवंत; ओष्ठी

(१) एक किंवा दोन (वरचा व खालचा) ओठ असलेल्या तोंडाप्रमाणे;
(२) ओठ असलेला (पुष्पमुकुट, संवर्त).

**Labiatae (Lamiaceae)** तुलसी कुल; लॅबिएटी (लॅमिएसी)

तुळस, सब्जा, पुदीना, फांगळा, पाच, दीपमाळ, माइनमूळ, सॅल्व्हिया इत्यादी परिचित द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा अंतर्भाव बेसी व हचिन्सन यांनी लॅमिएलीझ गणात केला आहे; प्रमुख लक्षणे : चौकोनी खोडाची क्षुपे व ओषधी; पाने व खोडावर तैलप्रपिंडे; पाने साधी, समोरासमोर; लहान पुंजक्यासारखे अनेक फुलोरे असलेले मोठे फुलोरे. संवर्त व पुष्पमुकुट दोन ओठासारखे (द्वयोष्ठक); केसरदले चार किंवा दोन व पाकळ्यास चिकटलेली; ऊर्ध्वस्थ, दोन किंजदलांच्या किंजपुटात चार कप्पे व प्रत्येक कप्प्यात एक बीजक; किंजाच्या तळातून किंजलाचा उगम असून फळात (चार कपालिकात) चार बीजे असतात.

**labile gene** परिवर्ती जनुक

सहज बदलणारा किंवा नाश पावणारा रंगसूत्रातील घटक.

**labium** अधरोष्ठ

खालचा ओठ किंवा तत्सम अवयव.

**labrum** उत्तरोष्ठ

वरचा ओठ किंवा तत्सम अवयव.

**labyrinthiform** जटिल; गूढ

वेडीवाकडी संरचना असलेला; नागमोडी रेषा असलेला.

**lac** लाख

लाखेच्या किड्यांच्या कातडीतून बाहेर पडणारा राळेसारखा पदार्थ.
हे किडे पळस, क्रोटन व वडाच्या वंशातील अनेक जातीवर वाढतात.

**lacerate** विदारित; विदीर्ण

खोलवर अनियमितपणे फाटल्याप्रमाणे; उदा. केळीचे पान; काही नेचांचे बीजुककोशावरचे आच्छादन (पुंजत्राण); भामुर्डी (*Blumea lacera* DC.).

**laciniate** संदीर्ण; विच्छिन्न

झालरीप्रमाणे अरुंद भाग पडलेले (पान); उदा. तिळाच्या वंशातील एक तण वनस्पती (*Sesamum laciniatum* L.).

**lacrima** श्लेष्माश्रु; चिक्कणाबिंदु
झाडातून पाझरणाऱ्या डिंक किंवा राळ यासारख्या चिकट द्रव्याचे थेंब.

**lactase** लॅक्टेज
दुग्धशर्करेचे रूपांतर करणारे वितंचक; त्यापासून दुग्धाम्ल ( लॅक्टिक ॲसिड ) बनते.

**lactose** दुग्धशर्करा; लॅक्टोज
दुधातील विशिष्ट साखर.

**lacuna** (१) रिक्तिका; (२) गर्तिका; (३) रिक्तमार्ग
(१) कोशिकांच्या समूहातील मोकळी जागा.
(२) दगडफुलाच्या शरीरावरील खाच.
(३) खोडातील वाहक वृंदातील पोकळी; उदा. बंधकतृण (Equisetum ).

**lacunar tissue** सुविरल ऊतक; पोकळयुक्त ऊति
अनेक रित्या जागा ( पोकळ्या ) असलेला पेशींचा ( कोशिकांचा ) समूह; पहा aerenchyma.

**lageniform** तुंबाकृति
खाली (तळाशी) फुगीर व तेथून अरुंद नळीसारखे होत आलेले; दूधभोपळ्यासारखे; त्यावरून त्याचे नाव (*Lagenaria leucantha* Rusby; Bottle gourd).

**Lamarckism** लामार्कची उपपत्ति
नवीन जातींच्या उत्पत्तीसंबंधीचा फ्रेंच प्राणिशास्त्रज्ञ जे. बी. लामार्क यांचा सिद्धांत : बाह्यपरिस्थितीचा सजीवांवर होणारा प्रत्यक्ष परिणाम पुढच्या पिढीत उतरून सजीवांच्या विद्यमान जातींत फरक पडतो व परिस्थितीशी समरस होणाऱ्या नवीन जाती उदयास येतात. याला प्रायोगिक पुरावा नसल्याचे औगुस्त वाइझमान यांनी दाखविल्याने अशी कल्पना स्वीकारली गेली नाही; परंतु अलीकडे नव लामार्कवादी शास्त्रज्ञांनी परिस्थिती आणि जातींचे अनुयोजन लक्षात घेऊन निराळ्या स्वरूपात लामार्कांच्या उपपत्तीस पाठिंबा व्यक्त केला आहे. पहा Neo–Lamarckism.

**lamella** पटल
पातळ पडदा, खवला अथवा तत्सम उपांग;
उदा. भूछत्रे; कोशिकाविभाजन.

**—, middle** मध्यपटल
परस्पराशी चिकटून असलेल्या दोन नवकोशिकांमधील प्रारंभी बनलेला पेक्टिक पदार्थाचा पातळ पडदा; ह्यावर दोन्ही बाजूंनी नंतर तूलीराचे थर बसून कायम स्वरूपाचे कोशिकावरण बनते.

**lamellar** पटलयुक्त
पातळ पडदे असलेले; उदा. भूछत्र; पहा Gill-fungi; Agaricales.

**lamelliform** पटलरूप
पातळ पडदा अगर खवला यांसारखे.

**Lamiaceae** तुलसी कुल; लॅमिएसी
पहा Labiatae.

**lamina ( blade )** पाते; पत्र
पानाचा सपाट किंवा पसरट भाग; क्वचित हा निमुळता अरुंद किंवा सुईसारखा असतो व कधी देठ अगर खोड पात्यासारखे असतात;
पहा phyllode, phylloclade, oladode.

**laminated** ( १ ) पत्रयुक्त; ( २ ) अनेकपत्री
१ ) पाते असलेले; २ ) अनेक पात्यासारखे भाग असलेले.

**— bulb** प्रावृत कंद
पहा bulb.

**Laminarietum** लॅमिनेरिया-संघात
फक्त लॅमिनेरिया नावाच्या शैवलाचा समुद्रातील विशिष्ट ठिकाणी आढळणारा समुदाय.

**lana** ऊर्णा; लोकर
वनस्पतींच्या अवयवांवर कधी कधी आढळणारे लोकरीसारख्या मऊ व बारीक केसांचे आवरण.

**lanate** ऊर्णायित; ऊर्णामय
लोकरीसारख्या केसांचे आच्छादन असलेले; उदा. ऐसर ( ईश्वर; *Calicarpa lanata* L. ).

**lanceolate** कुंतसम; कुंताभ
भाल्यासारखे; तळाशी अरुंद, मध्ये रुंद व टोकाकडे निमुळते होत गेलेले; उदा. पांढरा चाफा (पान); कुरासना ( *Pluchea lanceolata* Oliv. & Hien.).

**land** भू ; भूमि; क्षेत्र; स्थल; प्रदेश
जमीन, शेत इत्यादी अनेक अर्थांनी ही संज्ञा वापरतात.

**larval** डिंभकीय; डिंभी
वनस्पतीच्या सुप्तावस्थेतील भागासंबंधी; उदा. अर्गट या कवकाची निष्क्रिय अवस्था ( ग्रीष्मावस्था ). काही शंकुमंत वनस्पतींच्या प्रारंभिक अवस्थेबद्दल; काही प्राण्यांच्या विकासावस्थेसंबंधी.

**lasiocarpous** लोमश फलधारी
लवदार फळ असलेले.

**latency** (१) अप्रकटत्व; (२) सुप्तता

(१) गुप्त रीतीने असण्याचा किंवा प्रत्यक्ष उघडपणे न दिसण्याचा प्रकार ( गुण ); काही आनुवंशिक लक्षणे एका पिढीत न दिसता त्यापुढील पिढीत दिसतात;
(२) चेतनेच्या अभावी क्रिया न दर्शविण्याचा गुण ( प्रकार ); अनुकूल परिस्थितीच्या अभावी बियांना अंकुर न फुटणे.

**late** उत्तर

नंतरची; उशिरा आलेली ( उदा. कळी ).

**latent** अप्रकट; सुप्त

पहा dormant; recessive.

**— bud** सुप्तकलिका; सुप्तकोरक

भावी कालात उमलणारी कळी.

**— factor** सुप्त कारक; सुप्त घटक.

उघडपणे न दिसणाऱ्या एखाद्या लक्षणाबद्दल जबाबदार असलेला रंगसूत्रातील घटक ( जनुक ).
पहा factor.

**— period** (stage) सुप्तावस्था; सुप्तकाल

प्रकटावस्थेपूर्वीची अवस्था; चेतकाची क्रिया सुरू झाल्यापासून प्रतिक्रिया दिसण्यापर्यंतचा काळ.

**later** अत्युत्तर; विलंबित

अधिक नंतर ( उशिरा ) आलेली ( फुले, पाने ); अधिक नंतरची अवस्था.

**lateral** पार्श्व; पार्श्विक; पार्श्वीय

वनस्पती अगर प्राणी यांच्या शरीराच्या अथवा एखाद्या अवयवाच्या मुख्य अक्षाच्या बाजूस असलेले; उदा. बगलेतील कळ्या.

**— branching** पार्श्वशाखाबंध

मुख्य अक्षाच्या बाजूवरील कळ्या वाढून बनलेल्या फांद्यांची मांडणी.

**— meristem** पार्श्विक विभज्या

खोडाच्या अथवा मुळाच्या बाजूस पण शरीरात असलेले व सतत विभागणीने नवीन कोशिकासमूह ( ऊतक ) बनविणारे ऊतक; उदा. त्वक्षाकर; वाहक वृंदातील ऊतककर इ.
पहा cork cambium; cambium.

**— movement** पार्श्विक हालचाल

बाजूकडे होणारी हालचाल.

**— support** पार्श्वाधार

बाजूने मिळणारा आधार.

१६

**— view** पार्श्वदर्शन ( दृश्य )

बाजूने दिसणारा भाग.

**laterality** (symmetry) समात्रता; पार्श्वता

विभागणीनंतर दोन किंवा अनेक सारखे अर्ध होण्याची क्षमता; पहा symmetry.

**laterifolious** पर्णपार्श्विक

पानाच्या तळाशी परंतु बाजूस उगवलेले (उदा. उपपर्ण, शल्कपर्ण, कटक, इ. ).

**laterinervis** (laterinervius) पार्श्वसिराल

पात्याच्या तळापासून टोकापर्यंत सरळ ( बाजूच्या ) शिरा असणारे; उदा. गवताचे पान.

**lateristipulus** पार्श्वोपपर्णी

देठाच्या बाजूस उपपर्णे असलेले; उदा. गुलाबाचे संयुक्त पान.

**latex** चीक

काही वनस्पतीत आढळणारा व बहुधा चिकट दुधासारखा पांढरा, किंवा पातळ, पांढरट किंवा पिवळट रस; उदा. वड, केळ, कोकम, रबर, अफू, इ. यांमध्ये अनेक खनिजे, कार्बनी द्रव्ये, ( मेद, शकरा, स्टार्च इ. ), क्वचित विषारी व दाहक पदार्थ इत्यादी आढळतात.

**laticiferous cell** चिकाळ कोशिका

चिकाचा संचय करणारी कोशिका ( बहुप्रकली व शाखित ); उदा. शेर, शेंड, पानचेटी, व काही निवडुंगाच्या जाती.

**— vessel** चिकाळ वाहिनी

चिकाचा संचय करणारी व चीक पसरविणारी शाखित वाहिनी; उदा. पिवळा धोत्रा, अफू, दुधळ, पाथरी, इ.

**— tissue** चिकाळ ऊतक

चिकाळ घटकांचा समूह.

**latifoliate** (latifolius) विस्तृतपर्णी

रुंद पाने असलेले; उदा. धावडा (*Anogeissus latifolia* Wall.); घोगर (*Gardenia latifolia* Ait).

**Lauraceae** तमाल कुल; लॉरेसी

पिसी, मैदालकडी, तमाल, दालचिनी, कापूर, लॉरेल, ॲव्होकॅडो इत्यादी द्विदलिकित उपयुक्त वनस्पतींचे कुल. याचा अंतर्भाव एंग्लर व प्रँटल यांनी आणि बेसींनी मोरवेल गणात (रॅनेलीझमध्ये) केला आहे. प्रमुख लक्षणे : एकाआड एक, सोपपर्ण व चिवट पानांचे वृक्ष व झुडपे; तैल-नलिकायुक्त अवयव; अरसमात्र, अप्रदल, त्रिभागी,

द्विलिंगी किंवा एकलिंगी फुले; परागकोश झडपांनी उघडतात. किंजदले १–३; ऊर्ध्वस्थ किंजपुटात एक कप्पा व एक बीजक; मृदुफळात अपुष्क बीज.

**lavender** लॅव्हेंडर

( १ ) फिकट निळसर करड्या रंगाचे; उदा. *Lavandula vera* DC. या वनस्पतीच्या फुलासारखे;

( २ ) लव्हेंडर नांवाचा सुवासिक अर्क हिच्या फुलांपासून काढतात.

**Law of Ancestral heredity** पैतृक आनुवंशिकतेचा नियम

सर्वसाधारणपणे कोणाही व्यक्तीच्या आनुवंशिक गुणांमध्ये आई-बाप, दोन आजी-आजोबा, चार पणजी-पणजोबा वगैरे पूर्वजांचा वाटा हा अनुक्रमे ·५, ·२५, ·१२५ इत्यादी भूमितिश्रेणीच्या आकड्यांच्या बेरजेइतका असतो असा गॉल्टनचा नियम. संततीचे भिन्न पितरांशी साम्य यामुळे दिसून येते व सर्वसाधारणपणे त्या त्या प्रमाणात ते असू शकते.

**Law of Filial regression** संतानीय परागतीचा नियम

सरासरीने पाहता, असे आढळले आहे की, सर्वसाधारणपणे विशिष्ट जातीच्या ( species ) जीव समुदायामध्ये एखाद्या आनुवंशिक गुणाच्या बाबतीत आईबापांच्या सर्वसामान्य पातळीपासून त्यांची मुले त्यांच्यापेक्षा कमी ढळतात; म्हणजेच मुले ( प्रत्येक पिढी ) शक्यतो सर्वसामान्य पातळीच्या आसपास राहतात; यामुळे सर्वसाधारणतः जीवांमधील आनुवंशिक गुणांचे सरासरी मान विशिष्ट मर्यादेपलीकडे जाऊ शकत नाही; मात्र ते उत्परिवर्तनानेच जाऊ शकते; पहा mutation.

**Law of Inheritance** अनुहरणाचा नियम

आईबापांचे काही गुण संततीत फरक पावून किंवा तसेच उतरण्याबाबतची निश्चितता दर्शविणारी घटना ( नियम ); पहा Mendelism.

**lax** शिथिल; विरल

थोड्या फांद्या व फुले यामुळे फुलोऱ्यातील घनतेचा व दृढपणाचा अभाव दर्शविणारी मांडणी.

**layer** स्तर; थर; पदर

**— society** स्तर संहति; स्तर समाज

वनश्रीतील अनेक भिन्न थरांमध्ये आढळणारा व एकाच थरापुरता मर्यादित लहान समुदाय; पहा society.

**layering** दाबकलम प्रक्रिया

झाडाची फांदी वाकवून व जमिनीवर दाबात ठेवून मुळे फुटल्यावर ती अलग करणे व अशा प्रकारे नवीन वनस्पतीचे कलम तयार करणे.

**leaching** अपक्षालन; निक्षालन

जमीन धुपून जाऊन त्यामुळे पोषक द्रव्ये कमी होण्याची प्रक्रिया; बांध घालणे आणि गवत व झाडझाडोरा वाढू देण्याने जमिनीस स्थैर्य प्राप्त होते.

**leaf** पर्ण; पान

वनस्पतीच्या खोडापासून उगम पावून बहुधा बाजूस मर्यादित वाढ होणारा हरितद्रव्ययुक्त अवयव; मूलतः मर्यादित शाखा; परंतु अन्ननिर्मितीकरिता विशेषत्व पावलेला प्रमुख अवयव.

**— — apex** पर्णाग्र

पानाचे टोक.

**— — arrangement** पर्णविन्यास

पहा phyllotaxis.

**— — base** पर्णतल

पानाच्या पात्याचा ( देठ नसल्यास ) अथवा देठाचा खोडास सांधणारा तळभाग.

**— — blade** पाते; पत्र

पहा lamina.

**— — blister** पर्णविस्फोट

विशिष्ट कवकामुळे पानावर आलेला फोडासारखा भाग.

**— — blotch** पर्णकलंक; टिक्का

काही विकृतीमुळे पानावर येणारा काळपट किंवा गर्द पिंगट डाग; उदा. भुईमूग, बटाटा.

**— — bud** कोरक; पानकळी

अविकसित (अत्यंत अपूर्ण अवस्थेतील) प्ररोह (खोड व पाने यांची प्राथमिक अवस्था).

**— — climber** पर्णारोहिणी

पानाच्या रूपांतरित साधनाने चढत जाणारी वेल; उदा. मोरवेल, कळलावी.

**— — cushion (pulvinus)** पुलवृंत

पानाच्या देठाच्या तळाशी असलेला फुगीर भाग; बहुधा पानाच्या हालचालीस मदत करणारा अवयव; उदा. लाजाळू, संकेश्वर इ.

**— — cycle** पर्ण-सर्पिलिका

खोडावरील पानांच्या एकाआड एक मांडणीत, एका उभ्या रांकेत व एकावर एक असलेल्या दोन पानांच्या

व त्यामधल्या इतर पानांच्या तळातून खोडाभोवती जाणारी कल्पित रेषा; पहा angle of divergence.

**— - fall** पानगळ; पानझड; पर्णगलन
परिस्थित्यनुसार सर्व पाने एकाचवेळी निसर्गतः गळून पडण्याचा प्रकार; जीवनचक्रातील तालबद्धतेचा एक प्रकार; पहा abscission.

**— - gap** पर्णविवर
पहा foliar gap.

**— - scar** पर्णकिण
पान पडून गेल्यावर मागे खोडावर राहिलेली स्पष्ट खूण ( वण ); उदा. पपईचे खोड.

**— - scorch** दग्धपर्ण
काही कवकांच्या उपद्रवामुळे पान भाजल्यासारखे दिसणे.

**— - sheath** पर्णावरण
पानाच्या तळाचे खोडाभोवती असलेले वेष्टन; उदा. कर्दळ, गवत, केळ, इ.

**— - spine** पर्णशल्य
पानाचे काट्यात झालेले रूपांतर; उदा. नागफणा.

**— - spot** पर्णांक
रोगामुळे पानावर पडलेला ठिपका.

**— - stalk ( petiole )** पर्णवृंत; देठ
पानाच्या पात्याला खोडाशी सांधणारा अवयव.

**— - tendril** पर्ण-प्रतान
पानाच्या कोणत्याही भागाचे किंवा सर्व पानाचे ताण्यात रूपांतर; उदा. मोरवेलीचे देठ; वाटाण्याच्या संयुक्त पानाची दले; कळलावीच्या पानाचे टोक; कलशपर्णी ( नेपेंथस ) ची मध्यशीर इ.

**— - trace** पर्णलेश
खोडातील वाहक वृंदाचा पानातील वृंदाशी संबंध जोडणारा वाहक भाग.

**— - trap** पर्णपञ्जर
पिंजऱ्यासारखे पानाचे रूपांतर; उदा. डायोनिया ( कीटकभक्षक वनस्पती ).

**leafing** पर्णधारणा; पालवणे
पानांच्या कळ्या उमलून वाढीस लागणे; पालवी येणे.

**leafless** पर्णहीन; निष्पर्ण
पाने नसण्याचा प्रकार; पाने लवकर गळून पडल्यामुळे खोड पर्णहीन दिसते; उदा. काही निवडुंगाचे प्रकार, नांग्या शेर, मुहलनबेकिया, इ. वनस्पती. कधी पाने मुळीच न आल्याने खोड पर्णहीन दिसते; उदा. सोमलता. अनेक पानझडी वृक्ष व झुडपे वर्षातून एकदा पर्णत्याग करतात व पर्णहीन दिसतात; उदा. सावर, रामफळ, वड, पांगारा, पळस, इ.

**leaflet ( pinna )** दल
संयुक्त पानाचा स्वतंत्र पानासारखा भाग; दलातील स्वतंत्र भागास ' दलक ' म्हणतात; पहा pinnule; pinna.

**leaflike ( foliaceous)** पर्णसम; पर्णाभ
पानासारखे दिसणारे (खोड, देठ, उपपर्ण इ.).
पहा phyllode, cladode, phylloclad, stipule.

**leafy** पर्णयुक्त
पालेदार; अनेक पानांनी भरलेले; उदा. कोबीचा गड्डा.

**leathery** चर्मिल; चिवट
चामड्यासारखे जाड पण ठिसूळ नव्हे;
उदा. वड, पळस यांची पाने. पहा coriaceous.

**Lecythidaceae** समुद्रफल कुल; लेसिथिडेसी
निवर (समुद्रफळ), इंगळी, तोफगोळा वृक्ष, ब्राझिल नट व सापुकेया नट इत्यादी द्विदलिकित फुलझाडांचे लहान कुल. याचा अंतर्भाव जंबुल गणात (मिर्टिफ्लोरी, मिर्टेलीझ) करतात; बेंथॅम आणि हूकर यांनी या वनस्पतींचा समावेश जंबुल कुलात केला आहे. प्रमुख लक्षणे : वृक्ष; पाने मोठी, एकाआड एक, साधी; द्विलिंगी फुले एकाकी किंवा मंजरीवर; ती नियमित अथवा प्रदले आणि केसरदले एकसमात्र, परिकिंज किंवा अपिकिंज; संदले व प्रदले ४–६ व सुटी; पाकळ्या क्वचित जुळलेल्या; केसरदले अनेक व तळाशी जुळलेली; ४–६ जुळलेल्या किंजदलांच्या किंजपुटात अनेक कप्पे व त्यात अनेक बीजके; मृदुफळात किंवा बोंडात अपुष्क बिया.

**lee-side ( leeward side )** वातविन्मुख बाजू
वाऱ्याच्या आघातापासून संरक्षित बाजू (डोंगराची).

**left-handed twiner** वामावर्ती ( अपसव्य ) वेल
पहा anti-clockwise; sinistral.

**legitimate fertilisation** वैध फलन
द्विरूप किंवा त्रिरूप प्रकारच्या फुलांचे बाबतीत समरूप फुलांमध्ये घडून आलेले परागण व फलन;
पहा fertilisation.

**legume** शिंबा

'शेंग' या सामान्य नावाने ओळखले जाणारे फळ; परंतु शास्त्रीयदृष्ट्या एक किंजदलाच्या ऊर्ध्वस्थ किंजपुटापासून बनलेले, शुष्क व दोन्ही शिवणीवर तडकणारे फळ असे मानतात; या दृष्टीने शेवगा, मोहरी किंवा टेट्टू यांची शेंगेसारखी फळे शिंबा नव्हेत. शिंबाची उदाहरणे : वाटाणा, चिंच, शिकेकाई, बाभूळ. काही शिंबा मांसल ( उदा. चिंच ) तर काही न तडकणाऱ्या ( उदा. नीळ, अगस्ता, शिसवे, बिवला, इ. ) असतात.

**Leguminosae** शिंबी ( शिंबावंत ) गण; लेग्युमिनाजी

शिंबा ( शेंग ) फल असणाऱ्या या गटाचा पूर्वी कुल या अर्थी उल्लेख केला जात असे व त्यात तीन उपकुले समाविष्ट केली जात. आता ( हचिन्सन यांनी ) ह्याला गणाचा दर्जा देऊन उपकुलांना कुले म्हटले ( सीसॅल्पिनेसी, मिमोजेसी, पॅपिलिऑनेसी ) आहे. संकेश्वर कुल, शिरीष कुल व पलाश कुल. बेंथॅम व हूकर आणि एंग्लर व प्रँटल यांनी शिंबा कुलाचा अंतर्भाव गुलाब गणात केला होता व उपकुलांना सीसॅल्पिनिऑइडी, मिमोसॉइडी व पॅपिलिऑनेटी ही नावे होती.

पहा Caesalpinaceae, Mimosaceae, Papilionaceae; Rosaceae.

**leguminous** शिंबावंत; शिंबी

शिंबा फळे ( शेंगा ) धारण करणारी ( शिंबावंत गणातील ); शिंबासंबंधी.

**lemma** परितुष

पहा flowering glume.

**Lemnaceae ( Duck-weeds )** कारंडपादप कुल; लेम्नेसी

"टिकलीचे शेवाळे" ( टिकलीच्या आकाराची व पाण्यावर तरंगणाऱ्या शैवलासारखी दिसणारी ) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अतिलहान एकदलिकित फुलझाडाच फार लहान व ऱ्हास पावलेले कुल. याचा अंतर्भाव न्यूडिफ्लोरी (नग्नपुष्पी) गणात केलेला आढळतो; परंतु स्पॅडिसिफ्लोरी ( महाछदयुक्त फुलोरा असलेल्या ) गणात करावा असे अनेक शास्त्रज्ञांचे मत आहे. हचिन्सन यांनी ॲरॅलीझ गणात समावेश केला आहे. एकूण फक्त चार वंश व तेरा जाती या कुलात घातल्या आहेत; त्या साचलेल्या पाण्यात तरंगतात. प्रमुख लक्षणे : पाने व काहीत मुळे यांचा अभाव; फुले एकलिंगी, एकत्र; परिदलांचा अभाव; केसरदले व किंजदले प्रत्येकी एक; बीजके १–६; लेम्ना, वुल्फिया, वुल्फिएला व स्पायरोडीला या शास्त्रीय नावांनी चार वंश ओळखतात; बदकतण कुल ( डकवीड ) या नावानेही या कुलाचा काहींनी उल्लेख केला आहे.

**lens** ( १ ) भिंग; ( २ ) मसूर

**-- shaped ( lenticular )** ( १ ) बहिर्गोल; ( २ ) मसुराकार

मसुरीच्या बियाप्रमाणे दोन्ही बाजू फुगीर असलेले.

**Lentibulariaceae** दृतिपर्ण कुल; लेंटिब्युलॅरिएसी

युट्रिक्युलेरिया ( गेळ्याची वनस्पती ), पिंग्युइक्युला, बायोव्हयुलेरिया इत्यादी लहान कीटकभक्षक वनस्पतींचे कुल; याचा अंतर्भाव द्विदलिकित फुलझाडांपैकी ट्युबिफ्लोरी या गणात करीत ( एँग्लर ), परंतु हल्ली (बेंथॅम व हूकर यांच्या व हचिन्सन यांच्या पद्धतीप्रमाणे) पर्सोनेलीझ गणात करतात. त्या वनस्पती पाण्यात किंवा ओलसर जमिनीत वाढतात. त्यांच्या पानांचे रूपांतर कीटक पकडून त्यांचा अन्न म्हणून उपयोग करण्यास सोयीच्या अवयवात ( उदा. गेळा, दृति ) झाल्याने त्यावरून दृतिपर्ण हे विशेषण त्या कुलनामाला लावले आहे. यांची फुले द्विलिंगी व अनियमित असतात. पाच जुळलेली संदले व तशीच प्रदले पण द्वयोष्ठक; दोन सुटी केसरदले, पाकळ्यास चिकटलेली; दोन जुळलेल्या ऊर्ध्वस्थ किंजपुटात अनेक बीजके; चार शकलांनी फुटणाऱ्या बोंडात सपुष्क बिया असतात.

पहा carnivorous plants.

**lenticulate** वल्करंध्रयुक्त

सालीवर छिद्रे असलेले ( खोड ).

**lepidoid** शल्कसम; शल्काभ

खवल्याप्रमाणे दिसणारे; उदा. थुजा व जुनिपर यांची पाने.

**leptocentric bundle** मध्यपरिकाष्ठ वृंद

परिकाष्ठाभोवती प्रकाष्ठ असलेला वाहक वृंद.

**leptonema** तनुसूत्र; लेप्टोनामा

प्रकल विभाजनापूर्वी जालिकापासून बनलेला व पुढे गुंडाळी ( कुंडल ) सारख्या अवस्थेत जाणारा नाजूक धागा. पहा spireme; nucleus.

**leptophloem** रुद्धपरिकाष्ठ

पूर्ण वाढ न झालेली परिकाष्ठाची अवस्था.

**Leptosporangiatae** तनुबीजुककोशी उपवर्ग; लेप्टोस्पोरँजिएटी

तनुबीजुककोश असलेला नेचांचा गट; पहा Filicinae.

**leptosporangiate** तनुबीजुककोशिक; लेप्टोस्पोरँजिएट
पातळ आवरणाचे व प्रत्येकी एका कोशिकेपासून बनलेले बीजुककोश असलेला नेचा.

**leptotene** तनुसूत्रावस्था; लेप्टोटीन
पूर्ण विभागणीपूर्वी प्रकलाची अनेक सूक्ष्मतंतुयुक्त पुंजक्याची अवस्था; न्यूनीकरणात ही अवस्था पहिली असून यामध्ये समरचित व बारीक रंगसूत्रांच्या जोड्या नसतात; पहा meiosis.

**leptoxylem** रुद्धप्रकाष्ठ
हरितांच्या बीजुकधारीतील जलवाहक ऊतक. पहा Musci.

**lethal** मारक; घातक
एखादी प्रक्रिया नाश करणारा ( उदा. कारक, जनुक, तपमान; गुणक, इ. ).

**— coefficient** मारक गुणक
मारक ठरणारे अति उष्ण किंवा अतिथंड तपमान, यापासून सजीवांतील कार्यक्षमता फारच कमी होते.

**leucophyllous** श्वेतपर्णी
पांढरी पाने असलेली ( वनस्पती ).

**leucoplast ( leucoplastid )** श्वेतकणु; श्वेतलवक
वनस्पतींच्या कोशिकेतील प्राकलात आढळणारा वर्णहीन व स्टार्च–संचय करणारा सजीव कण ( प्राकणु ); पहा plastid.

**lever mechanism** तरफ-यंत्रणा
परागणामध्ये तरफेचा उपयोग केलेली योजना; उदा. सॅल्व्हियाचे फूल.

**levulose ( fructose )** फलशर्करा
फळातील साखर; ही दिशादिष्ट ( polarised ) प्रकाश डावीकडे झुकविते.

**liana ( liane )** महालता
विशेषेकरून उष्ण कटिबंधात आढळणारी मोठी काष्ठयुक्त व अनित्य संरचनेची वेल; उदा. गारदळ, खाजकुइली, कोंबळ, वाघनखी, इ.

**lianous** महालताभ
महालतेसारखे.

**liber** ( १ ) मुक्त; ( २ ) अंतर्वल्क
( १ ) शेजारच्या सारख्या भागांशी संबंध नसलेले. ( २ ) अनेकदा सूत्रमय असलेला परिकाष्ठाचा भाग.

**liber fibre ( bast-fibre )** परिकाष्ठसूत्र
परिकाष्ठातील लांबट घनकोशिका.

**libriform cell** लंबसूत्र ( कोशिका )
अरुंद, लांबट व कठीण आवरणाची कोशिका.

**Lichens** शैवाक वर्ग; धोंडफुले; शैलेय; लायकेन्स
शैवल व कवक यांच्या सहजीवनामुळे बनलेल्या सामायिक कायक वनस्पतींचा गट. सामान्य भाषेत दगडफूल ( धोंडफूल ) या नावे मसाल्यात काही प्रकार वापरतात. त्यातील भिन्न जातींत भिन्न प्रकारचे शैवल व कवक यांची युति असून एका परंतु भिन्न जातीत ते घटक भिन्न असतात. जातीतील अनेक व्यक्तींत तेच शैवल व कवक असते. कवक शैवलाला वेढून टाकते व शैवलावर उपजीविका करते; तसेच ते झाडाच्या सालीतून किंवा खडकावरच्या नरम थरातून कार्बनी व अकार्बनी पदार्थ शोषून घेऊन त्याचा शैवलास उपयोग करू देते. शैवले हा घटक नीलहरित शैवले किंवा हरित शैवलांपैकी असून कवक हा घटक धानीकवक किंवा गदाकवकांपैकी असतो. या दोन्ही घटकांच्या परस्पर संबंधाबद्दल मतभेद आहेत, परंतु त्यांचे वर्गीकरण “ धानीशैवाक ” आणि “ गदाशैवाक ” या दोन उपवर्गांत करतात कारण कवकाला प्राधान्य दिले आहे.

**— , crustose** कवची शैवाक
पातळ पापुद्र्याप्रमाणे ( खपलीसारखे ) खडकास किंवा दुसऱ्या झाडाच्या खोडास घट्ट चिकटून सपाट वाढणारे धोंडफूल; उदा. ग्राफिस.

**— , foliose** पर्णरूप ( पर्णाभ ) शैवाक
पानासारखे सपाट व खडकावर किंवा झाडाच्या सालीवर विरलपणे केसासारख्या मुळांनी चिकटून वाढणारे धोंडफूल; उदा. पामेलिया.

**— , fruticose** क्षुपरूप ( क्षुपाभ ) शैवाक
फक्त तळास चिकटून वाढणारे लहान झुडपाप्रमाणे किंवा शाखायुक्त पट्टीसारखे दिसणारे धोंडफूल. उदा. उस्निया; रेनडीयर मॉस ( क्लॅडोनिया ).

**Lichenography ( Lichenology )** शैवाक विज्ञान
शैवाक वनस्पतीसंबंधीच्या समग्र अभ्यासाची शाखा.

**lichenoid** शैवाकरूप
शैवाकाप्रमाणे अनेक लहानमोठे खंड पडलेले (शरीर).

**lichenologist** शैवाकविज्ञ
शैवाक वनस्पतीसंबंधीची विशेष माहिती असलेला तज्ञ.

**lid** अपिधान; टोपण; झाकण; पिधान
शेवाळींच्या बीजुकाशयावरचे झाकण; नेपेंथस (कलश-पर्णी) ह्या कीटकभक्षक वनस्पतींच्या चंबूसारख्या अवयवाचे टोपण; परागनलिका बाहेर येण्यापूर्वी अलग होणारा भाग; पहा operculum.

**— cell** अपिधान-कोशिका
अंदुककलशाच्या टोकावरची कोशिका; यामुळे प्रथम ग्रीवा-मार्ग बंद राहतो.

**life** (१) जीवन; (२) जीव; (३) सजीवत्व
(१) व्यक्तीच्या आयुष्यातील क्रिया-प्रतिक्रियांचे वर्णन.
(२) जिवंतपणाचे वैशिष्ट्य दर्शविणाऱ्या कोणत्याही कृतीबद्दल जबाबदार असलेला पदार्थ (जीवद्रव्य).
(३) जिवंतपणाची लक्षणे असण्याची क्षमता.

**— – cycle** जविनचक्र
संपूर्ण जीवनातील प्रमुख घटनांचा वर्तुळाने दाखविलेला आराखडा.

**— – form** जविरूप
जमिनीच्या पृष्ठभागाच्या संदर्भात वनस्पतीवरच्या सुप्त कळ्यांच्या स्थानाने निश्चित कलेले तिचे स्वरुप; उदा. अंतर्वनस्पती; अधिवनस्पती; भूपादप;
पहा geophyta.

**— – history** जीवनवृत्त
संपूर्ण जीवनातील भिन्न अवस्थांचे व कार्यांचे वर्णन.

**— – process** जीव-प्रक्रिया
जिवंतपणाचे वैशिष्ट्यनिदर्शक अशी अनेक क्रिया-प्रतिक्रियांची साखळी; उदा. श्वसन, वृद्धी, चयापचय, ऊर्जा-निर्मिती, प्रजोत्पादन, इ.

**— – span** आयुःकाल
जीवनाची कालमर्यादा; त्यावरून पडलेली नावे; उदा. वर्षायू, द्विवर्षायू, बहुवर्षायू.

**light-absorption** प्रकाशग्रहण
बाहेरचा संपूर्ण दिनप्रकाश व वनस्पतीभोवतालचा प्रत्यक्ष प्रकाश यांचे गुणोत्तर.

**— – duration** प्रकाशकाल
प्रकाशाच्या उपस्थितीचा काल.

**— – energy** प्रकाश-ऊर्जा
प्रकाशातून मिळणारे व अन्नपदार्थात साठविता येण्यासारखे प्रकाशातील शक्तीचे रूपांतर.

**— – intensity** प्रकाशतीव्रता

**— – meter** प्रकाशमापक
प्रकाशाचे रुप्याच्या लवणावरील (लवणाचा लेप असलेल्या कागदावरील) रासायनिक परिणामाची तीव्रता पाहून मोजमाप करण्याचे उपकरण;
पहा actinometer.

**— – perception** प्रकाशावगम
प्रकाशाची जाणीव.

**ligneous (lignous)** काष्ठमय
लाकडी अंश असलला.

**lignicole** काष्ठप्रिय
लाकडावर उगविणारी (वनस्पती; उदा. काही कवक).

**ligniferous** काष्ठजनक
फक्त लाकूड बनविणारी, पण फुले न प्रसवणारी (फांदी).

**lignification** काष्ठीभवन
कोशिकावरणात काष्ठीराचा समावेश; यामुळे ते अपार्य होऊन पुढे कोशिका मृत होते व वनस्पतीस बळकटी येते.

**lignin** काष्ठीर; लिग्निन
कोशिकावरणात समाविष्ट होऊन काष्ठ (लाकूड) बनण्यास उपयुक्त असा पदार्थ; हा पाणी व ईथर यात न विरघळणारा पण मद्यार्क व क्षार यात विरघळणारा असतो.

**lignite** काष्ठाश्म; लिग्नाइट
प्राचीन (अश्मीभूत किंवा शिलारूप) काष्ठ.

**lignum** प्रकाष्ठ
मध्यत्वचेच्या आतील सर्व काष्ठाचा भाग.

**ligular** (१) जिव्हिकासंमुख (२) जिव्हिकेय
(१) जिव्हिकासमोरचा (पृष्ठभाग).
(२) जिव्हिकेसंबंधी.

**Ligulatae** जिव्हिकावंत गट; लिग्युलेटी
जिव्हिकायुक्त पाने असलेल्या वनस्पतींचा गट; उदा. सिलाजिनेला, आयसॉएटीस व सिजिलॅरिया आणि लेपिडोडेंड्रॉन ह्या प्राचीन वनस्पती.

**ligulate** (१) जिव्हिकावंत (२) जिव्हिकाकृति
(१) जिव्हिका असलेला [अवयव];
(२) लहान जिभेसारखा दिसणारा; उदा. सूर्यफुलातील परिघावरच्या पुष्पकातील पुष्पमुकुट.

**ligule** जिव्हिका

लहान पातळ पट्टीसारखे ( जिभेसारखे ) उपांग; उदा. गवताच्या पात्याच्या तळाशी असलेले; सिलाजिनेला, आयसॉएटिस, ह्या वनस्पतीतही आढळते.

**liguliflorous** जिव्हिकापुष्पी

जिव्हिकाकृती पुष्पमुकुट असलेल्या पुष्पकांचा फुलोरा; उदा. दुधळ, सहदेवी; इ.

**lilac** नीलाभ

फिकट निळसर रंग किंवा रंग असलेले (फूल); उदा. निंबारा (Persian lilac).

**Liliaceae** पलांडु कुल; लिलिएसी

पलांडु ( कांदा ), लसूण, शतावरी, घोटवेल, कोरफड, कळलावी, दर्शना, युका, नागीन, इत्यादी अनेक उपयुक्त एकदलिकित वनस्पतींचे कुल. याचा समावेश पलांडु गणात ( लिलिएलीझमध्ये ) केला जातो. प्रमुख लक्षणे : ओषधीय वनस्पती; भूमिस्थित खोड ( कंद, दृढकंद, मूलक्षोड ); पानातील शिरा समांतर; पाने साधी व अनेकदा मूलज; फुलोरे विविध; त्रिभागी, नियमित व द्विलिंगी फुलात सहा केसरदले; ऊर्ध्वस्थ तीन कप्प्यांचा किंजपुट व त्यात अनेक बीजके; मृदुफळात किंवा बोंडात थोड्या किंवा अनेक सपुष्क बिया.

**Liliales** पलांडु गण; लिलिएलीझ

एकदलिकित वनस्पतींतील या गणात ज्या कुलांचा समावेश केला जातो त्याबद्दल मतभेद आहेत; लिलिफ्लोरी या गणात एंग्लर यांनी जुंकेसी, लिलिएसी, ॲमारिलिडेसी, डायॉस्कोरिएसी, इरिडेसी इत्यादी नऊ कुले घातली होती; परंतु बेंथॅम व हूकर यांनी या कुलांची व इतर काहींची ( गणांची ), विभागणी भिन्न श्रेणीत केली. बेसी व हचिन्सन यांनी लिलिएलीझ गणातील कुलांची फेरवाटणी केलेली आढळते; काही कुले ( इरिडेलीझमध्ये) केसर गणामध्ये तर काही (ॲमारिलिडेलीझमध्ये ) मुसली गणात तर काही अननस गणात व कदली गणात समाविष्ट केली आहेत. पलांडु कुलाचा अंतर्भाव मात्र पलांडु गणात आहे.

**limb** ( १ ) पाते; ( २ ) अवयव

( १ ) पाकळीचा पसरट भाग; उदा. मोहरी. जुळलेल्या ( युक्त ) पुष्पमुकुटाचा पसरट भाग.

( २ ) सामान्यपणे वनस्पती किंवा प्राणी यांच्या शरीराचे विशेष कार्यक्षम भाग.

**lime stone** चुनखडी; चुनखडक

भाजून यापासून चुना बनवितात.

**limicolous** पंकिल

चिखलात वाढणारी (वनस्पती ); उदा. अळ, कर्दळ, कोळशिंदा.

**limiting cell (heterocyst)** मर्यादक कोशिका

मर्यादा घालणारी कोशिका; उदा. नील हरित शैवले.

**— factor** मर्यादक घटक; सीमांकन कारक; सीमा कारक

अनेक घटकांच्या साहाय्याने चालू असलेल्या प्रक्रियेच्या (उदा. वाढ, प्रकाशसंश्लेषण, इ.) प्रगतीला प्रथम मर्यादा घालणारा घटक (उदा. तपमान, प्रकाश, हवेतील कार्बन डायॉक्साइड, आर्द्रता इ).

**limnad** तडागवासी

तळ्यात वाढणारी वनस्पती; उदा. सेरॅटोफायलम, हायड्रिला, नायास, इत्यादी; सामान्य भाषेत "केंदाळ" किंवा "केंजाल" ( पाण्यातील जाळी ); कुमुद (*Limnanthemum indicum* Thw.).

**limnium (lake-formation)** तडागी समावास

लहान तळयातील वनस्पतींचा नैसर्गिक समुदाय; पहा community; formation.

**limnobion** तडागजीव-समुदाय

गोड्या पाण्याच्या तळ्यातील सजीवांचे (प्राणी व वनस्पती) विशिष्ट समुदाय.

**limnobiotic** तडागजैव

तळ्यातील सजीवांचे किंवा सजीवासंबंधी.

**limnodad** लवणपंकज

खाऱ्या दलदलीत वाढणारी वनस्पती; उदा. निवगूर.

**limnodophilous** पंकप्रिय

विशेषतः दलदलीत वाढणारी (वनस्पती); उदा. अळू; पाणकणीस; अंबुली (*Limnophila indica* L.).

**limnodophyte** पंकवनस्पति; पंकपादप

दलदलीत (चिखलात) वाढणारी वनस्पती.

**limnology** तडागजीवविज्ञान

गोड्या पाण्यातील जीवांच्या माहितीची शाखा.

**limnophyta** तडागपादप

तळ्यात असणाऱ्या वनस्पतींचा गट.

**Linaceae (Lineae)** अतसी कुल; लायनेसी (लिनेसी)

अतसी (जवस, अळशी), रॅडिओला, ह्यूगोनिया इ. द्विदलिकित वनस्पतींचे लहान कुल; याचा अंतर्भाव भांड गणात ( जिरॅनिएलीझमध्ये ) केलेला आढळतो. प्रमुख

लक्षणे : एकाआड एक साध्या पानांच्या ओषधीय वनस्पती; द्विलिंगी, नियमित, ४–५ भागी, बिंबहीन फुले; केसरदले ५–२० व तळाशी जुळलेली; जुळलेल्या २–५ किंजदलांच्या ऊर्ध्वस्थ किंजपुटातील प्रत्येक कप्प्यात १–२ बीजके. बोंड किंवा मृदुफळ; बी सपुष्क; पहा Geraniaceae.

**line-transect** रेषाछेद

बनश्रीच्या अभ्यासाकरिता वनस्पतींच्या समूहात एका सरळ रेषेच्या आजुबाजूस वाढलेल्या वनस्पतींची नोंद करण्याकरिता दोन निश्चित बिंदूमध्ये काढलेली रेषा.

**lineage** वंशावळ

एखाद्या वनस्पतीच्या अथवा प्राण्याच्या अनेक पूर्वजांची संकलित माहिती.

**linear** रेषाकृति

रुंदीपेक्षा अनेक पटीनी लांबी अधिक असलेले; उदा. पान, पाकळी, इ.

**lineate** रेषांकित

अनेक बारीक व समांतर रेषा असलेले ( फळ, बी, खोड, इ. ).

**linen** लिनन

तागाचे कापड.

**lingulate** जिव्हाकृति

जिभेसारखे अरुंद, सपाट व लांबट.

**linin** प्रकलतंतु

प्रकलामध्ये सामान्यपणे दिसणारा लांबट धागा.

**link** दुवा; कडी

दोन गटांना ( जाती, वंश, कुल इ. ) जोडणारा भाग, व्यक्ती किंवा लहानमोठा गट.

**linkage** अनुबंधन; सहलग्नता

दोन किंवा अधिक अवैकल्पिक जनुकांचा ते एकाच रंगसूत्रावर असल्यामुळे माळेतील मण्याप्रमाणे असलेले साहचर्य; पहा crossing over.

**— group** बद्ध-संच; सहलग्न संच

एका रंगसूत्रावरील अनेक जनुकांचा सहसा परस्परापासून अलग न होणारा गट.

**Linnean ( Linnaeus' ) system** लिनियसची पद्धती

कार्ल लिनियस या स्वीडिश वनस्पतिविज्ञाने वनस्पतींच्या वर्गीकरणाच्या सोयीकरिता बनविलेली, मुख्यतः फुलातील केसरदले, त्यांची संख्या, संघटना व लांबी यांवर आणि किंजलांच्या संख्येवर विशेषतः आधारलेली, लिंग-प्रधान व कृत्रिम पद्धती. यातच द्विपद नामकरणाचा अंतर्भाव होतो. पहा binomial nomenclature.

**lip** ओष्ठ

(१) दोन अपूर्ण भाग पडल्याने, तोंडाशी साम्य दर्शविणाऱ्या, संवर्ताच्या अथवा पुष्पमुकुटाच्या प्रत्येक भागास ओठ या अर्थाची संज्ञा.

(२) आमराच्या [ ऑर्किड ] फुलातील किंवा गोकर्णाच्या पुष्पमुकुटातील, कीटकास बसण्यास सोयीची अशी मोठी पसरट पाकळी.

**lipase** वसाभेदक; लायपेज

मेदयुक्त (ओषट) पदार्थाचे रूपांतर (रासायनिक अपघटन) घडविणारे कार्बनी निदेशक; तेलबियांत हे आढळते; पहा enzyme.

**lipogenesis** वसाजनन

वसा (मेद, स्निग्ध पदार्थ) निर्माण होण्याची रासायनिक प्रक्रिया; ही परिकलात कार्बनी निदेशकांच्या साहाय्याने घडून येते.

**lipoid** वसाभ; मेदाभ; लिपॉईड

वनस्पतींच्या प्राकलात आढळणारा ओषट पदार्थ.

**lipoxeny** आश्रयत्याग

एखाद्या जीवोपजीवी वनस्पतीने आपली आश्रय देणारी वनस्पती सोडून अलग होणे व पूर्वसंचित अन्नावर पुढील विकास स्वतंत्रपणे चालू ठेवणे, हा प्रकार; उदा. अर्गटची जालाश्म अवस्था; पहा sclerotium.

**lipped ( labiate )** ओष्ठवंत; ओष्ठी

ओठासारखे स्वरूप असलेला (उदा. संवर्त, पुष्पमुकुट); ओठ असलेला अवयव.

**list-quadrat** चौकोन-उपस्थिती

विशिष्ट मापाच्या चौकोनी जागेत निसर्गतः आढळलेल्या वनस्पतींची नोंद (यादी); पहा quadrat.

**lithocarp** फलाश्म

भूस्तरात आढळलेले प्राचीन व अश्मीभूत फळ.

**lithophilous ( saxicolous )** शिलारुह

व्यवहारतः शिलाप्रिय व शिलारुह यात फरक नाही.

**lithophilus** शिलाप्रिय

खडकावर वाढून जगणारी; उदा. शैवाकांपैकी काही वनस्पती.

**— formation** शिलासमावास

खडकावर वाढून विशिष्ट संरचना, आकार इत्यादी दर्शविणाऱ्या वनस्पतींचा नैसर्गिक समुदाय.

**lithophyl** पर्णाश्म
प्राचीन अश्मीभूत पाने; उदा. पॅकोप्टेरिस, स्फेनोफायलम, इ.

**lithophyte** शैलपादप; शिलापादप
खडकावर किंवा खडकामधून वाढलेली वनस्पती; उदा. शैवाक; काही शेवाळी.

**lithospermous** शिलाबीजी
दगडासारखे कठीण बीज असलेले; उदा. खारीक.

**lithoxyle** काष्ठाश्म
भूस्तरात आढळणारे अस्मीभूत लाकूड.

**littoral (littoralis)** सागरतटवर्ती; तटीय
समुद्रकिनाऱ्यावर पण पाण्याच्या तळाशी किंवा पाण्यावर (वाढणारी वनस्पती); भरतीच्या सीमेपासून आत समुद्राकडे सुमारे २०० मीटरपर्यंत अंतरावरच्या प्रदेशात, प्रकाश व लाटांच्या अमलाखाली; उदा. सुंद्री चांद (*Heritiera littoralis* Ait.).

**— vegetation** वेला वनश्री; सागरतटवर्ती वनश्री
समुद्रकिनाऱ्यावर निसर्गतः आढळणाऱ्या सर्व वनस्पती.

**livens (livid)** रक्षावर्णी; राखी; धूसर
शिशाच्या रंगाचे; फिकट करडे.

**Liverworts (Hepaticae)** यकृतका; लिव्हरवर्ट्स
शेवाळी विभागातील सापेक्षतः साध्या वनस्पती; पहा Hepaticae; Bryophyta.

**llano** तृणक्षेत्र; लानो
वेनेझुएलामधील फारशी झाडे नसलेला प्रशस्त गवताळ प्रदेश (समावास); पहा savannah.

**loam** चिकण माती; चिकण मृदा

**loamy** दुमट; चिकण
फार बारीक कणांची, पाणी शोषून ते धरून ठेवणारी कलिलस्वरूप, सुकल्यावर कडक बनणारी (जमीन, माती); यामध्ये कुजट जीवावशेष असल्याने ही जमीन सुपीक असते व बारीक रेती फार कमी प्रमाणात असते.

**lobate (lobose)** खंडयुक्त; खंडित; पालियुक्त
खंड पडलेले; विभागलेले; उदा. वनभेंडीचे (*Urena lobata* L.) पान; कापसाचे पान.

**lobe** खंड; पालि
कोणत्याही पूर्णपणे न विभागलेल्या अवयवाचा एक विभाग; उदा. पाने, पुष्पमुकुट, किंजल्क फळ इ.

**lobelet (lobule, lobulus)** खंडिका; पालिका
लहान खंड; खंडाच्या पुनर्विभागणीने बनलेला.

**lobulate (lobular)** खंडिकीय
दोनदा विभागल्याने लहान खंड असलेले (पान).

**lobule** खंडिका
लहान खड.

**local (localized)** स्थानिक
विशिष्ट मर्यादित क्षेत्रात आढळणारे (पसरलेले).

**locality** स्थान; ठिकाण
एखाद्या वनस्पतीचा आढळ दर्शविणारे ठिकाण, किंवा तिच्या स्थानाबद्दल निश्चित माहिती (जिल्हा, घाट, तालुका, शहर, टेकडी, नदी इ); पादपसमुदाय किंवा संगती यांचे भौगोलिक स्थान.

**locelus** लघुपुटक
लहान कप्पा; उदा. परागकोशाच्या एका खंडातील (परागकोटर) दोन्हीपकी प्रत्येक कप्पा; पहा anther.

**locomotion** चलन; स्थानांतर; गमन
एखाद्या सूक्ष्म वनस्पतीचे किंवा सुट्या अवयवांचे (बीजुक, गंतुक, इ.) अथवा कोशिकेतील सुट्या भागाचे (हरितकणु, प्रकल, इ.) स्थलांतर; उदा. काही शैवले, कवक व त्यांच्या प्रजोत्पादक कोशिका.

**locular** पुटकित
कप्पे (पोकळ्या) असलेला; उदा. किंजपुट, परागकोश.

**locular, uni** एकपुटकित
एकच कप्पा असलेले; उदा. सूर्यफूल व पपईचा किंजपुट.

**—, bi** द्विपुटकित
दोन कप्पे असलेले; उदा. कुटकी, अडुळसा व मोहरीचा किंजपुट.

**—, tri** त्रिपुटाकेत
तीन कप्प्यांचा; उदा. पलांडु कुलातील वनस्पतींचा किंजपुट; कडुचिंच (*Corchorus trilocularis* L.).

**locule** पुटक
पहा loculus.

**loculicidal dehiscence** पुटक-स्फुटन
कप्प्याच्या बाजूने फुटण्याची प्रक्रिया; उदा. भेंडीचे बोंड.

**loculicidally dehiscent** पुटक-स्फुटनशील
कप्प्याच्या बाजूने तडकण्याची क्षमता असलेले (फळ); उदा. कापूस, तामण, बोंडारा.

**loculus (locule)** पुटक; कप्पा
परागकोश किंवा किंजपुट यांतील पोकळी.

**locus** स्थान
रंगसूत्रातील विशिष्ट जनुकाची जागा; पहा hilum.

**lodicule** लघुतुष; तुषक
गवतांच्या कणिशकातील फुलांच्या तळाशी असलेले खवल्यासारखे उपांग.

**loess** वायुधूळ
वाऱ्याने पसरविलेली व वनस्पतींनी धरून एकत्रित केलेली धूळ.

**Loganiaceae** कुंचल (कुचला) कुल; लोगॅनिएसी
कुंचल (काजरा), निर्मळी, पपीटा, काजरवेल व तत्सम इतर द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा अंतर्भाव बेंथॅम व हूकर यांनी किराईत गणात (जेन्शिएनेलीझ) केला असून हचिन्सन यांनी लोगॅनिएलीझ या गणात केला आहे; प्रमुख लक्षणे : समोरासमोर किंवा वर्तुळाकार व साधी आणि उपपर्णे असलेली पाने, वृक्ष, क्षुपे, ओषधी व लता; छदे व छदके असलेली, नियमित, द्विलिंगी, ४–५ भागी फुले; दोन जुळलेल्या किंजदलांच्या ऊर्ध्वस्थ किंजपुटात एक किंवा दोन कप्पे व अनेक बीजके; मृदुफळात किंवा बोंडात सपुष्क बिया.

**loma** शरद शाद्वल; लोमा
पेरू देशातील, हिवाळ्यात धुक्याने भिजलेल्या जमिनीवर वाढणारा गवताळ प्रदेश; तृणसंघाताचा एक प्रकार; पहा steppe.

**lomentaceous** मालाशिंबाधारी; मालाशिंबाकृति
माळेसारख्या शेंगाप्रमाणे; तशा शेंगा असलेले.

**lomentum (loment)** मालाशिंबा
मण्यांच्या माळेप्रमाणे दिसणारे व पक्व झाल्यावर अनेक सुट्या मण्यासारखे एकबीजी तुकडे सांध्यातून अलग करणारे शिंबा प्रकारचे फळ; उदा. बाभूळ, लाजाळू इ. पहा legume.

**long-day plant** दीर्घदिन पादप
बारा तासापेक्षा अधिक मोठ्या दिवसातील प्रकाशाच्या प्रभावाने फुलणारी वनस्पती; उदा. मुळा, लेट्यूस; इ. पहा photoperiodism; short-day plant.

**longiflorous** लंबपुष्पी
लांबट फुले असलेले; उदा. बांडगूळ (*Loranthus longiflorous* Desr.).

**longistaminate** दीर्घकेसरी
लांब केसरदलांचे व बहुधा वाऱ्याकडून परागण होणारे (फूल); उदा. गवते.

**longitudinal section** अनुदैर्घ्य (अन्वायम) छेद; अनुलंब छेद
उभा छेद; वस्तूच्या लांबीस समांतर रेषेत असलेला छेद. "उत्छेद" असे संक्षिप्त रूप.

**long shoot** दीर्घ प्ररोह
अमर्याद वाढणारा अक्ष व त्यावरील पल्लव.

**longus (long)** दीर्घ
लांबट; उदा. हळद (*Curcuma longa* L.); पिंपळी (*Piper longum* L.)

**loose** विरल; शिथिल
विरळ संरचना असलेले (ऊतक, फुलोरा).

**-- inflorescence** विरल पुष्पबंध
विरळ शाखायुक्त फुलोरा; उदा. परिमंजरी; वल्लरी.

**-- soil** विरल मृदा
भुसभुशीत (शिथिल) जमीन.

**— tissue** विरलोतक
हवामार्ग किंवा पोकळ्या असलेला कोशिकासमूह; उदा. spongy tissue; aerenchyma.

**Loranthaceae** बंदाक कुल; लोरँथेसी
बांडगूळ (बंदाक), हाडमोड व तत्सम द्विदलिकित वनस्पतींचे लहान कुल. याचा अंतर्भाव चंदन गणात (सँटॅलेलीझमध्ये) करतात. प्रमुख लक्षणे : काष्ठमय अर्धवट जीवोपजीवी; रूपांतरित मुळे (शोषक); पाने असतात (लोरँथस) किंवा नसतात (व्हिस्कम); बहुधा नियमित, २–३ भागी, समपरिदली, द्विलिंगी किंवा एकलिंगी फुले; किंजपुटात एक कप्पा व त्यात बीजकाधानी व बीजक असा भेद नसतो. सपुष्क बीजाभोवती चिकट मगज. बांडगुळे (लोरँथस व व्हिस्कम या वंशातील) बहुधा आंबा, निंब इत्यादीं वृक्षावर आढळतात.

**lorate (loriform)** पट्टाकृति
सपाट, लांब व जाड फितीप्रमाणे (पान); उदा. कुमूर, झेफिर लिली.

**lucens (lucid)** चकचकीत
उपत्वचेमुळे किंवा गुळगुळीतपणामुळे चमकणारा; उदा. पाने किंवा काही खोडे यांचा पृष्ठभाग.

**lumen** भेज; पोकळी

तट किंवा भिंत यांनी वेढलेली लहान पोकळी; नळीचे द्वार किंवा कोशिकेतील पोकळी.

**lunar** चांद्र

चंद्रासंबंधी; चंद्रावरील.

**lunate** अर्धचंद्राकृति

चंद्रकोरीप्रमाणे; अर्ध्या चंद्राप्रमाणे; उदा. काही पानांचे किंवा बियांचे आकार; *Passiflora lunata* L. या कृष्णकमळाच्या एका जातीचे पान.

**lunulate** नखचंद्राकृति

लहान अर्ध गोलकाप्रमाणे; उदा. एका नेचाचे (*Adiantum lunulatum* Burm.) पान.

**lurid** पिंगट पिवळट; तपकिरी

**luteolus** पिवळट

फिकट पिवळे; उदा. *Colchicum luteum.*

**luteous** पिवळे जर्द

उदा. *Gentiana lutea* L. याच्या फुलांचा रंग.

**Lycoperdales** भूकंदुक गण; लायकोपर्डेलीझ

सत्यगदाकवक ( युबेसिडी ) उपवर्गातील एक गण. या गणातील कवकांचे शरीर चेंडूसारखे ( भूकंदुक ), तारकासारखे, पक्ष्यांच्या घरट्यासारखे ( नीडकवक ), पूतिकवक किंवा दुर्गंधी द्रव्यात रूपांतर होणारे कवक ( स्टिंकहॉर्न फंजाय ) इत्यादींसारखे व बहुधा जमिनीवर असते; गदाबीजुककोशात आडपडदे नसून सर्व बीजुककोश अंतिम शरीरात असतात; काहींमध्ये बाहेरील वंध्य ऊतकांना बाजूस करून गदाबीजुके बाहेर येतात. पहा Eubasidii : Basidiomycetes.

**Lycopodiinae (Club-mosses; Lepidophyta)** मुद्गल शेवाळी वर्ग; लायकोपोडीनी; लेपिडोफायटा

नेचाभ पादपांच्या ( टेरिडोफायटा ) चार वर्गांपैकी एक; यात पाच गण आहेत : लायकोपोडिएलीझ, सिलाजिनेलेलीझ, लेपिडोडेंड्रेलीझ, लेपिडोकार्पेलीझ व आयसॉएटेलीझ. मुद्गलाच्या ( गदेच्या ) आकाराचे शंकू व काहींत शेवाळीसारखी पाने यावरून 'मुद्गल शेवाळी' हे नाव. काही जाती प्राचीन म्हणून जीवाश्मरूपातच व इतर अनेक विद्यमान वनश्रीत आढळतात. बीजुकधारी पिढी प्रमुख व तिला मूळ, खोड, व बहुधा लहान पाने एकाआड एक असतात; रंभ विविध; पर्णविवरांचा अभाव; बीजुककोश अक्षसंमुख (पानांच्या किंवा तत्सम उपांगांच्या तळाशी) व एक; पाने कधी जिव्हिकावंत; कधी मोठी व समोरासमोर; काहींत दोन प्रकारचे बीजुककोश; गंतुकधारी पिढी बहुधा ऱ्हसित; रेतुकाशये, व अंदुककलश, काहींत ऱ्हास पावलेल्या स्वरूपात; फलन पाण्याद्वारे होते. काही शास्त्रज्ञ नेचाभ पादपांच्या विभागात लायकोपोडिएलीझ हा एक गण म्हणून समाविष्ट करून त्यात वरील गण कुलस्वरूपात ठेवतात. लायकोपोडिएसी कुलात लायकोपोडियम व फायलोग्लॉसम हे दोनच वंश विद्यमान वनस्पतीत आढळतात. लायकोपोडियम याच्या हरिणाच्या शिंगासारख्या शंकुयुक्त भागामुळे त्याला 'मृगशृंग-शेवाळ' ( Staghorn Moss ) म्हणतात.

**Lycopsida** लायकोप्सिडा

जेफ्रे या शास्त्रज्ञाच्या मताप्रमाणे लायपोडिएलीझ व सायलोफायटेलीझ या गणांचा समावेश असलेला गट. नेचाभ पादपांपैकी ज्यामध्ये रंभात पर्णविवरांचा अभाव असतो अशा सर्वांचा (लायकोपोडीनी, एक्विसीटीनी व सायलोफायटीनी) समावेश असलेला गट.

पहा Pteropsida, Sphenopsida.

**lyrate** वीणाकृति

वीणेच्या आकाराचे; टोकास मोठे खंड व खाली लहान अपूर्ण खंडे असलेले; ( उदा. पान; गंगोत्री *Cyathocline lyrata* Cass. )

**lysigenous** नाशोद्भूत

वनस्पतींच्या शरीरात कोशिकांच्या नाशामुळे बनलेली ( पोकळी, नलिका, हवामार्ग इ. );

पहा schizogenous.

**Lythraceae** धातकी ( धायटी ) कुल; लिथ्रेसी

धातकी ( धायटी ), मेंदी, बोंडारा, तामण इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा अंतर्भाव जंबुल गणात ( मिर्टेलीझ; मिर्टिफ्लोरी ) करतात; तथापि हचिन्सन यांनी धातकी गण ( लिथ्रेलीझ ) या स्वतंत्र गणात धातकी कुलासह, दाडिम कुल व शृंगाटक कुल यांचाही समावेश केला आहे. पूर्वीच्या जंबुल गणात जंबुल कुल, कांदल कुल, शृंगाटक कुल, धातकी कुल, दाडिम कुल व अर्जुन कुल ही पाच समाविष्ट होती. प्रमुख लक्षणे : वृक्ष, क्षुपे व ओषधी; साधी समोरासमोर पाने; द्विलिंगी, नियमित किंवा एकसमात्र, ४–६ भागी फुले; पाकळ्या क्वचित नसतात; केसरदले कमी-जास्त संख्येने संवर्त-नलिकेवर आधारलेली; तीन ऊर्ध्वस्थ किंजदलांच्या किंजपुटात २–६ कप्पे व त्यात अनेक बीजके; बोंडात अपुष्क बिया. मेंदीची पाने रंगाबद्दल व फुले "हिना" अत्तराबद्दल प्रसिद्ध

असल्यामुळे या कुलाला मेंदी कुल असेही म्हणतात; पहा Myrtales. (: हेंदी)

## M

**mace** (१) जायपत्री (२) गदा; मुद्गल

(१) जायफळाच्या बीजावरचे एक जाडसर व अपूर्ण आच्छादन; पहा aril.

(२) सामान्य भाषेतील अर्थ; वेत्र.

**maceration** विमज्जन; भिजवण

पाण्यात भिजवून किंवा रासायनिक द्रव्यांचा संस्कार करून वस्तूला मऊपणा आणण्याची प्रक्रिया; ह्यापासून अर्क काढणे, आंबवणे, इत्यादी प्रक्रिया पुढे चालू ठेवता येतात.

**macrandrous** (१) दीर्घ पुं-तंतुवंत; (२) दीर्घपुष्पी

(१) रेतुकनिर्मिती करणारा नित्य लांब किंवा मोठा तंतू असलेली वनस्पतींची जाती किंवा तशा तंतूंच्या साहाय्याने लैंगिक प्रजोत्पत्ति; उदा. ईडोगोनियम शैवल. पहा nanandrous.

(२) लांबट फुलांचा प्रकार.

**macrandrospore** गुरु पुं-बीजुक

दोन बीजुक-प्रकारांपैकी नर– (पुं–) गंतुकधारी निर्माण करणारे बीजुक; पहा spore.

**macro- (mega-)** दीर्घ– ; गुरु– ; बृहत्

लांबटपणा किंवा मोठा आकार दर्शविणारा उपसर्ग.

**— cladous** दीर्घशाखी

लांबट फांद्या असलेली वनस्पती.

**— conidium** गुरु-विबीजुक

जीवनचक्रातील दोन विबीजुकांपैकी मोठे; पहा conidium.

**— cyst** गुरुकोष्ठ

मोठ्या आकाराचे कवच; पहा cyst.

**— fungus** गुरुकवक; बृहत्कवक

मोठ्या आकाराचे कवक.

**— gamete (megagamete)** गुरुगंतुक; स्त्रीयुग्मक

दोन प्रजोत्पादक कोशिकांपैकी मोठी (बहुधा स्त्रीलिंगी).

**— gametophyte** गुरुगंतुकधारी

मोठी गंतुके (बहुधा स्त्रीलिंगी) बनविणारी जीवन-चक्रातील अवस्था; पहा gametophyte.

**— gonidium** गुरुबीजुक

दोन्हीपैकी मोठे बीजुक; पहा spore.

**— nucleus** गुरुप्रकल

एका कोशिकेतील दोन प्रकलांपैकी मोठे प्रकल.

**— phyllous** गुरुपर्णी; बृहत्पर्णी

मोठ्या पानाची (जाती किंवा वनस्पती); उदा. काही नेचे; दिंडा (*Leea macrophylla* Roxb.); घोटवेल (*Smilax macrophylla* Roxb.).

**— phyte** दीर्घदेही वनस्पति; गुरुपादप

लांबट किंवा मोठ्या शरीराची वनस्पती.

**— phytoplankton** गुरुपादप-प्लवक

पाण्यात तरंगणाऱ्या मोठ्या वनस्पतींचा समूह; उदा. गोंडाळ, ऑटेलिया, कुमुद, पोटॅमोजेटॉन, हायड्रिला, नायास, साल्व्हीनिया, ॲझोला, इ.

**— sclereide** गुरुकठक

लंबगोल, बोथट टोकाची व जाड आवरणाची कठीण कोशिका. पहा sclerenchyma.

**— scopic** स्थूलमानीय; नेत्रदर्शी; दृष्टिगोचर

सहज साध्या डोळ्यांनी दिसणारे; सूक्ष्म नसलेले.

**— sporangiate** गुरुबीजुककोशिक

गुरुबीजुककोश असणारे (पान; वनस्पती).

**— sporangium** गुरुबीजुककोश

गुरुबीजुके बनवून पुढे ती मुक्त करणारा पिशवीसारखा अवयव; उदा. सिलाजिनेला, आयसॉएटिस; बीजक; पहा ovule.

**— spore** गुरुबीजुक

निर्लिंग पद्धतीने बनलेला प्रजोत्पादक व एककोशिक सूक्ष्म भाग; यापासून स्त्री-गंतुकधारी व स्त्री–गंतुके बनतात; पहा embryo–sac.

**— sporophyll** गुरुबीजुकपर्ण

गुरुबीजुककोश (व त्यातील गुरुबीजुके) बनविणारे पान अथवा तत्सम अवयव (उपांग); पहा carpel.

**— stylous** दीर्घकिंजली

लांब किंजल असलेले; उदा. फूल.

**— thermophilous** दीर्घोष्णताप्रिय

उष्ण प्रदेशातील (वनस्पती).

**— zoospore** गुरुचरबीजुक

हालचाल करणारे दुसरे मोठे बीजुक.

**macula** (१) खात; (२) बिंदु; ठिपका; (३) गुलिका

(१) वनस्पतीवर आढळणारी लहान व उथळ खाच.

(२) काही वनस्पतींच्या अवयवांवर आढळणारा रंगीत ठिपका.

( ३ ) बारीक फोड ( गाठ ).

**maculatus (spotted)** ठिपकेदार; बिंदुयुक्त
ठिपके असलेले; उदा. आवरण (फळाचे, व बीजाचे), किंवा खोडाची साल, इ.

**maculose** ठिपकेदार

**magnification** विवर्धन; विस्तारण
विस्तार; वाढविलेले आकार व आकारमान.

**magnifier** विवर्धक; विस्तारक
आकार व आकारमान वाढवून दाखविणारे ( भिंग ).

**magnifying power** विवर्धनक्षमता
विवर्धकाचे ( वाढ करून दाखविण्याचे ) सामर्थ्य.

**Magnoliaceae** चंपक कुल; मॅग्नोलिएसी
सोनचाफा, कवठी चाफा, टुलिप वृक्ष इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे प्रारंभिक कुल. याचा अंतर्भाव मोरवेल गणात ( रॅनेलीझ ) करतात. हचिन्सन यांनी चंपक गण ( मॅग्नोलिएलीझ ) या स्वतंत्र गटात केला आहे. प्रमुख लक्षणे : वृक्ष, क्षुपे व लता; तैल्मार्गयुक्त; साधी सोपपर्ण पाने; द्विलिंगी किंवा एकलिंगी, अवकिंज, एकाकी, फुले टोकास किंवा पानांच्या बगलेत असतात; पुष्पदले सुटीं; परिदले मंडलित किंवा सर्पिल; केसरदले व किंजदले अनेक व सर्पिल; मृदुफळ, सपक्षफळ किंवा पेटिकाफळ; बिया सपुष्क.

**main vein** प्रधान सिरा; मध्यशीर

**malacogamy** मृदुकाय युति
मृदुकाय प्राण्यांनी गोगलगायीसारख्या घडविलेले फलन; उदा. गोंडाळ, अळूच्या काही जाती.

**malacoid** पिच्छल; श्लेष्मल; बुळबुळीत; श्लेष्माभ

**malacophilous** मृदूकायप्रिय; मृदूकायपरागित
मृदुकायांद्वारे ( गोगलगायीसारख्या मृदु शरीराच्या प्राण्यांकडून ) परागण वा फलन घडवून आणणारी ( वनस्पती ).

**malacophyllous** मृदुपर्णी; रसाळपानी; मांसलपर्णी
मऊ अथवा रसाळ पानाची ( वनस्पती ). उदा. घोळ, कोरफड, इ.

**— leaf** मृदुपर्ण; मांसलपर्ण; रसाळ पान

**male** पुं- ; नर
पुल्लिंगवाचक उपसर्ग ( किंवा विशेषण ) उदा. पुं-गंतुक.

**— cell** पुं-कोशिका
प्रजोत्पादक नर कोशिका.

**— cone** पुं-शंकु
फक्त केसरदले (लघुबीजुकपर्णे) असलेला शंकू. उदा. सायकस; चिल. पहा cone.

**— floret** पुं-पुष्पक
सूर्यफुलाच्या फुलोऱ्यातील किंवा काही गवतांच्या कणिशकातील ( उदा. मका ) फक्त केसरदले फलनक्षम असलेले लहान फूल.

**— flower** पुं-पुष्प; नर-पुष्प; केसरपुष्प
फक्त कार्यक्षम केसरदले असलेले फूल; उदा. पपई, एरंड, इ.

**— gamete** पुं-गंतुक; पुं-युग्मक
प्रजोत्पादक नर कोशिका; रेतुक.

**— gametophyte** पुं-गंतुकधारी
फक्त रेतुकाशय ( पुं-गंतुकाशय ) धारण करणारी एक गुणित पिढी; पहा antheridium, haploid.

**— nucleus** पुं-प्रकल
पुं-गंतुकाचे कार्य करणारा अथवा प्रतिनिधित्व करणारा कोशिकेतील प्रकल; पहा nucleus.

**malformation** विकृति
अनित्य अवयव किंवा तत्सम आणि अकार्यक्षम संरचना प्रकार; उदा. पानावर येणाऱ्या गाठी; अर्बुद, गुल्म इ.

**Malpighiaceae** माधवी कुल; माल्पिघिएसी.
बागेतील शोभिवंत माधवी लता (मधुमालती), लाल बोर, गाल्फिमिया इत्यादी द्विदलिकित फुलझाडांचे एक मोठे कुल; याचा अंतर्भाव भांड गणात ( जिरॅनिएलीझ-मध्ये ) करतात; हचिन्सन यांनी माल्पिघिएलीझमध्ये ( माधवी गणात ) केला आहे. प्रमुख लक्षणे; लहान वृक्ष, झुडपे व महालता ( अंतर्रचना अनित्य ). पाने साधी, सोपपर्ण, बहुधा समोरासमोर, अनेकांत प्रपिंडयुक्त ठिपके असलेली; विशिष्ट प्रकारचे शाखित केस सर्वत्र; एकसमात्र, द्विलिंगी, पंचभागी फुले; बहुधा १० केसरदलांची दोन मंडले तळाशी एका वर्तुळात जुळलेली; पाकळ्या पाच, सुट्या; तीन ऊर्ध्वस्थ जुळलेल्या किंजदलांच्या संयुक्त किंजपुटात तीन कप्पे व प्रत्येकात एक बीजक; तीन फलांश होऊन फुटणारे शुष्क (पालिभेदी) फळ; अनेकदा पंखयुक्त कृत्स्नफल; बी अपुष्क.

**maltase (maltin)** माल्टेज ( माल्टिन )
रुजणाऱ्या शूकधान्यात आढळणारे व संचित पदार्थांचे रासायनिक रूपांतर घडविणारे वितंचक ( कार्बनी निदेशक ). डायास्टेजपेक्षा हे अधिक क्रियाशील असून माल्टोज शर्करेचे रूपांतर दोन ग्लूकोजच्या रेणूंत करते.

**Malvaceae** भेंडी कुल; कार्पास कुल; माल्व्हेसी
भेंडी, मुद्रा, जपा (जास्वंद), कापूस (तूल), पारोसा (पारिस) पिंपळ, अंबाडी इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. शाल्मली (लाल सावर), दुरियन, सफेत सावर, गोरख चिंच, इत्यादींचा अंतर्भाव पूर्वी याच कुलात करीत, परंतु त्यांचे एक स्वतंत्र कुल शाल्मली कुल (बॉम्बॅकेसी) हल्ली केले आहे (हचिन्सन). दोन्ही कुले भेंडी गणात (कार्पास गणात; माल्व्हेलीझ-मध्ये) समाविष्ट आहेत. याशिवाय मुचकुंद कुल (स्टर्क्युलिएसी) व परूषक कुल (टिलिएसी) इत्यादीही त्याच गणात आहेत. माल्व्हेसी कुलाची प्रमुख लक्षणे : शरीरावर तारकाकृती केस असलेले वृक्ष, क्षुपे व ओषधी; साधी सोपपर्ण, एकाआड एक पाने; फुले बहुधा एकाकी, पानांच्या बगलेत, द्विलिंगी, नियमित, सच्छदक व अवकिंज; संदले पाच व जुळलेली; पाकळ्या पाच व तळाशी केसर-नलिकेशी चिकटलेली; केसरदलाच्या नळीतून किंजल वाढत जाऊन नंतर किंजल्क पसरते. परागकोशात एक कप्पा; बहुधा पाच ऊर्ध्वस्थ किंजदलांच्या किंजपुटात अनेक कप्पे व प्रत्येकात एक किंवा अनेक बीजके; फळ मुद्रिका किंवा बोंड; इतर वनस्पती : चिनी कंदील, बला, चिकणा, तुपकडी, गुलखेरा, रानभेंडी, वनभेंडी, इ. इ.

**mamiform (mamillar, mamillate)** स्तनाभ
स्तनासारख्या आकाराचे (फळ; उदा. मॅमे ॲपल : Mammee apple; *Mammea americana* L.).

**mamilliform** स्तनाग्राभ; पिंडिकाभ
स्तनासारख्या उंचवट्यावरील टोकाप्रमाणे; उदा. अळूच्या पानावरील मखमलीसारख्या पृष्ठावर (अपित्वचेवर) असलेल्या कोशिकावरणाचे उंचवटे; काही फुलावरील अपित्वचा याच प्रकारच्या कोशिकांची असल्याने त्यावर पाणी टिकून न राहता गळून जाते.

**mangrove plant** कच्छपादप; समुद्रतटीय वनस्पति
खाऱ्या दलदलीत वाढणारे व विशिष्ट लक्षणांनी (आधारमुळे, श्वसनमुळे, अपत्यजनन, चिवट पाने इ.) ओळखले जाणारे झुडूप किंवा लहान वृक्ष; उदा. कांदळ, चिप्पी, तिवार इ.

**manna** माना शर्करा
तूलीरा (सेल्युलोज) पासून बनलेली, विशिष्ट साखर असलेला काही वनस्पतींचा घनीभूत पाझर; उदा. फ्रॅक्सिनस.

**mantle** प्रावरण
पहा tapetal layer.

**manubrium** पोततळ
पोयीचा (महाछदाचा) लांबट तळभाग; पहा handle cell.

**manure** खत
वनस्पतींना अन्न या दृष्टीने उपयुक्त होणारे कार्बनी किंवा अकार्बनी पदार्थ; उदा. वर खते, जोर खते, मिश्र खते, कंपोस्ट, कुजकट जैव पदार्थ.

**manuring** खत घालणे; खतावणी

**maqui** मॅकी
बव्हंशी सदैव हिरव्या राहणाऱ्या झुडपांची घनदाट वनश्री; ही संज्ञा कोर्सिकातील आहे.

**Marantaceae** आराट कुल; मॅरॅन्टेसी
आरारूट, टोपीतांबू इत्यादी एकदलिकित वनस्पतींचे (फुलझाडांचे) कुल; याचा समावेश कदली गणात करतात; पहा Scitamineae.

**Marattiaceae** मॅरॅट्टिएसी
नेचांपैकी स्थूलबीजुककोशी उपवर्गातील व मॅरॅट्टिएलीझ गणातील एकमेव कुल; ॲन्जिऑप्टेरिस, मॅरॅट्टिया, डॅनिया व कौल्फुसिया इत्यादी वंश यात अंतर्भूत आहेत. प्रमुख लक्षणे : जाडजूड, सु. १ मीटरपेक्षा लहान व फांद्या नसलेल्या खोडावर मोठी, सोपपर्ण, अवसंवलित पिसासारखी विभागलेली संयुक्त पाने; प्रत्येक पानाच्या तळाशी एक किंवा दोन मुळे; पानांवर खालच्या बाजूस शिरांवर अनेक बीजुककोशांचे पुंज; बीजुककोश प्रारंभिक (जाड आवरण, अनेक बीजुके व विकास अनेक कोशिकांपासून झालेला); ते कधी सुटे तरी कधी जुळून वाढलेले; सर्व बीजुके सारखी; गंतुकधारी पिढी द्विलिंगी, मोठी व बहुवर्षायू; पहा Filicinae, Eusporangiatae.

**marcescent** अवर्धी अपाती
कोमेजलेला पण न गळता झाडावर राहणारा (अवयव).

**margin** धारा; कडा; किनार
पाने, उपपर्णे, संदले, प्रदले यासारख्या सपाट अवयवांची किनार; शरीराची सीमारेषा.

**marginal** धारास्थित; सीमांतिक
अवयवांच्या कडेने असणारे; प्रत्यक्ष कडांवर किंवा कडांखाली असणारे (दात, बीजके, बीजुककोश, प्रपिंड, केस, काटे, पुंजत्राण इत्यादी अवयव; उपांगे).

**marginicidal** धाराभिदुर

किंजदलाच्या किनारीवर ( किंजपुटाच्या शिवणीवर ) होणारा ( स्फोट=फळाचे तडकणे ); उदा. बाटाणा.

**maritimus (maritime)** समुद्री; सागरी; समुद्रवासी

समुद्रासंबंधी अथवा समुद्रतीरावरचे; समुद्राजवळ असणारे.

**marking** अंकन

कोशिकावरणावर आढळणारे अनेक प्रकारचे जाडीचे प्रकार; उदा. वलयाकार, सर्पिल इ.

**marsh-formation** पंक-समावास

दलदलीत ( पाणथळ ) जागी वाढणाऱ्या वनस्पतींचा नैसर्गिक समुदाय.

**Marsiliaceae** मार्सिलिएसी

जलनेचे या नेचांच्या गटात पूर्वी अंतर्भूत केलेले एक कुल; यात फक्त मार्सिलिया, पिल्युलॅरिया व रेग्नेलिडियम हे तीन वंश असून हल्ली या कुलाचा अंतर्भाव तनुबीजुककोशिक नेचांच्या उपवर्गात करतात. बीजुककोश दोन प्रकारचे ( लघु व गुरु ); बीजुककोशपुंज पानाच्या एका खंडाने किंवा रूपांतरित पानाने कायम वेढलेले असून त्या जटिल संरचनेस "बीजुकफल" म्हणतात. मूलक्षोड दलदलीत आडवे वाढते व खाली आगंतुक मुळे आणि वर चतुर्दली, द्विदली किंवा दलहीन पाने असतात. गंतुकधारी पिढी ऱ्हसित.
पहा Filicineae; Leptosporangiatae; Hydropteridales; sporocarp; sorus.

**Martyniaceae** वृश्चन कुल; मार्टीनिएसी

फुलझाडांपैकी विंचवी ( वृश्चन = वृश्चिक = विंचू ) व तत्सम इतर द्विदलिकित जातींचे कुल. एकूण वंश फक्त तीन व जाती नऊ; यांचा अंतर्भाव काही शास्त्रज्ञ तिल कुलात ( पेडॅलिएसीत ) करतात; प्रसार : उष्ण व उपोष्ण कटिबंध; हचिन्सन यांनी टेट्रू गणात (बिग्नोनिएलीझमध्ये ) केला आहे; तिल कुलाशी या कुलाचे साम्य आहे. प्रमुख लक्षणे : मांसल मुळे; फुलोरा मंजरी; फुले द्विलिंगी व पंचभागी; चार केसरदले कार्यक्षम व एक वंध्य; परागकोशांना शुंडिका; किंजपुट ऊर्ध्वस्थ; द्विखंडी तटलग्न बीजकाधानी; फळ ( बोंड ) अनेकबीजी; फळातील आवरण व प्रत्येक किंजदलाच्या टोकाचा भाग कठीण बनून त्याचे आकड्यासारखे उपांग बनते व प्राण्यांच्या शरीरास अडकून प्रसार होतो; पहा Pedaliaceae; Bignoniaceae.

**massula** फेनपुंजक

( १ ) काही जलनेचांमध्ये ( साल्व्हीनिया, ॲझोला ) आढळणारा शुष्क, फेसाळ, श्लेष्मल, लघुबीजुकयुक्त सूक्ष्म पुंजका.

( २ ) आमरे अथवा रुई कुलातील वनस्पतींत आढळणारा परागांच्या कणांचा पुंजका;
पहा pollinium.

**mat** दृढजाल

मुळ्या व जमिनीतील तंतूसारखे खोड ( मूलक्षोड) यांचे घट्ट विणल्यासारखे जाळे असलेला (वनस्पति-समुदाय).

**mating** संगम; मीलन

दोन प्रजोत्पादक कोशिकांचा पूर्ण मिलाफ ( एकरूप होणे ).

**matrix** आधात्री

कवक अथवा शैवाक ( दगडफूल ) ज्यावर वाढते ती आधारभूत वस्तू ( उदा. लाकूड, विष्ठा, कार्बनी पदार्थ, झाडांची साल इ. ); ज्यामध्ये कोशिका किंवा कणरूप वस्तूंना आधार मिळेल असे अंतराकोशिकी श्लेष्मल किंवा अधिक घनस्वरूप माध्यम ( उदा. प्राण्यांतील उपास्थि-कार्टिलेज ).

**matroclinous** मातृलक्षणी; मातृमुखी

मातेचे गुणदोष दर्शविणारा ( संकरज ).

**maturation** परिपक्वन

पूर्ण विकास होण्याची प्रक्रिया; उदा. पराग, गंतुके, बीजके, बीजुके, फळे, इ.

**meadow** शाद्वल

अनुकूल परिस्थितीत सलगपणे नरम व उंच गवतांचा प्रदेश; तृणसंघाताचा ( स्टेप्स ) एक प्रकार.
पहा steppes.

**mealy (farinaceous)** पिष्टमय; पिठुळ

भरपूर पीठ असलेले; उदा. काही स्त्रियांतील पुष्क.

**mechanical tissue system** आधार-ऊतक तंत्र; यांत्रिक ऊतक समूह ( व्यूह )

शरीरास मजबुती देणारा, तसेच नाजूक भागास संरक्षण देणारा सजीव किंवा बहुधा निर्जीव कोशिकांच्या समूहाचा संच किंवा अशा संचांचा व्यूह. उदा. काष्ठ, दृढोतक, स्थूलकोनोतक, इ.

**mechanism** यंत्रणा

यंत्राप्रमाणे चालणारी किंवा यांत्रिक पद्धतीचा उपयोग केलेली योजना अथवा संरचना.

**medial** मध्यवर्ती; मध्य–
मध्ये असलेली.

**median plane** मध्य-प्रतल; मध्यस्त पातळी
फुलाचा छद व अक्ष यांमधून जाणारी उभी पातळी. ( अग्रपश्च ).

**medium** माध्यम; मध्यस्थ
परागण किंवा फलन ह्या प्रक्रिया घडवून आणणारा साहाय्यक ( उदा. पाणी, वारा, प्राणी ).

**medulla ( pith )** निकाष्ठ; भेंड; मज्जा
साधारणपणे काष्ठयुक्त वनस्पतीतील मध्यभागी असलेले नरम ( मदू ) ऊतक;
पहा conjunctive tissue.

**medullary** निकाष्ठीय; भेंडयुक्त; मज्जायुक्त
भेंडात असलेले; भेंडासंबंधी.

**— bundle** मज्जावृंद
भेंडात विखुरलेले वाहक वृंद;
पहा vascular bundle.

**— ray** मज्जाकिरण; निकाष्ठ-किरण
भेंडापासून काष्ठातून बाहेर मध्यत्वचेत जाणाऱ्या मृदूतकाचे पदर ( स्तर ). द्विदलिकित वनस्पतींच्या द्वितीयक काष्ठात असे थर आढळतात.

**— sheath** निकाष्ठावरण; मज्जावरण
भेंडाभोवतीचे वाहक घटकांचे वर्तुळ; ऊतककरापासून निकाष्ठात येणारे प्राथमिक वाहक वृंद;
पहा cambium.

**— stele** मज्जारंभ
नेचाच्या खोडातील मध्यवर्ती वाहक ऊतकांचा संच;
पहा stele.

**medullate** मज्जायुक्त
भेंड असणारे ( खोड ).

**mega– ( megas )** गुरु– ; महा–; बृहत्–
मोठा या अर्थी उपसर्ग.

**— gamete** गुरुगंतुक; महायुग्मक
दोन प्रजोत्पादक कोशिकांपैकी मोठी व बहुधा स्त्रीलिंगी.

**— nucleus** गुरुप्रकल
दोन प्रकलांपैकी अधिक मोठे.

**— phanerophyte** गुरुवृक्ष; महावृक्ष
मोठा ( सुमारे तीस मीटर उंच ) बीजधारी वृक्ष.

**— phyllous** गुरुपर्णी; महापर्णी
मोठी पाने असलेली (वनस्पती ); उदा. नेचे.

**— phylly** गुरुपर्णत्व; महापर्णता
मोठी पाने असण्याची क्षमता.

**— scopic ( macroscopic )** नेत्रदर्शी; दृष्टिगोचर
विशेष साधनाशिवाय डोळ्यांना दिसणारे.

**— spermous** गुरुबीजी; महाबीजी
मोठे बीज असलेली ( वनस्पती ).

**— sporangiate** गुरुबीजुककोशिक
गुरुबीजुके असणारे कोश धारण करणारा अवयव (उदा. शंकु, फुल, इ. ) अथवा वनस्पती.

**— sporangium ( megasporium )** गुरुबीजुककोश; महाबीजाणुधानी
पहा macrosporangium.

**— spore** गुरुबीजुक; महाबीजाणु
स्त्री-गंतुकधारी निर्माण करणारे बीजुक.

**— sporophyll** गुरुबीजुकपर्ण; महाबीजाणुपर्ण
किंजदल; गुरुबीजुककोश धारण करणारे पान; बीजके धारण करणारे पान अथवा तत्सम अवयव.

**— sporocarp** गुरुबीजुकफल
फक्त गुरुबीजुककोश असलेले जटिल कोष्ठ; उदा. ॲझोला ( नेचा ).

**— sporocyte ( spore-mother-cell )**
गुरुबीजुकजनक कोशिका; महाबीजाणुजनक पेशी

**meiosis** न्यूनीकरण विभाजन; अर्धसूत्रण; अर्धसूत्री विभाजन
कोशिकेतील मूळच्या एका द्विगुणित प्रकलातील दुप्पट रंगसूत्रांची संख्या निम्मी ( एकपट ) करणारी व दोन एकगुणित प्रकले निर्माण करणारी प्रक्रिया; त्यानंतर लागलीच त्या प्रकलातील रंगसूत्रांची संख्या कायम ( एकपट ) ठेवून विभागणीची क्रिया होते व एकूण चार एकगुणित प्रकल बनतात. प्राणी व वनस्पती यांमध्ये गंतुके बनण्यापूर्वी ही प्रक्रिया घडून येते, त्यामुळे ती गंतुके किंवा बीजुके ( वनस्पतीत ) एकगुणित असतात; पहा mitosis.

**melanin** कालिकण; कृष्णरंजक
काही सूक्ष्मजंतूंतील काळा रंग.

**melanophyllous** गर्दवर्ण-पर्णी
गडद रंगाची पाने असलेले ( झाड ); उदा. बकूळ.

**melanospermous** गर्दवर्ण-बीजुकी-बीजी
गडद रंगाची बीजुके अगर बीजे असलेले.

**Melastomaceae** अंजनी कुल; मेलॅस्टोमेसी

लाखेरी, लोखंडी, अंजनी इत्यादी वनस्पतींचे ( द्विदलिकित ) कुल. याचा अंतर्भाव जंबुल गणात ( मिर्टलीझमध्ये ) करतात. प्रमुख लक्षणे : समोरासमोर किंवा झुबक्यांनी ( वर्तुळात ), साधी पाने असलेल्या ओषधी किंवा झुडपे अथवा लहान वृक्ष; फुले आकर्षक, नियमित, तीन किंवा अनेकभागी; केसरदले, संदले किंवा प्रदले यांच्या दुप्पट; किंजदले जुळलेली व तितकीच; मृदुफळ किंवा बोंड; बिया अपुष्क व अनेक.

**Meliaceae** निंब कुल; मेलिएसी

कडुनिंब, बकाणा निंब, निंबारा, तूण, मॅहोगनी, लाल चंदन इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा समावेश भांड गणात ( जिरॅनिएलीझमध्ये ) बेंथॅम व हूकर (आणि एग्लर व प्रॅंटल) यांनी केला आहे; परंतु हचिन्सन यांनी निंब कुलाला निंब गणाचा दर्जा दिला आहे. प्रमुख लक्षणे : झुडपे किंवा वृक्ष; पाने बहुधा पिसासारखी संयुक्त; फुले द्विलिंगी; संदले व प्रदले क्वचित जुळलेली; बहुधा केसरदलांची नळी अथवा पाच, सुटी; पाच किंवा कमी, जुळलेल्या ऊर्ध्वस्थ किंजदलांच्या किंजपुटात अनेक कप्पे व प्रत्येकात १–२ बीजके; किंजल एकच; फळे विविध; बिया एक किंवा अनेक.

**member** अंग; भाग; अवयव

वनस्पतीच्या स्वरूपवर्णनाच्या संदर्भात तिचा कोणताही भाग.

**membrane** पटल; पापुद्रा

सर्व सारख्या कोशिकांचा नाजूक अतिपातळ पडदा.

**membranaceous ( membranous )** पटलाभ; पटली

अतिपातळ पडद्यासारखे; उदा. शेवाळीचे पान.

**Mendelian character** मेंडेली लक्षण

पहा allelomorph.

**Mendelian inheritance** मेंडेली अनुहरण; मेंडेली वंशागति

मेंडेल यांनी शोधलेल्या नियमानुसार, पिढ्यानुपिढ्या चालू राहणारी, लक्षणांची परपरा; पहा Mendel's laws.

**Mendelism** मेंडेलवाद

अनेक संकर-प्रयोगांनी मेंडेल यांनी प्रकाशात आणलेली वनस्पतींतील अनुहरणविषयक माहिती व त्यावरून काढलेले निष्कर्ष; पहा Mendel's laws.

**Mendel's Laws ( Mendelism )** मेंडेलांचे नियम ( मेंडेलवाद )

ग्रेगर योहान मेंडेल या वनस्पतिशास्त्रज्ञांचे आनुवंशिकी शाखेतील मौलिक संशोधन, ह्या वरील शीर्षकाखाली प्रसिद्ध असून लॉक या शास्त्रज्ञांची तत्संबंधीची व्याख्या पुढे दिल्याप्रमाणे आहे : " विषमरंदुकाने ( संकरजाने ) निर्मिलेल्या गंतुकांमध्ये शुद्ध पैतृक वैकल्पिक लक्षणे परस्परांपासून अलग असून त्यांची गंतुकांमध्ये झालेली सांख्यिक वाटणी अशी असते की, त्यामुळे त्यांची शक्य तितकी मिश्रणे ( एकजूट ) संख्येने सारखी होतात. " उदाहरणार्थ : "ठेंगू विरुद्ध उंच" आणि "हिरव्या विरुद्ध पिवळ्या बिया" अशा दोन वैकल्पिक लक्षणांच्या वाटाण्याच्या शुद्ध प्रकारांचा संकर घडविला असता त्यापासून मिळणाऱ्या संततीत ( संकरजात ) ह्या चारही लक्षणांचे जनुक " अलग व स्वतंत्र " ( असे एकक स्वरूपात ) राहून पुढे जेव्हा हा संकरज प्रजोत्पत्ति करतो त्यावेळी त्याच्या संततीत ठेंगू व हिरव्या बियांची, ठेंगू व पिवळ्या बियांची, उंच व पिवळ्या बियांची आणि उंच व हिरव्या बियांची अशी चार प्रकारची " मिश्रणे " दर्शविणाऱ्या वनस्पती असतात. फक्त एकच वैकल्पिक गुणांची ( लक्षणांची ) जोडी लक्षात ठेवून केलेल्या मेंडेल यांच्या प्रयोगात हीच घटना दिसते : दोन्हीपैकी एक लक्षण ( संकरजात ) "प्रभावी" असून दुसरे "सुप्त" असते; परंतु संकरजाच्या पुढील संततीत मात्र लक्षणांचे स्वतंत्रपणे अनुहरण झाल्याने, तीन प्रकारच्या व्यक्ती आढळतात (प्रभावी लक्षण दर्शविणारी शुद्ध, प्रभावी लक्षणाची अशुद्ध व सुप्त लक्षण दर्शविणारी शुद्ध ) व त्यांचे प्रमाण १ : २ : १ असते. मेंडेल यांच्या संकरप्रयोगांच्या संशोधनातील मौलिक निष्कर्ष असे–

( १ ) प्राणी वा वनस्पती यांमध्ये वैकल्पिक लक्षणांचे अस्तित्व असून त्याबद्दल जबाबदार असे घटक (जनुक) गंतुकाद्वारे एका पिढीतून दुसरीत " स्वतंत्रपणे " उतरतात.

( २ ) अशा भिन्न प्रकारच्या शुद्धवंशी ( समरंदुकी ) व्यक्तींच्या संकराने निर्माण झालेल्या संकरजाचे (विषमरंदुकी ) स्वरूपात (सरूपविधा) काही लक्षणे प्रभावी व काही सुप्त असतात; संकरजाच्या पुढील संततीत काही व्यक्ती मूळच्या पितराप्रमाणे शुद्धवंशी तर काही संकरजाप्रमाणे अशुद्धवंशी ( विषमरंदुकी ) असून काही मूळच्या लक्षणांचे " नवीन मिश्रण " दर्शवितात; याचे कारण कोणत्याही गंतुकात दोन वैकल्पिक लक्षणां-

पैकी एकटे ( जनुक स्वरूपात ) असतें. वैकल्पिक लक्षणांच्या अनेक जोड्या असल्यास प्रत्येक जोडीतील एकच असते; म्हणजेच (३) गंतुके शुद्ध असतात; रंदुके मात्र शुद्ध किंवा अशुद्ध अशी दोन प्रकारची असू शकतात. मेंडेल यांच्या प्रजोत्पत्तीसंबंधाच्या व लक्षणांच्या अनुहरणासबंधीच्या या संकल्पनेस मेंडेल यांची उपपत्ति ( मेंडेलवाद ) म्हणतात. या संकल्पनेत मेंडेलांच्या पश्चात् झालेल्या अनेक प्राणी व वनस्पती यांच्या संबंधीच्या संशोधनामुळे काही फरक पडले आहेत; तथापि काही बाबी अबाधित आहेत.
पहा allelomorphic pair of characters; gene; homozygous; heterozygous; inheritance.

**Menispermaceae** गुडूची कुल; मेनिस्पर्मेसी
गुळवेल ( गुडूची ), वसनवेल, काकमारी, पहाडवेल, इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा समावेश मोरवेल गणात (रॅनॅलीझमध्ये) केलेला आढळतो. प्रमुख लक्षणे : लहानमोठ्या वेली, झुडपे व वृक्ष; एकाआड एक साधी पाने; एकलिंगी, विभक्त वनस्पतींवर, बहुधा विखुरलेली, नियमित, लहान, फिकटरंगी, त्रिभागी फुले; किंजदलाखेरीज इतर पुष्पदलांची दोन दोन वर्तुळे; ऊर्ध्वस्थ किंजदले सुटी, अनेक किंवा एक व प्रत्येकात एक बीजक; आठळीफळ; पहा Ranales.

**merenchyma** कवकोतक; कवकोति
पहा plectenchyma.

**mericarp** फलांश; अंशफल
शुष्क फळ भंगून त्यापासून सुटे होणारे एकबीजी व बहुधा न फुटणारे भाग; उदा. लाजाळू, कोथिंबीर, एरंड, चक्रमेंडी, जिरेनियम, इत्यादींची फळे;
पहा schizocarpic; coccus; lomentum.

**meristele** रंभक
एकच मध्यवर्ती रंभ असलेल्या खोडावरील प्रत्येक पानाशी संबंधित असा रंभाचा भाग; उदा. ऑफिओग्लॉसम नेचा.

**meristem** विभज्या; विभाजी ऊतक
ज्यापासून पुढे विशेष प्रकारची ऊतके, अवयव व उपांगे बनतात असे विकसनशील ( सतत नवीन कोशिका निर्माण करणारे) ऊतक किंवा एकच कोशिका अथवा अनेक ऊतकांचे थर; खोड, मूळ, शाखा यांच्या टोकास, तसेच विशेषतः द्विदलिकित वनस्पतींच्या व प्रकटबीज वनस्पतींच्या अवयवांतील काही वर्धनशील स्थानांत, इतर स्थायी ऊतकांसरिघ अशी ऊतके आढळतात; नेचाभ वनस्पतींच्या व काही कायक वनस्पतींच्या विभज्येत एकच कोशिका असते;
पहा cambium; phellogen.

**—, primary** प्राथमिक विभज्या
प्रारंभापासून कार्यक्षम असणारा व कोवळ्या अवयवांच्या सर्व ऊतकांची निर्मिती करणारा ऊतकसमूह; खोडाच्या व मुळांच्या टोकास असलेल्या ह्या अग्रस्थ विभज्येमध्ये तीन भाग ( आद्यत्वचा, पूर्वोतककर व तल्पविभज्या ) आढळतात; पहा protoderm; promeristem; ground meristem; procambium.

**—, secondary** द्वितीयक विभज्या
स्थायी ( कायम ) पण जिवंत कोशिकांच्या समूहापासून ( ऊतकापासून ) बनलेले वर्धनशील ऊतक; उदा. त्वक्षाकर; पहा phellogen; interfascicular cambium.

**--- merous** --भागी
एखाद्या अवयवातील (किंवा इंद्रियातील) भागांची संख्या दाखविणारा प्रत्यय; उदा. त्रिभागी, पंचभागी, इ.
पहा trimerous, pentamerous.

**meristematic** विभाजी
सतत वाढत राहणाऱ्या ऊतकांची किंवा कोशिकेची लक्षणे दर्शविणारा घटक.

**— cell** विभाजी कोशिका
सतत विभागणीने संख्यावाढ करणारी कोशिका ( पेशी ).

**mesarch** उभयवर्धी
दोन्ही बाजूस आदिप्रकाष्ठ असलेले ( प्रकाष्ठ किंवा वाहक वृंद ); अनुप्रकाष्ठाने सभोवार वेढलेला आदिरंभ;
पहा protoxylem; xylem; metaxylem.

**mesocarp** मध्यकवच
फळाच्या सालीच्या तीन भागांपैकी मधला थर; मृदुफळात किंवा आठळी असलेल्या ( अश्मगर्भी ) फळात हे थर स्पष्ट दिसतात; उदा. संत्रा, आंबा, इ.

**mesophanerophyte** मध्यम बीजी वृक्ष; मध्यमवृक्ष
८ ते ३० मी. उंचीचे बहुवर्षायू व कळ्यांना अपुरे संरक्षण असलेला बीजधारी वृक्ष.

**mesophloem ( middle or green bark );** मध्यपरिकाष्ठ
बाह्य सालीच्या आतील हिरवट भाग; यामध्ये द्विती-

यक परिकाष्ठाचा काही ( बाहेरील ) भाग अंतर्भूत असतो.

**mesophyll** मध्योतक; मध्योति; पर्णमध्योति
पानातील वाहक वृंद ( किंवा रंभ ) आणि अपित्वचा-या खेरीज इतर सर्व ऊतकसमूह.

**mesophyte** मध्यवनस्पति
जमिनीतील व हवेतील ओलाव्याबाबत कधीही दुर्भिक्ष किंवा अतिरेक नसलेल्या ठिकाणी वाढणारी वनस्पती. उदा. आंबा, काजू, वड, पिंपळ, इ.

**mesopodium (leaf-stalk)** वृंत; देठ
पानाचा देठ.

**mesothermophilous ( mesothermic )** शीतकटिबंधीय
शीतकटिबंधातील ( वनस्पती ).

**mestome bundle** सूत्रहीन वृंद
दृढकोशिका व सूत्रे यांचा अभाव असलेला वाहक वृंद; पहा hadrome, leptome.

**metabolic** चयापचयी
चयापचयातील किंवा त्यासंबंधी.

**metabolism** चयापचय
कोशिका किंवा शरीर यात सतत चालू असलेली, जैव, विधायक व विध्वंसक रासायनिक प्रक्रिया. आत घेतलेल्या पदार्थांचे रूपांतर, संचय व ऊर्जा निर्माण करून सजीवास कार्यक्षम बनविण्याची क्रिया;
पहा anabolism; katabolism.

**metabolite** चयापचयोत्पाद
वर वर्णन केलेल्या चयापचयातून निर्माण झालेले पदार्थ ( उपयुक्त व टाकाऊ ).

**Metachlamydeae ( Sympetalae)** युक्तप्रदली उपवर्ग
संवर्त आणि जुळलेल्या पाकळ्यांचा पुष्पमुकुट असलेल्या द्विदलिकित वनस्पतींचा एंग्लर आणि प्रँटल यांच्या पद्धतीतील उपवर्ग. यात पाच गणांचा अंतर्भाव केला आहे. यांमध्ये फुलात एकूण चार किंवा पाच मंडले असतात; उदा. तिंदुक कुल, मधूक कुल, पारिजातक कुल, कर्कटी कुल, मंजिष्ठ कुल, इ.
पहा Archichlamydeae.

**metagenesis** पिढ्यांचे एकांतरण
सुस्पष्ट असे गंतुकधारी व बीजुकधारी यांचे एकानंतर दुसरे व त्यानंतर पुन्हा पहिले असे जीवनचक्र. उदा. शेवाळी, नेचे इ. पहा alternation of generations.

**metamorphosis** रूपांतरण
एखाद्या अवयवाचे दुसऱ्यात रूपांतर होण्याची प्रक्रिया ( प्रकार ); उदा. केसरदलांचा पाकळ्यात बदल (रूपांतरण ); हे व्यक्तीच्या किंवा जातीच्या विकासात होते. उपपर्णांचे किंवा पानांचे काट्यात रूपांतरण; उदा. काही निवडुंग; पहा ontogeny; phylogeny; Euporbiaceae; Cactaceae.

**metaphase ( metakinesis)** मध्यावस्था
कोशिकेच्या विभाजनात रंगसूत्रांची तर्कूच्या मध्यावर पसरलेली अवस्था; यात स्वतंत्र रंगसूत्रे किंवा रंगसूत्रार्धे स्पष्ट असतात. पहा mitosis; meiosis.

**metaphloem** अनुपरिकाष्ठ
आदिपरिकाष्ठानंतर बनलेला प्राथमिक परिकाष्ठाचा भाग; पहा protophloem.

**metaphysis** सहसूत्र
पहा paraphysis.

**metastasis** ( १ ) प्रक्षेपण; ( २ ) चयापचय
( १ ) नित्य स्थानावरून अवयवाचा अन्य स्थानावर उगम. ( २ ) पहा metabolism.

**metasyndesis ( telosynapsis; syndeosis )** अग्रसंलग्न
कोशिकेच्या विभागणीत रंगसूत्रांच्या जोड्या बनतेवेळी ( मध्यावस्था ) परस्परांच्या टोकास चिकटून राहण्याचा प्रकार.

**metatype** मूलस्थानरूप
मूळच्या स्थानातून संकलकाने आणलेली ( अधिकृत) वनस्पती.

**metaxylem** अनुप्रकाष्ठ
आदिप्रकाष्ठानंतर बनलेला प्राथमिक प्रकाष्ठाचा भाग.

**metoecious** भिन्नाश्रयी
पहा heterocious.

**micrandre** ऱ्हस्व नरतंतु ( पुं-तंतु )
पहा dwarf male; nanandrous.

**micranthous** लघुपुष्पी
लहान फुले असलेले.

**micro--** सूक्ष्म- ; लघु- ; अल्प-
अतिलहान या अर्थी उपसर्ग.

— **aplanospore** सूक्ष्म अचरबीजुक
अति लहान व हालचाल न करणारे बीजुक ( प्रजोत्पादक अलिंगी कोशिका ); उदा. शैवले, काही कवक.

— **biology** सूक्ष्मजीवविज्ञान
विषाणू, सूक्ष्मजंतू, सूक्ष्मजीव यासंबंधीची ज्ञानशाखा.

— **biotic** सूक्ष्मजैव
सक्ष्म जीवासंबंधी.

— **body** सूक्ष्मकाय
अति लहान कण.

— **conidium** लघुविबीजुक
पहा conidium.

— **cyst** लघुकोष्ठ
पहा cyst.

— **fibril** सूक्ष्मसूत्रक
अत्यंत सूक्ष्म धागा.

— **flora** सूक्ष्मपादपजात
विशिष्ट स्थानी आढळणारा अतिलहान वनस्पतींचा समूह किंवा त्यांचे वर्णन.

— **fossil** सूक्ष्मजीवाश्म
अत्यंत लहान जीवांचे भूस्तरातील अवशेष; उदा. करंडक वनस्पती; काही मृदुकाय प्राणी.

— **fungi** लघुकवक
लहान हरितद्रव्यहीन वनस्पती; पहा fungi.

— **gamete** सूक्ष्मगंतुक
दोन गंतुकांपैकी ( प्रजोत्पादक लगिक कोशिकापैकी ) लहान ( बहुधा नर ).

— **gametophyte** सूक्ष्म गंतुकधारी; लघुयुग्मकोद्भिद; सूक्ष्म पुं-गंतुकधारी
पुं– (नर) गंतुके निर्मिणारी अतिलहान पिढी; उदा. सिलाजिनेला.

— **meter** सूक्ष्ममापक
सूक्ष्मदर्शी यंत्रातून सूक्ष्म पदार्थांची ( उदा. स्टार्चकण, स्फटिक, वनस्पती व प्राणी आणि त्यांचे भाग, इ. ) लांबी, रुंदी, व्यास इ. मोजण्याचे साधन (काचपट्टी), छादनी किंवा नेत्रभिंग; पहा eyepiece.

— **nucleus** लघुप्रकल; सूक्ष्मप्रकल
कोशिकेतील ( सूक्ष्म प्राणी किंवा वनस्पतीतील ) बहुधा दोन प्रकलांपैकी लहान प्रकल; प्रकलाच्या खंडनामुळे स्वतंत्र झालेल्या शकला ( खंडा ) पैकी एक.

— **organism** सूक्ष्मजीव
फक्त सूक्ष्मदर्शकाच्या साहाय्याने दिसू शकणारे अत्यंत लहान सजीव ( प्राणी, वनस्पती, सूक्ष्म जंतू ).

— **parasite** सूक्ष्मजीवोपजीवी
अत्यंत लहान व दुसऱ्या जीवावर उपजीविका करणारा सजीव; उदा. काही सूक्ष्मजंतू, आदिजीव इ.

— **phanerophyte** लघुबीजीवृक्ष; लघुवृक्ष
सुमारे २ ते ८ मी. उंचीचे क्षुप किंवा लहान वृक्ष.

— **photograph** सूक्ष्म छायाचित्र
अत्यंत लहान वस्तूचे छायाचित्र.

— **phyll** लघुपर्ण
लहान पान; उदा. *Pilea microphylla* ( L. ) Liebm.

— **phyllous** लघुपर्णी
लहान पाने असलेली ( वनस्पती ); उदा. सिलाजिनेला, लायकोपोडियम, इ.

— **phylly** लघुपर्णता
लहान पाने असण्याचा प्रकार.

— **phyte** सूक्ष्म ( लघु ) पादप
उदा. सूक्ष्म जंतू, शैवले.

— **phytic formation** सूक्ष्मपादप समावास
फक्त सूक्ष्म वनस्पतींचा नैसर्गिक समुदाय.

— **pylar** बीजकरंध्र– ; बीजांडद्वार– ; बीजांडद्वारीय

— **pyle** बीजकरंध्र; बीजांडद्वार
बीजकातील प्रदेहाच्या टोकावरील लहान भोक; बीज रुजताना ह्या छिद्रातून पाणी शोषले जाते व मोड (आदिमूळ ) प्रथम बाहेर येतो.

— **scope** सूक्ष्मदर्शक; सूक्ष्मदर्शी
सूक्ष्म वस्तूंचे निरीक्षण करून त्यासंबंधीचे तपशील समजून घेण्यास उपयुक्त असे यांत्रिक साधन.

— **scopic** सूक्ष्म; सूक्ष्मदर्शीय

— **scopy** सूक्ष्मदर्शिकी
सूक्ष्मदर्शकासंबंधाची समग्र माहिती ( संरचना, उपयोग, वापरण्याची पद्धत, निरीक्षणाकरिता आवश्यक ते प्राणी वा वनस्पती यांवर करण्याचे संस्कार, इत्यादी तपशील ).

— **some** सूक्ष्म कण
प्राकलातील अत्यंत सूक्ष्म कण.

— **species** सूक्ष्मजाती
जातीचा एक लहान प्रकार.

**— spermous** लघुबीजी
लहान बीजे असलेली.

**— sporangium** लघुबीजुककोश
दोन प्रकारच्या बीजुकांपैकी लहान बीजुके असलेला पिशवीसारखा अवयव; उदा. सिलाजिनेला.

**— sporangiate** लघुबीजुककोशिक
लहान बीजुके असणाऱ्या बीजुककोशांची (किंवा पराग-कोशांची) निर्मिती करणारी नर-पुष्पे (केसर-पुष्पे) यांची निर्मिती करणारी (वनस्पती अथवा लघुबीजुक-कोश निर्मिणारे फूल किंवा शंकू).

**— spore** लघुबीजुक; लघुबीजाणु
दोन प्रकारच्या बीजुकांपैकी लहान; परागकण.

**— sporophyll** लघुबीजुकपर्ण
लघुबीजुककोश धारण करणारे पान अगर तत्सम उपांग, छद, शल्क, इ.

**— sporocarp** लघुबीजुकफल
लघुबीजुककोश असलेला बंद बोंडासारखा अवयव; उदा. ॲझोला (जलनेचांपैकी).

**— sporocyte** लघुबीजुकजनककोशिका; लघुबीजाणुजनकपेशी
लघुबीजुके निर्माण करणारी मातृकोशिका.

**— sporogenesis** लघुबीजुकनिर्मिती
लघुबीजुकांचे उत्पादन व विकास.

**— sporous** लघुबीजुकी
लहान बीजुके असणारी (वनस्पती).

**— stome** लघुतुण्ड
लहान छिद्रस्वरूप द्वार.

**— stomous flower** लघुतुण्डी पुष्प
लहान तोंडाचे (पुष्पमुकुटाच्या द्वाराचे) फूल; उदा. सदाफुली, जाई, जुई, इत्यादी.

**— stylous** लघुकिंजली
आखुड व लांब किंजलाच्या (द्विरूप) फुलांपैकी आखुड किंजलाचे.

**— symbiont** लघुसहजीवी
दोन सहजीवीपैकी (एकत्र राहणारी) लहान; उदा. ॲझोला वनस्पतीच्या पानातील नील-हरित शैवल, ॲनाबीना; सायकसातील नॉस्टॉक, पहा symbiosis.

**— tome** सूक्ष्मछेदक
वनस्पती अथवा प्राणी यांच्या लहान शरीराचे किंवा अवयवांचे अतिसूक्ष्म काप (छेद) काढण्याचे यांत्रिक साधन.

**— tubule** सूक्ष्मनलिका
अतिलहान वेजाची नळी.

**— zooid** सूक्ष्मचरगंतुक
अत्यंत लहान व चलनशील प्रजोत्पादक कोशिका; उदा. व्हॉल्व्हॉक्स, स्फेरेला, युलोथ्रिक्स इ. शैवले.

**— zoospore** सूक्ष्मचरबीजुक
अत्यंत लहान व अस्थिर बीजुक; उदा. काही शैवले (युलोथ्रिक्स); कवक इ.

**microbe** सूक्ष्मजीव
उदा. आदिजीव, सूक्ष्मजंतु.

**micron** मायक्रॉन
मिलिमीटरचा एक हजारांश; सूक्ष्म दर्शकाखाली वस्तू मोजण्याचे एकक.

**middle lamella** मध्यपटल
दोन कोशिकांमधील सामान्य प्राथमिक पातळ पडदा; याच्या दोन्ही बाजूस त्या कोशिकांचे स्वतंत्र आवरण बनते.

**mid-rib (mid-vein)** मध्यसिरा; मध्यशीर
पानातील पात्यामध्ये तळापासून टोकापर्यंत गेलेली प्रमुख शीर; ही देठातून अखंडितपणे आलेली दिसते.

**migration** स्थलांतर; स्थानांतर
पूर्वी नसलेल्या ठिकाणी प्रवेश किंवा आक्रमण करून सुस्थित होणे.

**mildew** भुरी; बुरा
एरिसायफी या कवकांच्या गटातील व विबीजुके निर्माण करून रोगाचा फैलाव करणारी वनस्पती. हिचे भुरकट रंगाचे ठिपके (किंवा आवरण) पानावर भुकटी टाकल्याप्रमाणे दिसते; ती तंतुमुक्त असल्यास 'तंतुभुरी' (sooty mildew) व भुकटीसारखी असल्यास 'चूर्णभुरी' (powdery mildew) म्हणतात.

**milk (latex)** चीक
वनस्पतीतील चिकाला सामान्यपणे दिलेले इंग्रजी नाव; त्यावरून Milk tree (*Brosimum galactodendron* D. Don.) व्हेनेझुएलातील एक दूध देणारे झाड; Milk weed (Asclepias sp.); दुधवेल (*Hoya wightii* Hook). Milk bush (*Euphorbia tirucalli* L.) नांग्याशेर.

**mimicry** अनुकृति; मायावरण
बहुधा संरक्षणाकरिता किंवा प्रसाराकरिता दुसऱ्या जातीच्या वनस्पतीची, प्राण्याची, अथवा अवयवाची

(फसवी) नक्कल. उदा. एरंडाचे बी किंवा घेवडा, सिताफळ, रामफळ इत्यादींचे बी कीटकांचे अनुकरण (शरीरसादृश्य) करतात; काही कीटक पानांची नक्कल किंवा काटकीचा आभास करतात.

**Mimosaceae** शिरीष कुल; लज्जालु कुल; मिमोझेसी :
शिकेकाई, शिरीष, लाजाळू (लज्जालु), बाभूळ, शमी गारदळ, इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; याचा अंतर्भाव क्षिंबी (शिंबावंत) गणात केला जातो. प्रमुख लक्षणे : पिसासारखी संयुक्त पाने असलेली झुडपे किंवा वृक्ष; लहान, नियमित, तीन, पाच किंवा सहा सहा पुष्पदलांची मंडले असणारी व बहुधा गुच्छाकृती किंवा कणिश प्रकारच्या फुलोऱ्यावर येणारी फुले; पाकळ्या क्वचित जुळलेल्या व अवार्किंज; केसरदले कधी सुटी तर कधी एकत्र जुळलेली; एका किंजदलाच्या किंजपुटात एक किंवा अनेक बीजके; शिंबा (फळ) कधी फुटून लहान एकबीजी न तडकणारे खंड (फलांश) बनतात; अपुष्क बिया.
पहा Leguminosae.

**miscibility** मिश्रणीयता
दोन द्रव पदार्थ परस्परांशी एकरूप होण्याची उभयतांतील क्षमता.

**mitochondria (chondriosomes)** कलकणु
कोशिकेतील प्रकलापासून निघालेले रंज्यद्रव्याचे विशिष्ट कण; त्यांची संरचना जटिल व आकार भिन्न असून त्यांत वितंचके असतात; हरित्कणूंचा उगम यांचेपासून होत असावा असे मानतात.

**mitosis (equatorial division)** समविभाजन
कोशिकेच्या प्रकलातील द्विगुणित रंगसूत्राच्या संख्येत बदल न करता, फक्त प्रत्येक रंगसूत्र उभे विभागून पुन्हा सारख्या रंगसूत्रांची दोन प्रकले बनविली जाणारी, कोशिका-विभागणीची प्रक्रिया. प्राणी व वनस्पती यांच्या शरीराची वाढ करणारी कोशिका–विभागण्याची पद्धती. ही प्रकलाची विभागणी पूर्वावस्था, मध्यावस्था, पश्चावस्था व अंत्यावस्था ह्या चार स्वरूपातून घडून येते व शेवटी प्रकलाबरोबर सर्व कोशिकेच्या दोन सारख्या कोशिका बनतात; पहा prophase; metaphase; anaphase; telophase.

**mitra** (१) फणा (फडी); (२) भूछत्रशिर
(१) फडीच्या आकाराची पाकळी; (२) काही कवकाच्या जाड गोलसर छत्रासारखा शिरोभाग.

**mitriform (mitrate)** फणाकृति; छत्राकृति; कुंचारूप
वर वर्णिल्याप्रमाणे असलेला.

**mixed** मिश्र
अनेक प्रकारच्या वनस्पतींचे (घटकांचे) मिश्रण असलेले;

**— bud** मिश्र कलिका.
कोवळी पाने व फुलांचे अविकसित भाग एकत्र असलेली कळी.

**— forest** मिश्रवन
भिन्न (पानझडी, सदापर्णी, खुरटी, व वेली, इ.) प्रकारच्या वनस्पतींचे मिश्रण असलेले जंगल.

**— formation** मिश्र समावास
परस्पराशेजारी असलेल्या दोन किंवा तीन प्रकारच्या समावासांचे मिश्रण असलेला वनस्पतींचा समुदाय; उदा. तळ्यातील मोठ्या तरंगणाऱ्या, लहान तरंगणाऱ्या आणि बुडून राहणाऱ्या (निमज्जित) वनस्पतींचा असे तीन समुदाय एकत्र असलेला संमिश्र समुदाय आढळतो.

**— inflorescence** मिश्र पुष्पबंध (फुलोरा)
एका प्रकारच्या (अकुंठित) फुलोऱ्यात असलेले दुसऱ्या प्रकारचे (कुंठित) फुलोरे; उदा. गवते, भूर्ज कुल, तुळस, ओसाडी (स्तबकांची परिमंजरी) इ.

**— pith** मिश्र निकाष्ठ (मेंड), मिश्र मज्जा
मृदूतकात विखुरलेल्या वाहिका किंवा घनकोशिका असलेले मेंड.

**— sorus** मिश्र (बीजुककोश) पुंज; मिश्रपुंज
बीजुककोशांची पक्व होण्याची वेळ व स्थान यांमध्ये अनियमितपणा असलेला समूह (पुंज); उदा. नेफ्रोलेपिस नेचा; पहा mixtae.

**— vessel** मिश्रवाहिनी
भिन्न प्रकारच्या जाडीचे प्रकार (एकाच वाहक घटकावर) असणारा नळीसारखा वाहक घटक;
पहा vessel.

**mixo-chimaera** मिश्र विचित्रोतकी
कृत्रिमरीत्या दोन भिन्न वाणांच्या कवकांच्या तंतूतील अंतर्द्रव्य मिसळून बनविलेला विचित्र प्रकार.

**— chromosome** मिश्र रंगसूत्र; मिश्र गुणसूत्र
नित्य रंगसूत्रापैकी दोन्हींच्या मिश्रणाने बनलेले नवीन रंगसूत्र.

**mixtae** मिश्रपुंजी

स्थान व कालसापेक्ष क्रमाने पक्व न होणारे असे बीजुककोशाचे पुंज धारण करणारे समबीजुक नेचे; बीजुककोश पुंजातील काही कोश प्रथम व काही नंतर पक्व होतात, परंतु त्यांच्या स्थानांशी पक्वतेचा संबंध नसतो.

**mobile** चल; चंचल; चलनक्षम

सहज हालणारे; वनस्पतींचे काही अवयव किंवा सुट्या वनस्पती; उदा. परागकोश, काही एककोशिक शैवले. वारा किंवा समुद्राच्या लाटा यामुळे स्थानांतर करणारी वालुकाराशी.

**mobility** चलनक्षमता; गतिशीलता

हालचाल करण्याची किंवा स्थलांतर करण्याची पात्रता.

**modification** रूपांतर; परिवर्तन

बाह्य परिस्थितिनुसार घडून येणारे (अस्थिर) तात्पुरते किंवा स्थिर बदल; पिढ्यान्‌पिढ्या चालू असलेले तात्पुरते बदल कायम स्वरूपात गेल्याची उदाहरणे आहेत. खोड, पाने व मुळे यांची काही कायम रूपांतरे काटे, तणावे या स्वरूपात आढळतात.

**mode of life** जीवनपद्धति; जीवनरीती

विशेषेकरून अन्नग्रहणाच्या किंवा क्रियाशीलतेच्या प्रकारात अनुकूल ठरलेला जीवनक्रम; उदा. शवोपजीवी, जीवोपजीवी, निष्क्रिय, क्रियाशील, इ.

**model** प्रतिकृति; आदर्श

वनस्पती अथवा प्राणी यांच्या शरीराच्या अवयवांची किंवा संरचनेची हुबेहूब नमुना दर्शविणारी कृति (चित्र), नियमाप्रमाणे बनविलेले व संवर्धन केलेले नमुनेदार आणि अपेक्षेप्रमाणे इच्छित फल देणारे ( उदा. शेत. पीक, उद्यान, लागवड इ. ).

**molecular biology** रेणवीय जीवविज्ञान

प्राणी व वनस्पती यांतील जीवद्रव्याच्या संरचनेतील रेणू व अणू यांची माहिती व त्यानुसार जीवद्रव्याची संघटना, त्याचा उगम, त्याचे गुणधर्म, विशेषतः सजीवांचे वर्तन यावर प्रकाश टाकणारी विज्ञानाची शाखा; सजीव व निर्जीव यातील मूलभूत फरक समजून येण्यास, पृथ्वीवर जीवांची निर्मिती कशी झाली व इतर ग्रहावर जीवन असणे शक्य आहे किंवा कसे हे समजण्यास या माहितीचा उपयोग होतो. आनुवंशिकता ही घटना समजण्यासही या शाखेतील माहिती अधिकाधिक मिळण्याचे संशोधन सुरू आहे.

**molecule** रेणु

एखाद्या पदार्थाचा सर्वात लहान घटक कण; मूळच्या पदार्थाचे सर्व गुण यात असून तो स्वतंत्र राहू शकतो. रेणू फुटून त्याचे भाग ( अणू ) अलग होतात.

**mon-** ग्रीक उपसर्ग

एक या संख्येचा संबंध दर्शविणारा ग्रीक उपसर्ग.

**— adelphous androecium** एकसंघ

फुलातील सर्व केसरदलांचा एकच स्तंभ ( जुडगा ) असलेले ( फूल किंवा केसरमंडल ); उदा. जास्वंद, गुलखेरा.

**— androus** (१) एककेसरदली; (२) एकरेतुकाशयी

(१) एकच केसरदल असलेले; उदा. कर्दळ, काजू, आले व काही आमरे यांची फुले; यामध्ये कार्यक्षम केसरदल एक असतो.

(२) एकच नर चरगंतुके बनविणारे अवयव असणारे.

**— andry** एककेसरत्व

फुलात फक्त एकच केसरदल असण्याचा प्रकार; उदा. युफोर्बिया वंशातील चषकरूप (पेल्यासारख्या) फुलोऱ्यातील नरपुष्पे एककेसरदली व स्त्रीपुष्प तीन किंजदलांचे असते.

**— anthous** एकपुष्पी

एकच फूल असलेली ( वनस्पती किंवा फुलोरा ) उदा. झेफिर लिली.

**— arch** एकसूत्र; एकादिप्रकाष्ठी

एकच आदिप्रकाष्ठ असलेले प्रकाष्ठयुक्त वाहकवृंद; उदा. सिलाजिनेलाचे मूळ.

**moniliform** मालाकृति

पहा monoliform.

**mono** एक—

एक या अर्थी उपसर्ग.

**— ecious** एकत्रलिंगी

दोन प्रकारची ( नर- व स्त्री- ) फुले एकाच झाडावर असण्याचा प्रकार. उदा. भोपळा, एरंड, इ.; अबीजी वनस्पतींत कधी दोन्ही प्रकारची जननेंद्रिये एकत्र असलेल्या गंतुकधारीला हेच विशेषण लावतात; पहा dioeceous.

**— embryony** एकगर्भत्व

एका बीजात एका गर्भाचे उत्पादन करण्याचा प्रकार; उदा. बहुतेक फुलझाडे. क्वचित अनेक गर्भ असतात.

**— carp ( monocarpic, monocarpean )** एकप्रसवी

एकदाच फुले येणारी एकवर्षायू किंवा अन्य वनस्पती; उदा. टाकळा, केळ, तुळस, इ.

— **carpellary** एकार्किंज; एककिंजदली
एक किंजदल असलेले (फूल अगर किंजमंडळ); उदा. शिंबी कुल.

— **carpic, biennial** एकप्रसवी द्विवर्षायु
एकदाच फुले येणारी, परंतु दोन वर्षे जिवंत राहणारी उदा. मुळा, गाजर.

—, **perennial** एकप्रसवी बहुवर्षायु
अनेक वर्षांच्या जीवनात एकदाच फुले व फळे येऊन नष्ट होणारी (वनस्पती); उदा. घायपात, बांबू.

— **cephlic** एकशीर्षक
एकच स्तवक फुलोरा असलेली (वनस्पती) उदा. दुधळ (Dandelion); एकदांडी (*Tridax procumbens* L.)

— **chasial cyme (monochasium)** एकशाखी वल्लरी
एक प्रमुख अक्ष असलेला कुंठित फुलोरा. पहा uniparous cyme; cyme.

— **chlamydeae (Monochlamydeous)** एकावृत (एक परिदली) उपवर्ग
परिदलांचे एकच मंडल असलेली फुले धारण करणाऱ्या द्विदलिकित फुलझाडांचा गट; बेथॅम व हूकर यांच्या वर्गीकरण- पद्धतीतील तिसरा उपवर्ग; क्वचित परिदले नसतात. एंग्लरांच्या पद्धतीत याचा समावेश आद्य- परिदली श्रेणीत किंवा उपवर्गात केला आहे व त्या मध्ये सुमारे तीस कुलांचा समावेश केला आहे व ती नऊ गणात विभागली आहेत; ही पद्धत अधिक ग्राह्य मानली आहे (पहा Choripetalae); हचिन्सन यांनी ह्या उपवर्गाला विभाग मानला आहे.

— **clinous** द्विलिंगी
(१) केसरदले व किंजदले एकत्र असलेली फुले;
(२) सर्वच फुले द्विलिंगी असलेला स्तबक फुलोरा.

— **cotyledon** एकदलिकित; एकबीजपत्री.
बीजात एक दलिका (डाळिंबी) असलेली वनस्पती; उदा. गवते; ताल-कुल. सामान्य भाषेत 'एकदल' ही संज्ञा रूढ आहे.

— **cotyledonous** एकदालिकित; (वनस्पती किंवा बीज); एकबीजपत्री

— **cotylae (Monocotyledoneae)** एकदलिकी उपवर्ग
बीजी वनस्पतींपैकी फुलझाडांच्या वर्गातील एक उपवर्ग; अलिकडे मात्र काहींनी द्विदलिकित व एकदालिकत हे वर्गच मानले आहेत (एंग्लर व प्रँटल, बेसी, बेथॅम व हूकर) व फुलझाडांना बीजी वनस्पतींत उपविभाग मानले आहे; पहा Angiospermae; phanerogameae.

— **cyclic** (१) एकचक्रीय; (२) वर्षायु
(१) प्रत्येक प्रकारच्या अवयवांचे एकच मंडल असलेले (फूल); उदा. धोतरा, सदाफुली इ.
(२) एक वर्ष किंवा त्याहून कमी जीवनकाल असलेली (वनस्पती).

— **dynamous** एकोन्नत
इतरांपेक्षा एकच केसरदल अधिक उंच असलेले (केसरमंडल); उदा. काजू.

— **ecious** एकत्रालिंगी
दोन्ही (पुं- व स्त्री-) फुले किंवा जननेंद्रिये एकाच झाडावर असणारे.

— **ecism** एकत्रालिंगता
दोन प्रकारची फुले एकाच झाडावर असण्याचा प्रकार; उदा. एरंड, हॅझेल, भोपळा, मका.

— **eciously polygamous** एकत्रलिंगी बहुयुतिक
एकलिंगी व द्विलिंगी फुले एकाच झाडावर असलेली (वनस्पती); उदा. मोई (*Odina wodier* Roxb).

— **gynous** एककिंजी
एक किंजदल असलेले (फूल; किंजमंडल).

— **liform** मालाकृति
मण्यांच्या माळेप्रमाणे; उदा. काही नील हरित शैवले.

— **hybrid** एकसंकरज
एका वैकल्पिक जोडीतील लक्षणांत फरक असलेल्या आईबापापासून झालेली संकरप्रजा (अपत्य); पहा allelomorph.

— —**cross** एकगुण संकर
वैकल्पिक गुणांच्या एका जोडीबाबत केलेला संकर.

— **locular (unilocular, one-celled)** एकपुट
एक कप्पा असलेला (किंजपुट, परागकोश).

— **petalous** युक्तप्रदल; एकप्रदल
जुळलेल्या पाकळ्यांचे; एकच पाकळी असलेले. (फूल).

—**phyletic** एकस्रोतोद्भव; एकोद्भव
एकाच पूर्वज गटापासून मूलतः उगम पावलेले; हा गट वंशापेक्षा मोठा व गणापेक्षा लहान मानतात.

**— podial** एकपदी

एकपद असलेली ( वाढ ).

**—podium** एकपद

अक्षाच्या टोकास सतत वाढ होत राहिल्याने बनलेला एकच सलग अक्ष ( स्तम्भ ); उदा चिल, चीड, सुरु.

**— sepalous** युक्तसंदल

पहा gamosepalous.

**— siphonous** एकनालिकीत

कोशिकांची एकच रांग असलेला शैवलतंतू ; उदा. युलोथ्रिक्स, इडोगोनियम; इ.

**—some** एकसमसूत्र

प्रकलविभाजनामध्ये एखादे संपूर्णपणे न विभागलेले अनियमित रंगसूत्र दुसऱ्या रंगसूत्रांच्या संचात जाऊन त्यापासून बनलेल्या प्रकलात समाविष्ट होण्याचा प्रकार; यामुळे तेथे एक रंगसूत्र अधिक असते व दोन्ही प्रकलांत एकूण संख्या विषम होते.

**—somic** एकसमसूत्री

एकसमसूत्र असण्याचा प्रकार.

**—spermous** एकबीजी

एक बीज असलेल्या फळाची ( वनस्पती ); उदा. आंबा; खारीक.

**— sporangiate** एकबीजुककोशिक; एकलिंगी

भिन्न ( लघु व गुरु ) बीजुककोश स्वतंत्र अक्षावर असलेले फूल; उदा. बीच, ओक; केसरदले किंवा किंजदले असलेली फुले अथवा तशी फुले असलेली वनस्पती; एकच बीजुककोश असलेली.

**— spore** एकबीजुक

एका बीजुककोशात बनणारे एकच विशेष बीजुक; उदा. एक्टोकार्पस शैवल.

**— sporic** एकबीजुकी

फक्त एकबीजुक बनविणारे बीजुककोश असणारी वनस्पती.

**— stelous** एकरंभी

फक्त एक रंभ ( केंद्रवर्ती वाहकवृंद व त्या सभोवार परिरंभ असल्यास ) असलेले ( खोड ).

**— stromatic** एकस्तरी

कोशिकांचा एकच थर असलेले; उदा. फ्युनेरिया या शेवाळीचे पान; शैवलांपैकी काहींचे कायक ( शरीर), उदा. पेडिॲस्ट्रम.

**— symmetrical (zygomorphic)** एकसमात्र

एका पातळीने दोन सारखे अर्ध बनविता येण्यासारखे.

**— thecal** एकपुटक

एक कप्पा ( पोकळी ) असलेले.

**— trichous** एकप्रकेसली

एक प्रकेसल ( केसासारखा प्राकलाचा धागा) असलेली ( वनस्पती ); उदा. युग्लीना शैवल;
पहा flagellum.

**— typic** एकप्रतिरूपी

फक्त एक प्रतिनिधी असलेला; उदा. कुल, गण, वंश, जाती, इ. एखाद्या कुलात एकच वंश ( उदा. दाडिम कुलात दाडिमवंश; गिंकोएसी कुलात गिंको हा एकच वंश ); एखाद्या वंशात एकच जाती ( उदा. गिंको वंशातील एक गिंको बायलोबा ही जाती; वेलविशिया वंशात एक, वेलविशिया मिराबिलिस ही जाती ); पहा Moringaceae; Gnetales; Gingkoales.

**mongrel** संकरज

पहा hybrid जुनी संज्ञा.

**monograph** विनिबंध

एखाद्या वंशाची, कुलाची किंवा गणाची संपूर्ण संशोधित शास्त्रीय माहितीची पुस्तिका.

**monsoon-forest** मोसमी वन (जंगल)

उष्णकटिबंधातील मोजका पाऊस पण दीर्घ शुष्क काल अशा ठिकाणी वाढणारे दाट ( पानझडी ) जंगल (अशी शिंपर यांची व्याख्या). विपुल पाऊस व थंड हवा असल्यास सदापर्णी वन.

**monstrocity** विकृति

अनियमित वाढीमुळे अनित्य, आकस्मिक व चमत्कारिक (बहुधा फार मोठे) स्वरूप प्राप्त झालेली संरचना, उदा. मक्यावर दोन्ही प्रकारची फुले एकाच सामान्य दांड्यावर येण्याचा प्रकार.

**mountane** पर्वतीय; शैलेय

पर्वतासंबंधी; पर्वतावरची किंवा डोंगरी (वनस्पती). उदा. तिमरू (*Diospyros montana* Roxb.)

**moorland** जीर्णक भूप्रदेश

समुद्रसपाटीपासून ते (ब्रिटनमधील) उंच टेकड्यांच्या माथ्यापर्यंत पसरलेल्या ह्या प्रदेशात पीट (जीर्णक) व संतानक कुलातील (एरिकेसी) वनस्पती विशेषेकरून आढळतात; पहा एरिकेसी.

**Moraceae** वट कुल; मोरेसी

तुत्, वड (वट), फणस, अंजिर, उंबर, पिंपळ इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; एंग्लर व प्रँटल यांनी याचा अंतर्भाव वावल गणात (अर्टिकेलीझ) केला होता; तसेच हचिन्सन यांनीही त्याच गणात इतर पाच कुलांसह केला आहे. प्रमुख लक्षणे; झुडपे व वृक्ष, चिकाळ; पानास उपपर्णे व ती साधी; एकलिंगी लहान फुले; फुलोरे विविध; परिदले असल्यास चार सुटी किंवा जुळलेली; केसरदले तितकीच व त्यासमोर; दोन जुळलेल्या किंजदलाच्या उर्ध्वस्थ किंजपुटात एक कप्पा व त्यात एक बीजक; फळ (कपाली, आठळी युक्त).

**Moringaceae** शिग्रु (शेवगा) कुल; मोरिंगेसी

शोभांजन अथवा शेवग्याच्या एका द्विदलिकित वनस्पतींच्या वंशातील फक्त तीन जातींचा समावेश असलेले लहान प्रतिरूपी कुल. याचा अंतर्भाव हचिन्सन यांनी वरुण गणात (कॅपॅरिडेलीझमध्ये) केला आहे. एंग्लर व प्रँटल यांनी ऱ्हीडेलीझ गणात केला आहे. प्रमुख लक्षणे: पानझडी वृक्ष; पाने संयुक्त व मोठी; फुले, द्विलिंगी, एकसमात्र, पंचभागी; पाच वंध्य केसर; किंजधरावर ऊर्ध्वस्थ, तीन जुळलेल्या किंजदलांच्या किंजपुटात एक कप्पा, तटवर्ती बीजकाधानी; बीजके अनेक; बोंडात अनेक अपुष्क बीजे; लांबट बोंडाला सामान्य भाषेत शेंग म्हणतात; ती शिंबा नव्हे; पहा legume.

**Morphogenesis** आकारजनन

वनस्पतींच्या आकारप्रधान लक्षणांचा उगम व विकास इत्यादींची माहिती देणारी ज्ञानशाखा.

**Morphology** आकारविज्ञान

सजीवांचे स्वरूप व त्यांची जडणघडण यांच्या अभ्यासाची शाखा; यामध्ये बाह्यांग व अंतरंग यांच्या अभ्यासाचा समावेश करतात; फक्त अंतर्रचनेचा अभ्यास 'शारीर' या शाखेत करतात. फक्त अवयवांच्या आरंभापासून त्यांचा विकास पूर्ण होईपर्यंतच्या क्रमवार माहितीस विकासतंत्र (morphosis) म्हणतात.

**mosaic** चित्रन्यास

चित्राप्रमाणे दृश्य अथवा मांडणी;

**— disease** चित्रन्यास विकृति; केवडा रोग

तंबाखू व इतर काही वनस्पतींच्या पानांवर चित्रविचित्र ठिपके किंवा ठिगळे येणारा क्रियावैज्ञानिक रोग.

**moschate (musky)** कस्तूरीगंधी

कस्तुरीचा वास येणारे; उदा. कस्तुरीभेंडी (*Abelmoschus moschatus* Medik; Musk mallow).

**moss** शेवाळे

शेवाळी विभागातील वनस्पतीचे सामान्य नाव; पहा Bryophyta; Musci.

**mother-cell** जनक (मातृ) कोशिका

नवीन कोशिकांची निर्मिती करणारी कोशिका.

**— plant** जनक वनस्पति

मूळची उत्पादक वनस्पती; संकरजाची बीजधारक वनस्पती.

**moth-flower** पतंगपुष्प; शलभपुष्प

पतंगाकडून परागित होणारे फूल. उदा. टाकळा, पिवळा धोतरा, इ.

**motile** चल-; चर-; चलनशील

हालचाल करणारे; तरंगत (पोहत) जाणारे; उदा. काही गंतुके, बीजुके, शैवले, इ.

**motility** चलनक्षमता; चलिष्णुता

हालचाल करण्याचे सामर्थ्य.

**motor-cell** प्रेरकपेशी

पहा bulliform cell

**motor organ** प्रेरक अवयव

हालचाल घडवून आणण्यास उपयुक्त असा अवयव किंवा उपांग; उदा. काही पानांच्या तळाशी असलेला फुगीर भाग (पुलवृंत); केसल, प्रकेसल इत्यादी प्राकलाचे धागे; काही गवतांच्या पानांच्या अपित्वचेतील विशेषत्व पावलेल्या कोशिका (उदा. मका); त्यामुळे पानांची रूक्ष हवेत सुरळी होते; नंतर पुन्हा पान सपाट होते.

**mould (mold)** १) बुरशी; २) साचा

(१) कवकांपैकी विशिष्ट तंतूमय वनस्पती; मृत पदार्थावर व क्वचित सजीव वनस्पतींच्या अवयवांवर ही आढळते कारण ती परोपजीवी असते.

(२) प्राचीनकाळी वनस्पतींच्या अथवा प्राण्यांच्या शरीराचे किंवा अवयवांचे ठसे नरम मातीत उठून त्यांचे पुन्हा दगडासारखे रूपांतर झाल्याने तयार झालेला साचा; त्यात पुढे पुन्हा रेती, गाळ साचून तो कठीण होऊन निघालेला ओतीव साचा; पहा fossil.

**moveable** चलनशील
आतील किंवा बाहेरील चेतकामुळे हालणारे अथवा स्थानांतर करणारे; उदा. गवतांचे परागकोश; काही शैवले; प्रजोत्पादक कोशिका.

**movement** हालचाल; चलन; वलन
अवयवांचे आंदोलन किंवा वळणे; उदा. फळांचे स्फोट; सूक्ष्मजंतू, शैवले, प्रजोत्पादक कोशिका यांची हालचाल; तणावे, वेढणारे खोड, फूल मिटणे व उमलणे.

**mucilage** श्लेष्मा; श्लेष्मल द्रव्य
बुळबुळीत पदार्थ; उदा., पाण्यातील वनस्पतींचे आवरण; काही फळातील (भेंडी, भोकर, बांडगूळ) अथवा काही बियांतून पाण्याच्या संपर्काने येणारा तसाच पदार्थ उदा. तालीमखाना, इसबगोल; घोळ व कोरफड यांच्या पानांतील चिकट रस.

**mucilaginous** चिकट; श्लेष्मल; बुळबुळीत

**mucro** लघुसूचि
आखूड, तीक्ष्ण टोक.

**mucronate** सूच्याग्र
सुईसारखे बारीक टोक असलेले (पान, तुस, छद इ.); उदा. त्रिधारी निवडुंगाचे पान; गव्हाचे तुस; कांदळाचे पान ( *Rhizophora mucronata* Lam. ).

**multi-** बहु-
अनेक या अर्थाचा उपसर्ग.

**— cellular** बहु- अनेक-कोशिक
अनेक कोशिकांचे बनलेले; शरीर किंवा अवयव.

**— ciliate** बहुकेसली
अनेक सूक्ष्म धागे (प्राकलाचे) असलेले; उदा. सायकस किंवा नेफ्रोलेपिस नेचा यांची रेतुके; इडोगोनियम शैवलाची बीजुके, गंतुके.

**— costate** बहुसिराल
अनेक प्रमुख शिरा असलेले; उदा. बोर, घोटवेल यांची पाने.

**— dentate** बहुदंती
अनेक दाते असलेले; करवती; उदा. जास्वंदाचे पान.

**— fid** बहुखंडित
अनेक खंड पडलेले; उदा. कामलता; भद्रदंती ( *Jatropha multifida* L. ) यांची पाने.

**— florus** बहुपुष्पी
अनेक फुले असलेली ( वनस्पती, अक्ष, इ. ).

**— foliate ( digitate )** बहुदली
अनेक दले एका बिंदूतून निघत असलेले संयुक्त पान; उदा. सावर, पून, गोरखचिंच, इ.

**— foliatus** बहुपर्णी
भरपूर पाने असलेली ( वनस्पती ).

**— locular** बहुपुटक
अनेक कप्पे असलेला ( किंजपुट ); उदा. भेंडी, धोत्रा; लिंबू, इ.

**— nuclear**
**— nucleate** } बहुप्रकली; बहुकेंद्रक
अनेक प्रकले असलेली ( कोशिका ) उदा. व्हाउचेरिया व क्लॅडोफोरा शैवले; म्यूकर बुरशी.

**— parous** बहुशाखी; बहवाक्षी
मुख्य अक्षावर टोकास वाढ थांबून बाजूस अनेक शाखा असलेली ( उदा. वल्लरी ); पहा cyme.

**multiple corolla** बहुचक्रीय पुष्पमुकुट
एकापेक्षा अधिक पाकळ्यांची वर्तुळे असलेला पुष्पमुकुट उदा. गुलाब, सोनचाफा, इ.

**— ( composite ) fruit** संयुक्त फळ
फुलोऱ्यापासून बनलेल्या अनेक लहान फळांचा एकत्रित समूह; उदा. फणस, बारतोंडी, अननस.

**— gene hypothesis** बहुजनुक गृहीतक
व्यक्तीतील एखादे लक्षण कमीजास्त प्रमाणात संततीत उतरण्याचे कारण त्याचे अस्तित्व व्यक्तीच्या प्रकलातील अनेक जनुकांवर अवलंबून असते असे मानणे; उदा. रंग; बियातील गाभा, फुलांच्या पाकळ्या, कातडीचा रंग, इ.

**multipolar** बहुध्रुवी
काही कोशिका विभाजनात द्विध्रुवी तर्कूऐवजी अनेक टोके असलेला तर्कू आढळतो. पहा bipolar spindle.

**multiseriate** बहुश्रेणिक
अनेक श्रेणी ( रांगा ) असलेले.

**muricate** पिटकित; खर्बर
अनेक आखुड, कठीण व लहान टेंगळे (गाठी) यामुळे खरबरीत असलेले; उदा. मामफळ ( *Anona muricata* L. )

**Musa-form** कदलीरूप
केळीच्या झाडाप्रमाणे असलेले स्वरूप; ओषधीय (नरम) हिरवे, मोठे खोड व त्याला लपेटून असलेल्या अनेक पानांचे आवरक तळ.

**Musaceae** कदली (रंभा) कुल; म्यूझेसी

केळ (कदली), रॅव्हेनेला, हेलिकोनिया (जंगली केळ) चवेणी इत्यादी एकदलिकित वनस्पतींचे लहान कुल. याचा अंतर्भाव हल्ली कदली गणात (सिटॅमिनी) करतात. परंतु हचिन्सन शुंठी (झिंजिबेरलीझ) गणात करतात. प्रमुख लक्षणे : मोठ्या नरम (काष्ठ नसलेल्या) मिथ्या-खोडाच्या वनस्पती; महाछदयुक्त संयुक्त फुलोरा; द्विलिंगी किंवा एकलिंगी, एकसमात्र, सम किंवा विषम प्रकारची परिदले असलेली फुले; बहुधा जुळलेल्या तीन परिदलांची दोन वर्तुळे; तीन केसरदले फलनक्षम व दोन वंध्य: तीन जुळलेल्या किंजदलांच्या अध:स्थ किंजपुटात तीन कप्पे व प्रत्येकात एक किंवा अनेक बीजके; मृदुफळ किंवा बोंडात सपुष्क व परिपुष्कयुक्त बिया; पहा Scitamineae.

**Musci (Mosses)** हरिता वर्ग; म्युस्की

शेवाळी विभागातील कायकाभ वनस्पतींच्या तीन वर्गांपैकी एक; यकृतका व शृंगका हे इतर दोन वर्ग होत.

**Muscinae (Bryophyta)** शेवाळी विभाग; म्युस्सिनी

अबीजी वनस्पतीपैकी अत्यंत साध्या कायकाभ शरीराच्या, पण प्रत्यक्ष कायक वनस्पतींच्यापेक्षा अधिक प्रगत, जलस्थलवासी, ओल्या ठिकाणी मखमलीसारखा थर बनविणाऱ्या वनस्पती; पहा Thallophyta; Bryophyta.

**mushroom** भूछत्र; अळंबे

कवक वनस्पतींपैकी छत्रासारख्या आकाराच्या वनस्पतींचा प्रकार; पहा Agaricales.

**mutable** उत्परिवर्तनीय

एकदम विशेष प्रकारचा फेरबदल होणारे (उत्परिवर्तनशील) सजीव.

**mutation** उत्परिवर्तन

प्राणी व वनस्पती यांच्या जातींतील संततीत एकदम दिसून येणारा व पुढील पिढ्यांत बहुधा चालू राहणारा विशेष प्रकारचा फरक (प्रभेदन); उदा. सरासरीपेक्षा बरीच अधिक उंची, आकार, रंग, बुद्धी इत्यादींमध्ये दिसणारा फरक.

**— progressive** प्रागतिक उत्परिवर्तन

मूळच्या पिढीपेक्षा निश्चित प्रगति दर्शविणारा बदल.

**— regressive** परागतिक उत्परिवर्तन

मूळच्या (पैतृक) पिढीपेक्षा न्यूनता दर्शविणारा फरक.

**mutant** उत्परिवर्ती; उत्परिवर्तक

उत्परिवर्तन झालेले दर्शविणारा (सजीव किंवा जनुक).

**muticous** शूकहीन

बिनटोकाचे, बोथट किंवा लांब व टोकदार नसलेले (छद); उदा. कसिली (*Abutilon muticum* Sweet.).

**mutualism** पारस्पर्य; अन्योन्यत्व

एकमेकांचे हितसंबंध (अवलंबन) असण्याचा प्रकार.

**mycelial** कवकजालीय

कवकजालासंबंधी; पहा Fungi.

**— layer** कवकजाल-स्तर

कवकजालाचा पापुद्र्यासारखा थर.

**— strand** कवकजाल-पट्ट

सूत्रमय कवकजाल कवकतंतूंचा विणलेला जुडगा.

**myceloid** कवकजालाभ

कवकतंतूंच्या जाळ्यासारखे.

**mycelium** कवकजाल

कवकाचे बहुधा तंतुमय शरीर; पहा Fungi.

**Mycetozoa** श्लेष्मकवक वर्ग; मायसेटोझोआ

कायक वनस्पतींपैकी कवक (Fungi) वनस्पतींच्या विभागातील एक वर्ग; वर्गीकरणाच्या अन्य पद्धतीत यालाच श्लेष्मकवक उपवर्ग (Myxomycetes) अथवा श्लेष्मकवक विभाग (Myxophyta, Myxothallophyta, Myxomycophyta) म्हणतात. प्रमुख लक्षणे : साधे, लहान, हरितद्रव्यहीन, नग्न चिकासारखे, बहुप्रकली, जीवद्रव्ययुक्त शरीर; प्रजोत्पत्तीकरिता चरबीजुक; काहींत चरबीजुककोश; ओलसर व कुजक्या पदार्थावर काही शवोपजीवी; लैंगिक प्रजोत्पादन अत्यंत साधे; यांचा उगम आदिजीवासारख्या प्राण्यांपासून असावा; विभाग मानल्यास तीन वर्ग (व वर्ग मानल्यास तीन उपवर्ग) करतात. हल्ली खऱ्या कवकापासून यांना अलग ठेवले जाते. पहा Fungi; Thallophyta.

**Mycologist** कवकविज्ञ; कवकतज्ज्ञ

कवक वनस्पतींसंबंधी भरपूर ज्ञान असलेला संशोधक-शास्त्रज्ञ.

**Mycology** कवकविज्ञान

कवकांची संपूर्ण माहिती संकलित करणारी विज्ञानशाखा.

**Mycoplasm** कवकद्रव्य

रोगकारक कवकातील जीवद्रव्याचा अंश; हा काही आश्रय-बीजात सुप्तावस्थेत राहून बीज रुजतेवेळी पुन्हा

क्रियाशील बनतो व उगवणाऱ्या वनस्पतीत रोगकारक ठरतो, असे काही शास्त्रज्ञ मानतात.

**mycorrhiza** संकवक

कवक व उच्च वनस्पतींची मुळे यांच्या एकत्र जीवनातील ( सहजीवी ) संबंध.

**—, ectotrophic** बहि:स्थित संकवक

कवकतंतू मुळात न शिरता पृष्ठभागावर राहून अन्नशोषण करणारे सहजीवन; ( उदा. पाइन वृक्ष ).

**— , endotrophic** अंत:स्थित संकवक

दुसऱ्या वनस्पतीच्या मुळात कवकतंतू शिरुन अन्नशोषण करण्याचा (उदा. काही आमरे) प्रकार.

**mycosis** कवकार्ति

युरोशियम कवकामुळे प्राण्यांना झालेला रोग. उदा. नायटा; एक कर्णरोग.

**mycotrophic** संकवकधारी

संकवक धारण करणारी ( वनस्पती ); उदा. चीड.

**Myristicaceae** जातिफल ( जायफळ ) कुल; मिरिस्टिकेसी

जायफळाच्या झाडाचा अंतर्भाव असलेले लहान द्विदलिकित कुल; याचा समावेश मोरवेल गणात ( रॅनेलीझमध्ये ) एंग्लर व प्रँटल आणि बेसी यांनी केला आहे. प्रमुख लक्षणे; झुडपे किंवा वृक्ष; पाने साधी एकाआड एक, सतत हिरवी व तैलप्रपिंडयुक्त. एकलिंगी, नियमित, विभक्त झाडांवर, लहान फुले येतात; ३ परिदले जुळलेली; केसरदले ३–१८ व जुळलेली; एका किंजदलाच्या ऊर्ध्वस्थ किंजपुटात एक बीजक; मांसल फळ तडकते; बियाला बीजोपांग असते. पुष्प रेषाभेदित. हचिन्सन यांनी हे कुल ॲनोनेलीझ ( सीताफल गण) मध्ये घातले आहे. *Knema attenuata* ( Wall ) Warb. पहा Ranales.

**Myricaceae** कट्फल कुल; मिरिकेसी

कायफळ ( कट्फल ) ह्या द्विदलिकित फुलझाडाचा व त्याच्या वंशातील इतरांचा आणि शिवाय इतर दोन वंशांच्या जातींचा ( एकूण जाती पन्नास ) अंतर्भाव करणारे लहान कुल; हचिन्सन ( व एंग्लर ) यांच्या पद्धतीत मिरिकेलीझ या स्वतंत्र गणात अंतर्भाव असून इतर शास्त्रज्ञ अक्रोड गणात ( जुग्लँडेलीझमध्ये ) करतात. प्रमुख लक्षणे; सुगंधी वृक्ष, झुडपे; पाने साधी, ताठर कमी जास्त विभागलेली; पानांच्या बगलेत विविध प्रकारचे बहुधा लोंबते कणिश प्रकारचे फुलोरे; फुले एकलिंगी, एकत्र किंवा विभक्त; परिदले नसतात; केसरदले २–२०; तंतू जुळलेले; किंजदले दोन, जुळलेली ऊर्ध्वस्थ; किंजपुट व फळ आठळीयुक्त; एकच बी. कायफळ ( Myrica nagi ) ही एकच जाती भारतात आढळते. पहा Juglandales.

**myrmecophilous** (१) पिपीलिकाप्रिय; (२) पिपीलिका परागित

( १ ) मुंग्यांना अन्नपुरवठा करून आश्रय देणारी व त्यांचे कडून संरक्षण मिळणारी ( वनस्पती ). उदा. बाभळीची एक जाती; ( २ ) मुंग्यांकडून परागण करविणारी ( वनस्पती ).

**myrmecophobous** पिपीलिकाद्वेष्टी

केस, प्रपिंडे यांच्या साहाय्याने मुंग्यांना दूर ठेवणारी ( वनस्पती ).

**myrmecophyte** पिपीलिका–वनस्पति

मुंग्यांचे साहचर्य दर्शविणारी वनस्पती.

**Myrsinaceae** विडंग कुल; मिर्सिनेसी

काजळा, वावडिंग ( विडंग ), आर्डिसिया, मीसा इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा समावेश एंग्लर व प्रँटल ( व बेंथॅम आणि हूकर ) यांनी प्रिम्यूलेलीझ गणात केला आहे. प्रमुख लक्षणे : झुडपे व वृक्ष; पाने सदा हिरवी व एकाआड एक; फुले सच्छदक, द्विलिंगी, एकलिंगी, नियमित व चार-पाच भागी; पाकळ्या जुळलेल्या; केसरदले पाकळ्यासमोर चिकटलेली; क्वचित वंध्यकेसर; ऊर्ध्वस्थ किंवा अर्ध-अधःस्थ किंजपुटात एक कप्पा व अनेक बीजके; आठळीयुक्त फळात एक किंवा अनेक केसपुष्क बीजे; कधी मृदुफळ.

**Myrtaceae** जंबुल कुल; मिर्टेसी

जांभूळ, पेरु, जांब, लवंग, इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; याचा समावेश ( मिर्टेलीझ ) जंबुल गणात केला आहे; प्रमुख लक्षणे: साधी, समोरासमोर, तैलप्रपिंडयुक्त पानांचे वृक्ष व झुडपे; द्विलिंगी चार-पाच भागी, नियमित, सच्छदक, परिकिंज, अपिकिंज फुले; संदले सुटी व सतत राहणारा; पाकळ्या सुट्या; केसरदले अनेक, बिंबाच्या कडेने चिकटलेली; दोन किंवा अधिक अधःस्थ किंजलदलांच्या संयुक्त किंजपुटात एक ते अनेक बीजके; फळ विविध; बहुधा मृदुफळ; अनेक अपुष्क बिया.

**Myrtales ( Myrtiflorae )** जंबुल गण; मिर्टेलीझ ( मिर्टिफ्लोरी )

यामध्ये जंबुल कुल, दाडिम कुल, कांदल कुल, अर्जुन कुल, शृंगाटक कुल आणि धातकी कुल यांचा समावेश

केला जातो. हचिन्सन यांनी मात्र धातकी कुल, शृंगाटक कुल, दाडिम कुल यांना वेगळ्या धातकी गणात (लिथ्रेलीझ) घातले आहे व इतरांना जंबुल गणात राखले आहे. याशिवाय रामेठा कुल (थायमेलेसी), आंबगुळ कुल (एलेग्नेसी), इत्यादी एकूण १९ कुले एंग्लरांच्या जंबुलगणात (मिर्टिफ्लोरी) समाविष्ट आहेत.

**Myxa (mucous)** श्लेष्मा
बुळबुळीत पदार्थ; उदा. भोकर फळातील (*Cordia myxa* L.) चिकट मगज.

**myxamoeba** श्लेष्मादिजीव
श्लेष्मकवकात आढळणाऱ्या बीजुकापासून निर्माण होणारी, आदिजीवाप्रमाणे वावरणारी, नग्न, जिवंत कोशिका.

**Myxomycetes** श्लेष्मकवक वर्ग; मिक्सोमायसेटीज
पहा Mycetozoa.

**Myxomycophyta** श्लेष्मकवक विभाग; मिक्सोमायकोफायटा
पहा Mycetozoa

**Myxophyceae (Schizophyceae)** नीलहरित शैवले; मिक्सोफायसी
पहा Cyanophyceae.

## N

**N (n)** एन्
एकगुणित रंगसूत्रांची संख्या दर्शविणारे इंग्रजी अक्षर.

**nacreous** मुक्ताभ; मौक्तिकाभ
मोत्यासारखे तेज असलेले.

**naked** अनावृत; नग्न; प्रकट
आवरण नसलेली (कोशिका, कलिका, बीजुके, गंतुके, पुष्पकलिका, बीज इ.) उदा. प्रकटबीज वनस्पती.

**— flower** नग्नपुष्प
परिदलहीन फूल; उदा. वाळुंज कुल; गवते; अळू.

**— seeded** प्रकटबीज; नग्नबीज; अनावृतबीजी
बीजे किंजपुटात नसून उघडी असण्याचा प्रकार. उदा. सायकस, चीड, चिर (पाइन), थुजा, गिंको, बिरमी (यू), इ. पहा Gymnospermae.

**nanandrous** ऱ्हस्व पुं-तंतुकी; लघु पुं-तंतुकी
आखूड (खुजे) नरतंतू निर्मिणारे (इडोगोनियम शैवल).

**nanism** ऱ्हस्वता; लघुता
खुजेपणा; उदा. काही वनस्पती व प्राणी यांच्या खुजा जाती, प्रकार.

**nannander (nanandrium)** ऱ्हस्व पुं-तंतु; लघु पुं-तंतु
पहा dwarf male.

**nannoplankton** लघुप्लवक
अत्यंत लहान व मुक्तपणे तरंगणारे जीव; उदा. काही शैवले; सूक्ष्म प्राणी, इ.

**nannophanerophyte** लघु बीजी पादप
दोन मीटरपेक्षा ज्यास्त उंची नसलेले व भूपृष्ठावरील भागावर सुप्त कलिका असणारे बीजधारी क्षुद्रप.

**nanus** ऱ्हस्व; खुजा; बटु

**napiform (napaceous)** कुंभीरूप
भोवऱ्यासारखे वर रुंद व खाली निमुळते होत गेलेले. उदा. गाजर, मुळा, इ.

**narcotic** मादक; संवेदनमंदक; गुंगिकारी
गुंगी आणणारे.

**nascent tissue (meristem)** विभज्या
सतत कोशिकांचे विभाजन चालू ठेवणारे ऊतक; पहा meristem.

**nastic movement** अनुकुंचनी वलन
चेतनेमुळे घडून येणारी पण तिच्या दिशेशी संबंध नसलेली हालचाल; दोन पृष्ठभाग असलेल्या अवयवांमध्ये सतत लांबीत वाढ होत असल्याने आपोआप वाकडेपणा आणणारी हालचाल (वळणे); यामुळे कळ्या प्रथम मिटलेल्या असून पुढे उघडतात; दरवेळी भिन्न पृष्ठभाग अधिक वाढतो; पहा epinasty, hyponasty, nyctinasty.

**natant** निमज्जित; निमग्न
डुबलेले, बुडून तरंगणारे.

**native** देशी
खास त्याच देशातील (वनस्पती).

**natural** स्वाभाविक; नैसर्गिक; प्राकृतिक

**natural classification** नैसर्गिक वर्गीकरण
पहा classification.

**— family** नैसर्गिक कुल
अनेक (कचित एकच) निकट संबंधित वनस्पतींच्या वंशांचा गट.

**— order** नैसर्गिक गण

अनेक (क्वचित एकच) निकटवर्ती कुलांचा गट.

**naturalist** निसर्गवैज्ञानिक

निसर्गातील वनस्पती, प्राणी, खडक इत्यादींची विशेष माहिती संकलन करणारा तज्ञ.

**naturalisation** स्वाभाविकीकरण

परठिकाणाहून येऊन स्थानिक परिस्थितीशी (निसर्गाशी) समरस होऊन देशी किंवा स्थानिक सजीवाप्रमाणे स्थायी होण्याची प्रक्रिया; उदा. कित्येक तण (पिवळा धोत्रा, ओसाडी, इ.).

**nature** स्वरूप; प्रकृति; निसर्ग

**natural selection** नैसर्गिक निवड

विशिष्ट परिस्थितीत, जगण्यास योग्य अशी, निसर्गतः घडून येणारी प्रक्रिया; डार्विनच्या (इ. स. १८५९) तत्त्वाप्रमाणे सजीवातील जीवनार्थ स्पर्धेत यशस्वी होणाऱ्यांना जणु निसर्गानेच जगण्यास लायक ठरवले व ते जगले आणि इतर नाश पावले, अशा प्रकारची घटना.

**navicular** नौकाकृति; नौकाकार

नावेसारखे; उदा. नॅव्हिक्यूला करंडक वनस्पती; काही गवतांची तुसे.

**neck** ग्रीवा; मान

(१) खोड व मूळ यामधील सांधा; (२) पाते व आवरक यामधील सांधा; (३) पुष्पमुकुट व संवर्त यांच्या नलिकांचा आकुंचित भाग; (४) गर्भकोश किंवा अंदुककलश यांचा लांबट भाग; (५) काही कवकांच्या पलिव धानीफलांची लांबवण;
पहा ascocarp; perithecium.

**— canal-cell** ग्रीवा-मार्ग कोशिका

ग्रीवेतील पोकळी भरून काढणारी कोशिका.

**— cell** ग्रीवा-कोशिका

ग्रीवेच्या घटक कोशिका. उदा. नेच्चे.

**necrosis** ऊतकक्षय; ऊतकनाश

व्रणासारख्या रोगकारक घटनेमुळे जिवंत वनस्पतीच्या विशिष्ट स्थानातील कोशिकेचा किंवा ऊतकाचा नाश.

**nectar** मधुरस; मकरंद

बहुधा फुलांत असलेला व कीटकाकरिता अथवा पक्ष्याकरिता आकर्षक अन्न असा गोड रस; हाच रस नंतर मध म्हणून उपलब्ध होतो. काही कवकसुद्धा असा रस बनवितात तो कीटकांकडून बीजुकांच्या प्रसाराकरिता असतो.

**nectary** मधुरस ग्रंथिंड

मधुरस स्रवणाऱ्या कोशिकांचा समूह.

**nectariferous** मधुरसधारक; मकरंदयुक्त; मधुस्रावक

मधुरस स्रवणारा, धारण करणारा (साठविणारा);

**necton (nekton)** चलप्लवक; तरणक

क्रियाशील व तरता (जलविहारी) जीवसमूह; पहा plankton.

**needle** सूचि, सुई

**needle-shaped** सूच्याकार

सुईप्रमाणे लांबट निमुळते गोलाकार (चितीय), उदा. चीड (पाइन) चे पान; शतावरीच्या काही जातींच्या फांद्या; पहा cladode.

**negative** ऋण

(१) विरुद्ध, अभावदर्शक किंवा नकारात्मक उपसर्ग; (२) विद्युत आयनांपैकी एक प्रकार; उदा. ऋणभार.

**— geotropism** ऋण गुरुत्वानुवर्तन

गुरुत्वाकर्षणाच्या चेतनेविरुद्ध (वाढणे); उदा. खोड.

**— heliotropism** ऋण प्रकाशानुवर्तन

प्रकाशाच्या चेतनेविरुद्ध असलेल्या दिशेकडे वाढणे; उदा. मूळ.

**— heterosis** ऋण संकरज ओज

संकरामुळे येणाऱ्या अधिक जोमाचा अभाव; पहा heterosis.

**— pressure** ऋणदमन; उलट दाब

बाष्पोच्छ्वास वाढला असता मुळांनी शोषलेले पाणी अपुरे पडून वनस्पतीतील पाणी कमी होते; यावेळी वनस्पतींतील वायू हवेपेक्षा कमी दाबाखाली असल्याने जमिनीतून खोडाद्वारे पाणी वर खेचण्याऐवजी ते खोड कापल्यास पाणी वरून शोषले जाते; या घटनेस वरील संज्ञा वापरतात.

**nemoralis** (१) नवागत; (२) वनवासी

(१) नवीन प्रविष्ट केलेली वनस्पती;
(२) रानात किंवा जंगलात वाढणारी.

**nematophyte** प्रवाहपादप

पाण्याच्या प्रवाहात वाढणारी वनस्पती. उदा. पोडोस्टेमोनेसी; काही नीलहरित शैवले.

**neobiogenesis** नवजीवजनन

पृथ्वीवर आरंभी एकदाच (अपघाताने) जीवोत्पत्ति होऊन जीवपरंपरा सुरू झाली या उपपत्तीशिवाय

त्यानंतर ती पुन्हा झाली असावी किंवा अनेकदा होत गेली असावी असा एक विचार.

**Neo Darwinism** नव-डार्विनवाद

क्रमविकासाने घडून येणाऱ्या जातींच्या निर्मिती-संबंधीच्या चार्ल्स डार्विन यांच्या उपपत्तीवर घेतले गेलेले आक्षेप दूर करून, उत्परिवर्तनाचा आधार घेऊन. तसेच मेंडेल यांनी पुरस्कार केलेल्या उपपत्तीप्रमाणे अनुहरणांच्या नियमांचा विचार करून, डार्विनांच्या मूळच्या लायख व्यक्तींच्या नैसर्गिक निवडीच्या संकल्पनेस पुष्टी देणारी उपपत्ती; पहा Darwinism; mutation; natural selection.

**Neo-Lamarckism** नव-लामार्क वाद

लामार्क या शास्त्रज्ञाच्या अनुयायांनी त्याच्या मूळच्या सिंद्धाताला आधारभूत म्हणून मांडलेले नवीन स्पष्टीकरण. संपादित लक्षणांच्या अनुहरणास प्रायोगिक पुरावा नाही ह्या वाइझमान यांच्या हरकतीमुळे लामार्क यांची नवजाति-निर्मितीला आधार देणारी मूळची उपपत्ति (गंतुकल उपपत्ति) बाजूस पडली; तथापि सजीवांच्या परिस्थितिसापेक्ष शरीररचना व सवयी (रीती) यांमुळे जीवनात यशस्वी होण्याची क्षमता ध्यानात घेऊन संपादित गुण व त्यांचे अनुहरण यांचे नवे स्पष्टीकरण लामार्कच्या अनुयायांनी केले; त्यानुसार व्यक्तीच्या गंतुकलावर (जननद्रव्यावर) बाह्य-परिस्थितीचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम (स्थातुक अथवा शरीराद्वारे होणारे प्रवर्तन) होऊन त्यानुसार यात पडणाऱ्या फरकांमुळे पुढील नवीन पिढीत काही फरक होतात व त्यामुळे सजीवास सोयीचे फरक (भेद, उत्परिवर्तने) चालू राहतात व अशा रीतीने संपादित केलेले गुण (लक्षणे) क्रमविविकासाला (व नूतन जातींच्या निर्मितीस) साहाय्यक होतात. पहा germ plasm, somatic induction, mutation; Lamarckism.

**Nepenthaceae (Pitcher-plants)** घटपर्णी कुल; नेपेंथेसी

चंबू, कलश, घट, कुंभ यांसारख्या रूपांतरित पानांच्या कीटकभक्षक व द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा अंतर्भाव सॅरासेनिएलीझ ह्या कीटकभक्षक वनस्पतींच्या गणात करतात.

पहा carnivorous plants; Sarraceniales.

**nereid formation** शैवल समावास

शैवलांचा विशिष्ट ठिकाणी आढळणारा समुदाय.

**neritic** समुद्रवासी प्लवक

समुद्रात २०० मीटरपर्यंतच्या खोलीमध्ये आढळणारा, तरंगणारा जीवसमूह.

**nerve** (१) सिरा; शीर; (२) चेतनी; ज्ञानतंतू

(१) साधी किंवा शाखायुक्त (पानातील) शीर.
(२) सजीवांच्या परिस्थितीचे ज्ञान त्यांना देणारा व प्रतिसाद करू देणारा तंतू.

**nervose (veined)** सिराल; सिरायुक्त

शिरांनी व्याप्त (भरलेले).

**nervous system** तंत्रिका व्यूह (तंत्र); चैतन्यव्यूह

सजीवास बाह्य परिस्थितीचे ज्ञान करून देणारी संरचना (कोशिका, तंतू, जीवद्रव्य, इ.).

**nervure** प्रधानसिरा

पानातील मोठी शीर.

**network** जालक; जाळे

पान अथवा तत्सम अवयवातील शिरांचे जाळे; कवक वनस्पतीतील जंतूंचे जाळे.

**netted** जालयुक्त; जाळिदार

शिरांचे जाळे असलेले (उदा. द्विदलिकित वनस्पतीचे) पान.

**neuter (neutral) flower** क्लीब-लिंगहीन-पुष्प

नपुंसक फूल; कार्यक्षम केसरदले किंवा किंजदले नसलेले फूल; उदा. अळूच्या फुलोऱ्यातील काही फुले; सूर्यफुलाच्या स्तबकातील किरण पुष्पके.

**neutralisation** उदासिनीकरण

अल्कधर्मी पदार्थाने (रसायनाने) अम्लधर्मी पदार्थाचे गुण नाहीसे करण्याची विक्रिया.

**neutriflorus** लिंगहीन (निर्लिंग) पुष्पी

नपुंसक फुले असलेले; उदा. सूर्यफुलाच्या कुलातील किरण-पुष्पके नपुंसक असलेल्या काही जाती.

**nicotianus** तंबाखू रंगी

गर्द तपकिरी रंगाचे.

**nicotine** निकोटीन

तंबाखूच्या पानातील क्षाराभ द्रव्य (अल्कलॉइड).

**Nidulariaceae** नॅडिकवक कुल; निड्युलॅरिएसी

सत्यकवकांपैकी गदाकवक वर्गातील (भूकंदुक गणातील) एक लहान कुल; ह्यातील सर्व वनस्पती शवोपजीवी असून शरीर पक्ष्याच्या (पेल्यासारख्या) घरट्याप्रमाणे असते. पहा Basidiomycetes; Eubasidii; Lycoperdales.

**niger** काळे; कृष्णवर्णी; कारळा

उदा. कांगणीचे फळ (*Solanum nigrum* L); कारळा (कार्तिल) *Guizotia abyssinica* Cass).

**night-position** निशास्थिती

रात्री (अंधारात) काही वनस्पतींच्या (शिंबीकुलातील) पानांची सैल लोंबणारी (निमिलीत) स्थिती; तसेच काही फुले (कमळ) रात्री बंद राहण्याची रीत; पहा nyctinasty.

**nigricant (nigricans)** कृष्णवर्णी.

काही कालानंतर काळे होणारे; उदा. फड्या निवडुंग (*Opuntia nigricans* Haw.); *Ixora nigricans*); राई (*Brassica nigra* Koch.).

**Nipetum** गुलगा-संघात; निपेटम

गुल्गा नावाच्या ताल वनस्पतींचे प्राधान्य असलेला समुदाय; पहा consociation.

**nitid** चमकदार

स्वच्छ, गुळगुळीत असल्याने चकाकणारे; कुनिस, सारोली (*Alnus nitida* Endl.).

**nitrification** नायट्रीकरण

जमिनीतील सूक्ष्मजंतू, कवक इत्यादींच्या साहाय्याने वनस्पती व प्राणी यांच्या मृत अवशेषांचे रूपांतर प्रथम अमोनियात व नंतर नायट्रेटयुक्त लवणात होण्याची प्रक्रिया; ही लवणे वनस्पती पुन्हा शोषून घेतात किंवा त्यातील काही भाग अन्य सूक्ष्मजंतूमुळे नायट्रोजनहीन बनून (विनायट्रीकरण denitrifying) तो वायू हवेत मिसळून जातो.

**nitrogen-fixation** नत्र (नायट्रोजन) स्थिरीकरण; नत्र-स्थिरण

अननिल (हवेशिवाय जगणारे) सूक्ष्मजंतूद्वारे किंवा काहीं नील-हरित शैवलांकडून स्वतंत्रपणे अथवा मुळातील सहजीवी सूक्ष्मजंतूद्वारे केले जाणारे हवेतील नायट्रोजन वायूचे संस्थापन (कार्बनी नायट्रोजन-संयुग-निर्मिती); याचा इतर वनस्पतींसही अन्नघटक म्हणून उपयोग होतो, कारण जमीन नायट्रोजनसंपन्न होते.

**nitrophilous** क्षारप्रिय; नत्रप्रिय

भरपूर नायट्रेट असलेल्या जमिनीत वाढणारी (वनस्पती).

**nocturnal** (१) नैश; (२) रात्रिंचर

(१) रात्रीसबंधी; रात्री घडून येणारे;

(२) रात्री संचार करणारे (निशाचर);



**— movement** नैश चलन-वलन.

रात्रीमुळे घडून येणारी हालचाल; पाना-फुलांची उघड झाप.

**nodal** पर्वीय

पेऱ्यावरचे; पेऱ्यातील; पेऱ्यासंबंधी.

**— diphragm** पर्वपटल

पेऱ्यांमध्ये पसरून वाढलेला पडदा.

**node** पेरे; पर्व

खोडावर जथून एक किंवा अनेक पाने, बगलेतील कळ्या व कधी मुळ्या निघतात तो दोन कांड्यांमधील भाग.

**nodiferous** पेरेदार; पर्वयुक्त.

पेरी स्पष्ट असलेले (खोड); उदा. ऊस, बांबू, इ.

**nodose** गाठदार; गाठाळ.

गाठी असलेले (मूळ);

**nodular** ग्रंथिल; गंडयुक्त.

अनेक लहान उंचवट्यासारख्या गाठी असलेले.

**nodule** गंड; ग्रंथि; ग्रंथिका, गाठ

लहान गाठ; काही शिंबी वनस्पतींच्या मुळावर सूक्ष्म-जंतु युक्त गाठी असतात.

**nomenclature** (१) नामपद्धति; (२) नामकरण;

(१) प्राणी किंवा वनस्पतींच्या वर्गीकरणात शास्त्रीय नाव देण्याची पद्धत किंवा (२) प्रत्यक्ष नाव देणे; पहा Binomial nomenclature.

**non-** अ-; -हीन

अभावदर्शक उपसर्ग किंवा प्रत्यय.

**non-cellular** अकोशिक

संरचनेत कोशिका नसलेले; उदा. प्राणी व वनस्पती याशिवाय इतर वस्तू; उदा. विषाणू.

**non-ciliated** केसलहीन

केसल अथवा केसले नसलेले (बीजुके, कोशिका, गंतुके); पहा cilium.

**non-cyclic** अचक्रीय

पहा acyclic.

**non-cytoplasmic** अपरिकलीय; परिकलहीन

परिकल नसलेली (मृतकोशिका). उदा. घनसूत्र, कठक-कोशिका; पहा stone cell.

**non-disjunction** अवियोजन

पहा disjunction.

**non-heritable** नानुहर्य; अवंशागतिक
एका पिढीतून दुसरीत परंपरेने न उतरणारे ( संपादित गुणदोष ).

**non-septate** पटहीन
पडदा (पडदे) नसलेला; उदा. काही कवक तंतू, व काही शैवल तंतू.

**normal** नियमित; सामान्य; नित्य
संरचनेच्या संदर्भात, नित्याप्रमाणे असलेली; परिस्थितीच्या दृष्टीने, सामान्य असलेली.

**notate (marked)** रेषांकित; बिंदवांकित
रेषा किंवा ठिपके पडलेले.

**notch** खाच
मर्यादित खोलगट भाग.

**notched (emarginate)** निम्नमध्य
मध्ये खाच असलेले (पानाचे टोक; उदा. उंडी, कांचनाची एक जाती).

**nucellus** प्रदेह; बीजांडकाय
बीजकातील गाभा; यातच गर्भकोशिका (गुरुबीजुक) असते; बीजकाभोवती एक किंवा दोन आवरणे असतात; पहा ovule.

**nuciferous** कपाली धारक
कठीण कवचाचे फळ असणारे ( झाड ); उदा. ओक; नारळाचे (*Cocos nucifera* L.) आतील कवचधारी भागाला उद्देशून जातीवाचक नाव दिले आहे; पण नारळाचे फळ अश्मगर्भी आहे; पहा nut.

**nuclear** प्रकलीय
प्रकलासंबंधी; प्रकलातील; पहा nucleus.

**— disc** प्रकलबिम्ब; केंद्रकी बिम्ब
कोशिका-विभाजनात प्रकलातील सर्व रंगसूत्रांच्या जोड्या बनून त्यांची कोशिकेच्या मध्यास बनलेली तबकडीसारखी आकृती (मध्यावस्था).

**— division** प्रकल-विभाजन
प्रकलाची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष विभागणी.
पहा karyokinesis; meiosis; mitosis.

**— fibril** रंगसूत्र
पहा chromosome.

**— fusion** प्रकलसंयोग
पुं– व स्त्री– प्रकलांचे मीलन.

**— membrane** प्रकलपटल
प्रकलाचे फार पातळ आवरण.

**— sap** प्रकलरस
प्रकलावरणाच्या आतील द्रवपदार्थ.

**— spindle** प्रकलतर्कु
प्रकलविभाजनामधील मध्यावस्थेत व पश्चावस्थेत आढळणाऱ्या व एका ध्रुवापासून दुसऱ्यापर्यंत पसरलेल्या अनेक तंतूंची कुकड्यासारखी मांडणी.

**— star (aster)** तारकावस्था
पहा nuclear disc.

**— thread (spindle-fibre)** तर्कुतंतु

**— vacuole** प्रकल-रिक्तिका; प्रकलातील पोकळी;

**nucleated** प्रकलयुक्त; केंद्रकित.
प्रकल असलेली ( कोशिका ).

**nucleic** प्रकली; न्यूक्लीइक
प्रकलातील; प्रकलासंबंधी.

**— acid** प्रकली अम्ल; केंद्रकाम्ल
अनेक न्यूक्लिओटाइडांच्या संयोजनाने बनलेली लांब साखळीची संयुगे ( डीएनए, आरएनए );
पहा nucleotide.

**nucleolus** प्रकलक; केंद्रिका
प्रकलातील घनबिंदू; यामध्ये रिबोज प्रकल प्रथिने असतात; प्रकल-विभाजनात प्रकलक लुप्त होतो व पुढे रंगसूत्रातील काही भागापासून पुन्हा आकार घेतो.

**nucleoplasm** प्रकलरस; केंद्रकरस
प्रकलातील द्रवपदार्थ.

**nucleo-protein** प्रकल-प्रथिन
प्रकली अम्ल व प्रथिन यांचा रासायनिक संयुग.

**nucleotide** न्यूक्लिओटाइड
पाच कार्बन अणूंची एक शर्करा (रिबोज), फास्फॉरिक अम्ल व नायट्रोजनयुक्त क्षारक ( प्यूरिन किंवा पिरॅमिडीन) यांच्या प्रत्येकी एक रेणूंचा बनलेला रासायनिक संयुग; यापासून डी ऑक्सीरिबोज न्यूक्लीइक अम्ल (डीएनए) व रिबोजन्यूक्लीइक अम्ल (आरएनए) बनतात; डीएनए आनुवंशिकतेबद्दल आणि आरएनए हे अम्ल प्रथिन-संश्लेषणास जबाबदार असते.
पहा chromosome; ribosome.

**nucleus** प्रकल; केंद्रक
सजीव प्राकलातील अत्यंत जटिल प्राथिनयुक्त व संघटित सूक्ष्म काय; हा कोशिकेतील सर्व जीव-प्रक्रियांना जबाबदार असून कोशिका-विभाजनात विशेष क्रियाशील असतो; आनुवंशिक लक्षणांच्या अनुहरणास जबाबदार

असलेले घटक ( रंगसूत्रे व जनुके ) त्यातच सामावलेले असतात; पहा mitosis, meiosis. chromosome.

**—, incipient (central body; open nucleus)** प्रारंभिक प्रकल

नीलहरित शैवलात आढळणारा सापेक्षतः असंघटित व प्रकलपटल नसलेला प्रकलकणांचा समूह.

**nuculanium ( nuculane )** द्राक्षाभ

लिंडले याच्या मताप्रमाणे ऊर्ध्वस्थ व द्राक्षासारखे पण कठीण बियांचे फळ ( मृदुफळ ); उदा. निंब, करवंद, खजूर, द्राक्ष, इ.

**nucule ( oogoniophore )** अंदुकाशयदंड; न्युक्यूल

कांडशरीरिका शैवलातील स्त्री–जननेंद्रिय. पहा Charophyceae.

**nude** नग्न

पाने, खवले किंवा तसे उपांगांचे आवरण नसलेले; उदा. अमरकंद ( *Eulophia nuda* Lindle. ).

**nudicaulous** नग्नस्तंभी; नग्नक्षोड.

खवले, पाने नसलेल्या खोडाची ( वनस्पती ); उदा. नेपती, सोमलता, नांग्या शेर, इ.

**nulliplex** अघटक

आईबापापासून विशिष्ट लक्षणांबद्दल जबाबदार असलेल्या प्रभावी जनुकाचा संततीत अभाव; त्यामुळे संततीत फक्त अप्रभावी ( अप्रकट ) जनुक असते व त्यामुळे पूर्वी सुप्त ( अप्रकट ) असलेला गुण दिसतो, पहा duplex, simplex.

**nursery garden** पन्हेरी बाग

वाफ्यात किंवा बागेत नियोजित ठिकाणी लावण्यापूर्वी रोपे तयार करण्याची नियंत्रित जागा.

**nut** कपाली; कवची फळ

एकापेक्षा अधिक किंजदलापासून बनलेल्या संयुक्त किंजपुटापासून पक्व झालेले, शुष्क, कठीण कवचाचे (फलावरणाचे ) पण न तडकणारे एकबीजी फळ. उदा. काजू, हॅझेल नट, ओक (वंजूफल); हीच इंग्रजी संज्ञा अश्मगर्भी फळातील कठीण आवरणाच्या (अंतःकवच) बियांस वापरतात. उदा. नारळ; अक्रोड; बदाम; जरदाळू, इ.

**—, spurious** छद्म कपाली; आभासी कपाली

फलावरणाखेरीज इतर भागांपासून कठीणपणा मिळालेले फळ. उदा. गुलबुशाच्या फळास परिदलाच्या तळभागापासून काठिण्य येते; यू ( बिरमी ) च्या कपालीस बीजावरण कठीण असून बीजोपांग मांसल असते.

**nutation** प्रच्यवन

( १ ) खोड, फांदी इ. अवयवांच्या टोकांची वेढे देत जाणारी सर्पिल अथवा एका बाजूकडून दुसरीकडे होणारी वाढ; विभाजी भागांतील (टोकातील) वाढीच्या दिशेत व प्रमाणात होणाऱ्या सतत बदलामुळे होणारी घटना.

( २ ) वाढ होत असलेल्या अवयवाच्या टोकाचे बाजूकडे झुकणे; यामुळे ते टोक नागमोडी वाढलेले आढळते.

**—, revolving** परिवर्धन

वाढणाऱ्या खोडाच्या टोकाचे सभोवार वळणे; त्यामुळे हवेत त्याची फिरकी बनते; याचे कारण टोकामधील वाढीची प्रक्रिया क्रमाने टोकाच्या निरनिराळ्या बाजूकडे बदलत राहते; याचा परिणाम त्या खोडास जवळच्या आधाराबर वेढून राहण्यात होतो. हा प्रकार वेलींच्या व तणाव्यांच्या टोकास दिसून येतो; वेलीच्या व तणाव्यांच्या ( प्रतानांच्या ) टोकास सतत आधारास न चिकटलेल्या बाजूस अधिक वाढ होत राहिल्याने त्याची गुंडाळी बनते; वेली वर चढत जातात.

**nutlet** कपालिका

पक्वावस्थेत फुटणाऱ्या फळातील शुष्क एकबीजी भाग ( फलांश ); उदा. तुलसी कुलातील व मोथा कुलातील वनस्पतीतील एकबीजी फळ किंवा फळाचा भाग.

**nutrient** पोषक

पोषण करणारे.

**nutrition ( nutriment )** पोषण

योग्य अन्न व पाणी घेऊन व शरीरातील चयापचयाच्या क्रिया चालू ठेवून ऊर्जेची निर्मिती करणे, झीज भरून काढणे व वाढ होण्यास साहाय्य करणे, ही प्रक्रिया.

**nutritious ( nutritive )** पौष्टिक; पोषक

शरीरास विपुलतेने पोषण देणारे.

**nutritive symbiosis** पोषक सहजीवन;

दोन सजीवांचे परस्परपोषणाच्या तत्त्वावर एकत्र असण्याचा प्रकार; या दोन्हीपैकी कधी एक वाढतो व दुसरा नाश पावतो ( जीवोपजीवन ), तर कधी परस्परास पूरक अशी अन्न घटकांची देवघेव होते ( दगडफूल ). पहा parasitism; Lichen; carnivorous plants;

**Nyctaginaceae** पुनर्नवा कुल; निक्टॅजिनसी

गुल्बुश, पुनर्नवा, वसू, बुगनवेली इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे लहान कुल. याचा अंतर्भाव एंग्लर व प्रँटल यांनी सेंट्रोस्पर्मी या गणात तर बेसींनी पाटलपुष्प गणात (कार्योफायलेलीझमध्ये) व हचिन्सन यांनी रामेठा गणात (थायमेलेलीझमध्ये) केला आहे; प्रमुख लक्षणे : बहुधा ओषधीय, कधी काष्ठयुक्त झाडे, झुडपे, वेली; पाने साधी, समोरासमोर; नियमित, द्विलिंगी, एकलिंगी, सच्छद फुले; परिदले पाच व जुळलेली आणि पाकळ्यासारखी असून खालचा भाग फळाभोवती कायम चिकटून राहतो. केसरदले बहुधा पाच तथापि कधी (१–३०) आणि एका ऊर्ध्वस्थ किंजदलाच्या किंजपुटात एक कप्पा व त्यात एक बीजक; शुष्क फळ, एकबीजी, न तडकणारे आणि बीजात परिपुष्क.

**nyctanthous** (१) नक्तपुष्पी; (२) निशाविकासी

(१) रात्री उमलणाऱ्या फुलांची (वनस्पती); उदा. पारिजातक (*Nyctanthas arbor-tristis* L.); रातराणी (*Cestrum nocturnum* L.).

(२) रात्री उमलणारी फुले.

**nyctigamous** नक्तविकासी

रात्री उमलणारी, बहुधा सुगंधी व दिवसा बंद रहाणारी (फुले); उदा. रातराणी.

**nyctinastic** निशानुकुंचनी

प्रकाशाभावी (रात्रीमुळे) घडून येणारी (हालचाल).

**nyctinasty** निशानुकुंचन

काही वनस्पतींत (उदा. शिंबी कुल), प्रकाशाच्या अभावामुळे त्यांच्या काही अवयवांच्या कोशिकांतील पाण्याच्या प्रमाणात बदल होऊन ते अवयव खाली, बाजूस किंवा वर वळण्याचा प्रकार; उदा. पानांची दले दलके किंवा फुलांच्या पाकळ्या मिटणे. दिवसा प्रकाश तीव्र झाल्यास अशा क्रिया घडून येतात, त्याला आन्हिक निद्रा (दिवा निद्रा– diurnal sleep) –वलन म्हणतात. प्रकाशाचा प्रभाव नाहीसा झाल्यावर पुन्हा पूर्ववत स्थिती प्राप्त होते.

**Nymphoeaceae** कमल कुल; निम्फिएसी

कमळे, महापद्म इत्यादींचे द्विदलिकित फुलझाडांचे कुल. याचा अंतर्भाव मोरवेल गणात (रॅनेलीझमध्ये) केला जातो. प्रमुख लक्षणे : पाण्यात किंवा दलदलीत वाढणाऱ्या ओषधीय वनस्पती; तरंगणारी किंवा बुडून राहणारी पाने; मोठी आकर्षक, नियमित, द्विलिंगी, एकाकी, फुले; देठ पोकळ; परिदले सहा ते अनेक, सुटी; केसरदले सुटी सहा ते अनेक; किंजदले सुटी किंवा जुळलेली, तीन ते अनेक, ऊर्ध्वस्थ किंवा अधःस्थ; मृदुफळातील बियांना बीजोपांग बहुधा असते; पुष्क व परिपुष्क कधी कधी असते. नीलंबियम, निंफिया, कॅब्रोम्बा, नूफर, यूरेल, व्हिक्टोरिया इत्यादी वंशनामे आहेत; हल्ली कॅब्रोम्बेसी, निलंबिएसी व निम्फिएसी अशी तीन कुले केली आहेत.

## O

**oasis** मरूद्यान; मरूवन

रुक्ष प्रदेशातील, पाण्याच्या क्वचित उपलब्धतेमुळे बनलेला, नैसर्गिक वनासारखा कमीजास्त तुरळक वनश्रीने व्यापलेला भाग.

**ob** – व्यस्त; प्रति–

उलट या अर्थाचा लॅटिन भाषेतील उपसर्ग; मराठीतही तसाच उपयोग होतो.

**— compressed** पार्श्वदम्न: प्रतिसंपीडित

बाजूने दबलेले (सपाट झालेले), चपटे.

**— conical** व्यस्त शंकाकृति

खाली तळाकडे टोकदार व शेंड्याकडे रुंदट; भोवऱ्यासारखे.

**— cordate** व्यस्त हृदयाकृती

हृदयाच्या उलट आकाराचे (पान); उदा. अंबुशी; पहा cordate.

**— diplostemonous** प्रतिद्विवर्तकेसरी

फुलातील दोन केसरमंडलांपैकी बाहेरच्या मंडलातील पाकळ्याइतकी केसरदले त्यांच्यासमोर असून आतील केसरदले त्यांशी एकाआड एक, असणारे (केसरमंडल; फूल). पहा Burseraceae.

**— diplostemony** प्रतिद्विवर्तकेसर

वर वर्णिलेला प्रकार.

**— jective** वस्तुभिंग

सूक्ष्मदर्शकाच्या साहाय्याने निरीक्षण करताना वस्तूजवळ असणारे भिंग. पहा eyepiece.

**— lanceolate** आयत कुंतसम; व्यस्त कुंताभ

भाल्याच्या उलट आकाराचे; तळाकडे टोकदार पण समांतर धारांचे व लांबट; उदा. खैरचाफ्याचे पान.

**— late** लघु-अक्षीय; लघ्वक्षी; प्रतिकुंताभ

पृथ्वीच्या आकाराप्रमाणे दोन्ही ध्रुवाकडे काहीसे सपाट असलेले; संत्र्याच्या आकाराचे.

**— ligate** अनिवार्य; आवश्यक
न टाळता येण्यासारखे; सक्तीचे.

**— ligatory symbiont** अनिवार्य सहजीवी
जिवंत राहण्यास सहजीवन बंधनकारक ( आवश्यक ) असलेले ( सजीव ); उदा. दगडफुलातील शैवल व कवक हे दोन घटक.

**— ligulate** प्रतिजिव्हिकाकृति
स्तबक-मध्याकडे लहान जिभेसारखी पुष्पके असण्याचा प्रकार; तळाकडे रुंद व टोकास निमुळता अशा आकाराचा ( पुष्पमुकुट ).

**— lique** तिर्यक्; तिरपे
असमान बाजू ( कडा ) असलेले; उदा. कडुनिंबाचे दल, किंवा बिगोनियाचे पान.

**— long** आयत
समांतर बाजू असलेले, रुंदीपेक्षा बरीच अधिक लांबी असलेले ( पान, फळ, छद, इ. ); उदा. पेरु; राईकुडा; बिही ( *Cydonia oblonga* Mill. ).

**— ovate** व्यस्त अंडाकृति
देठाकडे अरुंद व शेंड्याकडे अधिक रुंद व गोलसर असलेले ( उदा. पान, पाकळी, छद, फळ, इ. ) अंड्याच्या उलट आकाराचे. उदा. फणस व देशी बदाम यांची पाने; भुईतरवड ( *Cassia obovata* Collad. ).

**— ovoid** प्रत्यंडाभ
वर प्रमाणे आकार असलेले पण घन (उदा. फळ, बी, इ. )

**— scure** अस्पष्ट; पुसट
अनिश्चित आसमाव असलेले.

**— solete** रुद्ध; अस्पष्ट; अवशिष्ट; कालबाह्य
क्वचितच आढळणारा, ऱ्हसित किंवा लुप्त झालेला ( अवयव ); जुनी संज्ञा; पहा rudiment.

**— structus** अंशबद्ध
केस किंवा तत्सम लहान उपांगांनी अंशतः बंद केलेले नलिकाकृति पुष्पमुकुटाचे द्वार.

**— turbinatus** प्रतिकुंभीरूप
कुंभीरूपाच्या (भोवऱ्याच्या) उलट आकाराचे; पहा turbinate; napiform.

**— tuse** विशाल; विशालकोनी
काहीसे गोलसर किंवा बोथट; उदा. वडाच्या पानाचे टोक; नागेट्टा ( *Gordonia obtusa* Wall.).

**occlusion** व्रणरोध
वृक्षावर झालेली जखम नवीन ऊतकाने ( किणोतक ) बंद होण्याची प्रक्रिया; पहा callus.

**oceanophilous** सागरप्रिय
महासागरात वास करणे पसंत असणारी ( वनस्पती ).

**oceanophyta** सागरवनस्पति
महासागरात विशेषेकरून आढळणाऱ्या वनस्पती; उदा. काही शैवले : सरगॅजम, पॉस्टेल्शिया, नेरिओसिस्टिस, मॅक्रोसिस्टिस.

**ocellus** नेत्रक
प्रकाशसंवेदी पानाच्या अपित्वचेची कोशिका; उदा. अळू. कॅलॅडियम.

**ochraceous** गैरिक
गेरूसारख्या रंगाचे; पिवळट लालसर; उदा. तांबेरा रोगाचे पानावरचे ठिपके.

**ochrea** परिवेष्टक
खोडाभोवती गुंडाळून असणारे नळीसारखे उपपर्ण; उदा. अनंत; पॉलिगोनम; इ.

**ochreate (ocreate)** नलिकाकृति; परिवेष्टकी
वर वर्णन केलेले उपपर्ण असलेले.

**octagonal** अष्टकोनी
आठ कोन असलेले (फळ किंवा बी).

**octagynous** अष्टकिंजली
आठ किंजले असलेले (फूल).

**octandrous** अष्टकेसरी
आठ केसरदले असलेले (फूल).

**octant** अष्टम
आठवा भाग; अष्टमांश.

**octinucleate** अष्टप्रकली
आठ प्रकले असलेला (गर्भकोश).

**octospermous** अष्टबीजी
आठ बीजे असलेले (फळ).

**octosporous** अष्टबीजुकी
आठ बीजुके असलेला ( बीजुककोश ).

**oddly pinnate** विषमदली पिच्छकल्प
पहा imparipinnate.

**odes** – सम; – आभ
सारखेपणा दर्शविणारा प्रत्यय.

**odontoid** दंतसम
दातासारखे.

**odoratus** सुगंधी
चांगला वास येणारे ( फूल अथवा जवळचा भाग ) उदा. केवडा ( *Pandanus odoratissimus* Roxb.). हिरवा चाफा ( *Artabotrys odoratissimus* R. Br. )

**oecesis** वसनक्रिया
पहा ecesis.

**oecology** परिस्थितिविज्ञान; पारिस्थितिकी; स्थल-विज्ञान
निसर्गतः वनस्पती ( किंवा प्राणी ) अथवा त्यांचे लहान मोठे समुदाय ज्या परिस्थितीत विकास पावतात, तेथील सर्व बाबींचा ( जमीन, हवामान, इतर वनस्पती व प्राणी इत्यादी घटकांचा ) संपूर्ण अभ्यास; पहा ecology.

**oedema ( edema )** शोफ
शंकुमंत वनस्पतींच्या काष्ठयुक्त ऊतकावर वाढलेले अर्बुदासारखे प्रपिंड; वनस्पतींच्या शरीरावर कोठेही कोशिकांची अतिवृद्धी ( सूज ).

**offensive** बोचक; क्षोभक
स्पर्श, गंध, घर्षण इत्यादींमुळे दाह (कंडु किंवा आग) उत्पन्न करणारी ( वनस्पती, तिचे अवयव अथवा यंत्रणा ); उदा. आग्या, खाजोटी इत्यादींच्या स्पर्शाने खाज सुटते व आग होते अथवा काटेरी झाडांचा बोचकपणा जाणवतो.

**officinal ( official )** औषधी
औषधाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरलेली; क्वचित इतर दृष्टीने व्यापारी महत्त्वाची ( वनस्पती ); उदा. अफू, कबाबचिनी, कापूर; गजपिप्पली ( *Pothos officinalis* L. ); दुधळ ( *Taraxacum officinale* Webber); लुतपुतिया ( *Nasturtium officinale* R. Br. ); ऊस ( *Saccharum officinarum* L. )

**offset ( offshoot )** अपप्ररोह; प्रशाखा; उपशाखा
एका वनस्पतीच्या खोडाच्या तळापासून निघालेली व टोकांशी मुळे फुटून नवीन वनस्पती निर्माण करणारी जाड व आखूड शाखा; उदा. गोंडाळ.

**oil** तैल; तेल
वनस्पतीतील कोणतेही पातळ स्निग्ध ( वसायुक्त ) द्रव्य; विशेषतः स्टेरिक, पामिटिक, ओलीक अम्ले.

**— immersion lens** तैल निमज्जन भिंग
तल । न निरीक्षण करण्याकरिता वापरलेले भिंग.

**— plastid** तलकणु
पहा elaioplast.

**— tube ( vitta )** तैल नलिका
तेलाची ने-आण अथवा संचय करणारी सूक्ष्म पोकळी; उदा. धणे.

**Oleaceae** पारिजातक कुल; ऑलिएसी.
ऑलिव्ह, करंबा, ( इंडियन ऑलिव्ह ), पारिजातक, जाई, जुई, चमेली इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; याचा अंतर्भाव किराइत गणात ( जेन्शिएनेलीझमध्ये ) केला जातो. प्रमुख लक्षणे : काष्ठयुक्त, काही वेली, क्वचित ओषधीय; पाने साधी, समोरासमोर; क्वचित संयुक्त, पिसासारखी; द्विलिंगी किंवा एकलिंगी, नियमित व २–६ भागी फुले; पुष्पमुकुट सुटया किंवा जुळलेल्या पाकळ्यांचा, क्वचित अभाव; पाकळ्यास चिकटलेली दोन केसरदले; दोन जुळलेल्या ऊर्ध्वस्थ किंजदलांच्या किंज-पुटात एक किंवा अनेक बीजके; फळे मृदु, आठळीयुक्त किंवा बोंड; अपुष्क बीजे.

**olens** गंधयुक्त
विशेषतः मधुर वासाचे; graveolens = उग्र वासाचे; उदा. सताप ( *Ruta graveolens* L. ); अजमोदा ( *Apium graveolens* L. ).

**oleraceous** खाद्य
स्वयंपाकात उपयुक्त वनस्पतीसारखे; खाण्यास योग्य; लागवडीच्या जागी वाढणारे; उदा. घोळ ( *Portulaca oleracea* L. ); कोबी ( *Brassica oleracea* L. var. *capitata* ).

**olibanum** धूप
चंद्रसेनी ऊद; कडू व सुवासिक राळ; सालई व त्याच वंशातील ( *Boswellia* ) इतर झाडांपासून मिळालेला चिकट गोंदासारखा पदार्थ.

**oligo–** अल्प–
थोडे या अर्थाचा उपसर्ग.

**oligomerous** अल्पभागी
प्रत्येक मंडलात फार थोडे भाग असलेले ( फूल ); उदा. गवते; मोथा कुल; शेर, शेंड, थोर इत्यादी युफोर्बिया वंशातील वनस्पती.

**ombrometer ( rain-guage )** पर्जन्यमापक
पावसाचे प्रमाण मोजण्याचे उपकरण.

**ombrophilous** पर्जन्यप्रिय
भरपूर पावसात वाढत असलेली ( वनस्पती ); उदा. भात, नाचणी, ऊस, रोहिश, मोथा, कुंदा, शेवाळी, केळ, कर्दळ, इ.

**ombrophobe** पर्जन्यद्वेष्टी
सतत पावसात न वाढू शकणारी ( वनस्पती ); उदा. बाभूळ, नेपती, काटेघोत्रा, निवडुंग, इ.

**Ombrophyte (sciophyte)** छायाप्रिय वनस्पती
सावलीत वाढणारी वनस्पती; पर्जन्यप्रिय वनस्पती असाही अर्थ आहे. उदा. नेचे, शेवाळी, कॅलॅडियम, इ.

**Onagraceae** शृंगाटक (शिंगाडा) कुल; ऑनेग्रेसी
फुक्सिया, शिंगाडा, पाणलवंग, ईनोथेरा, केसर इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; याचा समावेश बेथींनी जंबुल गणात ( मिर्टेलीझमध्ये ) व हचिन्सन यांनी मेंदी गणात ( लिथ्रेलीझमध्ये ) केलेला आढळतो. प्रमुख लक्षणे; एकाआड एक, समोरासमोर किंवा झुबक्यात, बहुधा साध्या पानांच्या ओषधी; कधी कधी झुडपे व वृक्ष; द्विलिंगी व बहुधा नियमित फुले. संदले व पाकळ्या २–४ व सुट्या; पाकळ्या क्वचित नसतात; केसरदले ४–८ सुटी व किंजदले बहुधा चार व अधःस्थ किंजपुटात १ ते अनेक बीजके; फळ ( बोंड, कपाली, मृदु ); अपुष्क बीजे किंवा थोडा पुष्क असतो.

**oncospore** अंकुशबीज
बीजप्रसारास सोईस्कर असे आकडे असलेले बीज;

**one-called** एककोशिक
एकाच कोशिकेचा (जीव; बीजुक; प्राणी किंवा वनस्पती); एकच कप्पा असलेला ( परागकोश, किंजपुट, इ. ).

**one-flowered** एकपुष्पी
एकच फूल असणारा ( फुलोरा; वनस्पती ); उदा. झेफिर लिली; कमळ; कुमुद.

**ontogeny** व्यक्तिविकास; व्यक्तिवृत्त
प्राणी किंवा वनस्पती यांच्यापैकी कोणाच्याही ( एकाच्या ) संपूर्ण वाढ व विकासाचा वृत्तांत; पहा embryology.

**oogamete ( female gamete )** स्त्री-गंतुक; अंदुक
प्रजोत्पादक स्त्रीलिंगी कोशिका.

**oogamous** विषमगंतुकी
स्त्री-व पुं-गंतुके भिन्न असलेले ( प्रजोत्पादन अथवा वनस्पती ); पहा isogamy.

**oogamy** अंदुकयुति
अंदुक व रेतुक या भिन्नलिंगी प्रजोत्पादक कोशिकांचा संयोग.

**oogenesis** अंदुकजनन
अंदुकाची ( स्त्री-गंतुकाची ) निर्मिती.

**oogonium** अंदुकाशय
अंदुक निर्मिणारी कोशिका; उदा. शैवले; काही कवक.

**Oomycetes** रंदुककवक उपवर्ग; ऊमायसेटीज
शैवलकवक या वर्गातील दोन्हींपैकी एक उपवर्ग; दुसरा उपवर्ग गंतुबीजुक कवकांचा. पहिल्यात अंदुक व रेतुक यांची निर्मिती असून लैंगिक प्रजोत्पादन त्यांचे साहाय्याने होते; उदा. पिथियम. दुसऱ्यात समगंतुके असून गंतुबीजुक बनतात; उदा. म्यूकर; नवीन वर्गीकरणाच्या पद्धतीत शैवलकवकांचे आठ गण करतात; पहा Phycomycetae; Zygomycetes.

**oosphere ( ovum )** अंदुक
स्त्रीलिंगी प्रजोत्पादक कोशिका.

**oospore ( zygote )** रंदुक
अंदुक व रेतुक या भिन्न प्रजोत्पादक कोशिकांच्या संयोगाने बनलेली संयुक्त कोशिका.

**open bundle** वर्धी वृंद
वाढ चालू असलेला (वर्धिष्णु; कार्यक्षम ऊतककर असलेला) वाहक ऊतकांचा संच; पहा closed bundle.

**open forest** विरल वन
मधून मधून मोकळी जागा असलेले जंगल.

**open formation** विरल समावास
वनस्पतींचा प्रसार ज्यामध्ये विखुरलेला (विरळ) असतो, असा विशिष्ट परिस्थितीतील समुदाय; उदा. पानझडी जंगल; खुरटी झाडी.

**operculate** सापिधान
अपिधान (टोपण) असलेले.

**opercule (operculum)** अपिधान
(१) शेवाळीतील बीजुकाशयाचे किंवा काही बीजी वनस्पतीतील करंडकरूप फळाचे टोपण; उदा. घोळ, कुरडू.
(२) काही परागकणांवरील टोपण.
(३) निलगिरीच्या फुलावरील टोपण; पहा pyxis.

**Ophioglossales** अहिजिव्ह गण; ऑफिओग्लॉसेलीझ
नेचे वर्गातील स्थूलबीजुककोशी उपवर्गातील (युस्पोरँजिएटी) दोन्हीपैकी एक गण; दुसरा गण मॅरेटिएलीझ. या दोन्ही गणातील नेचे सापेक्षतः प्रारंभिक आहेत. अहिजिव्ह गणातील नेचांना पाते व देठ यांतून जनन•

क्षम कणिशासारख्या शाखेवर जाड आवरणाचे बीजुककोश असतात. नागाच्या जिभेसारखे (अहिजिव्हा) पान काहींत आढळल्याने या गणाला व त्यातील एकमेव कुलाला (ऑफिओग्लॉसेसी) त्या अर्थाची नावे पडली आहेत; पहा Eusporangiatae; Filicineae.

**opium** अफू
अफूच्या झाडावरील बोंडाला चऱ्या पाडून काढलेला व मुकविलेला चीक; मॉर्फिया हा त्यातील प्रमुख क्षाराभ (अल्कलॉइड); पहा Papaveraceae.

**opposite** संमुख; समोरासमोर
परस्परांच्या विरुद्ध बाजूस असलेले (अवयव; पाने) उदा. दसरी (*Colebrookia oppositifolia* Sm.) पहा deccussate; antipetalous.

**optimal** पर्याप्त
एखाद्या कार्याच्या दृष्टीने किंवा अवयवाच्या दृष्टीने सर्वाधिक हिताचे (उदा. तपमान, प्रकाश, इ.).

**optimum** इष्टतम
जास्तीत जास्त हितकारक; उदा. तापमान.

**orbicular (orbiculate)** गोलाकार
चकतीसारखे सपाट व गोल (उदा. पान, फळ, बी, इ.), कमळाचे पान; पारिजातक, वावळा व विवला यांची शुष्क सपक्ष फळे.

**Orchidaceae** आमर कुल; ऑर्किडेसी
आकर्षकपणामुळे व कधी सुगंधामुळे परिचित (सुप्रसिद्ध) असलेल्या एकदलिकित वनस्पतींचे मोठे कुल; याचा अंतर्भाव आमर गणात (ऑर्किडेलीझ) हल्ली करतात (पूर्वी मायक्रोस्पर्मी श्रेणीत): प्रमुख लक्षणे : बहुवर्षायू ओषधी कधी अपिवनस्पती; द्विलिंगी, एकसमात्र, सम (किंवा विषम) परिदली, मंडलित, त्रिभागी व जटिल संरचनेची फुले; केसरदले एक किंवा दोन असून किंजलाशी जुळलेले (किंजकेसराक्ष); परागं पुंजामध्ये; तीन अधःस्थ किंजदलांच्या व एका कप्प्याच्या किंजपुटात अनेक सूक्ष्म बीजके; बोंडात अपुष्क बीजे. तीन किंजल्कापैकी एक रुद्ध. सालममिश्री हे एका आमराचे मूळ आहे; व्हॅनिला नावाचे द्रव्य एका आमराच्या फळापासून काढतात व काही खाद्य पदार्थात स्वादाकरिता घालतात. रुद्ध किंजल्काला चंचुक म्हणतात.

**Orchidology** आमरविज्ञान
आमरासंबंधीची माहिती.

**order** गण
वर्गीकरण पद्धतीत अनेक कुलांच्या संचाला ही संज्ञा हल्ली वापरतात; उपवर्ग व वर्ग हे त्यापेक्षा मोठे गट असून जेव्हा एखाद्या गणात एकच कुल असते तेव्हा त्यांची लक्षणे समान असतात व त्यात एक किंवा अनेक वंश समाविष्ट करतात; उदा. आमरगण, तृणगण, गिंकोएलीझ, नीटेलीझ, इ.

**oread** सूर्यपादप
पहा heliophyte; sun-plant.

**orgadium** विरलवन
विरळपणे वाढणाऱ्या वृक्षांचा व झुडपांचा समुदाय (समावास).

**orgadophyta** काष्ठपादप
विरल व काष्ठयुक्त वनस्पती; झुडपे व वृक्ष.

**organ** अवयव; अंग; इंद्रिय
प्राणी किंवा वनस्पती यांच्या शरीरातील निश्चित कार्यक्षम भाग. उदा. पान, खोड, मूळ, फूल, फळ व बी, इ. प्राण्यांत यकृत, प्लीहा, नेत्र, कर्ण, हृदय इ.

**organelle** अंगक
सूक्ष्म कार्यक्षम भाग; पहा cell-organelle.

**organic** कार्बनी; जैव; ऐंद्रिय
सजीव इंद्रियासंबंधी; सजीवासंबंधी; सजीवांनी निर्मिलेल्या पदार्थासारखी संघटना असलेले.

**-- evolution** क्रमविकास; उत्क्रांति
सर्व सजीव प्राचीन व साध्या सजीव द्रव्यापासून क्रमाने फरक पावून निर्माण होत आले आहेत अशी संकल्पना (सिद्धांत; उपपत्ति). पहा evolution.

**organism** जीव; सजीव
ऐंद्रिय संरचना असलेले; भरण, पोषण, वर्धन, प्रजोत्पादन, इत्यादी जैव प्रक्रिया दर्शविणारे; जीव असलेले.

**organogenesis (organography)** अवयव विकास; इंद्रियजनन
इंद्रियांचा उगम, वाढ, प्रभेदन इत्यादी सर्व घटनांचा वृत्तांत.

**orifice (ostiole)** छिद्र; द्वार; रंध्र
पराग, स्त्रिया किंवा बीजुके बाहेर पडण्याचे द्वार.

**origin** उत्पत्ति; उगम
एखाद्या सजीवाची जाती, वंश, किंवा कुल इत्यादींची निर्मिती कोठून झाली, तसेच एखाद्या अवयवाची सुरवात कशी झाली यासंबंधीची माहिती; उदा. पानांचा उगम; फुलांचा उगम; फुलझाडांची उत्पत्ति इ.

**ornithophilous** पक्षिपरागित

पक्ष्यांकडून पराग ने-आण करविणारे ( फूल अगर वनस्पती ); उदा. शाल्मली, पळस, कदंब, पांगारा, इ.

**ortho–** सरल–

उभे किंवा सरळ या अर्थी ग्रीक उपसर्ग.

**orthogenesis** नियत ( निर्धारित ) विकास

प्राणी वा वनस्पती यांच्या अनेक पिढ्यान् पिढ्या निश्चित दिशेने चालू असलेला ( अंगभूत प्रवृत्तीमुळे क्रमाने घडून येणारा ) बदल. त्यामध्ये प्रगति वा परागति अभिप्रेत असते; परिणामी व्यक्तीचे अवयव ऱ्हास पावतात किंवा विकासाप्रत जातात; कधी कधी अतिविस्तार तर कधी अतिसंक्षेप होतो व त्यामुळे ती व्यक्ती अगर जाती जीवनार्थ कलहात अयशस्वी होते. त्यामुळे नवीन जातींच्या निर्मितीस मदत होते, अशी विचारसरणी; पण ती सर्वमान्य नाही.

**orthostichy** सरलपंक्ति

खोडावरील पानांच्या सरळ उभ्या रांगा. उदा. पेरू व रुई यांच्या खोडावर चार तर आल्याच्या खोडावर दोन ओळी असतात; पहा phyllotaxy.

**orthotropous** ऊर्ध्वमुख

किंजदलावर किंवा किंजपुटात सरळ स्थितीत वाढलेले ( बीजक ); यात बीजकरंध्र वरच्या टोकास व बीजकतल तळाशी ( विरुद्ध टोकास ) नाभीजवळ असते; बीजकाचा अक्ष सरळ असतो; उदा. सायकस, चुका, इ.

**oscillation** दोलन

खाली वर्णन केलेली प्रक्रिया.

**oscillatory** आंदोलनी

साधारणपणे घड्याळाच्या लंबकाप्रमाणे घडून येणारी ( हालचाल ) उदा. काही निळी हिरवी शैवले व काही तंतूसारखे सूक्ष्मजंतू.

**osculum** सूक्ष्मरंध्र

पहा ostiole.

**mometer** तर्षणमापक; परासरणमापी

तर्षणाचे मोजमाप करण्याचे उपकरण.

**osmosis** तर्षण; परासरण

पार्य पापुद्र्यातून होणारा दोन विद्रवांमधील पदार्थांच्या कणांचा ( किंवा पाण्याचा ) मंद प्रवेश ( अभिसरण, विसरण ); पहा diffusion; permeable.

**ossified** अस्थिभूत; घनीभूत

हाडाप्रमाणे कठीणपणा आणलेले; उदा. काही सताळू-सारख्या आठळीयुक्त फळाचे अंतःकवच.

२१

**osteosclereide** अस्थिकठक

कठीणपणा आलेली, लांबट हाडाच्या आकाराची कोशिका.

**ostiole ( ostium )** सूक्ष्मरंध्र

काही कवकांच्या गर्तिकांचे, धानीफलांचे आणि काही पिंगल शैवलातील कुहराचे द्वार; उदा. फ्यूकस, पेल्हेशिया; पहा conceptacle; perithecium pycnidium.

**outer bark** बाह्यवल्क

खोडावरील सालीचा बाहेरचा भाग.

**outer glume** परितुष

गवतांच्या कणिशकातील सर्वात बाहेरचे तूस; पहा glume; spikelet.

**outgrowth ( emergence )** उद्वर्ध; उत्थित

पृष्ठभागावर वाढलेले ( उपांग ).

**outline** आकार; रूपरेखा

अवयवाची सीमा दर्शविणारी बाहेरची किनार; उदा. पानाची, पाकळीची, छदाची कडा.

**oval** लंबवर्तुळाकृति

लांबट वर्तुळासारखे; उदा. शेवग्याचे दलक; सदाफुलीचे पान; तळाशी व टोकाकडे गोलसर व समांतर बाजू असलेले; उदा. निळा गुल्मोहर ( *Jacaranda ovalifolia* R. Br. ).

**ovary** किंजपुट

फुलातील किंजदलाच्या ( स्त्री-केसराच्या ) तळाशी असलेला व बीजकांना ( बीजांडांना ) समाविष्ट करणारा फुगीर भाग (भावी फळ); उदा. सर्व फुलझाडे; 'बीजांडकोश व बीजकोश' हे शब्दही वापरलेले आढळतात.

**Ovate ( ovoid, oviform, egg– shaped )** अंडाकृति; अंडाभ

तळाशी रुंद गोलसर व टोकाकडे निमुळत; अंड्याच्या आकाराचे; उदा. गुलबुशचे पान; इसबगोल ( Plantago ovata Forsk. ).

**overlapping** परस्परव्यापी

कलिकावस्थेत पुष्पदले अनेकदा विविधप्रकारे परस्परावर अंशतः झाकून असण्याचा प्रकार; पहा imbricate; contorted.

**ovulate** बीजकयुक्त; बीजांडी–; बीजांड -

बीजके असलेला ( अवयवः छद, खवला, पान, शंकू ).

**ovule** बीजक; बीजांड

बीजी वनस्पतीत आढळणारा बीजपूर्व अवयव; अबीजी वनस्पतीत (नेचाभ पादप) आढळणारा गुरुबीजुककोश व बीजक हे दोन्ही सारखेच ( समजात ) आहेत; पहा megasporangium.

**ovuliferous** बीजकधारा

पहा ovulate

**ovum** अदुक; अंडे; अंडपेशी

पहा egg; oosphere.

**— mother cell** अंदुकजनक कोशिका.

अंदुक निर्माण करणारी कोशिका.

**oxidation** ऑक्सिडीकरण.

मूळच्या रासायनिक संघटनेत ऑक्सिजनचा समावेश करणे.

**oxycanthous** कंटकयुक्त; काटेरी

अनेक काटे असलेले ( पान, खोड, फळ इ. ) उदा. हॉथॉर्न (*Crataegus oxycantha* L.) याच्या फांद्यांचे रूपांतर काट्यांत झालेले असते.

**oxylophyta (humus plants)** कुजात वनस्पति

कुजकट पदार्थावर वाढणाऱ्या वनस्पती; उदा. काही शवोपजीवी कवक; संकवक; काही आमरे (आर्किड).

## P

**P** प; पी; P

पुष्पसूत्रात परिदलमंडल संक्षिप्तरूपाने दर्शविण्यास हे अक्षर वापरतात; पहा floral formula.

**pachynema** स्थूलसूत्रावस्था

प्रकलाच्या न्यूनीकरण विभागणीच्या प्रक्रियेत सर्व रंगसूत्रांचा मिळून प्रथम बनलेला समीपस्थितीतील जाड सर्पिल धागा उभा चिरला जाण्यापूर्वीची अवस्था (काल); पहा synapsis; spireme; meiosis.

**pachytene** घनसूत्रावस्था

न्यूनीकरणातील (दुसऱ्या अवस्थेत) समरचित रंगसूत्रांच्या जोड्यातील प्रत्येक सूत्र अधिक जाड बनण्याची अवस्था; पहा diplotene; leptotene.

**pagophyta** गिरितलस्थ वनस्पति; गिरितलपादप

डोंगराच्या पायथ्याशी वाढणाऱ्या वनस्पती.

**paired (conjugated)** युगल; युग्म

जोडीने असणारे; उदा. रंगसूत्रे; शेवाळींच्या परितुंडाजवळचे दाते; संयोगापूर्वीची दोन प्रजोत्पादक कोशिकांची जोडी.

**Palaeobotany** पुरापादप शास्त्र; पुरावनस्पतिशास्त्र

प्राचीन काळी पृथ्वीवर असलेल्या व आता अश्मीभूत ( दगडासारख्या ) बनलेल्या अवशेषांवरून ओळखू येणाऱ्या वनस्पतींच्या माहितीची शाखा; त्यावरूनच आजच्या वनस्पतींची परंपरा, परस्परसंबंध व कालखंड इत्यादींची कल्पना येते; पहा. fossil.

**Palaeoclimatology** पुराहवामानशास्त्र

प्राचीनकाळातील हवामानासंबंधीची शास्त्रीय माहिती.

**Palaeontology** पुराजीवशास्त्र; जीवाश्मशास्त्र

सर्व प्राचीन जीवांच्या ( प्राणी व वनस्पती ) संबंधीची अश्मीभूत अवशेषांच्या ( जीवारंभाच्या ) शोधावरून व अभ्यासावरून काढलेली माहिती ( विज्ञानशाखा ); क्रमविकासाच्या सिद्धांताला हा बळकट पुरावा मानतात.

**palate** तालु

( १ ) उघडलेल्या तोंडाच्या दोन ओठाप्रमाणे ( द्वयोष्ठक ) असलेल्या पुष्पमुकुटाच्या फुलातील खालचा ठळक ओठ; उदा. अडुळसा; ( २ ) तसाच परंतु मिटलेल्या तोंडाच्या पुष्पमुकुटातील खालच्या ओठातील उंचवटा; उदा. हरणखुरी ( *Linaria ramosissima* Wall.); पहा bilabiate personate and ringent.

**pale ( palea, palet )** अंतस्तुष

( १ ) गवतांच्या कणिशकातील सर्वात आतील छदासारखा भाग ( तूस ); ( २ ) सूर्यफूल कुलातील काहींच्या पुष्पासनावर असलेले शुष्क छद. ( ३ ) काही नेचांच्या पानांच्या देठावरील पातळ, शुष्क व सपाट केस; पहा ramenta.

**palisade cell** स्कंभकोशिका; लंब- कोशिका.

लांबट, पातळ आवरणाची, हरित्कणयुक्त कोशिका.

**palisade tissue ( parenchyma )** स्कंभोतक

पृष्ठभागांशी काटकोनात असलेल्या लांबट हरित द्रव्ययुक्त कोशिकांचा थर; प्रकाशात वाढणाऱ्या बहुधा सर्व पानांत किंवा तत्सम अवयवांत हे ऊतक आढळते.

**pallens** पांडुरवर्णी

फिकट रंगाची; उदा. दवणा ( *Artemisia pallens* Pamp. )

**Palmaceae ( palmae )** ताल कुल; पामेसी

ताड, माड, पोफळी, शिंदी, खजूर, वेत इत्यादी उपयुक्त व परिचित एकदलिकित वनस्पतींचे मोठे कुल; याचा अंतर्भाव ( पामेलीझमध्ये ) ताल गणात करतात. प्रमुख

लक्षणे : बहुधा झुडपे व वृक्ष, क्वचित ओषधी; खोडाला फांद्या क्वचित असतात. संयुक्त पाने हाताच्या पंजाप्रमाणे किंवा पिसासारखी विभागलेली व एकाआड एक असून पानाचा तळ खोडास वेढून ( आवरक ) राहतो. फुलोरा जाडजूड कणिशासारखा व शाखित असून त्यावर एकलिंगी किंवा द्विलिंगी फुले एका किंवा विभक्त झाडावर आढळतात; फुले लहान, परिदले तीनच्या दोन वर्तुळात; तसेच केसरदलेही. तीन ऊर्ध्वस्थ किंजदलांचा संयुक्त किंजपुट; क्वचित विभक्त किंजदले; एक किंवा अनेक बीजके; फळ मृदू किंवा अश्मगर्भी व त्यावर सहवर्धिष्णु परिदले असतात; बिया सपुष्क.

**palmales** ताल (ताड) गण; पामेलीझ

बेंथॅम व हूकर यांच्या पद्धतीत पामी हा गण कॅलिसीनी या एकदलकित श्रेणीत घातला असून एंग्लर व प्रँटल यांच्या पद्धतीत याच गणाला प्रिन्सिपेस म्हटले आहे; बेसींनी हा गण स्ट्रॉबिलॉइडी या उपवर्गात तर हचिन्सन यांनी आपल्या कोरॅलोफ्लोरी या विभागात ठेवला आहे. पलांडु गणातील ( लिलिएलीझ ) पूर्वजांपासून हा गण अवतरला असावा याबद्दल यांचे एकमत आहे.

**palmate** हस्ताकृति

हाताच्या पंजासारखे विभागलेले ( संयुक्त पान ); उदा. शाल्मली, अंबुशी, मार्सिलिया, इ.

**palmately veined** हस्ताकृति सिराल

हाताच्या पंजाप्रमाणे शिरांची मांडणी असलेले ( पाते ); उदा. एरंड, कापूस; कवंडळ ( *Trichosanthes palmata* Roxb ).

गारवेल ( *Ipomoea palmata* Forsk.).

**palmatifid** अल्पहस्ताकृति

अर्ध्यापेक्षा कमी पण हस्ताकृती विभागलेले ( पाते ); उदा. पपई; एरंड.

**palmatipartite** अर्धहस्ताकृति

अर्ध्यापर्यंत विभागलेले हस्ताकृती ( पाते ); उदा. चिनी एरंड; भेंडी; कापूस; ताड.

**palmatisect** अपूर्णहस्ताकृति

अर्ध्यापेक्षा अधिक विभागलेले हस्ताकृती ( पाते ); उदा. गारवेल.

**palm-house** तालगृह

भिन्न प्रकारच्या ताल-वनस्पतींचे संवर्धन करण्यास किंवा कायम सुव्यवस्थित राखण्यास उपयुक्त असे कृत्रिम घर.

**paludosa** पंकवासी

दलदलित वाढणारे ( झाड ); उदा. *Phoenix paludosa* Roxb.

**paluster** रुतणवासी

विशेष प्रकारच्या पाणथळीत वाढणारे ( झाड ) उदा. *Caltha palustris* L.

**Palynology** परागविज्ञान

परागांचे भिन्न प्रकार, त्यांचे गुणधर्म, कार्य, संरचना, जीवाश्म ( व त्यावरून प्राचीन वनस्पतींसंबंधी काढलेले निष्कर्ष ) इत्यादींसंबंधी तपशीलवार माहितीची शाखा; हिला "परागविश्लेषण" असेही म्हणतात.

**pampa** सदातृणक्षेत्र; पंपा

याला रुक्षतृणक्षेत्र असेही म्हणतात; अर्जेंटिनात या प्रकारचे गवताळ प्रदेश आढळतात; ह्या गवतांचे मरुवनस्पतींशी साम्य असते; ती उंच असून त्यांचे झुबके विखुरलेले असतात. पहा steppes.

**Pandanaceae** केतकी कुल; पंडनसी

केवडा ( वंश : पँडॅनस ), साररंगा व फ्रेसिनेशिया या तीन वंशांतील सुमारे २२५ जातींचा समावेश करणारे एकदलिकित कुल; यांचा समावेश पँडॅनेलीझ गणात करतात. प्रमुख लक्षणे : बहुधा पाणथळीत वाढणाऱ्या व वायवी मुळांनी आधारलेल्या काष्ठमय वनस्पती; कधी वेलीप्रमाणे चढणाऱ्या; कधी शाखायुक्त; एकाआड एक, लांब, अरुंद, काटेरी कडा असलेली व तळाशी खोडास वेढणारी पाने तीन रांगांत असतात; फुलोरा टोकास व तळाशी छदे; स्थूलकणिश; नग्न फुले फार लहान व एकलिंगी; नर फुलात अक्षावर फक्त अनेक केसरदले; स्त्रीपुष्पात अनेक किंजदलांच्या वर्तुळाने बनलेल्या एक किंवा अनेक कप्प्यांच्या किंजपुटात एक ते अनेक बीजके; किंजले नसतात; मृदुफळ किंवा आठळीफळ किंवा यांचे बनलेले संयुक्त फळ; पुष्क तेलकट.

**panduriform (pandurate)** वीणाभ

काहीसे वीणेसारखे; मध्यभागी थोडे आकुंचित व तीन खंड पडलेले ( साधे पान ); उदा. पानचेटी; चुक्याची जाती. पहा lyrate; fiddle-shaped.

**pangenesis** सर्वजनन

शरीराच्या सर्व भागांतून सदैव असंख्य सूक्ष्म कण निघून प्रजोत्पादक कोशिकात जमतात व पुढील पिढीचा विकास घडवून आणण्यास व पितरांची लक्षणे पिढीत उतरण्यास जबाबदार असतात असा डार्विनचा सिद्धांत; हा मान्य

झाला नाही, कारण त्यामुळे संपादित गुण उतरणे शक्य होते व त्याला पुरावा नाही. पहा Lamarckism.

**panicle** परिमंजरी

विरळ व अनेक शाखायुक्त मंजरी किंवा तत्सम फुलोरा; उदा. आंबा, कंगुणी (*Celastrus paniculatus* Willd.).

**paniculate** परिमंजरीय

परिमंजरीयुक्त.

**panniform (pamosus)** ऊर्णाजिनाभ

बुरणूस किंवा लोकरीच्या कापडासारखे.

**pantogenous** सर्वाश्रयी; भिन्नोपजीवी

अनेक आश्रयावर वाढणारी (वनस्पती); उदा. काही कवक.

**Papaveraceae** अहिफेन कुल; पॅपॅव्हरेसी

अफू, पिवळा धोतरा (काटे धोतरा), पॉपी इत्यादी (द्विदलिकित) वनस्पतींचे कुल. याचा अंतर्भाव (पॅपॅव्हरेलीझमध्ये) अहिफेन गणात करतात; हचिन्सन यांनी ऱ्हीडेलीझमध्ये आणि बेंथॅम व हूकर यांनी पराए-टेलीझमध्ये हे कुल घातले आहे. प्रमुख लक्षणे : एका-आड एक पाने व चीक असलेल्या ओषधी. फुले नियमित किंवा एकसमात्र, द्विलिंगी; पाकळ्या ४-६, क्वचित नसतात; संदले २; केसरदले २, ४ किंवा अनेक; किंजदले २ ते अनेक, जुळलेली; ऊर्ध्वस्थ किंजपुटात एक कप्पा व तटलग्न बीजकाधानी; बीजके अनेक; बोंड किंवा कपाली प्रकारचे फळ; बीजे सपुष्क.

**Papilionaceae** पलाश कुल; पॅपिलिओनेसी

अगस्ता, घेवडा, गोकर्ण, पळस (पलाश), हरभरा, वाटाणा, शिसू, करंज, पांगारा इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. हचिन्सन यांनी याचा समावेश शिंबी गणात (लेग्युमिनोजीमध्ये) केलेला असून तत्पूर्वी शिंबी कुलातील हे एक उपकुल मानले जात असे. प्रमुख लक्षणे : ओषधी, क्षुप व वृक्ष: पाने साधी किंवा संयुक्त; पंचभागी, एकसमात्र, द्विलिंगी फुले; पुष्पमुकुट पतंगरूप; केसरदले बहुधा दहा, एकत्र जुळलेली किंवा दोन संघात; शिंबा तडकून बिया बाहेर पडतात. पतंगासारख्या (चणक) पुष्पमुकुटावरून चणक कुल असेही नाव या कुलाला दिलेले आढळते.

पहा Leguminosae.

**papilionaceous** पतंगरूप

फुलपाखरासारखा दिसणारा पुष्पमुकुट; यामध्ये एक सर्वात मोठी पाकळी (ध्वज) बाहेर व तिच्या आत दोन बाजूच्या लहान पाकळ्या (पक्ष=पंख) व मध्ये दोन जुळलेल्या पाकळ्यांचा नावेसारखा (नौकातल) भाग अशा पाच पाकळ्या असतात; उदा. अगस्ता; वाटाणा.

**papilla** पिंडिका

मृदु उंचवटा.

**papillate (papillose)** पिंडिकेय

अनेक पिंडिका असलेला (पृष्ठभाग).

**pappus** पिच्छसंदले

पिसासारखा अथवा केसांच्या झुबक्यासारखा संवर्त; उदा. दुधळ, सहदेवी, इ.

**parallel evolution** समांतरित क्रमविकास

दोन भिन्न गटात, समान परिस्थितीत विकास होत गेल्यामुळे काही लक्षणांत सारखेपणा येण्याची प्रक्रिया; उदा. रुई कुल, एरंड कुल व निवडुंग कुल यांतील काही वनस्पतींत काटेरी, मांसल व पानासारखे हिरवे खोड आढळते, ते रुक्षतेशी समरस होण्याकरिता असते.

**parallel venation** समांतर सिराविन्यास

पात्याच्या तळापासून अनेक शिरा उगम पावून टोका-कडे त्या समांतर जाऊन तेथे परस्परांशी जुळल्यास "अभिसारी" व न जुळता पात्याच्या कडेने गेल्यास "अपसारी" म्हणतात व हा "बहुसिराल" समांतर सिराविन्यास; पात्यात फक्त एक प्रमुख शीर व अनेक उपशिरा त्याशी काटकोनात पण समांतर असल्यास "एकसिराल" समांतर शिरांची मांडणी म्हणतात; उदा. गवत व केळ यांची पाने;

पहा convergent; divergent unicostate; multicostate.

**paraphysis (pl. paraphyces)** वंध्यतंतु

इतर फलनक्षम अवयवांमधून असणारा व कार्यक्षम नस-लेला (वांझ) तंतूसारखा अवयव; उदा. काही अबीजी वनस्पती (शेवाळी, शैवले, कवक, इ;).

**parasite** जीवोपजीवी

दुसऱ्या सजीवावर आपला निर्वाह अंशतः किंवा पूर्णतः करणारा सजीव; उदा. तांबेरा रोग; हिवतापाचे जंतू, बांडगूळ; अमरवेल.

**parasitism** जीवोपजीवन

जीवोपजीवी असण्याचा प्रकार.

**parastichy** सर्पिल पंक्ति; परिपंक्ति

खोडावरील पानांच्या एकाआड एक मांडणीत (सर्पिल प्रकार) त्यांच्या तळातून खोडाभोवती काढलेल्या

काल्पनिक रेषेला " जननिक सर्पिल " म्हणतात; जेव्हा खोडावरील पानांची गर्दी असते व त्यांचा निकट संपर्क असतो, तेव्हा अन्य सर्पिल रेषांची श्रेणी ठळकपणे आढळते व त्यांना सर्पिल पंक्ती म्हणतात; उदा. पाइनचे शंकू; वई निवडुंग.

**parasyndesis** समांतर युग्मन

प्रकल विभाजनातील समीप स्थितीत समजात रंगसूत्रांची समांतर मांडणी ( उपस्थिती ); पहा synapsis.

**paratonic** प्रवर्तित

वनस्पतिसृष्टीत आढळणाऱ्या व बाह्यचेतनेमुळे घडवून आणलेल्या ( हालचाली ); याच्या उलट स्वायत्त ( स्वयंप्रेरित ); पहा autonomic.

**parenchyma** मृदूतक

बहुधा पातळ आवरणाच्या, जिवंत, समव्यासीय व विविध कार्ये करणारा उपयुक्त कोशिकांचा समूह ( ऊतक ); उदा. मध्योतक, वायूतक, हरिमोतक, स्कंभोतक इ. पहा mesophyll; palisade.

**parenchymatous** मृदूतकीय.

मृदूतकाचे बनलेले.

**parents** जनक पिढी

आनुवंशिकतेच्या चर्चेत ( संकर-प्रयोगात ) वापरली जाणारी माता व पिता ( आई व बाप ) यासंबंधीची संज्ञा; त्यापुढच्या ( त्यापासून जन्मलेल्या ) संततीस ' संतानीय पिढी ' म्हणतात;
पहा filial generation.

**parichnos** द्विपार्श्वमुद्रा

पान पडून गेल्यावर खोडावर मागे राहणाऱ्या वणावरचे ( किणावरचे ) बाजूचे दोन ठसे; उदा. लेपिडोडेंड्रेलीझमध्ये ह्या गणातील प्राचीन वनस्पतींचे खोडाचे जीवाश्म; पहा Lycopodineae.

**parietal** तटलग्न; भित्तीय

एखाद्या अवयवाच्या आवरणास चिकटलेले अथवा त्यावरच वाढलेले; उदा. बीजक; बीजुक.

**— layer** भित्तिस्तर

बाहेरचा थर.

**paripinnate** समदली पिच्छाकृति

मध्यशिरेच्या ( पर्णाक्षाच्या ) फक्त दोन्ही बाजूस असलेली दले संख्येने सारखी असलेले ( पिसासारखे ) व टोकास दल नसलेले संयुक्त पान; उदा. चिंच, बाहवा, इ.

**parthenocarpic fruit** अनिषेक फल

**parthenocarpy** अनिषेक फलन

फलनाच्या लैंगिक प्रक्रियेशिवाय फळ बनण्याची घटना; उदा. केळ, अननस, इ. काही द्राक्षाचे व टोमॅटोचे बीजहीन प्रकार कृत्रिमरीत्या बनविले जातात.

**parthenogenesis** अनिषेक जनन

फलनाशिवाय ( लैंगिक प्रक्रियेशिवाय ) अंड्यापासून (अंदुकापासून) नवीन व्यक्तीची उत्पत्ति होण्याची घटना; उदा. दुधळ, धोतरा इत्यादि वनस्पती; प्राण्यांपैकी काही माश्यांचे, व मुंग्या, मधमाश्या, गांधीलमाश्या इत्यादींचे प्रकार.

**parthenospore** अनिषेकबीजुक

लैंगिक प्रक्रियेशिवाय एकाच गंतुकापासून बनलेले गंतुबीजुकासारखे बीजुक; पहा zygospore.

**particulate inheritance** विविक्त अनुहरण

आईबापापासून संततीत उतरलेल्या लक्षणांचे साधे अपूर्ण मिश्रण झाल्यास संततीमध्ये व्यक्तीच्या शरीराचा काही भाग आईकडून आलेल्या व काही भाग बापाकडून आलेल्या लक्षणांचा छाप दर्शवितो; उदा. कर्दळीच्या काही जातींत निम्मे पान हिरवे व निम्मे लालसर पिंगट असल्याचे आढळते. तसेच फुलांच्या रंगातही मिश्रण दिसते; पहा blended inheritance.

**parviflorous** लघुपुष्पी

एकाच वंशातील इतर जातीत आढळणाऱ्या फुलांपेक्षा लहान फुले असलेली ( वनस्पती ); उदा. राईकुडा ( *Ixora parviflora* Vahl. ).

**parvifolius** लघुपर्णी

एकाच वंशातील इतर जातीतल्यापेक्षा लहान पाने असलेली ( वनस्पती ).

**passage- cell** मार्ग-कोशिका; प्रवेश-कोशिका

मुळांतील अंतस्त्वचा अथवा बहिस्त्वचा ह्यातील कोशिकावरण न बदललेल्या कोशिका; यातून पाण्याचा आत बाहेर प्रवेश चालू राहतो; इतर कोशिकांचा अशा प्रवेशाला विरोध असतो; बहुधा या कोशिका आदिप्रकाष्ठासमोर असतात.

**Passifloraceae** कृष्णकमळ कुल; पॅसिफ्लोरेसी.

कृष्णकमळ, पॅशनफ्रूट, ॲडेनिया पामॅटा इत्यादी द्विदलिकित फुलझाडांचे एक लहान कुल; हल्ली याचा अंतर्भाव कृष्णकमळ गणात (पॅसिफ्लोरेलीझमध्ये ) करतात; तत्पूर्वी पराएटेलीझमध्ये (एंग्लर व प्रॅंटल यांनी) केला होता; कृष्णकमळाच्या वंशात (पॅसिफ्लोरामध्ये)

सुमारे पाचशे जाती असून या कुलात एकूण बारा वंश व सहाशे जाती आहेत; प्रसार उष्ण व समशीतोष्ण कटिबंधात आहे. प्रमुख लक्षणे : बहुतेक जाती ओषधी, झुडपे किंवा पानांच्या बगलेतील तणावे असलेल्या वेली; पाने साधी, खंडयुक्त, एकाआड एक व उपपर्णयुक्त; फुले एकेकटी किंवा वल्लरीवर येतात; फुले नियमित, द्विलिंगी किंवा एकलिंगी; फुलात केसरधर किंवा किंजधर आढळते; कधी पाकळ्या नसतात; संदले, प्रदले, केसरदले ३–५; केसरदले कधी १०; तीन ऊर्ध्वस्थ किंजदलांच्या किंजपुटात एक कप्पा व तटलग्न अनेक बीजके; मृदुफळ किंवा बोंड; बियांवर अध्यावरण.

**pasteurisation** पाश्चरीकरण

ज्यात वितंचन होऊन पदार्थ बिघडण्याची शक्यता असते तो द्रव सुमारे १४०° फॅ. पर्यंत तापवून वितंचन घडवून आणणाऱ्या कवकांचा व बीजुकांचा नाश करण्याची प्रक्रिया; यामुळे द्रवाचे परिरक्षण होते.

**pasture** कुरण; गुरचरण

नरम व उंच गवत सलगपणे वाढून बनलेला गवताळ प्रदेश (समावास); गुरांना चरण्यास हा फार उपयुक्त असतो.

**paternal** पैतृक

पित्याकडून आलेली (लक्षणे, जनुके किंवा रंगसूत्रे).

**pathogen** रोगकारक; रोगजनक; रोगजंतु

रोगाची लागण करणारे (बीजुक, जंतू इ.)

**pathogenic** विकृतिजनक

विकृति (रोग) उत्पन्न करणारे जीव किंवा परिस्थिती.

**pathology** विकृतिविज्ञान

रोगासंबंधीची सर्व माहिती संकलन करणारी विज्ञानशाखा.

**—, vegetable (plant)** वनस्पति-रोग-चिकित्सा; वनस्पति-रोगविज्ञान

वनस्पतींना होणाऱ्या रोगासंबंधीची ज्ञानशाखा.

**patulous** विस्तारित

विस्तारून किंवा पसरून वाढलेले ( झाड ).

**pear-shaped (obovoid, obconic)** कुंभाकृत

तळाकडे निरुंद होत गेलेले; काही घागरी व तांबे अशा आकाराच्या असतात. उदा. नासपती ( pear ).

**peat** जीर्णक; पीट

विशिष्ट हवामानात, उंचीवरच्या खोल दलदलीत व ऑक्सिजनच्या अभावी, वनस्पतींचे मृत अवशेष पूर्णपणे न कुजता राहून बनलेला जळाऊ पदार्थ.

**pectin** पेक्टिन

फळातील थलथली ( जेली ) सारखा पदार्थ.

**pectinate** कंकतिक

फणीच्या दात्याप्रमाणे बारीक भाग पडलेले; उदा. पान ( कामलता ); पाकळी ( पिंक );

पहा fimbriate; pinnatifid; pinnnatisect.

**pedate** पक्षिपदाकृति

पक्ष्यांच्या पावलाप्रमाणे विभागलेले ( पान किंवा पानातील शीर ); हस्ताकृति खंडित पानाच्या बाजूचे खंड पुन्हा विभागलेले असण्याचा प्रकार.

**pedicel** वृंत: देठ; पुष्पवृंत

फुलाचा देठ; जलनेचातील बीजुककोशधारी तंतू.

**pedicellate** सवृंत

देठ असलेले ( फूल ); उदा. संकेश्वर, गुलाब.

**peduncle** पुष्पबंधाक्ष

फुलोऱ्याचा देठ ( अक्ष ); एकच फूल असल्यास सुद्धा ( उदा. कमळ, झेफिर लिली ) ही संज्ञा वापरतात.

**peel** साल

फळाची साल (उदा. आंबा, केळ, संत्र, डाळिंब, इ. ); यामध्ये केव्हा फलावरणाचे तीन भाग तर केव्हा दोन किंवा एकच भाग येतो.

**pelagic** सागरी

खुल्या समुद्रात ( किनाऱ्यापासून दूर ) वास करणारे ( सजीव ); ही संज्ञा खाऱ्या किंवा गोड्या पाण्यात ( पण तळाशी नव्हे ) राहाणाऱ्यांनाही वापरली जाते; पहा plankton and nekton हे त्यांचे दोन प्रकार.

**pelagophyta** सागरपृष्ठी वनस्पति

समुद्राच्या पृष्ठभागावर तरंगणाऱ्या वनस्पती; उदा. सरगॅजम शैवल.

**pellicle** तनुच्छद

नाजूक व सर्वात बाहेरचा पापुद्रा; अपित्वचा.

**pellucid** पारदर्शी

अंशतः किंवा पूर्णतः पारदर्शक ( पलीकडचे दर्शविणारे ); स्वच्छ.

**pelochthophyta (pelophytes)** कर्दमतीर वनस्पति

चिखल साचलेल्या तीरावरील वनस्पती;

पहा अनूप समावास; पंक समावास; marsh formation.

**peltate** छत्राकृति

छत्राप्रमाणे एक दांडी ( देठ ) व त्यावर पसरट गोलसर ढालीसारखे आच्छादन (पाते) असणारे (पान); उदा. अळू, कमळ, ट्रोपिओलम, इ.

**pendant** लोंबते; निलंबित

आधाराच्या साहाय्याने लोंबणारे; उदा. काही पाने, फुले, फुलोरे, परागकोश, फळे इ. बाहव्याचा फुलोरा.

**pendulous** लोंबते; निलंबी

पहा pendant.

**penicillate** शलाकाकृति

पेन्सिलीसारखे, अनेक केसांच्या झुबक्यासारखे.

**penicillium** केश शलाका; कूर्चक कवक

केसांचा झुबका; *Penicilium notatum* या बुरशीला तिच्या झुबकेदार बीजुकधारी तंतूमुळे ते ( कूर्चक कवक ) नाव पडले.

**pennate** पिच्छाकृति; पक्षाकृति

पहा pinnate.

**pentacarpellary** पंचकिंजी

पाच किंजदले असलेले ( फूल ) अथवा पाच किंजदलांचा बनलेला ( किंजपुट ); उदा. भेंडी कुलातील काही वनस्पती; जास्वंद.

**pentacyclic** पंचचक्रीय

संवर्त, पुष्पमुकुट, केसरमंडल व किंजमंडल यापैकी एका किंवा दोन मंडलात वाढ होऊन एकूण पाच मंडले असलेले ( फूल ); उदा. कळलावी, नागदवणा या दोन्हीत परिदले व केसरदले यांची प्रत्येकी दोन मंडले व किंजदलांचे एकच मंडल असते.

**pentafoliate** पंचदली

पाच दलांचे संयुक्त पान.

**pentagonal ( pentangular )** पंचकोनी

पाच कोनाचे; उदा. निर्गुडी, गुलाब; पाचधारा असलेले (खोड, फळ, बी इ.); उदा. काही निवडुंगाच्या जाती.

**pentamerous** पंचभागी

प्रत्येक मंडलात पाच भाग असलेले ( फूल ). उदा, गारवेल, धोतरा; पहा bimerous.

**pentander ( pentandrous )** पंचकेसरी

पाच केसरदले असलेले ( फूल ); उदा. धोतरा, वांगे, केळ, रुई, इ. यावरुन *Pentandria* हा वर्ग लिनियसने मानला होता व त्यात सर्व पंचकेसरी वनस्पतींचा समावेश केला होता.

**pentarch** पंचसूत्री

पाच आदिप्रकाष्ठांचे गट असलेला ( प्रकाष्ठ; रंभ ).

**pentose** पेंटोज ( शर्करा )

पाच कार्बन अणू असलेले ग्लुकोजसारखे संयुग ( रेणू ); उदा. रिबोज; प्रकली अम्लांचे घटक.

**pepo** कर्कटीफल

अधःस्थ किंजपुटापासून बनलेले अनेकबीजी, एक कप्प्याचे, तटलग्न बीजकविन्यास असलेले मृदुफळ. उदा. काकडी; भोपळा; काशीफळ; (*Cucurbita pepo* L. ).

**pepsin** पेप्सिन

एक पाचक द्रव्य ( वितंचक ); पहा enzyme.

**peptic ferment** प्रथिन पाचक

प्रथिनांचे पाचन करणारे ( व त्यांचे रूपांतर पेप्टोनमध्ये करणारे ) वितंचक. उदा. पेप्सिन.

**perceptible** इंद्रियग्राह्य; अवगम्य

इंद्रियामुळे ग्रहण करता येणारे ( समजून येणारे ).

**perceptibility** अवगम्यता

जाणीव होण्याची क्षमता.

**perception** अवगम

इंद्रियाच्या मध्यस्थीने बाह्य कारण जाणण्याची ( समजण्याची ) प्रक्रिया; उदा. गुरुत्वाचे अस्तित्व कोशिकेतील काही कणांमुळे समजून येण्याची प्रक्रिया. पहा statolith, statocyst.

**percolation** निचरण; परिगलन

पाणी किंवा तत्सम द्रव जमिनीच्या कणांमधून ( जमिनीतील पोकळ्यांमधून ) किंवा छिद्रयुक्त पडद्यातून खाली किंवा बाजूस गळणे ( पाझरणे ).

**perennating organ** बहुवर्षजीवी अंग (अवयव)

अनेक वर्षे जिवंत स्थितीत राहणारा वनस्पतीचा भाग; उदा. जमिनीतील खोड.

**perennation** बहुऋतुजीविता; बहुवर्षजीविता

अनेक वर्षे जिवंत राहण्याची प्रक्रिया.

**perennial** बहुवर्षायु

अनेक वर्षे जिवंत राहणारी ( वनस्पती ); यांपैकी काही एकदाच फुलतात; उदा. घायपात, बांबू ; काही दरवर्षी तर काही कधीमधी फुलतात; पहा annual, biennial.

**perfect** पूर्ण

( १ ) द्विलिंगी फूल ( सर्व अत्यावश्यक अवयव असलेले );

( २ ) सर्व घटक भागांनी युक्त असा अवयव;
( ३ ) लैंगिक प्रक्रियेचा परिणाम म्हणून बीजुकोत्पत्ति होणारी जीवनातील अवस्था; उदा. काही कवकात ( अपूर्ण कवक ) या अवस्थेचा ( धानी, गदा, रंदुक इ. ) अभाव आढळतो.

**perfoliate** परिवेष्टी
पात्याच्या तळामधून खोड वर आल्यासारखे दिसणारे ( पाते ); तळाशी खोडाभोवती वेढून राहणारे; ( उदा. शंखपुष्पी = *Canscora perfoliata*). *Bupleurum perfoliatum* L. जेव्हा दोन समोरची अशी पाती जुळून राहतात तेव्हा त्यास सहजात ( उदा. *Lonicera glauca* Hk. = शिया ) म्हणतात; पहा connate;

**perforate** छिद्रिल
सूक्ष्म छिद्रे असलेले अथवा काहीसे पारदर्शी ठिपके असलेले (पाते).

**peri–** परि–
भोवती या अर्थाचा उपसर्ग.

**perianth** परिदलमंडल
संवर्त आणि पुष्पमुकुट असा भेद नसलेली पुष्पदले; दोन्ही मिळून वर्णन करण्यास पण ही संज्ञा वापरतात; पहा perichaetium

**-- lobe** परिदल
परिदलमंडलाचा भाग.

**periaxial wood** परिप्रकाष्ठ
खोडातील प्रकाष्ठाचा बाहेरचा भाग (उदा. टेटू कुल).

**periblem** मध्यजनक
खोडाच्या व मुळाच्या टोकाकडील सतत वाढणाऱ्या भागाचा ( विभज्येचा ) त्वचाजनकाच्या खालचा कोशिकांचा थर; त्याखाली वाहकवृंदाची निर्मिती करणारा रंभजनक भाग असतो; पहा plerome, meristem; dermatogen.

**pericarp** फलावरण
किंजपुटापासून बनलेले फळाचे संपूर्ण आवरण; बाह्य-कवच, मध्यकवच व अंतःकवच असे याचे तीन भाग असून ते विविध प्रकारचे असतात. ( उदा. आंबा, नारळ). कधी कधी (उदा. सूर्यफूल) तीन्ही भाग एकवटलेले आढळतात.

**perichaetium** परिवेष्टन
शेवाळींपैकी हरितकांच्या बीजुकधराच्या तळाशी असलेल्या सूक्ष्म छदकासारख्या उपांगांचे मंडल; काही यकृतकामध्येही असे वलय आढळते, त्याला 'छदक मंडल' म्हणतात व त्याच्या आतील बाजूस असलेल्या तशाच वलयास 'परिदलमंडल' म्हणतात;
पहा involucre; perianth; Liverworts; Musci ( Mosses ).

**periclinal** परिबाह्यत; पृष्ठसमांतर
वक्र पृष्ठभागाशी समांतरित भित्तिका.

**— chimaera** परिवेष्टित विचित्रोतकी
पहा graft-hybrid; chimaera.

**pericycle** परिरंभ
खोडातील किंवा मुळातील अंतस्त्वचेच्या आतील अस्तरासारखा व रंभाबाहेरचा कोशिकांचा थर; याचा अंतर्भाव रंभातच होतो; पहा stele.

**pericyclic fibre** परिरंभ सूत्र
परिरंभ वलयातील काही घनकोशिका.

**periderm** परित्वचा
त्वक्षाकर व त्यापासून निर्मिल्या जाणाऱ्या बाहेरच्या त्वक्षा-कोशिकांचा थर आणि आतील हरिमोतक अथवा द्वितीयक मध्यत्वचा;
पहा phellogen; phelloderm; cork-cambium; phellem.

**peridiole** बीजुककोटर
भूकंदुकांतील बीजुकधराच्या आच्छादनात असलेल्या गाभ्यातील बीजुके बनविणारा कप्पा.

**peridium** परिधाय
कवकांपैकी भूकंदुक उपवर्गातील बीजुकधराभोवती तंतूंचे बनलेले पापुद्र्यासारखे आवरण. याचे आतील व बाहेरील असे दोन पदर असतात ( अंतःपरिधाय व बहिःपरिधाय ); पहा Mushroom; Gasteromycetes.

**perigone ( perianth; perichaetium )** परिवेष्टन
बाहेरचे आच्छादन.

**perigynous** परिकिंज
फुलातील इतर अवयव किंजमंडलाच्या पातळीवर किंवा पातळीच्या वर असल्यास संवर्त किंजपुटापासून अलग असण्याचा प्रकार; उदा. रॉसबेरी, स्ट्रॅाबेरी, गुलाब इ.

**perimedullary zone** परिनिकाष्ठ-क्षेत्र;
आदिप्रकाष्ठांच्या आतील बाजूस असलेल्या भेंडाभोव-

तीचे ऊतक क्षेत्र; आदिप्रकाष्ठ व भेंड यामधील विभाग ( ऊतक ).

**periodic movements** आवर्ती हालचाल
ठराविक कालाने पुनः पुनः घडून येणारी ठराविक हालचाल; उदा. काही फुलांचे उघडणे व मिटणे; पानांचे निशानुकुंचन; पहा nyctinasty.

**periodicity** आवर्तितता
वर वर्णिलेला प्रकार.

**perinium** अपिबीजुक
पहा epispore.

**peripetalous** परिप्रदलीय
पाकळ्याभोवती असलेले.

**peripheral** परिघीय; परिधी
परिसरात किंवा सभोवार असलेले; उदा. सारोनियस-मधील चार, लांबट, वाकडे रंभ; मुळातील सर्वात बाहेरचे ऊतक ( परिधी ऊतक ); कोशिकेतील सर्वात बाहेरील परिकलाचा थर ( परिधीय परिकल ).

**periplasm** परिप्राकल
अंदुकाशय किंवा रेतुकाशय यातील उपयोगात न येता शिल्लक राहिलेले जीवद्रव्य.

**perisperm** परिपुष्क
पुष्काभोवती प्रदेहापासून बनलेले अन्नयुक्त ऊतक ( कोशिकांचा समूह );
पहा nucellus; endosperm.

**perispore** परिबीजुक
बीजुकाभोवतीचे आवरण; सिलिकायुक्त पुट ( उदा. आयसॉएटिसच्या बीजुकाभोवती असलेले ).

**peristome** परितुंड; परिमुख
हरितकात (शेवाळी) आढळणारे बीजुकाशयाचे द्वार व त्यावरची उपांगे किंवा तत्सम संरचना; पहा Musci.

**peristomate** परितुंडी; परिमुखी
परितुंड असलेले; उदा. शेवाळीपैकी हरितकातील बीजुकाशय.

**peristomatic** संवर्तमुखी
संवर्ताच्या (नलिकेच्या) मुखाशी चिकटलेली (परिकिंज केसरदले).

**perithecium** पलिघ धानीफल
धानीकवकांत आढळणारा, धानी अथवा धानीबीजुके यांची निर्मिती करणारा सूक्ष्मद्वारयुक्त अवयव (धानीफल ); पहा ascus, ascocarp, Ascomycetes.



**peritrichous** परिकेसलीय
सर्व पृष्ठभागावर केसले असलेले; उदा. व्हॉल्व्हॉक्स शैवल; काही सूक्ष्मजंतू. पहा cilium.

**permanent tissue** स्थायी ऊतक; स्थायी ऊति
पूर्णपणे वाढलेल्या व कार्यक्षम झालेल्या कोशिकांचा समूह; क्वचित हा पुन्हा विभाजी व जननक्षम बनतो व नवकोशिकांची निर्मिती करतो; पहा meristem, primary and secondary.

**-- quadrat** स्थायी चौकोन; स्थायी चतुष्कोणक
प्रत्येक बाजू एक मीटर असलेली कायम चौकोनी जागा; ही राखून ठेवून त्यात निसर्गतः उगवून वाढणाऱ्या वनस्पतींची वर्षानुवर्षे नोंद ठेवणे व अशा पद्धतीने विशिष्ट ठिकाणी असलेल्या पादपजातीचा व त्यात होणाऱ्या फरकाचा अभ्यास करणे; याचा परिस्थितिविज्ञानात उपयोग करतात.

**permeability** पार्यता
गरजेनुसार कोशिकाबाहेरील काही पदार्थ ( पाणी, लवणे, क्षार, विद्राव्य पदार्थ इ. आत जाऊ देणे व आतील काही बाहेर जाऊ देणे, अशी ( जीवद्रव्याची ) क्षमता; यावर जीवद्रव्याचे जीवन व कार्यक्षमता अवलंबून असते; कोशिकावरण बव्हंशी पार्य असते.

**permeable** पार्य
पदार्थांचे सूक्ष्म कण आंत ( किंवा बाहेर ) जाऊ देणारा निर्जीव पापुद्रा किंवा तशी जीवद्रव्याची अवस्था.

**persistent** दीर्घस्थायी
धारण करणारा अवयव पूर्ण पक्व होईपर्यंत ( दीर्घकाल ) त्यावर राहाणारा अन्य अवयव अथवा उपांग; उदा. काही झाडांवरची पाने; काही फळावरील संवर्त ( उदा पेरू ). वांगे अथवा डाळिंबाच्या फळावरील संवर्त सतत राहतो व अधिक वाढतो;
पहा accrescent.

**personate** बद्धौष्ठी
दोन ओठाप्रमाणे असलेल्या ( द्वयोष्ठक ) पुष्पमुकुटाचे तोंड मोकळे नसून त्यात तालू, उंचवटा, उपांग इत्यादींचा अडथळा असणे; यामुळे फार बारीक प्राणीच आत तळाकडे जाऊ शकतात. उदा. हरणखुरी, स्नॅपड्रॅगॉन, इ.

**perulate** शल्कित
खवलेदार; उदा. काही कळ्या.

**pesticide** कीडनाशक; पीडकनाशक

पिकांवरील रोगकारक कीटक, सूक्ष्मजंतू किंवा कवक यांचा नाश करणारे; उदा. द्रव, दुसरे कीटक, चूर्णे इ.

**petal** प्रदल; पाकळी

फुलातील बहुधा आकर्षक, विविधरंगी पण पानासारखा सपाट व संदलापासून भिन्न भाग ( पुष्पदल ); पुष्पमुकुटाचा भाग; क्वचित तो हिरवा असतो ( उदा. हिरवा चाफा, सिताफळ, हिरवा अशोक ), पिवळ्या चाफ्याच्या फुलात सर्वच परिदले पिवळी असतात; पहा sepal, calyx, corolla.

**petaloid** प्रदलसम

पाकळीसारखे सपाट, रंगीत ( किंवा पांढरे ) अन्य पुष्पदल; उदा. संदल, छद, केसरदल, किंजल ही सर्व कर्दळीच्या फुलात पाकळीसारखी असतात; संकेश्वराच्या फुलातील संदल प्रदलसम असते.

**petalody** प्रदलीभवन

फुलातील अन्य पुष्पदलांचे, विशेषतः केसरदलांचे, पाकळ्यात रूपांतर झालेली घटना.

**petalous** प्रदलयुक्त

पाकळ्या असलेले.

**petaly** प्रदलावस्था

पाकळ्या असण्याची अवस्था; gamopetaly = युक्त प्रदलावस्था; polypetaly = मुक्त प्रदलावस्था,

**petiolar** वृंतीय

देठासंबंधी; देठावर असलेले ( उपांग, कंटक, उपपर्ण, प्रतान, इ. )

**petiolate** सवृंत

देठ असलेले ( पान ); पहा sessile ( अवृंत ).

**petiole** वृंत; देठ

पानाचा तळ व पाते यामधील पात्यास आधार देणारा ताठर भाग.

**petiolule** वृंतक

लहान देठ; संयुक्त पानावर असलेल्या दलाचा किंवा दलकाचा देठ.

**petrad** शैलपादप

खडकावर येणारी वनस्पती; उदा. काही शैवाक, शेवाळी;

**petrifaction** अश्मीभवन

सिलिसिक ( सिकता ) अम्ल अथवा चुनखडीचे कण मूळ जीव पदार्थात किंवा जीवावशेषात घुसून त्याचे घन परिरक्षित रूपांतर अथवा जीवाश्म बनण्याची प्रक्रिया; fossil.

**petrochthophyta** शैलतीरपादप

खडकाळ किनाऱ्यावरच्या वनस्पती; उदा. काही शैवले.

**petrodophyta** गोलाश्मपादप

खडकाळ गोट्यांच्या जमिनीत वाढणाऱ्या वनस्पती.

**petrophilous** शैलवासी

खडकावर राहणारी (वनस्पती किंवा प्राणी).

**petrophyte** शैलपादप

खडकावर वाढणाऱ्या वनस्पती; उदा. शेवाळी, शैवाक, काही नील-हरित शैवले. खडकाच्या पृष्ठभागावर किंवा बाजूच्या आडव्या कंगोऱ्यावर वाढणाऱ्या असे दोन प्रकार असतात; पहा lithophyta.

**pezizoid** चषकाकृति

पेल्यासारख्या आकाराचे; उदा. पेझिझा नावाचे कवक.

**Phaeophyceae (Brown algae)** पिंगल शैवले वर्ग; फीओफायसी

सामान्यपणे पिंगट, तपकिरी किंवा फिकट रंग असलेल्या साध्या व कायक वनस्पति-विभागातील गट; काहींच्या मते हा विभाग ( Phaeophyta ) समजावा; यामध्ये फ्यूकोझँथीन रंगद्रव्य असते. ही शैवले मोठी असून बहुधा समुद्रात किंवा किनाऱ्याजवळ आढळतात; उदा. फ्युकस, सरगॅजम, पॅदीना, लॅमिनॅरिया, इ.

**Phallaceae** पूतिकवक कुल; फॅलेसी

भूकदुंक कवकाच्या गणात ( लायकोपर्डेलीझ ) समाविष्ट केलेल्या काही गदाकवकांचे एक कुल; यातील मुख्य वंश फॅलस ( इथिफॅलस ) याच्या परिपक्व शरीरापासून अत्यंत घाण वास सुटतो व हे शरीर शेवटी अर्धवट द्रवरुपात चिघळत जाते म्हणून पूतिकवक हे त्याचे नाव व त्याच अर्थाचे इंग्रजी नाव ( Stinkhorn fungus );

पहा Basidiomycetes.

**Phanerogamae (Phanerogams)** बीजी वनस्पति विभाग

बीजकात होणाऱ्या लैंगिक प्रक्रियेनंतर बियासारखे जटिल प्रजोत्पादक इंद्रिय बनविणाऱ्या वनस्पती;

पहा Angiospermae; Gymnospermae.

**phanerophyte** व्यक्तपादप; उपरिकलिकोद्भिद

सरळ बहुवर्षायू खोडावर प्रसुप्तावस्थेतील कलिका व तत्सम अंतिम नाजूक भाग असणारी वनस्पती ( वृक्ष

व क्षुप ); रॉनकीयर या शास्त्रज्ञांनी प्रतिपादन केलेला जीवस्वरूपाचा एक प्रकार.

**pharmacognosy** औषधिस्वरुप विज्ञान

वनस्पतींतील औषधी द्रव्यांच्या निश्चित लक्षणांची माहिती देणारी विज्ञानशाखा.

**pharmacology** औषधि क्रियाविज्ञान; औषधि विज्ञान

वनस्पतीपासून उपलब्ध झालेल्या औषधिद्रव्यांचा शरीरावर होणाऱ्या परिणामांची (प्रभावाची) माहिती देणारी विज्ञानशाखा.

**pharmacopia (pharmacopoeia)** औषधिकोश

भिन्न प्रकारच्या शासनमान्य औषधांच्या माहितीचा अधिकृत ग्रंथ.

**pharmacy** (१) औषधनिर्माणशास्त्र; (२) रसशाळा; (३) औषधनिर्मिती

(१) औषधे तयार करण्यासंबंधी माहिती; (२) औषधे निर्मितीचा कारखाना; (३) औषधे बनविण्याची प्रक्रिया.

**phellem (cork)** त्वक्षा

बुचासारख्या पदार्थाने भरलेल्या संरक्षक कोशिकांचे थर (ऊतक); पहा cork cambium; periderm; suberin.

**phelloderm** उपत्वक्षा; द्वितीयक मध्यत्वचा

त्वक्षा निर्मिती करणाऱ्या कोशिकाथरापासून आतील बाजूस तयार होणाऱ्या नवीन (द्वितीयक) मध्य-(मृदु) त्वचेचे थर.

**phellogen (cork cambium)** त्वक्षाकर

त्वक्षा व उपत्वक्षा निर्मिणारा द्वितीयक ऊतककर (विभज्या); पहा cambium.

**phenology (phenomenology)** ऋतुजैविकी

वनस्पतींच्या जीवनातील ऋतुमानसापेक्ष आवर्ती (ठराविक काली होणाऱ्या) घटनांची नोंद; उदा. पाने येणे, फुले येणे, फळे व बीजे यांचा प्रसार इ. ची माहिती.

**phenotype** सरूपविधा; दृश्यरूप

वनस्पती अथवा प्राणी यांचे आनुवंशिक दृष्ट्या बाह्यस्वरूप (मग त्यांची जननिक दृष्टीने संघटना कोणतीही असो); पहा genotype.

**phloem (bast)** परिकाष्ठ; अधोवाही

वाहिनीवंत वनस्पतींत सामान्यपणे अन्नरसाची ने-आण करणाऱ्या प्रभेदित (विशिष्ट संरचनेच्या) कोशिका व संलग्न ऊतके; सामान्यपणे उच्च दर्जाच्या वनस्पतीत यामध्ये चालनी नलिका, सहचरी कोशिका, मृदूतक व काही दृढोतक (घनावरणाच्या लांबट कोशिका = सूत्रे) इ. असतात. काही वाहकवृंदांत परिकाष्ठ व प्रकाष्ठ ह्या दोन्हींचा समावेश होतो.

पहा vascular bundle.

**— fibre** परिकाष्ठ सूत्र

परिकाष्ठाशी संलग्न (अंतर्भूत) घनावरणाच्या कोशिका.

**— island** परिकाष्ठ द्वीप

द्वितीयक प्रकाष्ठाने वेढलेले परिकाष्ठाचे जुडगे (वृंद).

**— parenchyma** परिकाष्ठीय मृदूतक

परिकाष्ठात समाविष्ट असलेले सामान्य सजीव कोशिकांचे (मृदू) ऊतक.

**phosphorescence** स्फुरदीप्ती

पहा bioluminescence.

**phosphorylation** भास्वरलन

फॉस्फॉरिक अम्लाशी संयोग (उदा. शर्करेचा).

**photochemical** प्रकाशरासायनिक

प्रकाशाने घडवून आणलेली रासायनिक (प्रक्रिया).

**photogenic** प्रकाशजनक

स्वतःच्या क्रियाशीलतेने चमकणारे (प्रकाशनिर्मिती करणारे); उदा. काही सूक्ष्मजंतू; काजवा; काही मासे; याला 'जीवदीप्ती' असे म्हणतात.

**photokinesis** प्रकाशजन्य हालचाल

प्रकाशाकडे किंवा प्रकाशाच्या दिशेविरुद्ध केली जाणारी हालचाल; उदा. काही शैवले, हरित्कणु, सूक्ष्मजंतू, इत्यादी. प्रकाशाच्या अभावी किंवा प्रकाश सान्निध्यामुळे घडून येणारी हालचाल; उदा. पाने व फुले यांची उघडझाप; पहा nyctinastic; photonastic.

**photomicrography** सूक्ष्म छायाचित्रण

प्रकाशाच्या साहाय्याने सूक्ष्म वस्तूची छायाचित्रे घेण्याची प्रक्रिया (कृती).

**photonastic** प्रकाशानुकुंचनी

प्रकाशाच्या तीव्रतेच्या बदलाने घडून येणारी (हाल्चाल); प्रकाशाच्या दिशेशी या हालचालींचा संबंध नसतो. उदा. पानां-फुलांची उघडझाप; पहा nastic movements.

**photoperceptive** प्रकाशसंवेदी

प्रकाशाची जाणीव करून देणारी (कोशिका, इंद्रिये, संरचना, कोशिकांगके, इ.)

**photoperiod** प्रकाशावधि

**photoperiodic** प्रकाशावधिक

**photoperiodism** प्रकाशावधिप्रभाव; प्रकाशावधि प्रतिक्रिया

दिवसाच्या ( प्रकाशाच्या ) कमीजास्त कालामुळे वनस्पतीच्या फुलण्यावर होणारा परिणाम, कारण प्रत्येक वनस्पतीला यावाबत काही कमाल प्रकाशपरिमाण आवश्यक असते; त्यामुळे लघुदिन वनस्पती (उदा. कॉस्मॉस) व दीर्घदिन वनस्पती ( उदा. मुळा, लेट्यूस इ. ) असे भेद पडतात. काही वनस्पती मात्र भेदातीत ( उदा. टोमॅटो ) असतात. वनस्पतीचे वय आणि तपमान यावर प्रकाशावधी संबंधीची प्रतिक्रिया अवलंबून असते.

**photophilous** प्रकाशप्रिय

सूर्यप्रकाशात वाढणारी वनस्पती.

**photophobism** प्रकाशद्वेष

प्रकाश टाळण्याची प्रवृत्ति.

**photosynthesis** प्रकाशसंश्लेषण

जिवंत कोशिकांत हरितद्रव्याच्या व प्रकाशाच्या सान्निध्यात त्यातील ऊर्जेचा उपयोग करून कार्बन, हायड्रोजन व ऑक्सिजन यांचे रासायनिक संश्लेषण घडवून त्यापासून कार्बोहायड्रेटांची ( उदा. शर्करा, तूलीर, स्टार्च ) निर्मिती. सृष्टीतील जीवनास अत्यावश्यक अशी हिरव्या वनस्पतींतील मौलिक प्रक्रिया; यामध्ये प्राणवायूचीही निर्मिती होऊन तो सर्व जीवांस आवश्यक म्हणून उपयुक्त ठरतो.

**photosynthetic** प्रकाशसंश्लेषी

प्रकाशसंश्लेषणाशी संबंधित.

**phototactic** प्रकाशानुचलनी

प्रकाशाच्या प्रेरणेने होणारी गतियुक्त हालचाल; उदा. काही स्वतंत्रपणे हालचाल करणारी शैवले. (क्लॅमिडोमोनॅस, युग्लिना इ.); कोशिकेतील हरितकणु; काही गंतुके; बीजुके; ह्यांच्या हालचाली प्रकाशाच्या दिशेकडे किंवा विरुद्ध असतात.

**phototaxis** प्रकाशानुचलन

प्रकाशाच्या दिशेप्रमाणे आपली हालचाल नियंत्रित करण्याची प्रक्रिया.

**phototonic** प्रकाशपोषित

प्रकाशाच्या पोषक प्रभावाने वाढणारी (संवेदनक्षमता).

**phototropic** प्रकाशानुवर्ती

प्रकाशाच्या दिशेप्रमाणे नियंत्रित व एकाच बाजूस अधिक वाढ होऊन घडून येणारी ( अवयवांची वक्रता ); उदा. मुळ प्रकाशाविरुद्ध व खोड प्रकाशाच्या दिशेकडे वाढतात.

**phototropism (heliotropism)** प्रकाशानुवर्तन

प्रकाशनियंत्रणामुळे एकाच बाजूस अधिक वाढ होणे ( होण्याची क्षमता ); यामुळे अवयवास वक्रता येण्याची प्रक्रिया.

**phyad** पादपाकृति

वनस्पतीचे जीवरूप; उदा. वृक्ष, वेल इ.

**phycocyanine** नील रंगद्रव्य; फायकोसायनिन

नील हरित-शैवलातील निळ्या रंगाचे द्रव्य; याशिवाय हरितद्रव्य असतेच; काही लाल शैवलांतही हे द्रव्य आढळते.

**phycoerythrine** लाल रंगद्रव्य; फायकोएरिथ्रीन

लाल शैवलांतील हरितद्रव्याशिवाय तांबड्या रंगाचे एक द्रव्य.

**phycologist** शैवलविज्ञ

शैवलांच्यासंबंधी विपुल ज्ञान मिळविलेला विशेषतज्ञ.

**phycology ( algology )** शैवलविज्ञान

शैवल वनस्पतींसंबंधीच्या माहितीची शाखा.

**Phycomycetes (Phycomycetae)** शैवल-कवक वर्ग; फायकोमायसेटीज ( फायकोमायसेटी )

सत्यकवक विभागातील ( युमायकोफायटा ) व शैवलांशी काही लक्षणांत साम्य असणाऱ्या व सापेक्षतः साध्या कवकांचा गट; उदा. म्यूकर (बुरशी), पिथियम, तंतुसुरी, इ.

**phylloclade** पर्णकांड; पर्णक्षोड

पानासारखे स्वरूप किंवा कार्य अथवा दोन्ही प्राप्त झालेले खोड. उदा. फड्या निवडुंग; नांग्या शेर; रस्कस; त्रिधारी निवडुंग, इ.

**phyllode (phyllodium)** वृंतपर्ण

पात्यासारखे देठ; उदा. काही कीटकभक्षक वनस्पती ( नेपेंथस ); बाभळीची एक जाती.

**phyllody** पर्णायन; पर्णाभता

पुष्पदलांचे पानांसारख्या अवयवांत रूपांतर; ही एक विकृती आहे.

**phylloid** पर्णाभ

पानासारखे स्वरूप असणे; उदा. वाटाण्याची उपपर्णे.

**phyllotaxis ( phyllotaxy )** पर्णविन्यास
अक्षावर ( खोडावर ) पानांची मांडणी; उदा. एकांतरित, संमुख, मंडलित, इ.
पहा alternte, opposite, whorled.

**phylogeny ( phylogenesis )** जातिविकास; जातिवृत्त
जातीच्या, वंशाच्या किंवा कुलाच्या क्रमविकासाचा इतिहास; व्यक्तीच्या विकासावरून ती व्यक्ती ज्या जातीत समाविष्ट असते तिच्या पूर्वजांच्या इतिवृत्ताचे अनुमान; व्यक्तीचा विकास थोड्या कालातील असल्याने तो संक्षिप्त स्वरूपात मिळतो त्यामुळे काही गतकालीन अवस्था लुप्त असतात; पहा ontogeny.

**phylum** संघ
वर्गीकरण पद्धतीत पूर्वी संबंधित जीवांच्या फार मोठ्या गटास ही संज्ञा उपयोगात असे; हल्ली प्राणिशास्त्रात ती वापरतात परंतु वनस्पतिशास्त्रात तिच्याऐवजी काही शास्त्रज्ञ विभाग ( division ) ही संज्ञा वापरतात; सर्वसाधारणपणे संघाचे अथवा विभागाचे अनेक वर्ग, वर्गांचे गण व गणांची कुले असे भाग पाडतात. तथापि उपकुले, उपविभाग, उपवर्ग, गोत्रे, श्रेणी असे लहान भागही पाडले जातात. जाती हे शेवटचे एकक असून संबंधित जातींचा एक वंश मानतात. ह्या सर्व एककांमध्ये नैसर्गिक व जातिविकासाच्या दृष्टीने नाते ( आप्तभाव ) असल्याचे मान्य करून वर्गीकरण केले जाते. अद्याप भिन्न शास्त्रज्ञांत तपशिलाबाबत एकमत नाही; विभाग ही संज्ञा phyta या प्रत्ययाने दर्शविलेल्या गटांना काही शास्त्रज्ञ वापरतात.
पहा Thallophyta, Bryophyta, Pteridophyta इ.

**phymatodeus ( warted )** पिटकित
अनेक पुटकुळ्या ( चामखिळीसारख्या ) असलेले ( पान; उदा. *Pleopeltis phymatodes* ).

**physical barrier** भौतिक ( प्राकृतिक ) रोध
नैसर्गिक अडथळा ( उदा. पर्वत, समुद्र इ. )

**physical drought** भौतिक ( प्राकृतिक ) रुक्षता
वनस्पतींना उपलब्ध न होण्याइतकी जमिनीतील पाण्याची टंचाई.

**physiognomy** रूपाकृति
स्वरूपाची माहिती देणारी लक्षणे व त्यावरून झालेला आकृति-बोध.

**physiognomy, botanical** पादपरूपाकृति
वनस्पतीचे अथवा वनस्पति-समुदायाचे स्वरूप (रीती); त्यावरून ती दुरून ओळखता येते.

**physiological drought** क्रियात्मक रुक्षता
जमिनीत पाणी असूनही तांत्रिक कारणामुळे ( क्षार, लवणे, अम्ल, इ. मुळे ) ते वनस्पतींना उपलब्ध न होण्याची परिस्थिती.

**physiology** क्रियाविज्ञान; शरीरक्रियाविज्ञान
शरीरांतर्गत चयापचयातील ( पचन, शोषण, अभिसरण इ. ) अनेक क्रियाविक्रियासंबंधाची माहिती; अनेक इंद्रियांच्या साहाय्याने हे घडून येत असल्याने पूर्वी याला इंद्रियविज्ञान म्हणत असत. या विषयातील तज्ज्ञास क्रियावैज्ञानिक (physiologist) म्हणतात.

**phytodynamics** पादपगतिकी
वनस्पतींतील हालचालीसंबंधीचे ज्ञान.

**phytogenesis ( phytogeny )** पादपजनन; पादपोद्भव
वनस्पतीचा उगम व विकास यासंबंधीचे ज्ञान.

**Phytogenetics** पादपानुवंशिकी
वनस्पतींतील आनुवंशिक लक्षणांच्या अनुहरणासंबंधीची माहिती.

**phytogeographer** पादपभूगोलविज्ञ
वनस्पति-भूगोलासंबंधी माहितगार.

**phytogeographical region** भौगोलिक वनस्पति-प्रदेश

**Phytogeography ( Plant-geography )** पादपभूगोल; वनस्पति-भूगोल
पृथ्वीवर भिन्न हवामानानुसार निसर्गतः झालेल्या वनस्पतींच्या प्रसाराची माहिती ( माहितीची शाखा ).

**Phytognosis ( Botany, Phytology )** वनस्पतिविज्ञान; वनस्पतिशास्त्र
वनस्पतीसंबंधी समग्र ज्ञानाची शाखा; एक जुनी संज्ञा.

**phytohormone** पादप संप्रेरक
वनस्पतीतील विशिष्ट प्रेरक पदार्थ; पहा hormone.

**phytolith** पादपजीवाश्म
जीवाश्मरूपातील प्राचीन वनस्पती.

**Phytolithology ( Palaeobotany )** पुरावनस्पतिशास्त्र
पहा palaeobotany.

**Phytopathology (Vegetable-Plant-pathology)** वनस्पति-विकृतिशास्त्र; वनस्पतिरोगशास्त्र; पादपरोगशास्त्र
वनस्पतींना होणाऱ्या सर्व रोगासंबंधीची ज्ञानशाखा.

**phytoplankton** वनस्पति ( पादप ) प्लवक
किनाऱ्यापासून दूरवर तळ्यात किंवा समुद्रात तरंगणारा वनस्पतींचा समूह; पहा plankton.

**Phytosociology (Plant-sociology)** वनस्पति-समाजशास्त्र; पादप-समाजशास्त्र
वनस्पतींच्या समुदायांचा व सामुहिक जीवनाचा अभ्यास.

**Phytoteratology** पादपविद्रूपशास्त्र; पादपात्यरूपशास्त्र
वनस्पतिसृष्टीत आढळणाऱ्या विकृत ( अनित्य किंवा राक्षसी ) स्वरूपाच्या संरचनेबद्दलची माहिती; उदा. एक केळाच्या सालीत दोन केळ्यांचा गाभा; नित्यापेक्षा फार मोठ्या आकाराचे फळ; फळाऐवजी गाठीसारखा अवयव; फुलातील केसरदलाऐवजी पाकळ्यासारखे अवयव.

**Phytotomy (Plant anatomy)** वनस्पति-पादप-शारीर
वनस्पतींच्या शरीराच्या अंतर्रचनेचा अभ्यास अथवा तत्संबंधी माहितीची शाखा.

**pigment** पिंजक; रंजक; वर्णक
प्राणी किंवा वनस्पती यांच्या शरीरास किंवा अवयवास रंग प्राप्त करून देणारा पदार्थ; उदा. हरितद्रव्य.

**pileate** छत्रयुक्त; छत्रकी
छत्राप्रमाणे आकार असलेला व बीजुके निर्माण करणारा भाग.

**pileus** छत्र
पसरट टोपीप्रमाणे (बशीसारखा) आकाराचा खालून दांड्यावर आधारलेला व बीजुकधारक पडदे असलेला अवयव; कधी दांडा फार लहान व छत्र फारच पसरट असते; उदा. कवकांपैकी भूछत्रे; पहा mushroom.

**piliferous layer** मूलकेशस्तर
मुळावरचे केसाळ आवरण; यातूनच पाणी व खनिजे यांचे शोषण होते.

**pilose (pilous)** केशयुक्त; केसाळ
नरम केस असलेले ( उपांग, अवयव, इ. ) उदा. कुंदा ( *Ischaemum pilosum* Hack. ).

**pinna** दल; पिच्छक
संयुक्त पानाचा सुटा भाग; उदा. गुलाबाच्या संयुक्त पानास पाच सुटी दले असतात.

**— trace** दललेश
पहा leaf-trace.

**pinnate** पिच्छकल्प; पिच्छाकृति
पिसासारखे; एका मध्यशिरेवर ( मध्याक्षावर ) दोन्ही बाजूस लहान सुटी ( स्वतंत्र ) दले असलेले ( संयुक्त पान ); उदा. चिंच, गुलाब; निंब इ. पहा paripinnate, imparipinnate.

**pinnatifid** अल्पपिच्छाकृति.
अर्ध्यापेक्षा कमी व पिसासारखे विभागलेले ( साधे पान ); उदा. अफू, शेवंती, भुईपात्रा ( *Launea pinnatifida* Cass. ).

**pinnatiseet** अपूर्ण पिच्छाकृति
अर्ध्यापेक्षा बरेच अधिक आणि पिसासारखे ( पाते ) विभागलेले ( साधे पान ); उदा. झेंडू ( *Tagetes erecta* L. ); कॉसमॉस; कामलता ( *Ipomoea quamoclit* L. ).

**pinnatipartite** अर्धपिच्छाकृति
अर्ध्यापर्यंत पिसासारखे विभागलेले ( पाते, पान ) उदा. काटे घोत्रा; मुळा.

**pinnule** दलक
संयुक्त पानाच्या पुनः विभागलेल्या दलाचा सुटा भाग; उदा. शेवगा.

**pioneer** आद्य; आद्य प्रवर्तक
आरंभी असणारा; पायाभूत.

**Piperaceae** मरीच ( मिरी ) कुल; पायपेरेसी
पिंपळी, कंकोळ, मिरी, नागवेल इत्यादी वनस्पतींचे ( द्विदलिकित ) कुल. बेसींच्या वर्गीकरणात या कुलाचा अंतर्भाव मोरवेल गणात ( रॅनेलीझमध्ये ) केला असून हचिन्सन यांनी मिरी गणात (पायपेरेलीझमध्ये ) केला आहे. उभयतांच्या मते हे प्रारंभिक कुल आहे. कारण त्यांची फुले एकलिंगी किंवा द्विलिंगी व अपरिदली असतात. प्रमुख लक्षणे : तिखट व साध्या एकाआड एक पानांच्या ओषधी व क्षुपे; कणिश फुलोरा; ऊर्ध्वस्थ किंजपुटात एक कप्पा व त्यात एक बीजक; सपुष्क व सपरिपुष्क बी.

**piperin** पायपरिन
काळ्या व पांढऱ्या मिरीत आढळणारे तिखट द्रव्य; त्यावरून *piperatus* ( *piperitus* ) तिक्त (तिखट) ही संज्ञा.

**pisaceus** वृत्तांगवर्णी
ओल्या वाटाण्या (वृत्तांग) प्रमाणे हिरवे.

**pisiform** वृत्तांगाकृति
वाटाण्यासारख्या आकाराचे.

**pistil** किंजमंडल; स्त्रीकेसरमंडल
एक किंवा अनेक किंजदलांचे बनलेले फुलातील स्त्रीलिंगी प्रजोत्पादक दलांचे मंडल; पहा gynaecium.

**pistillate** किंजयुक्त
फक्त किंजमंडल असलेले (फूल).

**— flower** किंजपुष्प; मादीफूल
फक्त किंजमंडल असलेले फूल; उदा. पपई, भोपळा इ.

**pistillode** वंध्यकिंज
ऱ्हास पावलेल्या किंवा अकार्यक्षम किंजदलांचे मंडल; उदा. सूर्यफुलाच्या फुलोऱ्यातील किरण–पुष्पक; उंबरातील गुल्म-पुष्पे.

**pit** खात; खाच; गर्त
कोशिकावरणातील लहान खोलगट जागा.

**pit-field** खातक्षेत्र; गर्तक्षेत्र
अनेक खाचा असलेली जागा.

**pit-membrane** खातपटल; गर्तपटल
खाचेतील पातळ पापुद्रा ( कोशिकावरण )

**pitcher** कलश; घट; कुंभ
नेपेंथेस ( घटपर्णी, कलशपर्णी ) वनस्पतींच्या रूपांतरित पानाचा टोकाकडील चंबूसारखा भाग; त्यात बहुधा पाचक रस असून त्यामुळे कीटकांचे रूपांतर शोषणीय पदार्थात होते; पहा Sarraceniales.

**pith ( medulla )** निकाष्ठ; भेंड; मज्जा
खोडात सामान्यपणे मध्यभागी आढळणारे मृदूतक; द्विदलिकित वनस्पतीच्या फार जून व काष्ठयुक्त खोडात त्याजागी पोकळी असते.

**— ray ( vascular ray )** निकाष्ठ किरण; मज्जा किरण
पहा medullary ray

**pitted** खातांकित
कोशिकावरणात खाचा असलेली ( वाहिका किंवा वाहिनी ). काही फळांच्या किंवा बियांच्या सालीवरही खाचा आढळतात.

**— vessel** खातांकित वाहिनी

**placenta** बीजकाधानी
किंजपुटातील बीजकाचे उगमस्थान; प्रकटबीज वनस्पतीतील किंजदलांच्या किनारी ( कडा ) किंवा खवल्यांचा पृष्ठभाग. अबीजी वनस्पतीतील बीजुककोशांच्या उगमस्थानाचे ऊतक, उदा. नेफ्रोलेपिस नेचा.

**placentation** बीजकविन्यास
किंजपुटात आढळणारी भिन्न प्रकारची बीजकांची मांडणी ( बीजकाधानींची व्यवस्था ); वनस्पतींच्या काही वंशात, कुलात किंवा गणात एकाच प्रकारचा बीजकविन्यास आढळतो; त्याला वर्गीकरणात महत्त्व असते.

**plaited (plicate)** चुणित; चुणिदार
कळीमध्ये चुण्या (घड्या) पडलेला (पुष्पमुकुट) किंवा उभ्या घड्या पडलेले पान; उदा. नारळ, शिंदी, इत्यादी; पर्णवलनाचा एक प्रकार; गारवेलीच्या किंवा धोतऱ्याच्या फुलातील पुष्पमुकुट.

**plane of section** छेद प्रतल
छेद घेण्याची पातळी ( आडवी किंवा उभी ).

**plane of symmetry** समात्र-प्रतल; समात्रतेची पातळी
वस्तूचे ( विशेषतः फुलाचे ) दोन अथवा अधिक सारखे भाग करणारी पातळी.

**plankton** प्लवक; प्लवकजीव
बहुधा जलपृष्ठावर किंवा पृष्ठाखाली मुक्तपणे तरंगणारा बहुधा सूक्ष्म जीवांचा समूह; इतर मोठ्या प्राण्यांचे प्रमुख खाद्य. पहा necton, pelagic, benthos, phytoplankton, nannoplankton.

**—, neritic** तटसमीप प्लवक
किनाऱ्याजवळचा तरता जीवसमूह; उदा. शैवले, सूक्ष्मजंतू, सूक्ष्म प्राणी, करंडक वनस्पती, इ.

**— formation** प्लवक समावास
मुक्तपणे पाण्यात तरंगणाऱ्या जीवांचा (प्राण्यांचा किंवा वनस्पतींचा ) समान परिस्थितीशी समरस झालेला समुदाय.

**plano-convex** समतल बहिर्गोल
एका बाजूस सपाट व दुसऱ्या बाजूस फुगीर.

**planogamete** चरगंतुक
केसल्युक्त व हालचाल करणारी प्रजोत्पादक कोशिका उदा. हरितशैवल; काही कवक.

**plant** वनस्पति; पादप; उद्भिज्ज
निसर्गातील वायू, पाणी खनिजे यांचे शोषण करून व सूर्यापासून अन्न बनविण्यास लागणाऱ्या उर्जेचा वापर करणारा हरितद्रव्ययुक्त, स्वावलंबी, सजीव घटक. कवक, अनेक सूक्ष्मजंतू वगैरे सजीव याला अपवाद परंतु त्यांवर अवलंबित असतात; तसेच अनेक प्राणीही वनस्पतीवर आपली उपजीविका करतात.

**— anatomy** वनस्पतिशारीर
पहा anatomy.

**— formation** वनस्पति समावास
पहा formation.

**plantation** लागवड; मळा
विशिष्ट वनस्पतींची मोठ्या प्रमाणावर विशेष प्रकारे केलेली पिकवण: उदा. ऊस, कॉफी, द्राक्षे इ.

**plant-breeder** वनस्पति-प्रजनक
वनस्पतींच्या भिन्न जाती व प्रकार यांमध्ये कृत्रिम पद्धतीने प्रजोत्पादन घडवून आणणारा (विज्ञ); उदा. लूथर बरबँक, मेंडल, इ.

**plant-breeding** वनस्पति प्रजनन
वर सांगितलेली प्रक्रिया.

**plant cane** सुरू ऊस
बियांपासून आरंभ केलेल्या उसाच्या लागवडीचे पहिल्या वर्षाचे पीक (वाढ).

**Plant-geography** वनस्पति-भूगोल
पहा Phytogeography.

**plantlet** पादपक
लहान रोपट.

**Plant-pathology** वनस्पतिरोगविज्ञान
पहा Phytopathology.

**plasma-membrane** प्राकल-कला; प्राकल-पटल
अतिशय पातळ, विशेषतः वसा आणि प्रथिन यांनी बनलेला ( कोशिकेतील ) जीवद्रव्याचा सर्वात बाहेरचा पापुद्रा; वनस्पतींच्या कोशिकांत असा पापुद्रा कोशिकेतील रिक्तिकेभोवतीही असतो. कोशिकेतील प्राकलाची पार्यता या पापुद्र्यावरच अवलंबून असते. पहा ectoplasm.

**plasmodesma** प्राकलतंतु
एका जिवंत कोशिकेतील प्राकलापासून निघालेला व दुसऱ्या कोशिकेतील प्राकलाला जोडणारा अतिसूक्ष्म धागा: अशा अनेक धाग्यांनी सर्व कोशिकांचा परस्परसंबंध मध्ये कोशिकावरण असतांनाही अबाधित राहून बहुकोशिक वनस्पती एकच सजीव व्यक्तीप्रमाणे जगते. पहा protoplast; protoplasm.

**plasmodial stage** प्राकलावस्था
जीवनांतील फक्त प्राकलयुक्त असण्याची अवस्था.

**plasmodium** प्राकलपुंज
अनावृत ( नग्न ), अनेक प्रकले असलेला व आदिजीवाप्रमाणे सरपटण्याची हालचाल करणारा प्राकलाचा ( जीवद्रव्याचा ) अनियमित गोळा; पहा Mycetozoa.

**plasmogamy** परिकलसंयोग
प्रकलाखेरीज इतर जीवद्रव्याचा ( परिकलाचा ) संयोग; यांमध्ये दोन किंवा अधिक जीवद्रव्ययुक्त घटकांचे मीलन (मिश्रण) होऊ शकते.

**plasmolysis** प्राकलकुंचन
कोशिकेतील पाण्याचा अंश बहिस्सर्षणामुळे (कोशिकेच्या बाहेर विसरणामुळे गेल्याने), कमी झाल्याने प्राकलाचे आकुंचन व कोशिकावरणापासून अलग होणे; रिक्तिकेचा भोवतालच्या प्राकलावरचा दाब कमी झाल्याने ही क्रिया घडून येते.

**plastic** आकार्य
आकार देता येण्यासारखे किंवा रूपांतर करण्यासारखे.

**— material** अकार्य पदार्थ

**plasticity** आकार्यता
आकार्य असण्याची क्षमता; पाने, उपपर्ण, खोड व मुळे यांमध्ये हा गुण असल्यामुळे त्यांचे परिस्थितिनुसार रूपांतर झालेले आढळते.

**plastid** प्राकणु; प्राकलकणु; लवक
वनस्पतींच्या सजीव कोशिकेतील जिवंत द्रव्यात (प्राकलात) आढळणारे व विविध कार्ये करणारे कोशिकांगक: उदा. हरितकणु, तैलकणु, वर्णकणु, श्वेतकणु इ. पहा cell-organelle.

**platycarpic ( platycarpous )** विस्तृतफली; पृथुफली
रुंद (पसरट) फळे असलेले (पादप).

**platyform** चपटा; पसरट

**platylobate** विस्तृतखंडी
रुंद विभाग असलेले (पान).

**platyphyllous** विस्तृतपर्णी; पृथुपर्णी
रुंद पाने असलेली (वनस्पती; जाती).

**plectenchyma ( merenchyma; pseudoparenchyma )** छद्मी (आभासी) मृदूतक; कवकोति; स्थूलोति
अनेक सुट्या कोशिकांचे किंवा तंतूंचे नंतर एकत्र येऊन बनलेले ऊतक. उदा. कवकांतील कित्येक अवयव (जालाश्म, पीठिका); काही शैवले.

**pleiochasium** ( **polychasium** ) बहुशाखी पुष्पबंध

प्रत्येक शाखा पुन्हा दोन्हीपेक्षा अधिक व लहान अक्ष बाजूस बनविणारा कुंठित फुलोरा.

**plerome** रंभजनक

खोडाच्या किंवा तत्सम अवयवाच्या विभज्येतील मध्यवर्ती वाहक वृंदादि भागाची निर्मिती करणारा मध्यजनकाच्या आतील भाग; पहा stele, periblem, vascular bundle, meristem.

— **sheath** (**bundle sheath**) रंभजनकावरण, रंभजनकवेष्ट

रंभजनकाभोवती असलेले उतक.

**pleuston** तरंड पादप

हल्केपणामुळे पाण्यात तरंगणाऱ्या वनस्पती; मुळे नसलेल्या, मुक्तपणे तरंगणाऱ्या व पाण्याखालील बीजी वनस्पतींचाही येथे समावेश करतात.

**plexus** जालक

परस्परांना जोडणाऱ्या शिरांचे जाळे.

**plicate** चूणित

चुण्या पडलेले ( अवयव ).

**Plumbaginaceae** चित्रक कुल; प्लंबॅजिनेसी

काळा व लाल चित्रक इत्यादींचे द्विदलिकित लहान कुल; चित्रकाच्या मुळ्यात प्लंबॅजिन हे स्फटिकी द्रव्य असते. याचा अंतर्भाव चित्रक गणात ( प्लंबॅजिनेलीझमध्ये ) एंग्लर व प्रँटल यांनी केला असून हचिन्सन व बेंथॅम आणि हूकर यांनी प्रिम्युलेलीझ गणात केला आहे. प्रमुख लक्षणे : ओषधी, क्षुपे व उपक्षुपे ( लहान झुडपे ); पाने साधी; पाणी व चुना मिश्रित पाणी बाहेर टाकणारी प्रपिंडे त्यावर असतात; फुले द्विलिंगी; संदले पाच व युक्त; पाकळ्या जुळलेल्या किंवा सुट्या; पाच केसरदलांचे एकच मंडल; पाच जुळलेल्या किंजदलांच्या किंजपुटात एक कप्पा व त्यात एकच बीजक; फळ एकबीजी शुष्क व न तडकणारे किंवा करंड्यासारखे झाकणाने उघडणारे; बी सपुष्क. संवर्त अनेकदा फळास वेढून राहतो.

**plume** तुरा; पिच्छक

केसांचा झुबका; उदा. दुधळ, एकदांडी व सहदेवी यांची फळे; कुड्याचे व रुईचे बी.

**plumose** शिखायुक्त; पिच्छकी

शेंडी अथवा तुऱ्याप्रमाणे केसाचा झुबका असलेले फळ अथवा बीज; पहा pappus. सातविणीच्या बियास दोन झुबके असतात.

**plumule** आदिकोरक; कोंब

बीज रुजल्यावर त्यातून बाहेर येणाऱ्या पहिल्या कळीचे ( कोंबाचे ) उजेडाकडे वाढणारे टोक ( कळी ); पहा radicle.

**plumule axis** प्रथमाक्ष; आद्यक्ष.

प्रारंभिक अक्ष; रुजलेल्या बियातून बाहेर आलेल्या अंकुराच्या आदिकोरक व आदिमूल यांना जोडणारा भाग.

**pluri** – बहु किंवा अनेक

या अर्थाचा उपसर्ग

**pluricellular** बहुकोशिक; बहुपशीय; अनेककोशिक

अनेक शरीरघटक असलेले.

**pluriflorus** बहुपुष्पी; अनेकपुष्पी

अनेक फुले असलेले.

**plurigametic** बहुगंतुकी

अनेक गंतुके निर्माण करणारे; उदा. शैवल.

**plurilocular** बहुपुटकी; अनेकपुटकी

अनेक कप्पे असलेले ( किंजपुट ); अनेक कोशिकांचे बनलेले; उदा. एक्टोकार्पस या शैवलातील बीजुककोश किंवा गंतुकाशय.

**plurisporous** बहुबीजुकी; बहुबीजाणुक

अनेक बीजुके असलेला ( कोश ).

**plus** ( **or** + ) धन

पुं–प्रकल असलेल्या बीजुकांचे ( वाणाचे, तंतूचे ) विशेषण; उदा. बुरशीच्या दोन प्रकारच्या तंतूपैकी एक ( नर ); दुसरा तंतू ( minus or–) ऋण (स्त्री).

**plus strain** धन वाण

पहा strain.

**pneumathode** वातछिद्र; वातरंध्र

पानावरील त्वग्रंध्र, सालीवरील वल्करंध्र, इत्यादीसारख्या छिद्रांचा अंतर्भाव या संज्ञेत करतात.

**pneumatophore** श्वसनमूल; वातमूल

वायूशी विनिमय करण्याकरिता जमिनीतून वर प्रकाशाकडे वाढणारे व अनेक हवायुक्त पोकळ्या असलेले मूळ. उदा. कांदळ, कांकरा चिप्पी, तिवार इ. समुद्रकिनाऱ्यावर चिखलात वाढणारी झाडे.

**pocket-leaf** कोटर-पर्ण

कुजट पदार्थ साठविण्याकरिता कप्प्याप्रमाणे विशेषत्व पावलेले पान; उदा. काही अपिवनस्पती.

**pod** शिंबा

सामान्य भाषेत शेंग, पण शास्त्रीयदृष्ट्या विशिष्ट प्रकारचे शुष्क फळ; पहा legume; siliqua.

**podetium** उन्नत कायक

तलस्थ व सपाट कायकाचा वर सरळ वाढलेला भाग; उदा. शैवाक; शेवाळी (मार्चांशिया); हा दांड्यासारखा अथवा पेल्यासारखा किंवा शाखायुक्त असतो.

**podium** स्तंभाधार

तळाशी असलेला सरळ आधार.

**podo -** दंड; वृंत

ग्रीक भाषेतील देठ किंवा तत्सम भाग या अर्थाचा उपसर्ग.

**podocarp** किंजवृंत

किंजदलाचा देठासारखा तळभाग.

**point-mutation** जनुकोत्परिवर्तन

पहा gene mutation.

**polar** ध्रुवी; ध्रुवीय

अवयवाच्या किंवा अक्षाच्या टोकासंबंधी किंवा टोकावर असलेले.

**— body** त्यक्त कोशिका

जनक कोशिकेच्या अर्धसूत्रण विभागणीने बनलेल्या कार्यक्षम कोशिकेखेरीज इतर (वंध्य) किंवा तत्सम प्राकलाचा अंश.

**— cap** ध्रुवी आवरण

कोशिकाविभाजनातील मध्यावस्थेत परिकलाच्या धाग्यांच्या तर्कूसारख्या अवस्थेत त्याच्या दोन्ही टोकास असलला टोपीसारखा भाग; पहा mitosis.

**polar nucleus** ध्रुवी प्रकल; ध्रुवीय केंद्रक

फुलझाडांच्या बीजकातील गर्भकोशात फलनापूर्वी बनलेल्या चार प्रकलांच्या जोडीतील प्रत्येकी एक; यांच्या संयोगाने पुढे बनणाऱ्या दुय्यम प्रकलाचे पर्यवसान पुष्कात (गर्भाभोवतीच्या अन्नात होते); पहा endosperm.

**polarity** ध्रुवत्व

दोन ध्रुव (टोके) असण्याची स्थिती; उदा. आदिमूळ व आदिकोरक ही दोन गर्भाक्षाची (प्राथमिक अक्षाची) टोके त्याचे ध्रुवत्व दर्शवितात व त्यांची निश्चिती तत्पूर्वीपासून झालेली असते; अनेक वनस्पतींत रंदुकावस्थेत दोन ध्रुवांची स्पष्टता दिसून येते.

**pole** ध्रुव; अग्र; टोक

**Polemoniales** भोकर गण; पोलेमोनिएलीझ

बेसी यांच्या वर्गीकरणाप्रमाणे द्विदलिकित वनस्पतींच्या या गणात वृंताक कुल, भोकर कुल, हरिणपदी कुल इत्यादींचा समावेश होतो हचिन्सन यांनी भोकर गण (बोरॅजिनेलीझ), वृंताक गण व पोलेमोनिएलीझ स्वतंत्र ठेवले आहेत; पहा. Boraginaceae.

**polish** झिलई करणे

घासून पुसून चकाकी आणणे.

**pollard** ऱ्हस्वित

जमिनीजवळच्या शाखा छेदून खुजा राखलेला व कापलेल्या ठिकाणी जाडजूड प्ररोहांनी भरलेला वृक्षतळ (खुंट).

**pollen** पराग

फुलझाडांच्या फुलातील केसरदलावर निर्माण झालेले व लैंगिक प्रक्रियेत आवश्यक असे लहान धुळीच्या कणासारखे भाग; यांचे कार्य प्रकटबीज वनस्पतींतील व नेचाभ (वाहिनीवंत अबीजी) वनस्पतींतील लघुबीजुकाप्रमाणे असते; साधारणपणे गोलसर, तथापि बाह्यावरणात ते फार विविधता दर्शवितात. अनेक कणांची भुकटी असाही पराग या संज्ञेचा अर्थ लावला जातो. पराग पुं-गंतुके निर्माण करतात.

**— analysis** पराग-विश्लेषण; परागविज्ञान

पहा palynology.

**— chamber** परागसंपुट

बीजकातील प्रदेहाच्या टोकावर असलेला परागणानंतर काही काळ परागसंचय करणारा व बीजकावरणाने संरक्षिलेला कप्पा; उदा. सायकस; पहा nucellus.

**— flower** परागपुष्प

परागणाकरिता येणाऱ्या कीटकांना मधुरसाऐवजी पराग उपलब्ध करणारे फूल; उदा. पॉपी (अफूच्या कुलातील काही जाती), गवते, अक्रोड कुल, भूर्ज कुल, बीच, चेस्टनट, ओक, वाळुंज कुल, एल्म, इ.

**— grain** परागकण

परागांच्या भुकटीतील एक स्वतंत्र कण.

**— sac (cell)** परागकोटर

सर्व परागकण एकत्र असलेली पिशवी (पोकळी; लघुबीजुककोश); बहुधा अशा दोन पिशव्या (कप्पे, कोटरे) एका परागकोशात असून असे दोन खंड

एका परागकोशात असतात. पहा anther, anther–lobe.

**— tetrad** परागचतुष्टय

चार परागकणाचा एक समूह किंवा चौकडी; उदा. ईनोथेरा; एरिकेसी. पहा Ericaceae.

**— tube** परागनलिका

पराग रुजल्यावर त्यातून बाहेर पडणारा नळीसारखा अवयव; हा फुलझाडांच्या किंजलातून किंजपुटातील बीजकात प्रवेश करतो व फलन घडवून आणतो; प्रकटबीजीत प्रत्यक्ष बीजकावरच पराग पडून नलिका आत प्रवेश करते. हिचे कार्य नर-गंतुकांना फलनात साहाय्य करण्याचे असल्याने व ही एकगुणित असल्याने गंतुकधारी पिढीच असते.

**pollinate** परागण करणे

पराग किंजल्कावर पडणे अथवा पाडण्यास मदत करणे ( सिंचन ).

**pollination** परागण; परागसिंचन

केसरदलांमधून निघणारे पराग त्याच फुलातील किंवा त्याच जातीच्या अन्य फुलातील किंजल्कावर पडण्याची प्रक्रिया अथवा पडण्यास मदत करण्याची प्रक्रिया; प्रकटबीज वनस्पतींतील पराग (लघुबीजुके) प्रत्यक्ष बीजकावर पडण्याची प्रक्रिया.

**pollinium** परागपुंज

एका परागकोटरातील सर्व परागांचा एक पुंजका; पुंजक्यातील कण सुटे नसून पातळ पापुद्र्यांनी वेढलेले असतात; तळाशी एक चिवट तंतू असतो व दोन तंतूंचा सांधा एका सूक्ष्म ग्रंथीस चिकटून असतो. उदा. रुई, ऑर्किड.

**pollinodium (antheridium)** पुं-धानी

पहा antheridium.

**poly–** बहु–

अनेक याअर्थी उपसर्ग.

**— adelphia** बहुसंघीय; पॉलिअडेल्फिया

कार्ल लिनियस यांच्या कृत्रिम वर्गीकरण पद्धतीतील एक वर्ग. यामध्ये त्यांनी फुलातील केसरदलांचे अनेक गट (झुबके) असणाऱ्या सर्व वनस्पतींचा समावेश केला होता.

**— adelphous** बहुसंघ

केसरदलांचे अनेक संघ असणारे ( केसरमंडल किंवा फूल) ; उदा. संत्र, एरंड, इ.

**— androus** बहुकेसरित

अनेक केसरदले असलेले (केसरमंडल, फूल); उदा. गुलाब, वाघाटी, कुंभा, इ.

**— andry** बहुकेसरत्व

अनेक केसरदले असण्याचा प्रकार ( स्थिती ).

**— anthous** बहुपुष्पी

एकाच छदमंडलात अनेक फुले असलेले; उदा. कुमूर; निशिगंध ( *Polyanthus tuberosa* L.).

**— arch** बहुसूत्र

आदिप्रकाष्ठांचे अनक गट असलेला रंभ; उदा. सिलाजिनेला; पहा stele.

**— carpellary** बहुकिंज; बहुकिंजदली

खुल्या किंवा जुळलेल्या अनेक किंजदलांचे ( किंजमंडळ) उदा; गुलाब, भेंडी, पिवळा चाफा, कमळ इ.

**— carpic** बहुफली

जीवनात अनेकदा फुले व फळे निर्मिणारे; उदा; आंबा.

**— carpous** मुक्तकिंज; पृथक् अंडपी

पहा apocarpous.

**— cephalous** बहुस्तबक: बहुशीर्षक

स्तबकासारखे अनेक फुलोरे असलेले; उदा. सहदेवी, ओसाडी, इ. पहा capitulum.

**— chasium** बहुशाख

पहा pleiochasium.

**— cotyledonous** बहुदलिकित

अनेक दलिका असलेले (बी; वनस्पती ); उदा. पाइन ( देवदार, चीड ).

**— cyclic** बहुचक्रीय

पुष्पदलांची ( संदले, प्रदले इ.) अनेक मंडले असलेले ( फूल ) उदा. गुलाब.

**— embryony** बहुगर्भत्व; बहुभ्रूणता

एका बीजकात किंवा बीजात अनेक गर्भ असण्याचा प्रकार; उदा. पाइन व इतर शंकुमंत वनस्पती; संत्र, लिंबू, इ.

**polygamous** बहुयुतिक

एकलिंगी व उभयलिंगी ( द्विलिंगी ) फुले एकाच झाडावर अथवा एका जातीच्या दोन भिन्न झाडावर असणारी ( जाती ) उदा. ॲश, मॅंगोस्टीन, काजू, काकडशिंगी, अमोणी, इ.

**polygamy** बहुयुतिकत्व

वर सांगितलेले लक्षण असण्याचा प्रकार.

**Polygonaceae** चुक्र (चुका) कुल; पॉलिगोनेसी
मुहलन्बेकिया, चुका, रेवंदचिनी, पोवळी (अँटिगोनॉन), इत्यादि द्विदलिकित वनस्पतींचे कुल; याचा अंतर्भाव बेसींनी पाटलपुष्प गणात (कॅरिओफायलेलीझ), एँग्लर व प्रँटल यांनी व हचिन्सनांनी चुक्रगणात (पॉलिगोनेलीझ) केला आहे. प्रमुख लक्षणे : नलिकेसारखे उपपर्ण असलेल्या एकाआड एक पानांच्या ओषधी. द्विलिंगी नियमित, चक्रीय किंवा अचक्रीय फुले; परिदले ३+३; केसरदले ३ + ३; किंजदले ३ जुळलेली, व ऊर्ध्वस्थ किंजपुट; ह्या साधारणतः आढळणाऱ्या व्यवस्थेत फरक आढळतात; किंजपुटात एक कप्पा व एक बीजक; त्रिकोनी कपाली (फळ); सपुष्क बी; फळावर सतत राहणाऱ्या परिदलाचा पंख असतो.

**polymerous (pleiomerous)** बहुभागी
फुलातील प्रत्येक मंडलात अनेक पुष्पदले असलेले (फूल); उदा. गुलाब (संवर्ताशिवाय इतर मंडले), कमळ; हिरवा चाफा.

**polymorphic** बहुरूपी
स्वरूपाचे अनेक प्रकार दर्शविणारे; एका जातीत पाने, पुष्पदले, बीजुके, फळे यांच्या प्रकारांतील विविधता असणारी (वनस्पती).

**polymorphism** बहुरूपता
बहुरूपी असण्याची स्थिती; उदा. एकाच झाडावर दोन प्रकारची फुले असणे. जीवनात त्याच वनस्पतीचे भिन्न आकार-प्रकार आढळतात; उदा. अर्गट नावाचे कवक.

**polynucleate (multinucleate)** बहुप्रकल (प्रकली); बहुकेंद्रक
अनेक प्रकल असलेली (कोशिका) उदा. म्युकर बुरशी; क्लॅडोफोरा शैवल.

**Polypetalae** मुक्तप्रदली उपवर्ग
बेंथॅम आणि हूकर यांच्या वर्गीकरणातील सुट्या पाकळ्या असलेल्या फुलांच्या (द्विदलिकित वर्गातील) वनस्पतींचा गट.

**polypetalous** मुक्तप्रदली
अनेक सुट्या पाकळ्यांचे (फूल); उदा. गुलाब, संकेश्वर, गुलमोहर, इ.

**polyphagous** बह्वाश्रयी
अनेक आश्रयांवर आढळणारे (कवक); उदा. पिथियम, अर्गट, तांबेरा, इ.

**polyphyletic** अनेकोद्‌भव; अनेकस्त्रोतोद्‌भव
अनेक पूर्वजांपासून (कुले, जाती अथवा वंश) उत्क्रांत झालेला (अवतरलेला) एखादा मोठा गट; उदा. सर्व शैवल वनस्पती अनेक प्रारंभिक सूक्ष्म पूर्वजांपासून स्वतंत्रपणे विकसित होत आल्या असाव्या; या आधारावर त्यांचे स्वतंत्र विभाग पाडले आहेत; शैवले असा स्वतंत्र विभाग आता मानला जात नाही. पहा monophyletic; Algae.

**polyphyllous** मुक्तपरिदली
सुटी परिदले असलेले (फूल) उदा. चुका, नारळ, कमळ, पिवळा चाफा.

**polyploid** बहुगुणित
प्रकलातील रंगसूत्रांची संख्या दुपटीपेक्षा अधिक असलेले (प्रकल अथवा वनस्पतींच्या जाती, प्रकार इ.). यातील जातीचा द्विगुणिताशी संकर होत नाही; पहा diploid.

**polyploidy** बहुगुणितत्व; बहुगुणन
बहुगुणित (रंगसूत्रांचे अनेक गट) असण्याचा प्रकार; पहा haploid, diploid, allopolyploidy.

**Polyporaceae** बहुछिद्रकवक कुल.
गदाकवक वर्गातील अनेक छिद्रे असलेल्या बीजुकोत्पादक अवयवांच्या कवकांचे कुल; पहा Basidiomycetes.

**polysepalous** मुक्तसंदली
सर्व संदले सुटी असलेले (फूल); उदा. मोहरी, लिंबू.

**polyspermous** बहुबीजी
अनेक बिया असलेले.

**polysporangiate** बहुबीजुककोशिक
अनेक बीजुककोश असलेले.

**polysporous** बहुबीजुकी; बहुबीजाणुक
अनेक (४–८ पेक्षा अधिक) बीजुके असलेली (धानी); पहा ascus.

**polyspory** बहुबीजुकत्व; बहुबीजाणुकता
अनेक बीजुके असण्याचा प्रकार.

**polystelic** बहुरंभी
अनेक रंभ असलेले खोड; उदा. सिलाजिनेला; काही नेचे इ. पहा stele.

**polystemonous (polyandrous)** बहुकेसरी; बहुपुं-केसरी
अनेक केसरदलांचे; उदा. पेरू, सावर यांचे फूल.

**polystylous** बहुकिंजली
अनेक किंजले असलेले ( किंजमंडळ ); उदा. एरंड; चित्रक; गुलाब, इ.

**polytheleus** बहुकिंजपुटी
अनेक स्वतंत्र किंजपुट असलेले ( फूल ); उदा. पिवळा चाफा; गुलाब, स्ट्रॉबेरी, रासबेरी, इ.

**polytrichous** बहुकेशी
अनेक केस असलेले ( फळ, बी, केसरदल इ.) उदा. सावर व कापसाचे बी; एकदांडीचे फळ; मोरवेलीचे किंजल; काही गवतांची तुसे.

**polytypic** बहु (अनेक) प्रतिरूपी
अनेक जाती अंतर्भूत असलेला वंश; पहा monotypic.

**pome** आक्रांत फल
अनेक कप्पे असलेले, मांसल पुष्पासनाने आणि संवर्ताने वेढलेले फळ; उदा. सफरचंद, नासपती, बिही;

**pomiferous** आक्रांत फलधारी
आक्रांत फळ असलेली ( वनस्पती ).

**pomology** फलविद्या; फलशास्त्र
खाद्य फळझाडांच्या लागवडीसंबंधीची माहिती.

**pond-scum** पल्वल तरंग
डबक्यातील व साठलेल्या पाण्यातील हिरवा तवंग; यात मुख्यतः सूक्ष्म शैवले असून विशिष्ट ऋतूत ती भरपूर असतात.

**poophyte** शाद्वलपादप
शाद्वल प्रकाराच्या गवताळ प्रदेशातील वनस्पति; पहा meadow.

**popcorn** लाही मका
मक्याची लाही करण्यास उत्तम असा प्रकार.

**porandrous ( poricidal)** रन्ध्रस्फोटक
छिद्रे पडून त्यातून पराग विखुरणारी ( वनस्पती ); उदा. मका, वांगे.

**pore** छिद्र; रंध्र
कोणत्याही अवयवाला ( खोड, पान, परागकोश, इ. ) असलेले भोक; उदा. त्वग्रंध्र, वल्करंध्र, जलरंध्र, छिद्रकवक, वाहिका, जमिनीतील पोकळी, स्फॅग्नम शेवाळीतील पाने, अफूची बोंडे.

**— fungus** छिद्रकवक
पहा *Polyporaceae*.

**— passage** रंध्रमार्ग
पानांच्या त्वग्रंध्राचा मार्ग; अपित्वचेतील बाहेरचे व आतील छिद्र यांमधील पोकळी.

**— space ( volume )** रंध्रावकाश
ज्यात घनकणांचा अभाव असतो, अशी जमिनीतील एकूण पोकळ जागा.

**poricidal** रंध्रस्फोटी
भोके पडून फुटणारे ( फळ ); उदा. अफू.

**porogamy** रंध्रयुति
बहुतेक सर्व बीजी वनस्पतींत परागनलिका बीजकरंध्रातून प्रदेहात प्रवेश करून नंतर गर्भकोशातील अंदुकाचे व परागनलिकेतील पुं-प्रकलाचे मीलन घडवून आणते तो प्रकार; पहा chalazogamy.

**poroids** छिद्राभ
छिद्रासारखे दिसणारे अनेक बिंदू ( ठिपके ); उदा. करंडक वनस्पतीचे आवरण.

**porometer** त्वग्रंध्रमापक
त्वग्रंध्रांची परिमाणे मोजण्याचे उपकरण.

**porous ( porose )** छिद्रल; छिद्री; रंध्री
छिद्रे असलेले ( अवयव ).

**— dehiscence** छिद्रल स्फुटन; रंध्रीस्फुटन
छिद्रे पडून तडकणारा; उदा. अफूचे बोंड; रिंगणीचे परागकोश.

**porphyreus ( purpureus )** जांभळे
उदा. *Claviceps purpurea* या कवकाचे जालाश्म ( अनेक तंतू एकत्र होऊन बनलेली निष्क्रिय संरचना )

**Portulacaceae** लोणी ( लोनिका ) कुल
घोळ (लोणी, लोणा) व तत्सम द्विदलिकित वनस्पतींचे लहान कुल; एंग्लर व प्रँटल यांनी सटोस्पर्मीमध्ये, बेंथॅम व हूकर यांनी कार्योफायलीनीत व हचिन्सननीं कार्योफायलेलीझमध्ये समाविष्ट केले आहे. प्रमुख लक्षणे : ओषधी व लहान झुडपे; मांसल पाने व केसाळ उपपर्णे; फुलोरा– नियमित, द्विलिंगी फुलांची वल्लरी; संदले सुटी, २; प्रदले ४–५ सुटी; केसरदले सुटी व ५ किंवा त्यापेक्षा कमीजास्त; किंजदले जुळलेली ३–५; किंजपुट ऊर्ध्वस्थ किंवा अर्धअधःस्थ, त्यात एक कप्पा व २– अनेक बीजके; बोंडफळात सपुष्क बीजे.

**positive** धन
केवळ ( निरपेक्ष ) किंवा परिणामकारक स्थिती दर्शविण्याकरिता उपसर्गाप्रमाणे उपयोग करतात. उदा.

धन प्रकाशानुवर्तनी ( प्रकाशाच्या परिणामामुळें तिकडे वाढणारे ); त्याउलट ऋण प्रकाशानुवर्तनी ( प्रकाशा-विरुद्ध वाढणारे ).

**— reaction** धन प्रतिक्रिया

चतकाकडे क्रियात्मक प्रवृत्ति दर्शविण्याची घटना.

**posterior** पश्च

प्रमुख अक्षाजवळची ( उदा. पानाची किंवा फुलाची बाजू ).

**post- climax** पश्चचरमावस्था; पश्चपरमावस्था

चरमावस्थेनंतरची स्थिती; पहा climax.

**— fertilisation** फलनोत्तर

गंतुकमीलनानंतर ( फलनानंतर ) होणारे ( बदल किंवा विकास ); पहा fertilisation.

**— genital** जन्मोत्तर; जननोत्तर

जन्मास आल्यानंतर उद्भवणारी किंवा दिसून येणारी ( लक्षणे किंवा संरचना ); याउलट जन्मजात ( आनुवंशिक ).

**— meiotic division** अर्धसूत्रणोत्तर विभाजन

पहा meiosis.

**— synapsis** उत्तर समीपस्थिति

प्रकलविभाजनात ( अर्धसूत्रण प्रकारात ) समजात रंगसूत्रांच्या जोड्यांची मांडणी झाल्यानंतरची (प्रक्रिया).

**potamophyta** नदीपादप

नद्यांत वाढणाऱ्या वनस्पती.

**potential** स्थितिज; अव्यक्त

विशिष्ट स्थान ( स्थिती ) असल्यामुळे प्राप्त होणारे व परिस्थितिसापेक्ष उपयुक्त ठरणारे ( संचित ).

**— energy** स्थितिज ऊर्जा

संचित ऊर्जा; उदा. अन्नकणांतील ऊर्जा अनुकूल परिस्थितीत मुक्त होऊन कार्यास उपयुक्त होते; लाकडातील ऊर्जा जळतांना उष्णतारूपाने बाहेर पडते व गतिज होते; पहा kinetic.

**potometer** बाष्पोच्छ्वासमापक;

वनस्पतीतून वाफेच्या रूपाने बाहेर टाकल्या जाणाऱ्या पाण्याचे मोजमाप करणारे उपकरण (साधन).

**pouch** कोष्ठ

पिशवीसारखा अवयव; उदा. काही फुलातील शुंडिका; काही बाजूच्या उपमुळाच्या विभाजी टोकावरची पाचक व पिशवीसारखी टोपी; पहा spur.

**powder** चूर्ण; पीठ; पूड; भुकटी

**powdery mildew** चूर्णभुरी

कवकांमुळे पानावर पडलेले पिठासारखे लहानमोठे ठिपके; उदा. द्राक्ष, गुलाब; पहा mildew.

**prairie** प्रशाद्वल

दमट हवामानातील उंच, नरम व सलगपणे वाढणाऱ्या गवतांचा (उ. अमेरिकेतील) प्रदेश; यात ऋतुमाना-प्रमाणे काही ओषधीही (कंदयुक्त, वर्षायू) आढळतात.

**pratensis** शाद्वलवासी

शाद्वलप्रकारच्या गवताळ प्रदेशात वाढणारी ( वनस्पती ); उदा. *Eulophia pratensis* ( शतावरी ).

**pratum** शाद्वल

पहा meadow.

**pre (prae)** आदि- पूर्व; प्राक्

स्थान किंवा काल यांच्या संदर्भात अग्रत्व दर्शविणारा उपसर्ग; मराठीत प्रत्ययासारखाही उपयुक्त.

**Preangiosperms** आद्यावृतबीज वनस्पति; आवृत-बीजपूर्व वनस्पती

फुलझाडे ( आवृतबीज वनस्पती ) अस्तित्वात येण्या-पूर्वीच्या पूर्वज वनस्पती; आधीची फुलझाडे.

**precatorius** माळेकरिता उपयुक्त

उदा. गुंज ( *Abrus precatorius* L. )

**preclimax** पूर्वचरमावस्था; पूर्वपरमावस्था

वनस्पतींच्या समुदायाच्या अंतिम अवस्थेपूर्वी असलेली स्थिती.

**prefertilisation** फलनपूर्व

अंडुकाचे रेतुकाकडून फलन होण्यापूर्वीची ( स्थिती, संरचना, इ. ).

**prefloration** कलिकारचना

फुलाची कळी उमलण्यापूर्वीची अंतर्गत संरचना अथवा आतील अवयवांची ( पुष्पदलांची ) मांडणी; पहा ptyxis; aestivation.

**prefoliation** कोरकरचना

कळी उमलण्यापूर्वीची तिच्यातील पानांची मांडणी; पहा ptyxis; vernation.

**prehensile type** परिग्राही प्रकार

केसरदले व किंजल यांना कवटाळून धरून परपरागण घडवून आणणारी कीटकपरागित ( फुले ).

**premorse (praemorse)** छिन्न
टोकाशी कापल्याप्रमाणे; चावून तोडल्याप्रमाणे; कुरतडलेला.

**presence** उपस्थिती
(१) व्यक्तीतील एखाद्या लक्षणाबद्दल जबाबदार असलेल्या जनुकाचे अस्तित्व; पहा gene;
(२) परिस्थितिविज्ञानात, एखाद्या पादप-समुदायातील अनेक नमुनाक्षेत्रात त्यातील विशिष्ट जातीचे अस्तिव व तिचे मापन किंवा वर्गवारी.

**presentation time** अवगमकाल;
एखाद्या अवयवास चेतकाची जाणीव होण्यास लागलेला वेळ.

**preservation** परिरक्षण
जैव, भौतिक व रासायनिक बदल न होऊ देता जतन करण्याची (टिकविण्याची) प्रक्रिया; उदा. खाद्य पदार्थ; वनस्पती अथवा प्राणी किंवा त्यांचे भाग.

**pressure** दाब; दमन

**—, root** मूलदमन
खोडात द्रव वर चढविण्यास आवश्यक असा मुळांच्या उतकांतील दाब.

**presynapsis** पूव समीपस्थिति
समीपस्थितीच्या आधीची प्रकलाची अवस्था; पहा synapsis, post-synapsis.

**prevention** प्रतिबंध
रोग होऊ न देणे, फुले किंवा फळे येऊ न देणे, इत्यादी संबंधी वापर असलेली संज्ञा.

**prevernal aspect** वसंतपूर्व प्रभाव अथवा दृश्य
वसंतऋतुपूर्वी पादपसमुदायास असलेले स्वरूप. पहा vernal aspect.

**prickle** काटा; शल्य
सालीवर इतस्ततः वाढलेले तीक्ष्ण व कठीण उपांग; उदा. गुलाब, काटेमाठ.

**prickly** काटेरी; शल्यवंत
काटे असलेले.

**primary** आद्य; प्राथमिक
प्रथम विकास पावलेला (अवयव).

**-- axis** प्रथमाक्ष; आद्याक्ष
पानांचा किंवा फुलोऱ्याचा मुख्य अक्ष (दांडा); वनस्पतींचे खोड.

**-- body** मूलकाय; आद्यकाय
फक्त प्राथमिक ऊतके असलेले शरीर; अग्रस्थ विभज्येपासून बनलेल्या ऊतकांचे शरीर; पहा meristem.

**— cortex** प्राथमिक मध्यत्वचा; मध्यजनक
(१) प्राथमिक विभज्येपासून बनलेले व अंतस्त्वचेबाहेरचे मृदूतक; अग्रस्थ विभज्येतील त्वचाजनकाने वेढलेले (आणि रंभजनकाबाहेरचे) ऊतक; पहा cortex, meristem; periblem; plerome.

**— increase** प्राथमिक वृद्धि
प्रथम झालेली आकारवाढ.

**-- leaf (primordial leaf)** आद्यपर्ण; पूर्वपर्ण
पहिले पान.

**-- meristem** प्राथमिक विभज्या
पहा meristem.

**-- petiole** पर्णाक्ष
संयुक्त पानाची मुख्य शीर (देठाचा पुढे वाढलेला भाग).

**— phloem (bast)** प्राथमिक परिकाष्ठ
पहा phloem.

**-- root** प्राथमिक मूळ
आदिमूलापासून बनलेले पहिले (प्रमुख) मूळ; पहा tap-root.

**-- shoot** प्राथमिक प्ररोह
आदिकोरकापासून (पहिल्या कोंबापासून) बनलेला प्रमुख पल्लव (खोड व कोवळ्या पानांची कळी, बालपर्ण इ.).

**-- structure** प्राथमिक संरचना
पहिल्याने बनलेली शरीररचना.

**-- tissue** प्रथमोतक
प्राथमिक विभज्येपासून बनलेले ऊतक (पहिल्याच वर्षी निर्मिलेले ऊतक).

**— wood** प्राथमिक काष्ठ
प्राथमिक विभज्येपासून (पूर्वोतककरापासून) बनलेले प्रकाष्ठ. पहा xylem (wood); procambium.

**primeval forest** अस्पष्ट वन; मूळचे जंगल
मूळच्या स्वरूपात असलेले, मानवाने स्पर्श न केलेले जंगल; अशी जंगले आता फारच थोडी आहेत (अमेरिका, आफ्रिका, इ.); पहा vergin forest.

**primine** बीजकावरण
बीजकाचे बाह्याच्छादन.

**primitive** प्रारंभिक; आदिम; आद्य; आदि-प्राचीन
पहिल्याने विकास पावलेले (अवयव, वनश्री, वनस्पती, जाती, जीवन, इ.).

**Primofilices** आदिम नेचे; आदि नेचे; प्रायमोफिलिसेस
नवनेचांपूर्वी विकास पावलेले प्राचीन नेचे. पुराजीव महाकल्पातील जीवाश्म स्वरुपातच सध्या आढळणारे व नेचे (फिलिसीनी) वर्गातील तीन उपवर्गांपैकी एक; पहा Filicinae.

**primordial** अविकसित; आदिम; आद्य
पहिल्याने दृश्य स्वरुपात आलेले; सर्वप्रथम अवस्थेतील (अवयव).

**— cell** अनावृत (नग्न) कोशिका
कोशिकावरण नसलेला जीवद्रव्याचा घटक (एकक).

**— leaf** आद्यपर्ण
दलिकेनंतरचे (पहिले) पान; आदिकोरकापासून बनलेले.

**— meristem (promeristem)** पूर्व विभज्या; आद्य विभाजी ऊति
पहा promeristem.

**— tissue** तल्पोतक
पहा ground tissue.

**— utricle** आद्याशय
कोशिकेतील बाह्य प्राकल; रिक्तिकायुक्त आतील जीवद्रव्य (अंतःप्राकल) ह्याने वेढलेला असतो; पहा protoplast.

**primospore** आदिबीजुक
जनक जीवांच्या शरीरकोशिकेपासून फारसे भिन्न (अप्रभेदित) नसणारे बीजुक.

**prismatic** लोलकाभ; प्रचिनाकार
लोलकासारखे; कोनानी अलग केलेल्या सपाट बाजू असलेले; उदा. काही मृदूतकातील कोशिका; ऊतककर कोशिका.

**— layer** लोलकस्तर; त्रिपार्श्विकस्तर
वर सांगितल्याप्रमाणे कोशिका असलेला थर.

**prison-flower** कारा-पुष्प
तुरुंगातील कैद्याप्रमाणे काही वेळ बंदिस्त ठेवून त्याचे (प्राण्यां) कडून परागणाचे कार्य करवून घेणारे फूल; उदा. पोपटवेल; अळू; कॅलॅडियम.

**proanthesis** प्राग्पुष्पन
फुले येण्याच्या नित्यकालपूर्वी, ती येण्याचा प्रकार.

**procambial strand** पूर्वोतककर पट्ट
विभज्येच्या रंभजनक भागातील वाहकवृंद बनविणाऱ्या लांबट कोशिकांची उभी पट्टी; पहा meristem.

**procambium** पूर्वोतककर
ज्या विभाजी कोशिकापासून नवीन वाहक घटक (वाहिका, वाहिन्या इ.) निर्मिले जातात त्या मूळ व खोड यांच्या टोकाशी असलेल्या विकासपूर्वावस्थेतील कोशिकांचा थर.

**procarp** पूर्वफल
घानीकवकातील (उदा. युरोशियम) स्त्री–जननेंद्रिय; त्यालाच टोकाशी 'योनिकासूत्र' असा आदायी (ग्रहणशील) तंतू असतो; पहा trichogyne.

**procerus** उंच
लहान वृक्षाप्रमाणे उंच असलेले झाड; उदा. मांदार (*Calotropis procera* R. Br.)

**process** (१) प्रवर्ध; (२) प्रक्रिया; विधी
(१) पृष्ठभागापासून वर किंवा पुढे वाढून आलेले उपांग; उदा. काटे; केसल, इ.
(२) अनेक टप्प्यांनी घडून येणारी जटिल क्रिया; उदा. वितंचन, प्रकाशसंश्लेषण, पचन, प्रजोत्पादन, इत्यादी जैव प्रक्रिया.

**processing** प्रक्रियण
वर (२) मध्ये वर्णन केलेली घटना.

**procumbent** भूसर्पी
जमिनीसरपट वाढणारे (खोड, वेल); उदा. पुनर्नवा; व्हर्बिना व्हेनोजा; एकदांडी (*Tridax procumbens* L.) इ.

**pro-embryo** पूर्वगर्भ; आदिगर्भ
गर्भाचे भिन्न भाग स्पष्ट होण्यापूर्वीची अवस्था.

**proenzyme** पूर्ववितंचक
वितंचनाची प्रक्रिया होण्यापूर्वी तिला चेतना देणारे दुसरे द्रव्य (प्रभावक).

**profile lie** पार्श्वदृश्य स्थिती; पार्श्वरुप
तीव्र प्रकाशाला अनुलक्षून पाने प्रकाशाच्या किरणाकडे आपल्या किनारी (कडा) वळवून ठेवतात ती स्थिती; उदा. टाकळा, लाजाळू; नागफणाचे खोड; नागीनची अथवा कोरफडीची पाने.

**progamous** फलनपूर्व
फलनापूर्वी घडणारी; उदा. लिंगनिश्चिती.

**— cell** फलनपूर्व काशिका

परागकणात बनलेली व नर-गंतुक ( प्रकल ) असलेली कोशिका.

**progressive metamorphosis** प्रगामी रूपांतरण

उच्चतेकडे ( प्रगतीकडे ) नेणारा अवयवांतील बदल; उदा. पाकळ्या ऐवजी केसरदलांची निर्मिती.

**— succession** प्रगामी अनुक्रमण

चरमावस्थेप्रत नेणारा पादपसमुदायातील बदल.

**Progymnosperms** आदिप्रकटबीज वनस्पति

प्रकटबीज वनस्पतींचे पूर्वज; उदा. बेनेटायटेलीझ; बीजी नेचे.

**prohydrotropism** धन-जलानुवर्तन

ओलाव्याकडे वाढत जाण्याची प्रवृत्ती.

**projection** प्रवर्धक; प्रक्षेप

पृष्ठभागावर वाढलेला लहान पण भिन्न आकार-प्रकाराचा उंचवटा.

**proliferation** प्रचुरजनन; प्रचुरण

उपशाखांनी विस्तार होण्याची घटना.

**proliferous** उपशाखी; बहुजनक; प्रचुरजनक

उपशाखारूप संतती असलेले ( निर्मिणारे ); अधिक सारखे अवयव किंवा भाग स्वतःवर निर्मिणारे.

**prolific** जननक्षम; प्रसवशील; फलदायी

प्रजानिर्मितीचे विपुल सामर्थ्य असलेले; विपुल फळे देणारे.

**prolification** प्ररोहनिर्मिती

फुलामध्ये टोकास किंवा बाजूस पानांचा झुबका येणे. उदा. गुलाब कुलातील काही वनस्पती, स्ट्रॉबेरी, इ.

**proligerous (proliferous)** बहुप्रसवी

शैवाक ( दगडफूल ) वनस्पतीतील मुक्त धानीफलाचा बीजुकधारी भाग.

**promeristem (primordial meristem)** पूर्वविभज्या

उच्च दर्जाच्या वनस्पतींतील कोवळ्या रोपाच्या खोडाच्या टोकातील अप्रभेदित कोशिकासमूह ( मृदूतक ); यातील सर्व कोशिका सर्व दिशांना विभाजनाने वाढत असतात; जसजसे टोकाकडून खालच्या बाजूस पहावे तसतसे अधिकाधिक प्रभेदित ऊतके आढळतात ( आद्यत्वचा, पूर्वोतककर आणि तल्पविभज्या ); पहा meristem.

**promycelium** पूर्वतंतु; पूर्वजालक; प्राक् कवक-जाल

बीजुक रुजून त्यातून वाढणारा अल्पायुषी व पुनरपि भिन्नरूप बीजुके निर्मिणारा कवकतंतु; उदा. कवक; म्यूकर बुरशीचे गंतुबीजुक रुजून बनणारा तंतू.

**pronucleus** पूर्वप्रकल

संयोगी गंतुकातील प्रकल; हा दुसऱ्याशी संयोग पावून कार्यक्षम बनतो व संयुक्त कोशिकेपासून नवीन वनस्पती निर्माण होते.

**propagation** अभिवृद्धी; प्रवर्धन

सजीवांचा प्रसार किंवा लागवड.

**propagule** कलिका; मुकुलिका; कंदिका; प्रवर्ध्य

वनस्पतींच्या लक्षणांचे सातत्य टिकवून धरणारी प्रजोत्पादक कोशिका, कळी, इत्यादी उपांग अथवा अवयव.

**prophase** पूर्वावस्था

कोशिकाविभाजनातील ( प्रकल विभाजनातील ) पहिली आरंभीची अवस्था; यामध्ये रंगसूत्रे स्पष्ट व स्वतंत्र होऊन ती उभी चिरली जातात व तर्कुतंतूशी जोडली जातात; प्रकलावरण नाहीसे होते व प्रकलक लुप्त होतो; मात्र तर्कूचे स्पष्ट रूप पुढील अवस्थेत दिसते; पहा metaphase.

**prophloem** आदिपरिकाष्ठ

पहा protophloem.

**prophototactic** धन प्रकाशानुचलनी

पहा प्रकाशानुचलनी; phototactic.

**prophototropic** धन प्रकाशानुवर्तनी

पहा प्रकाशानुवर्तनी; phototropic.

**prophylactic** रोगप्रतिकारक; रोगप्रतिबंधक

रोगाला प्रतिबंध करणारे (साधन, उपाय, इ.).

**prophylaxis** रोगप्रतिकार; रोगप्रतिबंध

रोग होऊ न देण्याचा प्रकार.

**prophyll** छदक

पहा bracteole.

**proplastid** पूर्वप्राकणु; आदिलवक; पूर्वलवक

परिकलातील प्राकणूची निर्मिती करणारा सूक्ष्मकण; पहा chloroplast; chromoplast.

**prop–root (stilt root)** आधारमूळ

वनस्पतीला आधार देणारे व खोडापासून निघून हवेतून जमिनीत गेलेले टेकूसारखे मूळ; उदा. केवडा, मका, इ.

**prosenchyma** दीर्घोतक

पातळ किंवा जाड आवरण असलेल्या, सजीव व लांबट कोशिकांचे समूह; अनेकदा याचे वलय अपित्वचे-खाली ( खोड, देठ यामध्ये ) आढळते; ह्या ऊतकांत हरितकणु बहुधा असतात; अन्ननिर्मिती, संचय, विसृति इत्यादी कार्ये येथे चालू असतात; जाड भिंती असलेले ऊतक मजबुती देते.

**prosgeotropic ( positively geotropic )** धन गुरुत्वानुवर्तनी

पहा geotropism.

**prosheliotropic ( positively heliotropic )** धन प्रकाशानुवर्तनी

पहा phototropism; Positive.

**prosporangium** पूर्वबीजुककोश

काही कवकातील बीजुककोशाची निर्मिती करणारी पहिली फुगीर कोशिका; यातील जीवद्रव्य बीजुक-कोशात गेल्यावर त्यापासून अनेक चरबीजुके निर्माण होतात; उदा. Chytridieae.

**prostelic** एकरंभी

अक्षामध्ये एकच, मध्यवर्ती, एकमध्य वाहकवृंद असलेले ( खोड ); उदा व्हिनिया ( नेचाभ पादप ).

**prosthermotaxis ( positive thermotaxis)** धन तापानुचलन

सूक्ष्मजंतू किंवा चरबीजुके यांचे उष्ण भागाकडे ( गमन ) जाणे; पहा thermotaxis.

**prostrate** प्रणत

जमिनीवर सपाट राहून वाढणारी ( वनस्पती ); उदा. काही शैवले, यकृतका, शैवाक; मर्यादवेल, पुनर्नवा, काटेरिंगणी, विष्णुक्रांता यांची खोडे व फांद्या.

**protandrous** पूर्वपरागपक्व

केसरदलातील परागकण प्रथम पूर्णपक्व होणारे ( फूल ); उदा. सूर्यफूल, कापूस;

**protandry** पूर्वपरागपक्वन

वर सांगितलेले लक्षण असलेली स्थिती ( प्रकार ).

**protease** प्रथिन वितंचक; प्रोटिएज

प्रथिनांचे वितंचन ( रासायनिक प्रक्रियेने साध्या पदार्थात रूपांतर ) करणारे द्रव्य.

**protective layer** संरक्षक स्तर (थर); संरक्षी स्तर

पान गळून पडतेवेळी खोडावर तेथील अनेक कोशिकांच्या थरात बदल होऊन ( जखम न होऊ देता ) बनणारा संरक्षक थर; पान प्रत्यक्ष गळल्यावर तेथे त्याचा वण राहतो; उदा. पपई; पहा abscission.

**protective sheath** संरक्षक आवरण

पहा endodermis.

**protein** प्रथिन

जीवद्रव्याचा मूलभूत घटक; कार्बन, हायड्रोजन, ऑक्सिजन व नायट्रोजन क्वचित् गंधक व स्फुर इत्यादी मूलद्रव्ये ( आणि काही खनिजे ) असलेले जटिल संयुग; प्राण्यांच्या अन्नांतील आवश्यक घटक; अनेक ॲमिनो अम्लांच्या संश्लेषणाने प्रथिने बनतात.

पहा protoplasm.

**protenchyma ( ground tissue )** तल्पोतक

पहा ground tissue.

**proterandrous** पूर्वपरागपक्व

पहा protandrous.

**proterogynous** पूर्वकिंजपक्व

प्रथम किंजल्क पक्व होणारे ( फूल ); उदा. सापसंद, मोहरी, बटाटा इ.

**proterogyny** पूर्वकिंजपक्वन

वर सांगितलेली स्थिती ( प्रकार ).

**prothallus** पूर्वकायक; प्रकायिका

बीजुक रुजल्यावर त्यापासून निर्मिलेली कायकरूप ( अत्यंत साधे शरीर असलेली ) व गंतुके निर्मिणारी एकलिंगी किंवा द्विलिंगी, स्वतंत्र किंवा अवलंबित ( वनस्पतीची ) पिढी; गंतुकधारी;

पहा gametophyte.

**protocorm** आद्यघनकंद

काही वनस्पतींत आढळणारा ( फायलोग्लॉसम, लायकोपोडियम सर्नम व इतर काहींत ) दृढकंदासारखा अवयव; याला ग्रंथिक्षोड असेही म्हणतात; गर्भाचे प्रभेदन होण्यापूर्वी तो याच स्वरूपात कमी अधिक काळ असतो. वाहिनीवंत वनस्पतींच्या खोडाच्या क्रमविकासात हा अवयव एक टप्पा असावा असे काहींचे मत आहे; पहा corm.

**protoderm** आद्यत्वचा

प्राथमिक अग्रस्थ विभज्येपासून बनलेले पहिले बाह्याच्छादक ऊतक ( अल्पविकसित अपित्वचा );

पहा meristem; epidermis.

**protodochae** प्रागनुक्रमण; पूर्वानुक्रमण

विशिष्ट ठिकाणी पहिल्याने होणारा वनश्रीतील क्रमिक बदल; पहा succession.

**protogenesis** पूर्वमुकुलन

कळ्यांनी प्रजोत्पादन घडून येण्याची प्रक्रिया.

**protogynous** पूर्वकिंजपक्व

पहा proterogynous.

**protohadrome** आदिप्रकाष्ठ

पहा protoxylem.

**protoleptome** आदिपरिकाष्ठ

पहा protophloem.

**protomeristem** आदिविभज्या

अवयवाचा पाया घालणारी अग्रस्थ विभज्या.

**protonema** शेवालक

शेवाळी वनस्पतींत रंदुक रुजल्यावर निर्माण होणारी पहिली शैवलासारखी ( तंतूसारखी किंवा सपाट चकतीसारखी ) अवस्था; पुढे हिच्यापासून मुख्य वनस्पती वाढते.

**protophloem** आदिपरिकाष्ठ

वाहक वृंदातील अन्नरसाची ने-आण करणाऱ्या ( परिकाष्ठ ) भागातील पहिल्याने बनलेला भाग; पहा phloem.

**protophyll** पूर्वपर्ण

आद्यहृदकंदावरील पान; ( वाहिनीवंत ) अबीजी वनस्पतीतील ( नेचाभ पादपातील ) दलिका अथवा आद्यपर्ण; लायकोपोडियम् सर्नम ह्या वनस्पतीत आद्यहृदकंदावर अनेक पूर्वपर्णे असतात;
पहा protocorm.

**protophyta** आदिपादप; आदिवनस्पती

अत्यंत साध्या प्रारंभिक एककोशिक व क्षुद्र वनस्पती; उदा. काही शैवले, सूक्ष्मजंतू, काही कवक.

**Protophytology** पुरावनस्पतिविज्ञान

पहा Palaeobotany.

**protoplasm** जीवद्रव्य

सर्व सजीवांच्या ( प्राणी व वनस्पती ) शरीरातील जीवनव्यवहाराचे भौतिक ( वास्तव ) आधारभूत स्थान. त्याच्या अभावी सजीवत्व ( वृद्धी, चयापचय, प्रजोत्पादन, संवेदनाक्षमता, इ. ) आढळत नाही. एककोशिक सजीवात हा अर्धघन पदार्थ कोशिकावरणाने, सरक्षित किंवा नग्नावस्थेत असतो; अनेककोशिकात, प्रत्येक कोशिकेत स्वतंत्रपणे असला तरी सर्वातील जीवद्रव्यात एकता आढळते; सर्व जीवद्रव्य (समष्टी) एकच असल्याप्रमाणे व्यवहार चालतात.
पहा protoplast; cell.

**protoplast** प्राकल

आच्छादलेल्या किंवा नग्नावस्थेत असलेल्या व्यक्तिस्वरूपातील ( व्यष्टी ) जीवद्रव्याचे एकक; एका कोशिकेतील सर्व जीवद्रव्य. पहा cytoplasm, nucleus, plastid.

**Protopteridophyta** प्राग्नेचाभ ( प्राग्वाहिनीवंत ) पादप; प्रोटोटेरिडोफायटा

वाहिनीवंत अबीजी वनस्पतींचा गृहीत पूर्वज गट; हरित शैवलांपासून ह्या वनस्पती क्रमविकासाने अवतरलेल्या आहेत असे मानल्यास त्यांच्याहून प्रभेदित व सायलोफायटींनी ( ज्यांचे पासून इतर टेरिडोफायटा विकसित झाल्या आहेत असा गट ) या गटांशी साम्य असलेला ( कल्पिलेला ) प्रारंभिक गट.

**protostele** आद्यरंभ

मध्य केंद्रवर्ती प्रकाष्ठ व त्याभोवती परिकाष्ठ असलेला प्रारंभिक रंभ; उदा. ऱ्हिनिया;
पहा Psilophytales.

**prototype** आदिरूप

ज्यापासून रूपांतरित प्रजा निर्मिली गेली असावी असा गृहीत पूर्वज ( पूर्वजाकृति ).

**protoxylem** आदिप्रकाष्ठ; पूर्वकाष्ठ

विभज्येपासून प्रथम बनलेला प्राथमिक प्रकाष्ठाचा (जलवाहक ऊतक समूह) भाग; हा भडाजवळ असतो. पहा xylem.

**protozoophilous** सूक्ष्मजीवप्रिय; सूक्ष्मजीवपरागित

लहान अगर सूक्ष्म प्राण्यांकडून ( आदिजीव ) फलन ( लैंगिक प्रक्रिया ) घडवून आणणाऱ्या काही जलवनस्पती.

**protozygote** आदिरंदुक

अनुहरणाच्या प्रक्रियेत पितरांकडून दोन्ही प्रभावी घटक ( जनुके ) एकत्र आलेले समरंदुक.

**protropic** धन अनुवर्तन ( धनानुवर्तन )

चेतकाकडे नेणारी वाढण्याची प्रक्रिया उदा. प्रकाशानुवर्तन; पहा heliotropic; phototropic.

**protruding** पुरःसृत

पुढे डोकावणारे ( झुकणारे ); उदा. संकेश्वराची केसरदले.

**proximal** समीपस्थ

जवळचे; अक्षाला अनुलक्षून, त्याच्या जवळ येणारे

( भाग ); उदा. पानाच्या पात्याचा तळभाग टोकापेक्षा जवळचा असतो; टोक दूरस्थ असते; पहा distal.

**pruinate ( pruinose, pruinous )** भुरे
भुरकट दिसणारे; पृष्ठभागावर मेणचट व चूर्णीय ( पिठासारखा ) थर असलेले; उदा. घायपातीचे पान.

**prurient** दाहक; खाजरे; कंडूत्पादक
खाज ( कंडू ) आणणारे ; उदा. खाजकुइली ( *Mucuna pruriens* Baker ).

**psamnophilous ( psamnophile )** वालुकाप्रिय; वालुकावासी; वालुकारागी
उदा. विपुल वाळूमिश्रित जमिनीत वाढणारी (वनस्पती); *Psamna arenaria* आणि *Spinifex squarrosa* ह्या वनस्पती वालुकाराशीवर समुद्रकिनारी आढळतात; पहा strand-plants.

**pseudannual** छद्मवर्षायु
कंदयुक्त किंवा ग्रंथिक्षोडयुक्त, जमिनीतील खोडाच्या साहाय्याने वर्षानुवर्षे जगणारी परंतु वर्षायूप्रमाणे प्रतिवर्षी कोरडया ऋतूत जमिनीवर न दिसणारी ओषधी; उदा. आले, काही आमरे, हळकुंड, कांदा, सुरण, इ.

**pseudannulus** छद्मवलय
शेवाळींच्या बीजुकाशयाच्या परितुंडाबाहेरचे विशेषत्व पावलेल्या कोशिकांचे वर्तुळ.

**pseudaxis** छद्माक्ष
पहा sympodium.

**pseudembryo** छद्मगर्भ
पुष्कातील अलग राखलेला कोशिकांचा समूह; उदा. बॅलॅनोफोरा ( पूर्ण जीवोपजीवी फुलझाड ).

**pseudo- ( pseud- )** छद्मी; छद्म-; मिथ्या; आभासी
खोटे अथवा भास उत्पन्न करणारे या अर्थी उपसर्ग.

**pseudobulb** आभासीकंद; छद्मकंद
कंदाप्रमाणे अन्नसंचयी कांडे ( खोडाच्या दोन पेऱ्यांमधील भाग ); उदा. आमरांपैकी कांही जाती.

**pseudocarp** छद्मफल; आभासी फल
पक्व किंजपुटाऐवजी फळाचे कार्य करणारी पुष्पस्थली किंवा तत्सम संलग्न अवयव; याला अतिरिक्त ( साहाय्यक ) फळ म्हणतात; उदा. सफरचंद, नासपती, स्ट्रॉबेरी, कमळ ( नीलंबो ); काजूचे बोंडू.

**pseudoepiphyte** अपिवनस्पतिरूप
प्रथमपासूनच दुसऱ्या ( आश्रय ) वनस्पतीवर न वाढता, पुढे आधार घेऊन जगणारी वनस्पती. उदा. सुरण कुलातील काही वनस्पती प्रथम जमिनीत वाढून नंतर जवळच्या झाडाचा आधार घेतात व त्यावर वाढतात; त्यांच्या खोडाची खालची बाजू नाश पावून त्यापासून सुटलेल्या वायवी मुळ्या त्यांना पाणी देतात. खऱ्या अपिवनस्पती ( उदा. आमरे ) आरंभापासून पूर्णपणे दुसऱ्यावर भार टाकतात व पाणी स्वतंत्रपणे वरच्यावर जमा करून वापरतात; पहा epiphyte.

**pseudogamy** छद्मयुति; आभासी फलन; आभासी युग्मन
अनिषेक जननाने फलोत्पत्ती; परागण होऊन बीजुकात गंतुक प्रवेश होत नाही, असा प्रकार.

**pseudo-hermaphrodite** छद्मी द्विलिंगी
कार्यक्षमतेच्या दृष्टीने एकलिंगी, तथापि संरचनेत द्विलिंगी आणि दोन्हीपैकी एका लिंगाचे अवयव वंध्य असलेले ( फूल ).

**pseudo-monocotyledon** छद्मी एकदलिकित
द्विदलिकित, तथापि विकासावस्थेत दोन्हीपैकी एक दलिका स्थगित झालेली ( वनस्पती ). उदा. कॅप्सेला.

**pseudoparenchyma** छद्मी मृदूतक
मूलतः संबंध नसलेल्या स्वतंत्र कोशिकांचे साधे ऊतक; उदा. कवकातील तंतू एकत्र येऊन बनलेले ऊतक.

**pseudopodium** छद्मपाद; पादाभ; आभासी पाद
नग्नावस्थेतील जीवद्रव्याच्या पृष्ठभागापासून निघालेले व हालचालीत पायाप्रमाणे उपयुक्त असलेले तात्पुरते प्रवर्धन. उदा. श्लेष्मकवकांची बीजुके व जीवद्रव्याचे खंड; ॲमीबा प्राणी.

**pseudo-perianth** छद्मपरिदलमंडल; आभासी परिदल
अंदुककलशाच्या तळाशी फलनानंतर बनणारे पेल्यासारखे आवरण; काही यकृतकातील वनस्पती.

**pseudo-vivipary** छद्मापत्यजनन
फुलांबरोबरच जवळपास पर्णयुक्त जननक्षम कळ्यांची निर्मिती; उदा. प्रनड ( *Juncus bufonius* L.)

**pseudozygospore** आभासी ( छद्मी ) गंतुबीजुक; आभासी युग्माणु
पहा azygospore.

**psilo –** अनावृत; नग्न
आच्छादन नसलेले; उपसर्गाप्रमाणे उपयुक्त संज्ञा.

**Psilophytinae** नग्नपादप वर्ग; सायलोफायटीनी
वाहिनीवंत अबीजी वनस्पती विभागातील ( नेचाभ पादप; टेरिडोफायटा ) प्रारंभिक वनस्पतींचा वर्ग; यातील

वनस्पती अत्यंत साध्या व मूलहीन असून बीजुककोश शाखांच्या वा उपशाखांच्या टोकास एकेकटे असतात; पाने फार लहान किंवा नसतात. यांच्यापैकी काहींचे जीवाश्म पूर्व व मध्य डेव्होनियन ह्या अतिप्राचीन काळातील खडकांत सापडतात; कदाचित त्यापूर्वी त्यांचा क्रमविकास होत आला असावा.

**Psilophytales** नग्नपादप गण; सायलोफायटेलीझ
वर सांगितलेल्या वर्गातील एक गण; ह्या सर्वच वनस्पती प्राचीन व जीवाश्म रूपातच आढळतात. उदा. ऱ्हिनिया, सायलोफायटॉन, ॲस्टरोझायलॉन हे व इतर काही वंश यात अंतर्भूत आहेत.

**Psilotales** सायलोटेलीझ
सायलोफायटीनी वर्गातील विद्यमान व फक्त दोन वंश असलेला ( सायलोटम व मेसिप्टेरिस ) गण; फक्त सायलोटमला खवल्यासारखी पाने असतात; बीजुककोशात २–३ कप्पे; द्विखंडी बीजुककोशपर्णे.

**psychrometer** आर्द्रतामापक
हवेतील ओलाव्याचे ( आर्द्रतेचे ) मापन करण्याचे साधन ( उपकरण ).

**psychrophytes** अतिशीतवनस्पति; शीतवासी पादप
जमिनीतील अतिथंड तपमानामुळे मुळांच्या शोषण-क्रियेत येणाऱ्या अडचणींशी समरस होणाऱ्या वनस्पती ( आल्पीय वनस्पती ).

**ptenophyllium** पानझडी वन
ठराविक काळात पाने गळणाऱ्या वृक्षांचा समावास.

**pterampelid** आरोही नेचा
वर चढत जाणारा कोणताही नेचा; उदा. लायगोडियम.

**pteratus** सपक्ष
पंख युक्त.

**Pterigraphia**
**Pteriodographia** } नेचे विज्ञान

**Pteridophyta** नेचाभ पादप ( वाहिनीवंत अबीजी वनस्पती ) विभाग; टेरिडोफायटा
शेवाळी व बीजी वनस्पती या दोन्हींच्या मध्ये (विकासाच्या दृष्टीने) असणारा गट. वाहिका आणि कधीकधी वाहिन्या असलेल्या (प्रकाष्ठ व परिकाष्ठ या घटकांनी बनलेले वाहक वृंद (गट) असलेल्या), परंतु बीजाचा अभाव असलेल्या नेचे ( pteris, pteridos ) व तत्सम वनस्पतींचा (नेचाभ) गट; पहा Tracheophyta.

**Pteridospermae ( Cycadofilicales )** बीजी नेचे गण; टेरिडोस्पर्मी. ( सायकॅडोफिलिकेलीझ )
बीजे धारण करणारा तथापि नेचाभ वनस्पतीशी साम्य असणारा प्राचीन (अश्मीभूत) वनस्पतींचा गट; याचा अंतर्भाव प्रकटबीज वनस्पतींत करतात. पुराजीव महाकल्पातील खडकात यांचे शिलारूप अवशेष आढळतात; प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे यांचेपासून बीजी वनस्पती विकास पावल्या असाव्यात असे काही शास्त्रज्ञ मानतात; प्रत्यक्ष त्यांचा उगम त्याच महाकल्पात प्रामुख्याने आढळणाऱ्या नेचांपासून झाला असावा अशीही विचारसरणी आढळते.

**pterigynous** सपक्ष
पंख असलेले.

**pterocarpus** सपक्षफली
पंखयुक्त फळे असलेली ( वनस्पती ); उदा. बिब्ळा ( *Pterocarpus marsupium* Roxb. ); रक्तचंदन ( *Pterocarpus santalinus* L. ).

**Pteropsida** टेरॉप्सिडा विभाग
पाणी व अन्नरस यांची ने–आण करणारे घटक ( वाहिका व वाहिन्या ) असणाऱ्या वनस्पतींच्या दोन विभागांपैकी एक; दुसरा विभाग लायकोप्सिडा; पहिल्या विभागात नेचे ( फिलिसीनी ), प्रकटबीज व आवृतबीज ( बीजी ) वनस्पतींचा समावेश होतो; मोठी पाने व त्यामुळे रंभात असलेली पर्णविवरे हे यांचे वैशिष्ट्य तर लहान पाने व पर्णविवरांचा अभाव हे दुसऱ्याचे वैशिष्ट्य; दुसऱ्या विभागात लायकोपोडिनी, एक्विसीटीनी व सायलोफायटीनी यांचा अंतर्भाव करतात. काहींच्या मते स्फेनोप्सिडा हा अधिक एक विभाग मानावा व त्यामध्ये एक्विसीटीनीचा समावेश करावा. सिनो यांच्या मते सर्व वाहिनीवंत वनस्पतींचा ( अबीजी व बीजी ) अंतर्भाव एका विभागात ( ट्रॅकिओफायटा ) करावा; तथापि असेही वर्गीकरण विवाद्य आहे. पहा Tracheophyta.

**pterospore** सपक्षबीजी पादप
पंखयुक्त बीजे असलेली वनस्पती; उदा. शेवगा.

**pterygium** पंख; पक्ष

**pterygospermous** सपक्षबीजी
पहा pterospore; उदा. शेवगा ( *Moringa pterygosperma* Gaertn. ).

**ptomaine** शविक-विष; टोमेन
रोगकारक सूक्ष्मजंतूंच्यापासून बनणारा विषारी क्षाराभ ( अल्कलॉइड ).

**ptyalin** टायलिन; लालाद्रव्य
स्टार्चसारख्या पिठूळ पदार्थाचे साखरेत रूपांतर करणारे लाळेतील वितंचक ( एन्झाइम् ) द्रव्य.

**ptyxis** दलवलन; पर्णवलन
कळीतील संरचना दर्शविणारी संज्ञा; पान किंवा पुष्पदल कळीमध्ये स्वतःभोवती गुंडाळलेले किंवा घडी पडलेले ( वळलेले ) असण्याचे भिन्न प्रकार; पहा prefoliation, prefloration, aestivation, vernation.

**puberulous** अल्पलोमश; सूक्ष्मरोमिल
फार थोडी लव असलेले ( पान, खोड, फुलातील भाग, फळ, बी, इ. ); उदा. आघाड्याचे पान, तुळशीचे प्रमुख अवयव.

**pubescence** लवदारपणा; लोमशत्व; रोमिलता
लवदार असण्याच लक्षण; उदा. कुंद *( Jasminum pubescence* Willd. *).*

**pubescent** लोमश; लवदार; मृदुरोमी
नरम व आखूड केस ( लव ) असलेले ( अवयव ); उदा. ऐसर ( ईश्वर ) ची फुले, फुलोरा; इ. लाल कमळ *( Nymphoea pubescence* Willd. ).

**pull-root** कर्षण-मूळ
स्वतः आकुंचन पावून खोडास जमिनीत खोलवर ओढून धरणारे मूळ; यावर आडवे कंगोरे दिसतात. उदा. अळू, केशर, नागदौना ( सुईशिरड ), इ.

**pullulation** मुकुलायन
कळ्या येणे; अंकुरणे. उदा. यीस्ट नावाचे कवक.

**pulp** गाभा; मगज; कल्क
फळांतील गीर ( रसाळ अथवा मांसल ); प्राण्यांतील नरम व मांसल भाग.

**—, paper** लगदा
कागद बनविण्यास लागणारा लाकडाचा किंवा चिंध्यांचा मऊ चोथा.

**pulsation** स्पंदन
कोशिकेतील ( नग्न चरबीजुके आणि प्राकलपुंज ) रिक्तिकांचे आकुंचन व प्रसरण; प्राण्यांतील हृदयाची तीच प्रक्रिया. पहा vacuole.

**pulverulent** भुरकट; चूर्णाभ; चूर्णिल; चूर्णी
भुकटी पसरल्याप्रमाणे दिसणारे; उदा. काही कवकातील बीजुके अथवा बीजुकसमूह.

**pulvinate** सपुलवृंत; स्थूलाधारी
पुलवृंत असलेले.

**pulvinus** पुलवृंत; स्थूलाधारिका
पानाच्या देठाच्या तळाशी असलेला फुगीर उशीसारखा भाग.

**pulvis** भुकटी; चूर्ण

**pumilus** खुजे; लघु
उदा. कवठी चाफा ( *Magnolia pumila* Andr. ).

**punctate** बिंद्वांकित; ठिपकेदार
अनेक ठिपके, सूक्ष्म खाचा अथवा अर्धपारदर्शक प्रपिंड असलेले.

**punctiform** बिंदुरूप
ठिपक्यासारखे.

**pungent** (१) तिक्त (२) तीक्ष्णाग्र
(१) तिखट चव असलेले;
(२) अणकुचीदार टोकाचे (पान); उदा. घायपात, युका, निवगूर.

**Punicaceae** दाडिमकुल; प्युनिकेसी
प्युनिका या शास्त्रीय नावाने ओळखल्या जाणाऱ्या एकाच वंशाचा अंतर्भाव असलेले कुल. याचा समावेश जंबुल गणात (मिर्टिफ्लोरीत) केला जात असे. हचिन्सन यांनी मेंदी (मेंदिका) गणात (लिथ्रेलीझमध्ये) हे कुल घातले आहे. ग्रॅनेटेसी या नावानेही हे कुल ओळखले जाते. डाळिंब (दाडिम) ही परिचित जाती या कुलातील फक्त दोन जातींपैकी एक आहे. प्रमुख लक्षणे : काष्ठयुक्त वनस्पती; पाने साधी, बहुधा समोरासमोर किंवा मंडलित; फुले द्विलिंगी, आकर्षक, नियमित; संदले व प्रदले सुटी, ५–७; केसरदले अनेक; किंजदले अनेक व जुळलेली; किंजपुट अधःस्थ; बीजके अनेक. बीजावरण रसाळ; मृदुफळात अपुष्क बीजे, डाळिंब ( *Punica granatum* L.).

**puniceous** किरमिजी
किरमिजी अगर गर्द लाल रंगाचे; डाळिंबी रंगाचे; डाळिंबाच्या फुलाच्या पाकळ्यांच्या रंगाचे.

**pure** शुद्ध; स्वच्छ; विशुद्ध
मिश्रण नसलेले.

**— culture** विशुद्ध संवर्धक
कोणत्याही अन्य सजीवाचा संपर्क न झालेला व विशिष्ट जीवाचे शुद्ध स्वरूपात संवर्धन केलेला द्रव अगर घन पदार्थ; उदा. यीस्ट ( किण्व ), सूक्ष्मजंतू, बुरशी,

आदिजीव, इत्यादींच्या कृत्रिम वाढीकरिता असे पदार्थ वापरतात.

**— forest** विशुद्धवन
एकाच जातीच्या वनस्पतींनी व्यापलेले जंगल. उदा. साळवन, चन्दनवन, सागवन, चीड ( पाईन ) वनं; आंबराई, चिंचेचे वन.

**— line** विशुद्ध संतति; शुद्ध वंशक्रम
स्वपरागणाने प्रजोत्पत्ती होऊन पिढ्यानपिढ्या चालू असलेली संतति.

**— strain** शुद्ध वाण
पहा strain.

**purity of gametes** गंतुकशुद्धी
व्यक्ती मिश्रगुणयुक्त असली तरी गंतुकात एकच गुण-घटक असण्याचा प्रकार; एखाद्या व्यक्तीच्या शरीर-कोशिकात त्याच्या आईबापाकडून आलेल्या वैकल्पिक गुणांपैकी ( उदा. खुजेपणा व उंची अथवा गुळगुळीत-पणा व सुरकुतलेपणा, इ. ) दोन्हींचे जनक घटक ( जनुके ) असले तरी तिच्या प्रजोत्पादक कोशिकात त्यांपैकी एकच असतो, म्हणजे प्रजोत्पादक कोशिका ( गंतुक ) शुद्ध असते.

**purpureus** जांभळे; नीलारुण
निळे व लाल यांच्या कमीअधिक मिश्रणाने बनलेला रंग; उदा. *Digitalis purpurea* L. = तिलपुष्पी.

**pustular** पिटकित
बारीक फोडाप्रमाणे पुटकुळ्या आलेले.

**pustule** पिटक; पुळी
सूक्ष्म उंचवट्यासारखा फोड.

**putamen** कवचकेंद्र; अष्ठि
आठळीतील कठीण साल. उदा. साग, बदाम, अक्रोड, नारळ, इ. पहा drupe, endocarp.

**pycnidium** गर्तिका; पलिघा
काही कवकातील व शैवकातील विशिष्ट प्रकारची बीजुके निर्माण करणारी पेल्यासारखी किंवा सुरईसारखी व अलिंग पद्धतीने कायकातच बनलेली पोकळी.

**pycnoconidium ( pycnogonidium, pycnospore )** गर्तिका-बीजुक
गर्तिकेत बनलेले बीजुक.

**pyrene** अष्ठिका; कपालिका
प्रत्येक बीजाभोवती स्वतंत्र कठीण कवच असलेल्या अनेकबीजी आठळी फळातील ( अश्मगर्भी फळातील ) एक मूळचे कवच विभागून बनलेली प्रत्येक आठळी. उदा. सप्तालू ( पीच ); घाणेरीं; शिवण; निर्गुंडी.

**pyrenoid** प्रकणु
कोशिकेतील वर्णकणूतील ( प्राकणूतील ) सूक्ष्म वर्णहीन, गोल कण. अनेकदा याभोवती पिष्टकण बनतो; उदा. शैवले.

**Pyrenomycetes** पलिघ-कवक; पायरिनोमायसेटीज
पलिघ प्रकारचे घानीफल निर्मिणाऱ्या कवकांचा गट ( उपवर्ग ); उदा. अर्गट रोग. पहा perithecium; ascus.

**pyriform** कुंभाकृति
पीअर फळासारखा आकार असलेले.

**pyrophilous** दग्धभूवासी
नुकत्याच जळून गेलेल्या जमिनीवर वाढणारी (वनस्पती).

**pyroxylophilous** दग्धकाष्ठवासी
जळलेल्या लाकडावर वाढणारी ( वनस्पती ).

**pyxidate ( operculate )** सापिधान
झाकणी असलेले; उदा. घोळ, कुरडू व निलगिरी यांची फळे.

**pyxidium ( pyxis )** करंड फल
लहान करंड्याप्रमाणे तळ व झाकणी असणारे व तसेच तडकणारे फळ; उदा. कुरडू; शेवाळीतील बीजुकाशय.

## Q

**quadrangular** चौधारी
चार धारा असलेले; उदा. कांडवेलीचे खोड ( *Vitis quadrangularis* Vahl. ).

**quadrant** चतुर्थ
फलित अंडुकाच्या विभागणीतील एक चतुर्थांश भाग.

**quadrat** चौकोन; चतुष्कोणक
बहुधा प्रत्येकी एक मीटर बाजू असलेला, चौरस आकाराचा, त्यातील वनश्रीच्या संघटनेचा अभ्यास करण्याकरिता राखून ठेवलेला भूभाग.

**—, permanent** स्थायी चौकोन
वर्षानुवर्षे अनुसंधानाकरिता राखून ठेवलेला कायम चौकोनी भूभाग.

**quadri** चतुः-
चारीच्या संबंधी उपसर्ग.

**quadrifid** चतुर्भागी
चार भागांचे बनलेले.

**quadrifoliate** चतुर्दली

चार दले स्पष्ट असलेले; उदा. संयुक्त पान (*Marsilea quadrifolia* नावाचा एक जलनेचा).

**quadrifurcate** चतुःशाखी

चार शाखांत विभागलेला (अक्ष).

**quadrilobate** चतुःखंडी

चार तुकडे (खंड) पडलेले (पान, फळ).

**quadrilocular (four-celled)** चतुष्पुटक

चार कप्पे असलेले (फळ, किंजपुट, परागकोश); उदा. तिळाचा किंजपुट; सायकसचा परागकोश; तुळशीचे फळ.

**quadrinucleate** चतुष्प्रकली

चार प्रकले असलेली (कोशिका); उदा. गदाकोशिका (बीजुक तयार होण्यापूर्वी) अथवा यीस्ट (किण्व) ची धानीकोशिका.

**quadrivalent** चतुःसंयोजी

(१) चार कोशिका निर्मिणारी (कोशिका).

(२) चार रंगसूत्रे एकत्र असलेले.

**qualitative** गुणात्मक

प्राणी अथवा वनस्पती यांच्या एखाद्या जातीतील प्रकारात असलेले न मोजता येण्यासारखे (भेद); उदा. रंग, फुलांचा वास, फळांची चव, बियांचे रंग, इ. प्राण्यांतील क्रौर्य व चापल्य.

**quantitative** परिमाणात्मक

वनस्पतींतील (अथवा प्राण्यांतील) जातींच्या प्रकारात असलेले (मोजमाप करता येण्यासारखे) भेद; उदा. उंची, वजन, पानाचे खंड, फुलाच्या पाकळ्या; प्राण्याच्या पायाची बोटे, आकारमान, पिलांची संख्या इ.

**quiescent** निश्चल; सुप्त

निष्क्रिय अवस्थेतील सजीव.

**quill** शल

कठीण, निमुळत्या टोकाचा लहान शूल, दंड (अक्ष). किंवा अवयव. quillwort = शलपर्ण; पहा Isoetales.

**quincuncial** विपरिहित

पुष्पदलांच्या (कळीतील) मांडणीतील एक प्रकार; यामध्ये दोन पाकळ्या पूर्णपणे बाहेर, दोन पूर्णपणे आत व एका पाकळीची एक किनार आतील पाकळीच्या किनारीवर व दुसरी किनार बाहेरच्या एका पाकळीच्या किनारीखाली असते; यामुळे या सर्व पाकळ्या २, १, ५, ३, व ४ ह्या अनुक्रमाने जोडल्यास फिरकीप्रमाणे संरचना बनते (उदा. गुलाब).

**quincunx** पंचराश्यंतर

पत्त्याच्या डावातील 'पंचा' प्रमाणे किंवा फाशा (समघन) वरील पाच टिंबाप्रमाणे (चार कोपऱ्यास चार टिंबे व मध्ये एक टिंब याप्रमाणे) मांडणी; झाडांची मांडणी कधी याप्रमाणे करतात.

**quinine** क्विनीन; कोयनेल

कोयनेलच्या (सिंकोना) झाडाच्या सालीतील क्षाराभ (अल्कलॉइड); सिंकोनाच्या व रेमिजियाच्या इतर जातीतूनही हे उपलब्ध होते; हा त्या वनस्पतीतील उत्सर्ग होय; उदा. *Cinchona officinalis* L.; *Remijia* sp.

**quinquefoliate** पंचपर्णी

पाच पाने असलेले; उदा. *Panax quinquefolius*.

**quinquefoliolate** पंचदली

पाच दले असलेले संयुक्त पर्ण.

**quintuplinerved** पंचशिरी

पाच प्रमुख शिरा असलेले (पान); उदा. एरंड.

## R

**race** प्रजाति

बीजापासून प्रजोत्पत्ती करण्याइतके स्थिर प्रकार किंवा त्या व्यक्तींचा लहान गट.

**—, adaptive (biological)** अनुकूलित (जैव) प्रजाति

फक्त क्रियावैज्ञानिक फरक दर्शविणारा प्रकार; आकारवैज्ञानिक फरकांचा येथे अभाव असतो.

**—, physiological** क्रियात्मक प्रजाति

शरीरक्रियेत फरक असणारा त्याच जातीतील व्यक्तींचा लहान गट.

**raceme** मंजरी; मंजिरी

फुलोऱ्याचा एक प्रकार; यामध्ये मुख्य अक्ष टोकाकडे सतत वाढत राहून बाजूस फुले येतात; सर्वात कोवळे फूल टोकाकडे व जून खाली तळाकडे याप्रमाणे क्रम (अग्रवर्धी) असतो; फुलांना देठ असतात. उदा. संकेश्वर, बाहवा, इ.; यामध्ये फुलांचे देठ सारख्या लांबीचे असतात असे नाही; पहा corymb; racemose.

**racemose** अकुंठित

पहा indefinite.

**rachis (rhachis)** पर्णाक्ष
संयुक्त पानाची दले धारण करणारा अक्ष.

**rachilla** उपाक्षिका; प्राक्षिका
लहान पर्णाक्ष किंवा लहान उपाक्ष; पुष्पके धारण करणारा अक्ष; उदा. गवते, लव्हाळे, इ.

**radial** अरीय
केंद्रापासून निघालेले; त्रिज्येच्या दिशेने असलेले.

**— bundle** अरीय वृंद
प्रकाष्ठ व परिकाष्ठ भिन्न त्रिज्येवर असलेला वाहक वृंद; उदा. बहुतेक मुळे.

**— dot** अरीय बिंदू
पहा casparian dot.

**— plane** अरीय प्रतल
केंद्रातून त्रिज्येच्या दिशेत व पृष्ठाशी काटकोनात असणारी पातळी.

**— section** अरीय छेद
त्रिज्येतून जाणाऱ्या उभ्या पातळीने काढलेला काप.

**— symmetry (radiosymmetry)** अरसममिती, अरीय सममिती; अरसमात्रता
वस्तूच्या केंद्रातून जाणाऱ्या व कोणत्याही व्यासाला समांतर व उभ्या अशा दोन्हीपेक्षा अधिक पातळ्यांनी दरवेळी दोन सारखे भाग होण्यासारखी संरचना; उदा; मक्याचे खोड.

**— wall** अरीय भित्ति
त्रिज्येशी समांतर भिंत ( कोशिकावरण ).

**— ly symmetrical** अरसमात्र; अरीय सममित
वर वर्णन केलेली अरसमात्रता असणारा ( अवयव ); उदा. गुलाबाचे फूल, अनेक मुळे, खोडे व फळे; पहा actinomorphic.

**radical** मूलज
मुळापासून जमिनीवर निघालेली अथवा मुळाच्या माथ्यावरील संक्षिप्त खोडापासून निघालेली किंवा जमिनीतील खोडापासून झुबक्यात वर येणारी (पाने); उदा. मुळा, बीट, गाजर, नागदवणा, निशिगंध यांची पाने.

**radicicolous** मूलस्थित
मुळाच्या माथ्यावर उगवलेले ( उदा. फूल ), अथवा मुळातच वस्ती करून असणारे ( उदा. सूक्ष्मजंतू; *Rhizobium radicicola* ).

**radicinus** मूलाभ
मुळासारखे ( स्वरूप, कार्य, इ. ).

**radicle** आदिमूल; मूलांकुर
बीज रुजून त्यातून आलेला मोड. काही अबीजी वनस्पतीतील मुळाचे कार्य करणारा प्रारंभिक अवयव.

**radicose** (१) बहुमूली; (२) गुरुमूली
( १ ) अनेक मुळे किंवा ( २ ) मोठी मुळे असलेली ( वनस्पती ); उदा. शतावरी, डेलिया, टॅपिओका, कणगर, गुल्बुश, इ.

**radicular** आदिमूलीय; मूलांकुरीय
आदिमूलासंबंधी; पहा radicle.

**radiculiformis** आदिमूलाकृति
आदिमूलासारख्या आकाराचे.

**radiculose** उपमूळधारी
अनेक उपमुळे ( मुख्य मुळावरच्या शाखा ) असलेले.

**radius (ray)** त्रिज्या; अर; किरण
उदा. ( १ ) सूर्यफूल कुलातील स्तबक फुलोऱ्यातील परिघाजवळचे भिन्न पुष्पक; ( २ ) चामर कुलातील संयुक्त चामर फुलोऱ्यातील एक; ( ३ ) निकाष्ठ-किरण.

**rain- forest** वर्षावन; वर्षारण्य
भरपूर पावसामुळे वाढलेले दाट जंगल; उदा. सह्याद्रीवरील दाट सदापर्णी जंगल; यात काही पानझडी झाडेही असतात; कमीजास्त मोसमी पावसामुळे सदापर्णी किंवा पानझडी अशी दोन्ही प्रकारची जंगले बनतात.

**— —, hot** सदापर्णी वर्षावन
विषुववृत्ताभोवतीच्या पट्ट्यातील सदैव हिरवी पाने असलेल्या झाडांचे जंगल; उदा. अमेझॉन व काँगो यांच्या खोऱ्यातील वने.

**— —, tropical** उष्णकटिबंधीय वर्षावन
विषुववृत्ताच्या उत्तरेस किंवा दक्षिणेस २३° २७′ अक्षांशाच्या पट्ट्यातील वरच्याप्रमाणे वन.

**rain-leaf** पर्जन्यपर्ण
पावसाचे पाणी खाली ठिबकून जाण्यास सोयीचे लांबट टोक (प्रकुंचित) असलेले पान. उदा. पिंपळ.

**ramal (rameous)** शाखीय
फांदीवरील; शाखेवरचे ( पान, फूल, मूळ, इ. ).

**ramentum (pl. ramenta)** तनुशल्क
पातळ खवल्यासारखा अपित्वचेवरचा केस; उदा. नेचे.

**ramentaceous** तनुशल्की
तनुशल्क असलेले.

**Ramie** रॅमी
 ऱ्हीया वनस्पतीचा तंतु; *Boehmeria nivea* Hook and Arn.=Rhea.

**ramiferous ( ramose )** शाखायुक्त
 फांद्या (शाखा) असलेले.

**ramification** शाखीभवन; शाखायन; शाखाविन्यास
 शाखांची मांडणी; शाखायुक्त बनणे.

**ramiform** शाखाकृति; शाखी
 शाखेप्रमाणे आकाराचे; शाखा असणारे.

**ramiparous** शाखोत्पादक
 शाखा निर्मिती करणारे.

**ramose ( ramous )** बहुशाखी
 अनेक शाखा असलेले ( क्षुप ).

**ramosissimous** अतिशाखी
 फारच शाखा असलेली ( ओषधी किंवा क्षुप ).

**ramulus** उपशाखा
 लहान शाखा.

**ramunculus ( twig )** अंत्यशाखा; अंतिम शाखा
 अनेक शाखायुक्त असलेल्या अक्षाची लहानात लहान ( शेवटची ) शाखा ( टहाळ ).

**ramus** शाखा; फांदी

**random mating** यदृच्छ संयोग; स्वैर संगम
 दोन किंवा अधिक भिन्न जनुकयुक्त नर-गंतुकांचा दोन किंवा अधिक प्रकारच्या स्त्री-गंतुकांशी होणारा संभाव्य संयोग ( युति, मीलन ); यातून भिन्न जनुकयुक्त अनेक रंदुकांची व त्यातून विकास पावणाऱ्या संततीची निर्मिती होत.

**range** कक्षा; पल्ला
 कमीतकमी व जास्तीत जास्त मूल्यांमधील अंतर; उदा. उष्णतामान, पाण्याची खोली; एखाद्या वनस्पतीची निसर्गतः वस्ती करण्याचे क्षेत्र; एखाद्या क्षेत्रातील किमान व कमाल पर्जन्यमानातील किंवा तापमानातील फरक.

**rank** पद
 वर्गीकरणातील एखाद्या गटाचा दर्जा; उदा. कुलाचा किंवा गणाचा दर्जा.

**Ranales** मोरवेल गण; रॅनेलीझ
 बेंथॅम आणि हूकर यांच्या वर्गीकरण पद्धतीप्रमाणे हे द्विदलिकित वनस्पतींचे गोत्र असून त्यात मोरवेल कुल चंपक कुल, सीताफळ कुल, गुडूची कुल व कमल कुल यांचा समावेश गण या संज्ञेने होतो; बेसींच्या पद्धतीत मोरवेल गणात ह्या कुलांशिवाय तमाल कुल, जाति फल कुल व मिरी कुल यांचाही अंतर्भाव आहे; हचिं-सनांनी फक्त मोरवेल कुल व कमल कुल यांचा समावेश केला आहे. या गणातील काष्ठयुक्त वनस्पती प्रारंभिक व ओषधीय वनस्पती विशेषत्व पावलेल्या आहेत. पुष्पदलांची सर्पिल मांडणी, मुक्त व अबकिंज किंजपुट, सुटी परिदले इत्यादी लक्षणे येथे आढळतात.

**Ranunculaceae** मोरवेल कुल; रॅनन्क्युलेसी
 काळे जिरे, बाळकडू, मोरवेल, अतिविष, बचनाग इत्यादी वनस्पतींचे ( द्विदलिकित ) कुल; याचा अंतर्भाव मोरवेल गणात ( रॅनेलीझमध्ये ) करतात. प्रमुख लक्षणे : ओषधीय वनस्पती; बहुधा विभागलेली पान; द्विलिंगी, नियमित, क्वचित् एकसमात्र फुले; सर्पिल ते चक्रीय परिदले; क्वचित संदले व प्रदले भिन्न; केसर-दले अनेक; किंजदले ऊर्ध्वस्थ, एक ते अनेक, सुटी; बीजके एक; बोंड किंवा पेटिका फळ; क्वचित् मृदुफळ; बिया तेलकट व पुष्कयुक्त.

**rapaceous** तर्कुरूप; लुंठसम
 मध्ये फुगीर व गोल आणि दोन्ही टोकांस निमुळते; पहा fusiform.

**raphe** संधिरेषा
 ( १ ) अधोमुख बीजकाशी चिकटून असलेला लांबट कंगोऱ्यासारखा बीजबंध ( बीजकाचा देठ ); उदा. सूर्यफूल. ( २ ) करंडक वनस्पतीच्या कोशिकावरणावर असलेली भेग; यातून होणाऱ्या जीवद्रव्याच्या हाल-चालीने कोशिका सरपटत जाते व मागेपुढे सरकते.

**raphide** सूचिस्फटिक
 सुईसारखे स्फटिक ( कॅल्शियम ऑक्झलेट ); उदा. गोंडाळ, कोरफड, कांडवेल इत्यादींच्या पानांतील कोशिकात अनेक स्फटिकांची जुडी असते; पहा sphaeraphide.

**ratoon** मूलोद्भव
 छाटून टाकलेल्या मुळापासून आलेला प्ररोह (पल्लव).

**raw humus** कच्चा ( अपूर्ण ) कुजात
 जैव अवशेषाचे पूर्ण रूपांतर न झालेला प्रकार; पहा humus.

**ray** किरण; रश्मी; अर
 दंडाकृति अक्षातील त्रिज्येशी समांतर असा मृदूतकाचा भाग; रंभातील अवाहक ऊतक.

**— floret** किरण-पुष्पक
स्तबक (गुच्छासारख्या) फुलोऱ्यावरचे परिघातील फूल; उदा. सूर्यफूल, शेवंती, सहदेवी इ.

**— , medullary** निकाष्ठी-किरण; निकाष्ठ-किरण
निकाष्ठाचा (भेंडाचा) इतर ऊतकांमधून जाणारा किरणासारखा पदर. ऊतककरापासून द्वितीयक प्रकाष्ठ व परिकाष्ठ यातून जाणारा मृदूतकाचा उभा थर; हा द्वितीयक निकाष्ठ-किरण असून तत्पूर्वी मध्यत्वचेतून जाणारा प्राथमिक निकाष्ठ-किरण असतो.

**— tracheid** अरवाहिका
त्रिज्येच्या दिशेने जाणाऱ्या वाहक ऊतकातील घन-कोशिका; ही त्रिज्येशी समांतर असून तिच्यावर अनुलिप्त खाचा असतात; उदा. पाइन (चीड, चिल).

**reaction** (१) प्रतिक्रिया; (२) विक्रिया
(१) चेतकामुळे घडून येणारा बदल अथवा प्रतिसाद-रूप क्रिया; वसतिस्थानावर घडलेला वनस्पतींच्या समावासाचा परिणाम.
(२) रसायनशास्त्रात ही संज्ञा रासायनिक बदलाकरिता वापरतात.

**— time** प्रतिक्रिया काल
चेतकाला प्रतिसाद देण्याला लागलेला अवधी.

**recapitulation** पुनरावर्तन
त्याच अवस्थांतून पुन्हा जाणे.

**— hypothesis** पुनरावर्तन गृहीतक

**— theory** पुनरावर्तन सिद्धांत
प्रत्येक सजीव व्यक्ती आपल्या जातीच्या क्रमविकासात ज्या अवस्थांतून गेली असावी त्याच अवस्थांतून स्थूलमानाने ती आपल्या व्यक्तिगत विकासामध्ये जात असते अशी क्रमविकासाच्या (उत्क्रांतीच्या) सिद्धांताला पुरावा म्हणून प्रथम मानलेली कल्पना (उपपत्ती); आता सिद्धांतरूपाने मान्य झाली आहे. व्यक्तिविकासात जातिविकासाची संक्षिप्तपणे पुनरावृत्ती होते, कारण व्यक्तिविकासाला सापेक्षतः फारच कमी वेळ मिळतो. पहा Phylogeny; ontogeny.

**receptacle** (१) पुष्पासन; (२) आशय (३) आधानी
(१) अनेक लहान फुले धारण करणारा अक्षाचा लांबट, सपाट, खोलगट किंवा घुमीर भाग; उदा. सूर्यफूल कुल; (२) कित्येक कवकांत आढळणारा बीजुकधारी भाग; उदा. पीठिका; धानीफल; पलिघा; शैवाकातील प्रजनी-जनक; बीजकाधानी; पुष्पस्थली (३) काही शेवाळीतील जननेंद्रिये धारण करणारा अवयव; नेचांतील बीजुककोश धारण करणारी आधारभूत संरचना. पहा Torus, placenta, stroma, soredium, pycnidium.

**receptacular** पुष्पासनीय; पुष्पस्थलीय
फुलातील पुष्पासनावर आधारलेले; पुष्पासनासंबंधी; पुष्पस्थलीसंबंधी;

**— theory** पुष्पस्थली सिद्धांत
ऊर्ध्वस्थ किंजपुटापासून अधःस्थ किंजपुटाचा क्रमविकास झाला असून त्यामध्ये पुष्पस्थली (पुष्पासन) ऊर्ध्वस्थ किंजपुटाला वेढून वाढण्याची प्रक्रिया असते अशी एक उपपत्ती. पहा appendicular theory.

**receptive** ग्राही; आदायी; ग्रहणशील
ग्रहण करण्याची (स्वीकारण्याची) क्षमता असलेला (अवयव; भाग; किंजल्क; इ.).

**— body** ग्राही काय
ग्रहणशील कणासारखा भाग.

**receptiveness (receptivity)** ग्रहणशीलता, आदायित्व; ग्राहकता
ग्रहण करण्याची क्षमता (सामर्थ्य).

**receptor (recipient)** ग्राहक; ग्राही
ग्रहण करणारा (अवयव, भाग).

**recessive** अप्रकट; अप्रभावी
एका पिढीतून दुसऱ्या पिढीत गुणदोषांचे अनुहरण होताना काही गुणदोष (लक्षणे) संततीत तांबडतोब न दिसता सुप्त (अप्रकट) राहून, त्यापुढच्या पिढीत अनुकूल परिस्थितीत दिसू लागतात म्हणून ती अप्रकट मानतात; त्यांना जी पर्यायी लक्षणे (जी लागलीच दिसतात) ती प्रकट किंवा प्रभावी ठरतात. पहा dominant.

**reciprocity** अन्योन्यता; परस्परता
एकमेकात देवघेवीच्या तत्त्वावर संबंध असण्याची स्थिती; उदा. फूल व कीटक यांचे संबंध; वनस्पती व प्राणी यांचे संबंध; पहा symbiosis.

**reciprocal** अन्योन्य; पारस्परिक; व्युत्क्रमी
दोन सजीव एकत्र जीवन काढीत असतांना त्यांचा एकमेकांशी देवघेवीचा संबंध अथवा व्यवहार. उदा. शैवाक; कवकमूल संबंध; पहा Lichen.

**— hybrids** अन्योन्य संकरण

दोन जाती अथवा प्रकार यांमध्ये दोन प्रकाराने घडवून आणलेली संकरप्रजा; एकदा एक जातीतील नर व दुसऱ्यातील मादी व त्यानंतर पहिल्या जातीतील मादी व दुसऱ्यातील नर असे संबंध घडवून केलेली ( संतती ) किंवा संकरण निर्मिती.

**reclinate** अववलित

कळीमध्ये पानाचा टोकाकडून तळाकडे दुमडून असण्याचा प्रकार; पहा ptyxis.

**recolonisation** पुनर्वसन; पुनर्वसाहतीकरण

एखाद्या क्षेत्रातील वनस्पतीसमुदाय नाश पावल्यावर पुनरपि तेथे वसाहत (समुदाय) स्थापन होण्याची प्रक्रिया (घटना).

**recombination** पुनस्संयोजन

संकर प्रक्रियेत संकरजात एकत्र आलेल्या अनेक गुणघटकांचे संकरजांच्या अंतःप्रजननामुळे पुढील पिढीत भिन्नप्रकारे (प्रभावी व अप्रभावी लक्षणांच्या रूपाने) मिश्रण होण्याचा प्रकार; याचा पहिला अनुभव ग्रेगर मेंडेल या शास्त्रज्ञांना आला; पहा Mendelism.

**recombinant** पुनस्संयोजी

पुनरपि नवीन मिश्रण होणारे (घटक).

**reconstruction** पुनर्रचना; पुनर्घटना

जीवाश्मस्वरूपात इतस्ततः आढळणाऱ्या प्राचीन वनस्पतींच्या (किंवा प्राण्यांच्या) भिन्न अवयवांचा अभ्यास करून संपूर्ण वनस्पतीची (किंवा प्राण्याची) पूर्ण कल्पना देणारी आकृती ( चित्र किंवा प्रत्यक्ष प्रतिकृती ) बनविणे.

**rectivenius (rectinerved)** सरलसिराल; समांतरसिरी

समांतर शिरा असलेले ( पान ) ; उदा. गवते, घायपात.

**red alga** लाल शैवल

पहा Rhodophyceae.

**red snow** लाल हिम; लाल बर्फ

एका हरित शैवलामुळे ( *Haematococcus nivalis* Agardh. ) लाल ठिपके पडल्याप्रमाणे दिसणारा बर्फाळ भाग.

**reduced** (१) न्यूनीकृत; अर्धसूत्रित (२) ऱ्हसित; न्यूनित

१ ) द्विगुणितापासून एकगुणित झालेली ( रंगसूत्रांची संख्या ).

२ ) विकसनात अपूर्ण राहिलेला ( अवयव ); क्रमविकासात संख्येत ( उदा. केसरदले, किंजदले, परिदले इ. ) किंवा आकारमानात ( उदा. भिन्न अवयव, उंची, पानांचा आकार, इ. ) कमीपणा आलेला; उदा. बटाट्याचे प्ररोह ऱ्हसनाने ग्रंथिक्षोड झालेले असावे असे मानतात.

**reduced apogamy** न्यूनित अनिषेकजनन; न्यूनित अयुग्मता

पहा apogamy.

**— fertilisation** ऱ्हासित फलन ( निषेचन ); न्यूनीकृत फलन

नर-व स्त्री-गंतुकांच्या किंवा प्रकलांच्या संयोगापासून होणाऱ्या नित्य फलनाऐवजी अन्य प्रकले ( उदा. दोन स्त्री-प्रकले ) एकत्र होण्याची प्रक्रिया.

**reduction** ऱ्हसन; न्यूनीकरण; क्षपण

वर reduced येथे वर्णिलेली प्रक्रिया; रसायनशास्त्रात क्षपण ही संज्ञा हायड्रोजन अणू मिळविणे किंवा ऑक्सिजन अणू घालविणे असा सामान्यपणे होणारा प्रकार.

**reduplicate** बहिर्वक्र धारास्पर्शी; वक्रधारास्पर्शी

फुलांच्या कळीतील पुष्पदलांच्या मांडणीचा एक प्रकार; यांमध्ये संदले किंवा पाकळ्या परस्परास फक्त किनारींनी ( कडांनी ) स्पर्श करतात परंतु तत्पूर्वी प्रत्येक दल बाहेर वळलेले असते; उदा. गुलखेराची संदले; बटाट्याच्या कुलातील फुलांच्या पाकळ्या.

**reduplication** पुनर्द्विगुणन

१) मूळच्या अवयवांच्या संख्येत नवीन अवयव त्याच धर्तीवर बनल्याने संख्यावाढ होणे उदा. पाकळ्या, किंजदले, केसरदले इत्यादींची मंडले.

२) रंगसूत्राच्या एकगुणित संचात एखाद्या रंगसूत्राचा भाग (खंड) दोनदा येण्याचा प्रकार.

३) संलग्नता व विलग्नता या पूर्वीच्या संज्ञाकरिता ही वापरतात; पहा linkage, repulsion.

**reflexed** बहिर्नत; बहिर्वलित; बहिर्वक्र

एकदम बाहेर वळलेला ( अवयव ); खाली किंवा मागे वाकलेला; उदा. काही केसरदले; गुलाबाची संदले; सूर्यफूल ( छदमंडल ).

**reg** जलोढ मरुस्थल

अल्जीरियातील गाळाच्या जमिनीचे रुक्ष मैदान.

**regeneration** पुनर्जनन; पुनरुद्भवन

जखम झाल्यावर किंवा अवयव कापून टाकल्यावर

तेथील शेष पृष्ठभागापासून नवीन शाकीय अवयवांचे उत्पादन; उदा. जंगलातील झाड तोडून राखलेल्या बुंध्यावर नवीन प्ररोह (फांद्या) येऊन झाड पुन्हा वाढण्याची घटना; कलमावर मुळे फुटणे; वनस्पतीत किंवा (प्राण्यात) नाहीसा झालेला अवयव पुन्हा प्राप्त होणे; सर्व जंगल किंवा गवताळ प्रदेश (जळल्यानंतर) पुन्हा निर्माण होणे. पहा reparation.

**regermination** पुनरंकुरण

स्थगित झालेले अंकुरण पुन्हा सुरू होण्याची प्रक्रिया.

**region** प्रदेश

काही विशिष्ट प्रकारांनी ( जातींनी ) व्यापलेला प्रदेश.

**— botanical** वानस्पतिक प्रदेश

विशिष्ट परिस्थितीशी संबंधित असे वनस्पतिप्रधान प्रदेश. उदा. उष्णकटिबंधीय वर्षारण्य; समशीतोष्ण तृणक्षेत्र; विषुववृत्तीय वर्षावन.

**regional** प्रादेशिक

विशिष्ट प्रदेशातील; प्रदेशासंबंधी.

**— distribution** प्रादेशिक प्रसार

परिस्थितिसापेक्ष विशिष्ट प्रदेशातच ( काही वनस्पती अथवा प्राणी यांचा ) प्रसार, उदा. सागाची किंवा सालाची वने; हिमालयातील शंकुमंत वने.

**regma** पालिस्फोटी फळ

तडकून तीन किंवा अधिक एकबीजी व स्फोटक फलांश ( कुडी फळ ) बनविणारे शुष्क फळ; उदा. एरंड, मोगली एरंड, जंगली एरंड, भद्रदंती; इ. हे फळ ऊर्ध्वस्थ, त्रिपुटक किंजपुटापासून बनलेले असते.

**regression** परागति; घट

प्रगतीऐवजी उलट प्रक्रिया; उदा. प्रगत अवयवाऐवजी तत्पूर्वीचा कमी दर्जाचा अवयव बनणे; पाकळ्याऐवजी संदले; केसरदलाऐवजी पाकळ्या.

**regressive evolution** प्रतिगामी क्रमविकास

वनस्पती अथवा प्राणी यांच्या सद्यःस्थितीत, त्यांच्या पूर्वजांशी तुलना केल्यास, आढळणारा अप्रगत (ऱ्हास दर्शविणारा ) बदल. हा बदल काही लक्षणांत ( उदा. उंची, आकारमान, संरचना, संख्या, प्रसार, इ. ) विशेषेकरून आढळतो. उदा. काही वनस्पती कुलांत परिदलांचा आकार व संख्या यात परागति दिसते ( उदा. मिरी–कुल ) तर काही कुलात वृक्षाऐवजी ओषधी अधिक ( उदा. सूर्यफूल कुल ) पण संख्या व प्रसार यात प्रगति आढळते ( पहिला क्रमांक). तृण कुलात फुलांच्या संरचनेत परागति आहे परंतु संख्या व प्रसार यामध्ये गवतांचा दुसरा क्रमांक लागतो.

**— succession** प्रतिगामी अनुक्रमण

चरमावस्थेप्रत न नेणारा पादपसमुदायातील बदल.

**regular** नियमित

आकार व संरचना यामध्ये समात्रता असणारे (फूल); पहा actinomorphic.

**regulation** नियमन

प्रतिकूल परिस्थितीतही नित्य स्थिती व शरीरकार्ये चालू ठेवण्याची क्षमता.

**—, auto- ( self )** स्वनियमन

स्वतःच्या जबाबदारीवर नियमन ( नियंत्रण ) चालू ठेवण्याचा प्रकार.

**rejuvenation** पुनरुज्जीवन; पुनर्युवीकरण; पुनर्युवन

विद्यमान कोशिकेतील जीवद्रव्यापासून नवीन एक नग्न कोशिका बनविण्याची प्रक्रिया. उदा. काही शैवल वनस्पतींची गंतुके व बीजुके.

**remains ( relic )** अवशेष

विनाशक प्रक्रियेतून उरलेले ( शेष ) अथवा वाचलेला भाग.

**reniform** मूत्रपिंडाकृति; वृक्काकार

मूत्रपिंडाप्रमाणे ( काजूच्या फळाप्रमाणे ) एका बाजूस ( तळाशी ) खाच असलेले व दुसऱ्या बाजूस ( टोकाकडे ) गोलसर असलेले ( पान, फळ, बी, इ. ); उदा. ब्राह्मीचे पान; उंदीरकानी ( *Ipomea reniformis* Chois. ).

**reorientation** पुनर्विन्यास; पुनःस्थापन

अवयवांच्या सापेक्ष स्थितीत बदल; उदा. आमरांची फुले; काही फुलातील केसरदले व किंजदले यांची परागणानंतर पूर्व स्थिती बदलते; उदा. भारंगी; सॅल्व्हिया.

**reparation** पुनर्वर्धन; हानिपूर्ति

नाश पावलेला अवयव, तेथेच पुन्हा नवीन बनणे; उदा. मुळाचे टोक फार थोडे तुटले असल्यास नवीन येणे, चिरले गेले असल्यास दोन नवीन टोके येणे.

**repent (repens)** प्रसर्पी

रांगते व मुळांनी चिकटून राहणारे खोड असलेली ( वनस्पती ); उदा. केसर ( *Jussiaea repens* L. ).

**repetition** पुनरावृत्ति
पुन्हा घडून येण्याची प्रक्रिया.

**replum** छद्मपट; आभासी पट (पडदा)
काही वनस्पतींच्या किंजपुटात नंतर बनणारा पडदा; बीजकाधानी याला चिकटून राहिल्याने फळाची झडपे अलग होतात. उदा. मोहरीचे (सार्षप) फळ; पहा siliqua.

**reproduction** प्रजोत्पादन; पुनरुत्पादन; जनन
विद्यमान (ह्यात असलेल्या) व्यक्तींपासून शाकीय, अलिंग किंवा सलिंग पद्धतीचा अवलंब करून नवीन त्यासारखी व्यक्ती (संतती) निर्माण होण्याची प्रक्रिया (घटना).

**reproductive** जनक, पुनरुत्पादक, प्रजोत्पादक
नवीन संतती निर्माण होण्यात भाग घेणारा (अवयव किंवा कोशिका); उदा. बीज, बीजुक, गंतुक, रंदुक, इ.

**— bud** कलिका, मुकुलिका
प्रजोत्पादक अवयव निर्मिणारी कळी (फुलाची कळी; पुष्पकलिका); प्रजा (संतती) निर्माण करणारी सूक्ष्म संरचना (उपांग, अवयव, कंदिका, इ.).

**— cell** जनन-कोशिका
संतती निर्माण करण्याची क्षमता असलेला शरीरातील सर्वांत लहान घटक; उदा. गंतुक, बीजुक, रंदुक, विबीजुक इ. पहा gamete.

**— organ** जननेंद्रिय; जनक अवयव
प्रजोत्पादनात प्रत्यक्ष भाग घेणारा किंवा तत्सम काय निर्माण करणारा व विशेषत्व पावलेला अवयव; उदा. अंदुकाशय; अंदुककलश; केसरदल; किंजदल; धानी; गदाकोशिका; इ. इ.

**— phase** जननावस्था
प्रजोत्पादनाची अवस्था.

**— shoot** जनन-प्ररोह
प्ररोहाच्या दोन प्रकारांपैकी प्रजोत्पादक अवयव असलेला भाग; शंकु, फूल, इ. पहा vegetative.

**— system** जनन-तंत्र (व्यूह)
प्रजोत्पादनात भाग घेणाऱ्या सर्व अवयवांचा व्यूह (संस्था) अथवा संच.

**repulsion** प्रतिकर्षण; विलग्नता
सजीवांचे किंवा त्यांच्या वैकल्पिक लक्षणांचे परस्परांना टाळणे. जनकाकडून (आईबापाकडून) आलेल्या भिन्न वैकल्पिक लक्षणांच्या घटकांचे संततीत उतरताना स्वतंत्र व्यवस्थापन होण्याऐवजी, भिन्न जनकांतून, काही घटक अनेकदा एकत्रपणे संततीत उतरतात, त्यास 'संलग्नता' (coupling) म्हणतात; तसेच कधी भिन्न जनकांतून आलेले भिन्न वैकल्पिक घटक पुढे परस्परांशी होणारी नवीन युति टाळतात; याला 'विलग्नता' म्हणतात; दोन्ही घटनांचा सारखाच परिणाम प्रत्यक्षात दिसतो, तो असा की, आईबापांच्या शरीर कोशिकांतील वैकल्पिक घटकांची युति गंतुक-जननात शक्यतो चालू ठेवण्याची (अबाधित राखण्याची) प्रवृत्ती आढळते; पहा allelomorph.

**reserve cellulose** संचित तूलीर; राखीव सेल्युलोज
साठवून ठेवलेले अर्धतूलीररूप अन्न; उदा. खारकेच्या बीजात विशिष्ट प्रकारे कोशिकावरणात साठवून ते अन्न बीजाच्या अंकुरणात विद्राव्य स्वरूपात आणून वापरले जाते.

**residue** अवशेष
विशिष्ट प्रक्रियेनंतर उरलेला.

**resin** राळ; रेझीन
चिकट, अविद्राव्य, घनीभूत किंवा कठीण टर्पेंटाइन यासारखा वनस्पतीत (पाइन, फर, इ.) बनलेला व सालीतून निसर्गतः किंवा जखम झाल्यावर पाझरणारा टाकाऊ पदार्थ. उदा. बोळ, गुग्गुळ, धूप, बाल्सम इ.

**— duct (canal)** राळ–नलिका
काही वनस्पतींतील राळ किंवा तत्सम पदार्थ निर्माण करणाऱ्या कोशिकांनी (राळ–प्रपिंड) वेढलेला नळीसारखा मार्ग; उदा. चीड (पाइन).

**— passage** राळ-नलिका; राळ–मार्ग
राळेचा स्राव करणाऱ्या कोशिकांनी वेढलेली नळीसारखी पोकळी.

**resinogenic** राळ जनक

**resinosis (resin flux)** राळस्राव
काही झाडांतून कवकांच्या उपद्रवामुळे (उदा. *Armillaria mellea*) सुटलेला अनियंत्रित, अनैसर्गिक व विपुल राळेचा पाझर; उदा. शंकुमंत वनस्पती.

**resistance** प्रतिरोध
प्रतिकार करण्याची क्षमता; उदा. रोगप्रतिरोध.

**respirable** श्वसनीय
श्वसनक्रिया होण्यासारखे (होऊन ऊर्जाप्राप्ती होण्यासारखे) उदा. साखर.

**respiration** श्वसन; श्वासोच्छ्वास

प्राणवायू आत घेऊन कार्बन डाय-ऑक्साइड व पाणी बाहेर सोडणे व ऊर्जाप्राप्ती करणे, इत्यादी प्रक्रियेस सानिल ( normal, aerobic ) श्वसन म्हणतात; ऑक्सिजन बाहेरून न घेता ऊर्जेचे उत्पादन करणे यास अननिल किंवा निर्वात (anaerobic) श्वसन म्हणतात ( उदा. यीस्ट; काही सूक्ष्मजंतू ); याला अंतःश्वसन ( internal respiration ) असेही म्हणतात; श्वसनक्रिया मूलतः ऑक्सिडीकरण होय; ती एक ज्वलनक्रिया आहे व ती कमी तपमानात घडून येते.

**respiratory coefficient** श्वसन-गुणक

आत घेतलेला ऑक्सिजन व बाहेर सोडलेला कार्बन डाय-ऑक्साइड यांचे गुणोत्तर $\left(\frac{CO_2}{O_2}\right)$; सर्वसाधारणतः $\frac{CO_2}{O_2} = १$ असे आढळते; तथापि तेलबियांच्या श्वसनक्रियेत ऑक्सिजन अधिक घेतला जाऊन कार्बन डाय-ऑक्साइड कमी सोडला जातो व निर्देशांक ( भागाकार ) १ पेक्षा कमी होतो ( सुमारे ·०७ ); प्रथिनांचा श्वसन निर्देशांक ( ·०८ ).

**— enzyme** श्वसन-वितंचक

श्वसनात उर्जोत्पादन करणारा निदेशक ( उत्प्रेरक ). पहा enzyme.

**respirometer** श्वसनमापक

वायुविनिमयाचे मोजमाप करण्याकरिता वापरलेले उपकरण; यामध्ये अंकुरणाऱ्या बिया किंवा उमलणाऱ्या कळ्या यांचा उपयोग करतात.

**response** प्रतिक्रिया; प्रतिसाद

चेतकाला सजीवाने भिन्न भिन्न प्रकारे दिलेला प्रतिसाद; सजीवांच्या संवेदनक्षमतेचा आविष्कार; उदा. अनुवर्तन, अनुचलन, अनुकुंचन, इत्यादी हालचाली व आदिजीवसदृश प्रतिसाद.

**rest** विश्राम

कडक हिवाळयात शीत तपमानामुळे आणि कडक उन्हाळ्यात ओलाव्याच्या अभावी काहीं वनस्पतींची चयापचय–निष्क्रियता.

**resting cell** विश्रामी ( निश्चल ) कोशिका; विश्रामी पेशी

निष्क्रियावस्थेत असलेली स्वतंत्र जिवंत कोशिका.

**— nucleus** विश्रामी केंद्रक; विश्रामी प्रकल

प्रकलाची विभाजनपूर्व अवस्था.

**— period** विश्रामकाल

बीजुके, बीजे, कंद, ग्रंथिक्षोडे इत्यादींची प्रसुप्तावस्था ( निष्क्रिय अवस्था ); पहा. dormancy.

**— stage** विश्रामावस्था

**— spore** विश्रामी बाजुक; विश्रामी बाजाणु

प्रतिकूल परिस्थितीत क्रियाशीलता तात्पुरती नसलेले जाड आवरणाचे बीजुक; उदा. शैवले; कवक.

**restitution** नवोद्गम; प्रत्यास्थापन; यथापूर्वस्थापन

नाश पावलेल्या अवयवांची किंवा अवयवांच्या भागांची पुन्हा वाढ ( पुनर्जनन ); वनस्पतीत ही घटना विकासावस्थेतील भागातच घडून येते ( उदा. फार लहान रोपे, वर्धिष्णु भाग, इ. ); इतरत्र जून ऊतकांचे विकासी ऊतकात रुपांतर होऊन नवीन वर्धिष्णु बिंदू निर्माण होतात व नवीन अवयव बनतात. काही प्राण्यामध्ये प्रत्यक्ष नाश पावलेल्या अवयवांच्या जागी नवीन अवयव बनतात;

पहा reparation, regeneration.

**— nucleus** नवोद्गत प्रकल

अर्धसूत्रणातील पहिल्या किंवा दुसऱ्या विभाजणीचा लोप झाल्याने दोन्हीऐवजी एक प्रकल असणे.

**restricted** निर्बंधित; सीमित

परिस्थितीच्या दबावामुळे मर्यादित झालेला ( उदा. वनस्पतीचा प्रसार किंवा वाढ. )

**resupinate** विपर्यस्त

खालची बाजू वर आल्याप्रमाणे स्थान बदलणे; उदा. काही कवकांचा बीजुकोत्पादक थर सर्वात वर असतो.

**resupination** विपर्यास

वर वर्णिलेली प्रक्रिया. मूळच्या स्थितीच्या उलट स्थिती होणे. उदा. आर्किडच्या फुलाची अंतिम स्थिती आरंभीच्या अवस्थेच्या ( स्थितीच्या ) उलट असते कारण विकास होत असताना ते अर्धे स्वतःभोवती फिरते.

**resurrection plant** पुनर्जीवी वनस्पती

एकदा सुकल्यावर पुन्हा पाण्यात ठेविली असता पूर्ववत आकार धारण करणारी वनस्पती; उदा. सिलाजिनेला लेपिडोफायला, ॲनॅस्टॅटिका, काही नेचे ( प्लिओपेल्टिस ), इ.

**retardation** प्रगतिरोध

मुक्तपणे वाढ किंवा विकास होण्यास प्रतिबंध किंवा मर्यादा. उदा. प्रकाशाचा प्रत्यक्ष परिणाम वाढ मर्यादित करतो; अंधारातील वाढ सापेक्षतः अधिक असते;

खोड व फांद्या अधिक लांब परंतु पाने फार लहान व फुलांचा अभाव आढळतो.

**retentivity** धारणशीलता

धरून ठेवण्याची क्षमता. उदा. जमिनीची पाणी धरून ठेवण्याची शक्ती तिच्या कणांच्या आकारावर व ह्यूमस ( कुजकट पदार्थ ) वर अवलंबून असते.

**reticulate** जालरूप; जाळीदार

जाळे असलेले, जाळीप्रमाणे संरचना असलेले; उदा. जाळ्याप्रमाणे फळाच्या सालीचा पृष्ठभाग असलेले; रामफळ ( *Anona reticutata* L. ).

**reticulum** जाल; जाळे

आडव्या व उभ्या धाग्यांनी बनलेला पापुद्रा ( पल्ल ) उदा. नारळाच्या पानाच्या देठाशी बनलेला.

**—, nuclear** प्रकलजालक

प्रकलाच्या नित्य स्थितीतील प्रकलावरणाच्या आतील रंगसूत्र द्रव्याचे सूक्ष्म जाळे.

**retiform** जालाकार

जाळ्यासारखे.

**retinaculum** ( १ ) परिवाहक; ( २ ) अंकुशाभ

१) एक किंवा अधिक परागपुंज एकत्र चिकटवणारा प्रपिंड ( उदा. आमरे )

२) बिया पक्व होईपर्यंत त्यांना आधार देणारा आकड्यासारखा बीजबंध (उदा. वासक कुल).

**retinerved** जालसिराल; जालसिरी

शिरांचे जाळे असलेले (पान).

**retrogression** परागति; प्रतिगमन

अधिक साधेपणा ( अप्रभेदन ) दर्शविणारा उलटा विकास. पादप समुदायात किंवा व्यक्तिगत विकासात हा प्रकार आढळतो. अनुक्रमणाच्या विरुद्ध ही प्रक्रिया घडून येते व पादपसमुदाय अस्थिर व साधा बनतो. पहा regression, filial regression.

**retrogressive** परागामी; प्रतिगामी

परागती दर्शविणारे; उदा. पूर्वकालीन हवामानाशी सुसंबद्ध असा स्थायी समावास (बदललेल्या परिस्थिती-नुरूप विकास न पावलेला).

**— metamorphosis** परागामी रूपांतरण

नित्य अवयवाऐवजी कमी दर्जाचे अवयव बनणे, ही विकृती (विकृतिविज्ञानातील एक प्रकार); उदा. केसर-दले व किंजदले याऐवजी पाकळ्यांची निर्मिती, किंवा फक्त किंजदलाऐवजी केसरदले येणे.

**retrorse** पश्चवक्र; अवनत

मागे किंवा खाली वाकलेले उदा. गुलाबाचे काटे.

**retroserrate (runcinate)** पश्चदंती

अंशतः खंड पडलेल्या पात्याचे भाग मागे वळलेले असून टोकास एक काहीसा त्रिकोणी भाग असलेले ( साधे पान ); उदा. पाथरी.

**retting** तंतुविलगन

पाण्यात कुजवून तंतुयुक्त भाग अलग करणे. उदा. ताग, जनस, घायपात इ. ची पाने व खोड.

**retuse** निम्नाग्र

टोकास खोलगट असलेले ( पान; उदा. तागाची एक जाती ); उदा. नांदूरक ( *Ficus retusa* L. ); असाणा ( *Bridelia retusa* Spreng ).

**reversion** प्रत्यावर्तन

पूर्वस्थितीवर ( पूर्वावस्थेप्रत ) येणे; पूर्वजांची काही लक्षणे विद्यमान पिढीत दिसून येण्याची घटना.

**revolute** बहिर्वलित

दोन्ही कडा खालच्या पृष्ठाकडे स्वतंत्रपणे वळून दोन सुरळ्या झालेले ( साधे पान; उदा. कण्हेर ).

**revolving nutation** परिवर्धन

पहा circumnutation.

**Rhamnaceae** बदरी ( बोर ) कुल; ऱ्हॅम्नेसी

बोर, तोरण, इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा समावेश बेसी आणि बेंथॅम व हूकर यांनी ज्योतिष्मती गणात ( सीलॅस्ट्रेलीझमध्ये ) व एँग्लर प्रँटल यांनी बदरी गणात ( ऱ्हॅम्नेलीझमध्ये ) केला आहे. प्रमुख लक्षणे; काष्ठयुक्त ( झुडपे व वृक्ष ) वनस्पती; काही वेली; पाने साधी, व एकाआड एक; लहान उपपर्णे; फुले, लहान, हिरवट किंवा पिवळट; संदले ४–५, पाकळ्या सुट्या, ४–५ किंवा नसतात; पाकळ्यासमोर ४–५ केसरदले; किंजदले ऊर्ध्वस्थ ते अधःस्थ, २–५ व तितकीच बीजके; फळ शुष्क किंवा आठळीयुक्त; पहा Celastraceae.

**rheotropic** धारानुवर्तनी; स्रोतानुवर्तनी

पाण्याच्या स्रोताच्या चेतनेमुळे त्या दिशेने किंवा त्या-विरुद्ध दिशेकडे वाढणारे.

**rheotropison** धारानुवर्तन

वर वर्णिलेला प्रकार.

**rhipidium** व्यजनवल्लरी

बाजूच्या शाखा एकाआड एक पद्धतीने पण समोरा-

समोरच्या दिशेने परस्परावर वाढलेल्या असल्याने पंख्यासारखा दिसणारा कुंठित फुलोरा; यामध्ये पहिल्या अक्षावर टोकास फूल व खाली बाजूस दुसरा अक्ष असून त्याच्याही टोकास फूल व खाली बाजूस (पहिल्या अक्षाजवळ) तिसरा अक्ष याप्रमाणे अनेक अक्ष निर्माण होतात व सर्व फुले एका पातळीत येतात; उदा. आयरिस व जुंकस (प्रनड) वंश.

**rhizine** मूलभ्रुव

साधा एक तंतू किंवा शाखित तंतू अथवा अनेक समांतर तंतूंचा एकरूप झुबका; उदा. शैवाकांतील (दगडफलातील) अनेक जातींत असे शोषणाचे कार्य करणारे व वनस्पतीस आधार देणारे अवयव आढळतात.

**rhizoid** मूलकल्प; मूलाभ

मुळासारखे कार्य करणारे पण साधे केसासारखे एककोशिक किंवा अनेककोशिक पण तंतूसारखे उपांग; उदा. शेवाळी; प्रारंभिक नेचाभ पादप (टेरिडोफायटा); सायलोफायटींनी; कित्येक गंतुकधारी.

**rhizomatous** मूलक्षोड जनक; मूलक्षोडयुक्त

मूलक्षोड निर्मिणारे; मूलक्षोड असणारे.

**rhizome (root stock)** मूलक्षोड; मूलस्तंभ

जमिनीखाली आडवे वाढणारे, मुळासारखे दिसणारे, खवल्यासारखी पाने असलेले, द्विपार्श्व, बहुधा बहुवर्षायू, जमिनीवर पाने, फांद्या, फुलोरे व जमिनीतील मुळे निर्मिणारे खोड (रूपांतरित); उदा. कर्दळ, हळद, आले, दूर्वा (हऱ्याळी), इ.

**rhizomorph** तंतुजटा

कवकाच्या तंतूंची बनलेली मुळासारखी शाखायुक्त जुडी, उदा. भूछत्र, भूकंदुक, इ.

**rhizophilous** मूलवासी

मुळावर वाढणारे.

**rhizophore** मूलदंड; मूलधर

मुळे धारण करणारी पर्णहीन शाखा; उदा. सिलाजिनेला.

**Rhizophoretum** कांदल-संघात

कांदलाची एखादी जाती किंवा अनेक जाती निसर्गतः एकत्र वाढत असलेला समावास; यामध्ये ही वनस्पती प्रभावी असते; किनाऱ्यावरील खाऱ्या दलदलीत यांचा एक समुदाय आढळतो; पहा consociation; formation.

**Rhizophoraceae** कांदल कुल; ऱ्हायझोफोरेसी

पांशी, कांदल, कांकरा, चौरी इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; याचा समावेश जंबुल गणात (मिर्टेलीझ) केला जातो; प्रमुख लक्षणे: समोरासमोर व उपपर्णे असलेल्या पानांची झाडेझुडपे; द्विलिंगी, अवकिंज ते अपिकिंज, नियमित फुले; संदले ४–८; पाकळ्या ४–८ सुट्या; केसरदले ८ ते अनेक व बिंबावर आधारलेली; २–५ ऊर्ध्वस्थ किंजदले (जुळलेली); किंजपुटात २–५ कप्पे व प्रत्येकात २ बीजुके; मृदुफळ. पहा Myrtaceae; Combretaceae.

**rhizotaxis (rhizotaxy)** मूलविन्यास; मूलतंत्र

मुळांची मांडणी.

**Rhodology** गुलाबविज्ञान

गुलाबासंबधीची सर्व शास्त्रीय माहिती.

**Rhodophyceae** लाल शैवलवर्ग; ऱ्होडोफायसी

शैवल वनस्पतींपैकी लाल रंगाचे द्रव्य (फायकोएरिथ्रीन) शिवाय कधी निळे रंगद्रव्य (फायकोसायनीन) प्रामुख्याने आढळणाऱ्या साध्या कायक वनस्पती; इतर शैवलाप्रमाणे यांमध्येही हरितद्रव्य असतेच. बहुतेक सर्व खाऱ्या पाण्यात, परंतु काही गोड्या पाण्यात आढळतात. केसलहीन नर–गंतुके व स्त्री–गंतुके असतात. या सर्वांचा अंतर्भाव हल्ली ऱ्होडोफायटा अथवा लाल (रक्त–) शैवल विभागात करतात; पहा Algae.

**rhombate (rhomboidal)** चतुष्कोणी

चार कोन असलेल्या चौकटीप्रमाणे. उदा. ॲडिॲंटम नेचाच्या एका जातीचे पान.

**rib** मध्यशिरा

पानाच्या मधली मुख्य शीर; प्राथमिक शीर.

**ribbed** सिराल

उठावदार (ठळक) शिरा असलेले; उदा. वडाचे पान.

**ribbon- shaped** पट्टाकृति

सपाट पट्टीप्रमाणे असलेले (पान); उदा. गवते; सवाला (वॅलिस्नेरिया; टेपग्रास).

**ribonucleic acid (RNA)** रिबो (रायबो)

न्यूक्लीइक अम्ल. पहा nucleic acid.

**ribosome** रिबोसोम; रायबोसोम

प्रथिनांचे संश्लेषण करणारा, आर एन ए (रिबोन्यूक्लीइक अम्ल) चा भरपूर साठा असलेला, परिकलात आढळणारा व कधी परिकलातील सूक्ष्म जालकतंतूस (अंतःप्राकल जालकास) चिकटून असणारा अति-

सूक्ष्म कण; असे असंख्य कण परिकलात असतात. पहा nucleotide; chromosome; endoplasmic reticulum.

**ridge** कटक; कंगोरा

लांबट अखंड उंचवटा.

**ridged** कटकित; कंगोरेदार

अनेक कटक ( कंगोरे ) असलेले; उदा. दोडका, भेंडी यांची फळे; खडशेरणीचे व एक्किसीटमचे खोड, फांद्या इ.

**right-handed twiner** उजवी वेल; दक्षिणावर्ती वेल.

पहा dextral.

**rigid (stiff)** ताठर; दृढ

फारसे न वाकणारे ( उदा. खोड. पान, काटे, इ. ); उदा. लहान सूर्यफूल ( *Helianthus rigidus* Desf. ).

**rind** साल; कवच; वल्क

झाडाची वा फळाची बाहेरील चिवट साल ( आवरण, आच्छादन ).

**ring** वलय; कडे

गोलाकार कंगोरा ( कटक ) अथवा कडी; उदा. काही वाहिका किंवा वाहिन्यातील जाड कंगोरे; खोडाच्या आडव्या छेदात दिसणारी काष्ठातील वार्षिक वर्तुळे; पहा annual ring; annulus.

**ring-bark** वलयवल्क; वलयीवल्क

गोलसर पट्टयांनी सोलून जाणारा खोडाच्या बाहेरील भाग; उदा. भूर्ज; पहा scale-bark.

**ring-cell** वलयकोशिका; वलयपेशी

आंगठीसारखी कोशिका.

**ring-disease** बांगडी रोग

बांगडीप्रमाणे खोडात पसरून वनस्पतीचा नाश करणारा रोग; उदा. बटाटा.

**ringworm** नायटा; दद्रु

एका कवकापासून ( *Trichophyton* ) होणारा गोल कंगोऱ्यासारखा त्वचारोग.

**ringent, bilabiate** जृंभोष्ठी

पहा bilabiate.

**riparian ( reparial )** नदीतटीय; स्रोतसमीपस्थ; नदीतीरस्थ

नदीच्या किंवा पाण्याच्या ओहोळाच्या कडेने वाढणारी ( वनस्पती, वनश्री ); उदा. *Homonoia riparia* Lour.

**ripe** पक्व

पूर्ण वाढ झालेले ( फळ; बीजुककोश; रेतुकाशय; इ. ).

**rivularis** जलतीरस्थ

पाण्याच्या ( नाला, झरा, ओहोळ, इ. ) कडेने वाढणारे; उदा. *Rivularia* ( एक नीलहरित शवल ).

**RNA** आरएनए

रिबोन्यूक्लीइक ( रायबोन्यूक्लीइक ) ॲसिड याचे संक्षिप्त रूप; प्रथिन-संश्लेषणात याचा महत्त्वाचा वाटा असतो; सर्व सजीवांत हे आढळते; पहा chromosome; ribosome.

**rock- garden** शैलोद्यान

खडकाळ जागी वाढणाऱ्या मरुवनस्पतींची बाग ( बागेचा भाग ); कलांचो, पानफुटी, निवडुंगाच्या भिन्न जाती, काटिलेडॉन, इ. वनस्पती तेथे वाढतात.

**rolling mechanism** लोळण-यंत्रणा

गडबडा लोळत, वाऱ्याने दूरवर जमिनीवरून (फिरत) जाण्याची योजना; उदा. समुद्रकिनाऱ्यावर वाढणाऱ्या काही वनस्पतींची फळे ( *Spinifex squarrosus* ); रानमेथी, लसूणघास, इ. जेरिकोचा गुलाब व सिलाजिनेलाची एक जाती संपूर्णपणे जमिनीतून निघून वाऱ्याने दूरवर गडगडत जातात.

**root** मूळ; मूल

उच्च वनस्पतीत आढळणारे, खोडापासून जमिनीत व प्रकाशाच्याविरुद्ध दिशेकडे वाढत जाणारे, वनस्पतीस आधार देणारे व लवणयुक्त पाणी शोषून घेणारे इंद्रिय.

**— cap** मूलत्राण

मुळाच्या टोकाशी संरक्षणाकरिता असलेले टोपीसारखे आवरण.

**— climber** मूलारोहिणी

मुळांच्या साहाय्याने चढत जाणारी वेल; उदा. गजपिप्पली, अंजनवेल.

**— hair** मूलरोम; मूलकेश

केसासारखे एककोशिक व मुळाच्या टोकाजवळ येणारे शोषक उपांग.

**— let** उपमूल

मुख्य मुळावर येणारे लहान मूळ.

— nodule मूलग्रंथि

मुळांवर आलेली गांठ; उदा. भुईमूग, वाटाणा.

— - parasite मूलोपजीवी

दुसऱ्या वनस्पतीच्या मुळांवर उपजीविका करणारी वनस्पती; उदा. चंदन, टारफुला, बंब्राखू, इ.

— - pocket मूलगोप

टोपीसारखे पण जमिनीत न वाढता पाण्यात वाढणाऱ्या वनस्पतीच्या मुळाच्या टोकावरचे आवरण; उदा. डकवीड (*Lemna*); पहा Lemnaceae.

— - pressure मूलदमन

मुळात घेतल्या जाणाऱ्या खनिजयुक्त पाण्यामुळे निर्माण होणारा दाब.

— - rot मूलकूज

कवकांच्या उपद्रवामुळे मुळे कुजणे व वनस्पतीचा नाश होणे; उदा. पिथियम कवकापासून पपई, आले, आळीव इत्यादींना हा रोग होतो.

— - stock मूलक्षोड

पहा rhizome.

— - system मूलतंत्र

प्रमुख एक मूळ किंवा अनेक मुळे व त्यापासून निघालेली उपमुळे यांचा संच (व्यूह).

— tuber मूलकंद

ग्रंथिल अथवा जाडजूड, गाठदार (मांसल) मूळ; उदा. डेलिया, गुलबुश, इ.

— tubercle मूलगुलिका

काही सूक्ष्मजंतूंनी मुळात वस्ती केल्याने त्यावर होणारी गाठ; यामध्ये ते जंतूही असतात; मूळ व जंतू यांच्या सहजीवनाचा एक प्रकार; पहा root-nodule.

**Rosaceae** गुलाब कुल; रोझेसी

गुलाब, जरदाळू, विही, रॉसबेरी, स्ट्रॉबेरी, नासपाती, सफरचंद इत्यादि द्विदलिकित फुलझाडांचे कुल. याचा अंतर्भाव गुलाब गणात करतात. प्रमुख लक्षणे : ओषधी, वेली, झुडूप व वृक्ष; पाने साधी किंवा संयुक्त व बहुधा उपपर्णासह असतात; बहुधा द्विलिंगी व एकसमात्र फुले; संदले पाच व जुळलेली; पाकळ्या बहुधा पाच व सुट्या; केसरदले अनेक; किंजदले जुळलेली किंवा सुटी व बहुधा अनेक; फुले परिकिंज किंवा अवकिंज; फळे विविध, साधी किंवा घोसफळे; बीजे थोडी व अपुष्क.

**Rosales** गुलाब गण; रोझेलीझ

बेंथॅम व हूकर यांच्या पद्धतीप्रमाणे हे गोत्र समजले जाते व एंग्लर आणि प्रँटल यांच्या व बेसीच्या पद्धतीत हा गण असून त्यात शिंबी कुल, गुलाब कुल, इत्यादींचा समावेश होतो. हचिन्सनांच्या पद्धतीत शिंबी कुलाचा समावेश नाही. ह्या गणाचा उगम मोरवेल गणाशी संबंधित असून त्यातील फुले चक्रीय, पूर्ण, एकसमात्रापासून अरसमात्र या मर्यादेत मुक्तप्रदल, पंचभागी, असतात; केसरदले अनेक; किंजदले थोडी किंवा अनेक, सुटी किंवा जुळलेली.

**rosaceous** गुलाबाकृति; गुलाबवणा

गुलाबपुष्पाप्रमाणे पाकळ्यांची मांडणी असलेला पुष्पमुकुट; गुलाबी रंगाचा.

**rosette (rosella)** गुच्छ; गुच्छाकृति

गुलाब पुष्पातील पाकळ्यांच्या मांडणीप्रमाणे असलेला पानांचा झुबका; उदा. कोरफड, घायपात, कॉटिलेडॉन, इ.

— shoot गुच्छ प्ररोह

फांदीवर एकाच बिंदूपासून निघालेला पानांचा झुबका.

**Rosetum** गुलाब-संघात

गुलाबांच्या अनेक झाडांचा नैसर्गिक समुदाय (समावास).

**roseus (rosy)** गुलाबी; फिकट लाल

उदा. गुलखेरा (*Althea rosea* (L.) Cav.); सदाफुलीचा एक प्रकार (*Vinca rosea* L.).

**rostellum** चंचुक

केसरमंडल व किंजमंडळ याच्या स्तंभाच्या टोकाचा अरुंद चोचीसारखा भाग; उदा. आमरे (ऑर्किड), पहा Orchidaceae.

**rostrum** चंचू

चोचीसारखा वर वाढलेला भाग.

**rot** कूज

कवक किंवा सूक्ष्मजंतू यामुळे होणारे अनेक कुजण्याचे प्रकार.

**rotate** चक्राकृति

गोलाकार, चाकासारखा, सपाट व खाली आखुड नलिकेवर आधारलेला (जुळलेल्या पाकळ्यांचा पुष्पमुकुट). उदा. वांगे, मिरची, रुई, इ.

**rotation** परिगमन

कोशिकेतील (सूक्ष्म शरीर-घटकातील) सजीव द्रव्याची कोशिकेच्या आवरणाच्या आतील बाजूस चालणारी प्रदक्षिणा. उदा. नायटेला, सवाला अशा कित्येक जलवनस्पती.

**rotund (orbicular-oblong)** वर्तुळाकृति
एकंदरीने गोल आकाराचे पण काहीसे आयत (पान): उदा. कमळ; भुईचाफा (*Kaempferia rotunda* L.)

**rough (scabrous)** १) खरबरीत; २) रोमश
१) पृष्ठभाग खडबडीत असलेले; २) पृष्ठभागावर ताठर केस असलेले (उदा. पान, खोड, फळ, इ. खरवताचे व प्राजक्ताचे पान; भोपळ्याचे खोड, पान, देठ इ.).

**Rubiaceae** कदंब कुल; रुबिएसी
मंजिष्ठ, कदंब, कॉफी, पापटी, अनंत, राईकुडा, इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. बेथम व हूकर यांच्या वर्गीकरणाप्रमाणे याचा अंतर्भाव रुबिएलीझ गोत्रात असून एंग्लर व प्रँटल यांच्या व बेसींच्या पद्धतीत त्याच नावाच्या गणात आहे. हचिन्सन यांनी रुबिएलीझ गणात फक्त रुबिएसी हे एकच कुल समाविष्ट केले आहे. विविध उपपर्णे असलेली समोरासमोर पाने; पुष्प-संरचनेत ४–५ भागांची मंडले; संदले फार लहान; पाकळ्या जुळलेल्या; अधःस्थ किंजपुट व सपुष्क बियांची विविध फळे, इत्यादी लक्षणे या कुलात आढळतात. कॉफी उपकुल (कॉफीऑइडी) व सिंकोना (कोयनेल) उपकुल (सिंकोनॉइडी) अशी कदंबकुलाची विभागणी करतात.

**rubidus** लालसर

**rubrica (red)** लाल; तांबडे
उदा. मयाळ (*Basella rubra* L.) या वेलीचे खोड, फांद्या, देठ इ. अवयव.

**ruderal** अपशिष्टवासी; अपशिष्ट पादप; क्षेप्यवासी
वर्ज्य (कचरा वगैरे टाकाऊ माल) वस्तूंवर अथवा ओसाड जागी वाढणारी वनस्पती; उदा. ओसाडी, काटेरिंगणी, काटेमाठ, काटेधोत्रा, पांढरा धोत्रा इ.

**rudiment (rudimentary)** अवशेष; रुद्ध
खुरटलेला; पूर्ण वाढ होण्याअगोदर ती थांबून अर्धवट विकास पावलेला (अवयव); उदा. स्त्री–पुष्पातील कार्यक्षम नसलेली केसरदले; केळातील बिया.

**rugged** खरबरीत; खर्बर.
पहा rough, scabrous.

**rugose (rugous)** सुरकुतलेले
सुरकुत्या पडलेले; उदा. खोड; फळ; तोरण (*Zizyphus rugosa* Lamk.); मिरी व गुलबुश यांची फळे.

**ruminate** रेषाभेदित
अनेक रेषांनी भरलेले (बियातील मगज; पुष्क); उदा. जायफळ, हिरवा अशोक, सुपारी, सिताफळ इत्यादींचे बी. येथे बीजावरणाचा आतील थर मगजात इतस्ततः वाढलेला असतो.

**runcinate** पश्चदंती
पात्याच्या कडावरचे (करवती) दात खाली तळाकडे वळलेले असणे; उदा. दुधळचे पान; पाथरी (*Lactuca runcinata* DC.)

**runner** धावते खोड; धुमारा
मुख्य खोडापासून निघालेली व जमिनीवर सरपटत मुळांनी चिकटून वाढणारी बाजूची शाखा. उदा. ब्राह्मी.

**rupestral (rupestrine)** भित्तिवासी
भिंतीवर वाढणारी (वनस्पती).

**rust** तांबेरा; गेरवा
तांबूस, पिवळट, तपकिरी, गर्द पिंगट रंगाच्या ठिपक्यांनी सहज ओळखू येणारा कवकजन्य रोग; लोखंडावरील गंजाप्रमाणे दिसल्याने तसे नांव पडले आहे. पहा Uredinae.

**Rutaceae** सताप कुल; रुटेसी
बेल, कवठ, सताप, लिंबू, कढिलिंब इत्यादींचे द्विदलिकित कुल; हे हचिन्सन यांनी सताप गणात (रुटेलीझमध्ये) अंतर्भूत केले आहे. बेसींच्या व बेंथम–हूकरच्या पद्धतींत भांड गणात (जिरॅनिएलीझमध्ये) घातले आहे. सुगंधी प्रपिंडचित्रित बहुधा संयुक्त पाने; नियमित द्विलिंगी फुले; संदले व प्रदले ४–५; केसरदले ५, ८, १० अथवा अधिक, सुटी किंवा अनेक जुड्यांची असून किंजपुट बिंबावर व ऊर्ध्वस्थ. किंजपुटातील अनेक कप्प्यात दोन ते अनेक बीजके; फळे विविध.

**Rutales** सताप गण; रुटेलीझ
हचिन्सन यांच्याखेरीज इतरांनी हा गण मानलेला नाही; त्यातील एकमेव रुटेसी कुलाचा समावेश भांड गणात (जिरॅनिएलीझ मध्ये) केला जातो; रुटेलीझ ह्या प्रारंभिक गणाचा उगम मोरवेल गणातून फार पूर्वी झाला असावा असे मानतात.

## S

**sabulose (sabuline)** वालुकावासी
रेताड जमिनीत वाढणारी (वनस्पती);
पहा psamnophyte.

**sac** कोश

पिशवीसारखा अवयव; उदा. कोशिका; वायुकोश; बीजुककोश; गर्भकोश इ.

**saccate (gibbous)** १) कोशवंत; २) कोशकल्प

१) कोश असलेला संवर्त; उदा. मोहरी.

,, ,, पुष्पमुकुट; उदा. स्नॅपड्रॅगॉन.

२) कोशाप्रमाणे कार्यक्षम.

**saccharatus (saccharinus)** शर्करायुक्त

साखर असलेला (ज्यापासून साखर मिळू शकेल असा) (पदार्थ); उदा. उसाचा रस; ताड वृक्षातील रस; मॅपल (*Arenga saccharifera* Labill.) व बीट यांच्या काही जातींतील रस. ऊस (*Saccharum officinarum* L.).

**Saccharomyces (yeast)** किण्व

शर्करासंबंधित एका धानीकवक वंशाचे नांव; यातील जाती (वनस्पती) साखरेच्या द्रवात वितंचन घडवून आणून त्याचे रूपांतर अल्कोहॉल (मद्यार्क) मध्ये करतात व उत्पन्न होणारी ऊर्जा आपल्या जीवनात उपयोगात आणतात. बेकरी (पाव, केक बनविण्याचा उद्योग) व बीर नांवाच्या मद्योत्पादनाचा उद्योग यांमध्ये किण्वाचा मनुष्याने उपयोग केला आहे; शिवाय काही पौष्टिक गोळ्यातही किण्व असते; पहा Ascomycetes.

**saccule** लघुकोश

लहान कोश

**saffron** केशर

केशराच्या (कंदयुक्त वनस्पतीच्या) फुलातील किंजल्कापासून काढलेले रंगद्रव्य; केशर वनस्पती (*Crocus sativus* L.).

**sagittal plane** अरीय प्रतल

दोन सारखे भाग (द्विपार्श्व समात्र) होण्याकरिता केलेल्या विभागणीतील मध्यरेषेची उभी पातळी. पहा bilateral symmetry.

**sagittate** शराकृति

बाणाच्या टोकासारखा आकार असलेले (पान, परागकोश, इ.); तळाशी रुंद व दोन बाजूस सरळ टोकदार खंड असलेले; उदा. करवीर कुलातील काही वनस्पतींतील परागकोश (उदा. कण्हेर, सदाफुली); अळूचे पान; पहा hastate.

**sago** साबुदाणा

काही वनस्पतींच्या मेंडापासून काढलेल्या पिष्ठयुक्त पदार्थापासून बनविलेली कणी. त्या वनस्पती : *Metroxylon sagu* Rottle and *M. rumphii* Mart. *Cycas spp.*, sago palm; मेर्ली माड (*Caryota urens* L.).

**salep (salop, saloop)** सालममिश्री; सालेप

आमराच्या एका जातीच्या वनस्पतीची ग्रंथिल सुकी मुळे (*Orchis latifolia* L.).

**Salicaceae** वाळुंज कुल; सॅलिकेसी

ॲस्पेन, वाळुंज (विलो), बहान (पॉप्लर) इत्यादी वनस्पतींचे कुल; यात फक्त दोनच वंशांचा समावेश केला जातो; या कुलाचा अंतर्भाव (भूर्जकुल, ओककुल – वंजुकुल, अक्रोडकुल, इत्यादीबरोबर) ॲमेंटिफेरी गटात करतात; यांना नतकणिश (लोंबत्या कणसासारख्या प्रकारचे एकलिंगी फुलोरे येतात. हा सर्व गट ऱ्हास पावलेल्या द्विदलिकित वनस्पतींचा असावा असे मानतात. यांच्या फुलात बहुधा परिदले नसून वाऱ्याकडून परागण होते. वाळुंजाचे पुं-फुलोरे सरळ असतात. पुं-पुष्पात २-३० केसरदले छदाच्या बगलेत आणि स्त्री-पुष्पात दोन जुळलेली किंजदले; बीजे अपुष्क व अनेक आणि केसाळ.

**salt** लवण

अम्ल व क्षार (अल्क) यांच्या संयोगाने बनलेला पदार्थ.

**salt-marsh** खारी दलदल; खाजण

समुद्रकिनाऱ्यावरची खारट चिखलाने भरलेली पाणथळ जमीन; पहा mangrove.

**Salvadoraceae** पीलु कुल; सॅल्व्हॅडोरेसी

पीलू, किंकानेला, मिरजोळी इत्यादी समुद्रकिनारी वाढणाऱ्या वनस्पतींचे लहान तीन वंशाचे कुल. याचा अंतर्भाव अरिष्ट गणात (एंग्लर व प्रँटल) किंवा किराइत गणात (बेंथॅम व हूकर) करतात.

**salver-shaped** अपछत्राकृति

दांड्यावर उलटे छत्र (समईसारखे) असल्याप्रमाणे (पुष्पमुकुट); उदा. सदाफुली, पारिजातक, जाई, इ; पहा hypocrateriform.

**samara** सपक्ष कृत्स्नफल; सपक्षफल

शुष्क, न तडकणारे, एकबीजी, ऊर्ध्वस्थ किंजपुटापासून बनलेले पंखधारी फळ. उदा. बिवळा, वावळा, सिकॅमूर.

**samaroid** सपक्ष कृत्स्नफलाभ; सपक्षफलाभ
पंखधारी शुष्कफलासारखे.

**sandy soil** रेताड माती; वालुका मृदा; वाळू मृदा
वाळूमिश्रित माती.

**sanguine** रक्तवर्ण
रक्तासारखे लाल; उदा. कपबशी ( *Holmskioldia sanguinea* Retz. ) वनस्पती.

**Santalaceae** चंदन कुल; सँटॅलेसी
या चंदनाच्या कुलाचा समावेश चंदनगणात ( सँटॅलेलीझमध्ये ) केला जातो. प्रमुख लक्षणे : अर्धवट दुसऱ्या वनस्पतीवर जगणाऱ्या वनस्पती ( ओषधी, झुडपे व वृक्ष ). पान साधी, एकाआड एक किंवा समोरासमोर; फुले द्विलिंगी किंवा एकलिंगी, सारख्या परिदलाची; परिकिंज किंवा अपिकिंज बिंब; परिदले २+२ किंवा २+३; तितकीच त्यावर आधारलेली केसरदले; अधःस्थ किंजपुटात एकच कप्पा व त्यात १–३ बीजके; कपाली किंवा आठळीफळ, एकबीजी; सपुष्क बीज.

**santalin** सँटॅलीन
रक्तचंदनाच्या लाकडापासून काढलेला राळयुक्त पदार्थ.

**santonin** सँटोनीन
किरमाणी ओव्यातील (*Artemisia maritima* L. ; santonica; ) कडू पदार्थ.

**sap** पादपरस; रस
कोशिकांतील किंवा कोवळ्या वाहिका व वाहिन्यांतील अन्नयुक्त द्रवपदार्थ; फुलोऱ्याचे दांडे किंवा काही खोडे यातून जखमेमुळे स्रवणाऱ्या व अन्नघटक असलेल्या रसालाही ही संज्ञा वापरतात.

**— wood** रसकाष्ठ
अन्नरस वाहून नेणारा काष्ठाचा भाग.

**sapid** रुचकर

**Sapindaceae** अरिष्ट कुल; सॅपिंडेसी
रिठा ( अरिष्ठ ), कपाळफोडी, रामबुतन, लिची, जखमी इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे लहान कुल. याचा समावेश अरिष्ट गणात (सॅपिंडेलीझमध्ये) करतात. संदले व प्रदले प्रत्येकी पाच; दहा केसरदले व त्याखाली बिंब. तीन जुळलेली किंजदले; ऊर्ध्वस्थ किंजपुट व त्यात तीन कप्पे व तीनच बीजके; फळे विविध.

**Sapindales** अरिष्ट गण; सॅपिंडेलीझ
आम्र कुल व अरिष्ट कुल या दोन्हींचा येथे अंतर्भाव होतो. बेंथॅम व हूकर यांच्या पद्धतीत शेवगा ( शिग्रु ) कुलही घातले आहे. एंग्लरांच्या पद्धतीत पीलु कुल अंतर्भूत आहे. द्राक्ष कुल व बदरी कुल यांचेशी या गणाचे जवळचे नाते आहे. याच्या गणापासून म्हणजे ज्योतिष्मती (सेलॅस्ट्रलीझ) गणापासून अरिष्ट गण अवतरला असावा असे मानतात. यामध्ये फुलातील प्रपिंडयुक्त बिंबापासून केसरदले व प्रदले वाढतात.

**Sapotaceae** मधूक ( मोह ) कुल; सॅपोटेसी
चिकू, मोह, खिरणी, बकुळ इत्यादी चिकाळ वनस्पतींचे द्विदलिकित कुल; याचा अंतर्भाव बेंथॅम व हूकर यांच्या पद्धतीत टेंबुर्णी गणात ( एबेनेलीझमध्ये ) केला जातो. प्रमुख लक्षणे : काष्ठयुक्त व एकाआड एक साध्या पानांच्या वनस्पती, सच्छदक द्विलिंगी फुले; संदले ४–८ दोन मंडळात व जुळलेल्या तितक्याच पाकळ्यांचे एक वर्तुळ किंवा दोन वर्तुळे; कधी त्याशिवाय उपांगे; केसरदलांची २–३ वर्तुळे; अनेक जुळलेल्या ऊर्ध्वस्थ किंजदलांचा किंजपुट; मृदुफळात अनेक बीजे असतात.

**saprophyte** शवोपजीवी; मृतजीवी
मृत व कुजकट जैव पदार्थावर उपजीविका करणारी वनस्पती; उदा. काही सूक्ष्मजंतू व कवक.

**saprophytism** शवोपजीवन
शवोपजीवी असण्याचा प्रकार; पहा mycorrhiza.

**Sarraceniales** कलश (घट) पर्णी गण; सॅरासेनिएलीझ
एंग्लर व प्रँटल यांनी हा गण आर्किक्लॅमिडी गटात समाविष्ट केला असून हचिन्सन यांनी हर्बेसीत घातला आहे. प्रमुख लक्षणे : साधी, एकाआड एक, कीटकभक्षक अवयवात (घट, कलश, चंबू ) रूपांतर पावलेली पाने असलेल्या लहान ओषधी; फुले नियमित, अवकिंज; चक्रीय ते अर्धचक्रीय (अर्धसर्पिल); परिदले सर्व सारखी, किंवा संवर्त व पुष्पमुकुट स्पष्ट व अलग. ३–५ ऊर्ध्वस्थ, जुळलेल्या किंजदलांच्या किंजपुटात तीन ते अनेक बीजके; फळे विविध व बीजे सपुष्क. या गणात सॅरासेनिएसी, नेपेंथेसी व ड्रॉसेरेसी ही तीन कुले घालतात; हचिन्सन यांनी नेपेंथेसीचा अंतर्भाव सापसंद गणात (ईश्वरीगणात; ॲरिस्टोलेकिएलीझमध्ये) केला आहे. पहा : कीटकभक्षक वनस्पती (insectivorous plants ); Nepenthaceae.

**sativus** आरोपित; संवर्धित
लागवडीत असलेली किंव पिकविलेली ( पेरून वाढविलेली ) वनस्पती. उदा. आळीव ( *Lepidium sativum* L. ); वाटाणा ( *Pisum sativum* L.)

**savannah** रुक्षवन; सॅव्हाना
काही थोडे पानझडी वृक्ष किंवा झुडपे असलेला गवताळ प्रदेश; हे गवत रुक्ष, केसाळ, जाडेभरडे पण उंच असून झुबक्यांनी वाढते.

**saw - toothed (sawd, serrate)** दंतुर; करवती
दाते असलेलो ( कडा ). उदा. जास्वंद.

**saxicolous** शैलरुह
खडकावर वाढणारी (वनस्पती; उदा. दगडफूल).

**Saxifragaceae** पाषाणभेद कुल; सॅक्सिफ्रॅगेसी
गूजबेरी, पाषाणभेद ( हिं. पाखानभेद ), बसक इत्यादी द्विदलिकित फुलझाडांचे एक कुल; याचा अंतर्भाव गुलाब गणात केला जातो; हचिन्सन यांनी पाषाणभेद गणात (सॅक्सिफ्रॅगेलिझमध्ये) केला आहे. एकूण वंश तीस व जाती सुमारे सहाशे ( रेंडल : ऐंशी वंश व अकराशे जाती ); प्रसार : विशेषकरून समशीतोष्ण व उष्णकटिबंधातील डोंगराळ प्रदेश. प्रमुख लक्षणे : ओषधी, क्षुपे व वृक्ष; पाने एकाआड एक; फुलोरे विविध; फुले नियमित, द्विलिंगी, मंडलित, पचभागी; क्वचित पाकळ्या नसतात; केसरदले पाचाच्या दोन मंडळात असून बाहेरचे मंडळ पाकळ्यासमोर असते; किंजदले बहुधा दोन; ऊर्ध्वस्थ किंवा अधःस्थ किंजपुट; अनेक बीजके मध्यवर्ती अक्षाला चिकटलेली; मृदुफळात किंवा बोंडात अनेक सपुष्क बीजे. पहा Rosales.

**saxifragous** शिलाभेदी
खडक फोडून त्यातील भेगात वाढणारी ( वनस्पती ).

**scab** खवड्या
भिन्न कवकांमुळे मध्यत्वचेत खरबरीतपणा आणणारा रोग.

**scabrous (rough)** खरबरीत

**scalariform** श्रेणीरूप
शिडीप्रमाणे दिसणारे; उदा. वाहिका व वाहिन्या यातील आडव्या दांड्याप्रमाणे जाड रेषा असलेले.

**— conjugation** श्रेणीरूप युगुलीभवन
काही शैवलांमध्ये ( स्पायरोगायरा, झायग्नीमा ) दोन तंतूमध्ये समोरासमोरच्या कोशिकांमध्ये निर्माण झालेल्या आडव्या आरपार नळ्यांतून घडून आलेला गंतुकसंयोग ( प्रजोत्पादक जीवद्रव्यांचे एकरूप होणे ).

**scale** शल्क; खवला
पातळ व अनेकदा काहीसा ताठर, क्वचित मांसल व फार लहान पानासारखा अवयव; पहा glume.

**— bark** शल्कीवल्क
खवल्याच्या स्वरूपात सुटून निघणार सालीचे तुकडे; उदा. चीड ( पाइन ) व पेरू इत्यादींचे खोड.

**— hair** शल्ककेश
पहा ramenta.

**— leaf ( cataphyll )** शल्कपर्ण
बहुधा भूमिगत खोडावर असलेले खवल्यासारखे पान; उदा. आले, कर्दळ, कांदा इ. क्वचित जमिनीवरच्या खोडावरही खवल्यासारखी पाने आढळतात; उदा. खडशेरणी, नांग्याशेर, एक्विसीटम, इत्यादी.

**scales, interseminal** आंतर (अंतरा) बीजी शल्क
शंकूतील एकावर एक असलेल्या बीजांमधून किंवा बीजकांमधून वाढलेले खवले; उदा. सायकॅडीऑइडिया ( अश्मीभूत शंकुमंत वनस्पती ); काही विद्यमान शंकुमंत वनस्पती.

**scalloped (crenate)** स्थूलदंतुर
बोथट दात असलेली कडा; उदा. पान ओवा; पहा crenate.

**scaly** शल्कयुक्त; खवलेदार
खवले असलेले.

**— bulb** शल्ककंद
अनेक लहान मांसल खवल्यांनी वेढलेला लहान कंद; उदा. आंबुटी; लसणाच्या गड्डीत अनेक लहान पातळ खवले असून त्यांच्या बगलेत मांसल कुड्या (कळ्या) असतात; पहा bulb.

**scandent** आरोही
कोणत्याही साधनांनी वर चढणारी (वेल); उदा. अंजनवेल ( *Pothos scandens* L. ).

**scape** पुष्पाक्ष; पुष्पबंधाक्ष
जमिनीतील खोडापासून वर वाढलेला व बहुधा पर्णहीन असून टोकास एक किंवा अनेक फुले धारण करणारा दांडा; उदा. गुल्छडी, घायपात, कोरफड, झेफिरलिली, नागीन, कांदा, इ.; काही भूछत्रात आढळणारा दांडा.

**scapiform** पुष्पाक्षाकृति; पुष्पाक्षसम
फुलोऱ्याच्या दांड्यासारखे.

**scapigerous** पुष्पाक्षधारी
फुलोऱ्याचा अक्ष धारण करणारी ( वनस्पती ); उदा. कांदा, घायपात, कोरफड, इ.

**scar** किण; वण
जखमेची राहिलेली खूण ( वण ); फांदी कापल्यावर,

पान, बीज, फूल, फळ पडून गेल्यावर मूळ जागी राहिलेला वण; उदा. पपईचे खोड; बीजावरची खूण ( नाभि ); पहा hilum.

**scarious** रुक्ष

पातळ, शुष्क पापुद्र्यासारखे (छद); उदा. नागरमोथा ( *Cyperus scariosus* R. Br. ).

**scarred** किणांकित

अनेक वण पडलेले.

**schizocarp ( schizocarpic )** पालिभेदी

अनेक एकबीजी तुकडे तुटून पडणारे शुष्क फळ; प्रत्येक तुकडा ( फलांश ) तडकणारा किंवा न तडकणारा असतो; उदा. लाजाळू, गाजर, एरंड, भांड ( जिरेनियम ), मुद्रा, गुलखेरा इत्यादींची फळे; पहा mericarp.

**schizogenous ( schizogenetic )** भेदोद्भव

सामान्य कोशिकावरणात फूट पडून त्या कोशिका अलग होण्यामुळे निर्माण झालेली ( पोकळी किंवा नलिका ) उदा. राळनलिका; पहा lysigenous.

**Schizomycophyta ( Bacteria )** सूक्ष्मजंतू विभाग

सर्व प्रकारच्या सूक्ष्मजंतूंचा ( बॅक्टेरिया ) समावेश करणारा विभाग; वर्गीकरणाच्या भिन्न पद्धतीत यानाच Schizophyta, Schizomycetes असे म्हणतात. काही अपवाद सोडल्यास हे सर्व जंतू परोपजीवी आहेत; त्यांचा आकार भिन्न परंतु आकारात फारच लहान व संरचना अत्यंत साधी तथापि त्यांचे क्रियाशीलत्व महत्वाचे असते. त्यांचे प्राचीनत्व वादातीत आहे; त्यांची प्रजोत्पत्ती द्विखंडनामुळे होते म्हणून त्या अर्थाचे ग्रीक नांव दिले आहे. तसेच त्यांचे कवकांशी असलेले साम्य ( हरितद्रव्याचा अभाव ) त्याच नावात सूचित केले आहे.

**schizopetalous** भेदित प्रदली

चिरलेल्या ( फाटलेल्या ) पाकळ्या असलेले; उदा. गोंड्याची जास्वंद ( *Hibiscus schizopetalous* Hook.)

**sciad ( sciophyte )** छायावासी वनस्पति

सावलीत वाढणारी वनस्पती; उदा. नेचे, शेवाळी, इ.

**scion** कलम फांदी

एखाद्या खुंटावर कलम स्वरूपात बांधून वाढविण्याकरिता आणलेली दुसरी कोवळी फांदी; पहा stock.

**sciophilous** छायाप्रिय वनस्पती

**Scitamineae** कदली गण; सिटॅमिनी

केळ, कर्दळ, आले, इत्यादी एकदलिकित वनस्पतींचा गण. यामध्ये आराट कुल, कर्दळ कुल, कदली व शुण्ठी कुल यांचा अंतर्भाव करतात; हचिन्सन यांनी याला शुण्ठी गण ( झिंजिबरेलीझ ) म्हटले आहे. बेसींच्या पद्धतीत याच गणाला इरिडेलीझ असे नाव देऊन त्यामध्ये अननस कुल व मुसळी कुल यांचाही समावेश केला आहे. वेखंड, वेलची, हळद, इत्यादींचाही अंतर्भाव शुण्ठी कुलात केला जातो. त्रिभागी एकसमात्र फुले; संवर्त व पुष्पमुकुट भिन्न; केसरमंडळात ऱ्हास; वंध्यकेसर पाकळ्यासारखे; अधःस्थ किंजपुटात तीन कप्पे व बियांत परिपुष्क ही लक्षणे या गणात आढळतात. पहा Cannaceae, Marantaceae, Musaceae, Zingiberaceae.

**sclereid** कठक कोशिका

फार कठीण आवरण असलेली कोशिका; अश्मगर्भी फळांचे अंतःकवच या कोशिकांचे बनलेले असते.

**Sclerenchyma** दृढोतक

घन कोशिकावरण असलेला मृत व लांबट कोशिकांचा समूह; वनस्पतींना काठिण्य आणण्यास भिन्न अवयवात याचा वापर आढळतो; लांबट कोशिकांना दृढसूत्र म्हणतात ( sclerenchymatous fibre ).

**sclerite** कठक

घनावरणाची कठीण कोशिका; यामध्ये भिन्न आकार असून कधी आवरणावर स्फटिक असतात; उदा. कमळाचा देठ.

**Sclerotium** जालाश्म

काही कवकातील ( उदा. अर्गट ) सुप्तावस्थेतील अनेक तंतूंचा घन जुडगा; हा निष्क्रिय अवस्थेत जमिनीवर पडून राहतो, पुढे तो रुजून नवीन बीजुके बनतात व त्यापासून नवीन तंतू वाढतात.

**Sclerophyllous** चर्मिलपर्णी

चिवट व कठीण पाने असलेली ( वनस्पती ); उदा. रबर, रुई, कण्हेर, वड, कांदळ.

**scorpioid cyme (cincinus)** वृश्चिकाभ वल्लरी

कुंठित फुलोऱ्यातील एकपद प्रकारापैकी एक; यामध्ये मुख्य अक्षावर फूल येऊन वाढ खुंटल्यावर अनेक नवीन अक्ष एकाआड एक येऊन त्यापैकी प्रत्येकाची वाढ तशीच खुंटते; सर्व अक्षांचा मिळून एक सलग अक्ष (संयुत पद) बनतो; त्यावर फुलांच्या दोन रांगा व टोक

वाकडे व गुंडाळीप्रमाणे असते; तो विंचवाच्या नांगी-प्रमाणे दिसतो म्हणून त्या अर्थाचे नाव पडले आहे; उदा. कंचट कुल; घायमारी कुल, भुरुंडी इ. पहा helicoid; cymose.

**Scrophulariaceae** नीरब्राह्मी कुल; स्क्रोफ्यूलारिएसी

नीरब्राह्मी, कुटकी, टारफुला, केश, तिलपुष्पी, अंबुली, बांब, हरिणखुरी, दुधाळी, घोल इत्यादी वनस्पतींचे कुल; याचा अंतर्भाव नीरब्राह्मी गणात (स्क्रोफ्यूलारिएलीझ) केला जातो: हचिंसन यांचा पर्सोनेलीझ गण हा बेसींच्या नीरब्राह्मी गणासारखा आहे. प्रमुख लक्षणे : ओषधी व झुडुपे; द्विलिंगी, पंचभागी, एकसमात्र फुले; केसर-दले २-५; किंजदले दोन, ऊर्ध्वस्थ, जुळलेली व मृदु-फळात किंवा बोंडात सपुष्क अनेक बिया.

**scrub** खुरटे

पाण्याचा अभाव व बाष्पोच्छ्वासाचे आधिक्य यामुळे वाढ खुंटलेले ( झाड ).

**— jungle** खुरटी झाडी ( जंगल )

खुज्या (खुरटलेल्या) झाडांचा समुदाय (एक समावास).

**scurfy** शल्कयुक्त

खवल्यासारखे केस असलेले.

**scutellum** पुष्कादनी

गर्भ व पुष्क यामध्ये ढालीप्रमाणे असणारा जाड भाग; हिलाच काणी दल्कि म्हणतात, कारण पुष्कातील अन्नाचे रूपांतर करून गर्भास पुरवठा करण्याचे काम ती करते; उदा. मका, गहू आणि कित्येक गवते.

**scutiform (scutate)** फलकाकृति

ढालीसारखे.

**— leaf** फलकपर्ण

ढालीप्रमाणे आकाराचे बालपर्ण; उदा. साल्व्हिनिया जलनेचा.

**seaweed** सागरी शैवल

समुद्रात सदैव तरंगत किंवा बुडलेल्या ( निमग्न ) स्थितीत राहणारे शैवल ( किंवा अन्य प्रकारची वनस्पती ).

**secondary** दुय्यम; द्वितीयक

प्रारंभिक किंवा प्रमुख नसलेले; पहिल्यानंतर बनलेले ( दुसरे ).

**— bast** द्वितीयक परिकाष्ठ

प्रारंभिक परिकाष्ठानंतर द्वितीयक विभज्येपासून बनलेले नवीन परिकाष्ठ ( अन्नाची ने-आण करणारे घटक ); पहा bast, phloem.



**— cortex** द्वितीयक मध्यत्वचा; उपत्वक्षा

त्वक्षाकरापासून आतील बाजूस बनलेले मृदूतक; बहुतेक बहुवर्षायू द्विदलित वनस्पतीत आढळते; पहा cork-cambium.

**— formation** द्वितीयक समावास

नैसर्गिक वनस्पति-समुदायात मनुष्याने हस्तक्षेप केल्याने फरक पडून बनलेला नवीन समुदाय ( समावास ); पानझडी जंगलाऐवजी बनलेले तृण-क्षेत्र ( गवताळ प्रदेश ).

**— growth** द्वितीयक वृद्धि

प्रारंभिक वाढीनंतर द्वितीयक विभज्येमुळे घडून आलेली वनस्पतीतील नवीन वाढ; पहा meristem.

**— hybrid** द्वितीयक संकरज

आईबापापैकी एक किंवा दोघेही संकरज असल्याने निर्मिलेली नवीन संकरपिढी.

**— medullary ray** द्वितीयक निकाष्ठ-किरण

प्रारंभिक निकाष्ठ-किरणांमध्ये असून निकाष्ठापर्यंत न पोचलेला व द्वितीयक विभज्येपासून बनलेला मृदूतकाचा पट्टा; पहा pith; parenchyma.

**— meristem** द्वितीयक विभज्या ( ऊतककर )

प्रारंभिक विभज्येपासून बनलेल्या काही स्थायी ऊतका-पासून बनलेली नवीन विभज्या ( सतत कोशिकांची विभागणी होऊन नवीन कोशिका बनविणारे ऊतक; ऊतककर ) पहा meristem, cambium, phellogen.

**— nucleus** दुय्यम प्रकल

पहा प्रकल.

**— petiole** दुय्यम वृंत; वृंतक

संयुक्त पानाच्या दलाचा देठ.

**— root** दुय्यम मूळ

प्रधान मुळापासून आलेले मूळ.

**— spore** दुय्यम बीजुक

एक बीजुक रुजून त्यातून आलेल्या तंतूपासून किंवा त्या बीजुकापासून बनलेले बीजुक; उदा. गदाबीजुक; वि-बीजुक.

**— tissue** द्वितीयक ऊतक

ऊतककरापासून नव्याने बनलेला कोशिकासमूह.

**— wood (xylem)** द्वितीयक प्रकाष्ठ
नव्या ऊतककरापासून बनलेला वाहिकांचा किंवा वाहिन्यांचा, सूत्रांचा, व आनुषंगिक जलवाहक कोशिकांचा संच; पहा xylem, protoxylem.

**secretion** स्रवण; स्राव
विशिष्ट कोशिकांतून (प्रपिंडीय) पाझरणारा द्रव पदार्थ; कधी हा वनस्पतीच्या तशा कोशिकेबाहेर पडून शरीरातील पोकळीत साचून राहतो (उदा. चीक, राळ, इ.) तर कधी तो शरीराबाहेर पडतो (उदा. मधुरस, गोंद, इ.). पाझरलेल्या पदार्थांना वनस्पतिजीवनात काही कार्य असते अगर ते पदार्थ टाकाऊ असतात. पहा nectary; insectivorous plants; gland.

**secretory** स्रावक
पाझर (स्रवण) करणारी (कोशिका अथवा ऊतक).

**— duct** स्रावी नलिका
स्रावक कोशिकांनी वेढलेली नळीसारखी पोकळी.

**— gland** स्रावक प्रपिंड

**— product** स्रावोत्पाद; स्राव
पाझरलेला पदार्थ. पहा gland.

**— sac** स्रावक कोश
गोंद, राळ यासारखे उत्सर्जित पदार्थ स्वतःच्या पोकळीत साचवून ठेवणारी कोशिका अगर काही कोशिकांचा समूह.

**— tissue** स्रावी ऊतक
प्रपिंडाचे कार्य करणाऱ्या कोशिकांचा समूह; उदा. कीटकभक्षक वनस्पतींपैकी काहीत कीटकांचे पचन करणारा पदार्थ स्रवणारे ऊतक विशिष्ट अवयवात आढळतात; उदा. नेपेंथस (घटपर्णी); पहा laticiferous tissue.

**section** काप; छेद
सूक्ष्मदर्शकाने निरीक्षण करण्याकरिता तीक्ष्ण चाकूने (पात्याने, वस्तऱ्याने) कापून काढलेला पातळ चकतीसारखा तुकडा (उभा किंवा आडवा).

**secund** एकांगी; एकपार्श्वी
एकाच बाजूवर फुले आहेत असा दिसणारा फुलोरा.

**sedimentary** अवसादी
गाळाने बनलेली.

**seed** बीज, बी
बीजी वनस्पतींच्या फुलातील किंवा शंकूतील बीजकात घडून आलेल्या लैंगिक प्रक्रियेनंतर त्यापासून बनलेला, पुढील पिढीच्या निर्मितीस जबाबदार असलेला, तसेच वनस्पतींच्या प्रसारास मदत करणारा सुटसुटीत व महत्त्वाचा अवयव;
पहा ovule, Phanerogamae.

**seed-coat** बीजावरण
बीजातील गर्भ (आदिमूल, आदिकोरक व दलिका) व असल्यास पुष्क व परिपुष्क या सर्वांचे वेष्टन. पहा testa, tegmen; aril.

**seed-fern** बीजी नेचा
पहा Pteridospermae.

**seed — germination** बीजांकुरण
बीजाची उगवण. पहा germination.

**seedless plant** बीजहीन (अबीजी) वनस्पती
पहा Cryptogamae.

**seedling** रोपा; रोप
बीज रुजून आलेली नवीन लहान वनस्पती.

**segment** खंड; खंडक
निसर्गतः विभागल्याने निर्माण झालेला एखाद्या कोशिकेचा किंवा अवयवाचा भाग; उदा. पान, फळ, अग्रस्थ कोशिका, रंदुक, इ.

**segmentation** खंडीकरण; खंडीभवन; खंडन
खंड (भाग) निर्मितीची प्रक्रिया. उदा. रंदुकाच्या खंडीभवनाने गर्भविकासास सुरवात होते.

**segregation** विभक्तीकरण
प्रजोत्पादनात गंतुकनिर्मितीचे वेळी जनककोशिकात एकत्र असलेले वैकल्पिक गुण अलग होऊन, जोडीतील प्रत्येक गुण भिन्न गंतुकातून स्वतंत्रपणे पुढील पिढीत उतरतो, ती प्रक्रिया (घटना); पहा assortment; allelomorphic characters.

**seismonastic** कंपानुकुंचनी
कंपनामुळे ग्रहणशील अवयवात बदल घडून येण्याची क्षमता असणारे; त्यामुळे संबंधित अवयवाची प्रतिसादात्मक हालचाल करण्याची क्षमता असणारे; कंपनाला संवेदनाक्षम असणारे अवयव अथवा त्यांची प्रतिक्रिया.

**selenotropism** चंद्रानुवर्तन
चंद्रप्रकाशाच्या चेतनेमुळे घडून येणारी वनस्पतींच्या अवयवाची वृद्धियुक्त हालचाल.

**self-bred (selfed)** स्वफलित (संतती)
स्वपरागणामुळे निर्माण झालेली (संतती).

**— fertilisation** स्वफलन

स्वपरागणामुळे किंवा स्वतः निर्माण केलेल्या प्रजोत्पादक घटकांमुळे घडून आलेली लैंगिक प्रक्रिया ( अंडुकाचे फलन ).

**— pollination** स्वपरागण

एकाच फुलातील पराग तेथील किंजल्कावर पडणे ( येणे ).

**— sterility** स्वयंवंध्यत्व

एकाच फुलातील पराग व किंजल्क यांचा संपर्क उपयुक्त नसण्याचा प्रकार.

**— sown** स्वरोपित; अडाऊ

वनस्पतीने स्वतःच बी पसरवून व रुजून आलेली ( नवीन वनस्पती ) ओसाड जागी अशा अनेक वनस्पती आढळतात.

**semester ring** वर्षार्ध वलय

उष्णकटिबंधातील कित्येक वृक्षांत, एका वर्षात दोनदा वाढ व एकदा विश्रामकाल यामुळे बनलेली वलयाकार काष्ठनिर्मिती.

**semi-** अर्ध

उपसर्गाप्रमाणे किंवा प्रत्ययाप्रमाणे मराठीत वापरतात.

**— amplexicaul** अर्धसंवेष्टी

तळाशी अर्धवटपणे खोडास वेढणारे ( पान ); उदा. तापमारी ( *Aralia* sp. ); तंबाखू; म्हातारा ( *Sonchus oleraceous* L. ).

**— aquatic plant** अर्धजलवनस्पति

जमिनीत मुळे असून काही पाने पाण्यात बुडलेली किंवा पाण्यावर अशी वनस्पती; पाणकणीस, कोळशिंदा. इ. पहा. amphibious.

**— cell** कोशिकार्ध

कोशिकेच्या दोन सारख्या भागांपैकी एक; उदा. डेस्मिड नावाचे सूक्ष्म शैवल.

**— desert** अर्धमरुस्थल

रुक्षस्थल किंवा रुक्ष जंगल आणि तृणक्षेत्र यामधील प्रदेश.

**— equitant** अर्धाध्यारूढ

पर्णसंबंधाचा एक प्रकार; कळीमध्ये एका पानाचा मध्यरेषेवर दुमडलेला अर्धा भाग दुसऱ्या पानाच्या तशा अर्धावर वेढून राहतो; दोन्ही संमीलित असतात. पहा conduplicate; equitant.

**— inferior** अर्ध अधःस्थ ( अर्धाधःस्थ )

संवर्ताने अर्धवट वेढलेला किंजपुट; उदा. बीट.

**— lunar** अर्धचंद्राकृति

अर्धवर्तुळाप्रमाणे ( उदा. पान, पाकळी, बी, इ. )

**seminiferous scale** बीजधारी शल्क

शंकुमंत वनस्पतींच्या बीजकधारी शंकूतील छदशल्का-व्यतिरिक्त बीजक धारण करणारा खवला किंवा तत्सम उपांग.

**semiorbicular** अर्धगोलाकृति

अर्ध्या वर्तुळाप्रमाणे आकार असलेला अवयव; उदा. ब्राह्मीचे किंवा काही नेचांचे पान.

**semiparasitic** अर्धजीवोपजीवी

हिरवी पाने अगर खोड असलेली परंतु पाणी व खनिजे इतर स्वतंत्र वनस्पतीपासून घेणारी वनस्पती: उदा. बांडगुळ ( लोरँथस, व्हिस्कम, इ. ); चंदन, इ.

**semipermeable** अर्धपार्य

पूर्णपणे पाणी व विरघळलेले पदार्थ आरपार जाऊ न देणारे; कोशिकावरण पूर्ण पार्य असते, परंतु प्राकलाचा बाहेरील अधिक दाट भाग काही पदार्थ आत जाऊ देतो तर आतील काही पदार्थ बाहेर जाण्यास प्रतिबंध करतो.

**— membrane** अर्धपार्य पटल

वरप्रमाणे बाह्यप्राकलाचा भाग किंवा तत्सम दुसरा पापुद्रा.

**semiterete** अर्धशूलाकृति

लांब, अर्धगोल, व टोकाकडे निमुळते असलेल्या काठी-प्रमाणे ( देठ, खोड, फळ, इ. ); उदा. ताडाच्या किंवा केळीच्या पानाचा देठ.

**senescence** जीर्णता

वयोमान वाढत गेल्याने जीवद्रव्याला आलेली कमजोरी.

**sensation** संवेदना

चेतकाला ( प्रेरकाला ) प्रतिसाद.

**sensibility (irritability)** संवेदनशीलता; संवेदनाक्षमता;

चेतनेला (उत्तेजनाला) प्रतिसाद देण्याची क्षमता.

**sensitive** संवेदनाक्षम; संवेदी

प्रतिसाद देणारे (उदा. लाजाळूचे पान).

**sensory** संवेदी

चेतनाग्रहण करून प्रतिसाद देणारे; केस कोशिका, इ. उदा. काही कीटकभक्षक वनस्पतींच्या पानावरचे केस

(उदा. डायोनिया). काही वेलींच्या तगाऱ्यांची (प्रतानांची) किंवा खोडांची टोके.

**sepal** संदल

फुलाच्या देठावर असलेल्या व फुलातील दलांच्या चार मंडलातील पहिल्या (संवर्त) मंडलाचा एक भाग; पहा calyx.

**sepalody** संदलीभवन

इतर पुष्पदलांचे संदलांत रूपांतर.

**sepaloid** संदलाभ; संदलसम

संदलासारखे (बहुधा हिरवे व आकाराने लहान निमुळत्या पानासारखे); उदा हिरव्या चाफ्याच्या किंवा सिताफळाच्या फुलातील पाकळ्या.

**separate flower** स्वतंत्र (एकलिंगी) फूल

पहा diclinous.

**separating layer** अपाच्छेदक स्तर

विभाजक (विमोचक) थर; पहा abscission.

**septal** पट—

पडद्याचे; पडद्यासंबंधी; (उपसर्गाप्रमाणे ही संज्ञा वापरतात; उदा. पट–मधुप्रपिंड)

**septate** सपट; पटयुक्त; पटमय

लहान पडदा (पडदे) असलेला (उदा. किंजपुट; बीजुक, मेंड, फळे इ.).

**septicidal** पटभिदुर

फळातील पडद्यांच्या संधिरेषेवर तडकण्याचा प्रकार. उदा. पोपटवेल; सापसंद, इ. येथे फळाची शकले बियांसह स्वतंत्र होतात.

**septifragal** पटभंगुर

फळातील पडदे केंद्रापासून तुटून निघण्याचा प्रकार. यामध्ये पटभिदुर व पुटकभिदुर या दोन्हींपैकी एक प्रकारही आढळतो. उदा. घोत्रा; तूण; येथे फळाची शकले बियांशिवाय अलग होतात; पहा loculicidal.

**septum** पट; पडदा

दोन किंवा अधिक भागात विभागणी करणारा कोशिकांचा (ऊतक) थर; पहा diaphragm; replum.

**seriate** श्रेणीबद्ध

अनेक रांगा असलेले; उदा. पानांची मांडणी.

**series** क्रम; श्रेणी

(१) सर्वात कमी मूल्य असलेल्यापासून ते ओळीने (नियमितपणे) सर्वात अधिक मूल्य असलेल्यापर्यंतची एक माला (रांग);

(२) वर्गीकरणात भिन्न अर्थाने वापरलेले एकक; बहुधा उपवर्गाच्या खालच्या दर्जाचे.

**serial order** क्रमांक

क्रमात असलेल्या स्थानाप्रमाणे.

**serotinal (serotinous)** विलंबित; शरदीय, शरद–

फार उशिरा बनलेले (ऋतूच्या किंवा वर्षाच्या शेवटी).

**serrate** दंतुर; दातेरी

टोकाकडे वळलेले टोकदार दाते असलेली (कडा); उदा. तुळस; जास्वंद; सालई (*Boswellia serrata* Roxb.).

**serrulate** लघुदंतुर

फार बारीक दाते असलेली किनार (कडा).

**sessile** अवृंत

बिनदेठाचे किंवा चिकटून असलेले (पान किंवा फूल).

**set** गट; संच

कुलांचा, वंशांचा, किंवा गणांचा एक गट.

**seta** दंड; रोम

शेवाळी वनस्पतींत आढळणाऱ्या बीजुकधारीच्या तीन भागांपैकी (पद, दंड बीजुकाशय) एक बहुधा लांब दांड्यासारखा भाग; गवतांच्या तुसावरील टोकदार केस (रोम); पहा awn.

**setaceous (setose)** रोमश; रोमिल

ताठर केस असलेला (पृष्ठभाग).

**setiform** रोमसम; रोमाभ

ताठर लहान केसासारखे.

**sex** लिंग; लिंगभेद

वनस्पतींतील (किंवा प्राण्यांतील) नर– व स्त्री–विषयक भेद किंवा कार्ये अथवा तद्विषयक संरचना.

**— cell** लिंगकोशिका

नर किंवा स्त्री यापैकी एकाचे कार्य करणारी कोशिका (प्रजोत्पादक घटक; गंतुक).

**— chromosome** लिंगसूत्र

शरीरातील कोशिकांत किंवा लिंगकोशिकेत (गंतुकात) आढळणारे व विशिष्ट लिंगाबद्दल जबाबदार असलेले रंगसूत्र; काही प्राण्यांत, मनुष्यात व काही शेवाळीत आणि काही फुलझाडांमध्ये अशा प्रकारचे रंगसूत्रभेद (एक्स व वाय) आढळतात तर इतर कित्येकांत असा भेद नसून लिंगयंत्रणा बरीच गुंतागुंतीची असते; कधी वाय ऐवजी रंगसूत्राचा अभाव आढळतो (एक्स व ओ).

पहा X– chromosome; Y–chromosome.

**sex-determination** लिंगनिश्चिती; लिंगनिर्णय

संततीत नर अथवा मादी ( हे फरक ज्या सजीवांत स्पष्ट असतील तेथे) व्यक्ती जन्मास यावी ही बाब नरगंतुके व स्त्री-गंतुके यांच्या संयोगाचे वेळी (उदा. मनुष्ये ) किंवा तत्पूर्वी लिंगसूत्रामुळे ठरण्याची प्रक्रिया अथवा इतर प्रकारच्या लिंगयंत्रणेतील तरतुदीनुसार ठरण्याची घटना; फारच थोड्या उच्च वनस्पतींत नर व मादी असा बीजुकधारी पिढीचा प्रकार आढळतो; खालच्या दर्जाच्या वनस्पतीत लघु- व गुरु-बीजुकापासून दोन प्रकारची गंतुकधारी पिढी (शरीर) बनते; तेथे लिंगनिश्चिती बीजुकोत्पादनाचे वेळी होते; तसेच वरच्या दर्जाच्या वनस्पतीत परागकण आणि गर्भकोशिकातील अंदुक वगैरे कोशिका बनतात त्यावेळी होते.
पहा spore; gamete; gametophyte.

**sex-differentiation** लिंगप्रभेदन

नर व मादी असा भेद व्यक्ती, अवयव, प्रजोत्पादक कोशिका इत्यादींत दिसून येण्याचा प्रकार. वनस्पतींत भिन्न वर्गात हे प्रभेदन भिन्न प्रमाणावर आढळते.

**sex-linkage** लिंग-सहलग्नता

वनस्पती व प्राणी यांच्या भिन्न जातींत आढळणारी काही लक्षणे नर किंवा मादी यांच्या विशिष्ट रंगसूत्राशी संबंधित असण्याचा प्रकार; यामुळे अनुहरण (एका पिढीतून दुसऱ्या पिढीत ) गंतुकातील लिंगसूत्रावरील जनुकातर्फे होत असावे.

**sex- ratio** लिंगप्रमाण

लोकसंख्येतील स्त्री–पुरुषांचे परस्परांशी प्रमाण हे प्रत्येक शंभर स्त्रियांना किती पुरुषांची संख्या पडते यावरून काढले जाते. प्राथमिक गुणोत्तर रंदुकोत्पत्तीनंतर, द्वितीयक गुणोत्तर जन्मानंतर व तृतीयक गुणोत्तर पूर्ण वाढीनंतर काढतात, कारण त्यामुळे काही उद्बोधक निष्कर्ष काढता येतात.

**sex- reversal** लिंगविपर्यय; लिंगबदल

काही नैसर्गिक घटनेमुळे व्यक्तीच्या विद्यमान लिंगलक्षणांत बदल घडून येण्याचा प्रकार; यामुळे नराचे रूपांतर मादीत किंवा त्या उलट होते. प्राण्यांत कधी कधी पण वनस्पतीत फार क्वचित ही घटना आढळते.

**sexual dimorphism** लैंगिक द्विरूपता

भिन्न लिंगाप्रमाणे बाह्यलक्षणांतील फरक असणे.

**— generation** लैंगिक पिढी; गंतुकधारी

पहा. gametophyte

**— organ** लैंगिक अवयव; जननेंद्रिय

फक्त लैंगिक प्रक्रियेशीच संबंध येणारे अवयव; उदा. रेतुकाशय, अंदुककलश इ.

**— reproduction** लैंगिक जनन

सलिंग प्रजोत्पादन; लिंगभेद दर्शविणाऱ्या व रंगसूत्रांचा एक गट असणाऱ्या (एकगुणित) कोशिकांच्या (गंतुकांच्या) मीलनापासून घडून येणारी संततीची निर्मिती; पहा haploid.

**— system** लैंगिक पद्धति

कार्ल लिनियस या स्वीडिश शास्त्रज्ञांनी बनवलेली, वनस्पतींतील लैंगिक अवयवांची ( पुं–केसर व स्त्रीकेसर ) संख्या व त्यांचे स्थान यावर आधारलेली कृत्रिम वर्गीकरण व्यवस्था.

**shade-leaf (ombrophile)** छायापर्ण

नियंत्रित प्रकाशाशी समरस होणाऱ्या ( अनुकूलित ) संरचनेचे पान.

**— plant** छायापादप

छायेत चांगली वाढू शकणारी व तेथील परिस्थितीशी समरस झालेली वनस्पती; उदा. नेचे.

**— loving** छायाप्रिय

छाया पसंत करणारे अथवा छायेतच आढळणारे ( झाड ).

**— tree** छायी वृक्ष

छाया ( सावली ) देणारा वृक्ष.

**sheath** आवरण

नळीसारखा किंवा तत्सम लपेटणारा भाग किंवा अवयव; उदा. गवताच्या पानाचा तळभाग; केळ, कर्दळ यांचे देठ.

**—, bundle-** वृंदावरण

वाहक वृंदाभोवती असलेला ऊतकांचा मर्यादक थर; पहा vascular bundle.

**sheathing** आवरक

दुसऱ्या अवयवाभोवती वेढून राहणारा भाग; उदा. कर्दळ, केळ, यांच्या देठाचा तळभाग.

**shell** कवच; करवंटी

१) अश्मगर्भी फळातील ( उदा. नारळ, अक्रोड, आंबा, इ. ) आठळीचे कठीण आवरण;

२) शुष्क, न तडकणारे, एकबीजी, कठीण फळाचे बाह्य आवरण; उदा. काजू, ओक (वंजूफल).

**shield-shaped** ढालाकृति

(१) ढालेच्या आकाराचे (पान); उदा. शैवाकांतील मुक्त धानीफल; कारेसी (कांड शरीरिका) कुलातील वनस्पतींत आढळणारी रेतुकाशयाशी संबंधित ढाल कोशिका; (२) शंकूतील खवल्यांचे बाहेरचे समचतुर्भुज टोक; इ.

**shoot** प्ररोह; धुमारा

सर्वसाधारणतः वनस्पतीचा जमिनीवर वाढणारा खोड, पाने, फुले इत्यादींनी युक्त असा भाग; याउलट जमिनीत वाढणारा भाग– मूळ ही व्याख्या सापवाद असूनही वरील संज्ञा तशाच वापरतात. फक्त फुलाला 'पुनरुत्पादक प्ररोह' असे म्हणतात, कारण त्यामध्ये अक्ष व पुष्पदले असतात.

**—, vegetative** शाकप्ररोह

फक्त खोड व पाने यांनी बनलेला भाग.

**short-day-plant** लघुदिन-पादप

बारा तासापेक्षा लहान दिवस असतानाच फुलणारी वनस्पती.

**shrub** क्षुप; झुडूप

वृक्षापेक्षा लहान, अनेक वर्षे जगणारी, काष्ठयुक्त वनस्पती; याला जमिनीच्या पातळीपासूनच अनेक फांद्या येतात; उदा. घाणेरी, कण्हेर, गुलाब, संकेश्वर, चिनी कंदिल.

**— land** क्षुपवन

झुडपांच्या आकाराच्या (व प्रकाराच्या) वनस्पतींचा नैसर्गिक समुदाय.

**— let** क्षुपक

झुडपापेक्षा लहान परंतु इतर लक्षणांत त्यासारखीच वनस्पती; उदा. सदाफुली.

**sieve-area** चालनी क्षेत्र

लांबट कोशिकेतील उभ्या भिंतीवर असलेला छिद्रयुक्त मर्यादित भाग.

**sieve-cell** चालनी कोशिका

चाळणीसारखे आडपडदे असलला नळीसारखा घटक; अनेक वनस्पतींत याचे कार्य अन्नरसाची ने-आण करण्याचे असते.

**— element** चालनी घटक

चाळणी घटक; चाळणी असलेली कोशिका किंवा नळी.

**— plate** चालनी पट्टिका; चाळण; चालनी बिम्ब

चाळणी असलेल्या लांबट कोशिकेतील किंवा नलिकेतील भोके पडलेला आडवा पडदा; या भोकांतून जीवद्रव्याचे धागे जातात. कधी कधी हा पडदा बाजूच्या भिंतीवरही असतो; अनेक चाळण्यांची संयुक्त पट्टिका असते; पहा phloem.

**— tube** चालनी-नालिका; चाळण नळी

अनेक चाळण-कोशिका जुळून बनलेली सलग नळी. मात्र यांमध्ये आडव्या पडद्यावर किंवा बाजूस आरपार भोके असतात.

**sigmoid** सिग्माभ

s या इंग्रजी अक्षराप्रमाणे.

**silage** मुरघास

उंच कप्प्यात बंदिस्त ठेवून व वितंचन (काहीसे कुजवून) घडवून आणलेले गवत (वैरण); मुरलेले गवत.

**silica** सिकता, रेती, वालुका; वाळू

खडकाचा भुगा.

**silicification** सिकताधान; वालुकाधान

कोशिकावरणात बारीक रेतीचे कण जाऊन बसण्याची प्रक्रिया; उदा. गवतांची पाती, करंडक वनस्पतींचे कोशिकावरण.

**silicula (silicle)** सार्षपक

लहान सार्षप फळ; उदा. कँडिटफ्ट; कॅप्सेला.

**siliqua (silique)** सार्षप

दोन किंजदलापासून बनलेले, शुष्क, अनेकबीजी, दोन्ही शिवणीवर तडकणारे व मध्ये असलेल्या खोट्या (छद्मपट) पडद्यावर बिया राखून ठेवणारे फळ; फळाची शकले (तुकडे) खालून वर तुटत जातात; उदा. मोहरी, कोबी, इ.

**silva (sylva)** वृक्षवर्णन; वृक्षज्ञान

एखाद्या स्थानातील (जिल्हा) वृक्षांची माहिती.

**silvery** रुपेरी; चंदेरी

चांदीसारखे चकचकीत. उदा. आंबगुळाच्या पानांची खालची बाजू.

**silvestris** वन्य

वनात वाढणारे; उदा. शिंदी (*Phoenix silvestris* Roxb.).

**silviculture** वनवृक्षविज्ञान

वनात वाढणाऱ्या वृक्षासंबंधीची सर्व माहिती.

**similarity** साधर्म्य; साम्य
सारखेपणा.

**simple** साधे

**—fruit** साधे फळ
एका किंजपुटापासून बनलेले फळ; उदा. आंबा, पेरू.

**— inflorescence** साधा पुष्पबंध
एकाच अक्षावर आलेल्या फुलांचा घोस; उदा. मंजरी, कणिश, इ; क्वचित एकच फूल असलेला अक्ष.

**— leaf** साधे पान
मुख्य देठाला (असल्यास) जोडून असलेला पानाच्या पात्याचा एक भाग असलेले पान; उदा आंबा, वड, पिंपळ.

**— pistil** साधे किंजमंडल
एका किंजदलाचे बनलेले किंजमंडळ; उदा. वाटाणा, घेवडा, इ.

**— sorus** साधा बीजुककोशपुंज
सर्वच बीजुककोश एकाच वेळी पक्व होणारा समूह; पहा gradate sorus; mixed sorus.

**— stem** साधे खोड
शाखा नसलेले खोड; उदा. नारळ, सुपारी, इ.

**simplex** एकघटक
पहा duplex.

**single flower** एकेरी फूल
पाकळ्यांचे एकच वर्तुळ असलेले फूल; उदा. काकडी, भोपळा, पांढरा चाफा.

**sinistral (sinistrose; left-handed)**
वामावर्त; डावे
पहा anticlockwise.

**sinuate (sinuous)** नतोन्नत
खोलवर खंड पडलेली किनार (पानाची कडा); उदा. ओक.

**sinus** (१) कोटर; विवर (२) फट
(१) दोन खंडातील खोलगट भाग; उदा: डेस्मिड शैवलाच्या कोशिकेच्या दोन अर्धांमधील भाग.
(२) पानाच्या दोन खंडामधला रुंद फटीसारखा भाग.

**siphon** निनाल
अक्षातील केंद्राभोवती असलेली लांबट नलिका; उदा. पॉलिसायफोनिया (लाल शैवले).

**siphonaceous** निनाली
नलिकाकार शैवलासंबंधी; उदा. व्हाउचेरिया.

**siphonogam** निनालयुतिक पादप
परागनलिकेद्वारा फलन होणारी वनस्पती.

**siphonogamous** निनालयुतिक
निनालयुति असणारी (वनस्पती).

**siphonogamy** निनालयुति
परागनलिकेद्वारा घडून येणारे फलन; उदा. बहुतेक सर्व बीजी वनस्पती.

**siphonostele** नलिकारंभ
नळीसारखी मध्यवर्ती वाहक घटकांची (ऊतकांची) संरचना; यामध्ये भेंडाभोवती प्रकाष्ठ व त्यानंतर परिकाष्ठ असते; कधी प्रकाष्ठाच्या दोन्ही बाजूस परिकाष्ठ असते; उदा. ऑस्मुंडा; ॲडिॲंटम; पहा amphiphloic; ectophloic.

**sleep-movement** निशानुकुंचनी क्रिया
प्रकाशाच्या मोठ्या बदलामुळे घडून येणारी हालचाल; उदा. अनेक शिंबी वनस्पती; पहा Leguminosae.

**slide, glass-** काचपट्टी
सूक्ष्मदर्शकांतून निरीक्षण करण्याकरिता वापरलेली काचेची आयताकार पट्टी.

**sliding growh (gliding growth)** सर्पणवृद्धि
वाढ चालू असताना एका कोशिकेच्या आवरणाचा शेजारच्या आवरणाशी संबंध तुटून ती दुसऱ्यावर घसरून नवीन आवरणाशी संपर्क साधण्याचा प्रकार.

**slime- fungus** श्लेष्मकवक
पहा Myxomycetes, Mycetozoa.

**sling- mechanism** गोफण- यंत्रणा
फळ किंवा बी यांशी संबंधित अशा स्फोटक यंत्रणेमुळे बिया दूरवर फेकल्या जाण्याची अंतर्गत योजना; यामध्ये फळाच्या किंवा बियाच्या एखाद्या भागातील अतिस्फीतता किंवा काही भागाची वाढती रुक्षता कारणीभूत होतात. उदा. काटेरी इंद्रायण व तेरडा यांची फळे पूर्ण पिकली असता स्फीतता वाढीमुळे तडकून बिया बाहेर फेकतात; एरंड, गेवा व भांड यांची फळे शुष्कतेच्या विशिष्ट बिंदूप्रत पोचल्यावर तडकतात व फलांश किंवा बिया अलग होऊन दूरवर पडतात; अशा बाबतीत गलोल किंवा गोफण ह्या साधनांनी फेकल्या जाणाऱ्या खड्यांशी साम्य दिसते. अशा फळांना "गोफण- फळे" (sling-fruits) म्हणतात.

**slip** मुनवा; अधश्वर; फुटवा
खोडाच्या तळापासून निघालेला व लागणीकरिता पुनः उपयोगात आणला जाणारा प्ररोह ( शाखा ).

**smooth** गुळगुळीत
पहा glabrous.

**smut (disease)** कांणी; काजळी ( रोग )
उस्टिलॅगो कवकांमुळे अनेक पिकांवर ( मका, बार्ली, ओट, जोंधळा, गहू, उस, इ.) रोग होऊन फळात काळ्या बीजुकांचे उत्पादन होते व पिकाचा नाश होतो म्हणून त्या अर्थाची नावे पडली आहेत.

**snail-pollination** शंबूक-परागण
गोगलगाय किंवा तत्सम प्राण्यांकडून पराग नेण्याची व ते किंजल्कावर टाकण्याची घटना.

**sociability** समाजप्रियता
भिन्न प्रकारचे व भिन्न दर्जाचे समुदाय करून राहण्याची प्रवृत्ती; परिस्थितिविज्ञानात पादप–समुदायातील एखाद्या जातीतील अनेक व्यक्तींचे परस्परसंबंध काय आहेत, हे दर्शविणारी संज्ञा.

**social** समाजप्रिय; संगतिप्रिय
१) एकाच जातीच्या व मोठ्या जागेवर निसर्गतः एकत्र वाढणाऱ्या अनेक वनस्पती; उदा. टाकळा.
२) वनश्रीचे वैशिष्ट्य दर्शविणारी प्रभावी वनस्पती; उदा. साग-वनातील साग.

**social flowers** संगतिप्रिय फुले
गेंदासारख्या स्तबक फुलोऱ्यातील ( उदा. सूर्यफूल कुलातील ) अनेक पुष्पके. पहा Compositae.

**society** संहति; समाज
संगति (association) व संघात (consociation) या वनस्पति-समुदायात गौण मानलेल्या व्यक्तींचा छोटा उपसमुदाय; यातील एखादी व्यक्ती प्रधान ( प्रभावी ) व इतर त्यापेक्षा गौण असतात; परंतु ही प्रधान व्यक्ती संगति व संघात यातील प्रधानाहून भिन्न असते; म्हणून संहति "प्राधान्यातील प्राधान्य (dominance within a dominance)" मानतात. उदा. पळस-संघातात रुई व तिच्या सभोवारची लहान रोपटी यांची संहति आढळते; मोठ्या संघातात पळस प्रधान असतो; संहतीत रुई प्रधान असते.

**—, aspect-** स्वरूप-संहति
विशिष्ट ऋतुमानामुळे घडून येणाऱ्या मोहराने (पुष्पविकसनामुळे) किंवा नवीन पालवीमुळे अधिक ठळकपणे दिसून येणारी गौण वनस्पतींची संहति.

**—, stratum-** स्तर-संहति
विशिष्ट थरातच आढळून येणारी गौण वनस्पतींची संहति.

**sociological, plant-** पादपसमाजशास्त्रीय
वनस्पतींच्या समुदायासंबंधीच्या शास्त्रासंबंधी अगर त्या शास्त्रात अंतर्भूत होणारे.

**sociology, Plant- ( Phytosociology )** पादपसमाजशास्त्र
वनस्पतींच्या नैसर्गिक समुदायांचे स्थान, त्यांचा उगम विकास, संरचना, वर्गीकरण, भौगोलिक वाटणी ( वितरण ) इत्यादींची परिस्थितिसापेक्ष माहिती; पहा Synecology.

**soft bast** मृदु परिकाष्ठ
चाळन–नलिका व निकटवर्ती मृदूतक.

**soil** मृदा; जमीन; माती; भूमी
पृथ्वीवर पसरलेला व निसर्गतः कमी जास्त होणारा लहान मोठ्या कणांचा थर; यामध्ये बारीक रेतीचे कण, जैव पदार्थांचे कण, पाणी व त्यात विरघळलेली खनिजे व काही सूक्ष्मजीव ( सूक्ष्मजंतू, कवक, इ. ) कमी अधिक प्रमाणात असून या भिन्न घटकांच्या प्रमाणावर जमिनीचे गुणधर्म व भिन्न प्रकार ओळखले जातात व त्यानुसार भिन्न संज्ञा वापरतात; उदा. शेत-जमीन, माळजमीन, पोयट्याची जमीन, खार जमीन, रेताड जमीन, दग्धभूमी, खडकाळ जमीन, इत्यादी.

**— - aeration** मृदावातन
जमिनीत हवा ( वायू ) खेळती राहील अशी प्रक्रिया; उदा. निचरा करणे, नांगरणे, कुळविणे, इ.

**— - borne** मृदावाहित; मृदोद्भवी
जमिनीतून संपर्क साधून नवीन वनस्पतीमध्ये ( आश्रयात ) प्रवेश करणारे ( रोग बीज ).

**— - concentration** भूसंहति, मृदासहति
जमिनीतील पाण्यात असलेल्या लवणांचे प्रमाण.

**— - conservation** भूसंरक्षण; मृदासंधारण.
शेतजमिनीतील अथवा कोणत्याही पिकाऊ जमिनीतील महत्त्वाचे घटक नाश पावून ( किंवा धुपून ) ती निकस होऊ नये व लागवडीस योग्य राहावी म्हणून केली जाणारी संरक्षणात्मक प्रक्रिया अथवा योजना; उदा. बांध घालणे, निचरा करणे, इ.

**— - dwelling** भूवासी
जमिनीत नित्य राहणारे ( उदा. कवक, सूक्ष्मजंतू, काही प्राणी इ. ).

**— - evaporation** मृदा-बाष्पन
जमिनीतील पाण्याची वाफ होऊन जाणे.

**— - factors** भूघटक
वनस्पतींच्या जीवनाच्या दृष्टीने महत्त्वाचे व जमिनीशी संबंधित घटक; उदा. पाणी, लवणे, तापमान, प्राणी, कुजकट पदार्थ, हवा व जमिनीच्या भिन्न घटकांच्या कणांचे आकार व आकारमान इ.

**— less culture** मृद्हीन कृषि; जलकृषि
पहा hydroponics.

**— reclamation** भूमि-उद्धार
स्थिर नसलेली व लागवडीस अयोग्य जमीन सुधारून पिकाऊ करण्याची प्रक्रिया.

**— - solution** भूमि-विद्रव
जमिनीतील पोकळ्यात असलेले व विरघळलेली खनिजे असलेले भूमिजल.

**— - stabilisation** भूमि-स्थिरीकरण ( स्थिरण )
माती वाहून जाऊ नये किंवा वायूमुळे तिचे स्थलांतर होऊ नये म्हणून तिला स्थिर करण्याची प्रक्रिया.

**— - temperature** भूतापमान; मृदातापन
जमिनीतील विशिष्ट खोलीवरचे तपमान ( उष्णतेचे प्रमाण ).

**— - water** भूजल
जमिनीतील पोकळ्या भरून राहिलेले व मातीच्या कणांनी धरून ठेवलेले पाणी.

**Solanaceae** धोतरा ( धोत्रा ) कुल; सोलॅनेसी
वांगे ( वृंत्ताक ), बटाटा, टोमॅटो, मिरची, धोतरा, तंबाखू, अश्वगंध, रिंगणी, इत्यादी वनस्पतींचे कुल; याचा अंतर्भाव बेसींच्या पद्धतीत पोलेमोनिएलीझ गणात व हचिन्सन यांच्या मते धोतरा गणात ( सोलॅनेलीझ-मध्ये ) केला जातो. प्रमुख लक्षणे : धोतरा कुलातील वनस्पती ओषधीय किंवा झुडपे असून पाने साधी व एका-आड एक. फुले नियमित, अरसमात्र, द्विलिंगी आणि पंचभागी; सवर्त बहुधा दीर्घस्थायी किंवा सहवर्धिष्णु; पुष्पमुकुट जुळलेल्या पाकळ्यांचा; केसरदले पाच आणि पाकळ्यास तळाशी चिकटलेली; ऊर्ध्वस्थ, दोन किंज-दलांचा किंजपुट आणि फळ मृदू किंवा शुष्क ( बोंड ) असते; या कुलाला ' वृंत्ताक कुल ' असेही म्हणतात कारण वृंत्ताक (वांगे) ज्या वंशात घातले आहे तो वंश (सोलॅनम) प्रमुख आहे.

२८

**solenostele** खंडित रंभ
प्रकाष्ठाच्या आतील व बाहेरील बाजूस परिकाष्ठ असून पर्णविवरामुळे अखंडपणा नाहीसा झालेले रंभ; उदा. नेचे; मार्सिलियाचे मूलक्षोड.

**solitary** एकाकी
एकटे ( उदा. फूल ); उदा. झेफिर लिली; कमळ.

**— gregarious** एकाकी सांघिक
एकाच जातीच्या अनेक वनस्पतींचा एक झुबका (समूह).

**soluble** द्राव्य; विद्राव्य
पाणी किंवा तत्सम द्रवात ( पातळ माध्यमात ) विरघळणारा (त्याशी एकरूप होणारा) घन पदार्थ; ती प्रक्रिया संपल्यावर बनतो तो त्या घन पदार्थाचा द्राव (solution) अथवा विद्रव, द्रावण, विलयन इ.

**solvency** द्रावकता
विरघळण्याचे प्रमाण.

**solvent** द्रावक; विद्रावक
घन पदार्थाला विरघळवून त्याशी एकरूप होणारा द्रव पदार्थ; उदा. पाणी, मद्यार्क, ईथर इ.

**somatic** कायिक; स्थातव
शरीरासंबंधी; शरीरातील.

**— cell** स्थातुक; काय-कोशिका; कायिक पेशी
शरीरातील शाकीय (प्रजोत्पादक नसलेली) कोशिका.

**somatoplasm** स्थातुकल
वाइझमान या शास्त्रज्ञांच्या मताप्रमाणे सजीवांच्या शरीराच्या दोन घटकांपैकी प्रजोत्पादनाशी संबंध नसलेला जीवद्रव्यरूप भाग; पिढ्यानुपिढ्या वाटचाल करीत हा राहात नाही; तो मर्त्य आहे परंतु दुसरा भाग (गंतुकल) प्रजोत्पादक असल्याने भावी पिढीचा स्थातुकल व गंतुकल (germ–plasm) निर्माण करतो; म्हणजे गंतुकल अमर व पिढ्यानुपिढ्या सतत राहणारा आहे. गंतुकलाच्या या सातत्याच्या संकल्पनेला त्यांनी त्यावेळी सिद्धांताचा दर्जा दिला होता; त्यानुसार स्वसंपादित लक्षणांचे अनुहरण होत नाही असा त्यांचा अभिप्राय होता व त्यात बरेचसे तथ्य आहे. पहा germ –plasm.

**sordid** मलिन
मळकट दिसणारा भाग ( उदा. बियावरील केसांचा झुबका; पिच्छसंदले).

**soredium** प्रजनी
शैवाक (धोंडफूल) वनस्पतीत आढळणाऱ्या व अनेक कवकतंतूंनी वेढलेल्या एक अथवा अनेक शैवल

कोशिका; यांचा नूतन घोंडफुले निर्मिण्याकरिता उपयोग होतो.

**sorophore** बीजुकपुंजधर

बीजुककोशांचे अनेक पुंज धारण करणारा श्लेष्मल धागा; उदा. मार्सिलिया ( जलेंचा ).

**sorosis** फलपुंज

कणिश फुलोऱ्याच्या अनेक फुलांपासून बनलेल्या अनेक फळांचे एकच संयुक्त फळ; बहुधा हे मांसल असून फुलोऱ्याचा अक्ष व फुलांचे इतर भाग फळात समाविष्ट होतात; उदा. फणस, अननस, बारतोंडी, तुत, केवडा, इ.

**sorus** बीजुककोशपुंज

अनेक बीजुककोश एकाच स्थानापासून ( बीजकाधानी ) निर्मिल्याने बनलेला समूह; उदा. नेचे.
पहा sporangium, placenta.

**spadix** स्थूलकणिश

जाडजूड किंवा मांसल दांडा ( पुष्पबंधाक्ष ) असलेला फुलोरा ( कणिश ). उदा. अळू, सुरण, नारळ इ.

**sparse** विखुरलेले

(sparsiflorus=विखुरलेली फुले असलेले फुलझाड; उदा. *Croton sparsiflorous* Morong).

**spathe** महाछद

स्थूलकणिशाला संरक्षण देणारा मोठा पानासारखा अवयव ( छद ).

**spathulate** चमसाकृति

आयत व टोकास रुंद व सपाट आणि तळाशी अरुंद होत गेलेल्या कलथा किंवा चमच्याप्रमाणे आकाराचे; ( उदा. पान, पाकळी किंवा तत्सम अवयव ).

**special creation, doctrine of** विशेष जनन सिद्धांत

सध्या अस्तित्वात असलेले सर्व सजीव आहेत तसेच पूर्वी एकदाच परमेश्वराने निर्माण केले असून त्यांत काही बदल झालेले नाहीत असा जुना परंतु आता पुराव्याभावी न मानला जाणारा सिद्धांत. पहा organic evolution.

**species** जाती

वनस्पतींच्या ( किंवा प्राण्यांच्या ) वर्गीकरणातील सर्वात लहान एकक. एका जातीतील सर्व व्यक्तींची विशिष्ट लक्षणे सारखी व निश्चित असतात; उदा. आंबा, जास्वंद, कण्हेर, इत्यादी वनस्पती आणि मांजर, कुत्रा, कावळा इत्यादी प्राणी यांना जाती म्हणतात. यांपैकी अनेकांत प्रकार असल्याचे आढळते.

**—, indifferent** उदासीन जाती

अनेक विविध प्रकारच्या पादपसमुदायात आढळणारी जाती; पहा fidelity.

**—, physiologic** क्रियावैज्ञानिक जाती

एका जातीच्या परंतु क्रियाविज्ञानाच्या दृष्टीने फरक दर्शविणाऱ्या व्यक्तींचे लहान गट अथवा एकक.

**specific** जातिविशिष्ट; जातीय

जातीसंबंधी; विशेषत्व असलेली ( लक्षण ). .

**— character** जातिविशिष्ट गुण

एखाद्या जातीत आढळणारा विशेष प्रकारचा गुण किंवा दोष; उदा. सुगंधी किंवा दुर्गंधी फुले.

**— epithet** जाति-गुणनाम

पहा epithet.

**-- name** जातिवाचक नाव

वनस्पतींच्या ( किंवा प्राण्यांच्या ) दुहेरी नामातील बहुधा विशेषत्व दर्शविणारा भाग; पहिला भाग वंशनामनिर्देशक व दुसरा विशेषत्व निर्देशक ( विनिर्देशक ) असतो. उदा. लंबपर्णी ( *longifolia* ), विस्तृतपर्णी ( *latifolia* ), काटेरी ( *spinose* ); काटेमाठ ( *Amarantus spinosus* L. ).

**specimen** नमुना; प्रादर्श

अभ्यासाकरिता घेतलेली वनस्पती ( किंवा प्राणी ) किंवा तिचा भाग ( छेद ).

**sperm-cell** पुं-गंतुक

प्रजोत्पादक व बहुधा क्रियाशील, सूक्ष्म नर- ( पुं- ) कोशिका; रेतुक.

**sperm-nucleus** रेतुक प्रकल; पुं-प्रकल

रेतुकातील प्रकल; परागनलिकेतील किंवा तत्सम अवयवांतील नर-गंतुकाप्रमाणे क्रियाशील होणारा म्हणजेच अंदुकाशी ( स्त्री-गंतुकाशी ) संयोग पावणारा प्रकल. पहा nucleus.

**Spermaphyta** बीजी वनस्पति विभाग

पहा Phanerogamae.

**spermatangium (antheridium)** अचर रेतुकाशय

एकच अचर रेतुक निर्माण करणारी कोशिका.

**spermatium** अचर रेतुक

स्वतंत्रपणे हालचाल न करणारे पुं-गंतुक; उदा. लाल शैवले; धानीकवक (तांबेरा).

**spermatid** रेतुक-जनक

रेतुकोत्पादन करणारी कोशिका.

**spermatocyst** रेतुकाशय-जनक

रेतुकाशये निर्माणारी कोशिका; उदा. शेवाळी.

**spermatogenesis** रेतुकजनन

पुं-गंतुके निर्माण करण्याची प्रक्रिया.

**Spermatophyta** बीजी वनस्पति विभाग

पहा Phanerogamae.

**spermatozoid** रेतुक

हालचाल करणारे ( पोहणारे ) सकेसल पुं-गंतुक. उदा. शेवाळ, नेचे, इ.

**spermogonium ( spermogone )** पालिघ

अचर रेतुकांची निर्मिती करणारा पेल्यासारखा अवयव; उदा. धानीकवक; पहा pycnium.

**sphaeraphide** स्फटिकपुंज

अनेक स्फटिकांचा गोलाकार पुंजका; हे स्फटिक कॅल्शियमच्या ऑक्झॅलेट व कार्बोनेटचे असतात.

**sphaeroid** गोलाकार

चेंडूसारखे; वाटोळ्या घन वस्तूप्रमाणे; उदा. बाभूळ, लाजाळू किंवा कदंब यांच्या गोल गेंदासारखे ( स्तबकाप्रमाणे ).

**spicate** कणिशाभ

कणसासारखे उदा. वाखेरी ( *Wagatea spicata* Dalz ).

**spike** कणिश

लांबट अक्षावर बिनदेठाची फुले असलेला अकुंठित फुलोरा ( अकुंठित फुलोऱ्याचा एक प्रकार ); उदा. आघाडा, काटेमाठ, निशिगंध इ. (२) प्ररोहाच्या ( फांदीच्या ) टोकाशी असलेला बीजुकपर्णांचा झुबका; उदा. सिलाजिनेला, लायकोपोडियम, एक्विसीटम, इ. पहा raceme.

**-- compound** संयुक्त कणिश

प्रमुख अक्षावर अनेक साधे कणिश फुलोरे बाजूस असलेला फुलोरा; गवतांचे फुलोरे अनेक लहान कणिशांच ( कणिशकांचे ) बनलेले असतात.

**spikelet** कणिशक

सामान्य छदांनी ( तुसांनी ) वेढलेला फक्त एक किंवा दोन फुल असलला दुय्यम प्रकारचा कणिश फुलोरा; उदा. गवते.

**spindle** चाती; तर्कु

प्रकलाच्या विभागणीमध्ये कोशिकेच्या मध्यभागी अनेक प्रथिनयुक्त धाग्यांची बनलेली, दोन टोके व मध्ये फुगीर असलेली संरचना; हिच्या फुगीर भागात एका पातळीत ( बिंब ) रंगसूत्रार्धे पसरलेली असून त्यांना अलग करून दोन टोकांकडे त्यांचे गट करण्याचे कार्य या अवस्थेनंतर ( मध्यावस्था ) होते.

**spindle-fibre** तर्कुसूत्र

कोशिकेतील तर्कूतील जीवद्रव्याचा एक धागा.

**spine** कंटक; काटा; शल्य

पान, उपपर्ण, देठ इत्यादींच्या रूपांतराने बनलेले तीक्ष्ण, कठीण टोकदार उपांग.

**spinescent** कंटकाग्र

टोकास काटा असलेले किंवा तीक्ष्ण टोक असलेले ( पान ).

**spiniferous ( spinous, spiny )** कंटकित

काटे असलेले (अवयव); काटेरी.

**spinulose** कंटकावृत

पृष्ठभागावर काटे असलेले.

**spiral** सर्पिल; कुंडलित

अक्षाभोवती गुंडाळल्यासारखे; फिरकीप्रमाणे.

**-- flower** सर्पिल पुष्प

पुष्पदलांची मांडणी वर्तुळात नसून एकाआड एक पद्धतीने पुष्पाक्षाभोवती असलेले फूल; उदा. सोनचाफा, कमळ, इ.

**— phyllotaxy** सर्पिल पर्णविन्यास

पहा phyllotaxy.

**-- vessel ( duct )** सर्पिल वाहिनी

मूळच्या कोशिकावरणावर सर्पिल कंगोरे ( अंकने ) असलेला वाहक घटक ( नलिका ).

**spireme** कुंडल

कोशिकेतील प्रकलाच्या विभागणीपूर्वीचा त्यातील रंगसूत्रांच्या अखंड फितीसारख्या धाग्याचा गुंता ( गुंडाळा ); हा पूर्वावस्थेच्या आरंभी दिसतो. पहा mitosis.

**spirillum ( spirobacterium )** सर्पिल जंतु

स्पायरिल्लम वंशातील फिरकीप्रमाणे आकाराचा सूक्ष्मजंतू.

**splendens** चकाकणारे

चमकणारे अवयव ( पान, खोड इ. ) असणारे; उदा. *Euphorbia splendens* Bojer ex Hook.

**split** भग्न; विभक्त

बहुधा अंशतः विभागलेले, चिंबलेले अथवा चिरलेले; उदा. लाकूड, पाकळी, फळ, साल;

**spongy** सुच्छद्र; सुविरल

स्पंजासारखे, अनेक छिद्रे व पोकळ्या असलेले.

**-- tissue (parenchyma)** विरलोतक

पोकळ्यांनी भरलेला कोशिकासमूह; उदा. द्विपार्श्व पानातील खालच्या भागातील ऊतक; जलवनस्पतींच्या खोडातील, देठातील, फळातील किंवा बीजावरणातील ऊतक.

**spontaneous generation** स्वयंजनन; उत्स्फूर्तजनन

निर्जीवापासून विद्यमान सजीव आपोआप उत्पन्न झाले असावे अशी जुनी, परंतु हल्ली न मानलेली, समजूत; पहा biogenesis.

**sporadic** तुरळक; विरळ

फार मोठ्या प्रदेशात, थोड्या प्रमाणात इतस्ततः विखुरलेला; उदा. वनस्पतींवरचा रोग.

**sporangium (spore-case)** बीजुककोश

बहुधा एककोशिक व लिंगहीन प्रजोत्पादक कोशिका (बीजुके) अंतर्भागात बनविणारा पिशवीसारखा अवयव; येथे बीजुके संख्येने क्वचित एक ते चार पण बहुधा अनेक असतात.

**sporangiferous** बीजुककोशधारक

बीजुककोश धारण करणारी (वनस्पती) अथवा अवयव (उदा. ऑफिओग्लासम नेचाचा कणिश).

**sporangiophore** बीजुककोशदंड

बीजुककोश धारण करणारा दांडा (देठ); उदा. एक्विसीटम.

**spore** बीजुक; बीजाणु

प्रजोत्पादनाचे कार्य करणारी व त्याकरिता जनक वनस्पतीपासून अलग होणारी लिंगहीन सूक्ष्म कोशिका.

**-- sac (moss-capsule)** बीजुकाशय

बीजुकांनी भरलेली पिशवी; उदा. शेवाळींतील बीजुकधारीचा प्रमुख अग्रस्थ भाग.

**sporeling** बीजुकापत्य

बीजुक रुजून बनलेला लहान रोपा (पूर्वकायक व गंतुकधारी यांची पूर्वावस्था); पहा prothallus; gametophyte.

**sporiferous** बीजुकधारक

बीजुके धारण करणारा (अवयव).

**sporocarp** बीजुकफल

(१) लैंगिक प्रक्रियेनंतर बनणारा, अनेककोशिक व स्वतः बीजुककोश निर्माण करणारा व त्यांचे संरक्षण करणारा अवयव; उदा. कत्रक.

(२) जलनेचांतील बीजुककोशपुंजाभोवती असलेल्या संरक्षक वेष्टनासह (पुंजत्राण, किंवा पर्णखंड– दल अथवा रूपांतरित पर्ण) बनलेले व फळासारखे दिसणारे कोष्ठ; पहा Hydropteridales.

**sporocyte (sporogenous cell)** बीजुकजनक कोशिका

बीजुक निर्माण करणारी मातृकोशिका; बहुधा ही द्विगुणित असून अर्धसूत्रणाने ती चार एकगुणित बीजुके बनविते.

**sporogenesis** बीजुकजनन

बीजुके बनविण्याची प्रक्रिया (उगम व विकास).

**sporogenous** बीजुकजनक

बीजुके बनविणारी (कोशिका, संरचना).

**— layer (hymenium)** बीजुकजनकस्तर

बीजुके निर्मिणारा (फलनक्षम) कोशिकांचा थर; उदा. गदाकवक; पहा Basidiomycetes.

**sporogonium** बीजुकधर

शेवाळीतील गंतुकधारीवर (प्रमुख पिढीवर) लैंगिक प्रक्रियेनंतर रंदुकापासून बनलेली बीजुकधारी पिढी; पद, दंड व बीजुकाशय हे तिचे भाग होत; बीजुकाशयातून बीजुके बाहेर पडतात.

**sporoid (spore-like)** बीजुकाभ

बीजुकासारखे दिसणारे.

**sporophore** बीजुकदंड

बीजुके धारण करणारा दांडा, आधानी, कवकतंतू, इ.

**sporophyll** बीजुकपर्ण

बीजुके (किंवा बीजुककोश) निर्मिणारा पान किंवा छद यांसारखा अवयव; उदा. नेचे, नेचाभ पादप (सिलाजिनेला. लायकोपोडियम, आयसॉएटिस, इ.)

**sporophyte** बीजुकधारी

बहुधा बीजुकांच्या साहाय्याने प्रजोत्पादन करणारी द्विगुणित (प्रकल्युक्त) पिढी; गंतुकधारी पिढीशी ह्या पिढीचे एकांतरण असते; नेचे व शेवाळी ह्यांत एकांतरण अधिक स्पष्ट असते; नेचे व इतर उच्च वनस्पतींत बीजुकधारी पिढी प्रमुख असते.

**sport** नवोदय; लीला; उत्परिवर्तन

कळीतून किंवा बीज रुजल्यानंतर त्यातून उद्‌भवणाऱ्या वनस्पतीवरची नवीन स्पष्ट संरचना ( प्रभेदन; एक नैसर्गिक लीला, क्रीडा ); पहा mutation.

**sporulation** बीजुकनिर्मिती

बीजुके निर्माण होण्याची प्रक्रिया.

**spot** ठिपका; स्थान; बिन्दू; लक्ष्म

**— disease** टिक्का रोग

पानांवरच्या ठिपक्यांनी दिसून येणारा रोग; उदा. भुईमूग.

**spring-wood** वसंतकाष्ठ

वसंत ऋतूत बनलेला खोडातील लाकडाचा थर ( वलय ); यातील वाहिका व कोशिका त्यानंतरच्या पेक्षा मोठ्या असतात.

**sprout** अंकुर; प्ररोह; कोंब

बीज अथवा बीजुक रुजल्यावर त्यातून आलेला भावी वनस्पतीचा आरंभीचा खोड व पाने यांचा किंवा तत्सम शाकीय भाग ( पूर्वकायक ); बटाटा, कांदा यासारख्या किंवा कलमासारख्या अवयवांतून फुटलेला नवीन कोंब.

**spumescent** फेनाभ

फेसासारखे दिसणारे.

**spur** (१) शुंडिका; (२) ऱ्हस्व प्ररोह

(१) संवर्त किंवा पुष्पमुकुट यापासून वाढलेली लहान सोंडेसारखी अरुंद, लांबट ( बंद नळीसारखी ) व मधुयुक्त पिशवी. उदा. लार्कस्पर, तेरडा, हरणखुरी, पॅन्सी.

२) मर्यादित वाढ असलेली व पाने धारण करणारी बाजूची शाखा; उदा. पाइन (चिल, चीड; चिलघोजा).

**spurred ( calcarate )** शुंडिकावंत

शुंडिका असलेले ( परिदलमंडळ ); उदा. एक आमर ( *Habenaria longicalcarata* ).

**spurious ( false )** आभासी; छद्म; छद्मी

भ्रामक ( खोटे ); भासमान होणारे; उदा. काजू फळ ( बोंडू ) हा वास्तविक रसाळ देठ असतो; पहा pseudocarp.

**-- dissepiment** छद्मपट

किंजदलाच्या किनारीपासून किंवा पुष्पस्थलीपासून न बनलेला परंतु नंतर वाढलेला किंजपुटातील आडपडदा; उदा. मोहरीचे फळ; पहा siliqua.

**-- tissue** छद्मोतक

विशेषतः भूछत्रात आढळणारा व अनेक स्वतंत्र तंतू एकत्र विणले गेल्यामुळे बनणारा मृदूतकासारखा कोशिकासमूह; उदा. अर्गट; काही शैवले, इ.

**squamate ( scaly )** लघुशल्की

लहान खवल्यासारखी पाने किंवा छदे असलेले.

**squamose** खवलेदार; शल्काभ; शल्कयुक्त

खवल्यासारखे दिसणारे किंवा खवले असलेले: उदा. सिताफळाचा पृष्ठभाग खवले असल्यासारखा दिसतो, त्यावरून *Annona squamosa* L. हे त्याचे नाव.

**stable** स्थिर; अपरिवर्तनीय

स्थानात किंवा संघटनेत बदल न झालेला; उदा. वनस्पतीसमूह ( समुदाय ).

**-- formation** स्थिर समावास

वर सांगितल्याप्रकारचा वनस्पतींचा विशिष्ट प्रकारचा समूह.

**stage** अवस्था

टप्पा; पादपसमुदायात होणाऱ्या बदलातील एक टप्पा.

**— final** अंत्यावस्था

विशिष्ट परिस्थितीतील पादप समुदायाच्या विकासाचा शेवटचा टप्पा (चरमावस्था): पहा climax.

**--, pioneer** प्रारंभिक अवस्था

नवीन भूमीवर होणारा पादपसमुदायाचा सुरवातीचा टप्पा.

**--, transition** संक्रामी अवस्था

प्रारंभिक व शेवटचा या दोन्हीमधील विकासाचा टप्पा.

**stain** अभिरंजक

सूक्ष्मदर्शकातून वनस्पती व प्राणी आणि त्यांचे भाग तपासून त्यांतील सूक्ष्मरचनेचा अभ्यास करण्याकरिता त्यावर केलेल्या प्रक्रियेत वापरलेले द्रव्य; त्यामुळे विशिष्ट भाग काही रंगद्रव्यच शोषून इतरांपासून निराळा दिसतो व ओळखू येतो.

**stalk** देठ; दांडा; दंड; वृंत

फूल, पान, फळ इत्यादी अवयवांचा खोड अथवा शाखा यांचेशी संबंध जोडणारा आधारभूत भाग. शैवले, कवक, शेवाळी इत्यादी वनस्पतींतही असा आधारभूत भाग आढळतो.

**-- cell** वृंत-कोशिका

परागकण रुजताना त्यातील कार्यक्षम ( रेतुक जनक )

प्रकलाच्या विभागणीने बनणाऱ्या दोन कोशिकेपैकी वंध्य कोशिका; उदा. पाइन.

**stamen** केसरदल; पुं-केसर

प्रजोत्पादक पुं-गंतुके निर्माण करण्यास जबाबदार असलेले परागकण (लघुबीजुक) बनविणारा फुलातील (पुं-शंकूतील) अवयव (पुष्पदल); बहुधा एक लांब तंतू व त्यावर परागकणांनी भरलेली पिशवी (परागकोश) हे केसरदलाचे भाग होत; पहा microsporophyll; anther; androecium.

**staminal tube (androphore)** केसर-नलिका

अनेक केसरदले जुळून बनलेली नळी; उदा. जास्वंद.

**staminate flower** पुं-पुष्प; केसर-पुष्प; नर-पुष्प

फक्त कार्यक्षम केसरदले असलेले फूल; उदा. भोपळा, पपई, इ.

**staminode** वंध्य केसर

कार्यक्षमता नसलेले केसरदल; उदा. कर्दळ, आले.

**staminody** केसरीकरण; केसरीभवन

केसरदलाखेरीज इतर पुष्पदलांचे केसरदलात रूपांतर होणे.

**stand** शुद्ध गट

फक्त एक प्रभावी वनस्पती असलेला पादपसमूह. उदा. बांबूचे बेट; चिंचेचे बन; आंबराई, इ.

**standard petal (vexillum)** ध्वजक

पतंगरूप पुष्पमुकुटातील सर्वात मोठी पाकळी; उदा. गोकर्ण, वाटाणा इ. पहा papilionaceous.

**staple** कापसाचा धागा

**starch** मंड; पिष्ठ; स्टार्च

वनस्पतींत सामान्यपणे आढळणारा कणस्वरूप व तूलीरसम (सेल्यूलोजसारखी) रासायनिक संघटना असलेला कार्बोहायड्रेट प्रकारचा संचित पदार्थ.

**— sheath** मंडस्तर; अंतस्त्वचा

प्राथमिक मध्यत्वचेच्या सर्वात आतील कोशिकांचा थर; पहा endodermis.

**starchy** पिष्ठयुक्त; पिठुळ

**stasophyta (stagnant water-plants)** स्थिर-जलपादप

साचलेल्या पाण्यातील वनस्पती; उदा गोंडाळ, डकवीड, कुमुद, इ.

**state** अवस्था

स्थिती; उदा. प्रसुप्तावस्था.

**static** स्थैतिक; अचल; स्थिर

विशिष्ट स्थितीत किंवा स्थानात कायम असण्याची किंवा बदल न होण्याची अवस्था.

**station** स्थानक; अधिनिवास

एखाद्या वनस्पतीचे विशिष्ट (नैसर्गिक) स्थान; उदा. काही वनस्पती ओसाड जागी (पडीत जमिनीवर) आढळतात (एरंड, धोत्रा, काटेमाठ, इ.).

**statocyst** संतुलन पुटी

पिष्ठकण व बाह्यप्राकल असलेल्या गुरुत्वसंवेदी कोशिका; खोडात व मुळात असलेल्या अंतस्त्वचेच्या कोशिका गुरुत्वाकर्षणाला प्रतिसाद देणाऱ्या कोशिका (संवेदी) असल्याने, वनस्पतीला तिच्या स्थितीतील बदल जाणवतो, म्हणून हा भाग गुरुत्व– संवेदनाक्षम मानतात.

**statolith** संतुलनाश्म

वर सांगितलेल्या संरचनेतील उच्च विशिष्टगुरुत्व असलेले कोणतेही घन कण (पिष्ठकण); वनस्पतीची सापेक्ष स्थिती बदलल्यास हे स्वतंत्र कण कोशिकेत स्थानभ्रष्ट होतात व त्यांचा बाह्यप्राकलाशी असलेला संपर्कही बदलल्याने पूर्वपरिचित स्थिती पुन्हा आणण्यास तो अवयव (खोड, मूळ) वक्र होतो.

**statospore** विश्रामी बीजुक

काही काळ निश्चलपणे घालविणारे बीजुक; पहा spore.

**stele** रंभ

द्विदलिकित वनस्पतींच्या खोड व मूळ या अवयवांतील अंतस्त्वचेच्या आतील सर्व भाग; विशेषेकरून वाहक वृंदांचा संच; काही एकदलिकित वनस्पतींत व इतर वाहिनीवंत वनस्पतींतही रंभ स्पष्टपणे आढळते; कधी अनेक रंभ असतात. प्राथमिक विभज्येतील मध्यवर्ती अप्रभेदित भागापासून रंभ बनते म्हणून त्याला रंभजनक म्हणतात; पहा plerome; meristem.

**stellate** तारकाकृति; ताराकृति

अनेक किरणासारखे भाग (शाखा) असलेली (कोशिका); भेंडी कुलात तारकाकृति केस आढळतात.

**stem** खोड; क्षोड; स्तभ; प्रकांड; स्कन्ध

वनस्पतींचा बहुधा गुरुत्वाकर्षणाविरुद्ध उभा वाढणारा प्रमुख अक्ष; खाली सरपटणाऱ्या (जमिनीवर पसरणाऱ्या) वनस्पतींचे खोड व फांद्या गुरुत्वाकर्षणाच्या दिशेशी काटकोनात वाढतात.

**stem - parasite** स्तंभोपजीवी

आश्रय देणाऱ्या वनस्पतींच्या खोडावर राहून त्यातून

अन्नरस शोषणारी वनस्पती; उदा. बांडगूळ (लोरँथस; व्हिस्कम); अमरवेल.

**stem – tendril** क्षोडप्रतान
खोडाच्या रूपांतरामुळे बनलेला ताणा (प्रतान); उदा. कृष्णकमळ; कांडवेल, द्राक्षवेल इ.

**stemless** खोडहीन; क्षोडहीन
सकृद्दर्शनी खोडाचा अभाव दर्शविणारी (बिनखोडाची) वनस्पती; उदा. मुळा, गाजर, गुलगा, इ.

**steppe** तृणसंघात
कोरडी, खुरटी व इतस्ततः झुबक्यांनी वाढणारी आणि मरुवनस्पतींशी साम्य असणारी गवते निसर्गतः वाढणारा विशिष्ट हवामानातील व वृक्षहीन प्रदेश; याचा प्रसार समशीतोष्ण कटिबंधात विशेषेकरून आढळतो; गवताळ प्रदेशाचा एक प्रकार.

**Sterculiaceae** मुचकुंद कुल; स्टर्क्युलिएसी
मुचकुंद, मुरुडशेंग, कोको, कांडोळ, सारडा, नवा, रुद्राक्षी, कौशी, इत्यादी वनस्पतींचे कुल; याचा अंतर्भाव भेंडी गणात (माल्व्हेलीझमध्ये) करतात पण हचिन्सन यांनी परुषक गणात (टिलिएलीझमध्ये) केला आहे. भेंडी कुलाशी (माल्व्हेसी) या कुलाचे साम्य असून द्विपुटक (दोन कप्प्यांचा) परागकोश, क्वचित पाकळ्यांचा अभाव अथवा एकलिंगी फुले या लक्षणांनी हे कुल ओळखता येते; पहा Malvaceae.

**stereid** घनकोशिका; दृढकोशिका
वनस्पतींना किंवा त्यांच्या अवयवांना आधार व मजबुती देणारी कोशिका; दृढोतकातील घटक. पहा sclerenchyma.

**stereome (stereom; mechanical tissue)** आधार ऊतक
वनस्पतींना आधारभूत कोशिकासमूह. दृढोतक व स्थूल-कोनोतक यांचा किंवा यापैकी एकाचा (अर्थात त्यातील फक्त घटकांचा) येथे अंतर्भाव करतात, कारण दोन्हीचे कार्य सारखे असते; संरचनेत काही फरक असतात; पहा collenchyma; sclerenchyma.

**sterioscopic microscope** त्रिमिति सूक्ष्मदर्शी
लांबी, रुंदी व जाडी दर्शविणारा सूक्ष्मदर्शक.

**sterigma (pl. sterigmata)** प्रांगुल
कवकामध्ये बीजुक-क्षेपण करणारा देठासारखा भाग; उदा. गदाकवक; पेनिसिलियम, इ.

**sterile** (१) वंध्य; (२) निर्जंतुक
(१) कार्यक्षम नसलेला (वांझ) प्रजोत्पादक अवयव; उदा. केसरदल; किंजदल; बीजुक; बीज. (२) जंतुंपासून मुक्त केलेला (द्रव–पदार्थ; माध्यम).

**sterility** वंध्यत्व; वांझपण
वर वर्णिलेला दोष असण्याचा प्रकार.

**sterilisation** वंध्यीकरण; निर्जंतुकीकरण
वंध्य किंवा निर्जंतुक करण्याची प्रक्रिया.

**sterrophyta** जीर्णक भूपादप
पहा moor.

**stiff fibre** दृढसूत्र
ताठर धागा.

**stigma** किंजल्क
युक्त किंजपुटाच्या किंवा (किंजलाच्या) टोकाचा ग्राहक व परागकणास आधारभूत भाग; किंजदले स्वतंत्र असल्यास प्रत्येकाचा अग्रभाग; 'स्त्रकेसराग्र' हा शब्दही वापरलेला आढळतो; पहा style.

**Stigmaria** मूल जीवाश्म; मूलाश्म; स्टिग्मॅरिया
काही अश्मीभूत वनस्पतींचा, व्रणांच्या खुणा (किण) असलेला मूळ–वंश.

**stilt-root** आधारमूळ; अवस्तंभ मूळ
वनस्पतीच्या खोडापासून निघालेले तिरपे व तिला आधार देणारे मूळ; उदा. केवडा, कांदळ, इ.

**stimulus** चेतक; उत्तेजक; उद्दीपक
चेतना देणारे; सजीवांमध्ये एखादी प्रक्रिया सुरू होण्याकरिता चालना देणारे (द्रव्य, द्रव, प्रकाश, उष्णता स्पर्श, इ.); उदा. कीटकभक्षक वनस्पतीत कीटकांवर पाचक स्राव होण्यास कीटकाचा स्पर्श चेतना देतो; लाजाळूची पाने स्पर्शामुळे व अतिप्रकाशामुळे किंवा प्रकाशाच्या अभावामुळे हालचाल दर्शवितात.

**stinging** कंडूत्पादक; दाहक; दंशक
स्पर्श झाला असता खाज (आग) उत्पन्न करणारा; उदा. केस (आग्या, खाजकुइली, खाजोटी इ. वनस्पतींचे).

**stipe** देठ; दांडा
भूछत्राचा आधारभूत दांडा; नेचांच्या संयुक्त पानांचा देठ.

**stipel** उपपर्णक
संयुक्त पानाच्या दलाचे उपपर्ण; उदा. घेवडा.

**stipulate** सोपपर्ण

उपपर्ण असलेले ( पान; उदा. जास्वंद, कापूस, इ. ).

**stipule** उपपर्ण

पानाच्या तळाशी ( देठ असल्यास, त्याच्या तळाशी ) असलेले भिन्न आकाराचे किंवा प्रकारचे उपांग. उदा. वाटाणा, पिवळा चाफा, गुलाब, अनंत, बोर, इ.

**stipulode** अल्पोपपर्णक

एका कोशिकेचे बनलेले उपपर्ण ( उदा. कारा नावाचे शैवल ).

**stock** खुंट

१) चांगल्या जातीचे कलम करण्याकरिता वापरलेल्या मूळच्या वनस्पतीचे ( आश्रय) खोड; पहा; scion, host. २) ज्यापासून मुळे निघतात असा मूलक्षोड किंवा शाखाहीन खोड.

**stolon** तिरश्चर

जमिनीवर खोडापासून वाढल्यानंतर पुन्हा जमिनीकडे वळून व जमिनीशी संपर्क ठेवून नवीन वनस्पती निर्माण करणारी शाखा.

**stoloniferous** तिरश्चरवर्धिनी (वर्धी)

तिरश्चरांच्या साहाय्याने वाढणारी ( संख्यावाढ करणारी वनस्पती); उदा. नेचा, रॉसबेरी इ.

**stoma** त्वग्रंध्र

पानावरच्या अपित्वचेवर (क्वचित हिरवे खोड, हिरव्या फांद्या, किंजपुट इत्यादींच्या पृष्ठावर ) दोन रक्षक कोशिकांनी नियंत्रित केलेले सूक्ष्म छिद्र; यातूनच वनस्पतीतील वाफेचा निचरा होतो व हवेची ये-जा चालू राहते. सामान्य भाषेत सूक्ष्मछिद्र ही संज्ञा stoma ला वापरलेली आढळते. परंतु त्यामुळे pore व stoma तील फरक स्पष्ट होत नाही.

**stomate** छिद्र

रक्षक कोशिकांनी वेढलेले छिद्र.

**stone** अष्ठि; आठळी; बाठा; कोय

अश्मगर्भी फळातील ( उदा. आंबा, जरदाळू ) कठीण कवच किंवा कवचासह बी; पहा endocarp; drupe.

**— cell** घनकोशिका

घन आवरणाची कोशिका.

**— fruit** अश्मगर्भी फळ; आठळी फळ; कोयफळ; बाठीफळ

पहा drupe.

**storage cell** संचयी कोशिका

अन्नाचा साठा करणारी कोशिका; उदा. ग्रंथिक्षोड, ( बटाटा ), मूलक्षोड ( आले, हळद, इ. ), ग्रंथिमूळ ( गाजर, मुळा, रताळे इ. ).

**strain** (१) वाण; (२) ताण

(१) एका जातीच्या अनेक प्रकारातील उपप्रकार. (२) एखाद्या अवयवावर पडलेला दाब, किंवा तो अवयव वाकल्याने एका बाजूस दाब व दुसरी बाजू ओढली जाणे.

**strand** पेड; पट्ट

(१) दोरीप्रमाणे अनेक धाग्यांचा जुडगा किंवा जुडी; उदा. वाहक ऊतकांचा पट्ट. ( २ ) किनारा.

**— vegetation** वेलातटीय वनश्री

समुद्र किनाऱ्यावर वाढणारा पादपसमूह.

**strap-shaped ( ligulate )** पट्टाकृति

सपाट पट्टीसारखे; पहा ligulate.

**stratification** स्तरण; स्तरीभवन

थरावर थर बनणे; उदा. कोशिकावरणाची जाडी; वनश्रीमध्ये भिन्न उंचीवर भिन्न प्रकारच्या वनस्पतींचे थर असणे. शैवाकाच्या शरीरातील शैवले व कवक यांची थरावर थर अशी मांडणी.

**stratum** स्तर; थर

**— , ground** भूमिस्तर

जमिनीलगतचा वनस्पतींचा थर ( शेवाळी, शैवल व फार लहान सरपटणाऱ्या वनस्पती ).

**— , field** ओषधीस्तर; तृणस्तर

गवते व लहान ओषधीय वनस्पतींचा थर.

**— , shrub** क्षुपस्तर

झुडपांचा थर.

**—, tree** वृक्षस्तर

लहानमोठ्या वृक्षांचा थर.

**stream** प्रवाह; स्रोत

**streaming** परिगमन; सरण; प्रवाही

जीवद्रव्याचे कोशिकावरणाच्या आतील भागात प्रवाहाप्रमाणे वाहणे ( भ्रमण ).

**— movement** प्रवाही हालचाल; सरणक्रिया

पहा cyclosis.

**striate** रेषांकित

बारीक समांतर रेषा ( कंगोरे, खोबणी ) असलेले; उदा. फळ, खोड, बी; एक्विसीटम.

**strigose** नत रोमश

ताठ, तीक्ष्ण टोकाचे, सरळ व आडवे पडलेले केस असलेले ( अवयव ).

**striped** पट्टेदार

एका किंवा भिन्न रंगाचे पट्टे असलेले ( पान, फूल, फळ इ. ).

**strobile ( strobilus, cone )** शंकू

एकलिंगी किंवा द्विलिंगी (लघुबीजुकपर्णे किंवा गुरुबीजुकपर्णे अथवा दोन्ही असलेले ), खवलेदार, तळाशी रुंद व टोकाकड निमुळते होत गेलेले, बीजुककोशयुक्त ( प्रजोत्पादक ) प्ररोह; बहुधा रुक्ष व अनाकर्षक; काहींच्या मते पुष्पाशी, तर काहींच्या मते फुलोऱ्याशी (पुष्पबंधाशी) साम्य; उदा. एक्विसीटम, सिलाजिनेला लायकोपोडियम, पाइन, सायकस, देवदार इ.

**strobiloid** शंकाकृति

शंकूसारखा आकार व संरचना असलेले.

— **theory** शंकु-सिद्धांत

लायकोपोडियम व एक्विसीटम यासारख्या प्रारंभिक व साध्या बीजुकधारी पिढी असलेल्या पूर्वजांपासून इतर नेचाभ पादपांचा ( टेरिडोफायटा वनस्पतींचा ) उगम झाला असावा अशी एक उपपत्ती.

**stroma** पीठिका

अनेक पलिघ धानीफले ( धानीबीजुके निर्मिणारे अवयव) असलेली उशीसारखी संयुक्त कवक-संरचना; उदा. अर्गट ( क्लॅविसेप्स पुर्पुरिया ) या कवकाचे जालाश्म रुजून त्यातून पीठिका बाहेर पडतात व त्यातून धानीबीजुके निर्माण होऊन त्या रोगाचा प्रसार करतात; पहा sclerotium; perithecium.

**strombus** सर्पिल शिंबा

गोगलगायीच्या लांबट शंखाप्रमाणे पिळीव ( गुंडाळीसारखी ) शेंग; उदा. विलायती चिंच; लसूण घास.

**strophiole** नाभिजात

पहा caruncle.

**structure** संरचना

वनस्पतींतील किंवा त्यांच्या अवयवांतील सर्व भागांची विशिष्ट मांडणी ( आयोजन ); संरचनात्मक वनस्पतिविज्ञानात शारीर, आकारविज्ञान, अवयवविकास, सूक्ष्मशारीर इत्यादींचा समावेश होतो.

**stunted** कुंठित; खुरटलेले

वाढ खुंटली आहे, असे ( अवयव; वनस्पती ).

२९

**style** किंजल

फुलातील मध्यभागी असलेल्या पुष्पदलमंडलातील ( किंवा स्त्रीकेसरातील ) किंजपुट व किंजल्क यामधील बहुधा लांबट नलिकेसारखा भाग; बहुधा याचे कार्य किंजल्काला फुलाबाहेर परागणाकरिता भरपूर मोकळीक देणे हे असते.

**stylodium** लंब किंजल्क

किंजलासारखा लांबट किंजल्क; उदा. काही गवते.

**styrax ( storax )** ऊद

काही वनस्पतींपासून ( *Styrax* spp. ) काढलेला घट्ट राळेसारखा पदार्थ.

**suaveolent ( suaveolens )** सुगंधी

चांगला वास येणारे ( सुवासिक ); उदा. फूल.

**sub** – उप –, अल्प–

विशिष्ट ( मुख्य ) दर्जाखालचे; काहीसे किंवा किंचित अशा अर्थाने उपसर्गाप्रमाणे उपयोगात असलेली संज्ञा.

— **acute** अल्पतीव्र

कमी ( काहीशी ) तीक्ष्ण; उदा. पानाचे टोक.

— **arctic** उत्तरध्रुवाजवळचे; उपोत्तरध्रुवीय

लागवडीच्या उत्तर मर्यादेपलीकडचे ( उदा. पादपजीवन ).

— **aerial** उपवायवी

जमिनीजवळचे पण जमिनीवर वाढणारे ( मूलक्षोड ).

— **alpine** उपाल्पीय

वनश्रीच्या साधारण मर्यादेवरची पण आल्पीय ( सर्वोच्च ) रेषेखालची ( वनश्री ).

— **apical** उपाग्रस्थ

टोकाजवळचे ( फूल, फळ ).

— **association** उपसंगति

संगतीतील एकूण पादपीय संघटनेबाबत निश्चित फरक दर्शविणारा त्यातील भाग. पहा association.

— **axillary** उपकक्षस्थ

पानाच्या बगलेजवळचे ( बगलेखाली असलेले ).

— **caespitose** अल्पगुच्छाकृति

काहीसे झुबकेदार.

— **class** उपवर्ग

वर्ग आणि गोत्र यामधील ( गणांचा ) गट; पहा cohort.

**— climax** उपचरमावस्था
वनस्पतींच्या नैसर्गिक समूहाची (समावासाची) अंत्यपूर्व अवस्था; पहा climax.

**— cordate** अल्पहृदयाकृति
काहीसे हृदयासारख्या आकाराचे ( पान, उपांग ).

**— division** उपविभाग
विभाग व वर्ग ( किंवा श्रणी ) ह्या वर्गीकरणातील एककाच्या मध्ये येणारा गट.

**— dominant** उपप्रभावी
प्रभावीपेक्षा कमी दर्जाची ( वनस्पती ) पण दखल घेण्यायोग्य ( लक्षण ).

**— epidermal** अधस्त्वचीय
अपित्वचेखालील ( त्वचा. कोशिका, इ. ).

**suberin** त्वक्षा; स्यूबरिन
बुचासारख्या वस्तूतील पदार्थ; परित्वचेच्या कोशिकात आतील तूलीर भिंत व बाहेरील मध्यपटल यांमध्ये हा पदार्थ साचून राहतो.

**suberisation** त्वक्षाभवन
बुचातील पदार्थात रूपांतर होण्याची प्रक्रिया (घटना).

**sub-family** उपकुल
कुल व वंश यांमधील गट.

**— genus** उपवंश
वंश व जाती यांमधील गट.

**— inferior** अल्पाधःस्थ
काहीसा अधःस्थ ( किंजपुट ).

**— kingdom** उपकोटी
वनस्पति-कोटीचा प्राथमिक विभाग; उदा. बीजी वनस्पती; अबीजी वनस्पती.

**— littoral** समुद्रतट समीप; उपवेलांचलीय
भरती–ओहोटीच्या मर्यादेपलीकडे परंतु किनाऱ्यापासून दूर ( असणाऱ्या वनस्पती ).

**— marginal** धारासमीप
पानाच्या किनारीजवळ असलेली; उदा. शीर; बीजुककोश पुंज.

**— merged (submersed)** निमज्जित; निमग्न
पाण्यात बुडलेले; उदा. पान, खोड, इ. ( हतिपर्ण वनस्पती ).

**— obtuse** अल्पविशालकोनी
लघुकोन व विशालकोन यामधील अंशाचा कोन असलेले. ( उदा. पानाचे टोक ).

**— order** उपगण
गण व कुल यामधील ( वंशांचा ) गट.

**— petiolar (subpetiolate)** वृंताधःस्थ
देठाखाली असलेले; उदा. प्रपिंड.

**— serrate** अल्पदंतुर
काहीसे दातेरी; उदा. तुळशीचे पान.

**— sessile** अल्पवृंतीय
फार लहान देठ असलेले; उद. रुईचे पान.

**— shrub** उपक्षुप
झुडपापेक्षा लहान; उदा. सदाफुलीचे झाड.

**subsidiary** गौण
कमी दर्जाच्या ( महत्त्वाच्या ); उदा. अपित्वचेतील त्वग्रंध्रांच्या रक्षक कोशिकाजवळच्या काशिका.

**subspecies** उपजाति
जाती व प्रकार यांमधील अनिश्चित दर्जा असलल्या वनस्पतींचा लहान गट; जातीतील कित्येकांशी त्यांचे साम्य नसून परस्परसाम्य मात्र आढळत; जातीपेक्षा लहान एकक.

**substantive variation** मौलिक भेद; गुणात्मक भेद
प्रत्यक्ष संघटनेतील बदल; पहा qualitative variation.

**substitution** प्रतिष्ठापन
नाश पावलेल्या अवयवाऐवजी दुसरा तत्सम अवयव निर्माण होणे; वनस्पतीतील द्वितीयक ऊतककरापासून बनलेल्या नवीन वाढीमुळे (वनस्पतीतील) जखम भरून येण्याची प्रक्रिया.

**substrate** कार्यद्रव्य
रासायनिक विक्रियेतील (विशेषत: वितंचनात) ज्यावर विक्रिया होते तो प्रारंभिक पदार्थ; त्यात विक्रियेने बदल होऊन बनलेला तो उत्पाद.

**subtending leaf** संमुख पर्ण
बगलेतून नवीन कळी अथवा पुष्पाक्ष निर्मिती करणारे पान.

**subterraneous (underground)** भूमिगत
जमिनीखालील ( अवयव: उदा. ग्रंथि खोड, मुळे, क्वचित फूल व फळ).

**subulate (subuliform)** आराकृति
पहा awl-shaped.

**subvalvate** उपधारास्पर्शी; अल्पधारास्पर्शी
अंशतः धारास्पर्शी; पहा valvate.

**subvariety** उपप्रकार

प्रकारातील परंतु क्षुल्लक फरक दर्शविणारी व्यक्ती.

**succedanum** बदली

एखाद्या कोशिकेऐवजी किंवा अवयवाऐवजी दुसरे कार्यक्षम अवयव किंवा जाती. उदा. काकडशिंगी ( *Rhus succedanea* L. ).

**succession** अनुक्रमण

एकाच क्षेत्रात क्रमाने बदल होऊन भिन्न व चरम ( अंतिम प्रकारचे ) पादप समुदाय किंवा वनस्पति-समावास निर्माण होण्याची प्रक्रिया.

**successive whorls** अनुक्रमी वर्तुळे; क्रमागत मंडले

क्रमाने ( एकानंतर दुसरे ) निर्माण झालेली अवयवांची वर्तुळे ( उदा., संवर्त, पुष्पमुकुट, केसरमंडल व किंजमंडल ).

**successor** वंशज; वारस

पूर्वजापासून क्रमाने निर्माण होत आलेली संतती.

**succulent** रसाळ; मांसल

रसाने किंवा रसयुक्त मगजाने भरलेले; उदा. खोड, पान, फळ इ; घोळीची किंवा कोरफडीची पाने; निवडुंगाचे खोड इ.

**sucker** ( १ ) अधश्वर; धुनवा; ( २ ) शोषक; चूषक

( १ ) जमिनीतील खोडापासून ( फार क्वचित मुळापासून ) जमिनीवर वाढत आलेली फांदी; उदा. पुदीना, शेवंती; ( २ ) पहा haustorium.

**suffrutescent ( suffruiticose )** उपक्षुपी; क्षुपाभ

काहीसे झुडपासारखे.

**suffultus** बिम्बकोष्ठ

चकतीसारखे कंदाच्या तळाशी असलेले खोड; उदा. कांदा, लसूण इ.

**sugar** शर्करा; साखर

स्फटिकरूप, विद्राव्य व गोड पदार्थ ( कार्बोहायड्रेट ); उदा. बीटशर्करा, इक्षुशर्करा, फलशर्करा, द्राक्षशर्करा, मॅपलशर्करा, तालशर्करा इ. भिन्न प्रकार भिन्न वनस्पतीत आढळतात.

**sulcate** ससीता; खोबणीदार

खोचणी, चऱ्या, बारीक पन्हळी असलेले उदा. एक्विसीटमचे खोड.

**sulcus** सीता; खोबण

लांबट खाच, पन्हळ; उदा. करंडक वनस्पतींतील काहींची शकले; पहा furrow.

**sulfureous ( sulphureous )** पीताभ; पांडुर

फिकट पिवळट रंगाचे.

**summer-spore ( uredospore )** ग्रीष्म-बीजुक

कवकांत उन्हाळ्यात निर्मिला जाणारा अलिंगी प्रजोत्पादक घटक; हा घटक बहुधा एककोशिक असतो; उदा. तांबेरा. फार थोड्या कालपर्यंत टिकणारे व लागलीच रुजणारे बीजुक; पहा teleutospore ( winter spore ).

**summer-wood** ग्रीष्मकाष्ठ

वाढ चालू असतेवेळी बनलेला लाकडाचा थर.

**sun-leaf** सूर्यपर्ण

भरपूर सूर्यप्रकाशात वाढण्यास अनुकूल अशी संरचना असलेले पान. उदा. निवडुंग, रुई, पानफुटी, कण्हेर, इ.

**sun-plant** सूर्यपादप

वर दिलेल्या परिस्थितीशी समरस होणारी वनस्पती. उदा. तगर, खैर, वड, काटेघोत्रा, बाभूळ, इ.

**sun-red** सूर्यताम्र

सूर्यप्रकाशात वाढल्यास (शरीर अवयवावर ) लाल रंग निर्मिणारी ( वनस्पती ).

**super- ( supra )** अति-; बाह्य-, अधि-

वरचे, वरच्या दर्जाचे, अधिक, उच्च या अर्थी उपसर्गाप्रमाणे उपयुक्त संज्ञा.

**— axillary** अधिकक्षस्थ

पानाच्या बगलेपेक्षा अधिक उंचीवर असलेले.

**superficial** पृष्ठीय; उपरिस्थ

वरवरचे; वरचे; पृष्ठभागावरचे.

**superior** ऊर्ध्व; ऊर्ध्वस्थ

वरच्या पातळीत वाढणारे ( असलेले ).

**— ovary** ऊर्ध्वस्थ किंजपुट

किंजमंडलाखेरीज इतर सर्व पुष्पदले किंजपुटाखालच्या पातळीवर वाढतात त्यावेळी किंजपुटाचे स्थान ( ऊर्ध्वस्थ ); पुष्पसूत्रात हे लक्षण दर्शविण्यास जी या आद्याक्षराच्या पुढील आकड्याखाली रेघ काढून दाखवितात; पहा floral formula.

**— plant** ऊर्ध्वपादप

दुसऱ्या वनस्पतीवर वाढणारी वनस्पती; उदा. अपिवनस्पती; जीवोपजीवी.

**superposed** अध्यारोपित
उभ्या रेषेत खालच्या अवयवाच्या बरोबर वरच्या पातळीत असलेले; फुलांच्या बाबतीत एका पुष्प-दलाच्या आतील दुसरे; उदा. पाळीसमोरचे केसरदल.

**supporting fibre** तर्कुसूत्र; आधारसूत्र
पहा spindle-fibre.

**-- plant ( host )** आश्रय वनस्पति
इतरांना आधार वा पोषण देणारी वनस्पती.

**— tissue** आधार ऊतक; आधार ऊति
आधारभूत असलेला कोशिकांचा समूह.

**suppression** दमन; वृद्धिरोध; निरोधन
पूर्णपणे विकास थांबविण्याची प्रक्रिया.

**supra- ( super- )** वरचे; अति- ; अधि-
उपसर्गाप्रमाणे उपयुक्त संज्ञा.

**— axillary** अधिकक्षस्थ
पहा superaxillary.

**— foliar** अधिपर्णस्थ

**-- folius** अधिपर्णस्थ
पानावर वाढणारे.

**-- -nodal** अधिपर्वस्थ
पेऱ्यावरील भागात असलेले.

**survival of the fittest** बलिष्ठांची ( समर्थांची ) अतिजीविता
जीवनस्पर्धेत ( जगण्याकरिता कराव्या लागणाऱ्या घडपडीत ) सर्वात श्रेष्ठ ( विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट गुणामुळे बलवान ) असणाऱ्या सजीवांची ( प्राणी वा वनस्पती ) सरशी व दुर्बलांचा नाश ही डार्विनच्या नैसर्गिक निवडीच्या सिद्धांतातील मुख्य कल्पना.

**susceptibility** रोगप्रवृत्ति
रोगाला सहज बळी पडण्याइतकी दुर्बलता.

**suspended** निलंबित
लोंबते; आधाराला चिकटून खाली लोंबणारे; उदा. फूल, फळ, फुलोरा, बीजक ( किंजपुटात ).

**suspensor** आलंबक
(१) रंदुकापासून बनलेला व एका टोकाशी प्रत्यक्ष गर्भ धारण करणारा कोशिकांचा तंतू ; उदा. बीजी वनस्पती व काही नेचाभ पादप;
(२) काही कवकांत आढळणारी व गंतुकाशयाला आधारभूत कोशिका; उदा. म्यूकर बुरशी.

**suture** सीवनी; शिवण
संधिरेषा; किंजदलाच्या किनारी परस्पराशी सांधल्या जाऊन किंजपुटाची पोकळी निर्माण करते ती जोडरेषा ( औदर सेवनी ): किंजदलांच्या मध्यरेषेला पृष्ठसेवनी म्हणतात; पहा dorsal suture, ventral suture.

**swamp-formation** अनूप समावास
कायम दलदलीत वाढणारा वनस्पतींचा समुदाय

**swarmspore** चरबीजुक
हालचाल करणारे बीजुक ( प्रजोत्पादक घटक ).

**switch-plant** अपर्ण पादप
पाने लवकर गळून पडणारी अथवा पाने असून नसल्यासारखी किंवा नसणारी वनस्पती; उदा. नांग्या शेर; माकडशिंग ( *Caralluma fimbriata* Wall. ). नेपती, खडशेरणी झाऊ इ.

**sword-shaped ( ensiform )** खड्गाकृति
तरवारीसारखे; उदा. आवईची ( *Canavalia ensiformis* DC. ) शेंग बाळवखंडाचे ( *Iris germanica* L. ) पान: इ.

**syconus** औदुंबरिक
लहान कलशासारख्या ( कुंभासनी ) फुलोऱ्यापासून बनलेले पोकळ व मांसल संयुक्त फळ; उदा. उंबर, अंजिर, इ. पहा hypanthodium.

**sylva ( silva )** वृक्षवर्णन; वृक्षज्ञान
विशिष्ट स्थानातील वृक्षांची माहिती ( वर्णन ).

**sylvestris ( sylvestral )** वनवासी
वनात वाढणारा; उदा. शिंदी ( *Phoenix sylvestris* Roxb. ).

**symbiont** सहजीवी
सहजीवनातील ( सामाइक जीवनातील ) सहकारी.

**symbiosis** सहजीवन
सारख्या नसलेल्या दोन किंवा अधिक सजीव व्यक्तींचे एकत्र जगणे. उदा. जीवोपजीवी वनस्पती व तिचा आश्रय.

**--, antagonistic** विरोधी सहजीवन
सहकाऱ्यात स्पर्धा असलेले सहजीवन; उदा. जीवोपजीवी ( अमरवेल ) व तिचा आश्रय ( कडवी, डुरांटा, शेर, इ. ); कीटकभक्षक वनस्पती.

**—, conjunctive** संयोजी सहजीवन
दोन्ही सहजीवी कायम एकत्र सांधलेले असणे; उदा.

जीवोपजीवी सूक्ष्मजंतू; बुरशी ( नायट्र्यास कारणीभूत असलेली ); बांडगूळ; अमरवेल, इ.

**—, contingent** सापेक्ष सहजीवन

एका वनस्पतीने दुसऱ्याच्या शरीरात फक्त आश्रय घेणे; उदा. अंतर्वनस्पती: सायकसच्या मुळात आढळणारे नॉस्टॉक (नीलहरित शैवल).

**—, disjunctive** प्रासंगिक सहजीवन

सहकाऱ्यांचा तात्पुरता संबंध असलेले एकत्र जीवन; उदा. वृक्षवेलसंबंध; हीच वेल कोठेही इतर आश्रयावर वाढू शकते; अपिवनस्पती; पक्षी व वृक्ष.

**—, mutualistic** अन्योन्य सहजीवन

परस्परांना फायद्याचे एकत्र जीवन; शैवाक (शैवल + कवक; दगडफूल); शिंबी वनस्पतीच्या मुळावरील गाठींतील सूक्ष्मजंतू; परागण घडविणारे कीटक.

**—, nutritive** पोषक सहजीवन

एक किंवा दोन्ही सहकारी पोषणामुळे संवर्धित असण्याचा प्रकार; उदा. संकवक, शैवाक, इ. पहा Lichens.

**symbiotic saprophytism** सहजीवी शवोपजीवन

उच्च वनस्पती व कवक यांचे एकत्र जीवन ( संकवक ); पहा mycorrhiza.

**symbiotrophic** सहजीवोपजीवी; सहपोषी

पोषणाच्या साहाय्याने एकत्र जगणारे.

**symmetric** सममित; समात्र

मध्यशिरेवर विभागल्यावर दोन सारखे भाग होणारे; उदा. सामान्य पान.

**symmetry** समात्रता

दोन सारखे भाग होण्याची क्षमता.

**—, bilateral** द्विपार्श्व; समात्रता

एकाच उभ्या पातळीत विभागल्यावर दोन सारखे भाग होण्याची क्षमता; उदा. वाटाण्याचे फूल; पहा zygomorphic.

**—, radial** अरसमात्रता

वस्तूच्या केंद्रातून कोणत्याही उभ्या पातळीत विभागल्यावर दोन सारखे भाग होण्याची क्षमता. उदा. गुलाबपुष्प; सदाफुली, इ. पहा actinomorphic.

**Sympetalae ( Gamopetalae )** युक्तप्रदली उपवर्ग

बेंथॅम व हूकर आणि एंग्लर व प्रँटल यांच्या वर्गीकरणपद्धतीतील फुलझाडांच्या द्विदलिकित वनस्पतीतील जळलेल्या पाकळ्यांच्या वनस्पतींचा उपवर्ग.

**sympetalous** युक्तप्रदल

जुळलेल्या पाकळ्या असलेले ( फूल किंवा पुष्पमुकुट ); उदा. घोत्रा.

**sympodium ( sympode )** संयुतपद

अनेक लहान ( नवीन ) अक्षांचा बनलेला एक प्रमुख अक्ष; उदा. द्राक्षवेल; पहा monopodium.

**symphysis** सम संजनन

अवयवाच्या सारख्या भागांची आरंभापासूनच जुळून वाढण्याची प्रक्रिया; उदा. युक्तप्रदल पुष्पमुकुट.

**synandrium** संकेसरमंडल

केसरदलांच्या अंशतः किंवा पूर्णतः संयोगाने बनलेली संरचना. उदा. काकडी, भोपळा, सूर्यफूल व सुरण कुलातील काहींचे केसरमंडल; इ.

**synangium** संधानी

सर्व बीजुककोश परस्परांशी बाजूने चिकटल्याने बनलेली संयुक्त बहुपुटक ( अनेक कोटरयुक्त ) संरचना; उदा. मॅरॅटिया नेचा; पहा Marattiales.

**synapsis** समीपस्थिति

कोशिकेच्या अर्धसूत्रण विभागणीपूर्वी प्रकलातील सर्व सूत्रमय गुंता प्रकलावरणात एका बाजूस साचून राहण्याची अवस्था; पहा meiosis.

**syncarp** संयुक्त फळ

कणिश फुलोऱ्यापासून बनलेले संयुक्त फळ अथवा मांसल घोसफळ; उदा. तुतू; केवडा; अननस; पहा spike.

**syncarpous** युक्तकिंज

दोन किंवा अधिक किंजदलांच्या संयोगाने बनलेला ( किंजपुट ); उदा. सूर्यफूल, चिकू, काकडी, इ

**syndesis** युग्मन; युगुलीभवन

प्रकलातील समीपस्थितीनंतर सजातीय रंगसूत्रांच्या जोड्या बनणे (अर्धसूत्रण विभाजनाकरिता); पहा meiosis.

**synecology** वनस्पति ( पादप ) समाजशास्त्र

वनस्पतींच्या समुदायासंबंधीच्या माहितीची विज्ञानशाखा; पहा Plant sociology; Phyto- ( plant- ) sociology; ecology, autecology.

**synergidae** साहाय्यक कोशिका; साहाय्यक पेशी

फुलझाडांच्या बीजकातील ( फलनपूर्वावस्थेत ) गर्भकोशातील अंडुकाजवळच्या व फलनास साहाय्य करणाऱ्या दोन ( वंध्य अंडुके ) कोशिका; तिन्ही

मिळून "अंदुकपरिवार" बनतो व गर्भकोशाच्या वरच्या ( बीजकरंध्राजवळच्या ) टोकाजवळ तो असतो.

**syngamete ( zygote, oospore )** रंदुक

दोन प्रजोत्पादक भिन्न कोशिकांच्या संयोगाने बनलेली कोशिका.

**syngamy** गंतुकसंयोग; फलन

दोन विषम ( विरुद्धलिंगी : एक पुं– व दुसरे स्त्री– ) गंतुकांचे मीलन.

**syngenesious anthers** युक्त परागकोश

फक्त परागकोश जुळून त्यांचे बनलेले वलय; उदा. सूर्यफूल कुल.

**synizesis** समीपस्थिति

पहा synapsis.

**synthate** संश्लिष्ट

संश्लेषणाने (अनेक रासायनिक द्रव्ये एकत्रित झाल्याने) बनलेला पदार्थ.

**synthetic fibre** कृत्रिम तंतू

काही रसायने एकत्रित करून बनविलेला ( संश्लेषित ) कृत्रिम व नैसर्गिक धाग्याहून ( सूत, रेशीम, वाख इ.) भिन्न धागा.

**system** व्यूह; तंत्र; पद्धति

अनेक अवयवांच्या सहकार्याने बनलेली व विशिष्ट कार्यतत्पर अशी संरचना.

**Systematic botany** वर्गीकरणात्मक वनस्पतिशास्त्र

वनस्पतींतील लक्षणांवरून प्राकृतिक आप्तभाव ओळखून ( लक्षात घेऊन ) त्यांची वर्गीकरणाच्या साच्यात मांडणी करणारी विज्ञान शाखा.

**systemic fungicide** दैहिक कवकनाशक

रोगकारक कवकाच्या सर्व शरीरावर पडून त्याचा संपूर्ण नाश करणारा रासायनिक पदार्थ.

**systemic insecticide** दैहिक कीटकनाशक

वनस्पतींचे नुकसान करणाऱ्या कीटकांचा संपूर्ण नाश करणारा पदार्थ.

**systole** संकोच

काही शैवले, चरबीजुके इत्यादींच्या कोशिकांतील प्रसरण व आकुंचन पावणाऱ्या रिक्तिकांचे ( पोकळ्यांचे ) आकुंचन.

## T

**tabasheer ( tabashir )** तबाशीर

बांबूच्या पेऱ्यांमधील वालुकामय खडे ( औषधी पदार्थ ).

**tactic** अनुचलनी

आंतरिक बदल होऊन चेतकाला ( उदा. प्रकाश, रसायन, उष्णता ) प्रतिसाद दर्शविणारी स्थलांतराची हालचाल; उदा. काही स्वतंत्र एककोशिक शैवले; हरितकणू, सूक्ष्मजंतू, इ.

**tactile** स्पर्शग्राही

स्पर्शाला ( स्पर्शाच्या चेतकाला ) प्रतिसाद देणारे.

**— hair or bristle** स्पर्शग्राही केस; स्पर्शरोम.

उदा. कीटकभक्षक वनस्पती; डायोनिया.

**— organ** स्पर्शेंद्रिय

**— papilla** स्पर्शग्राही पिटिका

अवयवावरील एखाद्या कोशिकेचा बाहेरील उंचवट्यासारखा फुगीर भाग. उदा. प्रतान; अपित्वचा.

**— pit** स्पर्शग्राही खाच

अपित्वचेच्या एखाद्या कोशिकेच्या बाहेरील आवरणाचा मर्यादित पातळ भाग: काकडी ( कर्कटी ) कुलातील अनेक वेलींच्या प्रतानाची टोके खाचयुक्त असतात; त्या खाचाद्वारे कोशिकेतील जीवद्रव्य स्पर्श जाणू शकतो व प्रतान त्यामुळे गुंडाळण्याची प्रतिक्रिया दर्शविते.

**tail** पुच्छ

बारीक, लांब व शेपटीसारखे उपांग.

**tailed anther** पुच्छयुक्त परागकोश

परागकोशाच्या पोकळीखालून वाढलेले शेपटीसारखे (परंतु त्यात परागकण नसलेले) उपांग; उदा. वासककुलातील काही वनस्पती.

**Tamaricaceae** झाऊ कुल; टॅमॅरिकेसी

शेरणी, झाऊ, इत्यादी द्विदलिकित मरुवनस्पतींचे लहान कुल; याचा अंतर्भाव बेंथॅम व हूकर यांच्या पद्धतीत कार्योफायलिनी व एंग्लर व प्रँटल यांच्या पद्धतीत पराएटेलीझ गणात केलेला आढळतो; बेसींनी अहिफेन गणात ( पॅपॅव्हेरेलीझमध्ये ) आणि हचिन्सननी झाऊ गणात (टॅमॅरिकेलीझमध्ये) समाविष्ट केले आहे. प्रमुख लक्षणे : फार लहान व एकाआड एक पानांची झुडपे व वृक्ष; द्विलिंगी, नियमित, ४-५ भागांची फुले; सुट्या पाकळ्या; तितकीच किंवा दुप्पट केसरदले, क्वचित अनेक, सुटी किंवा गटांमध्ये; किंजदले २–५ व जुळलेली; ऊर्ध्वस्थ किंजपुटात एक कप्पा व तलस्थ बीजकाधानीवर अनेक बीजके; बोंडात केसाळ बिया.

**tangential plane** स्पर्शरेखीय प्रतल

खोड किंवा मूळ यांच्या आडव्या छेदात त्रिज्येशी अथवा निकाष्ठ-किरणाशी काटकोनात असलेली पातळी.

**— section** स्पर्शरेषी छेद; स्पर्शरेखी छेद
वर वर्णन केलेल्या पातळीतून मिळणारा काप.

**tap-root** प्रधानमूळ; सोटमूळ; अधिमूळ
आदिमुळाची सतत खाली वाढ होऊन जाडजूड बनलेले व जमिनीत अनेक उपमुळे निर्माण करून मूलव्यूहाचा (तंत्राचा) प्रमुख भाग बनलेले प्रमुख मूळ; हे सर्व द्विदलिकित व कित्येक प्रकटबीज वनस्पतीत आढळते; उदा. मुळा, गाजर, गुलबुश यांमध्ये ते मांसल असते; पहा radicle.

**tapering (tapered)** शुंडाकृति; शूलाकृति
लांब काठ्याप्रमाणे किंवा सोंडेप्रमाणे निरुंद होत गेलेले.

**tapetum** पोषक स्तर
सर्व उच्च दर्जाच्या वनस्पतींत, बीजुकजनक कोशिकांभोवती असणारा व अन्नकणांनी भरलेल्या कोशिकांचा थर; हळूहळू हा विसर्जित होऊन बीजुक निर्मितीत वापरला जातो.

**Tapioca** तापिका; टॅपिओका
एरंड कुलातील एका वनस्पतीच्या लठ्ठ (ग्रंथिल) मुळातील पिष्ठयुक्त पदार्थ; तापिका (*Manihot utilissima* Pohl.).

**tawny** फिकट तपकिरी
काहीसा पिंगट पिवळ्या रंगाचा.

**Taxetum** बिर्मी-सघात
बिर्मि वृक्षांचा नैसर्गिक समूह (समावास); बर्मी = बिर्मी = यू (*Taxus baccata* L.).

**taxon (pl. taxa)** वर्गक
वर्गीकरणात भिन्न थरात मानलेले एखादे एकक; उदा. गण, गोत्र, वर्ग, कुल, वंश, जाती, इ.

**Taxonomy** वर्गीकरण विज्ञान
(१) वनस्पती अथवा प्राणी यांच्या महत्त्वाच्या लक्षणांचा विकासवादाच्या संदर्भात विचार करून वर्गीकरणाची तत्त्वे व मांडणी ठरविणारे शास्त्र.
(२) परिस्थिति व वनस्पती यांच्या अभ्यासात भिन्न समुदायांसंबंधी सर्व तपशील लक्षात घेऊन केलेली वनश्रीतील भिन्न घटकांची (समुदायांची) वर्गवारी.

**taxonomist** वर्गीकरणविज्ञ
वनस्पती अथवा प्राणी यांच्या वर्गीकरणासंबंधी विशेष ज्ञान असणारी व्यक्ती.

**taxis** अनुचलन
स्वतंत्र सजीवांची बाह्य चेतकाला अनुलक्षून केलेली प्रतिसादरूप हालचाल; पहा phototaxis; chemotaxis.

**technical term** पारिभाषिक संज्ञा; तांत्रिक संज्ञा
विशिष्ट विषयाच्या क्षेत्रात विशिष्ट अर्थाने वापरलेला शब्द.

**technique** तंत्र
विशिष्ट कार्य घडवून आणण्याकरिता वापरलेली आवश्यक पद्धती; त्यावरून technical = तांत्रिक (तंत्राचा अंतर्भाव असलेले; तंत्राचा आधार असलेले)

**tegmen** अंतश्चोल
बीजाच्या दोन आच्छादनांपैकी आतील आवरण.

**tegumentum** पुंजत्राण
पहा indusium.

**teleutospore (winter spore)** शिशिर-बीजुक
एक अथवा बहुधा दोन (क्वचित अनेक) कोशिकांचे बनलेले व बहुधा हिवाळी विश्रांतीनंतर रुजणारे बीजुक (कवकांपैकी तांबेऱ्यात आढळणारे);
पहा uredospore.

**telium** शिशिर-बीजुकपुंज
शिशिर ऋतूतील बीजुके एकत्र वाढल्याने बनलेला समूह; पिंगट, काळसर, पिवळट अशा रंगाचे हे ठिपके पानांवर वा खोडावर आढळतात.

**telophase** अंत्यावस्था
प्रकलाच्या विभाजनातील शेवटची अवस्था;
पहा mitosis; meiosis.

**tendril** प्रतान; ताणा; तणावा
दुर्बल वनस्पतीच्या प्रमुख अवयवाच्या रूपांतराने बनलेला तंतूसारखा, स्पर्शग्राही (संवेदनाक्षम) व आधार घेण्यास उपयुक्त असा अवयव; उदा. काकडी, वाटाणा, कळलावी, मोरवेल, इ.

**— climber** प्रतानारोही; प्रतानिनी
प्रतानाच्या साह्याने वर चढत जाणारी वेल.

**tendrillar** प्रतानरूप
प्रतानाप्रमाणे कार्यक्षम (उदा. कळलावीच्या पानाचे टोक, मोरवेलीचा देठ, इ.).

**tentacle** स्पर्शक
स्पर्शग्राही केस; उदा. ड्रॉसेरा नावाची कीटकभक्षक वनस्पती.

**tenuifolious** तनुपर्णी
पातळ पान असलेले.

**tepal** परिदल

पहा perianth.

**terate** शूलाकृति

लांबट, गोलसर, व टोकदार दांड्याप्रमाणे (उदा. पान).

**Teratology** विकृतिविज्ञान; विद्रूपविज्ञान

कुरचना, विकृती, राक्षसी आकाराचे अवयव इत्यादी-सारख्या निर्मितीसंबंधीची विज्ञानशाखा.

**terminal** अग्रस्थ; अंतिम

टोकावर असलेले; शेवटी असलेले; उदा. संयुक्त पानाच्या टोकावरचे दल; अक्षाच्या टोकावरची कळी.

**terminology** परिभाषा

एखाद्या विषयात विशिष्ट अर्थी वापरलेल्या (संज्ञांची) अनेक शब्दांची यादी ( शब्दसंग्रह ).

**ternary** त्र्यंगी

तिन्हीच्या गटात असलेले; त्रिभागी.

**ternate** त्रिदली

तीन दले असलेले ( उदा. बेलाचे संयुक्त पान ).

**terrestrial** (१) स्थलवासी; स्थलीय; (२) भूचर

(१) जमिनीवर वाढणारे; उदा. सराटा (*Tribulus terrestris L.* )

( २ ) प्राण्यांच्या बाबतीत ही संज्ञा वापरणे इष्ट.

**tertiary** तृतीय; तृतीयक; तिय्यम

तिसऱ्या क्रमांकाचे; दुय्यम अक्षावर आलेला तिसरा ( अक्ष ).

**— period** तृतीयकल्प

भूस्तर विकासातील एक कालखंड ( सु. साडसहा कोटी ते १·२ कोटी वर्षापूर्वीचा काल ).

**testa** बीजचोल; बहिश्चोल; बीजावरण

बीजाचे बाहेरचे आच्छादन; कधी कधी बाहेरचे व आतील पूर्ण जुळलेले असते.

**tetra—** चतुः - ; चतुर् -

चारीचा संबंध दर्शविणारा उपसर्ग.

**tetracarpellary** चतुः किंजदली.

चार किंजदले असलेले ( किंजमंडल किंवा फूल ).

**tetrachotomy** चतुःखंडन; चतुःशाखाक्रम

चार सारखे भाग पडलेले ( अक्ष ) असण्याचा प्रकार; पहा dichotomy.

**tetracyclic** चतुर्मंडलित; चतुश्चाक्रिक

भिन्न अवयवांची चार मंडले ( चक्रे, वर्तुळे ) असलेले ( फूल ).

**tetrad** चतुष्टय

चौकडाः चारीचा संच; उदा. परागचतुष्टय ( उदा. संतानक ) किंवा बीजुकचतुष्टय ( काही शैवले ).

**tetradynamous** चतुरोन्नत

सहापैकी चार केसरदले अधिक उंच असलेले; उदा. मोहरीच्या फुलातील केसरमंडल.

**tetrafoliate** चतुर्दली

चार दलाचे संयुक्त पान; उदा. मार्सिलिया.

**tetramerous** चतुर्भागी

प्रत्येक मंडलात चार अवयव असलेले ( फूल ); उदा. मोहरीचे फूल.

**tetrandrous** चतुष्केसरदली

चार केसरदले असलेले; उदा. कारवीचे फूल.

**tetranucleate** चतुः प्रकली

चार प्रकले असलेली ( कोशिका ).

**tetraphyllous** चतुष्पर्णी; चतुष्परिदली

चार पानांचे; चार दले असलेले परिदलमंडल पहा perianth.

**tetraploid** चतुर्गुणित

चार एकगुणित प्रकलांच्या संयोगाने बनलेला ( प्रकल ); असा प्रकल असलेली ( वनस्पती ).

**tetraploidy** चतुर्गुणितत्व

चतुर्गुणित प्रकल असण्याचा प्रकार.

**tetraquetrus** चतुष्कोनी

चार धारा असलेले; आडव्या छेदात चार कोन दिसणारे ( चौकोनी ); उदा. खोड ( कांडवेल ).

**tetrarch** चतुःसूत्र

रंभाच्या आडव्या छेदात चार प्रकाष्ठाचे वृंद असण्याचा प्रकार; पहा stele.

**tetrasporangium** चतुर्बीजुककोश

चार बीजुके असलेला बीजुककोश; उदा. लाल शैवले.

**tetraspore** चतुर्थबीजुक

चार बीजुकांपैकी एक.

**tetrasporophyte** चतुर्थबीजुकधारी

चतुर्थबीजुके निर्मिणारी पिढी; उदा. लाल शैवले ( उदा. पॉलिसायफोनिया ).

**tetravalent** चतुःसंयुजी

प्रकलाच्या अर्धसूत्रण विभाजनात वरवर एका रंगसूत्राप्रमाणे दिसणाऱ्या रंगसूत्रातील चारीपैकी एक; येथे

समजात रंगसूत्राच्या जोडीतील प्रत्यकाची उभी विभागणी झाली असावी असे मानल्यास एकूण चार रंगसूत्रार्धे एकत्र काही काळ असतात.

**texture** पोत

पानांची किंवा तत्सम अवयवाची जाडी, मजबुती, इ. उदा. पातळ, जाड, चिवट, मांसल, ठिसूळ इ. संज्ञा यासंबंधात वापरतात; हीच संज्ञा जमिनीबाबतही वापरतात.

**thalamifloral (thalamiflorous)** अवकिंज-पुष्प

किंजमंडलाखेरीज फुलातील इतर भाग वरच्या पातळीत (पुष्पस्थलीवर) असलेले.

**Thalamiflorae** अवकिंजपुष्पी श्रेणी

बेंथॅम आणि हूकर यांच्या वर्गीकरणामध्ये द्विदलिकित (वर्ग) वनस्पतींतील मुक्तप्रदली (सुट्या पाकळ्यांच्या फुलझाडांची) उपवर्गातील अवकिंज फुलांची एक श्रेणी; दुसरी श्रेणी बिंबयुक्त फुलांची (बिंबपुष्पी) व तिसरी श्रेणी चषकाप्रमाणे संवर्त असलेल्या परिकिंज किंवा अपिकिंज फुलांची (संवर्तपुष्पी).

**thalamus (torus)** पुष्पस्थली

पुष्पदले ज्यावर आधारलेली असतात तो देठाचा पसरट भाग; याला receptacle असेही म्हटलेले आढळते.

**thalasad** समुद्रपादप

समुद्रात वाढणारी वनस्पती.

**thalasophilus** समुद्रप्रिय (वनस्पति)

**thalassoplankton** सागरी प्लवक

पहा plankton.

**thalloid** कायकाभ

कायकासारखे अत्यंत साधे शरीर; पहा thallus.

**Thallophyta** कायकवनस्पति विभाग

जुन्या (ऐक्लर) वर्गीकरण पद्धतीप्रमाणे अति साध्या, अप्रभेदित, कायक प्रकारच्या शरीर धारण करणाऱ्या वनस्पतींचा विभाग; यामध्ये शैवले, कवक व शैवाक यांचा समावेश करीत; पहा Cryptogamae.

**thallus** कायक

खोड व पाने यांचा पूर्ण अभाव असलेले व कधी कधी मुळासारखी (पण मुळे नव्हेत) आधारभूत साधी उपांगे असलेले, एककोशिक किंवा अनेक कोशिक अप्रभेदित शरीर; उदा. शैवल, कवक, भोंडफूल, इ.

३०

**Theaceae (Ternstroemiaceae)** चहा कुल; थीएसी

चहा (थीया), कॅमेलिया, (गॉर्डोनिया) नागेट्टा इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल; याचा अंतर्भाव एंग्लर व प्रँटल यांनी पराएटेलीझममध्ये (तटलग्न बीजकाधानी असलेल्या गणात), बेंथॅम व हूकर यांनी कोकम (बृंदार) गणात व हचिन्सनने चहा गणात (थीएलीझममध्ये) केला आहे. प्रमुख लक्षणे; साध्या, चिवट, एकाआड एक पानांच्या काष्ठयुक्त वनस्पती; द्विलिंगी, अंशतः सर्पिल फुले. संदले ५–७, नियमित, दीर्घकाल राहणारी; पाकळ्या बहुधा ५–९ किंवा अनेक व सुट्या, क्वचित् खाली जुळलेल्या; केसरदले अनेक, क्वचित कमी वा जास्त (५–१०–१५), सुटी किंवा जुळलेली; किंजदले जुळलेली ३–५ किंवा २ ते अनेक व १ ते अनेक बीजके (अक्षलग्न); बोंडात अनेक बिया.

**theca** प्रावरक

(१) नेचाचा बीजुककोश; (२) शेवाळीतील बीजुकाशय; (३) परागकोश; (४) पराग पुटक.

**theine** थीन

चहाच्या पानातील क्षाराभ (अल्कलॉइड).

**Thelephoraceae** चर्मकवक कुल; थेलेफोरेसी

गदाकवकांपैकी एक कुल; यातील कवकांचे शवोपजीवी शरीर झाडांच्या सालीवर सपाट, चिवट खपलीसारखे असून गदानिर्मितीचा थर वरच्या बाजूस असतो; अथवा सपाट शरीराचा भाग आधारावर उचलला जाऊन एकावर एक कंसाकृति रचना बनते व त्या प्रत्येकाखाली गदांचे थर येतात. उदा. स्टेरियम; पहा Basidiomycetes.

**Theory of descent** वंशानुक्रमवाद (सिद्धांत)

पृथ्वीवरील सजीव सृष्टी एकाएकी आहे तशी निर्माण झाली नसून आरंभी अपघातानेच निर्माण झालेल्या अतिसूक्ष्म साध्या जीवद्रव्यापासून क्रमाने, हळुहळू निसर्गतः फरक पडत जाऊन विविधरूपधारी अवस्थे-प्रत पोचली आहे असा चार्लस् डार्विन यांचा सिद्धांत.

**Theory of pangenesis** सर्वोत्पत्तिवाद

पहा pangenesis.

**thermonastic** तापानुकुंचनी

उष्णतेमुळे (अधिक तापमानाच्या उत्तेजनामुळे) घडून आलेली (अवयवांची वक्रता); यामध्ये अवयवांची वाढ विषमप्रकारे होऊन परिणामी वाकडे-

पणा येतो. उदा. यकृतकांचे कायक प्रथम वरच्या बाजूस अधिक वाढून उलट्या बशीप्रमाणे आकार येतो व याला 'अपिवर्धन' म्हणतात; याउलट वाकडेपणाला 'अधोवर्धन' म्हणतात. केशराची फुले उष्ण हवेत उघडतात व थंड हवेत मिटतात. पहा epinasty; hyponasty.

**thermonasty** तापानुकुंचन

वर वर्णन केलेली घटना; येथे उत्तेजकाच्या दिशेचा वक्रतेशी संबंध नसतो. पहा nastic movement.

**thermotactic** तापानुचलनी

पुढे वर्णन केलेल्या प्रकारची हालचाल (त्या दिशेकडे किंवा त्या विरुद्ध).

**thermotaxis** तापानुचलन

उष्णतेमुळे उत्तेजन पावलेल्या सजीव स्वतंत्र वनस्पतीचे स्थानांतर अथवा स्थिर वनस्पतींच्या स्वतंत्र भागाचे (गंतुक, बीजुक, हरितकणु, इ.) स्थलांतर; पहा taxis.

**thermotropic** तापानुवर्तनी

उष्णतेमुळे तिच्या उगमाकडे किंवा विरुद्ध दिशेला झालेली (वनस्पतीच्या अवयवांची वाढ); यामध्ये अवयवास वक्रता येणे शक्य असते. पहा tropism.

**thickening** घनीभवन

प्राथमिक तूलीरमय आवरणावर नवीन लेप बसून जाडी वाढण्याची प्रक्रिया; हा लेप तूलीराचा किंवा काष्ठीराचा (लिग्निनचा) असतो; तसेच तो सर्वत्र सारखा अगर विशिष्ट जागी बसल्याने भिन्न प्रकारचे अंकन आढळते.

**thicket** झाडी

अनेक लहान झुडपांची दाट जाळी.

**thigmotropism** कंपनानुवर्तन; स्पर्शानुवर्तन

(१) कंपनाच्या चेतनेनुसार अधिक स्थानिक वाढ होऊन अवयवात वक्रता येणे. (२) स्पर्शाच्या चेतनेमुळे उलट बाजूस वाढ अधिक होऊन वक्रता येण्याची प्रक्रिया; उदा. वेलीचे टोक; प्रतानाचा टोकाकडील भाग; कीटकभक्षक वनस्पती.

**thinophyta** राशिपादप

माती किंवा वाळूच्या ढिगावर वाढणाऱ्या वनस्पती.

**thorn** शूल; काटा

लांबट, टोकदार, कठीण, कधी शाखित, अशी रूपांतर पावलेली शाखा; उदा. मेंदी, डाळिंब, करवंद, इ.

**thorn-forest** काटेरी वन

रुक्ष ठिकाणी वाढणारी काटेरी झुडपे व लहान वृक्ष यांचे जंगल. उदा. ब्राझिलमधील 'कटिंगा' वन (कंटकी वन).

**thread-shaped (filiform)** सूत्राकार

फार बारीक सुतासारखे.

**three-angled (trigonous)** त्रिकोनी; त्रिधारी

तीन धारा असलेले (खोड, फळ, बी, इ).

**throat** कंठ

जुळलेल्या पाकळ्यांच्या फुलाच्या नळीचे द्वार; उदा. सदाफुली; पारिजातक.

**Thymelaeaceae** रामेठा कुल; थायमेलिएसी

रामेठा या वनस्पतीचा अंतर्भाव असलेले हे द्विदलिकित फुलझाडांचे कुल जंबुल गणात (मिर्टेलिझमध्ये) समाविष्ट केले आहे (एंग्लर). हचिन्सन यांनी रामेठा गणात (थायमेलेलिझमध्ये) अंतर्भूत केले आहे. प्रमुख लक्षणे; काष्ठयुक्त व साध्या, एकाआड एक किंवा समोरासमोर पानांच्या वनस्पती; बहुतेक सर्व वृक्ष किंवा झुडपे, क्वचित ओषधी; द्विलिंगी अथवा एकलिंगी फुलात कधी पाकळ्यांचा अभाव; अक्ष नळीसारखा किंवा पेल्यासारखा; संदले ४–५ बहुधा जुळलेली; पाकळ्या ४–१२, खवल्यासारख्या; केसरदले संदलाइतकी व त्यांशी एकाआड एक, किंवा दुप्पट तर कधी दोन. बहुधा बिम्ब असते; किंजदल एक, ऊर्ध्वस्थ; किंजपुटात एक किंवा दोन कप्पे; बीजके एक किंवा दोन. फळे विविध, पुष्पस्थलीने वेढलेली; पहा Myrtaceae.

**thyrse (thyrsus)** मिश्रवर्ध्यक्ष; मिश्र परिमंजरी

बाजूचे अक्ष कुंठित व मुख्य अक्ष अकुंठित असलेली परिमंजरी (शाखायुक्त फुलोरा). पहा panicle.

**tier** स्तर, थर

**tigline** टिग्लीन

जमालगोटा या वनस्पतीच्या बियांतील कडू व तिखट द्रव्य.

**Tiliaceae** परुषक कुल; टिलिएसी

ज्योत (ज्यूट), निचर्डी, खटखटी, धामण, रुद्राक्ष इ. वनस्पतींचे कुल; याचा अंतर्भाव भेंडी गणात (माल्व्हेलीझमध्ये) केला जातो. हचिन्सन यांनी परुषक गणात (टिलिएलीझमध्ये) केला आहे. भेंडी कुलाशी याचे साम्य असून अनेक व स्वतंत्र केसरदले, दोन कप्प्यांचे परागकोश व कुंठित फुलोरे या लक्षणांनी त्या

कुलापासून परुषक कुलाचे निराळेपण ओळखता येते; पहा Malvaceae.

**tiller** फूट; फुटवा

पहा sucker; उदा. नेचा, गवते.

**tilophyte (pond-plant)** पल्वलपादप

डबक्यातील वनस्पती; उदा. गोंडाळ, ॲझोला, कारंड (लेम्ना), इ.

**timber-line** वृक्षसीमा

उंच पर्वतावरच्या वनश्रीतील वृक्षांची वाढ संपून खुरटी झाडी सुरवात होते ती सीमारेषा (उंची).

**tinctorious (tinctorial)** रंजकता; रंजनक्षमता

रंगविण्याची क्षमता असलेले; उदा. अल (*Morinda tinctoria* Roxb); काळा कुडा (*Wrightia tinctoria* R. BR.) नीळ (*Indigofera tinctoria* L.).

**tissue** ऊतक; ऊति

समान उगम व कार्य असलेल्या आणि बहुधा परस्परावलंबी कोशिकांचा समूह.

**--, aqueous** जलोतक

पातळ आवरणाच्या, हरितद्रव्यहीन, जलपूरित कोशिकांची अधस्त्वचा; उदा. मांसल पाने.

**— culture** ऊतक-संवर्धन

कृत्रिमरीत्या सजीवांच्या ऊतकाची विशेष पद्धतीने शरीराबाहेर वाढ करण्याची प्रक्रिया.

**—, heterogeneous** संकीर्णोतक

भिन्नप्रकारच्या कोशिका असलेले ऊतक.

**--, spurious** छद्मोतक; आभासी ऊतक

अनेक कवकतंतू एकत्र विणल्याप्रमाणे राहून बनलेले ऊतक; उदा. भूछत्रे, भूकंदुक, इ.

**— system** ऊतक-तंत्र

समान कार्य असलेल्या अनेक संलग्न ऊतकांचा संघ; उदा. वाहक तंत्र; विभज्या; तल्पोतक तंत्र.

**toadstool** छत्रक

भूछत्राखेरीज इतर तत्सम गदाकवक.

**tomentose** लवदार; लवाच्छादित

आखूड व बारीक लव असलेले. उदा. ऐन (*Terminalia tomentosa* W. & A.).

**tomentum** लव

**Tomillares** चर्मपर्णी (चर्मिलपर्णी) वनश्री

फार थोडा पाऊस व कोरडी हवा यांच्या प्रभावाने वाढलेला मरुवासी (चिवट पानांच्या) वनस्पतींचा समावास.

**tongue-grafting** जिभली कलम

मूळच्या खुंटात इच्छित वनस्पतींचे पाचरीसारखे कापलेले कलम बसविण्याची प्रक्रिया.

**tongue-shaped (ligulate)** जिव्हाकृती

जिभेसारखे सपाट, क्वचित जाड व मांसल व लांबट आकाराचे; फार पातळ व लहान असल्यास 'जिव्हिकाकृति' ही संज्ञा वापरतात; उदा. सूर्यफुलाच्या किरणपुष्पकांचा पुष्पमुकुट.

**tonoplast** अंतःप्राकल पटल; रिक्तिकापटल

कोशिकेतील रिक्तिके (पोकळी) भोवती असलेले जीवद्रव्याचे (प्राकलाचे) आवरण; रिक्तिकेतील पदार्थाचे नियंत्रण या पटलाद्वारे होते.

**toothed** दातेरी

दाताप्रमाणे विभागलेली किंवा दाते असलेली; करवती (पानाची कडा).

**top-shaped** कुंभीरूप; भोवऱ्यासारखे

उलट्या शंकूप्रमाणे; उदा. मुळा, गाजर; पहा napiform.

**torulose** गाठाळ

अनियमितपणे गाठाळ असलेला.

**torus** पुष्पस्थली

पहा thalamus.

**toxic** विषारी; विषमय

विष असलेले, विषयुक्त.

**toxin** विष; जंतुविष

काही जीवोपजीवी कवकातून स्रवलेला व आश्रय वनस्पतीच्या कोशिकांचा नाश करणारा पदार्थ; काही सूक्ष्मजंतूंनी टाकलेला तसाच विकृतिजनक (अथवा नाशक) द्रव.

**trabecula** प्रपाट्टिका

बारीक आडवा दांडा; उदा. शेवाळीच्या परितुंडांच्या दात्यांवर असलेला; आयसॉएटिसच्या लघुबीजुक कोशातील पडदे; सिलाजिनेलाच्या खोडातील मध्यवृंदाभोवती असलेल्या ऊतकातील आडवा पडदा.

**trabeculate** प्रपट्टिकित

प्रपट्टिका असलेले

**trace** लेश

**— elements** लेशघटक

वनस्पतींना आवश्यक असे पण लेशमात्र अन्नघटक.

**—, leaf** पर्णलेश

पानाच्या देठातून खोडातील रंभाशी ( वाहक व्यूहाशी ) जोडणारा वाहक घटकांचा संच.

**trachea** वाहिनी; वाहक नलिका

बीजी वनस्पतींपैकी फुलझाडांमध्ये विशेषेकरून आढळणारा काष्ठातील पाण्याची ने-आण करणारा सूक्ष्म नळीसारखा मृत घटक; यांची आवरणे जाड व लिग्निनयुक्त असल्याने यामध्ये प्राकल नसतो; वनस्पतीस मजबुती आणण्यास या घटकांचा विशेष उपयोगही होतो.

**tracheal cell (tracheid)** वाहिका

वरच्याप्रमाणे काष्ठांतील हा घटक लांबट कोशिकारूप आणि मृत असून प्रकटबीज वनस्पती, नेचे व नेचाभ पादप यांत आढळतो; फुलझाडांपैकी काहीत वाहिका आढळतात (द्विदलिकित वनस्पतीतील द्वितीयक काष्ठ).

**tracheid-fibre** वाहिकासूत्र

जाड आवरण असलेला व फक्त मजबुती देणारा लांब तंतुसारखा घटक.

**Tracheophyta (Vascular plants)** वाहिनीवंत वनस्पती

वाहिन्या किंवा वाहिकायुक्त संरचना असलेल्या वनस्पती ( नेचाभ व बीजी वनस्पती) पहा Pteridophyto; Phanerogamae.

**trachycarpous** खर्बरफली

खरबडीत फळ असलेली ( वनस्पती ); उदा. कवठ; सिताफळ इ.

**traction-fibre** कर्षण सूत्र

कोशिकाविभाजनातील ( प्रकल विभाजनात ) तर्कूच्या सूत्रांपैकी रंगसूत्रांना चिकटलेला व त्यांना ध्रुवाकडे खेचून नेणारा सूत्रल भाग; हे अनेक असून जीवद्रव्यापासून बनतात.

**tragacanth** ट्रॅगॅकँथ ( गोंद )

एका विशिष्ट वनस्पतीपासून ( *Astragalus tragacantha L.* ) स्रवणारा गोंद.

**trailing (prostrate)** अनुसरणी; प्रणत

मुळाशिवाय जमिनीवर सरपटत वाढणारी वेल किंवा ओषधी; उदा. विष्णुक्रांता, काटेरिंगणी.

**transect** वनश्री छेद

विशिष्ट स्थानातील वनश्रीच्या अभ्यासाकरिता घेतलेला आडवा छेद.

**transfer** स्थानांतर

कोशिका अथवा नलिकाद्वारे पाण्याचे स्थलांतर.

**transformation (metamorphosis)** रूपांतर; रूपांतरण

एखाद्या अवयवाच्या कार्यात बदल होऊन त्यानुसार आकारात व स्वरूपात बदल होण्याची प्रक्रिया; उदा. फांदीचे रूपांतर तणाव्यात किंवा काट्यात झालेले आढळते; पानाचे रूपांतर काटा किंवा ताणा यात होते; ( उदा. निवडुंग, कृष्णकमळ, वाटाणा, कांडवेल, इ. )

**transfusion tissue** संचरणोतक

बाजूच्या शिराऐवजी मृदूतक व वाहिकासारख्या मृत कोशिकांचे जाळ; कित्येक शंकुमंत वनस्पतींच्या पानांमध्ये हे ऊतक वाहकवृंदाशी संलग्न असते व त्याचे कार्य वाहकवृंदाला पूरक असते; मृदूतकाचा संपर्क परिकाष्ठाशी व वाहिकांचा प्रकाष्ठाशी असतो.

**transition** संक्रमण

एका अवयवातून दुसऱ्यात बदल होण्याची प्रक्रिया; उदा. मुळाची व खोडाची परस्परमर्यादा संपून ते अवयव स्वतंत्र कार्य करू लागतात असा संधिप्रदेश, दोन्ही अवयवांच्या सांध्यात असून, लहान रोपाच्या तेथील अंतर्रचनेत हा बदल भिन्न प्रकारे झालेला आढळतो. या बदलानंतर वाहकवृंदांच्या संख्येत बदल बहुधा होतो. पाकळ्यांचे केसरदलात रूपांतर.

**translocation** ( १ ) स्थलांतर; ( २ ) अदलाबदल

एखाद्या ठिकाणाहून अन्यत्र संचित ( राखीव ) पदार्थ नेण्याची प्रक्रिया; उदा. ग्रंथिल ( लठ्ठ ) मुळातून खोडात व तेथून फुलाच्या कळीत अन्नांश नेणे व फळ बनविण्यास मदत करणे; कलमातील राखीव अन्न त्यावर नव्याने फुटणाऱ्या कळ्यात येणे. ( २ ) जनुकांचे एका रंगसूत्रावरून दुसऱ्यावर जाणे व त्या उलट क्रिया.

**translator (corpusculum)** वृंतक; स्थानांतरकारी

दोन परागपुंजांच्या तळास जोडणारा देठासारखा भाग; उदा. रुई.

**transmission** प्रेषण

संपर्कस्थानापासून प्रत्यक्ष चलनवलन घडविणाऱ्या अवयवापर्यंत चेतनेला ( किंवा ती पोचविणाऱ्या पदार्थाला ) पोचविण्याची प्रक्रिया; उदा. लाजाळूच्या पानास केलेला स्पर्श ( चेतक ) पानाच्या तळापर्यंत ( पुलवृंत ) पोचल्याशिवाय पानाची व दलांची प्रतिक्रिया ( वळून खाली लोंबणे ) होत नाही.

**transpiration** बाष्पोच्छ्वास; बाष्पोत्सर्जन
वनस्पतीने नियंत्रित केलेला व त्वग्रंध्रांतून बाहेर टाकलेला वाफेच्या स्वरूपातील उच्छ्वास; पहा stoma.

**—, cuticular** उपत्वचीय बाष्पोच्छ्वास
उपत्वचेतून होणारे मामुली ( अत्यल्प ) बाष्पीभवन.

**—, stomatal** त्वग्रंध्रीय बाष्पोच्छ्वास
त्वग्रंध्रांतून ( पानावरच्या छिद्रांतून ) जाणारी मोठ्या प्रमाणातील वाफ.

**transpirometer** बाष्पोच्छ्वासमापक
बाष्पोच्छ्वासाचे प्रमाण मोजण्याचे साधन ( उपकरण ).

**transport** अभिगमन; परिवहन
एखाद्या अवयवात इतरत्र तयार झालेले अन्न आणले जाणे; उदा. पानात बनलेले अन्न खोडात किंवा फुलोऱ्यात नेणे.

**transverse** अनुप्रस्थ; आडवा
लांबट अक्षाला काटकोनात असलेला ( उदा. छेद ).

**— plane** अनुप्रस्थ प्रतल
वर सांगितल्याप्रमाणे असलेली पातळी.

**— section** अनुप्रस्थ छेद; काटच्छेद; आडवा छेद
लांब (उभ्या) अक्षाचा घेतलेला आडवा पातळ काप; उदा. खोड, शाखा, मूळ व पान यांचा आडवा काप ते उभे धरून घेतला जातो. संरचनेच्या अभ्यासाकरिता असे पातळ काप घेणे आवश्यक असते; पहा longitudinal section.

**trap-door** कूटद्वार
आतल्या बाजूस उघडून, बंद राहून व आतच कोंडून ठेवणारे झडप; उदा. कीटकभक्षक वनस्पतींपैकी गेळ्याची वनस्पती ( Bladderwort ).

**trapezoid** समलंबाभ
समलंब चौकोनाप्रमाणे आकाराचे ( उदा. पान ); उदा. अडिॲंटम नेच्याच्या काही जातींची दले किंवा दलके.

**trap (prison) - mechanism** कारायंत्रणा
पहा prison-mechanism.

**traumatropism** व्रणानुवर्तनी
जखमेच्या चेतकामुळे विशिष्टप्रकारे वाढ घडून येण्याची प्रक्रिया; उदा. मुळांचे टोक; ओकच्या वृक्षावर येणारी गाठ ( मायफळ ).

**tree** वृक्ष
बहुवर्षायू, काष्ठमय व एक जाडजूड, प्रमुख व उंच खोड ( प्रकांड ) असलेले झाड; उदा. आंबा, निंब इ. पहा herb, shrub.

**— canopy** वृक्षछत्र
अनेक वृक्षांच्या माथ्यावरील पर्णसंभारामुळे बनलेला छत.

**— stratum** वृक्षस्तर
जंगलातील सर्वात उंच झाडांचा थर.

**— culture** वृक्षसंवर्धन
विशेष रीतीने वृक्षांची वाढ करण्याची प्रक्रिया.

**Tremellales (Jelly-fungi)** जेलीकवक गण; अवलेहकवक
पहा Jelly-fungi.

**tremelloid** थुलथुलीत
ट्रेमेला या वंशातील जेलीकवकाप्रमाणे ( थलथलीत ) शरीर असलेले.

**tri** त्रि-
तीन या संख्येसंबंधीचा किंवा तिप्पट संख्या दर्शविण्याचा उपसर्ग.

**triad** त्रिक; त्रिकूट; त्रय
तिन्हींचा गट.

**triadelphia** त्रिसंघ गण
केसरदलांचे तीन संघ असणाऱ्या फुलझाडांचा कार्ल लिनियस यांनी केलेला गट ( गण ).

**triadelphous** त्रिसंघ
केसरदले तीन गटात असणारे ( फूल किंवा केसरमंडल ); पहा monadelphous.

**triandrous** त्रिकेसरदली
तीनच केसरदले असलेले ( फूल किंवा केसरमंडल ); उदा. काही गवते ( मका ), केशर, बाळवेखंड.

**triangular** त्रिकोनी
तीन कोन किंवा तीन धारा असलेले ( पान, खोड ); उदा, लव्हाळा, मोथा, सायलोटम; लायकोपोडियमचे पान.

**trianthous** त्रिपुष्पी
एका देठावर तीन फुले असलेले.

**triarch** त्रिसूत्र
तीन प्रकाष्ठ गट असलेला ( रंभ ); उदा. लायकोपोडियमच्या काही जातींचे मूळ; पहा stele.

**tricarpellary (tricarpellate)** त्रिकिंजक
तीन किंजदले असलेले ( फूल किंवा किंजमंडल ); उदा. एरंड, नारळ, इ.

**tricephalous** त्रिस्तबक; त्रिशीर्षक
तीन स्तबक ( फुलोरे ) असलेला ( अक्ष ); पहा capitulum.

**trichasium** त्रिपद वल्लरी
तीन अक्षात विभागलेला कुंठित फुलोरा. पहा cyme.

**trichodes** केशाभ
केसासारखा.

**trichogyne** योनिकासूत्र
काही लाल शैवलांच्या स्त्री-जननेंद्रियाच्या टोकास असलेला तंतूसारखा आदायी ( ग्राहक ) भाग. काही धानीकवक व शैवाक वनस्पतींतही हा आढळतो.

**trichoma ( pl. trichomata )** तंतुकायक
सूक्ष्म तंतूसारखे कायक ( शरीर ); उदा. काही शैवले ( नॉस्टॉक, कॉन्फर्वा ); याला trichome असे विशेषेकरून म्हणतात.

**trichome** अधिरोम
अपित्वचेपासून वाढलेला केस, पहा bristle.

**trichophyllus** केशपर्णी
अतिशय विभागलेली केसासारखी पाने असलेली ( वनस्पती ); उदा. कामलता.

**trichothallic** अग्रकेशी
टोकास एक अथवा अनेक तंतूसारखे केस असलेला (उदा. शैवल-कायक-तंतू ) एक्टोकोर्पस, लेथेसिया, इ.

**trichotomy** त्रिभाजन; त्रिशाखाक्रम
अक्षाचे तीन विभाग ( शाखा ) होण्याचा प्रकार.

**tricoccus** त्रिफलांश
फुटून ज्याचे तीन तडकणारे भाग ( कुडी ) अलग होतात असे शुष्क फळ; उदा. एरंड; पहा. coccus.

**tricolor** तिरंगी
तीन रंग असलेले.

**tricostate ( trinervate )** त्रिसिराल
तीन मुख्य शिरा असलेले पान; उदा. बोर.

**tricussate** त्रिपर्णी
खोडाच्या प्रत्येक पेऱ्यावर तीन पानांचे मंडळ असलेली स्थिती; उदा. कण्हेर. पहा decussate.

**tricyclic** त्रिचक्रीय; त्रिमंडलित
अवयवांची तीन मंडले असलेले; उदा. फुलातील संवर्त, पुष्पमुकुट इत्यादी पुष्पदलांची मंडले एकूण तीन असल्यास ते फूल त्रिचक्रीय ठरते; गुलबुश, कुमूर, आघाडा, आवळा, कुंकुम इ.

**tridentate** त्रिदंती
तीन दाते असलेले.

**triennis ( trimus )** त्रिवर्षायु
तीन वर्षे टिकणारे.

**trifid** त्रिशाखी
तीन शाखांत विभागलेले; उदा. एरंडाच्या फुलातील किंजल्क.

**triflorous** त्रिपुष्पी
तीन फुले असलेली ( वल्लरी ); उदा. मोगरा.

**trifoliate** त्रिपर्णी
तीन पानी.

**trifoliolate** त्रिदली
तीन दले असलेले संयुक्त पान; उदा. पांगारा, पळस, बेल, इ.

**trigonous** त्रिधारी
तीन धारा असलेले; पहा triangular.

**trihybrid-cross** गुणत्रय संकर
तीन वैकल्पिक गुणांच्या जोड्यांनी भिन्न असलेल्या वनस्पतींच्या प्रकारांचा संकर; यातील संततीस त्रिसंकरण म्हणतात; पहा dihybrid-cross.

**trilateral** त्रिपार्श्व
तीन पृष्ठ असलेले किंवा लोलकासारखे ( पान, खोड, फळ, बी; ).

**trilobed ( trilobate )** त्रिखंडी
तीन भाग स्पष्ट असलेले; उदा. एरंडाचा किंजपुट; तीन अपूर्ण खंड असलेले ( पान ); उदा. अळू, हरणखुरी.

**trilocular ( three-celled )** त्रिपुटक
तीन कप्पे असलेला; ( उदा. किंजपुट; जंगली एरंड; कर्दळ, इ. )

**trimerous** त्रिभागी
प्रत्येक मंडलात तीन भाग असलेले; ( उदा. नारळ, कुमूर, गुलछडी, इत्यादींची फुले ).

**trimorphic ( trimorphous )** त्रिरूपी
तीन भिन्न प्रकारची संरचना असलेला एकच अवयव ( उदा. फूल ); आखूड, लांब व मध्यम किंजदले किंवा केसरदले असलेली फुले.

**trimonphism** त्रिरूपत्व
वर वर्णन केलेली स्थिती.

**trioecious** त्रिभक्तलिंगी
पुं–पुष्पे, स्त्री–पुष्पे व द्विलिंगी फुले तीन स्वतंत्र झाडावर असलेली वनस्पती; उदा. ॲश.

**triovulate** त्रिबीजक
तीनच बीजके असलेला किंजपुट; उदा. एरंड.

**tripartite** त्रिभागी; त्रिभक्त
तीन भागात विभागलेले; उदा सीताफळाचा संवर्त.

**tripetalous** त्रिप्रदली
तीन पाकळ्याचे ( उदा. सीताफळाचे फूल ).

**tripinnate** त्रिगुण पिच्छाकृति
तीनदा पिसासारखे विभागलेले ( पान ); उदा. शेवगा.

**triple fusion** त्रिसंयोग
फुलझाडांच्या बीजकाच्या गर्भकोशातील दोन स्त्रीप्रकल व परागनलिकेतून आलेल्या दोन नरप्रकलापैकी एक या तिन्हींचा संयोग; त्यानंतर पुष्क–प्रकल बनण्याची प्रक्रिया होते; पहा endosperm.

**triplicate** त्रिगुण्य
तिप्पट संख्या असलेले; उदा. एखाद्या आनुवंशिक लक्षणाचे अनुहरण संततीत भिन्न प्रमाणात होतांना त्याबद्दल तीन प्रभावी घटक जबाबदार असण्याचा प्रकार आढळतो; उदा. गव्हाचा रंग. पहा duplicate.

**triploid** त्रिगुणित
रंगसूत्रांच्या नित्य (एकगुणित) संख्येऐवजी प्रकलातील त्यांची संख्या तिप्पट असणे; पहा polyploid; diploid.

**triquetrous** त्रिधारी; त्रिकोनी
तीनधारा असलेले ( खोड, फळ, इ. ) उदा. *Psilotum triquetrum*.

**triridged** त्रिकटक
तीन जाड कंगोरे असलेले; उदा. काही बीजुके.

**triseriate** त्रिस्तरी
तीन थरात ( श्रेढीत ) असणारे.

**trisomic** त्रिसमसूत्री
द्विगुणित रंगसूत्रे असलेल्या प्रकलात कधी कधी एखादे रंगसूत्र विद्यमान रंगसूत्रांपैकी एखाद्याशी सारखेपणा दर्शविणारे ( समरचित ) आढळते. त्यामुळे तीन रंगसूत्रे सारखी असण्याचा प्रकार. नित्याच्या प्रकारात समरचित रंगसूत्रांच्या जोड्या असतात.

**trispermous** त्रिबीजी
तीनच बीजे असलेले; उदा. एरंडाचे फळ.

**tristichous** त्रिपंक्तिक
तीन उभ्या रांगांत असलेले ( उदा. मोथा कुलातील पाने ); पहा phyllotaxis.

**tristigmatic** त्रिकिंजल्की
तीन किंजल्क असलेले किंजमंडल; उदा. आवळा, एरंड.

**tristis** ( १ ) निशापुष्पी; ( २ ) मंदवर्णी
( १ ) रात्री फुले येणारी ( विकसणारी ); उदा. पारिजातक ( *Nyctanthes arbor-tristis* L.); ( २ ) फिकट व अनाकर्षक रंगाचे.

**tristylous** त्रिकिंजली
तीन किंजले असलेले (किंजमंडल; फूल); उदा. जंगली एरंड.

**triternate** त्रिदली संयुक्त
पानाचे प्रत्येक दल पुन्हा त्रिदली असण्याचा प्रकार.

**trivalvular** त्रिशकली
फुटल्यावर तीन शकले असलेले ( फळ ); उदा. भेंडी.

**tropic** अनुवर्तनी
चेतना निर्माण करणाऱ्या घटकाकडे किंवा घटकाविरुद्ध दिशेने वाढत जाणारे ( अवयव ) अथवा होणारी वाढ.

**tropism** अनुवर्तन
वर सांगितल्या प्रकारच्या वाढीची प्रक्रिया;
पहा phototropism; geotropism.

**tropophyte** परिवर्तनी वनस्पति
ऋतुमानाप्रमाणे आर्द्र वनस्पती किंवा मरुवनस्पती या प्रमाणे अनुयोजक वनस्पती.

**truffle** (**Tuberaceae**) कंदकवक
धानीकवक वर्गातील भूमिस्थित कवक कुलातील खाद्य व सुवासिक शवोपजीवी वनस्पती; ती १–१० सेंमी. व्यासाची, गोलसर, पिंगट, काळसर व बाहेरून खरबडीत असून आत बनलेली धानीबीजुके, त्यावर पडणाऱ्या भोकातून बाहेर येतात व पसरतात. डुकरे व कुत्री या वनस्पती वासाने काढतात. पहा Ascomycetes.

**truncate** छिन्नाग्र; छेदिताग्र
टोकास सपाट ( आडवे कापल्याप्रमाणे ) असलेले ( पान ).

**truncus** (**trunk**) प्रकांड
वृक्षाचे प्रमुख खोड; शैवाकातील कायक.

**tubaeformis** (**trumpet-shaped**) तुतारीसारखे
खाली नळीप्रमाणे व टोकास पसरट होत गेलेले;

काहीसे धोतऱ्याच्या पुष्पमुकुटाप्रमाणे पण त्यापेक्षा अरुंद उदा. परळ; तुतारी वृक्ष.

**tube-cell** नलिका कोशिका; नलिकापेशी
नळीसारख्या आकाराची कोशिका ( पेशी ); उदा. परागनलिका.

**tube-nucleus** नलिकाप्रकल
फुलझाडांच्या परागनलिकेतील जनककोशिकेखेरीज राहिलेल्या प्राकलातील प्रकल; याचे कार्य परागनलिकेला फलन घडवून आणण्यास मदत देण्याचे असते; जनक कोशिकेपासून बनलेल्या दोन पुं-प्रकलांचा विनियोग द्विफलनाकरिता होतो; पहा double fertilisation.

**tuber** ग्रंथिक्षोड
खोडाचे अथवा शाखेचे ( बहुधा जमिनीत राहणाऱ्या व ) गाठीसारख्या अन्नयुक्त अवयवात रूपांतर; उदा. बटाटा; काही नेचे.

**Tuberales** कंदकवक गण
पहा truffle.

**tubercle** गुलिका, पिटिका
लहान गाठ; उदा. भुईमुगाच्या मुळावरच्या गाठी.

**tuberous** ग्रंथिल; गाठदार
गाठीसारखा मांसल, स्थूल व अन्नयुक्त ( अवयव ); उदा. खोड; बटाटा (*Solanum tuberosum* L.); मूळ: ( गाजर, मुळा, गुलबुश, इ. ).

**tuberculoid (tubercular)** ग्रंथिसदृश
बारीक गाठीसारखे.

**tuberculous (tuberculose)** ग्रंथियुक्त
लहान गाठींचे आवरण असलेले किंवा गाठीचे बनलेले.

**tuberiferous** ग्रंथिधारक
गाठी (ग्रंथि) धारण करणारी (वनस्पती); गाठीसारखे अवयव असलेले; कधी पानाच्या बगलेत गाठी असलेले, उदा. कारंदा.

**Tubiflorae** नलिकापुष्पी गण
एंग्लर व प्रँटल यांच्या वर्गीकरण पद्धतीप्रमाणे द्विदलिकित फुलझाडांच्या युक्तप्रदली ( मेटॅक्लॅमिडी ) उपवर्गातील एक गण; यामध्ये धोत्रा कुल, नीरब्राह्मी कुल; साग कुल, हरिणपदी ( गंधवेल ) कुल व वासक कुल इत्यादी अंतर्भूत आहेत. यापैकी काही कुले हचिन्सन यांनी धोत्रा गणात, काही तुळशी गणात आणि काही बद्धौष्ठी गणात (पर्सोनेलीझ) घातली आहेत; पहा Sympetalae.

**tubiflorous (tubuliflorous)** नलिकापुष्पी
नळीसारखी फुल असलेले (झाड); उदा. सूर्यफुलातील बिम्ब-पुष्पकाप्रमाणे.

**tubiform** नलिकाकृति
नळीसारखे.

**tubular** नळीसारखे; नलिकाकृति
चितीय ( दंडगोलासारखे ) व पोकळ.

**tuft** झुबका

**tufted (caespitose)** झुबकेदार
अनेक लहान खोडे एकत्र उगवून बनलेली (वनस्पती); उदा. काही गवते; क्षुप. कधी काही केस असे झुबक्यांनी बियांवर येतात ( उदा. कुडा ).

**tumble-weed** कोलांटी तण
सुकल्यावर कोलांट्या घेत वाऱ्यामुळे फिरत अथवा गडगडत व बिया फेकत जाणारी वनस्पती ( अथवा तिचे भाग ); उदा. समुद्रकिनाऱ्यावरचे एक गवत ( Spinifex squarrosus L. ); आळीव, लशुण गवत, जेरिकोचा गुलाब, सिलाजिनलाची एक जाती; इसबगोल.

**tumid** फुगीर; स्फीत
फुगलेले, सुजलेले; उदा. शिंगाड्याच्या पानाचे देठ; गुलबुशाच्या खोडाची पेरी; हवेने अथवा पाणी शोषण करून फुगलेले; उदा. कपाळफोडीचे फळ.

**tundra** टंड्रा
विस्तृत, सपाट किंवा लहान मोठ्या उंचवट्यांनी व्यापलेला वृक्षहीन तथापि जीर्णक भूसारखा प्रदेश; पहा moor.

**—, lichen** शैवाक टंड्रा
दगडफुलांनीच विशेषतः भरलेला टंड्रा प्रदेश; हा सैबेरियाच्या उत्तरेस आढळतो.

**—, moss** शेवाळी टंड्रा
शेवाळींनी विशेषतः भरलेला टंड्रा प्रदेश; हा रशियन सैबेरियाच्या उत्तरेस आहे.

**tunic (tunica)** कंचुक
( १ ) बीजाचे आवरण; ( २ ) पातळ, शिथिल पापुद्रा; ( ३ ) कंदाचे आवरण; ( ४ ) काही कवकांचे बाह्यावरण.

**tunicate (tunicated)** चोलधारी; आवृत
भूमिस्थित कंद प्रकारच्या खोडाचे ( उदा. कांदा ) बाहेरील पातळ आवरण असलेले; पहा bulb.

**turbinate** कुंभीरूप

भोवऱ्यासारख्या किंवा उलट्या शंकूच्या आकाराचे.

**turfophylae** रुतणवनस्पति

पहा bog.

**turgescence ( turgidity )** स्फीतता

अर्धपार्य पडद्यातून आत पाणी शोषल्यानंतर त्यामुळे उत्पन्न झालेल्या तर्षण–दाबामुळे आलेला फुगीरपणा; उदा. मनुका पाण्यात टाकल्यावर त्या फुगतात; पहा osmosis.

**turgid** स्फीत

तुडुंब भरल्यामुळे फुगलेले.

**turgor pressure** स्फीतता दमन

वर वर्णन केलेल्या तर्षणामुळे उत्पन्न झालेला दाब.

**turnip-shaped** कुंभीरूप

पहा napiform.

**tussock** जुमडा; झुबका

गवत अथवा तत्सम वनस्पतींचा झुबका; काही गवताळ प्रदेशांत गवत झुबक्यांनी वाढते; उदा. तृणसंघात; पहा steppe.

**twig** डहाळी; लघुत्तम शाखा

वृक्षाची फार लहान फांदी.

**twin** जोडी; जुळे; युगुल

**-- bundle** द्विपर्णलेश

पर्णाशी खोडातील रंभाचा संबंध जोडणारी दोन लहान वाहक वृंदाची जोडी; उदा. लायजिनोडेन्ड्रॉन.

**twiner** वलयिनी; वेल; वल्ली

आपल्या दुर्बल खोडाने जवळच्या आधारास पकडून वेढे देत वर चढून जाणारी वनस्पती; जाई; जुई, चमेली, कुसर, गारवेल, रंगूनचा वेल, इत्यादी; चढण्याकरितां यांना विशेषत्व पावलेले स्वतंत्र अथवा रूपांतरित अवयव नसतात. पहा climber.

**twisted** परिवलित; परिहित; व्यावृत

पहा contorted; उदा. *Andropogon contortus* L. कुसळी गवत.

**two-celled** द्विकोष्ठी

दोन कप्पे असलेला ( उदा. किंजपुट, परागकोश ).

**tylosis ( tylose )** गुहारुध

जवळच्या वाहक नलिकेत खाचेचा पडदा आत ढकलून व वाढून तेथे अनेक कोशिका बनवून तिची पोकळी भरून टाकणारी संरचना; जखम झालेल्या वाहिकांत किंवा वाहिन्यांतही अशाच प्रकारे वाढ होऊन त्या बंद होतात.

**type** प्ररूप

एखाद्या वंश, जाती, कुल, इत्यादींपैकी गटाचा आदर्श प्रतिनिधी; एखाद्या स्थळासारखेच दुसरे स्थळ ( निवास ).

**Typhaceae** पाणकणीस कुल; टायफेसी

पाणकणीस या सामान्य व दलदलीत वाढणाऱ्या वनस्पतींच्या टायफा ह्या एकमेव वंशाचा अंतर्भाव करणारे एकदलिकित फुलझाडांचे कुल. याचा समावेश न्यूडिफ्लोरी अथवा नग्नपुष्पी श्रेणीत ( बेंथॅम व हूकर ) व केतकी गणात ( पँडॅनेलीझ; एंग्लर व प्रँटल ) केला जातो. प्रमुख लक्षणे : पाणथळ जमिनीत वाढणाऱ्या ओषधीय वनस्पती; एकलिंगी फुले; परिदले नसतात : कणिश फुलोऱ्यात वर केसांनी वेढलेली पिवळट पुं–पुष्पे व त्याखाली तशीच पण पिंगट स्त्री–पुष्पे; केसरदले २–५; परागकणांचे चौकडे; किंजदल एकच व बीजकही एकच; वायुपरागण; फळ शुष्क, एकबीजी व केसाळ आणि बीज सपुष्क असते.

**Typhetum** पाणकणीस-संघात

फक्त पाणकणिसाचाच प्रभाव असलेला दलदलीतील समावास.

**typical** प्रारूपिक

एखाद्या गटाचे किंवा गटातील साच्याचे प्रतिनिधित्व करणारी ( वनस्पती ) अथवा करणारा प्राणी.

## U

**ubiquitous** सार्वत्रिक

सर्वसामान्यपणे आढळणारा ( सजीव ).

**ulginiose ( ulginous )** अनूपस्थ

दलदलीत वाढणारी ( वनस्पती ).

**Ulmaceae** कारगोळ कुल; उल्मेसी

कारगोळ, एल्म, सेल्टिस, इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा समावेश वावल गणात ( अर्टिकेलीझमध्ये ) केलेला आढळतो. प्रमुख लक्षणे : उपपर्णयुक्त साध्या एकाआड एक पानांच्या काष्ठयुक्त वनस्पती; सुट्या किंवा जुळलेल्या ४–५ परिदलांचे एक वर्तुळ; फुले द्विलिंगी किंवा एकलिंगी; केसरदले ४–५ किंवा ८–१०; दोन जुळलेल्या ऊर्ध्वस्थ किंजदलांच्या किंजपुटात एक कप्पा व त्यात एक बीजक; कपालीत किंवा आठळीफळात बहुधा अपुष्क बीज असते.

पहा Urticales; Urticaceae. कारगोळ ( *Trema orientalis* (L) Bl.).

**ultimate** अंतिम; अग्रस्थ

टोकावर असलेली ( शाखा, कळी किंवा कोशिका ).

**ultra –** अति –

अतिशय या अर्थी उपसर्ग.

**umbel, simple** चामरकल्प फुलोरा

चवरीसारखा; एका बिंदूतून अनेक फुले निघालेली, तथापि सर्वांत लहान ( कोवळी ) फुले मध्यभागी व सर्वांत जून बाहेरच्या बाजूस अशी मांडणी ( व उमलण्याचा क्रम ) असलेला अकुंठित फुलोरा; उदा. रुई, कांदा, कोथिंबीर, लोखंडी ( *Memecylon umbellatum* Burm. ); पहा indefinite, racemose, inflorescence.

**—, compound** संयुक्त चामरकल्प फुलोरा

साध्या चामरकल्प फुलोऱ्यातील प्रमुख अक्षावरच्या टोकास असलेल्या अनेक दुय्यम अक्षावर साधे चामर कल्प फुलोरे येऊन बनलेला अकुंठित फुलोरा ( अभिमध्य ); उदा. गाजर, ओवा, इ.

**—, cymose** कुंठित चामरकल्प फुलोरा

सकृद्दर्शनी चवरीसारखा, परंतु अपमध्य ( फुलांच्या उमलण्याचा क्रम केंद्राकडून परिघाकडे ) असलेला फुलोरा; उदा; भांड ( *Geranium* ), पेलार्गोनियम, नार्सिसस.

**Umbellales ( Umbellifloreae )** चामर गण; अंबेलेलीझ, अंबेलिफ्लोरी

बेंथॅम व हूकर यांनी या गणात द्विदलिकित फुलझाडांपैकी चामर कुल व तापमारी कुल ( ॲरॅलिएसी ) यांचा अंतर्भाव केला आहे. सुट्या पाकळ्या, द्विलिंगी, अरसमात्र, पंचभागी फुले; अधःस्थ किंजपुट; चामरकल्प ( चवरीसारखा ) फुलोरा, इत्यादी लक्षणे सामान्यपणे येथे आढळतात; कॉनसी या कुलाचा अंतर्भावही येथे केलेला आढळतो.

**umbellate** चामरयुक्त

चवरी किंवा तत्सम मांडणी असलेले; चामरासंबंधी.

**Umbelliferae** चामर कुल; अंबेलिफेरी

कोथिंबीर, गाजर ( गृंजन ), बडिशेप, शेपू, ओवा, जिरे, इत्यादी ओषधीय, द्विदलिकित वनस्पतींचे कुल. विभागलेली, एकाआड एक व तळाशी खोडाला वेढणारी पाने; चवरीसारखा फुलोरा; पांढरी, हिरवट किंवा पिवळट व अपिकिंज, नियमित लहान फुले; द्विकिंज व द्विपुटक किंजपुट; पालिस्फोटी फळ व दोन बीजे इत्यादी लक्षणे या कुलात आढळतात ( शिवाय वर वर्णन केलेली ); याला 'एपिएसी' कुल असेही म्हणतात.

**umbelliform** चामराभ

चवरीसारखे.

**umbilical cord** नाळ

पहा funicle.

**umbilicate** नाभियुक्त

छत्राकृती असून केंद्राजवळ दबलेले.

**umbilicus** नाभि

पहा hilum.

**umbo** ककुद

बीजक धारण करणाऱ्या छदाच्या टोकावरील तिकोनी उंचवटा; उदा. चीड ( *Pinus* sp. ).

**umbonate** ककुदयुक्त

केंद्राजवळ ककुद असलेले.

**umbraculiferous ( umbrella-shaped )** छत्राकृति; छत्राभ

छत्राप्रमाणे आकार असलेले; उदा. बजरबट्टू वृक्ष ( *Corypha umbraculifera* ).

**umbrosus** छायावासी

छायेत वाढणारी ( वनस्पती ).

**unavailable** अप्राप्य

न मिळण्यासारखे.

**unbranched** अशाखी; शाखाहीन; अशाख

उदा. नारळाचे खोड.

**unciform** अंकुशाकृति

एका टोकास वाकलेले ( आकड्याप्रमाणे ); उदा. केस, काटे, इ. पहा uncus.

**uncinate (uncate)** अंकुशधारी

अंकुशासारखी उपांगे असलेले ( अवयव ); उदा. एका कवकाचे ( *Uncinula necator* ) पलिघ धानीफल; एका जलनेचाच्या ( *Azolla* ) लघुबीजुकांच्या फेनपुंजकावरचे अंकुशयुक्त उपांग; पहा massula.

**uncorticated (ecorticate)** मध्यत्वचाहीन

मध्यत्वचा नसलेले किंवा ती टाकलेले ( खोड ); कांडशरीरिका ( कारेसी ) शैवलांपैकी जातीत काही

मध्यत्वचायुक्त व काही मध्यत्वचाहीन असतात; पहा Characeae.

**uncovered (naked)** अनाच्छादित; नग्न

कोशिकावरण नसलेली ( कोशिका ); आवरण नसलेला ( बीजुक पुंज ); फलावरण हीन ( बीज ); इ. काही गंतुके, बीजुके.

**uncus (hook)** अंकुश

गळाप्रमाणे अथवा टोकास वळलेले असलेला ( केस, काटा, इ. उपांगे ) उदा. वेत.

**underdeveloped** अर्धविकसित

पूर्ण वाढ न झालेला ( अवयव ).

**underground** भूमिगत; भूमिस्थित

जमिनीखाली असलेला ( अवयव; उदा. बटाटा, हळकुंड, आले, रताळे, सुरण, इ. ).

**undergrowth** निम्नरोह

जंगलात इतर वृक्षाखाली वाढलेल्या वनस्पती.

**undershrub** क्षुपक

लहान झुडूप.

**undeveloped** अप्रगत; अविकसित

पूर्ण वाढ न झालेला ( अवयव; सजीव ).

**undifferentiated** अप्रभेदित

वाढ होत असताना अवयवांत अंतर्गत फरक न पडणारा ( अवयव; सजीव ).

**undulate (wavy)** तरंगित

तरंगाप्रमाणे ( लाटेप्रमाणे ) वर खाली वाढलेली ( किनार; चढ उताराचे मैदान ).

**unfertilized** अफलित; अनिषेक

दोन प्रजोत्पादक कोशिकांचा संयोग न होता निर्माण झालेला ( सजीव ).

**unfree water (bound water)** असुक्तजल; बद्धजल

मातीच्या कणांनी घट्ट धरून ठेवलेले व सहज मुळांना उपलब्ध न होणारे पाणी.

**unguiculate (ungulate)** नखरी; नखरयुक्त

वर पसरट परंतु तळाकडे लहान देठ ( वृतक, नखर ) असलेला ( अवयव; उदा. पाकळी )

**unguiform** नखराकृति

नखरासारखे; उदा. वाघनखीची दले ( *Bignonia unguis-cati. L.* )

**uni -** एक

एकटेपण ( एकत्व ) दर्शविणारा किंवा एका भागाचा अंतर्भाव दर्शविणारा, उपसर्ग.

**-- axial** एकाक्ष

एकच अक्ष ( दांडा ) असलेला; उदा. फुलोरा.

**-- carpellate** एककिंज

एकच किंजदलाचे ( फळ; किंजपुट ); उदा. वाटाण्याची शिंबा ( शेंग ).

**— cellular** एककोशिक

एकाच शरीरघटकांचे ( कोशिका, पेशी ) बनलेले.

**-- costate** एकसिराल

एकच मध्यशीर असलेले ( पान; उदा; आंबा, केळ).

**— cotyledonous** एकदलिकित

एकच दलिका असलेले ( बीज किंवा गर्भ; वनस्पती ).

**-- cus** एकाकी; एकटे

**-- florous** एकपुष्पी

एकच फूल येणारे; उदा. झेफिर लिलीचा फुलोरा किंवा तत्सम वनस्पती.

**-- foliate** एकपर्णी; एकदली

एकच दल असलेले संयुक्त पान; उदा. लिंबू, संत्र इ.

**— foliolate** एकदली

**— folius** एकपर्णी

एकच पान असलेले ( खोड किंवा बनस्पती ); उदा. ऑफिओग्लॉसम (नेचा).

**-- formis** एकाकृति

एकाच आकाराची ( नलिकाकृति किंवा जिव्हिकाकृति) फुले असण्याचा प्रकार; उदा. सूर्यफूल कुलातील काही वनस्पती (झेंडू, मखमल, सहदेवी, ओसाडी, सालीट, ब्रह्मदंडी, सँटोनिन, दवणा, इ.).

**— lateral** एकपार्श्विक

सर्व अवयव ( शाखा, पाने, फुले ) एकाच बाजूस वळलेले किंवा उगम पावलेले.

**— locular (one-celled)** एकपुटक

एकच कप्पा असलेले ( पराग, किंजपुट ).

**-- nucleate** एकप्रकली

कोशिकेतील जीवद्रव्यात एकच प्रकल असलेला (प्राकल).

**— on** युति; संघटना

केसरदले, तंतू, परागकोश, किंजदले इत्यादी ( वनस्पतीच्या) अवयवांचे अंशतः किंवा पूर्णपणे जुळून वाढणे; पहा adhesion, cohesion.

**— parous cyme** एकपद (एकशाख) वल्लरी
फुलोऱ्याच्या अक्षाची फूल येऊन वाढ खुंटल्यावर एकच नवीन अक्ष (व त्यावर) दरवेळी एक फूल येऊन फुलोरा बनणे; पहा helicoid, scorpioid.

**— petalous** एकप्रदला
एकच पाकळीचा पुष्पमुकुट असलेले (फूल).

**— septate** एकपटीय
एकच पडदा असलेले (बीजुक).

**— seriate** एकस्तरित; एकश्रेणीबद्ध
एका उभ्या रांगेत किंवा आडव्या थरात असलेले.

**— sexual** एकलिंगी
फक्त केसरदले किंवा किंजदले असलेले (फूल); फक्त रेतुकाशये किंवा अंदुककलश असलेला (गंतुकधारी); एकाच लिंगाची गंतुके (प्रजोत्पादक घटक) प्रसवणारा (कायक; उदा. शैवले, कवक, शेवाळी, इ.).

**unit character (or factor)** एकक लक्षण (घटक)
अनुहरणामध्ये (एका पिढीतून दुसरीत उतरण्याच्या प्रक्रियेत) गंतुकाद्वारे, न विभागता जाणारे, निश्चित व स्वतंत्र गुण किंवा गुणधारक घटक; वैकल्पिक गुणांच्या जोडीतील प्रत्येक स्वतंत्रपणे आपले वैशिष्ट्य कायम राखून व अनुहरणाच्या नियमानुसार पुढील पिढीत उतरतो. पहा allelomorph.

**univalent** एकयुजी
साधे रंगसूत्र; दोन्हींचे मिळून (जोडी) द्वियुजी बनते; पहा bivalent.

**universal** सर्वसामान्य
सर्वत्र आढळणारे (लक्षण, पादप, इ).

**unseptate** पटहीन
विभागणारे आडपडदे नसलेला (तंतू, कोशिका, सूत्र, नलिका, इ.); उदा. काही शैवले, कवक, (व्हाउचेरिया, म्यूकर, इ.)

**unstratified** अस्तरित; स्तरहीन
थरावर थर नसण्याचा प्रकार; उदा. शैवल व कवक यांचे थर नसून ते घटक मिसळून एकत्र राहणारी संरचना असलेली (काही धोंडफुले– शैवाक).

**unstriated (unstriped)** अरेखित
रेषा नसलेले. उदा. फळाची साल, बियाचे टरफल, इ.

**unsymmetrical (asymmetrical)** असमात्र; असममित
समात्रता (दोन अथवा अनेक सारखे अर्ध होण्याची क्षमता) नसलेले.

**upper** उत्तर; ऊर्ध्व
वरची (बाजू); वर असलेले (आच्छादन).

**— limit** ऊर्ध्वसीमा
वरची (ज्यास्तीत ज्यास्त) मर्यादा; उदा. पर्वताची उंची; रासायनिक विक्रियेचे तापमान, इ.

**urecolate** कुंभाकृति; घटाकार
गडूच्या आकाराचे; तळाशी व टोकाशी अरुंद पण मध्ये फुगीर; उदा. संतानकाचा पुष्पमुकुट (काऊबेरी, संतानक, गंधपुरा, इ. च्या कुलातील अनेक वनस्पती). शेवाळीचा बीजुकाशय; पहा pyxidium.

**ureaceous** कृष्णवर्णी; कालवर्णी
करपट काळ्या रंगाचे.

**Uredinales** तांबेरा गण; युरेडिनेलीझ
अर्धगदाकवकांपैकी एक जीवोपजीवी व तांबूस, पिवळट किंवा पिंगट टिपक्यांनी ओळखू येणारा कवक गण; पहा Hemibasidii.

**urediniospore** ग्रीष्मबीजुक
पहा summer-spore.

**uredosorus** ग्रीष्मबीजुकपुंज
ग्रीष्मबीजुकांचा समूह; ग्रीष्म ऋतूत बनलेल्या बीजुकांचा पुंजका.

**uredospore** ग्रीष्मबीजुक
पहा summer-spore.

**urens** दाहक; दंशक
संपर्काने आग उत्पन्न करणारे: उदा. आग्या, खाजोटी, इ. वनस्पती

**urn-shaped** कुंभाकृति; घटाकृति
कुंभाकार; घटाकार; लहान तपेलीसारखे; पहा urceolate.

**Urticaceae** वावल (वावळा) कुल; अर्टिकेसी
बेंथॅम व हूकर यांनी पूर्वी हा द्विदलिकित फुलझाडांचा गण मानला होता. यातील सर्व वनस्पती आता हचिन्सन यांनी चार कुलात समाविष्ट केल्या आहेत. वटकुल, गंजा (गांजा) कुल, वावल (वावळा) कुल व कारगोळ कुल. एंग्लर व प्रँटल यांनी वावल गणातील (अर्टिकेलीझ) फक्त दोन कुलात त्यांना

अंतर्भूत केले आहे. वावल कुलात वावळा, आग्या, कापसी, मोठी खाजोटी, बिचू, रॅमी इ. वनस्पतींचा समावेश केला आहे. लहान एकलिंगी, द्विभागी, एक-किंज व परिदलात ऱ्हास असलेली फुले; फळ अश्मगर्भी, किंवा कपाली व एकबीजी; चीक नसतो व बहुतेक वनस्पती औषधीय आहेत; पहा Ulmaceae, Cannabinaceae, Moraceae.

**Urticales** वावल (वावळा) गण; अर्टिकेलीझ

वर वर्णिल्याप्रमाणे हचिन्सन यांनी पुरस्कार केलेल्या ह्या गणात वटकुल, गंजाकुल, वावलकुल व कारगोळ कुल या शिवाय बर्बेएसी व सायफोस्टेगीएसी या दोन कुलांचाही समावेश होतो; त्यांच्या मते हा गण ऱ्हसित असून याचा उगम मोरवेल गण व चंपक गण या दोन्ही पासून झाला असावा, कारण ह्या वावल गणात सर्व स्वरुपाच्या वनस्पती आढळतात.

**Ustilaginales** काणी (काजळी) गण; युस्टिलॅजिनेलीझ

अर्धगदाकवकांपैकी जीवोपजीवी व काजळी सारखी भुकटी (बीजुके) बनविणाऱ्या कवक वनस्पतींचा गण; पहा Hemibasidii.

**utricle** क्लोम

लहान एकबीजी किंवा अनेकबीजी, फुगीर, शुष्क फळ; उदा. माठ, राजिगरा.

## V

**vacilans** विलोल

मुक्तपणे हालणारे; उदा. गवतांच्या व नागदवणाच्या फुलातील परागकोश.

**vacuolate** रिक्तिकायुक्त

रिक्तिका (पोकळ जागा) असलेला (प्राकल; कोशिका; जीवद्रव्य).

**vacuole** रिक्तिका

प्राकलातील पोकळी; यामध्ये अनेकदा घन, स्फटिक किंवा काही द्रव (अन्न किंवा टाकाऊ) पदार्थांचा साठा असतो.

**vacuolization** रिक्तिकानिर्मिती

रिक्तिका बनणे.

**vagin** पिंगल द्रव्य

काही नेचांतील असा पदार्थ.

**vagina** आवरक

पानाच्या तळाशी पात्याचे अगर देठाचे अथवा पर्णतलाचे खोडाभोवती असलेले आवरण; उदा. केळ गवत.

**vaginate** आवरकी

**vaginule** (१) लघु आवरक; तिरोधान
(२) नलिका-पुष्पक

(१) शेवाळीच्या दंडाच्या तळाशी असलेले आवरण; तिरोधानः अंदुककलशाचा खालचा अर्ध.
(२) सूर्यफूल कुलातील नलिका–पुष्पक.

**vallecula** सीता

बारीक पन्हळ; खोबण; कंगोऱ्यांमधील खोबणी; उदा. धणे, जिरे.

**vallecular canal** सीतानाली

पृष्ठावरील खोबणीसमोरील मध्यस्त्वचेतील अंतरा-कोशिकी पोकळ मार्ग; उदा. एक्विसीटमचे खोड.

**valvate** धारास्पर्शी

फुलाच्या कळीतील परस्परांना स्पर्श करणारी (परि-दले); उदा. रुईच्या पाकळ्या, जास्वंदीची संदले.

**valve** (१) शकल (२) झडप

(१) फळ तडकून होणारे त्याचे स्वतंत्र भाग; उदा. भडी; शिंबा; करंडक वनस्पतीच्या कोशिकावरणाच्या दोन्हीपैकी एक भाग (शकल).
(२) परागकोशाच्या आवरणाचा लहान भाग (झडप); उदा. दालचिनी.

**-- view** शकल-दृश्य

करंडक वनस्पतीच्या दोन कोशिकावरणांपैकी एकाच्या पूर्ण पृष्ठाचे दर्शन; पहा girdle view.

**valvular dehiscence** (१) शकलस्फुटन;
(२) सीवनस्फुटन

(१) परागकोश झडपांनी तडकणे; (२) शिवणीवर फळ तडकून त्याची शकले होणे.

**vaporisation** बाष्पीभवन; बाष्पन

वाफेत रूपांतर होण्याची प्रक्रिया.

**variability** परिवर्तनशीलता

फरक पडण्याची क्षमता (प्रवृत्ती).

**variable** परिवर्तनशील; परिवर्ती

फरक (भेद) पडण्याची (प्रवृत्ती) असलेले; उदा. सर्व सजीव.

**variant** भेदजन्य; विभिन्न

मूळ जातीत थोडा फरक पडून निर्माण झालेला प्रकार.

**variation** भेद; विभिन्नता

मूळच्या जातीपासून अल्पसा फरक अथवा बदल किंवा तो दर्शविणारा प्रकार. उदा. दुहेरी पाकळ्यांचा प्रकार; भिन्न रंगाची फुले असणारे वाण.

**—, acquired** अर्जित किंवा संपादित भेद

व्यक्तीच्या विकासावस्थेत परिस्थितीच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणामामुळे पडलेले फरक; उदा. फळांचा आकार वाढणे, फुलांची संख्या वाढणे, झाडांची वाढ खुरटणे, इ.

**—, correlated** सहसंबद्ध भेद

एखाद्या अवयवातील फरकामुळे दुसऱ्यात झालेला बदल.

**—, discontinuous** खंडित भेद

मूळचे लक्षण व त्यात झालेले बदल यामध्ये सलगपणा नसलेले; उदा. पाच पाकळ्यांऐवजी आठ, नऊ किंवा दहा पाकळ्याची फुले येणे पहा continuous variation.

**—, genetic** जननिक भेद

प्रजोत्पादक कोशिकांतील किंवा रंदुकातील काही बदलामुळे संततीत दिसणारे फरक ( भेद ); उदा. फुलांचा रंग; फळांचा वाढलेला आकार, रंग, चव, बियांची संख्या, आकार व वजन इ.

**varicose** अपिस्फीत

काही ठिकाणी विस्तारलेले; उदा. तंतुयुक्त अवयव.

**variegated** शबल; विविधवर्णी

अनियमितपणे रंगाचे किंवा इतर ठिपके पडलेले. उदा. क्रोटॉनची पाने; गुलबुशच्या काही प्रकारांतील फुले.

**variety** प्रकार

जातीपेक्षा किंवा उपजातींपेक्षा खालच्या दर्जाचा वाण; एकाच जातीची सामान्य लक्षणे असूनही काही किरकोळ भेदांनी निराळेपण दर्शविणाऱ्या व्यक्तींचा गट. उदा. टोमॅटो, वांगी ( हिरवट पांढरी, काळी, तांबूस पण पांढऱ्या रेषांची, इ. ); मिरच्या ( लांबट, बुटक्या, लवंगी, इ. ).

**vascular** वाहक; वाहिनीवंत

( १ ) वाहून नेण्याचे कार्य करणारी ( कोशिका, नलिका, इ. ).

( २ ) वर सांगितलेल्या प्रकारचे विशेषत्व पावलेले घटक असलेली वनस्पती किंवा संरचना.

**— bundle** वाहक वृंद

विशेषत्व असलेले वाहक घटक ( संरचना ) असलेला संच ( गट ). फक्त वाहिका अथवा वाहिका आणि वाहिन्या असलेल्या ऊतकांचा ( प्रकाष्ठ ) किंवा याखेरीज अन्नरस वाहून नेणाऱ्या ऊतकांचा ( परिकाष्ठ ) संच; पहा xylem; phloem, tracheid, trachea.

**— cryptogams ( Cryptogamae )** वाहिनीवंत अबीजी वनस्पति विभाग

वाहक ऊतके असलेल्या बीजहीन वनस्पती; उदा. नेचे व नेचाभ पादप ( वनस्पती ); पहा Pteridophyta.

**vascular cylinder** वाहक चिति

वाहक ऊतकांचा खोड, शाखा, मूळ इत्यादी अक्षरूप अवयवातील केंद्रवर्ती समूह.

**— plant** वाहिनीवंत वनस्पति

वाहक ऊतके असलेली वनस्पती.

**— ray ( pith ray )** मज्जाकिरण

प्रकाष्ठ व परिकाष्ठ यातून जाणारे भेंडाच्या ऊतकाचे पदर.

**— structure** वाहक संरचना

पाणी व अन्नरस यांची ने-आण करणाऱ्या ऊतकांची मांडणी; भिन्न अवयवात ही भिन्न असू शकते.

**— system** वाहक तंत्र; वाहक व्यूह

भिन्न प्रकारच्या वाहक ऊतकांची मिळून मूळ, खोड, फांद्या, पाने, फुले व फळे ह्या अवयवात विस्तार पावलेली योजना (संस्था).

**— tissue system** वाहक ऊतक तंत्र

पहा vascular system.

**vasculum** वनस्पति (संग्राहक) पेटिका; व्हॅस्क्युलम्

वनस्पतींची पाहणी करण्यास वनसंचार करताना, काही वनस्पती जमवून त्यांचे नमुने आणण्याकरिता बरोबर ठेवलेली लहान व पत्र्याची बंदिस्त पेटी.

**vase-shaped ( vascularis )** पुष्पपात्रसम; कलशाकृति; कुंभाकार

कलशाप्रमाणे ( कुंभ, तांब्या, इ. ) अथवा फुलदाणीप्रमाणे.

**vasiform** दीर्घनालिकाभ

लांबट नाळक्यासारखे.

**vegetable** वानस्पतिक; शाक; वनस्पति

वनस्पतींचे किंवा वनस्पतियुक्त; भाजी.

— acid शाकाम्ल
वनस्पतीमध्ये सामान्यतः आढळणारे अम्ल.

— anatomy वनस्पति-शारीर
वनस्पतींच्या शरीराची संरचना ( अंतर्रचना ).

— diet शाकाहार; वनस्पत्याहार
फक्त वनस्पतियुक्त खाण्याचे पदार्थ.

vegetarian शाकाहारी
वानस्पतिक ( वनस्पती अथवा तज्जन्य ) पदार्थ खाणारे ( प्राणी ).

vegetate वर्धन
वनस्पतीप्रमाणे रुजणे अथवा वाढणे.

vegetation वनश्री
पृथ्वीवराल कोणत्याही लहान वा मोठ्या प्रदेशावरील नैसर्गिक वानस्पतिक आवरण अथवा सर्व वनस्पतींचा समूह.

— form ( १ ) वनस्पत्याकृति; ( २ ) वनश्रीरूप
वनस्पतींचा विशिष्ट आकार; उदा. वृक्ष, क्षुप, उपक्षुप, ओषधी, इत्यादी; बहुवर्षायू व वर्षायू असा यांमध्ये भेद करतात. ( २ ) वनश्रीचे स्वरूप; उदा. जंगल, तृणक्षेत्र.

— strip वनस्पति-पट्ट; वनश्री-पट्ट
वनस्पतींनी व्यापलेली पट्टी.

vegetative ( १ ) वर्धी; ( २ ) शाकीय
( १ ) वाढणारी किंवा वर्धन घडविणारी;
( २ ) पोषणाच्या अवयवांशी संबंधित.

— bud कोरक
वाढीस मदत करणारी कळी.

— cell वर्धी कोशिका
( १ ) पराग कणातील दोन कोशिकांपैकी मोठी व पुढे परागनलिका निर्मिणारी. ( २ ) सिलाजिनेलाच्या लघुबीजुकातील टोकास असलेली स्वतंत्र कोशिका.

— cone वर्धी अग्र; शाकीय शंकु
शंकूच्या आकाराचे खोडाचे अथवा शाखेचे वाढत राहणारे टोक.

— growth पालेवाढ
फक्त पाल्याची ( पानांची ) वाढ.

vegetative multiplication शाकीय गुणन
शाकीय भागांच्या साहाय्याने संख्यावाढ करण्याची प्रक्रिया.

— nucleus शाकीय प्रकल
प्राकलातील प्रजोत्पादनाशी संबंध नसलेला प्रकल.

— organ शाकीय अवयव
प्रजोत्पादनाशी संबंध नसलेले, पण वाढीशी बहुतांशी ( पोषणाशी ) संबंधित अवयव; उदा. पान, मूळ, खोड, इ.

— reproduction ( propagation ) शाकीय अभिवृद्धी
शाकीय ( पोषक ) अवयवांद्वारे घडविलेली प्रजोत्पत्ती; उदा. पानफुटीच्या पानापासून, गुलाबाच्या कलमापासून किंवा आल्याच्या तुकड्यापासून नवीन लागवड व उत्पादन; ऊस, बटाटा, हळद इ.

— tissue शाकीय ऊतक
प्रजोत्पादनाशी संबंध नसलेल्या कोशिकांचा समूह.

veil गुंठन
पहा calyptra; velum.

vein सिरा; शीर
पान अथवा तत्सम सपाट अवयवांत पाणी व अन्नरस यांची ने–आण करणाऱ्या ऊतकांची जुडी ( वाहक वृंद ).

— , costal ( primary ) प्राथमिक सिरा
मध्य ( मोठ्या ) शिरेपासून निघणारी.

— , external ( intramarginal ) बाह्यसिरा
पानाच्या किनारीजवळून त्याशी समांतर जाणारी शीर.

veined सिराल; सिरायुक्त
शिरा असलेले.

veining सिराविन्यास
शिरांची मांडणी.

veinless सिराहीन
शिरा नसलेले.

veinlet सूक्ष्म ( अंतिम ) सिरा
फार लहान शीर; सिराविभाजनातील सर्वांत लहान शीर.

velamen जलशोषी त्वचा
पाण्याचे प्रत्यक्ष शोषण करणारी हवाई ( वायवी ) मुळावरची मृत, सच्छिद्र त्वचा; या त्वचेमुळे ती मुळे पांढरट दिसतात; उदा. आमरे व इतर काही अपिवनस्पती.

veld ( veldt ) मिश्र तृणक्षेत्र; व्हेल्ट
नैसर्गिक तृणसंघाताचा एक प्रकार; दक्षिण आफ्रिकेतील पठारावर या प्रकारचे गवताळ प्रदेश आढळतात; गवते

खुरटी, कोरडी व झुबकेदार असतात; तसेच ल्हान वृक्ष तुरळकपणेच आढळतात. पहा steppe.

**velum ( veil )** छदन

(१) भूछत्राच्या विकासामध्ये प्रारंभीचे आच्छादन; यामध्ये दांडा व छत्र दोन्ही झाकलेली असतात; पुढे याचे अवशेष छत्र व दांड्यावर आढळतात.

(२) आयसॉएटिसमध्ये पापुद्र्यासारखे आच्छादन ( पुंजत्राण ) बीजुककोशावर आढळते.

**velutinous ( velvety )** मखमली

सूक्ष्म व नरम केसामुळे किंवा पिंडिकेय ( बारीक उंचवटे असलेल्या ) अपित्वचेमुळे मखमलीसारखा पृष्ठभाग असलेले ( उदा. अळूचे पान. अनेक फुलांच्या पाकळ्या ); यामुळे अवयवांवर पडलेले पाणी पृष्ठभागास न चिकटता ओघळून जाते.

**venation** सिराविन्यास

शिरांची मांडणीची पद्धत; उदा. द्विशाख, जालरूप व समांतर. पहा netted; reticulate.

**veneniferous** विषारी

**venenose** अतिविषारी

**venose** सिराल; शिरामय

शिरा असलेले.

**venter** अंदुस्थली

अंदुक कलशाचा तळचा विस्तृत भाग.

**ventilating tissue ( spongy parenchyma )**

विरलोतक; संवातन ऊति

पानातील विवरयुक्त कोशिकांचा समूह ( थर ).

**ventral** अधर; औदर; मुखीन

उभ्या अक्षाशी काटकोनात असलेल्या व प्रकाशाकडे वळलेल्या पानाचा किंवा तत्सम सपाट अवयवाचा खालचा पृष्ठभाग; किंजदलाचा आतील पृष्ठभाग.

**— canal-cell** उदरमार्ग-कोशिका

अंदुककलशाच्या अंदुस्थली ( तळचा भाग ) व मान ( ग्रीवा ) यामधील नळीसारख्या भागातील कोशिका; पहा archegonium; neck.

**— suture** अधर सेवनी ( सीवनी, शिवण )

किंजदलाच्या कडा जुळून बनलेली शिवण; यावर बीजके चिकटून तेथेच ती किंजपुटाच्या पोकळीत असल्यास त्याला धारास्थित बीजकविन्यास ( marginal placentation) म्हणतात. उदा. वाटाण्याची शेंग.

**ventricose** — एकतःशून

एका बाजूने फुगलेले.

**Verbenaceae** साग कुल; व्हर्बिनेसी

तिवर, साग (सागवान), घाणेरी ( टणटणी ), निर्गुंडी, व्हर्बिना, शिवण, डुरांटा, भारंगी, कडवी ( कुइनेल ) इत्यादी द्विदलिकित वनस्पतींचे कुल. या कुलाचा अंतर्भाव हल्ली तुलसी गणात ( लॅमिएलीझ ) करतात व क्रमविकासात हा गण फार प्रगत समजतात. प्रमुख लक्षणे : ओषधीय, क्षुप व वृक्ष प्रकारच्या वनस्पती; समोरासमोर पाने; बहुधा द्वयोष्ठक चतुर्भागी-पंचभागी फुले; उर्ध्वस्थ, द्विकिंज, किंजपुट आणि मृदुफळे किंवा अश्मगर्भी फळे; पहा Labiatae.

**vermicular ( vermiform )** कृमिरूप

काही ठिकाणी जाड व वाकलेले; उदा. काही झाडांची मुळे.

**vernal ( vernalis )** वासंतिक

वसंत ऋतूत येणारे (असणारे).

**vernal aspect** वासंतिक प्रभाव; वासंतिक दृश्य

वसंत ऋतूतील देखावा : वनश्रीमध्ये अथवा पादपसमुदायातील वनस्पतींची पाने गळणे, पालवी येणे अथवा त्यांना फुलांचा बहर येणे यामुळे विशिष्ट स्वरूप प्राप्त झालेला देखावा.

**vernalisation** वासंतीकरण

फुले येण्याकरिता वनस्पतींना, तापमानात बदल करून उद्युक्त करणे; हे दिवसाच्या कमी अधिक मोठेपणाशी संबंधित असते. पहा photoperiodism.

**vernation** पर्णसंबंध; कलिकारचना

कलिकावस्थेतील पानांची मांडणी (परस्परसंबंध).

**verrucose ( verrucous )** चर्मकीलकी

चामखिळया असलेले ( आच्छादन; पृष्ठभाग, इ. ).

**versatile** विलोल

सहज हलणारे; चंचल (उदा. गवताच्या किंवा कृष्णकमळाच्या फुलातील परागकोश ).

**versicolour** चंचल ( तरल ) वर्णी

रंग बदलणारे; एक रंग बदलून दुसरा घेणारे; उदा. पारसा पिंपळाचे किंवा बदलरंग भेंडीचे फूल.

**vertical** ऊर्ध्व; उदग्र; उभा

क्षितिजाशी काटकोनात असलेले उभे ( खोड, पान, इ. ) भेंडीचे फळ; कांद्याची पात अथवा फुलोऱ्याचा दांडा; आयरिसचे पान.

**verticil** मंडल; झुबका; वर्तुळ

**verticillaster** पुंजवल्लरी

अक्षाच्या एकाच किंवा प्रत्येक पेऱ्यावर समोरासमोर आलेल्या द्विपाद वल्लरीचे मंडल; फुले व प्राथमिक अक्ष फार लहान असल्याने सर्वांचा प्रमुख अक्षाभोवती दाट पुंजका बनतो; उदा. तुळस, सब्जा, दीपमाळ इत्यादींच्या 'मंजिऱ्या'.

**verticillate (whorled)** मंडलित; चक्रीय; चक्री

पुष्पदले, शाखा, पाने अथवा तत्सम अवयवांची चक्रासारखी मांडणी असण्याचा प्रकार; उदा. सातवीण; एक्विसीटम; कारा शैवल; सामान्यतः बहुतेक फुलातील दले.

**vesicle** पुटिका; आशयक

लहान पोकळी अथवा पिशवीसारखा अवयव; उदा. गेळ्याची कीटकभक्षक वनस्पती; दतिपर्ण (*Utricularia*).

**vessel** वाहिनी

पहा trachea.

**vestige** अवशेष

उरलेला भाग; एखाद्या अवयवाचा ऱ्हास होऊन शिल्लक राहिलेला भाग; उदा. पपईच्या स्त्री-पुष्पातील केसरदले; काही फुलातील परागकोशहीन तंतू किंवा वंध्य किंजपुट (सूर्यफुलातील किरण-पुष्पके).

**vestigial** अवशिष्ट; अवशेषी

अवशेषरूप अकार्यक्षम (अवयव).

**vexillary** ध्वजकीय; ध्वजकरूप

पतंगरूप फुलातील इतर पाकळ्यावर लपेटलेली ध्वजक पाकळी असलेले कळीतील पुष्पदलसबंध (कलिकारचना); उदा. वाटाणा; पहा aestivation.

**vexillum (standard or banner)** ध्वजक

पतंगरूप फुलातील सर्वात मोठी पश्चस्थानी असलेली (निशाणासारखी) पाकळी: पहा papilionaceous.

**viable** अंकुरणक्षम; जननक्षम

रुजण्याची समर्थता असलेले (बीज, बीजुक, इ.).

**viability** अंकुरणक्षमता

रुजण्याचे सामर्थ्य.

**viatical** पथतटीय

रस्त्याच्या कडेने वाढलेल्या (वनस्पती); उदा. अनेक तण.



**viabratile** कंपनक्षम; कंपशील

थरथर कापण्याची क्षमता असणारे; पुढे व मागे गति प्राप्त करून देणारे (गति असणारे).

**vibrio** वक्रजंतु

स्वल्पविरामासारखा सूक्ष्मजंतू; उदा. पटकीचा सूक्ष्मजंतू.

**villous (villose)** लंबकेशी; तनुरोमी

पृष्ठभागी लांब नरम केस असलेला (अवयव).

**villus** लंबकेश; तनुरोम

मृदु, बारीक, लांब केस.

**vine** वेल

वर चढणारी किंवा जमिनीवर पसरणारी दुर्बल वनस्पती; द्राक्षवेल (*Vitis vinifera* L.).

**vinegar-plant** सिर्का (व्हिनेगर) वनस्पति

व्हिनेगर (सिर्का) तयार होण्यास जबाबदार असलेली कवक वनस्पती (*Mycoderma aceti* Desmaz).

**vinicolor (vinosus)** सुरावर्ण

मद्याचा (वाइनचा) रंग (गर्द किंवा जांभळट लाल).

**violaceous** जांभळा; नीललोहित

व्हायलेटच्या फुलासारखा रंग.

**virelus** हिरवट

काहीसे हिरवे; त्यावरून सदाहरित (virent).

**virescence** हरितभवन

नित्याच्या रंगाऐवजी हरितद्रव्याच्या निर्मितीमुळे हिरवा रंग येणे.

**virgate** (१) वर्णरेषांकित;
(२) लघुदंडाकृति; शलाकाकृति

(१) रंगाच्या रेघा असलेले; (२) लहान दांड्यासारखे.

**virgin soil** कोरी जमीन

पूर्वी कोणत्याही वनस्पतींनी (वनश्रीने) न वापरलेली जमीन.

**-- forest** अस्पृष्ट वन

मानवाने प्रवेश (स्पर्श) न केलेले जंगल.

**viridis** हिरवे; हरितवर्णी

हिरव्या रंगाचे; उदा. एक आमराची जाती (*Habenaria viridiflora* L.).

**virosus (virose)** दुर्गंधी

(१) वाईट वास येणारी (वनस्पती अथवा फूल);
(२) विषारी.

**virus** विषाणु; व्हायरस

सजीव वनस्पती व प्राणी यांच्या शरीरांत प्रवेश

करून तेथे रोग निर्माण करणारे, आपली प्रजोत्पत्ती करणारे पण सामान्यपणे सूक्ष्मदर्शकातून पुरेशी कल्पना येण्याइतपत सहज न दिसणारे सजीव द्रव्य; याला विशिष्ट आकार नसून सजीवांच्या शरीराबाहेर त्याची वाढ व पुनरुत्पत्ती होत नाही; इतर सजीवांप्रमाणे यातील जीवद्रव्य प्रभेदित नसते व कोशिका या संज्ञेत त्याचा समावेश होत नाही. सजीव व निर्जीव यांच्या सीमेवर अशी द्रव्ये असलेल्यांच्या गटात अशा विविध द्रव्यांचा समावेश होतो: देवी, सर्दी पडसे, कांजिण्या, इन्फ्लुएंझा, पीतज्वर, इत्यादी रोग विषाणूमुळे होतात; ज्या पडद्यातून सूक्ष्मजंतू जात नाहीत त्यातून विषाणू जातात.

**viscid ( viscidosus )** चिकट; पिच्छिल

श्लेष्मल ( बुळबुळीत ) पदार्थामुळे आलेला चिकटपणा.

**viscous** विष्यंदी; श्यान

चिकटपणा असलेले ( पान, देठ, संवर्त, फळे, इ. ); उदा. पिवळया तिळवणीची पाने ( *Cleome viscosa* L. ); प्राकलाची घटना.

**Vitaceae ( Ampelidaceae )** द्राक्षा कुल; व्हायटेसी; ॲम्पेलिडेसी

द्राक्षवेल, कांडवेल, दिंडा, आंबटवेल, बेंडरवेल, कर्कणी इत्यादी द्विदलिकित वेली वनस्पतींचे कुल. बेंथॅम आणि हूकर यांच्या पद्धतीनुसार बोर कुल व हे कुल यांचा समावेश ज्योतिष्मती गणात ( सेलॅस्ट्रेलीझमध्ये ) केला गेला आहे. दोन्हीतील वनस्पतींत पाकळ्यासमोर केसरदले व त्या केसरदलांमध्ये बिंब असते. अरिष्ट गण व गुलाब गण यांचे या कुलांशी आप्तभाव आहेत. द्राक्षा कुलांतील वनस्पती बहुतेक प्रतानधारी वेली असून फुले अवकिंज, एकलिंगी अथवा द्विलिंगी व लहान असतात; मृदुफळे.

**vital** जैव

जीवविषयक; जीवासंबंधी; प्राणी व वनस्पती यांतील जीवतत्त्वासंबंधी.

**vitalism** जीवनवाद; प्राणतत्त्ववाद

सर्व सजीवांचे वैशिष्ट्य मानली गेलेली ( जैव ) व जीवनाला निर्देशन करणारी आंतरिक प्रवृत्ति सर्व सजीवाद्वारेच व्यक्त होते असे मानणारी विचारप्रणाली. या उलट जडवाद विचारसरणीप्रमाणे सर्व जीवनव्यापार भौतिक, रासायनिक व यांत्रिक पद्धतीचे असून ते निर्जीव सृष्टीतही आढळतात.

**vitalistic theory** जैवशक्तिवाद ( सिद्धांत )

वितंचनक्रिया ( फसफसणे, आंबणे, इ. ) हा एक परिणाम असून तो घडून येण्याचे कारण काही वनस्पतींची वाढ व क्रियाशीलता ( सूक्ष्मजंतू, बुरशी, किण्व ) होय असे लुई पाश्चर यांचे मत.

**vitality** जैवशक्ति; जीवनशक्ति

जीवनातील विक्रिया व प्रक्रिया दर्शविण्याची क्षमता; उदा. बियांच्या बाबतीतील अंकुरणशीलता. परिस्थिति-विज्ञानात पादपसमुदायातील भिन्न जातींनी दर्शविलेला जोम आणि उत्कर्ष.

**vitamin** जीवनसत्त्व

जैव प्रक्रियांना प्रेरणा देणारा वनस्पतींतील अतिरिक्त अन्नघटक अ, ब, क, ड, इ, इत्यादि प्रकार.

**viticolous ( viticola )** द्राक्षोपजीवी

द्राक्षवेलीवर किंवा वेलीत उपजीविका करणारे; उदा. द्राक्षावरील तंतुभुरी ( *Plasmopara viticola*); पहा mildew.

**vitricole** काचस्थ; काचवासी

काचेच्या बाटलीवर वाढणारे ( दगडफूल; शैवाक ).

**vitta ( pl. vittae )** ( १ ) तैलनलिका; ( २ ) लंबसिरा

( १ ) सुगंधी (बाष्पनशील) तेल असलेली सूक्ष्म नळी; उदा. धणे, जिरे, ओवा, इ. ( यांच्या फळावरच्या सूक्ष्म नळया );

( २ ) करंडक वनस्पतींच्या भिंतीवरील लांबट ( उभ्या ) रेषा.

**vivipary** अपत्यजनन

अपत्ये जन्माला येणारी घटना; खाऱ्या दलदलीच्या जमिनीत वाढणाऱ्या कित्येक वनस्पतींची बीजे फळातच रुजून ( हवेत ) लांब आदिमूळ प्रथम बाहेर येते व त्यानंतर ( दलिकाधर व दलिकायुक्त ) कोवळा प्ररोह ( कोंब ) त्यातून निघून खाली चिखलात पडतो व वाढून नवीन वनस्पती बनते; उदा कांदळ; चिप्पी. प्राण्यांच्या बाबतीत काही प्राणी अंडी घालतात तर काही प्रत्यक्ष अपत्यांना जन्म देतात.

**volatile** बाष्पनशील

वाफेच्या रूपात उडून जाणारे ( तेल; कापूर, इ. ).

**voluble ( volubile )** वलयिनी

आधाराभोवती वेढत जाणारी वेल; उदा. नीलहार वेल ( *Petrea volubilis* L. )

**volva** अधश्छादनी; अधोवेष्टन; परिस्यून
संपूर्ण भूछत्रावरील प्राथमिक आच्छादनाचा तळभाग.

**vulgaris** सामान्य; साधारण
उदा. बीट, चुकंदर ( *Beta vulgaris* L. ); कलिंगड ( *Citrullus vulgaris* Schrad. var. *fistulosus* ).

## W

**wall-formation** तट ( भित्ति; भित्तिका ) निर्मिती
नग्न कोशिका (प्राकल खंड) भोवती अथवा बहुप्रकल प्राकलामध्ये तट ( भिंती ) निर्माण होणे; कोशिका-विभाजनात तटनिर्मिती होऊन दोन कोशिका बनतात.

**wart** चामखीळ; चर्मकीलक
कातडीवर येणारा कठिण व घन फोड (गाठ).

**warty** चर्मकीलकी
पहा verrucose.

**water-balance** जलसंतुलन
वनस्पतीतील ओलाव्याची आयात-निर्यात ( हानी व भरपाई ).

**water-bloom** जलबहार
तळी व डबकी यांतील कायम पाण्याच्या पृष्ठावर गरम हवेत एकाएकी येणारा (निळ्या-हिरव्या शैवलांचा) तवंग.

**water-capacity** जलक्षमता
जमिनीत पाणी शोषणे व त्याचा साठा करणे यासंबंधीचे सामर्थ्य.

**water-cell** जलकोशिका
मांसल वनस्पतींच्या पानातील (किंवा पर्णहीन खोडातील) पाणी साठवून ठेवणारी व बहुधा त्वक्षीय पदार्थाने वेढलली कोशिका.

**water-content** जलांश
पाण्याचे प्रमाण ( प्राप्त होणारे व प्रत्यक्ष असणारे ).

**water-culture** जलसंवर्धन
आवश्यक ते क्षार पाण्यात मिसळून ( विरघळवून ) केलेल्या विलयनात, किंवा विलयनाच्या साहाय्याने, वनस्पती वाढविण्याची प्रक्रिया; पहा hydroponics.

**-- - dispersal** जलविकिरण
पाण्याचे साहाय्याने प्रसाराची पद्धत; उदा. नारळ.

**— – leaf** जलपर्ण
सदैव पाण्यात राहणारे व अतिशय विभागलेले पान; उदा. साल्व्हिनिया.

**— - logged** पाणथळ
पाण्याने भरलेली ( जमीन ).

**-- - loss** जलहानि
वनस्पतीतून किंवा जमिनीतून बाष्पीभवनामुळे नाहीसे होणारे पाणी; वनस्पतींच्या बाबतीत याला बाष्पोच्छ्वास म्हणतात.

**-- - mould** जलकवक; पाणबुरशी
पाण्यात वाढणारी बुरशीसारखी वनस्पती.

**-- - plant** जलवनस्पति
पहा hydrophyte.

**-- - pollination** जलपरागण
पाण्याच्या प्रवाहाच्या किंवा ( हालचालीच्या ) साहाय्याने घडविलेले परागांचे इष्टस्थळी स्थापन. उदा. सवाला ( *Vallisneria spiralis* L. ).

**— - pollution** जलप्रदूषण
पाणी बिघडण्याची प्रक्रिया.

**— - pore** जलरंध्र
पाणी शरीराबाहेर टाकणारे छिद्र; त्वग्रंध्राशी तुलना केल्यास जलरंध्राला रक्षककोशिका नसतात; पहा stoma; hydathode.

**— - retentivity ( of soil )** जलधारकता
जमिनीत पाणी टिकून राहण्याची क्षमता; वालुकामय क्षेत्रात ही क्षमता फार कमी व गाळाच्या जमिनीत सर्वात जास्त असते.

**— - scum** पल्लव तरंग
साचलेल्या पाण्यात तरंगणारा सूक्ष्म शैवलांचा थर.

**-- - stoma ( pore )** जलरंध्र
पहा hydathode.

**— table** जलस्तर
जमिनीतील पाण्याच्या थराची पातळी; मरुस्थलात व वाळवंटात ( रुक्ष ठिकाणी ) ही पातळी फार खोल असते.

**-- tissue** जलोतक
पातळ आवरणाच्या व श्लेष्मल द्रव्य आणि पाणी असलेल्या जिवंत कोशिकांचा समूह ( मृदूतक ); उदा., अनेक मांसल वनस्पती ( कोरफड, घायपात, इ. ).

**-- weed** जलतृण
पाण्यात सदैव वाढणाऱ्या व बुडलेल्या किंवा तरंगणाऱ्या तणासारख्या वनस्पती; उदा. मोठी शैवले, काही गवते, डकवीड ( लेम्ना, उल्फिया ), नायास, सेरॅटोफायलम; इ.

**wavy ( sinuate )** तरंगित
पहा undulate, sinuate.

**waxy** मेणचट
मेणाचा पातळ थर किंवा मेणाच्या बारीक केसांचा थर असलेले; यामुळे पानावरचे पाणी न चिकटता गळून पडते, तसेच बाष्पीभवनापासून वनस्पतीचे संरक्षण होते. उदा. मरुवनस्पती; उसाच्या खोडाचे कांडे; घायपाताचे पान; पहा glaucous.

**waxy coating** सिक्थकावरण
मेणाचा लेप.

**weathering** ऋत्वीय अपक्षय
हवामानादी परिस्थितीमुळे होणारा विघटनासारखा (फूट-तूट होणारा) बदल.

**wedge-shaped ( cuneate )** कीलाकृति
पाचरीसारखे; तळाशी अरुंद व टोकाकडे रुंद होत गेलेले. उदा. गोंडाळचे पान.

**weed** तण
आगंतुक, निरुपयोगी, हानिकारक, वनस्पती; उदा. ओसाडी, काटेघोत्रा, सराटा, काटेमाठ, इ.

**weeping** ( १ ) दोलित; लोंबते; ( २ ) स्रवण
(१) लोंबणाऱ्या पानांचे अथवा शाखांचे ( झाड ); उदा. (विलो) वाळुंज; हिरव्या अशोकाचा एक प्रकार.
(२) जखमेतून अति रसस्राव होण्याचा प्रकार; उदा. द्राक्षवेल; भूर्ज.

**wheel-shaped ( rotate )** चक्राकार
चाकासारखा दिसणारा ( पुष्पमुकुट ); उदा. वांगे, मिरची, रुई.

**whip-shaped ( flagelliform )** प्रतोदरूप
चाबकासारखा; उदा. उसाच्या अक्षाची लांब चाबकासारखी वाढ होऊन त्यावर काणी रोगाची (smut) काळी बीजुके तयार होतात.

**whorl** मंडल
अवयवांची अक्षाभोवती वर्तुळाकार मांडणी; उदा. पुष्पदले; एक्विसीटमच्या शाखा; कण्हेरीची पाने.

**whorled** मंडलित; चक्रीय
मंडलासारखी (वर्तुळाकार) मांडणी असलेले (अवयव).

**wild type** वन्य प्ररूप
लागवडीतील वनस्पतीचा जंगली आप्त (प्रकार).

**wilt ( disease )** मर; म्लानि ( रोग )
अवयव कोमेजून लोंबण्याचे लक्षण असलेले रोग; बटाटा, जवस, इत्यादीवर आढळतो.

**wilting coefficient** म्लानिगुणक
वनस्पतीची पाने पाण्याभावी लोंबू लागतात त्यावेळचे जमिनीतील पाण्याचे प्रमाण.

**wind-dispersal** वायुविकिरण
वाऱ्याने होणारा ( फळांचा किंवा बीजांचा ) प्रसार.

**wind-pollination** वायुपरागण
वाऱ्याने होणारी परागांची किंजल्कावरील स्थापना. पहा anemophily.

**windward** वातसंमुख
वाऱ्यासमोरची ( बाजू ).

**wing ( ala )** पक्ष; पंख
( १ ) कोणत्याही अवयवांवर ( देठ, फळ, बीज, खोड ) असलेला पातळ पापुद्र्यासारखा विस्तार ( पसरट भाग. )
( २ ) पतंगरूप पुष्पमुकुटाची बाजूची पाकळी; पहा papilionaceous.

**winged ( alate ) fruit** सपक्ष फल
पंखधारी फळ; फलावरणावरील पातळ विस्तृत उपांग असलेले फळ; उदा. बिबला; अर्जुनसादडा; जखमी, अंजन, शिसवे, माधवलता, इ.; अनेक पंखांचा उगम छदे, संवर्त ( संदले ), परिदले यापासून होतो ( उदा. साल, चालन, लिंडेन, इ. ); पहा samara.

**winged seed** पक्षधारी बीज; सपक्ष बीज
बीजावरणावर असलेला पंखासारखा विस्तार; उदा. शेवगा, तूण, टेटू, वावळा इ.

**wintering bud** शिशिरकोरक
हिवाळ्यात निष्क्रिय अवस्थेत असलेली कळी.

**witches broom** केरसुणी रोग; गोसावी रोग
कवक किंवा काही कीटक यांमुळे झाडांना फक्त बारीक शाखांचे झुबके धारण करावयास लावणारा रोग.

**woad** वोड; जांभळा रंग; इसॅटिन
वोड नावाच्या एका वनस्पतीपासून ( *Isatis tinctoria* L. ) मिळणारा जांभळा रंग.

**wood (xylem)** काष्ठ; लाकूड; प्रकाष्ठ
वनस्पतीतील लिग्निनयुक्त घटकांचा वाहक किंवा मजबुती देणारा भाग.

**-- fibre** काष्ठसूत्र; प्रकाष्ठसूत्र
प्रकाष्ठ भागात असलेला मृत, लांब, काष्ठयुक्त कोशिकावरणाचा घटक; पहा fibre; xylem.

**-- land** वनभूमी
विशेषतः वृक्षांनी व्यापलेले स्थल ( भूप्रदेश ).

**— parenchyma** प्रकाष्ठ मृदूतक
प्रकाष्ठाच्या सान्निध्यात असलेले घन आवरणाचे मृदूतक; पहा parenchyma.

**wood— ray** प्रकाष्ठ किरण; काष्ठ किरण
प्रकाष्ठातून त्रिज्येप्रमाणे जाणारे मृदूतकाचे पदर ( पट्ट ). पहा medullary ray.

**—, autumn** शरदकाष्ठ
प्रकाष्ठाच्या प्रत्येक वार्षिक वलयातील सर्वात बाहेरचा लहान घटकाचा भाग; आतील भाग तत्पूर्वीचा ( वसंत काष्ठ ).

**--, cryptogamic** अभिमध्य प्रकाष्ठ
काही खोडातील प्रकाष्ठ भागात आढळणारा अभिमध्य ( बाहेरून केंद्राकडे वाढणारा ) भाग; इतर भाग अपमध्य ( केंद्राकडून बाहेर वाढणारा ) असतो.

**--, spring** वसंतकाष्ठ
पहा spring wood; autumn wood.

**woods** वन; जंगल

**woody** काष्ठमय
काष्ठ ( लाकूड ) असलेले ( झाड, ऊतक, फळाची साल, तंतू, इ. ).

**-- tissue** काष्ठोतक
कठीण आवरणाच्या कोशिकांचा ( बहुधा वाहिकांचा व वाहिन्यांचा ) समूह.

**wool** ऊर्णा; लोकर
मेंढी, बकरा, ॲल्पाक इ. प्राण्यांच्या कातडीवरील विशिष्ट प्रकारचे कुरळे केस; त्यावरून वनस्पतींवरील मऊ, कुरळे, बारीक, लांब, दाट केस.

**wooly ( lanate, floccose )** ऊर्णी; ऊर्णायित
लोकरीसारखे केस असलेला ( अवयव ).

**wrinkled ( rugose )** सुरकुतलेला; चूर्णित
सुरकुत्या किंवा घड्या पडलेला ( अवयव; उदा. पान, खोड, साल इ.).

**wound-cork** व्रण-त्वक्षा
जखमेखाली बनणारा बुचासारख्या पदार्थाचा थर.

**wounding** व्रणन
जखम होण्याची प्रक्रिया; पान, फूल, फळ किंवा फांदी बाहेरील घटकांमुळे तुटून जाऊन अक्षावरचा काही पृष्ठभाग किंवा आतील काही ऊतके उघडी पडणे.

## X

**xanthophyll** पर्णपीतक; पीतद्रव्य; झँथोफिल
पाण्यात न विरघळणारे प्राकणूतील एक पिवळे रंगद्रव्य; उदा. काटेरिंगणीचे फळ;
(*Solanum xanthocarpum* Schrad.).

**xanthorhamnin** झॅन्थोऱ्हॅम्निन
रक्तरोहिडाच्या वंशातील ( ऱ्हॅम्नस ) जातींच्या पिकलेल्या फळातील पिवळे रंगद्रव्य.

**X-chromosome** क्ष-रंगसूत्र
लिंगनिश्चिती करणाऱ्या दोन रंगसूत्रांपैकी एक.

**x-generation ( n-generation )** एकगुणित पिढी; क्ष-पिढी
रंगसूत्रांचा एक संच असलेली कोशिका किंवा अनेक कोशिका असलेली संतती ( प्राणी किंवा वनस्पती); त्यावरून २ x – generation (द्विगुणीत पिढी) म्हणजे दुप्पट रंगसूत्रे असलेली एक कोशिका किंवा अनेक कोशिक पिढी.

**xenia** परप्रभाव; झेनिया
जनक वनस्पतीच्या काही अवयवांवर परकीय परागाच्या संपर्काने ( फलनामुळे ) झालेला प्रत्यक्ष परिणाम; उदा. मक्याच्या कणसातील दाण्यांचे ( पुष्काचे ) भिन्न रंग.

**xenocarpy** परफलोत्पत्ति
परकीय गंतुकाच्या फलनामुळे फळ बनण्याची घटना.

**xenogamy ( gaitonogamy )** परफलन; दूरस्थयुति
एकाच जातीतील दोन भिन्न व्यक्तीतील लैंगिक प्रक्रियेमुळे घडून आलेला गंतुकसंयोग; पहा cross-fertilisation.

**xerad ( xerophyte )** मरुवनस्पति
रुक्ष ठिकाणी वाढणारी वनस्पती.

**xerarch succession** मरूद्भवी अनुक्रमण
शुष्क ( रुक्ष ) स्थानात उगम पावणाऱ्या वनश्रीचा विकास व चरमावस्था.

**xerochasy** शुष्कक्षेपण

फळ सुकून तडकल्यामुळे होणारा बीजप्रसार; उदा. संकेश्वर, एरंड, काटेधोत्रा, इ. पहा hydrochasy.

**xerohylad** रूक्षपादप

रुक्ष ( सुक्या ) जंगलातील झाड.

**xerohylium** रुक्ष वन

रुक्ष ( सुक्या ) जंगलातील वनस्पतींचा समुदाय.

**xeromorphic** रुक्षतानुकूली

शुष्क हवा, जमीन इत्यादीपासून अथवा सुकण्यास जबाबदार असणाऱ्या इतर बाबीपासून रक्षण करण्यास जलनाश कमी करण्याची योजना अथवा लक्षणे असणारी (वनस्पती).

**xeromorphy** रुक्षतानुकूलन

वर सांगितल्याप्रमाणे लक्षणे असण्याचा प्रकार.

**xerophilous (xerophile)** रुक्षताप्रिय

शुष्क ठिकाणी वाढणारी ( वनस्पती ); उदा. निवडुंग, घायपात, कोरफड, इ.

**xerophobous** रुक्षताद्वेषी

शुष्क ठिकाणी न आढळणारी (वनस्पती); उदा. बहुतेक नेचे, शेवाळी, इ.

**xerophyte** मरुवनस्पति; मरुपादप

मरुस्थलात (फार थोडा ओलावा असलेल्या ठिकाणी) वाढणारी वनस्पती; उदा. नागफणा, नेपती, शेंड, खजूरी, घायपात, रुई, घाणेरी, इ.

**xerophytic (xeric)** मरुवानस्पतिक; मरुपादपीय

मरुवनस्पतींप्रमाणे; मरुपादपांना योग्य स्थान; मरुवनस्पती असलेले ( वन, समावास ).

**xerophytism** मरुवानस्पतिकता; मरुपादपता

मरुवनस्पतीची लक्षणे ( पाने फार लहान असणे किंवा नसणे, मांसल शरीर, मेणचट लेप, केसाळपणा, काटेरी आवरण, इ.) असण्याचा प्रकार.

**xerosere (xerarch succession)** मरुस्थलीय क्रमक; शुष्कवासीय क्रमक

पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या ठिकाणी क्रमाने बदलत जाणाऱ्या पादप समुदायाची अवस्था अथवा तो समुदाय.

**xerotherous** उन्हाळी; ग्रीष्मानुकूल

उन्हाळयातील हवामानाशी अनुयोजना असणारी ( वनस्पती; पिके ).

**xerotropism** शुष्कनानुवर्तन

सुकून जाण्याविरुद्ध संरक्षण मिळण्याकरिता वनस्पतींनी किंवा त्यांच्या अवयवांनी केलेला स्थितीतील बदल ( बदल करण्याची प्रवृत्ति ).

**xiphioid** खड्गाकृति; अस्याकार

पहा ensiform.

**xiphiophyllous** असिपर्णी

तरवारीसारखी पाने असलेले; उदा. बाळवेखंड; आयरिस; बेलमकँदा.

**xylem (wood)** प्रकाष्ठ

उच्च वनस्पतींत पाण्याची ( व त्यात विरघळलेल्या क्षारांची ) ने–आण करणाऱ्या कठीण आवरणाच्या व मृत कोशिका व नलिका यांचा संच; पहा tracheid, trachea, vascular bundle.

**— island** प्रकाष्ठद्वीप

इतरांपासून तुटक असलेला प्रकाष्ठाचा भाग; उदा. थंबर्जिया.

**— parenchyma** प्रकाष्ठ-मृदूतक

प्रकाष्ठाच्या सान्निध्यात असलेल्या आयत व घनावरणाच्या ( काष्ठयुक्त ) सजीव कोशिकांचा उभा थर ( ऊतक ).

**— plate (ray)** प्रकाष्ठ किरण

दोन निकाष्ठ–किरणांमधून असणारा प्रकाष्ठाचा पाट ( पट्ट ).

**xylophilous** काष्ठप्रिय

मृत लाकडावर वाढणारे ( कवक ).

## Y

**yeast** किण्व; खमीर; यीस्ट

साखरेच्या ( किंवा साखर असलेल्या इतर ) द्रवातून आपल्याला आवश्यक ती ऊर्जा घेऊन त्या द्रवाचे रूपांतर मद्यार्कात करणारी सूक्ष्म कवक वनस्पती.

**— budding** किण्व – मुकुलन

किण्व वनस्पतीच्या कोशिकेवर विभाजनाने तत्सम कोशिकांची पुनः पुनः वाढ होऊन संख्यावाढ होणे; मूळची कोशिका अबाधित राहते व नव्या कोशिका कळ्याप्रमाणे येतात.

**Y-chromosome** य– रंगसूत्र

लिंग निश्चिती करणाऱ्या दोन रंगसूत्रांपैकी पुं ( नर ) संतती होण्यास जबाबदार असलेले रंगसूत्र; पहा X- chromosome.

## Z

**z-chromosome** झ-रंगसूत्र

य- रंगसूत्राऐवजी वापरलेली संज्ञा; दोन्हीपकी एक रगसूत्र स्त्री-संततीस जबाबदार असते.

**zero-point** शून्य बिंदू

वनस्पतीला जिवंत राहून सहन करता येण्याजोगे ज्यास्तीत ज्यास्त व कमीत कमी तापमान; भिन्न वनस्पतीत हे बिंदू भिन्न असतात.

**Zingiberaceae** शुण्ठी कुल झिंजिबरेसी

आले (शुण्ठी), हळद, सुवर्णपुष्प, सोनटक्का (पांढरा), कोलिंजन, वेलची इत्यादी वनस्पतींचे लहान कुल. याचा अंतर्भाव एंग्लर व प्रँटल आणि बेंथॅम व हूकर यांनी सिटॅमिनी गणात केला असून हचिन्सन यांनी झिंजिबरेलीझ या स्वतंत्र गणात केला आहे. प्रमुख लक्षणे: बहुवर्षायू ओषधी; मूलक्षोड मांसल; पाने साधी, जिव्हिकावंत, कुंतसम; फुले द्विलिंगी, एकसमात्र; संदले व प्रदले प्रत्येकी तीन व खाली नलिकाकृती; जननक्षम केसरदल एक पण इतर वंध्य; अधःस्थ, त्रिकिंज किंजपुटात तीन कप्पे व अनेक बीजके; बोंडात अनेक बिया (बहुधा बीजोपांगासह) सपुष्क आणि सपरिपुष्क; पहा Scitamineae.

**zone** क्षेत्र; विभाग; कटिबंध

सर्वसाधारणपणे सारखी वनश्री असलेला सलग पट्टा.

**zoogamete** चरगंतुक; चलयुग्मक

स्थानांतर करणारी प्रजोत्पादक कोशिका; ही सकेसल किंवा आदिजीवासारखी असते; उदा. नेचे; शैवले; शेवाळी; काही कवक, इ.

**zoogloea** श्लेष्मावस्था

सूक्ष्मजंतूंची विष्यंदी (चिकट) आवरणात गुरफटून राहण्याची अवस्था; बहुधा अशा वेळी पोषक द्रवात ते तवंगरूपात असतात.

**zoogonidangium** चरबीजुककोश

चर बीजुके निर्माण करणारा अवयव; उदा. काही शैवले.

**zoogonidium** चरबीजुक

स्थानांतर करणारे बीजुक; पहा spore, gonidium.

**zooid (zoospore)** चरगंतुक; चरबीजुक; चलबीजाणु

हालचाल करणारा प्रजोत्पादक घटक.

**zoophilous** प्राणिपरागित

प्राण्यांकडून परागांचा प्रसार होणारी (वनस्पती); पहा pollination.

**zoophily** प्राणिपरागण

प्राण्यांकडून घडविलेले परागण

**zoophobous** प्राणिद्वेषी

हानिकारक प्राण्यांपासून आपले संरक्षण करून घेणारी (वनस्पती); प्राण्यांना टाळणारी.

**zoosporangium** चरबीजुककोश

पहा zoogonidangium.

**zoospore (zoogonium)** चरबीजुक

पहा zoogonidium.

**zygomorphic** एकसमात्र

एकाच उभ्या पातळीने दोन सारखे भाग करता येणारा (अवयव); उदा. घेवडा, वाटाणा, गोकर्ण इत्यादींची फुले; हे लक्षण पुष्पसूत्रात किंवा संक्षिप्त वर्णनात दाखविण्याकरिता ·|· हे आंतरराष्ट्रीय चिन्ह वापरतात; पहा floral formula.

**zygomorphy** एकसमात्रता

वर वर्णन केलेला प्रकार.

**Zygomycetes (zygomycetae)** गंतुबीजुक कवक; झायगोमायसेटीज (झायगोमायसेटी)

शैवलकवक वर्गातील (फायकोमायसेटीज किंवा फायकोमायसेटी) एक उपवर्ग; यामध्ये लैंगिक प्रक्रिया घडून आल्यानंतर गंतुबीजुक बनते; तसेच बीजुककोशात अनेक अलिंगी बीजुके बनतात. नव्या वर्गीकरणात शैवलकवकांचे आठ गण केले आहेत. पहा Phycomycetes; zygospore.

**zygophase** द्विगुणित अवस्था

पहा diplophase.

**Zygophyllaceae** गोक्षुर (गोखरू) कुल; झायगोफायलेसी

सराटा (गोखरू), धमासा, हरमल व लिग्नम व्हिटी इ. द्विदलिकित वनस्पतींचे कुल. याचा समावेश हल्ली भांड गणात (जिरॅनिएलीझमध्ये) करतात (एंग्लर व प्रँटल आणि बेंथॅम व हूकर यांच्या पद्धतीमध्ये); हचिन्सन यांनी माधवी गणात (माल्पिघिएसीमध्ये) घातले आहे. प्रमुख लक्षणे: झुडपे; समोरासमोर व कधी पिसासारखी विभागलेली, उपपर्णयुक्त संयुक्त पाने;

नियमित, द्विलिंगी, ४–५ भागांची, बिंबयुक्त किंवा किंजधर असलेली, अवकिंज फुले; ८–१० केसरदले; तळाशी कधी उपांगयुक्त; किंजदले ४–५ व जुळलेली; एक ते असंख्य बीजके; फळे पालिभेदी किंवा बोंडे; पहा Geraniaceae.

**zygospore** गंतुबीजुक; युग्माणू

एक किंवा अनेक प्रकले असलेल्या दोन सारख्या गंतुकांच्या संयोगाने बनलेली जाड आवरणाची प्रजोत्पादक कोशिका. उदा. स्यूकर बुरशी.

**zygote** रंदुक; युग्मनज; युग्मज

स्त्री-गंतुक व पुं-गंतुक यांच्या संयोगाने बनलेली संयुक्त प्रजोत्पादक कोशिका; उदा. काही शैवले, कवक, नेचे, शेवाळी, नेचाभ व बीजी वनस्पती; पहा gamete.

**zygotene** झायगोटीन

न्यूनीकरण प्रकारच्या कोशिका-विभाजनातील पूर्वावस्थेत समजात रंगसूत्रांच्या वक्ररूप जोड्या बनणे; पहा meiosis.

**zymase** किण्वद्रव्य

किण्वात (व इतर काही कवकात) आढळणारा क्रियाशील कार्बनी निदेशक (वितंचक) पदार्थ; पहा yeast, enzyme.

**zymogen** पूर्ववितंचक; वितंचकपूर्व; पूर्वविकर

वितंचकापूर्वीचा (पूर्ववर्ती) व निदेशक नसलेला पदार्थ; पहा proenzyme.

**zymosis** वितंचन

आंबवण्याची अथवा तत्सम विश्लेषणाची (अपचय) रासायनिक प्रक्रिया; पहा fermentation.

# वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा

## ( वनस्पतिशास्त्र–व्याख्यासंग्रह )

## पुरवणी

रा. सा. सं. मं. ग्रंथालय
ग्रं १८ / २
मंत्रालय.

### A

**abrupt** अकस्मात

एकदम फरक पावणारे; हळूहळू निमुळते न होता एकदम टोकदार बनलेले ( पान ); टोकास दल नसलेले संयुक्त पान ( उदा. टाकळा ).

**abundance** वैपुल्य

विशिष्ट स्थानी निसर्गतः आढळणाऱ्या वनस्पतींच्या समुदायातील एखाद्या किंवा प्रत्येक जातीच्या संख्येबद्दलची माहिती; पहा frequency; density.

**acotyledonous** अदलिकित

गर्भात दलिकेचा अभाव असलेली ( वनस्पती ); पहा Cryptogamia.

**aeciospore ( aecidiospore )** वर्षाबीजुक

तांबेरा रोगाच्या कवकाचे द्विगुणित प्रकल असलेले, लैंगिक प्रक्रियेने बनलेले व बहुधा पावसाळ्याच्या सुमारास निर्मिले जाणारे बीजुक.

**aecium ( aecidium, aecidiosorus )** वर्षाबीजुकपुंज

वर वर्णन केलेल्या बीजुक प्रकाराचा संच.

**aestival aspect** वासंतिक दृश्य; उष्मकालीन प्रभाव

उन्हाळ्यात दृष्टीस पडणारे वनस्पतिसमुदायाचे स्वरूप; फुलांनी भरलेले ( उदा. गुलमोहर ) अथवा नवीन पालवीमुळे हिरवेगार दिसणारे ( उदा. वड ).

**aggregation** जमाव

अनेक वनस्पतींच्या निसर्गतः एकत्र वाढण्याने बनलेला समूह: हा प्रकार त्यांचे प्रजोत्पादक घटक एकत्र आल्याने व अनुकूल परिस्थितीमुळे घडून येतो. उदा. शेवाळी, गवते, टाकळा, इ.

**agrad** संवर्धित पादप

विशेष प्रकारे वाढविलेली वनस्पती.

**agrostology** तृणविज्ञान

सर्व गवतांचा तपशीलवार अभ्यास व त्यावरून मिळालेली माहिती अंतर्भूत करणारी शाखा.

**Aizoaceae** वालुक कुल; ऐझोएसी

पहा Ficoideae.

**alliance** ( १ ) संघ; संघसमष्टी; ( २ ) उपवर्ग

( १ ) वनस्पतींच्या अनेक व विशिष्ट प्रकारच्या समुदायांनी ( संगतींनी ) बनलेला नैसर्गिक व मोठा समुदाय; पादपसंघटना व पादपसमाजशास्त्र याबाबत परस्परात आप्तभाव दर्शविणाऱ्या अनेक पादपसंगतींचा गट. ( २ ) काही विशिष्ट व नैसर्गिक वनस्पति कुलांचा एकत्रित गट; पहा association; sub–class.

**allogenic succession** परजात ( परजनित ) अनुक्रमण; परानुक्रमण

बाह्य परिस्थितीमुळे पादपसमुदायाला विशिष्ट चरमावस्थेप्रत पोचविणारी प्रक्रिया; पहा autogenic; succession.

**allopatric speciation** अवरोधी जातिनिर्मिती

भौगोलिक कारणांमुळे पूर्वी अलग पडलेल्या पूर्वजांपासून स्वतंत्रपणे अवतरणाऱ्या नवीन जातींची निर्मिती.

**allotetraploid** उभयद्विगुणित

आई व बाप यांच्या द्विगुणित रंगसूत्रांचा संच मिळालेली चतुर्गुणित ( जाती ); द्विगुण संकरजातील रंगसूत्रे दुप्पट झाल्यामुळे बनलेली असमगट–गुणित जाती; पहा allopolyploidy; amphiploid.

**allotype** मूलप्ररूप

पहा holotype.

**alpine vegetation** आल्पीय वनश्री

पर्वत शिखरावर वृक्षमर्यादेपलीकडे असलेली खुरटी ( फक्त ओषधी व लहान झुडपे असलेली ) वनश्री.

**AMP** एएम्पी

ॲडिनोसीन मॉनोफॉस्फेट या रासायनीक पदार्थाच्या नावाचे संक्षिप्त रुप. ॲडेनेलिक अम्ल; एक न्यूक्लीओटाइड ( प्रकलातील संयुग ); पहा nucleotide.

**analysis, floristic** पादपजातीय विश्लेषण

एखाद्या ठिकाणी आढळणाऱ्या वनश्रीच्या अन्वेषणात

आवश्यक असलेली तेथील अनेक समुदायात आढळणाऱ्या वनस्पतींची तपशीलवार माहिती. उदा. नामनिर्देश, संख्या, प्रकार, प्रभाव स्थायिकता इ., तसेच भौगोलिक, स्वरूपविषयक, परिस्थितिविषयक माहितीही त्या वनश्रीतील समुदायांचे व एकूण वनश्रीचे वर्गीकरणास उपयुक्त असते.

**—, sociological** समाजशास्त्रीय विश्लेषण

वनश्रीचे पादपसामाजिक ( वनस्पतींच्या सामूहिक जीवनाच्या ) दृष्टिकोनातून केलेले पृथक्करणात्मक विवेचन.

**antibiotic** प्रतिजैव

काही सूक्ष्म जीवांच्या वाढीस आळा घालणारे नैसर्गिक कार्बनी पदार्थ; यांची निर्मिती बहुतेक काही सूक्ष्मजीव करतात.

**arcuate** धन्वाकृति; चापाकृति

धनुष्याप्रमाणे बाकदार किंवा वाकलेले.

**aspect** (१) समुखांश; (२) प्रभाव

( १ ) सूर्यप्रकाश वारा पाऊस इत्यादींच्या समोर असण्याच्या प्रक्रियेचे प्रमाण. ( २ ) वनश्रीच्या किंवा एखाद्या पादपसमुदायाच्या स्वरूपावर बदलत्या ऋतुमानाचा परिणाम.

**aspection** ऋतुप्रभाव

भिन्न हवामानाच्या कालाचा वनस्पति-समुदायावर होणारा परिणाम अथवा दृश्य स्वरूपातील बदल.

**assay, biological** जैव आमापन

जीवशास्त्रीय दृष्टिकोनातून केलेले मूल्यमापन; नियंत्रित परिस्थितीत एखाद्या पदार्थाचा सजीवावर होणाऱ्या परिणामाचे मूल्यमापन. उदा. गवतांचे पशुखाद्य या दृष्टीने मूल्य निश्चित करण्यास शास्त्रीय पद्धतीचा उपयोग करणे.

**association of species** जाति-संगति; जाति-साहचर्य

दोन किंवा अधिक जाती नियमितपणे वारंवार एकत्र ( जवळ जवळ ) वाढण्याची घटना.

**associes** वर्धी संगति

विकासावस्थेत असलेला ( म्हणून अस्थिर ) वनस्पतींचा विशिष्ट समुदाय; पहा association.

**autogenic succession** स्वजात (स्वयंजनित) अनुक्रमण; स्वानुक्रमण

वनस्पतींच्या समुदायाच्या स्थलातील बदल त्यांच्या प्रक्रियेमुळेच घडून आल्याने त्यात हळूहळू फरक पडून त्याचे अंतिम अवस्थेत रूपांतर होण्याची प्रक्रिया; पहा allogenic succession.

**autophyte** स्वोपजीवी

आपले अन्न स्वत: बनविणारी वनस्पती; दुसऱ्या सजीव किंवा मृत जीवावर अवलंबून नसणारी वनस्पती.

## B

**banner** ध्वजक

पतंगरूप फुलात आढळणारी मोठी, रुंद व ठळकपणे दिसणारी पाकळी; उदा. गोकर्ण, तूर, अगस्ता; पहा papilionaceous.

**bare area** अनावृत क्षेत्र; नग्न प्रदेश

वनस्पतींची वस्ती ज्यावर अद्याप झालेली नाही किंवा असलेली पूर्णपणे नाश पावलेली आहे अशी भूमी.

**barrier** प्रतिबंधक; अवरोधक; रोधक

अडसर; अडथळा करणारे; वनस्पतींच्या जातींच्या मुक्त प्रसाराला मर्यादा घालणारा घटक; उदा. उंच पर्वत; प्रतिकूल हवामान; महासागर, इ.

**belt;, life-** जैवपट्ट

वनस्पतींच्या ( पादप ) समुदायांच्या भौगोलिक वाटणीवरून केलेल्या वर्गीकरणातील कमी पातळीवरचे एकक; जैव जिल्हे व जैव प्रांत हे अनुक्रमे त्यापेक्षा वरच्या पातळीतील आहेत; पहा zonation.

**belt-transect** अनुच्छेदी पट्ट

वनस्पतींच्या मोठ्या समुदायातील नमुन्यादाखल निश्चित केलेल्या क्षेत्रातील एक अरुंद जमिनीचा पट्टा; यातील वनस्पतींची मोजदाद वगैरे करून त्या समुदायातील पादपसंघटनाची माहिती घेण्याची पद्धत आहे.

**bi—** द्वि-; दु-; द्विगुण-; उभय-

दोन, दोनदा, दोन्हीने युक्त या अर्थाचा उपसर्ग.

**biociation** जैव संगति

विशिष्ट स्थानातील काही वनस्पती व प्राणी यांचा संयुक्त व मोठा समावास; उदा. टंड्रा, आल्पीय शाद्वल ( गवताळ प्रदेश ), काष्ठवन, मरुवन, इ. यांमध्ये वनस्पती व प्राणी यांचे संयुक्त, लहान व अनेक समुदाय असू शकतात.

**biocoenosium** जैव समुदाय

वनस्पती व प्राणी यांचा नैसर्गिकरीत्या बनलेला एकत्र समुदाय.

**biological spectrum** जैव वर्णपट

एखाद्या मर्यादित विशिष्ट क्षेत्रातील विविध प्राणी व

वनस्पती यांच्या उपस्थितीची प्रतिशत ( शेकडा ) वारंवारता दाखविणारे कोष्टक.

**— type ( life-form )** जीवाकृति; जीवरूप
सजीवाचे स्वरूप ( आकार, आकारमान इ. ); पहा life-form.

**biome** जीवसंहति
विशिष्ट प्रकारच्या परिस्थितीशी समरूप होऊन एकत्र राहणाऱ्या सर्व सजीवांचा सापेक्षतः स्थिर व प्रभावी वनश्रीयुक्त समुदाय; तेथील सर्व सजीवांत एक समतोल आढळतो; उदा. टंड्रा; ध्रुवीय प्रदेश; गवताळ प्रदेश.

**biometer** जीवमापक
सजीवांचे प्रमाण मोजून निश्चित करण्याची पद्धती; उदा. एखाद्या जमिनीतील मातीच्या नमुन्यात असलेल्या जीवांचे प्रमाण निश्चित करण्याची पद्धत.

**bion ( biont )** स्वतंत्र पादप
पूर्णपणे स्वावलंबी वनस्पती.

**bionomic ( ecological )** स्थलविज्ञानीय; पारिस्थितिकीय
परिस्थितीतील घटकांसंबंधी.

**biophilous ( biogenous )** जीवोपजीवी
पहा parasitic.

**bioplasm ( protoplasm )** जीवद्रव्य
सर्व सजीवांतील मूलभूत जिवंत पदार्थ.

**biota** स्थानिक जीव
विशिष्ट स्थानातील ( स्थायिक ) प्राणी व वनस्पती.

**biotic** जैव
जीवासंबधी; जीवनविषयक.

**— adaptation** जैवानुकूलन
इतर वनस्पतीशी यशस्वी स्पर्धा करण्यास स्वरुपात व शरीरक्रियांत फरक पडून परिस्थितीशी समरस होण्याची घटना.

**— climax** जैव चरमावस्था
सजीवांनी निश्चित केलेली वनस्पतिसमुदायाची अंतिम अवस्था; उदा. आगीमुळे किंवा चरणाऱ्या प्राण्यांमुळे एखाद्या क्षेत्रात वन न बनता सदैव गवताळ प्रदेशाच्या स्वरूपात ती वनश्री असते.

**— factor** जैव घटक
वनस्पतींच्या सामुदायिक जीवनात परिणाम करणारा अन्य सजीव.

**biotine** बायोटीन
एच जीवनसत्त्व; यीस्ट या सूक्ष्म कवकाच्या वाढीस आवश्यक कार्बनी पदार्थ.

**biotype** जैव समुदाय
पहा biocoenocium.

**— ( physiological race )** (१) क्रियावैज्ञानिक वाण; ( २ ) समजननिक वाण; ( ३ ) जनुकविद्या
( १ ) शरीर क्रियांमधील फरक दर्शविणारा त्याच जातीतील लहान प्रकार; ( २ ) वांशिक ( जनुक संचाच्या ) दृष्टीने ऐक्य असलेली दुसरी व्यक्ती अथवा अनेक व्यक्तींचा गट; ( ३ ) स्थानिक समुदायातील सारखी सहनक्षेत्रे दर्शविणाऱ्या व्यक्ती. पहा genetic; genotype.

**Blackman reaction** ब्लॅकमन-विक्रिया
प्रकाशाच्या साहाय्याने अन्ननिर्मिती ( प्रकाश-संश्लेषण ) करण्याच्या वनस्पतींतील प्रक्रियेत प्रकाशाच्या अभावी घडून येणाऱ्या सर्व रासायनिक विक्रिया; यानांच 'तिमिर-विक्रिया' म्हणतात. ब्लॅकमन या शास्त्रज्ञांनी प्रथम निदर्शनास आणल्याने त्यांचे नाव दिले गेले आहे; 'अंधार-विक्रिया' असेही म्हणतात.

**blepharoplast** आधार-कणिका
कोशिकेतून बाहेर निघालेल्या केसासारख्या बारीक ( प्रकेसलाच्या ), जीवद्रव्याच्या धाग्याच्या तळाशी असलेला सूक्ष्म कण; पहा flagellum.

**blunt** गोलाग्र; बोथट
गोलसर टोक असलेला ( अवयव ); उदा. काही शैवल व कवक यांचे तंतू; शिंबा; पानाचे टोक, इ.

**Bordeaux mixture** बोर्डो मिश्रण
साधारणपणे ४ पौंड मोरचूद, ४ पौंड चुना, सुमारे ५० गॅलन पाण्यात एकाच वेळी मिसळून कवकजन्य रोगावर ( रोगी वनस्पतीवर ) शिंपडण्याचे मिश्रण; यातील घटकांचे प्रमाण जरूरी प्रमाणे बदलून वापरतात.

**border parenchyma** मृदूतकावरण; सीमावर्ती मृदूतक
वाहक घटकाभोवती असलेले, मृदू कोशिकांच्या एक किंवा अधिक थरांचे आवरण.

**boss** पिटिका
फळावर, देठावर, तंतूवर किंवा बीजावर असलेला उंचवटा.

**bound water** बद्धजल

प्राकृतिक गुणधर्मामुळे एखाद्या वस्तूच्या पृष्ठभागात शोषून ठेवलेला पाण्याचा अंश; पहा adsorption; free water.

**brachy -** ऱ्हस्व -

आखुडपणा किंवा खुजेपणा दर्शविणारा उपसर्ग.

**— blast** ऱ्हस्व प्ररोह

मर्यादित वाढ असलेला पल्लव; पहा spur.

**— cladous** ऱ्हस्वशाखी

फार आखूड फांद्या असलेले ( झाड ).

**— form** ऱ्हस्वरूपी

एकाच आश्रय–वनस्पतीवर वाढणाऱ्या तांबेरा नावाच्या कवकीय रोगातील वर्षाबीजुकीय अवस्था लोप पावल्याचा प्रकार; उदा. *Puccinia thwaitesii* Schwr. Syd. पहा aecidiospore.

**— sclereide ( stone-cell )** ऱ्हस्वकठक

साधारणपणे लांबीत व रुंदीत सारखी असलेली जाड भिंतीची काष्ठीय कोशिका; आठळी फळांच्या करवंटीतील कोशिका; उदा. नारळ, बदाम, अक्रोड इ.

**bracteody** छदीभवन

पुष्पदलांचे छदासारख्या उपांगांत रूपांतर होण्याची प्रक्रिया; पहा bract.

**branch-tendril** शाखा-प्रतान

तणाव्यात रूपांतर झालेली शाखा; उदा. द्राक्षवेल.

**brand-spore ( uredospore, summer-spore )** ग्रीष्मबीजुक

जाड आवरणाचा बहुधा काही काळ विश्रांति घेणारा व बहुधा काळपट रंगाचा काही कवकात आढळणारा प्रजोत्पादक घटक ( बीजुक ); उदा. काणी; पहा Ustilaginales.

**Brassicaceae** मोहरी ( सर्षप ) कुल

पहा Cruciferae.

**brevi-** ऱ्हस्व -

खुजेपणा ( आखुडपणा ) दर्शविणारा उपसर्ग.

**— stigma** ऱ्हस्वकिंजल्क

फार आखूड किंजल्क ( स्त्री–केसराचे टोक ) असलेले; उदा. सोमलता ( *Sarcostemma brevistigma* Wight.).

**Brownian movement** ब्राउनी हालचाल ( आंदोलन )

कलिल विद्रवातील सूक्ष्म कणांची सतत चालू असणारी सूक्ष्म हालचाल; द्रवपदार्थांच्या रेणूंशी त्या सूक्ष्म-कलिल-कणांच्या असंतुलित ( तोल नसलेल्या ) भडिमारामुळे ( माऱ्यामुळे ) ती घडून येते.

**bundle-end** वृंदान्त; वृंदाग्र

वाहक संचाच्या शेवटी असलेला भाग; उदा. पानांच्या संरचनेतील मध्यभागी असलेल्या कोशिकांच्या समूहातील वाहक घटकांचा शेवटचा भाग.

**bundle-scar** वृंद-किण

पान गळून पडतेवेळी त्याच्या तळात खोडातून जाणाऱ्या वाहक वृंदाचा खोडावर पडलेला वण.

**bur ( burr )** (१) अंकुशफल; (२) कंटवेष्ट; (३) ग्रन्थि

(१) आकड्यासारखे उपांग असलेले फळ;
(२) फळाचे काटेरी आवरण; उदा. निचर्डी, धोत्रा;
(३) गाठ.

**burdock** रोमस्थली; रोमासन

ताठर केस असलेले पुष्पासन; पहा receptacle.

**Burgandy mixture** बर्गंडी मिश्रण

चुन्याऐवजी सोडा ( सोडियम कार्बोनेट ) मिसळलेले बोर्डो मिश्रणासारखे फवारण्याचे औषध; पहा Bordeaux mixture.

**bush ( undershrub )** उपक्षुप

जमिनीलगत अनेक फांद्या असलेली लहान काष्ठयुक्त वनस्पती; लहान झुडप; पहा shrub.

**button** कुड्मल

भूछत्राचे छत्र व दांडा स्पष्टपणे ( पूर्णपणे ) बनून दिसण्यापूर्वीची गोळीसारखी प्रारंभिक अवस्था; पहा mushroom.

## C

**caeruleus** नीलाभ; आकाशी

फिकट निळे; किंचित निळे; निळसर.

**Cainozoic era** नवजीव ( नूतनजीव ) महाकल्प; केनोझोइक ईरा

सुमारे ६·५ कोटी ते ११ हजार वर्षापूर्वीचा भूशास्त्रीय कालखंड.

**calamiferous** रिक्ताक्ष; नलिकाक्ष

नळीसारखे पोकळ खोड असलेले; उदा. नावळी; कळक बोरू.

**Calciferae** उभयपरिदली
परिदलांची दोन्ही ( संवर्त व पुष्पमुकुट ) मंडले असलेला एकदलिकित वनस्पतींचा गट.

**calcifuge** खटद्वेष्टी; खटत्यागी
चुनखडीच्या जमिनीत न वाढणारी ( वनस्पती ); पहा calciphobous.

**caline** वृद्धिप्रेरक द्रव्य; कॅलीन
वाढीला उत्तेजन देणारा पदार्थ; मूलोत्तेजक ( rhizocaline ) हा मुळांच्या वाढीस चालना देणारा; क्षोडोत्तेजक ( caulocaline ) हा खोडाच्या वाढीस चालना देणारा.

**callocity** किण
जाडसर चट्टा; किणकामुळे बनलेली खपली; पहा callus.

**calyc-** चषक
पेला या अर्थी ग्रीक उपसर्ग.

**calycanthemy** प्रदलीभवन
संदलाचे पाकळयात रुपांतर होण्याची अनित्य घटना.

**Calyciferae** संवर्ती उपवर्ग; कॅलिसिफेरी
हचिन्सन यांनी संमत केलेला व संवर्ताची उपस्थिती निश्चितपणे असलेला एकदलिकित वनस्पतींतील ( वर्गातील ) एक गट; यामध्ये मूलक्षोड असतेच; पहा calyx.

**Calycinae** संवर्ताभ श्रेणी; कॅलिसिनी
बेंथॅम व हूकर यांच्यामतें संवर्तासारखी व पातळ परिदले असलेल्या फुलांच्या एकदलिकित वनस्पतींचा गट; पहा Monocotyledons.

**calycine** संवर्तीय; संवर्ती
संवर्ताशी संबंधित अथवा संवर्ताचे.

**calycoid** संवर्ताभ
संवर्तासारखे.

**calyculate** अपिसंवर्तयुक्त
संवर्तासारखा भाग, संवर्ताखाली असलेले ( फूल ).

**calycule ( calyculus )** (१) अपिसंवर्त
(२) चषिका
( १ ) संदलाखाली असलेल्या पानासारख्या उपांगांचे ( छदांचे ) वर्तुळ; उदा. जास्वंद.
( २ ) बीजुककोशांच्या तळाशी असलेला लहान पेल्यासारखा अवयव; उदा. श्लेष्मकवक.

**Cambrian period** हैमन्त युग; कँब्रियन कल्प ( युग )
सुमारे ६० ते ५० कोटी वर्षापूर्वीचा भूशास्त्रीय प्राचीन कालखंड; यालाच त्रिखंड-युग असेही म्हणतात कारण यातील खडकात त्रिखंड प्राण्यांचे ( trilobites ) जीवाश्म सापडतात.

**---, pre-** हैमन्तपूर्व युग; कँब्रियनपूर्व कल्प ( युग )
कँब्रियन कालखंडापूर्वीचा ( सु. ६० कोटी वर्षापूर्वीचा ) अतिप्राचीन कालखंड.

**canaliculate** ससीता; नालीयुक्त
लांबट पन्हळ ( खोबण ) असलेले ( उपांग ); उदा. काही देठ ( नारळ, केळ, कर्दळ ).

**canescent** भुरकट
करडी लव असलेले किंवा भुरे होत असलेले; उदा. कोहळा.

**canker** खैरा; व्रण; कँकर
सूक्ष्मजंतू किंवा कवक यामुळे मध्यत्वचेत निर्माण होणारा मर्यादित ऊतकनाश ( कोशिकासमूहाचा क्षय ) किंवा तो रोग; पहा necrosis.

**canopy** छत्र; छत
काष्ठयुक्त, लहान किंवा मोठ्या वृक्षांच्या जमिनीवरच्या पण उंच भागावर पाने व शाखा यांनी बनलेला छतासारखा पसरट भाग.

**canus** भुरकट
करडे-पांढरे या अर्थी लॅटिन संज्ञा.

**cap-cell** टोपण-कोशिका
नेचाच्या रेतुकाशयाच्या टोकावरील झाकणीसारखी कोशिका; ती सुटून निघाल्यावर रेतुके ( पुं-कोशिका ) बाहेर पडतात.

**capillary** केशीय; केशाभ
केसासारखी सूक्ष्म जाडी ( किंवा व्यास ) व पोकळी असलेली ( नलिका, मार्ग ).

**-- soil-water** केशीय मृज्जल
जमिनीतील सूक्ष्म कणांच्या पोकळयांमधील पाणी; हे वनस्पतींच्या मुळांना किंवा तत्सम अवयवांना उपलब्ध असते.

**capillitium** (१) सूत्रपुंजक; (२) वंध्यतंतुसमूह;
(३) तंतुकपाश
(१) अनेक सूक्ष्म धाग्यांचा पुंजका;

(२) काही कवकांच्या वांझ तंतूचा पुंजका;
(३) काही श्लेष्मकवकांच्या अलिंग प्रजोत्पादक अवयवांतील जीवद्रव्याच्या सूक्ष्म धाग्याचा संच.

**capituliform** स्तबकाभ; शीर्षाभ
अनेक लहान फुलांच्या गर्द गुच्छासारखी लक्षणे असलेली (संरचना; उदा. फुलोरा); पहा capitulum.

**caprification** उदुंबरण
काही लागवडीतील अंजिराच्या प्रकारात कृत्रिम परागणाची ( पराग घालण्याची ) प्रक्रिया; त्यानंतर अंजिराचे फळ बनते.

**cartilagions** कूर्चाभ; कूर्चायुक्त
कठीण व चिवट परंतु ठिसूळ नसलेले ( आच्छादन ).

**catapult mechanism** गलोल-यंत्रणा; गोफण-यंत्रणा
गलोल किंवा गोफण ह्यासारख्या पद्धतीने बिया फळाबाहेर फेकण्याची योजना ( साधन ); उदा. काही फळे ( तेरडा, आंबुशी ).

**central body** केंद्रकाय
प्रकलाप्रमाणे कार्यक्षम असा जीवद्रव्यातील रंगहीन ठिपका; पहा nucleus; Blue green algae.

**centralium** सरल कोटर
वस्तूंमधील उभी पोकळी.

**centrum** घनकेंद्र
घन वस्तूचा मध्यबिंदू.

**cernuous ( ceruus )** लोंबते; नत
लोंबणारे; वाढ होत असताना वाकलेले.

**chamaeophyte** निम्नकोरक पादप; निम्नपादप
जमिनीच्या पृष्ठभागालगत किंवा २५-३० सें. मी. उंचीपर्यंत शाकीय अवयव धारण करणारी वनस्पती.

**chaparral** चॅपरल
अमेरिकेतील ( कॅलिफोर्निया व नैऋत्य भाग येथील ) सौम्य "भूमध्यसामुद्रिक" हवामानातील जाड पानांच्या झुडपांचा समुदाय ( वनश्री ).

**chasmophyte** विदार-पादप
खडकांतील भेगांमध्ये वाढणारी वनस्पती.

**chorisis** भंग; खंडन
दोन किंवा अधिक खंड ( भाग ) होण्याची प्रक्रिया ( रोग ); यामुळे काही अनित्य संरचना बनतात; उदा. एका पानाची किंवा तत्सम अवयवाची प्रथमपासून दोन किंवा अधिक अवयवांत ( अधिक पाकळ्या, संदले, दले, दलके, इ.) विभागणी होणे.

**chorology** स्थानिक ( सीमित ) प्रसार
मर्यादित क्षेत्रातील जातींचा आढळ किंवा तत्संबंधीची माहिती.

**chromatophore** वर्णकणु
पहा chromoplast.

**chromogenic** वर्णजनक
रंगद्रव्य निर्माण करणारा ( पदार्थ, सजीव, विक्रिया, प्रक्रिया इ. ).

**chromoplasm** वर्णस्तर
रंगद्रव्य धारण करणारा थर; उदा. नीलहरित शैवलांच्या कोशिकेतील बाहेरचा रंगद्रव्य असलेला थर.

**chromosome set** रंगसूत्र-संच ( गट )
काही सजीव व्यक्तींच्या शरीराच्या कोशिकेतील ( जातिविशिष्ट ) रंगसूत्रांचा एकगुणित गट; काहींच्या शरीर-घटकांत असे गट दोन असून प्रजोत्पादक घटकांत एकच गट असतो; पहा haploid; diploid.

**cinereous** रक्षावर्णी; राखी
राखेप्रमाणे करड्या रंगाची ( उदा. साल ).

**circular** वर्तुळाकृति
वाटोळे ( पान ) उदा. कमळ; ट्रोपिओलम.

**clasping** वेष्टक; परिवेष्टी
अंशतः किंवा पूर्णपणे वेढणारा ( अवयव ); उदा. काही आमरांची वायवीमुळे; गवतांच्या पानांचे तळभाग. पहा leaf-sheath.

**classification of vegetation** वनश्रीचे वर्गीकरण
एखाद्या प्रदेशातील संपूर्ण वनस्पति-समुदायांचे ( किंवा पादपरूप आच्छादनाचे ) लहानमोठे गट करण्याची प्रक्रिया ( पद्धती ). यामध्ये समावास, संगति, संघात, कृत्तक, संहति, समूह, इत्यादी विशिष्ट गटांचे सामान्य स्वरूप, संरचना, विकासाची पातळी, अनुक्रमणाची अवस्था, स्थिरता, स्थलविविधता इत्यादी बाबींना प्राधान्य असते व त्यावरून समुदायांचे प्रकार व त्यातील दर्जा निश्चित करतात. पहा association, formation, society.

**climax** चरम-; परम-
विद्यमान परिस्थितीतील सापेक्षतः स्थिर झालेला (असलेला) अथवा कायमपणा आलेला (पादप समूह).

— **community** चरम समुदाय

विशिष्ट परिस्थितीत न बदलता राहिलेला वनस्पतींचा समुदाय ( समूह ).

-- **dominant** चरम प्रभावी

स्थिर वनस्पति-समूहातील ठळकपणे आढळणारी परिणामकारक जाती; उदा. सागाच्या जंगलातील सागवानाची जाती ( *Tectona grandis* L. ).

**cline** संक्रामी समुदाय

परिस्थितीतील फरकामुळे भिन्नपणा आलेल्या शेजारच्या दोन समुदायांना जोडणारा काहीसा मिश्र व क्रमिकता दर्शविणारा वनस्पतींचा समुदाय; उदा. सपाट मैदान व डोंगर किंवा दलदली किनारा व शेजारची चढण अशा क्षेत्रांमधील वनश्रीचा संधिप्रदेश.

**clone** कृत्तक

उद्यानविद्येत ( बागेसंबंधीच्या माहितीत ) ही संज्ञा अलीकडे फक्त शाकीय पद्धतीने अभिवृद्धी केली जाते अशा वनस्पतीला वर्गीकरणातील एकक या अर्थी वापरतात.

**cluster** गुच्छ; पुंज

झुबका. उदा. एकत्र वाढलेली पाने, फांद्या, फुले किंवा फळे.

**coaction** सहक्रिया

पहा symbiosis.

**coadaptation** सहानुयोजन

परस्परांवर अवलंबून असणाऱ्या दोन सजीवात किंवा दोन अवयवांत होणारा संबंधित बदल.

**coadnate** संलग्न

परस्परांना जोडलेले ( दोन अवयव किंवा उपांग ).

**cochlea** सर्पिल शिंबा

फिरकीप्रमाणे गुंडाळलेली शिंबा ( शेंग ); उदा. विलायती चिंच ( *Pithecolobium dulce* Benth. ).

**cochlear (spoon-shaped)** चमसाकृति

चमच्यासारख्या आकाराचा ( अवयव ).

**coeno** – सह –

एकत्र असणारे या अर्थाचा उपसर्ग.

**coenobium** निवह

मर्यादित संख्या व संघटन असलेला शैवलांच्या कोशिकेचा समूह; हा एका व्यक्तीप्रमाणे वावरत असून अनेकदा तळ व शेंडा ( ध्रुवत्व ) असा भेद दर्शवितो; तसेच स्वतःसारख्या कोशिकांचे समूह निर्माण करतो. उदा. हॉल्व्हॉक्स.

**cohesion mechanism** संसंग-यंत्रणा

पाण्याच्या कणांच्या परस्परांशी चिकटून राहण्याच्या धर्मावर अवलंबून असणारी संरचना ( यंत्रासारखी कार्य करणारी रचना ) उदा. नेचाच्या बीजुककोशाचा स्फोट घडविणारे वलय.

**collar ( collet )** स्कन्धमूलसंधि

खोड व मूळ यांना जोडणारा वलयासारखा भाग.

**collateral bud** संलग्न कलिका

पानाच्या किंवा छदाच्या बगलेतील कळीशेजारची अधिक कळी.

**compatible** स्वफलनशील

स्वतः आपल्या पुं– व स्त्री–गंतुकाचे मीलन घडवून आणण्याची क्षमता असलेली ( वनस्पती; पिढी ).

**compensating point** समकारी बिंदु

प्रकाशसंश्लेषणाने अन्नाची केलेली निर्मिती व श्वसनामुळे खर्च झालेले अन्न यांमध्ये समतोल राखणारी प्रकाश–तीव्रता; इतर घटक स्थिर आहेत असे मानल्यास या प्रक्रियेत कार्बन डाय-ऑक्साइड किंवा ऑक्सिजन यांचे ग्रहण किंवा विसर्जन घडून येत नाही.

**compensation period** अनुपूर्ति-काल

प्रकाशाभावी चालू असलेल्या हिरव्या वनस्पतीतील श्वसनामुळे खर्च झालेल्या अन्नपदार्थांची ( कार्बोहायड्रेटची ) प्रकाशात निर्मितीने भरपायी करण्यास लागलेला अवधी.

**composition** संघटन

सर्व स्थूल आणि लहान घटकांचे प्रमाण; उदा. पादप-समुदायातील भिन्न वनस्पतींचे प्रमाण किंवा जमिनीतील खनिज द्रव्यांचे प्रमाण.

**confluent** मीलित

एकत्र जुळलेले ( अवयव ); परस्परात मिसळलेले ( समुदाय ); उदा. अनेक लहान फळे एकत्र होऊन बनलेले संयुक्त फळ ( तुती, बारतोंडी, अननस, फणस, इ. ).

**constancy** सातत्य

वनस्पतींच्या नैसर्गिक समुदायातील ( संगतीतील ) सारख्या आकारमानाच्या अनेक नमुना-क्षेत्रांत साधारणपणे सतत आढळणाऱ्या विशिष्ट वनस्पतीचे शेकडा प्रमाण; उदा. शंभर नमुना-क्षेत्रांपैकी नव्वद क्षेत्रात

तिचा आढळ ( उपस्थिती ) असल्यास तिचे सातत्य प्रतिशत नव्वद धरतात; पहा presence.

**consumer** ग्राहक
पहा ecosystem.

**continuum** सातत्यक
वनस्पतींच्या दोन भिन्न समुदायांमधील व दोन्हींत सलगपणा राखणारा सामाइक वनस्पति-समूह.

**convergence** समाभिरूपता
आरंभीची परिस्थिती व विकासमार्ग यांवर काही अंशी अवलंबून असून नंतर समान परिस्थितीत भिन्न पादप-समुदायांचे अंतिम विकसित स्वरूप समान राहिल्याची घटना.

**corniculate** लघुशृंगाग्र
टोकावर लहान शिंगासारखा उंचवटा असलेला (अवयव, छद, खवला); उदा. आंबुटीचे (*Oxalis corniculata* L.) फळ.

**cotype** सहमूलप्ररूप
मूळचा नमुना ज्या वनस्पतीपासून घेतला तिचाच दुसरा नमुना.

**cover (area occupied)** आवरण; आच्छादन
व्यापलेले क्षेत्र.

**—, herbage-** ओषधीय आवरण
वरून पाहिले असता पूर्ण झाकलेले दिसणारे व वनस्पतींच्या अवयवांनी व्यापलेले जमिनीवरील क्षेत्र.

**—, plant-** पादपावरण
जमिनीवरील वनस्पतींनी व्यापलेला भाग.

**cryptophyte** गूढपादप; गूढ कलिकोद्‌भिद
जमिनीच्या पृष्ठभाखाली असलेल्या भागावर सुप्त कळ्या धारण करणारी वनस्पती.

**cultigen** संवर्धित
सतत लागवडीने विकास पावलेली व फक्त लागवडीतच आढळणारी ( जंगली अवस्थेत नसलेली ) उदा. वनस्पती किंवा त्यांचा गट.

## D

**decomposer** अपघटक
पहा ecosystem.

**deltoid** त्रिकोनी
तीन कोन असलेल्या आकृतीप्रमाणे ( उदा. पान, छद ).

**density** घनता
एखाद्या स्थलविषयक एककातील ( ठराविक क्षेत्रातील ) व्यक्तींची संख्या: पहा abundance.

**Devonian period** डेव्होनियन पीरीयड; डेव्होनी कल्प
सुमारे ४० कोटी ते ३६·५ कोटी वर्षांपूर्वीचा भूशास्त्रीय कालखंड; सिल्यूरियन व कार्बॉनिफेरस कल्पांमधील कालखंड.

**disseminule** विकिर्णी
स्थलांतराच्या अवस्थेतील वनस्पती; उदा. बीज, बीजुक, फळ इ.

**distractile** वियोजी
परागकोशाच्या दोन खंडांना परस्परांपासून पूर्णपणे दूर ठेवणारी संधानी; उदा. सॅल्व्हिया.

**divaricate** अत्यपसारी
परस्परापासून बव्हंशी दूर असलेले भाग; उदा. काही परागकोशांचे खंड; काही पानांतील शिरा; पहा divergent; forked.

## E

**ecological system** पारिस्थितिकीय तंत्र
एक किंवा अनेक सजीव आणि त्यांचा परिसर यांमधील ऊर्जेच्या विनिमयाचे जटिल संबंध दर्शविणारी व्यवस्था.

**ecosystem** स्थल-व्यूह; स्थल-तंत्र; निवास-तंत्र
पादपसमुदायातील सर्व सजीव व निर्जीव घटकांची परस्परावलंबी एकत्रित संस्था ( व्यूह ); सजीवांपैकी कोणी अपघटक ( decomposers ), कोणी उत्पादक ( producers ) आणि इतर ग्राहक ( consumers ) असतात. साधारणपणे हिरव्या वनस्पती अधिकांश उत्पादक, सूक्ष्मजंतू व कवक हे अपघटक ( जटिल कार्बनी पदार्थांचे रूपांतर अकार्बनी पदार्थांत करणारे) व प्राणी अधिकांश ग्राहक ( उपयोगांत आणणारे ) असतात.

**ecotone (vegetational boundary)** पादपी सीमा; एकोटोन
दोन पादपसमुदायातील सीमारेषा दर्शविणारे संक्रमण-स्थल ( परस्परात मिसळलेले ठिकाण ).

**ecotype** स्थितिरूप; स्थलरूप; एकोटाइप
( १ ) विशिष्ट परिस्थितीशी ( जननिक दृष्ट्या ) वंश-परंपरेने अनुकूलित झालेल्या एकाच जातीतील काही वनस्पतींचा गट; यांचा त्याच जातीतील अन्य परि-

स्थितीशी अनुकूलित झालेल्या इतर वनस्पतींशी मुक्तपणे संकर होऊ शकतो;

( २ ) एखाद्या वनस्पतीचा निवासानुरूप बनलेला रूपप्रकार.

**effective publication** अनुवृत्त प्रकाशन

वनस्पतींच्या नावासंबंधीची प्रसिद्धी छापील मजकूर, विक्री, देवघेव, प्रसार इ. साधनांनी करण्याची अधिकृत पद्धती.

**effloration** ( १ ) पुष्पोद्गम; पुष्पानिर्मिती; ( २ ) पुष्पकाल

( १ ) फुले येणे; ( २ ) फुलांचा मोसम.

**enation** अपिवार्धित

अपित्वचेपासून वर वाढलेले उपांग.

**epibiotic** अपिजैव

निर्वंश पादपजातीतील अवशिष्ट ( शिल्लक ) जाती.

**era** महाकल्प; ईरा

भूशास्त्रीय कालाचा सर्वांत मोठा भाग ( कालखंड ); याचे अनेक उपविभाग ( कल्प ) बनविलेले आहेत; पहा period.

**ergastic substances** अजैव पदार्थ

कोशिकेतील जीवद्रव्यापासून निघालेले अक्रिय ( मेदबिंदू, पिष्ठकण, बहिःस्राव इ. सारखे ) पदार्थ.

**euxerophyte** सत्यमरुपादप

पूर्ण विकसित मूलतंत्र असलेली, पाणी शोषून घेण्यात अडथळा आल्यास त्वरित कोमेजणारी व रुक्ष ठिकाणी वाढणारी वनस्पती.

**exserted** बहिरागत

पहा exerted.

## F

**fasciated** सपाट

अनित्यपणे सपाट झालेले ( खोड ); एक विकृति; उदा. शतावरीची एक जाती.

**female cell** स्त्री-पेशी; स्त्री-कोशिका

अंडे; अंदुक; पहा female gamete.

**feminine** किंजी; किंजदलयुक्त; स्त्रीलिंगी

उच्च दर्जाच्या वनस्पतींत किंजदलांचे मंडल असलेले ( फूल, वनस्पती ); उदा. पपई.

**fenestrate** सच्छिद्र

अनेक बारीक भोके असलेले.

३४

**Ficoideae (Ficoidaceae; Aizoaceae)**

वालुक कुल; फायकॉइडी (फायकॉइडेसी; ऐझोएसी) वळू ( वालुक ), झरस, धाप, वसू, दसरा–साग इ. नावांनी ओळखल्या जाणाऱ्या वनस्पतींचा अंतर्भाव करणाऱ्या द्विदलिकित फुलझाडांचे एक लहान कुल. याचा अंतर्भाव हचिन्सन यांनी फायकॉइडेसी नावाने पाटलपुष्प गणात ( कॅरिओफायलेलीझमध्ये ) केला असून एंग्लर व प्रँटल यांनी ऐझोएसी या नावाने आणि बेंथम व हूकर यांनी फायकॉइडी या नावाने फायकॉइडेलीझमध्ये केलेला आढळतो. प्रमुख लक्षणे : ओषधी व उपक्षुप; बहुधा साधी, मांसल, कधी लहान खवल्यासारखी पाने; पाकळ्या नसलेली, अरसमात्र, बहुधा नियमित, द्विलिंगी फुले; सुटी किंवा जुळलेली व किंजपुटास चिकटलेली संदले; मूलतः पाच, परंतु विभागून अनेक झालेली केसरदले; बाहेरची वंध्य व पाकळ्यासारखी; तीन ते पाच दलांचा, परंतु एक संयुक्त किंजपुट; क्वचित एकच बीजक; बोंडात किंवा मृदुफळात एक किंवा अनेक, सपुष्क कधी अपुष्क, बिया. वसू ( *Trianthema monogyna* L. ); वळू ( वालुक = *Gisekia pharnecioides* L. ).

**fidelity** निष्ठा

विशिष्ट प्रकारच्या पादप समुदायातच आढळण्याचे एखाद्या वनस्पतीच्या जातीचे प्रमाण; अनेक भिन्न समुदायांत आढळणाऱ्या जातीची निष्ठा ( प्रमाण ) कमी दर्जाची असून फार कमी समुदायातील आढळ उच्च दर्जाची निष्ठा ( प्रमाण ) दर्शविते.

**—, exclusive** अनन्य निष्ठा

बव्हंशी एकाच प्रकारच्या पादपसमुदायात विशिष्ट वनस्पती आढळण्याचा प्रकार.

**—, preferential** अधिमान्य निष्ठा

अनेक प्रकारच्या पादपसमुदायात विशिष्ट वनस्पती विपुलतेने आढळण्याचा प्रकार; परंतु हीच जाती त्यांपैकी एकातच परिस्थितिसापेक्ष संख्या व जोम या दृष्टीने अधिक असते.

**—, selective** वरणात्मक निष्ठा

एका प्रकारच्या पादपसमुदायात वारंवार आढळणारी, पण फार क्वचित, इतर प्रकारच्या समुदायातही तीच जाती असण्याचा प्रकार.

**fluviatile** नदीय

प्रवाहात किंवा नदीत वाढणारी ( वनस्पती ).

**follicetum** पेटिकागुच्छ

एकाच फुलातील अनेक सुट्या किंजदलांपासून बनलेला पेटीसारख्या फळांचा घोस; उदा. सोनचाफा; रायणी ( *Manilkana hexandra* Roxb. ); पहा follicle.

**food-chain** अन्नशृंखला

अन्न व त्यापासून प्राप्त होणारी ऊर्जा ज्या अनेक सजीव व्यक्तींच्या ( किंवा सजीव गटांच्या ) श्रेणीतून ( मालिकेतून ) पूर्णपणे खर्ची पडण्यापूर्वी, स्थानांतर करते ती साखळी.

**fucoxanthin** पिंगल शैवलद्रव्य; फ्यूकोझँन्थीन

पिंगट शैवलांतील रंगद्रव्य; पहा Phaeophyceae.

**fumaginous** धूम्रवर्णी

पहा fumeous.

**Fumariaceae** पर्पटकुल; फ्यूमॅरिएसी

फुलझाडांपैकी द्विदलिकित वर्गातील पर्पट, भूलकेशी, मामिरान इत्यादी वनस्पतींचे कुल. याचा अंतर्भाव ऱ्हीडेलीझ ह्या गणात करतात. प्रमुख लक्षणे : पाण्याचा अंश अधिक असलेल्या ओषधी; क्वचित वेलीसारख्या; पाने साधी, बहुधा एकाआड एक, मूलज किंवा स्कंधेय, कधी फार विभागलेली व काहीशी समोरासमोर; फुले द्विलिंगी, एकसमात्र; परिदले तीन मंडलात असून संदले दोन, प्रदले चार; केसरदले सहा व किंजपुटाच्या दोन्ही बाजूस तीनच्या गटात व जुळलेली; किंजदले दोन; ऊर्ध्वस्थ किंजपुटात एक कप्पा व त्यात दोन किंवा अनेक बीजके. फळ ( बोंड ) तडकणारे किंवा कपाली; बी एक किंवा अनेक. पर्पट अगर पित्तपापडा ( *Fumaria parviflora* L. ).

**fungicolous** कवकवासी

कवकावर आधार किंवा कवकापासून अन्नरस घेणारी (वनस्पती).

**fungiform** भूछत्राकृति

भूछत्रासारखे दिसणारे; पहा mushroom.

**funicular** तंतुसम; तंतुवत्

बारीक दोऱ्यासारखे; सुतासारखे.

**funiform** रज्जुसम

लहान दोरासारखे; जाडजूड दोरीसारखे.

**funnel-cell** नालिका-कोशिका

नाळक्याच्या आकाराचा ( वरच्या बाजूस रुंद व खाली क्रमाने निमुळता होत गेलेला ) शरीरातील सूक्ष्म घटक; काही पानांच्या अंतर्रचनेत अपित्वचेखाली असलेल्या कोशिका-समूहातील एक घटक ( कोशिका).

## G

**Galton's laws** गॉल्टनचे नियम

पहा Law of ancestral heredity ( inheritance ); Law of filial regression.

**galvanotropism** विद्युतनुवर्तन

चलविद्युत् प्रवाहाच्या चेतनेने घडून येणाऱ्या वाढीमुळे अवयवास वाकडेपणा ( वळण ) येण्याचा प्रकार हे वळण विद्युत् धनाग्राकडे असते; पहा tropism.

**gametophytic budding** गंतुकधारीय मुकुलायन

पुं-नर-जननेंद्रिये ( रेतुकाशये ) धारण करणाऱ्या पिढीपासून शाकीय पद्धतीने सूक्ष्म कळ्यासारख्या अवयवांची निर्मिती व नंतर त्यापासून नवीन एकगुणित पिढ्यांची उत्पत्ती.

**gametoplasm** गंतुकप्राकल; गंतुकद्रव्य

सलिंग प्रजोत्पादक कोशिकेतील जीवद्रव्य.

**gamotropic movement** फलनपूर्व हालचाल

प्रजोत्पादक घटकांच्या संयोगापूर्वी घडून येणारी त्यांची किंवा संबंधित अवयवांची ( उपांगांची ) हालचाल.

**gangliform** गंडिकारूप; गंडिकाभ; गुच्छिकारूप

अनियमित फुगवट्याप्रमाणे.

**ganglion** (१) गंडिका; (२) गुच्छिका

( १ ) कवकतंतूतील विविधप्रकारे ( कमी अधिक ) फुगलेला भाग; ( २ ) तंत्रिका-तंत्रात ( चैतन्यव्यूहात) आढळणारा अनेक कोशिकांचा गाठीसारखा समूह.

**Garigue** गॅरीग

भूमध्यसामुद्रिक प्रदेशातील खुरटी झाडी; यात मुख्यतः तुलसीकुल, शिंबीकुल आणि सुगंधी ओषधीय वनस्पती यांचा भरणा असतो.

**gene-dosage** जनुकमात्रा

प्रकलातील एखाद्या आनुवंशिक घटकाच्या उपस्थितीची संख्या; पहा duplex; simplex.

**genetic complex** जननिक संच

कोशिकेतील परिकल आणि रंगसूत्रातील आनुवंशिक गुणदोषवाहक घटक यांचा संपूर्ण गट.

**— variation** (१) जननिक ( वांशिक ) भेद; वंशागत भेद; (२) जनुक विभेदन

( १ ) वंशपरंपरेने आलेला संततीतील फरक;

(२) रंगसूत्रातील आनुवंशिक घटकासंबंधीचा बदल.

**genome (genom)** रंगसूत्र (गुणसूत्र) संच
विशेषतः जननिक दृष्ट्या विचारात घेतलेला एकगुणित रंगसूत्रांचा गट.

**genuine tissue** सत्योतक; सत्य ऊति
संबंधित कोशिकांच्या समूहातून विभागणीने निर्मिलेल्या व पुढे प्रभेदन घडून आलेल्या कोशिकांचा समूह; आभासी नसलेले ऊतक; पहा tissue.

**geonasty** गुरुत्वानुकुंचन
भूगर्भाकडे वळण्याची अवयवांची प्रक्रिया; उदा. आदिमूळ.

**geophilae** मृदाशैवले
मातीवर वाढणारी शैवले; उदा. व्हाऊचेरिया.

**geophilic (geophilous)** भूमिप्रिय; भूरागी
(१) जमिनीत फळे बनविणारी वनस्पती; उदा. भुईमूग; (२) जमिनीवरच वाढणारी (वनस्पती); स्थलवासी.

**geophyte** गूढपादप
जमिनीतील खोडावर प्रतिकूल परिस्थितीत कळ्यांचे संरक्षण करून जगणारी वनस्पती (उदा. आले, हळद इ.); त्यावेळी जमिनीवरील तिचा भाग सुकून जातो. पहा geophyta.

**geotome** मृदाखंडक; मृदाकर्तक
प्रायोगिक अभ्यासाकरिता मातीचे नमुने (लहान तुकडे) कापून गोळा करण्याचे शास्त्रीय साधन (उपकरण).

**germen (ovary)** (१) किंजपुट; (२) कलिका
पहा ovary; bud.

**germinable (viable)** अंकुरणशील; अंकुरणक्षम
रुजण्याची क्षमता असलेले; रुजू शकणारे; उदा. बीज; बीजुक, इ.

**germinal (germ-) disc** अंकुरबिम्ब; जननबिम्ब
बीजुक रुजून त्यापासून काही कोशिकांचे बनलेले व सूक्ष्म चकतीसारखे प्राथमिक शरीर; उदा. मार्चेशिया शेवाळी.

**— tube** जनननलिका; अंकुरनलिका
पहा germ-tube.

**gigantism** भीम– (बृहत्–) कायिता
प्रचंडपणा अथवा फार मोठा आकार असण्याचा प्रकार.

**gilvous** पिंगल
तपकिरी किंवा पिंगट रंगाचे; उदा. अशोक, आंबा, माधवलता (मधुमालती=*Hiptage madablota* Gaertn.) यांची कोवळी पाने.

**gimped** स्थूलदंतुर
पहा crenate.

**girder** तुळई; धरण
खोड किंवा काही पाने यांमध्ये ताण आणि दाब सहन करण्याकरिता व आधाराकरिता उपयुक्त अशा कठीण आवरणाच्या घटकांची तुळईसारखी मांडणी.

**— sclerenchyma** धरण-दृढोतक
कित्येक वरच्या दर्जाच्या वनस्पतींच्या अवयवांच्या आडव्या छेदात तुळईच्या किंवा इंग्रजी I, T, H व O या अक्षरांच्या आकारांत असलेला कठीण आवरणाच्या व बहुधा मृत कोशिकांचा समूह; उदा. शिंदी, केवडा, इ. वनस्पतींची ताठर पाने; जाडजूड देठ; ताठर खोड व फांद्या (मका, तुळस, पुदीना, इ.).

**girdle-structure** मेखला-संरचना
खोडाच्या आडव्या छेदात त्रिज्येच्या दिशेने पसरलेल्या व हरित्कणूंनी भरलेल्या लांबट कोशिकांनी वेढलेला वाहक कोशिकांचा संच.

**glabrescent** अल्परोमश; अल्पकेशी
काहीसे केसाळ किंवा बऱ्हंशी गुळगुळीत असलेला (अवयव); उदा. ओसाडीचे पान.

**glaciation** हिमानी क्रिया
पृष्ठभागावरून हिमनदी वाहात जाण्याची प्रक्रिया व त्यामुळे झालेला बदल; उदा. पूर्वीची वनश्री नाहीशी होणे.

**gladiate** खड्गाकृति; अस्याकृति
तरवारीसारखे; उदा. पान, फळ; पहा ensiform.

**glandular serrate** प्रपिंडदंती; ग्रंथिदंतुर
पानाच्या किंवा अन्य अवयवांवरील दातेरी किनारीवर (कडेवर) किंवा टोकावर प्रपिंडे (ग्रंथी) असण्याचा प्रकार.

**glaucesant** (१) समुद्रवर्णी; (२) किमानील
(१) समुद्राच्या पाण्याच्या (हिरवट) रंगाचे. (२) काहीसे निळसर हिरवे; पहा glaucous.

**gleba** गाभा
काही कवकांच्या बीजुकोत्पादक शरीरातील अनेक कप्पे असलेले व बीजुके निर्मिणारे ऊतक; पहा Phallaceae.

**glebula** गोलवर्ध

गोलसर उंचवटा; पहा Lichens.

**glebulose** गोलवर्धयुक्त

पृष्ठभागावर गोलसर उंचवटे असलेले ( साधे शरीर; कायक ); उदा. धोंडफूल.

**gliadin** ग्लायडीन

विशेषतः गव्हाच्या दाण्यात असलेले प्रथिन.

**glide** विसर्पण

घसरत जाणे; हळू सरकणे; उदा. काही नीलहरित शैवले व करंडक वनस्पती.

**gliding growth** विसर्पी वृद्धि

पहा sliding growth.

**glomerulate** पुष्पकपुंजित; बीजुकपुंजित

काही अवयवांचे ( बीजुके पुष्पके, इ. चे ) झुबके असलेली ( वनस्पती ); पहा glomerule.

**glumella (palea)** अंतस्तुष

पहा palea.

**gluten** ग्लुटेन

( १ ) स्टार्च वेगळा काढल्यानंतर राहिलेले काही वनस्पतींतील चिवट व आरक्षित प्रथिन.

( २ ) काही भूछत्रावरचे चिकट आवरण.

**gonoplasm** पुं-द्रव्य

प्रजोत्पादक नर-कोशिकायुक्त अवयवातून, फलन-नलिकेद्वारा, स्त्री-कोशिकायुक्त अवयवातील स्त्री-कोशिकेशी संयोग होण्यास जाणारा नर-जीवद्रव्याचा एकप्रकलयुक्त भाग; उदा. द्राक्षवेलीवरील भुरी.

**gracilis** तनु

बारीक या अर्थी लॅटिन संज्ञा; हिचा वापर वनस्पतींच्या जातिवाचक नावाकरिता करतात. उदा. *Bignonia gracilis*.

**gradient** क्रमिकता; उतार; प्रवणता

परस्पराशेजारी असलेल्या दोन भिन्न प्रदेशांतील ( उदा. डोंगर व मैदान ) जमीन, हवामान इत्यादींतील फरकांमुळे एकातून दुसऱ्यात जाणाऱ्या सीमाप्रदेशात आढळणारा चढउतार; हा त्यातील वनस्पतींच्या समुदायात हळुहळू संघटनात्मक फरक पडण्यातही दिसून येतो. पहा cline.

**grand period of growth** महावृद्धिकाल

कोशिका, ऊतक व अवयव यांच्या पूर्ण वाढीकरिता आरंभापासून शेवटपर्यंत लागलेला संपूर्ण वेळ.

**grandis** महा-; बृहत्-

मोठा या अर्थाचा लॅटिन उपसर्ग; त्यावरून *grandiflora* किंवा *grandiflorus* = महापुष्पी; उदा. अगस्ता ( *Sesbania grandiflora* Poir.).

**graviperception** गुरुत्वबोध; गुरुत्वागम

गुरुत्वाची (पृथ्वीच्या आकर्षणाची) अथवा स्वतःच्या वजनाची जाणीव.

**gravitational water** गुरुत्वीय जल

गुरुत्वाकर्षणामुळे जमिनीत शिरून विशिष्ट खोलीवर ( खडकाळ थरांवर ) साचलेले पाणी; हे द्रवरूप असून वनस्पतींना उपलब्ध होते.

**ground-respiration** मूलश्वसन

जमिनीत असणाऱ्या मुळांचा श्वासोच्छ्वास; याचा खनिजांच्या शोषणाशी संबंध नसतो.

**— -water** भूजल; मृज्जल

जमिनीच्या खालच्या थरात निसर्गतः मातीने धरून ठेवलेले पाणी; या भूजलाच्या पृष्ठभागाला "भूजल प्रतल" म्हणतात; पहा water-table.

**growing zone** वर्धी क्षेत्र

वनस्पतींच्या अवयवांची प्रत्यक्ष लांबीत वाढ होत असलेला भाग. उदा. खोड, मूळ, व शाखा यांची टोके, पानांची टोके किंवा तळभाग इ.

**growth-inhibiting** वृद्धिरोधक

वाढीस प्रतिबंध करणारा किंवा वाढीचा वेग मंद करणारा व कोशिकांत बनविला जाणारा ( पदार्थ ).

**— -limiting** वृद्धिमर्यादक; वृद्धिनियंत्रक

वाढीला मर्यादा घालणारा अथवा वाढीचे नियमन करणारा ( घटक ).

**gymno-** नग्न-; प्रकट-; अनावृत-

उघडे ( आवरण नसलेले ) या अर्थाचा ग्रीक उपसर्ग.

**— carpous** नग्नफली; प्रकटफली; अनावृतफली

( १ ) परिदलाशी जोडून नसलेल्या फलावरणांनी युक्त; ( २ ) लव किंवा केस नसलेल्या फळांची ( वनस्पती ); ( ३ ) बीजुके पक्व होत असताना बीजुकोत्पादक थर उघडा असलेले ( कवक ).

**— cyte** नग्नकोशिका

भित्तिका ( आवरण ) नसलेला सूक्ष्म शरीरघटक; उदा. काही गंतुके, बीजुके, इ.

**gynandromorph** पुं-स्त्रीरूप; पुंजायरूप
नर वनस्पतीसारखी दिसणारी स्त्री–वनस्पती ( मादी वनस्पती ).

**gynospore** गुरुबीजुक; बृहत्‌बीजाणु
पहा megaspore.

**gyrate** अवसंवलित; चक्राकृति; अग्रवलित
पहा circinate.

**gyrose** नतोन्नतपृष्ठी; तरंगितपृष्ठी
नागमोडी रेषा किंवा कंगोरे यांनी भरलेला पृष्ठभाग असलेला ( अवयव ).

## H

**haliplankton** समुद्रप्लवक
समुद्रातील सजीवांचा तरता व पृष्ठाच्या आसपासचा समूह.

**halobiontic** लवणांबुवासी
फक्त खाऱ्या पाण्यातच राहणारी ( वनस्पती ).

**handle-cell ( manubrium )** हस्तक-कोशिका; मुष्टि-कोशिका
कांडशरीरिका शैवलाच्या रेतुकाशयाच्या ( पुं–जननेंद्रियाच्या ) बाहेरील आवरणातील आधारभूत कोशिकांपैकी एक; पहा Characeae.

**haplophase ( gamophase )** एक गुणितावस्था
पहा haploid.

**hemi-cryptophyte** अर्धगूढपादप; अर्धगूढ-कलिकोद्‌भिद
जमिनीच्या पृष्ठालगत अनेक वर्षे राहणारा प्रोषक ( शाकीय ) अवयव आणि कळ्या असणारी वनस्पती; यावर अनेकदा पालापाचोळ्याचे आवरण असते.

**Herbaceae** ओषधीय उपवर्ग; हर्बेसी
द्विदलिकित वनस्पतींच्या वर्गातील एक गट; हचिन्सन यांनी येथे सर्व ओषधी आणि त्यांपासून विकास पावलेल्या झुडपांचा समावेश केला आहे.

**hetero-carpous** विषमफली
एकापेक्षा अधिक प्रकारची फळे निर्मिणारी ( वनस्पती ).

**— chlamydeous** विषमपरिदली
संवर्त व पुष्पमुकुट स्पष्टपणे भिन्न असलेले ( फूल ); उदा. जास्वंद, गुलाब.

**— gametic** विषमगंतुकी; विषमयुग्मकी
दोन प्रकारची नर–गंतुके ( पुं–गंतुके ) किंवा स्त्री–गंतुके निर्मिणारी ( अनुक्रमे नर किंवा स्त्री व्यक्ती ); उदा. मनुष्य प्राण्यांत आणि सर्व सस्तन प्राणी, काही मासे, मेलँड्रियमसारख्या अनेक विभक्तलिंगी वनस्पती इत्यादींत दोन प्रकारची पुं–गंतुके ( क्ष व य ) निर्माण होतात; पहा homogametic; X– chromosome; Y– chromosome.

**— gamety** विषमगंतुकता; विषमयुग्मता
दोन प्रकारची नर–किंवा स्त्री–गंतुके असण्याचा प्रकार.

**-- karyon** असम ( विषम ) प्रकल; विषमकेंद्रक
एकाच शरीरकोशिकेतील भिन्न आनुवंशिकता असलेला दुसरा प्रकल.

**-- karyosis** असमप्रकलत्व; विषमकेंद्रकता
दोन किंवा अधिक विषम प्रकल एकाच कोशिकेत असण्याचा प्रकार. उदा. काही अपूर्ण कवक.

**— phyte** परजीवी पादप
अन्य सजीव किंवा मृत पदार्थावर उपजीविका करणारी सजीव वनस्पती.

**hippocrepiform** अश्वक्षुराभ; अर्धवर्तुलाकृति
घोड्याच्या नालाप्रमाणे आकार असलेला; उदा. गर्भ, परागकोश.

**holandric ( Y-chromosomal )** य–रंगसूत्री; वाय–गुणसूत्री
य–रंगसूत्र असलेले.

**holotype ( allotype )** मूलप्ररूप
ज्यावरून प्रथम वर्णन लिहिले गेले तो मूळच्या वनस्पतीचा एकमेव नमुना किंवा तिचा अन्य अवयव.

**homo-chlamydeous** समपरिदली
संदले व प्रदले असा फरक नसलेले ( फूल ); उदा. कमल कुल.

**— gametic** समगंतुकी; समयुग्मकी
एकाच प्रकारची नर– ( पुं– ) किंवा स्त्री-गंतुके निर्मिणारी ( अनुक्रमे नर किंवा स्त्री व्यक्ती ); उदा. काही पक्षी व मासे यांमध्ये नर समगंतुकी व माद्या विषमगंतुकी असतात; पहा heterogametic.

**— gamety** समगंतुकता; समयुग्मता
वर वर्णिलेला प्रकार असणे.

**hydro-chasy** आर्द्रस्फुटन
पहा hygrochasy.

**— sere (hydrarch succession)** जलीय क्रमक
पाणथळ जागी आरंभापासून विकास होणारा पादप-समुदाय अथवा वनस्पतींचा समूह.

**hypotrophy** अवविकास
अवयव किंवा भाग यांची अपूर्ण वाढ.

## I

**identical** समरूप; समान
सर्व दृष्टीने सारखे; उदा. व्यक्ती, अवयव, अपत्य.

**— twins** समान (समरूप) जुळी
एकाच फलित अंड्यापासून बनलेली दोन सारखी अपत्ये; दोन स्वतंत्र अंड्यापासून बनलेल्या दोन सारख्या अपत्यांना सहजात ( fraternal twins ) म्हणतात.

**illegitimate name** अवैध नाम
आंतरराष्ट्रीय संकेत व नियम यांनी मान्य न केलेले प्राणी व वनस्पतींचे शास्त्रीय नाव.

**ineffective publication** अननुवृत्त प्रकाशन
अनुवृत्त प्रकाशनाच्या पद्धतीने केला नसलेला वनस्पतीच्या नावाचा मजकूर; पहा effective publication.

**inermis (unarmed)** अकंटाकित
बिनकाटेरी; काटे नसलेली ( वनस्पती ); उदा. वनजाई (*Clerodendron inerme* (L.) Gaertn).

**infrageneric** (१) अंतर्वंशी; (२) अववांशिक
(१) पहा intrageneric. (२) वंशापेक्षा खालच्या दर्जाचे; उदा. उपवंशातील किंवा त्या दर्जाचे.

**infraspecific** (१) अंतर्जातीय; (२) अवजातीय
(१) पहा intraspecific; (२) वर्गीकरणात जातीपेक्षा खालच्या दर्जाचे; उदा. उपजाती, प्रकार, वाण इ. च्या दर्जाचे.

**inorganic** अकार्बनी; अकार्बनिक; अजैव
खनिज; सजीवाशी संबंध नसलेले ( पदार्थ ).

**intrafoliar** अंतःपर्णी
पानांमधून असलेले; उदा. काही तालवृक्षांचे फुलोरे.

**intrusion** अंतभेदन; अंतर्वेशन
आत घुसून राहण्याची ( वाढण्याची ) प्रक्रिया; उदा. एक अन्यदेशीय वनस्पती दुसऱ्या क्षेत्रात प्रविष्ट होणे; एक ऊतक दुसऱ्यात प्रविष्ट होणे.

**intrusive** अंतर्भेदी; अंतर्वेशी
आत घुसणारे; आत वाढणारे अथवा आत प्रवेश करणारे ( ऊतक ).

**— growth** अंतर्भेदी वृद्धि
दुसऱ्या संरचनेत होणारी ( झालेली ) वाढ.

**invalid name** अयथार्थ नाम; असार्थ नाम
शिष्टसंमत नसलेले नाव.

**isotope** समस्थानिक
दोन किंवा अधिक अणुभार असलेले मूलद्रव्य; अधिक अणुभार असलेली द्रव्ये बहुधा किरणोत्सारी असतात.

**isotype** मूलसम प्ररूप; आयसोटाइप
मूलप्ररूपासारखा दुसरा ( वनस्पतीचा ) नमुना.

## J

**jacket** वेष्टन
अंदुककलश व बीजुकाशय यासारख्या अवयवांभोवती आच्छादन करणारा कोशिकांचा थर.

**Jurassic period** जुरासिक पीरीयड (कल्प)
सुमारे १८ ते १५ कोटी वर्षांपूर्वीचा प्राचीन भूवैज्ञानिक कालखंड; फ्रान्स आणि स्वित्झर्लंड यांमधील ज्यूरा पर्वतांच्या नावावरून बनविलेली संज्ञा.

**juvenile stage** बाल्यावस्था
एखाद्या वनस्पतीचे नित्य शरीर ज्यापासून वाढते ते प्रारंभिक विशिष्ट शरीर ( अवस्था ): उदा. काही शैवले ( कांड शरीरिका; काही लाल शैवले ); पहा Characeae; Rhodophyceae.

## K

**kelp** बृहतशैवल
समुद्रातील मोठ्या आकाराच्या शैवलांचे सामान्य नाव; उदा. लॅमिनेरिया, मॅक्रोसिस्टिस, इ.

**kernel** गाभा
आठळीफळातील अंतः कवचाने वेढलेला आतील भाग (बी); उदा. नारळातील खोबरे; बदाम बी; पहा nut.

**kinetochore** तर्कुयुज
रंगसूत्राची हालचाल दिग्दर्शित करणारा व वैशिष्ट्य पावलेला, त्यातील भाग; पहा centromere.

## L

**lactose** दुग्धशर्करा; लॅक्टोज
दुधात निसर्गतः आढळणारा साखरेचा प्रकार.

**laevigate (laevis, levigate)** चिक्कणपृष्ठी
गुळगुळीत व चकाकीत पृष्ठभाग असलेले ( पान, साल, फळ, इ. ); उदा. *Ehretia laevis* Roxb. =धत्रंग ( अजानवृक्ष ).

**land-capability** भूक्षमता; मृदाक्षमता
जमिनीत असलेल्या विविध प्रकारच्या उपयुक्त भिन्न घटकांच्या गुणधर्मानुसार तिचे ( पोषण ) सामर्थ्य (क्षमता, गुणवत्तता); बव्हंशी हे जमिनीतून होणाऱ्या धुपावर अवलंबित असते; जितकी धूप कमी, तितकी गुणवत्तता अधिक.

**layer of vegetation** वनश्री-स्तर; पादप-स्तर
एकूण वनश्रीत आढळणाऱ्या अनेक आडव्या थरांपैकी एक थर; भिन्न विकासावस्थेत थरांची संख्या भिन्न असून एकूण वनश्रीचे स्वरूप बदलते असते; तसेच प्राण्यांच्या चरण्याच्या क्रियेने व इतर कारणांमुळे थरांची संख्या व स्वरुप बदलते.

**leaflet** पर्णक; पर्णिका
पहा pinna, pinnule.

**lectotype** अभिप्ररूप; लेक्टोटाइप
मूळच्या प्रातिनिधिक नमुन्यांपैकी निवडलेला वनस्पतीचा एक नमुना किंवा अन्य घटक; विशेषतः मूळचा नमुना उपलब्ध नसेल किंवा प्रसिद्धीच्या वेळी त्याचे नामकरण झाले नसल्यास घेतलेला नमुना; पहा allotype; holotype.

**legitimate name** वैध नाम
आंतरराष्ट्रीय नियम व संकेत यानुसार दिलेले नाव.

**lenticel** वल्करंध्र
झाडाच्या सालीवरचे वायु-विनिमयाचे छिद्र ( रंध्र ); पहा bark.

**life-span** जीवनकाल; आयु:काल
एखाद्या वनस्पतीचा ( किंवा प्राण्याचा ) जिवंत स्थितीत असण्याचा काळ.

**light-perception** प्रकाशज्ञान; प्रकाशावगम
वनस्पतींना प्रकाशाचा तीव्रपणा, मंदपणा, अभाव इ. यांची जाणीव होण्याची प्रक्रिया; प्राण्यांच्या बाबतीत बहुधा ही जाणीव विशेषत्व पावलेल्या अवयवांद्वारे ( इंद्रियाकरवी ) होते, परंतु वनस्पतीत तसे अवयव फारच क्वचित आढळतात; पहा eyespot.

**Lignosae** काष्ठीय उपवर्ग; लिग्नोसी
हचिन्सन यांनी मान्य केलेला द्विदलिकित वनस्पतींच्या वर्गातील दोन्हीपैकी एक गट; यामध्ये मूलतः क्षुप व वृक्ष या काष्ठमय वनस्पतींचा व त्यांचेपासून उद्‌भवलेल्या ( उत्क्रांत झालेल्या ) ओषधीय वनस्पतींचा अंतर्भाव होतो.

**lithosere** शैलक्रमक
खडकावर विकास पावणारा पादपसमुदाय.

## M

**macromolecular** महारेणवीय; बृहद्रेणवीय
फार मोठा रेणुभार असलेले; उदा. कोशिकेतील लहान मोठे घटक : प्रथिने, लिपिडे, बहुशर्करा.

**majus** बृहत्तर
अधिक मोठे या अर्थाची लॅटिन संज्ञा; हिचा वापर वनस्पतींच्या शास्त्रीय नावात गुणनामाकरिता केलेला आढळतो; उदा. *Antirrhinum majus* L.

**male gamete (sperm)** पुं-पेशी; नर-पेशी; रेतुक
पहा sperm.

**mangrove formation** कच्छ-समावास
नद्यांच्या मुखाजवळ आणि उष्ण कटिबंधात इतरत्र जेथे दैनिक भरतीच्या वेळी भरपूर खारे पाणी जमते व ओहोटीच्या वेळी तेथे सतत साचलेला चिखल उघडा पडतो अशा ठिकाणी वाढणाऱ्या विशिष्ट वनस्पतींचा समुदाय.

**manubrium** हस्तक-कोशिका
पहा handle-cell.

**master-factor** प्रधान घटक; प्रघटक
विशिष्ट क्षेत्रात महत्त्वाच्या ( प्रमुख ) दर्जाच्या पादप-समुदायाच्या अस्तित्वाबद्दल जबाबदार असलेला परिस्थितीतील घटक; उदा. डोंगराची उंची, पर्जन्यमान, जमिनीतील लवण किंवा पाणी, इ.

**maximus** महत्तम
फार मोठे या अर्थाची लॅटिन संज्ञा; उदा. भोपळ्यासारख्या ( *Cucurbita maxima* Duchesne ) फार मोठ्या फळाची वनस्पती.

**medulla** ( १ ) निकाष्ठ; ( २ ) तंतुजालक
( १ ) पहा pith; medulla; ( २ ) कवकातील जालाश्म किंवा तत्सम मोठ्या रचनेतील अनेक सुट्या तंतूंचा गुंता; धोंडफुलाच्या शरीरातील कवकतंतूंचा विरळ थर. पहा sclerotium; Lichens.

**meiospore** एकगुणित बीजुक
अर्धसूत्रणाने बनलेले बीजुक.

**member** अवयव
आकारविज्ञानाच्या दृष्टीने एखाद्या वनस्पतीचा कोणताही भाग.

**Mesozoic era** मध्यजीव महाकल्प; मेसोझोइक ईरा
सुमारे २३ कोटी ते ९ कोटी वर्षापूर्वीचा भूशास्त्रीय कालखंड; पुराजीव महाकल्प आणि नवजीव महाकल्प यांमधील कालखंड.

**metazenia** परागप्रभाव
स्त्रीलिंगी अवयवांतील कोशिकांच्या समूहावर दिसून येणारा परागाचा प्रभाव ( परिणाम ).

**micella** श्लेषिका
